म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
1-10-33

# धर्मवीर राजे
# [illegible] भोसले.

## यांचें चरित्र

लेखकः— पांडुरंग गोपाळ रानडे.

REFBK-00048-7

६८९०

चारित्र ७८३
१-१०-३३

॥ श्रीरामप्रसन्न ॥

श्रीमंत धर्मवीर, धर्मविभूषण

# राजे लक्ष्मणराव भोंसले नागपूरकर, यांचें चरित्र.

REFBK-0004837

प्रपंचीं जन... ...न जसे ।
स्वभावें ते ... ...ं नसे ॥
अलिप्ती संसारीं अविगत तयांची परि असे ।
विलोकीं, लोकांच्या वसति शिरिं कां ते कमलसे ॥१॥

[ प्रथम सांवत्सरिक वाङ्मय श्राद्ध. ]

लेखकः—पांडुरंग गोपाळ [illegible]

१९३३.

किंमत अडीच रुपये.

९-१०-३३
४८३०

प्रकाशकः—

महादेव अनंत घारे,

महाराष्ट्र औषधी कारखाना,

श्रीरंगूबाई पॅलेस, बेळगांव.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क लेखकांनीं आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

मुद्रकः—

बी. व्ही. अयनापूर,

मॅनेजरः-श्रीरामतत्त्व-प्रकाश प्रेस, बेळगांव.

# प्रास्ताविक चार शब्द.

## कर्मण्येवाधिकारस्ते ।



श्रीमंत धर्मवीर राजे लक्ष्मणराव साहेब भोंसले यांचें चरित्र लिहावयाला आम्हीं गेल्या गणेशचतुर्थीचे दिवशीं ह्मणजे तारीख ४।९।३२ इ. रोजीं प्रारंभ केला. राजेसाहेबांचे देहावसानानंतर त्यांचें चरित्र लिहिण्याचें कार्य आपण हातीं घ्यावें कीं न घ्यावें, याच विवंचनेंत दोन तीन महिने गेले. या विवंचनेचा हेतु एवढाच होता कीं, राजे साहेबांसारख्या थोर पुरुषाचें चरित्र लिहावयाला एकाद्या थोर विद्वान गृहस्थानेंच हें कार्य हातीं घेणें इष्ट होतें. परंतु शेवटीं आमचें मनांत अशी एक कल्पना आली कीं, प्रत्यक्ष डोळ्याला दिसणाऱ्या गोष्टीचें भविष्य सांगण्याकरितां कुंडली मांडून भविष्य वर्तविणाऱ्या विद्वान् ज्योतिषाची जशी जरूरी नसते; किंवा तर्कशास्त्राच्या जोरावर नवीन आडाखे बसवून लोकांना विस्मयचकित करून सोडावयाचें नसलें ह्मणजे जशी तर्कशास्त्रज्ञाची जरूरी भासत नाहीं त्याचप्रमाणें गेल्या वीस वर्षांपासून राजेसाहेबांचा व आमचा स्नेह असल्यामुळें त्यांची सर्व कामगिरी आमच्याच डोळ्यांसमोर झाली, तेव्हां वस्तुस्थिति निवेदन करण्याकरितां एकाद्या जाडया विद्वानाचीच जरूरी आहे, असें आमचें मन आह्मांला साक्ष देईना; ह्मणून त्याच मनोबळावर आह्मीं चरित्र लिहिण्याचा संकल्प केला; त्याप्रमाणें हें चरित्र लिहिलें जाऊन राजेसाहेबांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं वाचकांच्या हातीं पडण्याकरितां प्रसिद्धिकरणाचा योग आला !

## मराठी रियासतकार व चरित्रकार.

आह्मीं राजेसाहेबांच्या या चरित्राच्या मुख्य विषयाला आरंभ करण्यापूर्वी पहिलीं सुमारें शंभर पृष्ठें नागपूरकर भोंसल्यांची पूर्वपीठिका आणि त्यांचा त्रोटक इतिहास देण्यांत गुंतविलीं आहेत. याचा मुख्य हेतु एवढाच कीं, सातारकर भोंसले आणि नागपूरकर भोंसले यांच्या शाखा कोणत्या पुरुषवृक्षापासून निघाल्या, हें आजपर्यंत इतिहासाचें संशोधन विशेष काळजीपूर्वक करून प्रसिद्धीला आलें नव्हतें, तें आणण्याचा आह्मीं प्रयत्न केला आहे. नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्वपीठिकेवर टॉडसारख्या इंग्रजी इतिहासकारांनीं कांहीं शिंतोडे टाकले आहेत, परंतु त्यांचा परामर्ष

आह्मांला स्वतःला या प्रसंगीं त्यांच्यावर देखरेख करून त्यांचेकडून काम करून घेण्याचा प्रसंग आल्यामुळें व रोज सुमारें अठरा वीस तासप्रमाणें वीसएक दिवस त्यांनीं काम केल्यामुळें त्यांच्या परिश्रमाला खरोखरच मोल नाहीं, असें आह्मांला वाटतें. ह्मणून त्यांचे परिश्रमाकडे पाहून आह्मांला रा. फकिराप्पा बसाप्पा नेगिनहाळ, सटवाजी परशराम खांडेकर, रामचंद्र कृष्णाजी पवार, सिदराम चनवीरप्पा काकतीकर आणि सटवाजी फकीरप्पा जंगळे या पांच इसमांचें आह्मी प्रेमपूर्वक अभिनंदन करतों. त्याचप्रमाणें छंपाईचें काम करणारे रा० ओमाण्णा टोपाण्णा धामणेकर हे या छापखान्याच्या सुरवातीपासून ह्मणजे सुमारें पन्नास वर्षांचे जुने नोकर आहेत. त्यांच्या वयाला पाऊणशें वर्षे झालीं असतांही प्रेसवर रात्रीं अपरात्रीं काम करूनसुद्धां त्यांनीं छपाईचें काम फारच नामी व कळकळीनें केलें आहे. त्याबद्दल त्यांचेंही आम्ही मनःपूर्वक अंभिनदन करतों.

## ‘ कर्नाटक फोटो झिंको ’ प्रेस.

आतां शेवटीं या चरित्रांतील ब्लॉक करणारे रा० परशराम राजवा पवार धारवाडकर, मालक कर्नाटक फोटो झिंको प्रेस—बेळगांव, यांनीं आपली गरीब स्थिति असतांहि बेळगांवीं तीन चार वर्षांपूर्वी फोटो झिंको प्रेस काढला; ते स्वतः शोधक वृत्तीचे गृहस्थ असल्यामुळें उद्योगांत मिळविलेले पैसे नवीन शोधाच्या प्रयोगांतच त्यांचे सामान्यतः जातात. त्यांनीं प्रोसेस कॅमेरा स्वतः घरींच तयार केला आहे. त्यांनीं ब्लॉकचें काम काळजीपूर्वक व वक्तशीर तयार करून छापून दिल्याबद्दल त्यांचेंही अभिनंदन करावयाला आह्मांला मोठा आनंद होतो.

शेवटीं या चरित्राच्या प्रिय वाचकांनीं आपुलकीच्या नात्यानें याचा स्वीकार करावा, अशी त्यांना विनंति करून हे ‘ प्रास्ताविक चार शब्द ’ आह्मी पुरे करतों.

बेळगांव
ता. २४ मे सन १९३३ इ.

**पांडुरंग गोपाळ रानडे.**



# अर्पण-पत्रिका.

## वृत्त-द्रुत विलंबित.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | वि | क | री | नृ | प | व | र्ण | न | वा | टि | का |
| न | व | ल | पु | ष्प | रि | घे | ज | णुं | वे | त्रि | का |
| क | थ | न | तें | क | रि | तें | न | व | प | र्वे | णीं |
| क | व | न | कू | ज | न | ल | क्ष्म | ण | ल | क्ष | णी |
| र | त | स | दा | ज | रि | अ | र्प | ण | के | लि | या |
| वि | धि | प | दीं | म | न | अ | न्त | र | सां | डि | या |
| म | धु | र | मी | ल | न | अ | र्थ | वि | का | स | ला |
| ल | लि | त | भा | ज | न | द | र्प | ण | भा | स | ला |
| क | व | न | कू | ज | न | ल | क्ष्म | ण | व | र्ण | नी |
| सु | म | न | अ | र्पि | त | सा | धु | नि | प | र्वे | णी |
| न | व | सु | सू | क्ष्म | चि | ल | क्ष्म | णिं | प | त्रि | का |
| क | थ | न | सा | र्थ | क | हो | म | म | वा | च | का |

पांडुरंग गोपाळ रानडे.

महाराष्ट्र औषधी कारखाना—रंगुबाई पॅलेस—बेळगांव.

बेळगांव. ता. २३-५-१९३३.

B. R. T P.

# चित्रादिकांची अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक | चित्र | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | श्रीमंत धर्मवीर धर्मविभूषण नामदार राजे लक्ष्मणराव भोंसले. | १ |
| २ | श्री. राजे बहाद्दूर जानोजी महाराज आणि त्यांचा वंशविस्तार | १०० |
| ३ | श्री. मातोश्री राणी काशीबाईसाहेब आणि त्यांचे भाग्यशील नातु... | १०१ |
| ४ | श्री. राजे लक्ष्मणराव वय वर्षे ४... ... | ११० |
| ५ | श्री. राजे लक्ष्मणराव वय वर्षे ८... ... | १११ |
| ६ | श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाईसाहेब व राजेसाहेब ... | १४० |
| ७ | श्री. राजेसाहेब ( वय वर्षे १६–१७ ) पंचहत्यारी ... | १४१ |
| ८ | हांकेमारी ... ... ... | १५४ |
| ९ | आदमखोरा वाघ ( पृष्ठ १७२ ) व राजेसाहेब ... | १५५ |
| १० | श्रीमत्सद्गुरु सच्चिदानंद श्री ब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर | १८८ |
| ११ | श्री. सौ. राणी इंदिराबाईसाहेब आणि त्यांचीं अपत्यें | १८९ |
| १२ | राजेसाहेबांचा विलायतचा प्रवास ... | १९४ |
| १३ | राजेसाहेबांचें हस्ताक्षर ... ... | १९५ |
| १४ | श्रीमज्जगद्गुरूंनीं दिलेलें श्रीमुख ... ... | १९६ |
| १५ | प्रायश्चितानंतर नागपुरांतील मराठा क्षत्रिय मंडळ ... | २१२ |
| १६ | उपनीत क्षत्रिय बटुगण मध्यभागीं श्री. कुं. प्रतापसिंह | २१३ |
| १७ | पाद्यपूजेनंतर श्री. शंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) व राजेसाहेब | २३० |
| १८ | पुणें येथील लघुरुद्रांतील वैदिक ब्रह्मवृंद व राजेसाहेब. | २३१ |
| १९ | श्री. सर गंगाधरराव चिटणवीस, के, सी. आय. ई. ... | २७० |
| २० | श्री. व्यंकटराव गुजर, डॉ. मुंजे व श्री. गोपाळराव ओगले... | २७१ |
| २१ | मध्यप्रांताचे गव्हर्नर ना. सर फ्रँक स्लाय व राजेसाहेब वगैरे... | २८४ |
| २२ | राजेसाहेबांची दसऱ्याची स्वारी ... | २८५ |
| २३ | श्री. पहिले रघोजी यांची छत्री व तेथील मिरवणूक ... | ३४६ |

| अनुक्रमांक | चित्र | पृष्ठ |
|---|---|---|
| २४ | श्री. पहिले रघोजी यांच्या पुण्यतिथीची समारंभ ... | ३४७ |
| २५ | श्री. कुं. प्रतापसिंह भोंसले ... | ३५२ |
| २६ | श्री. कुं. प्रतापसिंह भोंसले ( दांडपट्टा खेळत असतांना )... | ३५३ |
| २७ | श्री. कुं. प्रतापसिंह यांचें नवव्या वाढदिवसाचें काव्यात्मक शुभचिंतन | ३६८ |
| २८ | संक्रांतीनिमित्त राजसाहेबांस काव्यात्मक तिळगुळ ... | ३६९ |
| २९ | बेळगांवच्या मानपत्रानंतर. मध्यभागीं राजेसाहेब ... | ३७८ |
| ३० | शारीर शिक्षणाचे आदर्श. श्रीछत्रपति शाहुमहाराज ... | ४०० |
| ३१ | श्रीरंगूबाई पॅलेसचा कोनशीला समारंभ... ... | ४१० |
| ३२ | श्रीलक्ष्मीविलास थिएटरचा उद्‌घाटन समारंभ... ... | ४११ |
| ३३ | नागपूर येथील मराठा क्षत्रिय मंडळ ...... | ४१८ |
| ३४ | क्षत्रिय उपकारिणी सभा. मध्यभागीं श्री. दुर्जनशालसिंह व राजेसाहेब | ४१९ |
| ३५ | अखिल भारतीय अहिर सुवर्णकार शिक्षण परिषद-जळगांव ... | ४३० |
| ३६ | श्रद्धानंद अनाथलयाचा उद्‌घाटन समारंभ होशंगाबाद ... | ४३१ |
| ३७ | श्री. राणी काशीबाईसाहेब यांच्या छत्रीचा कोनशीला समारंभ...... | ४३२ |
| ३८ | कौन्सिल ऑफ स्टेट, दिल्ली ... .. | ४३३ |
| ३९ | हिंदुस्थानचे व्हॉईसराय लॉर्ड व लेडी एर्वीन आणि राजेसाहेब. | ४३४ |
| ४० | उदेपूरच्या महाराणाजींच्या भेटीनंतर राजेसाहेब, श्री. रानडे व रामराव | ४४४ |
| ४१ | श्री. राजेसाहेबांचे कौन्सिल ऑफ स्टेटमधील मदतनीस ... | ४४५ |
| ४२ | श्री सोनेगांव येथील रथोत्सव ... ... ... | ४४५ |
| ४३ | जगद्विख्यात पहेलवान गामा आणि इमामबक्ष ... ... | ४४६ |
| ४४ | बद्धकाव्यहार ( चित्रकाव्य ) ...... | ४७२ |

# अनुक्रमणिका.


## प्रास्ताविक चार शब्द. ३–६

## प्रकरण १ लें–नागपूरकर भोंसले घराण्याची पूर्वपीठिका.

' भोंसले ' घराणें व तिच्या पूर्वपीठिकेची आवश्यकता १-२ स्वधर्मरक्षणापुढें स्वराज्यस्थापनेचें कार्य दुय्यम प्रतीचें ३ ' भोंसले ' ह्मणजेच उदेपूरचें सिसोदिया घराणें ४-५ 'भोंसले' नांवाची उपपत्ति ६ सातारकर व नागपूरकर भोंसले यांचे मूळ-पुरुष ७ परसोजी व सरदेसाई ७-८ नागपूरकर भोंसल्यांचा मूळपुरुष परसोजीच–बाबाजी भोंसले सातारकर भोंसल्यांचा मूळपुरुष, त्यांचा सख्खा भाऊ ८-१९ दोन्ही भोंसल्यांचा मूळपुरुष संभाजी २० नागपूरकर भोंसले यांचें कुलदैवत श्रीरामचंद्र २० रामाजीपंत कोल्हटकर २१ कोन्हेरराम कोल्हटकर २२.

## प्रकरण २ रें:–पहिला सेनासाहेब सुभा-परसोजी भोंसले.

रायगडावरून परसोजीची हद्दपारी २३-२४ परसोजीचा उदय २४-२६ परसोजी व छत्रपति राजाराम २६-२७ पाळेगारांचा सेनासाहेब सुभा २८ परसो-जीची महनीय कामगिरी २९ राजाची भाम ३० छत्रपति राजारामकालीन मराठी राज्याची स्थिति–राजारामाचा अंत २९-३५ रामचंद्रपंताला परसोजीचें पाठबळ ३५-३६ ताराबाईची अमदानी–औरंगजेबाचा मृत्यु ३६-३९ शाहूची सुटका ४० त्यास परसोजी मिळतो ४० ताराबाईची हिकमत ४१ हिंगणीकर बापूजी भोंसले शाहूबरोबर एके तार्टी जेवतात ४३ खेडकडूसची लढाई–प्रतिनिधीचा पराभव ४५ शाहूस राज्याभिषेक ४५ शाहु परसोजीला सनद देतो, सनदेचें पुनरु-जीवन ४६-४७ साबाजी भोंसले याला सनद ४७-४८ कृतज्ञ परसोजी ४८ परसो-जीचा मृत्यु ४९ परसोजीच्या कामगिरीचें सिंहावलोकन ५०-५१.

## प्रकरण ३ रें:– दुसरा सेनासाहेब सुभा-कान्होजी भोंसले.

कान्होजीला सेनासाहेब सुभा हें पद देण्याचें कारण ५२–५३ कान्होजीची कामगिरी व तीबद्दल शाहूकडून त्याचा बहुमान ५३–५४ कान्होजी वगैरेंच्या

आंगीं स्वतंत्रतेचें वारें ५४ शाहु व ताराबाई ५५ बाळाजी विश्वनाथ पेशवा होतो ५६ फिरोकशायर व सय्यदबंधू ५७ सय्यदबंधू व शाहु ५७—५९ कान्होजीचा पहिला अपराध ५९ मराठ्यांच्या मदतीनें सय्यदबंधू बादशहास ठार करितात ५९-६० पेशवे दिल्लीहून साताऱ्यास येतात ६० निजामउन्मुलुख व सय्यदबंधू ६१ बऱ्हाणपूरची लढाई ६२ बाळापूरची लढाई ६२ निजामउन्मुलुख दक्षिणचा सुभेदार होतो ६३ वजीर होऊन दिल्लीला जातो ६३ निजामचे सरदार व कान्होजी भोंसले वगैरे मराठे सरदार कर्नाटकांत लढतात ६४ निजाम दक्षिणेस परत येतो ६४ साकरखेडलें येथील लढाई ६५ कान्होजी भोंसले व निजाम-बालाघाटची लढाई- भोंसल्यांचा पराभव ६६ कान्होजी साताऱ्यास येतो ६७ कान्होजी व राणोजी-सरंजामी तंट्याचा निकाल शाहु करितो ६७-६९ मराठी दरबारांतील दुफळी व निजामाचा कावा ६९-७० पालखेडची लढाई ७० कान्होजीची साताऱ्यास दुसरी भेट व ‘ सेनासाहेब सुभा ’ या पदावर गदा ७०-७३.

## प्रकरण ४ थें:— नागपूरकर भोंसले.

पहिला रघोजी व कान्होजी ७५-७६ रघोजी देवगडचे राजे चांद सुलतान यांचेकडे येतो ७६ त्याचें साताऱ्यास आगमन व शाहूशीं परिचय ७६ कर्नाटकांतील कामगिरी, वाघाची शिकार यांहींकरून शाहूची मर्जी बसते ७६ रघोजीचें सुलाबाईशीं लग्न ७७ कान्होजीवरील शाहूची इतराजी- रघोजीला सेनासाहेब सुभा पद देण्याचे आधीं शाहूची दक्षता—रघोजीबरोबर शाहूनें दिलेलें मंत्रिमंडळ ७७-७९ रघोजी वऱ्हाडांत जातो, देवगडच्या राजपुत्रांना संकटमुक्त करितो ७९ कान्होजीला रघोजी पकडतो-भामला येऊन मंत्रिमंडळ स्थापतो—परत साताऱ्यास कैदी कान्होजीला घेऊन जातो—कान्होजीची अखेर—रघोजी भामला परततो ८० नागपूर राजधानीची जागा कां केली ? ८१ रघोजीचा पराक्रम-पेशवा व रघोजी ८२ दत्तक प्रकरणांत रघोजीवर पेशव्यांची मात ८२ उभयतांत वितुष्ट पण कारभाराकरितां दिलजमाई ८३ रघोजी व बंगाल—मराठा डिच — भास्कररामची कत्तल व ‘ मुंडकटाई ’ ८३ रघोजीची अखेर—त्याच्या राज्याचा विस्तार — त्याच्या शिक्क्यावरील श्लोक ८४ पहिला जानोजी — सोनपतपानपत—नानासाहेब पेशव्याबरोबर जानोजीही अर्ध्यांच वाटेवरून परततो — माधवराव पेशव्याची कारकीर्द, राक्षस-

भुवनची लढाई ८५ पेशव्यांशीं बांधा — गोपाळराव पटवर्धनांची मध्यस्थी ८६ जानोजीचा मृत्यु ८६ दुसरा रघोजी-साबाजी नाखूष होतो-त्याला पेशवा माधवराव पाठीशीं घालून सेनासाहेब सुभा पद देतो-साबाजीविरुद्ध दुसरा रघोजी व त्याचा जनक पिता मुधोजी ८६ पुणें येथील बारभाई ८७ मुधोजी साबाजीला लढाईत ठार करितो ८८ पुन्हां दुसरा रघोजी- त्याचे बंधू चिमणाबापू व व्यंकोजी- व्यंकोजी 'सेनाधुरंधर' ८८ खडर्याची लढाई-रघोजीची बाणवृष्टि, मुसारेणूची दाणादाण, रघोजीच्या कामगिरीचा गौरव ८९ मराठी साम्राज्याच्या ऱ्हासाचें कारण ९० रघोजी व इंग्रज ९० रघोजीचा मृत्यु ९१ 'आंधळे परसोजी, कारभारी आप्पासाहेब,' बांकाबाईचें कारस्थान, परसोजीचा अकस्मात मृत्यु, 'काशीबाईचें मंदीर' ९१-९२ मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब, इंग्रजांशीं कटकट, तुळशीबागेच्या रस्त्यावरील धुमश्चक्री, सात कबंधें, फितुरीमुळें आप्पासाहेब पराभूत होऊन कैद होतो, कैदेंतून निसटतो व जोधपुरास जातो- 'कानफांटे' आप्पासाहेब ९२ महामंदीर ९२-९३ आप्पा-साहेबांची लोकप्रीयता ९३ नायकिणीला आंगठी बक्षिस देतात ९४ जोधपूर दर-बारला ओळख पटते ९४ इंग्रज व जोधपूर दरबार ९५ दरबारचा बाणेदारपणा ९५ आप्पासाहेबांची राजजिन्हांकित अखेर-'कागा' ९५ तिसरा रघोजी-इंग्रजांशीं नवा तह कीं 'आह्मी नागपूरचें राज्य वंशपरंपरागत चालवूं'—रघोजी निपुत्रिक, दत्तक न घेतां मरतो ९५ डलहौशी नागपूरचे राज्य खालसा करितो ९६ नागपूरचे राजे इंग्रजांचे पेन्शनदार ९६ दुसरा जानोजी 'राजा बहादूर ऑफ देऊर'—तीन राण्या करूनही संतति नाहीं- पुनः वधुसंशोधन ९६ सप्तकुळी ९७ मराठा राजघ-राण्यांतील वधुपरिक्षेची जुनी चाल ९७—९८ काशीबाई व तुळशीबागेंतील अद्भुत रम्य प्रसंग ९९ काशिबाई पसंत पडून लग्न होतें १००

## प्रकरण ९ वें—श्रीमंत राजे लक्ष्मणराव

जन्मकथा १०१-१०४ ( नागपूरचा भांडारखाना विलायती गंगाजळींत १०१ 'मोतींवाले भोंसले' पण पुत्ररत्नामुळें कष्टी १०२ नवसांचें सार्थक 'रघोजी' व 'लक्ष्मण' यांची प्राप्ति १०२ राजे लक्ष्मणराव यांना जन्मतांच तोफां-ची सलामी १०३ ) जन्मोत्सव १०४—१०९ ( हत्तीवरून साखर वांटली १०४-१०५ पुत्रप्राप्तीबद्दल सार्वत्रिक आनंदप्रदर्शन १०५ ज्योतिषांची गडबड आणि

विसंगत जातक १०६-१०७ राजेसाहेबांची कुंडली १०७ या कुंडलीवरून वर्तविलेलें जातक १०८ बारशाचा समारंभ—नामकरणविधि १०८—१०९ ) बालपण १०९—११० पितृवियोग ११०—१११ शिक्षण १११—१२० ( आधुनिक जिजाबाई १११—११२ शाहाण्णव कुळी बाजीराव प्राथमिक शिक्षक—राजेसाहेबांच्या शिक्षणाचा रोजचा ठराविक कार्यक्रम—राजेसाहेब आणि त्यांचे खेळगडी ११२-११३ राजेसाहेबांचें उपनयन ११३ इंग्रजी शिक्षक राघोबा बावीस्कर-आधुनिक दादोजी कोंडदेव ११३-११४ विश्वनगरी ११४-११८ श्रीशिवाजी-महाराजांच्या धोरणाची मीमांसा - सत्य हाच हिंदुधर्म ११९-१२० क्षत्रियांना एकदेशीय शिक्षण नको १२० ) कुस्ती १२१-१२४ [ शागीर्द राजेसाहेब वस्ताद छोटुमिया - दीक्षासमारंभ १२१-१२२ कुस्तींतील प्रवीणता- दहा वर्षे शिक्षण घेतात - या कसरतीचा दैनिक कार्यक्रम १२२--१२४ ] खुराक १२४-१२६ [खुराकाचें शास्त्र-दौड करण्याच्या आधींचा खुराक, पांच मोरावळे, ते तयार करण्याची कृति १२४-१२५ दौडीनंतर कसरत, तीनंतर थंडाई, ती तयार कशी करीत ? १२५ दुपारचे भोजनांत गहूं जास्त, मधल्या वेळीं मुरब्बा, रात्रौं झोंपण्याच्या वेळीं दूध १२५-१२६ आठवड्यांत एक दिवस सुटी, त्या दिवशीं मालीस, मालीसनंतर तेल-खंडीचें तलावांत पोहणें १२६ ] दांडपट्टा १२६-१२९ [वस्ताद लक्ष्मणसिंग १२६ राजेसाहेबांचे सहाध्यायी १२७ पट्टयाच्या शिक्षणांतील गुरुकिल्ली १२८ सर्व फेकांचा राजेसाहेबांनीं बसविलेला एक हात १२९ ] फरीगदगा १२९-१३२ [ पवित्र्याचें महत्व १३० हूल, हुलकावणी किंवा बाव्हेली १३१ फरीगदग्याचें रहस्य १३२ ] बोथाटी किंवा बंधाट १३२-१३३ खांडा १३३ धनुर्विद्या १३३-१३५ [ लक्ष्मणसिंग वस्तादचा राजेसाहेबांना अंतकाळचा उपदेश १३४-१३५ ] बिनोट १३५ — १३८ [ वस्ताद अल्लिमिया १३५ पंचहत्यारी जानोजी महाराज १३६ राजा-रामसिंह यांचा व्रतबंध १३६ उदेपुरी क्षत्रिय कुमाराचें शस्त्रास्त्रकौशल्य १३७ फरीगदग्यांत राजेसाहेबांची चढाई १३८ राजेबहादूर व राजेसाहेब यांचा बिनोटचा खेळ १३८ ] लाठी १३९ [ वस्ताद अब्रदुल्लामिया ] दख्खनी घोड्यावर बसणें १३९ ( घोड्यावरील सर्व प्रकारची कसरत ) बावीस्कर मास्तरांचा मृत्यु १४० इंग्लिश शिक्षणासाठीं मिशनस्कूलमध्यें जातात १४० प्रपंचप्रवेश १४०-१४२ [ पुरुषार्थांची मीमांसा १४०-१४१ प्रपंचांत पत्नीचें महत्व- १४१ प्रथम सुमुहूर्त—सावधान - टोलेजंग समारंभ १४२ भोंसला इस्टेटीची वांटणी १४२ ]

## प्रकरण सहावें:—वाघाची शिकार.

प्रास्ताविक १४३-१४४ [ शिकारीचा नाद वेडा १४३ घरची मंडळी अडचणी उत्पन्न करतात १४३ शिकारी इसमाचीं कधींच खरीं न होणारीं वचनें १४४ ] पूर्वतयारी व प्रवासाचा मार्ग १४४-१४७ [ राजेसाहेबांचें शिकाराचें स्थान 'झाडी' १४४ वाघाच्या शिकारीचा मोसम-उन्हाळा १४५ रेंग्या हरिणाच्या शिकारीच्या उपयोगी १४५ कार्दे येथील नदीकांठचा सुखकर मुक्काम १४६ भंडारा जिल्ह्यांतील कोंकण-'झाडी' १४६ शेवटचा मुक्काम डिघोरी १४७ [ शिकारीचीं ठिकाणें १४७—१४९ [ मांडवाखालचे शामीरखां शिकारी १४७ 'घोवल' १४८ 'भडक' आणि गाढवी नदी-वाघाची दिवसां फेरी १४८ डिघोरीचा जंगली तलाव १४८ अस्वल घोडी १४९ लामटा राणी तलाव—अकरा ते तेरा फुटांचे पट्टेदार वाघ १४९ ] प्रत्यक्ष शिकारीची तयारी १४९—१५१ [ डिघोरीच्या कामदाराची कामगिरी— 'गारा' बांधून तो झाला कीं नाहीं पहाणें १५० 'मचान'-करितां जंगल-बंडोबा तुपकर आघाडीचे व्यवस्थापक १५० पहाणी १५१ ] जखमी वाघ व म्हशीचा कळप १५१—१५३ [ अंता पाटील व वाहदखां १५१ जखमी वाघाचा अनावर भयंकरपणा १५२ त्याला तोंड म्हशींचा कळप १५२ ] राजेसाहेबांची शिकारस्वारी १५३-१५४ [ जुनी व नवी शिकारी मंडळी-मुसलमान, मराठे, ब्राम्हण १५३ अर्जुनीपर्यंत रेल्वेप्रवास - ब्रम्हपुरी येथील डाक बंगला १५३ ] हांकेमारी व शिकार १५४—१५६ [ हांके लोकांची संख्या चारपांचशें, त्यांचें वर्तुल, त्यांच्यापुढें म्हशींचा कळप, 'मचान' खालून जनावरें निघून जाण्याला मार्ग १५४ वाघाच्या आगमनाचा पूर्वसूचक मोर -वाघाचा एकीएक मित्र १५५ शिकारीनंतरचें गांवकऱ्यांकडून स्वागत १५६ राजेसाहेबांच्या शिकारी बंदुका १५६ ] राजेसाहेबांची बॅग ( एकंदर शिकार ) १५६-१५७ [ राजेसाहेब निशाणाचे बहाद्दर होते १५७ ] पळत्या वाघिणीची शिकार १५७—१६४ [ बरोबर श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाईसाहेब, शिकारीची सर्व व्यवस्था वृद्ध शामीरखांकडे १५७—हांक्यांत एक पट्टेदार वाघीण निघाली-म्हशींनीं वाघिणीला हुसकलें १५८ पळत्या वाघिणीवर राजेसाहेबांनीं गोळी चालविली १५९ शामीरखांचा संताप १५९ राणीसाहेबांची धूर्तता १६० बंडोबा तुपकरांचा शोध, 'शेर जखमी हो गया,' बुड्ढयानं बेचाळीस कुळं उद्धारलींन !' १६१ जखमी

वाघिणीचा शोध ह्मैस लावते १६२ बलदारखां वस्तादांचें तोंड, शामीरखांची सपशेल माफी १६३ राजेसाहेबांचें मोठें मन १६४ ] ध्वनिवेधानें केलेली शिकार १६४-१७२ [ लामटा गांवीं ' गारा ' बांधला १६५ बोली बोलणारा, आदमखोरा वाघ १६६ राजेसाहेबांच्या दृढनिश्चयाची पंचमहाभूतें परीक्षा पहातात १६८ तुफानांत ' गारा ' करण्याचा वाघाचा प्रयत्न १६९ आवाजाच्या अनुरोधानें राजेसाहेब गोळी चालवितात १७० वाघाच्या वर्मी गोळी १७१ निंदक तेच स्तुतिपाठक १७२ ] आदमखोऱ्या वाघाची पायीं शिकार १७२-१८६ [ सिंह वाघापेक्षां श्रेष्ठ कां ? १७२ वाघाची शिकार पायीं करणें धोक्याचें १७३ नागपुरच्यापुढें सातारचे वाघ ' दर्यामें खसखस ' १७४ ' आदमखोरा वाघ, पायीं शिकारीला फारच भयंकर १७४ शिकारीला निघतांना राजेसाहेबांना त्यांच्या मातोश्रींचा उपदेश १७५ बार-बनांत ' आदमखोरा ' वाघ १७६ राजेसाहेबांचें आगमन आणि त्या जंगलांतील लोकांना संकटमुक्त होण्याचा विश्वास १७७ वाघाचा शोध १७८ उभयतां वाघांची नजरभेट ! १७९ ' सरकारच्या हुकुमाबाहेर आम्ही थोडेच आहोंत ! ' १८१ ' गाढवी ' नदीला एकादशी पावली ! १८२ मृत्यूचें द्विधा मन ! पशुव्याघ्राव‌ झडप ! १८३ ' गाढवी ' चा कंटकमय कांठ १८४ नदींत बसलेल्या व्याघ्रावर गोळी-पाठलाग-वाघ पुनः नदींतच-शेवटची गोळी १८५ मेल्यावरही राजेसाहेबांवर मोहरा करणारा वाघ ! १८६ ] १९२९ सालची शिकार-सोबत सांगलीचे राजवैद्य आबासाहेब सांभारे, श्री. सौ. राणी इंदिराबाईसाहेब वगैरे-व्याघ्रासन-मृगासनांच धर्म १८७.

## प्रकरण ७ वें:-सत्पुरुष-दर्शन.

राजेसाहेब मातोश्रींसह पंढरपुरास येतात १८८ श्रीसद्गुरु गोंदवलेकर महाराजांचें चंद्रभागेवर स्नानार्थ आगमन १८९ मानवी स्वभावाचा दोष ! १८९ क्षमाशील सद्गुरु स्वतःच दर्शन देतात १९० ' माझ्या बाबांना मुलगा झालेला मीं पाहिला ह्मणजे माझ्या डोळ्यांचें पारणें फिटेल ' १९० ' माझ्या रामाला तुह्मी विसरतां कामा नये '- ' त्रयोदशाक्षरी ' मंत्रजपाची आज्ञा-सहा वर्षांत जपाची सांगता १९१ सांगतेनंतर प्रत्यक्ष ' इंदिरे'चा लाभ ! १९२ ' अनंत हस्तें कमलावरानें । देतां किती घेशिल दों करानें ॥ ' १९२. १९२७ च्या जून महिन्यांत गोंदवल्यास श्रीसद्गुरु-समाधीचें दर्शन १९२ अपत्यलाभ १९३.

## प्रकरण ८ वें–विलायतचा प्रवास.

मुंबई येथील सरदारगृहांत १९४ मातोश्रींचा प्रसंगोचित उपदेश १०५ एस. एस. मांचुआ–हिंदुस्थान ते इंग्लंड १९६ फर्स्ट ॲव्हेन्यू हॉटेल १९६ लंडन, मधील विविध कार्यक्रम–रॉयल कमांडचा समारंभ १९७ राजनिष्ठा व्यक्त करण्याची सुसंधि १९८ तेथील श्रावणी सोमवार–सोंवळेंच सोंवळें! तद्देशियांना अपूर्वाई १९९–२०० परत हिंदुस्थान २०१ प्रवासांत नित्यजपाची अखंडता २०१.

## प्रकरण ९ वें:–वेदोक्त प्रकरण.

'धर्म' हा क्षत्रियाच्या जिव्हाळ्याचा विषय २०२ तेलंगशास्त्र्यांचा 'महाराष्ट्र' मधील लेख–कलावाद्यंतयो स्थितिः–महाराष्ट्रीय हिंदु परिषद नागपूर येथें–अध्यक्ष डॉ० कुर्तकोटी–परिषदेच्या कार्यांत विघ्नें २०३ ब्राह्मणेतरपक्ष, सत्यशोधक–त्यांचे पाठीराखे कोल्हापूरचे कै० शाहूमहाराज, त्यांची व (डॉ० कुर्तकोटी) शंकराचार्यांची कार्यभिन्नता, अभिनव क्षात्रजगद्गुरुपीठाची स्थापना, सत्यशोधकी तमासे, चातुर्वर्ण्याला मागें टाकून पुरस्कारलेले ब्राह्मण व ब्राह्मणेतर हे दोनच वर्ण, या सर्व खळबळी, तेलंगशास्त्र्यांच्या लेखांचा आधार २०३-२०४ तेलंगशास्त्र्यांना नागपुरच्या वस्तुस्थितीचें अज्ञान २०४ परिषदेंच्या उघड्या बैठकींत तेलंगशास्त्री स्वमतपुष्टिकरणार्थ येऊं धजत नाहींत २०५ कलियुगांत क्षत्रिय व वैश्य वर्ण आहेत कीं नाहींत? परिषदेचें उत्तर अस्तिपक्षी २०५-२०६ कोल्हापूर व नागपूर २०६-२०८ [ तेलंग शास्त्र्यांनें सुंभ जळालें पण पीळ जळाला नाहीं २०६ नागपूरचे क्षत्रिय मराठे तेलंग पक्षीय भिक्षुकांशीं फटकून राहाण्याचा राजेसाहेबांना आग्रह करितात २०७ राजेसाहेबांच्या उत्तरांतील सर्वसंग्राहक बाणेदारपणा २०७ 'आपण क्षत्रिय आहोंत. आपला धर्म हिंदुधर्म फोडण्याचा नसून जोडण्याचा आहे-वेद जीवंत ठेवणें असेल तर ब्राह्मणांचें रक्षण केलें पाहिजे २०७ ज्याचें जें कर्तव्य तें त्याचेकडून करवून घेणें, हें पुरुषार्थाचें लक्षण आहे २०८ ] श्रीमज्जगद्गुरु व क्षत्रियत्व २०८-२१३ [ व्रतबंध वेदोक्त कीं पुराणोक्त २०८ उपनयन हा संस्कार पुराणोक्त पद्धतीनें कोणत्या धर्म-ग्रंथाच्या आधारें केला जातो ? २०९ उपनयन हा संस्कार मुळीं पुराणोक्त नाहींच, तो वेदोक्तच आहे २०९ तुमचें ब्राह्मणाचें काम तुह्मींच केलें पाहिजे २१० श्री-मज्जगद्गुरूंनीं दिलेलें श्रीमुख २११-२१२ श्रींच्या आज्ञापत्राकरितां राजेसाहेबांची

मंडळी शृंगेरीस जातात २१३ ] पाठक शास्त्री व वेदोक्त उपनयन २१३-२१४ [ कलियुगांत क्षत्रियांचें अस्तित्व मानणारा ब्राह्मणांचा दुसरा पक्ष, त्याचे अध्वर्यु जटा, घनपाठी जनार्दनभट्ट पाठक, यांना राजेसाहेब पुरोहितत्वाची सुपारी देतात, कर्मलोपाबद्दल राजेसाहेबांसह त्यांचे ज्ञातिबांधवांस प्रायश्चित्त २१३ शृंगेरीस श्रीशंकराचार्यांची भेट, ते आजारी असल्यामुळें झाली नाहीं, पाठक शास्त्र्यांनीं पुरोहितत्व स्वीकारल्यामुळें श्रींच्या आज्ञापत्राची अनवश्यकता, मंडळी परत येतात २१३ कुंवर प्रतापसिंह यांचा व आणखी सात मराठाक्षत्रिय मुलांचा व्रतबंध, थाटाचा समारंभ २१४ ] बृहन्महाराष्ट्राची मुक्तकंठ सहानुभूति २१४–२१८ [ महाराष्ट्र २१४, केसरी २१५, चैतन्य २१६, डॉ. मुजे यांचें पत्र २१७ वैद्यालंकृति रंगुबाईकृत ' सोन्याचा दिवस ' व चित्रमयजगत् जादा अंक २१७–२१८ ] श्रीशाहूछत्रपति आणि राजे लक्ष्मणराव २१८–२२५ [ वृत्तपत्रांनीं अभिनंदन कां केलें? २१८ द्विवर्णिकांवर परकीय सत्तेचें आक्रमण २१८–२१९ ( पराभूतावस्थेंत सत्ता ( क्षत्रिय ) मत्ता ( वैश्य ) यांची दुरवस्था ) बीजरूप अस्तित्वाची इष्टता व शक्यता २१९–२२० ( परशुरामानें ' निःक्षत्रिय ' पृथ्वी केली – निःक्षत्रियत्व ह्मणजे बीजरूपानें जीवंत रहाणें २१९ भोंसल्यांचे शेतकरी पूर्वज–' क्षत्रियकर्म ' नव्हे तर ' क्षत्रियबीज ' जीवंत ठेवतात, अनुकूल काल व क्षत्रिय बीजापासून क्षत्रियकर्मवृक्ष २२० ) कर्मलोप कीं वर्णलोप २२०–२२३- (गुणकर्मानें क्षत्रियत्व सिद्ध झालें तरी तें संस्कारसिद्ध पाहिजे २२० उपनयन-संस्कारानें द्विजत्व सिद्ध व्हावें लागतें, कर्मलुप्त श्रीशिवाजीमहाराज व महाराष्ट्रीय ब्राह्मण, धर्मबंधनें शस्त्रांनीं तुटत नाहींत २२१ गागाभट्टांची योग्यता, श्रीशिवरायाचें क्षत्रियत्व लोकमान्य होऊन राज्याभिषेक २२२ आपल्या क्षत्रियत्व-सिद्धीकरितां श्रीशिवराय ब्राह्मणांवर अधिकारशस्त्राचा उपयोग करीत नाहींत २२२ वर्णाश्रमधर्माचें कर्तव्य २२२ श्रीशिवाजीमहाराज अवतारी कां? २२२ पंचकुळी, सप्तकुळी, मराठे क्षत्रिय २२३ धर्मरक्षकर्तेतच जातिवंत क्षत्रियत्व २२३-२२५ ( पाश्चिमात्य संस्कृति व वर्णाश्रमधर्म २२३ उपनयनाच्याद्वारें राजेसाहेबांनीं पाडलेलीं तीन फळें २२४ )

## प्रकरण १० वें–डॉ. कुर्तकोटी व राजेसाहेब.

जाहीर पाद्यपूजा–पूर्वतयारी २२६-२२७ श्रीशिवाजीमंदिराचा शृंगार २२२-२२८ पादुकाची मिरवणूक २२८-२२९ सार्वजनिक पाद्यपूजा २२९-२३१

क्षत्रिय आणि ब्राह्मण २३१-२३३ ( दिवेकरशास्त्र्यांचें भाषण, राष्ट्राच्या उन्नतीकरितां शास्त्र यांची आवश्यकता २३१ वर्णसंकर होणार तो कलियुगाचे तृतीय चरणांत २३२ श्रीशंकराचार्य ह्मणतात, ' सांप्रत क्षात्रतेजाचा पुनरुद्धार होत आहे, ब्राह्मणाच्या पळिपंचपात्रीवर व शूद्रांच्या केरसुणीवर कोणीहि घाला घालीत नाहीं २३२ अस्पृश्यतेची मीमांसा २३३ तत्त्व अगर शास्त्र सीमोल्लंघनानें किंवा समुद्रोल्लंघनानें कमीजास्त प्रमाणांत रूपांतर होणार नसतें २३४ धर्माचें शास्त्र किंवा तत्त्व हें अव्यक्त स्वरूप व रूढि हें व्यक्त स्वरूप बनलें आहे २३५ शाहु छत्रपतींची चिकाटी २३६ अस्पृश्यसमाजाची दिशाभूल २३७ छत्रपति व धर्मपति २३७ श्री. शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) व श्रीशाहुमहाराज उभयतांचीही कुचंबणा २३८ सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर २३८ शाहुमहाराजांच्या धोरणामुळें समाजांत उडालेली खळबळ २३९ दोन ध्रुव २३९ एक ब्राह्मणांना दूर करतो व दुसरा जवळच ठेवतो, याची कारण-मीमांसा २४० टीकाकारांची दिशाभूल २४१ मार्ग भिन्न ध्येय एक २४१ सराफी भांडण २४२ एका म्यानांत दोन तरवारी २४३ शास्त्र आणि शस्त्र एके हातीं आल्याचा दुष्परिणाम ह्मणजे उन्माद २४३ श्रीरामावताराची श्रेष्ठता २४४ धर्मरक्षण हेंच साध्य २४५.

## प्रकरण ११ वें—नागपुरांतील धर्मसत्याग्रह.

पूर्वपीठिका २४७ तंट्याचें मूळ—गणेशपेठेंतील नवी मशीद २४८ ' तुह्मीं पखवाज बंद ठेवा ' २४९ शांततेचें संरक्षक मॅजिस्ट्रेट २४९ गणपति—विसर्जन राहिलें २४९-२५० खिलाफत कमेटी आपल्या वळणावर गेली २५० कॉंग्रेसकमेटीचे शिकस्तीचे प्रयत्न २५१ भोंसले राजे व धार्मिक सत्याग्रह २५२ धर्माचे आधार क्षत्रियच २५३ मोहरें इरेस घातलें ! २५३-२५४ पांच टाळांचा समेट २५४ मुसलमानांनीं वचन मोडलें २५५ सत्याग्रहाला तोंड लागलें २५५-२५६ सरकार व पुढारी २५६ समेटाच्या अटी २५७ मुसलमानांनीं पुनः कानावर हात ठेविले २५८ मुसलमानांचें दुटप्पी वर्तन २५९ ' आतां समेट होत नाहीं ' २६० सत्याग्रहाचे सर्वाधिकारी राजेसाहेब २६१ वाड्यांतील सभा २६१ मुसलमानांचें अपमानकारक पत्र २६१ ' हा प्रश्न गणेशपेठेपुरता राहिला नाहीं ' २६२ सत्याग्रहाची पद्धतशीर तयारी २६२ शांतताभंग आणि सरकार २६२ पोलीस ॲक्टचें

३० वें कलम २६२ पहिली दिंडी पकडली २६३ धर्माची इभ्रत व हिंदू २६३ मुसलमानांचा धर्मवेडेपणा २६४ धर्मश्रद्धा कीं धर्मवेडेपणा २६४ धर्माचरण करणें हें पूर्ण सात्विक कर्तव्य आहे२६४वाद्यांबाबत मनाई हुकूम २६५-२६९मनाई हुकूम-ही एकतर्फीच ! २६९ यज्ञकुंड धडाडलें २७०-२७१ शेवटची आहुती ? २७१ 'रविवारच्या सत्याग्रहांत आपणहि जाणार' २७२ गव्हर्नरांचें आगमन २७२ मनोनिग्रहाची तयारी २७३ ' धन्य आहे राजा ' २७३ अखेरचें निर्वाणीचें पत्र २७४ पांच टाळांचा तात्पुरता समेट २७५ श्रीशंकराचार्यांची धांव २७६ राजाश्रित सत्याग्रही २७७ सत्याग्रहाचें विराट स्वरूप २७७ भजनी साहित्याचा तुटवडा ! २७८ स्वागत व निरोप दोन्ही प्रसंगींच्या अभिवादनांतील भावना २७९ नागपुरच्या हिंदुत्वाची परीक्षा २०८ ' निमित्तमात्रं भव सव्यसाची ' २८० बालपणचे मित्र पण धर्मकारणांतले शत्रू प्रेमभावानें भेटतात २८१ नागपूरचा आत्मा २८२ ' वाहावा रें शेर ! शाबास क्षत्रियवीरा ' २८३ शंकराचार्यांनीं अखेर साधली २८३ जयजय-कार २८४ अभिनंदनीय अभिनंदन-गव्हर्नरांचें पत्र २८४-२८५.

## प्रकरण १२ वें–नागपूर हिंदुसभेची स्थापना.

टौन हॉलमधील सभा २८६ अध्यक्षांचें भाषण- ' हीं भांडणें ह्मणजे आंधळ्या हिंदु लोकांना दृष्टि आणणारीं अंजनेंच होत ' ' कोणतेही हक्क भीक्षा मागून मिळत नसतात. धर्म ही अशी वस्तु नाहीं कीं जी दुसऱ्यानें देऊन मिळेल २८७ नागपूर हिंदुसभेची संघटना २८७-२८९ हिंदुत्वाची व्याख्या २८८ आधुनिक श्रीशिवसमर्थ २८९ लोकोत्तर राजपुरुष २९०.

## प्रकरण १३ वें– नागपुरांतील मुसलमानांचा दंगा.

१९२३ ची कार्तिक एकादशी-तडजोडीचा निष्कर्ष २९१ निमाजाच्या पांच वेळां २९२ गणेशपेठेंतील दिंडी व मुसलमानांचा हल्ला २९३ एका मुलाच्या डोक्याला भयंकर खोंक २९४ गोटमारीचा थोडाबहुत प्रसाद राजेसाहेबांनाही मिळाला २९४ द्वादशीचा दंगा आणि उदाराम पहेलवानांचें शौर्य २९५ चकमक दहापंधरा मिनिटें—मुसलमानांचा पळ २९५ आत्मरक्षणाची तयारी २९६ गणेशपेठेंतील गणपति—विसर्जन २९७ हिंदुसंघटन २९८ उपसंहार २९८–२९९

नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता २९९ 'राजे' पदाची सरकारी सनद ३०० धर्म्म-मानपत्रम् ३०१ महामहोपाध्याय ताह्मनकृत काव्यमय अलंकार ३०२

## प्रकरण १४ वें—महाराष्ट्र हिंदुधर्मपरिषद.

लोकमान्य लोकसेवा ३०४ मराठा तितुका मेळवावा ३०५ त्रिसूत्री ३०६ आर्यसंस्कृति प्रज्वलित करणारे मुसलमान ३०७ शुद्धिकरणाचें खरें स्वरूप ३०८ खरे सुधारक कोण ? ३०९ ठराव १ ते १४ ३१०—३१२ क्षत्रियांचें गुप्तमंजुष ३१३ श्रीमंत शाहु महाराजांचें साभिमान स्मरण ३१४ समाजकार्यापुढें खाजगी प्रश्नाकडे दुर्लक्ष केलें पाहिजे ३१५ हिंदुधर्माचें धर्मत्व ३१६ हिंदुधर्मशास्त्र हें मानवी जातीनें योजलेली किंवा ठरविलेली गोष्ट कशी करावी, हें सांगतें ३१६ हिंदुधर्म अखिल मानवी जातीकरितां आहे ३१६ कोल्हापुरी वेदोक्ताची अनवश्यकता ३१७ अस्पृश्यतेचा जाहीर इन्कार ३१८ पुनर्मीलन ३१९ कार्यगौरव ३२०.

## प्रकरण १५ वें—रायगड येथील चवथा महोत्सव.

स्मारकाचें विशिष्टत्व ३२१ शिवस्मारकांचा हेतु ३२२—३२३ स्वधर्मसंस्था-पकाच्या स्मारकोत्सवाला स्वधर्मसंरक्षक अध्यक्ष ३२३ ऐतिहासिक हद्दपारीची वर्त-मान कालीन सन्माननीय निष्कृति ३२४—३२६ पांढरपेशे व मावळे ३२६ राजे-साहेबांना रायगडची सलामी ३२७ राजेसाहेबांवरील प्राणसंकट ३२८ पाचाड पर्यंत पायउतारा ३२९ चंद्रप्रकाशांतील रायगडचढणीचें शब्दचित्र ३३० पहाडी-दैवतें ३३१ दऱ्याखोऱ्यांतील वैभवहीन लक्ष्मीचें दर्शन व नमस्कार ३३२ राजे-साहेब खुर्ची सोडतात आणि पायींच गड चढूं लागतात ३३३ अनवाणी चाल-ण्याचा पहिला व शेवटचा गोड प्रसंग ३३४ भोंसले राजेसाहेब आणि केळकर तात्यासाहेब ३३४—३३५ रायगडचें नैसर्गिक सौंदर्य ३३६ पूर्वज-पूजन व प्रसाद ३३७ धर्मशाळेची कोनशिला बसवितात ३३८ राजेसाहेबांचा शिवरायचरित्रावरील अभिप्राय ३३६ क्षणभर मोहिनी पाडणारें भाषण ३३६ भवानीचा अहेर ३३७ रायगडची अखेरची सलामी ३३८ कोंझर पाटलाचे येथील हृदयस्पर्शी स्वागत ३३९ 'राजाचं पाय लोन्यावानी' ३४० आनंदीआनंद ३४१ महाड येथील मानपत्र ३४२ पंढरपूर येथील मानपत्र ३४३—३४४.

## प्रकरण १६ वें–पहिले रघोजीराव भोंसले यांची पुण्यतिथि.

श्री. रानडे यांचा नागपूरकर भोंसल्यांच्या इतिहासावर व्यासंग व पहिले रघोजीराव यांच्या पुण्यतिथीचा नक्की दिवस ३४५ पंधरा हजार लोकांची मिरवणूक ३४६ टौनहॉलच्या पटांगणांतील जंगी जाहीर सभा व हत्तीखान्यांतील मर्दानी सामने ३४६ अध्यक्ष श्री. राजेबहादूर रघोजीराव यांचें भाषण ३४७ उत्सवांचें स्वरूप व उपयोग ३४७ हिंदुसमाजाचें कर्तव्य ३४८ इतिहाससंशोधनाची आवश्यकता ३४९ कुं. प्रतापसिंह यांचें भाषण ३५० राजा उन्हांतून कां हिंडतो? ३५० उत्सवांतील इतर कार्यक्रम ३५१.

## प्रकरण २७वें– युवराजांचें शिक्षण.

१९३२ मध्यें मॅट्रिक्युलेशनच्या परिक्षेला बसतात ३५२ शारीरिक व धार्मिक शिक्षक ३५३ गोष्टीरूप शिक्षण-३५३-३५६ [ धर्मजागृति ३५३-वाघिणीची प्रसूति-पद्धति ३५३-सर्व कांहीं ' जातीकरितां ' ३५४-मेंढयांचा संरक्षक वाघ ३५४-वाघाला वाघ भेटतां ३५४-३५५–' अरे, तूं वाघ आहेस वाघ! ' ३५५ प्राणिमात्राचें खरें अस्तित्व प्रकट करणारें साधन ह्मणजे इतिहासाचें खरें ज्ञान ३५६] श्री.रानडेकृत नागपूरकर भोंसले यांचा काव्यमय वंशवृक्ष ३५७-३६२ सार्वजनिक कामगिरीचें शिक्षण ३६२ तरुण मराठा क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष ३६३-अध्यक्षीय भाषण ३६३-३६४ शिवरामगुरूंचा आखाडा ३६५ त्याचा जीर्णोद्धार ३६६ त्याचें प्रतापसिंह आखाड्यांत नामांतर ३६६ त्या समारंभाचे प्रसंगीं राजेसाहेबांचें भाषण ३६६-३६८ श्री. कुं. प्रतापसिंह यांचें भाषण ३६८–३६९ राजेसाहेबांची अपूर्ण सदिच्छा ३७०.

## प्रकरण १८ वें–बेळगांव येथील संस्मरणीय कामगिरी.

राजेसाहेब व अस्पृश्यता ३७१ मराठे व कानविंदे ३७१-३७२-[ महाराच्या हातचें पाणी गटागट पितात! ३७२ ] राजेसाहेबांचें अस्पृश्यता निवारणावर भाषण ३७२ ३७४ - [ अस्पृश्यता विषयक सारासार विचार ३७२-३७३, अस्पृश्य व मंदिरप्रवेश ३७३, विधायक सूचना ३७४ ] डॉ. मुंजे यांना मानपत्र ३७५ राजेसाहेबांना मानपत्र दिलें, त्या समारंभाची हकीकत ३७५-३७६ राजे-

साहेबांना देण्यांत आलेलें मानपत्र ३७६-३७९ [ ' ब्राह्मण ' या क्षणभंगूर शब्दावर क्षणभंगूर विरोध ३८० राजाचा न्याय ३८० निढावलेला सभापति ३८१ पुणेकरांस छत्रपतींची ओळख ३८२ क्षत्रियांचा आत्मघात ह्मणजे पळिपंचपात्री हातांत ३८२-३८३ आजा मेला नातू झाला ३८३ अस्सल आणि कमअस्सल ३८४ भीमराव पाटलांची सुंदर लाठी ३८५ प्रामाणिक विरोध-खरी देशभक्ति ३८५ श्रद्धानंदांत बेळगांवची सभा ३८६.

## प्रकरण १९ वें– महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद, सांगली.

अध्यक्षस्थानीं राजेसाहेबांचीच निवड कां ? ३८७ स्वागतसमारंभ ३८८-३८९ परिषदेच्या अनुषंगिक इतर समारंभ व परिषदेला प्रारंभ ३८९ राजेसाहेबांचें अध्यक्षीय भाषण ३९० [ अध्यक्षपद कां स्वीकारिलें ? ३९०–३९१ परिषदेच्या स्थापनेचें कारण ३९१–३९२ शारीरिक शिक्षण–मीमांसा ३९२ पैशाचा खेळ कीं खेळाचा पैसा ३९२– ३९३ ब्रह्मचर्य ! ब्रह्मचर्य !! ३९३–३९४ चहापान कीं विषपान ३९५-३९६ खुराकाची अनवश्यकता ३९६ संरक्षणाचें साधन- लाठी ३९६–३९७ स्त्रियांना शारीरिक शिक्षण युक्तिप्रधान ३९७ स्त्रीशिक्षणाचा दुष्परिणाम-सूपशास्त्राचा लोप ३९८ सार्वजनिक आरोग्य ३९८–पुत्र कां मेला ? ३९९ शारीरिक शिक्षणाचे आदर्श ४००–४०१ शक्ति ह्मणजेच परमेश्वरप्राप्ति ४०१–४०२ परिषदेमध्यें पास झालेले मुख्य ठराव ४०२–४०४.

## प्रकरण २० वें:– श्रीरंगूबाई पॅलेसचा कोनशीला समारंभ.

शनिवार ता. ८ माहे जून सन १९२९ इ. ४०५ महाराष्ट्र औषधी कारखाना ४०५-४०७ त्याची व्याप्ति ४०७-४०९ आर्यांकरितां आयुर्वेद- राजेसाहेबांचें भाषण ४०९-४१० वैद्यालंकृतींची अनुकरणीय कर्तबगारी ४१० लक्ष्मीविलास थिएटरचा उद्‌घाटन समारंभ ४११-४१३ - देशी चित्रपटाचें महत्व, राजेसाहेबांचें भाषण ४१२-४१३.

## प्रकरण २१ वें- इतर सार्वजनिक कामगिरीचा त्रोटक वृत्तांत.

१ मराठाशिक्षण परिषद ४१४-४१६ २ शारीरिक शिक्षण मंडळ, नागपूर ४१६-४१९ ३ क्षत्रिय उपकारिणी सभा ४१९-४२२ ४ अखिल महाराष्ट्र शारी-

रिक उन्नति परिषद ४२२-४२३ ५ कामठी येथील धर्मसभा ४२३-४२६ ६ वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत-हिंदुसामाजिक परिषद ४२६-४२८ ७ हिंदु परिषद ४२८ ८ मध्यप्रांतीय मालगुजार - कास्तकार परिषद ४२८-४३० ९ अखिल भारतीय अहीर सुवर्णकार परिषद ४३०-४३१ १० श्रद्धानंद अनाथालयाचा उद्घाटन समारंभ ४३१-४३२ ११ श्रीबालाजी मंदिराचा नूतनगृहप्रवेश-समारंभ ४३२.

## प्रकरण २२ वें– कौन्सिल ऑफ स्टेटमधील कामगिरी.

राजेसाहेबांवरील लोकविश्वास ४३३ कौन्सिल ऑफ स्टेटमधील जागेला बिनविरोध निवडणुक ४३४ कौन्सिल ऑफ स्टेटची घटना ४३४ क्षत्रियांचें अस्तित्व प्रत्ययाला न येण्याचें कारण ४३४-४३५ बजेटवरील राजेसाहेबांचें भाषण ४३५-४३९ लष्करांत मराठा जातीची भरती अधिक प्रमाणांत करण्याविषयींची कारणमीमांसा४३९इंडियन सँढर्स्टबबतच्या ठरावाला राजेसाहेबांचा दुजोरा ४४० कौन्सिलमधील राजसाहेबांचें शेवटलें भाषण ४४०-४४३ कौन्सिलमधील राजेसाहेबांचें सल्लागार ४४३ कौन्सिलमुळें आलेले इतर योगायोग ४४३ उदेपूर व नागपूर ४४४ गामा आणि इमामबक्ष ४४५ दिल्ली येथील महाराष्ट्र- मंडळ ४४५-४४६ श्रीगणेशोत्सव ४४६-४४७ सिमल्यावरील मारुतिराय ४४७ लाहोर-स्वागतसमारंभ ४४८-४४९ लाहोर-महाराष्ट्रमंडळ ४४९-४५० अमृतसर ४५० ग्वाल्हेरवरून नागपूर ४५१ घुलेशास्त्रीकृत काव्यालंकार ४५१

## प्रकरण २३ वें–राजेसाहेबांचा अंतकाळ.

मापी लागलें शरीर । घडीनें घडी॥ ४५२ काळाचा प्रतिनिधि-मधुमेह ! ४५३ राजवैद्य आबासाहेब सांबारे ४५३-४५५ सांगली दरबारचा पाहुणचार ४५५-४५६ काळाची पकड–क्विनाईन इंजक्शन ४५६-४५७ निर्याण स्थळ–पुणें ४५७-४५९ हाय ! हाय ! ! इंजेक्शन ! ! ! ४५९-४६१ युवराजांना गुप्तधनाची देणगी ४६१-४६२ मूर्तिमंत स्थितप्रज्ञ ४६२-४६३ मरणीं जया जें आठवे । तो त्याचि गतीतें पावे ४६३–४६५ [ मास्तरांचा ध्यास ४६४ ‘ दादा बारा वाजले ’ ‘ श्रीराम-जयराम-जयजयराम , पांडुरंग विठामाई’ ४६४] मृत्यु न म्हणे हा धर्मवीर ! ४६५-

४६८ [ राजवाड्यावरील ध्वजा मोडते ! ४६५ नाशिकला शव नेण्यासाठीं पुणें-करांची अनुमति ४६६ ऑनरेबल सर दादाभाई ४६६ पुण्याहून नाशिक-रात्रींचा मोटारप्रवास ४६७ नागपुरची मंडळी येतात ४६७ अंत्यविधि व श्री. गुंजाळ यांचें भाषण ४६८ ] मरावें परीकीर्ति रुपें उरावें ४६८ दुखवट्याचे संदेश ४७९[ तारा ] ४६९ दुखवट्याचे ठराव ४६९ दुखवट्याचीं पत्रें ४७० वर्तमानपत्रांतील मृत्युलेख.

## उपसंहार ४७१-४७२.

राजेसाहेबांचा उदार स्वभाव ४७१ सच्छील ब्राह्मणाचे ठिकाणीं श्रद्धा ४७१ पांडुरंग व श्रीराम यांचे भक्त ४७१ लोकसेवेला वाहून घेतलेल्या थोर विभू-तीबद्दल अभिमान ४७१ गायनवादन-इतिहाससंशोधन यांचा नाद ४७१ भज-नाकडे प्रवृत्ति ४७१ मोक्षगुरु श्रीसद्गुरु नानाजी महाराज ४७१ जनावरांचा मोठा शोक ४७२ त्यांच्या औषधापाण्याची माहिती ४७२ देशी विदेशी खेळांत निष्णात ४७२ यात्रा केल्या ४७२ भ्रातृभक्त व मातृभक्त ४७२ चरित्रकारांचा काव्यमय समारोप ४७२

परिशिष्ट १ लें— तारा तुटला तरी तेज आहे [ उदय पत्राचा उतारा ] १-५

परिशिष्ट २ रें— सोन्याचा दिवस [ वैद्यालंकृतिकृत काव्यात्मक अहेर ] ६

परिशिष्ट ३ रें— राजेसाहेबांवरील तीन दुःखद प्रसंग ७

परिशिष्ट ४ थें— पुण्याच्या महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेंत भाग घेतलेल्या मुख्य शास्त्रीपंडितांची यादी ८

परिशिष्ट ५ वें— राजेसाहेबांनीं पुण्यास केलेल्या लघुरुद्रांत भाग घेत-लेल्या मुख्य वैदिक ब्राह्मणांची यादी ८-९

परिशिष्ट ६ वें— धमतरी म्युनिसिपालिटीकडून राजेसाहेबांस मिळालेलें मानपत्र १०

श्री. राजेसाहेबांचें

# - श्रीहद्-वाक्य -

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।

स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

—श्रीमद्भगवद्गीता.



श्रीमंत धर्मवीर, धर्म विभूषण, नामदार राजे लक्ष्मणराव भोंसले
[K P.Z P, B] नागपुरकर. पृष्ठ १

मराठी ग्रंथ संग्रहालय ६८८०
मराठी ग्रंथ संग्रहालय चरित्र नं. ४८३ ता. १-१०-३३
४८३०

श्री

## प्रकरण १ लें.

# नागपूरकर भोंसले घराण्याची पूर्व पीठिका.

श्रीमंत कैलासवासी राजे लक्ष्मणराव साहेब भोंसले नागपूरकर यांचे चरित्राला सुरवात करावयाची, ह्मणजे प्रथमतः त्यांनीं ज्या क्षत्रिय कुलावतंस गो-ब्राह्मण प्रतिपालक अशा ' भोंसले ' घराण्यांत जन्म घेतला, त्या घराण्याची संक्षिप्त पूर्व-पीठिका देण्यास प्रारंभ केल्यास विषयांतर न होतां चरित्रनायकाच्या कर्तबगारीचें त्यांच्या पूर्वजांच्या चरित्राशीं तुलनात्मक निरीक्षण करावयास सुलभ जाईल. चरित्र नायकाचा चरित्र ओघ हा जर नदीच्या प्रवाहासारखा मानला तर नदीच्या पावित्र्यांत नदीच्या उगमस्थानच्या विशेष वैशिष्ठयाची भर पडल्यास त्या नदीच्या पावित्र्याला विशेष महत्व येत असतें. सर्वसाधारण व्यवहारांत ' ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ ' पाहूं नये, असा प्रघात आहे. परंतु, ज्याठिकाणीं ऋषीच्या कुळाचा शोध केल्यास अगर नदीच्या मुळाचें संशोधन केल्यास तें तितकेंच किंबहुना ज्यास्त श्रेष्ठ व पवित्र असल्याची खात्री असतें; त्याठिकाणीं तसा प्रयत्न केल्यास तो अप्रयोजक होणार नाहीं. श्रीशंकराचें जें निवासस्थान कैलास पर्वत त्या स्थळाची समृद्धिशाली, सौभाग्यशाली, वैभवशाली अशी जी गंगा नदी तिच्या उगमाला जोड मिळाल्यामुळें तिच्या पावित्र्याला इतर नद्यांपेक्षां विशेष श्रेष्ठत्व प्राप्त झालें. त्याचप्रमाणें चरित्र-नायक ' भोंसले ' आणि त्यांचें ' भोंसले कूळ ' सूर्याप्रमाणें दैदीप्यवान् असल्यानें त्याला तितकीच तेजस्वी असलेल्या त्याच्या पूर्वपीठिकेची जोड मिळाली तर त्याच्या थोरपणाला तितकेंच विशेष महत्व येणार आहे.

' भोंसले ' या नांवांत अशी कांहीं जादू भरलेली आहे कीं, तें उच्चारल्या-बरोबर आपण एकदम सत्राव्या शतकांतच आहोंत कीं काय असा भास होतो. त्या वेळचे हिंदुपदपातशाहींतील नानाविध देखावे सिनेमाच्या चित्रपटाप्रमाणें आपल्या डोळ्यापुढें दिसूं लागतात. गगनाशीं स्पर्धा करणारे रायगड, प्रतापगड, सिंहगड, पुरंदर इत्यादि, दुर्गम डोंगरी किल्ले दृष्टीसमोर उभे राहतात. डोंगर कठड्यावरून दऱ्या-खोऱ्यांत चेंडूप्रमाणें पुटकी घेत घेत बागडणाऱ्या घोंगड्या मावळ्यांचें दृश्य दिसूं लागतें. अफझुलखान, चंद्रराव मोरे, शाइस्तेखान वगैरे शत्रू-पक्षाकडील सरदारांच्या दुर्दशेचे प्रसंग मूर्तिमंत पुढें उभे राहतात. आग्र्याची अटक आणि त्यांतून युक्तीनें करून घेतलेलें बंधविमोचन समोर दिसूं लागतें. तानाजी, येसाजी, नेताजी, बाजी फसलकर, बाहिरजी नाईक, मुरार बाजी, बाजी देशपांडे, रघोजी आंग्रे, सूर्याजी, प्रतापराव गुजर वगैरे अनेक स्वामिभक्त आणि रणशूर सर-दारांच्या धाडसी कृत्यांची आठवण होऊन अंगावर वीरश्रीनें रोमांच उभे राहतात. स्वधर्मरक्षण आणि गो-ब्राह्मण-प्रतिपालन यांची जागृति अंगीं संचरूं लागते व त्याच विचार-तरंगांत मनाची एकतानता होते. त्याचप्रमाणें कल्याणच्या सुभेदाराची रूप-यौवनसंपन्न स्नुषा लुटींत सांपडली असतां तिला बटिक करून ठेवण्याऐवजीं तिला मातृ-पदाचा मान देऊन आणि वस्त्रालंकारांनीं तिचा सन्मान करून तिला तिच्या पतिगृहीं सुखरूप पोंचविण्यांत येणें किंवा लूटमारींत एकादे वेळीं इस्लामी धर्माचें पवित्र कुराण ( इस्लामी धर्म ग्रंथ ) सांपडलें तर तें अत्यादरानें पालखींतून वाजत गाजत शत्रुपक्षाच्या हवालीं करणें या गोष्टीची स्मृति अंतःकरणाला सद्गदित केल्याशिवाय राहत नाहीं. याचा अनुभव जातिवंत हिंदु लोकांना थोड्या बहुत प्रमाणांत आहेच.

' भोंसले ' ह्मटल्याबरोबर श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांचाच काल आणि यांच्याच वेळेचे प्रसंग कां आठवतात ? शिवाजी महाराजांच्या अगोदर कोणी भोंसले झाले नाहींत किंवा नंतर झाले नाहींत ? त्यांच्या अगोदरही झाले आणि नंतरही पण झाले. असें असतां ' भोंसले ' ह्मटल्याबरोबर श्रीशिवाजी महाराजांचाच काल प्रामुख्यानें कां पुढें येतो ? प्रत्यक्ष त्यांचे वडील शहाजी राजे यांना इतिहासकार " King Maker " ह्मणजे " राजे बनविणारे " असें ह्मणत. असा पराक्रम शहाजी राजे यांचे ठिकाणीं असतां ' भोंसले ' ह्मटल्याबरोबर त्यांचा

काल प्रामुख्यानें कां पुढें येऊं नये ? याचें उत्तर थोडक्यांत एवढेंच देतां येईल कीं, शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत स्वतंत्र हिंदुपदपातशाही स्थापन केली हें खरें कारण नसून त्यांनीं हिंदुधर्म संस्थापना केली, हेंच एक खरें कारण आहे. त्या वेळीं हिंदुधर्म परचक्राखालीं चिरडला जात होता, परकीयांच्या धर्म खड्गाचे प्रहार हिंदुधर्म सहन करीत होता, परधर्मीयांच्या हल्ल्यांनीं हिंदु–धर्मीयांना त्राही भगवन् केलें होतें, अशा धर्मग्लानीच्या वेळीं हिंदुधर्म रक्षणाचें कंकण शिवाजी महाराजांनीं हातांत बांधून महाराष्ट्रांत हिंदुधर्म स्थापना करण्याचें अवतारी कृत्य पार पाडलें, ह्मणूनच ते हिंदु लोकांच्या आदराला प्रामुख्यानें पात्र झाले.

स्वधर्म रक्षणापुढें स्वराज्य-स्थापन करणें हें दुय्यम प्रतीचें कार्य मानलें जातें. इतर धर्माच्या अनुयायांची कोणतीही समजूत असो, पण हिंदु लोकांच्या आजपर्यंतच्या विचारसरणीचा ओघ मात्र असाच आहे. बगिचांत सुंदर फुलझाडें लाविलीं आहेत, त्यांना नयनमनोहर आणि सुगंधयुक्त फुलांचा बहर आला आहे, अशा वेळीं त्या फुलांवर जर वाटसरू लोकांकडून हल्ले होऊन फुलें चोरीस जाऊं लागलीं किंवा जनावरांकडून जर तीं खाऊन जाऊं लागलीं तर मात्र त्या बगिचांतील फुलझाडांचें व फुलांचें रक्षण करण्याकरितां त्या बगिचाला चोहोंबाजूंनीं बळकट कुंपण घालावें लागतें. हेतू एवढाच कीं बगिचावर परकीय हल्ले होऊं नयेत. त्याचप्रमाणें हिंदु-धर्माचें आहे. हिंदुधर्मावर जोंपर्यंत परधर्माचे हल्ले होत नाहींत, तोंपर्यंत हिंदु-धर्माच्या रक्षणाची काळजीच बाळगण्याचें कारण नाहीं; परंतु त्याच्यावर जेव्हां उघड हल्ले होऊं लागतात, त्या वेळीं मात्र हिंदुधर्माच्या रक्षणाकरितां त्याला स्वराज्याचें कुंपण घालण्याचा प्रसंग येतो. तेव्हां स्वधर्म-रक्षणाकरितां स्वराज्याची स्थापना असाच त्याचा हिशेब आहे. सर्वसाधारणपणें आजपर्यंतचा हिंदुस्थानचा इतिहास पाहिला तर असेंच दिसून येईल कीं, हिंदुधर्माला यत्किंचित् हात न लावतां जर हिंदूंचें कोणी स्वराज्य हस्तगत केलें तर त्यांनीं त्याबद्दल विशेष विषाद वाटून घेतला नाहीं; पण ज्या ज्या वेळीं हिंदुधर्मावर परधर्माचे उघड हल्ले होऊं लागले, त्या त्या वेळीं मात्र हिंदु लोक धर्माच्या एक ध्वजाखालीं गोळा होऊन ते प्रत्यक्ष कृतांतकाळालाहि अजिंक्य झाले, हें इतिहास सांगतोच आहे.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥**

श्रीमद्भगवद्गीतेच्या या श्लोकाचाही हाच भावार्थ आहे. ज्या ज्या वेळीं धर्माची ग्लानि होते त्या त्या वेळीं धर्मसंस्थापना करण्याकरितां परमेश्वर अवतार घेतो. राज्य तृष्णेची हाव भागविण्याकरितां परकीय जनतेला निःशस्त्र करून गुलामांप्रमाणें त्यांचेवर हुकमत चालविण्याकरितां किंवा बादशाही स्थापन करण्यासाठीं परमेश्वर खास अवतार घेत नाहीं. अवतार धर्मरक्षणाकरितांच होतो. श्रीशिवाजी महाराजांना अवतारी पुरुष ह्मणण्याचें रहस्य तरी तें हेंच होय.

आतां ज्या ' भोंसले ' घराण्यानें हिंदुधर्म संस्थापनेचें अवतारी कार्य केलें, त्याचा वंश ह्मणजे विख्यात सूर्यवंश होय. याच सूर्यवंशाचे वंशज चितोडचे महाराणा लक्ष्मणसिंह होत. यांच्या वंशाला सिसोदिया ह्मणत. अल्लाउद्दीन खिलजी यानें इ. स. १२९० मध्यें चितोडवर स्वारी केली व चितोडच्या किल्ल्यास वेढा दिला. हा वेढा सहा महिने पडला होता. शेवटीं लक्ष्मणसिंहाचा अल्लाउद्दीन-बरोबर तुंबळ संग्राम होऊन त्यांत ते मारले गेले. लक्ष्मणसिंहाचा वडील मुलगा अर्सी-सिंग व दुसरे सहा मुलगेही या लढाईत मारले गेले. त्या वेळीं अर्सीसिंहाची पत्नि आपला मुलगा हमीरसिंह यासह शत्रूच्या हल्ल्यांतून निसटून बाहेर पडली व आपल्या कांहीं निवडक लोकांसह अरवली पर्वताचे दुर्गम जागीं—ऊनमा गांवीं जाऊन राहिली. तेथें ती आपल्या पुत्रासह आपल्या अज्ञातवासाचे दिवस गांवकरी लोकांच्या सहाय्यानें कंठू लागली.

इकडे अल्लाउद्दीन यानें चितोड हस्तगत केलें; पण महाराणा लक्ष्मणसिंह यांचा आणखी एक मुलगा अजयसिंह हा या लढाईत जखमी झाला. त्याला त्याच्या लोकांनीं केलवाडा येथें नेलें. हें ठिकाण अरवली पर्वताच्या दुसऱ्या भागीं असून पूर्ण निर्भयपणाचें असें होतें. तेथें आल्यावर तो साधारण बरा झाला. नंतर आपणांला महाराणा हा किताब घेऊन अरवली पर्वताच्या आसमंताच्या भागा-वर तो राज्य करूं लागला. याला दोन पुत्र होते. एक सज्जनसिंह व दुसरा क्षेमसिंह. अजयसिंहानें केलवाडा येथें आपली गादी स्थापन केली व चितोड शत्रूकडून परत घेण्याकरतां तेथें सैन्याची जमवाजमव केली. इतक्यांत तो पुन्हां आजारी पडला व त्याचें शरीर दिवसें दिवस निर्बल होऊं लागलें. त्याच वेळीं अजयसिंहाला एक घरचाच ह्मणजे अरवलीपर्वतातलाच मुंजाबालेचा या नांवाचा एक प्रबल लुटारू शत्रू उत्पन्न झाला. तो गोलवाड जिल्ह्यांत राहत असून त्यानें अजयसिंहाचे मुलखांत

लूटमार करण्यास सुरवात केली. तेव्हां अजयसिंहानें आपल्या सज्जनसिंह व क्षेमसिंह. या पुत्रांस त्याचें पारिपत्य करण्याचा हूकूम दिला. या उभयतां बंधूनीं त्याचा मोड करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण मुंजाबालेचा हा कसलेला नामांकित दरवडेखोर असलेनें, अजयसिंहाचे पुत्रांकडून त्याचा बंदोबस्त होईना. त्यामुळें त्याला विशेष दुःख होऊं लागलें. शिवाय तो स्वतः आजारीपणामुळें जास्तच थकत चालला. अशा वेळीं त्याला आपला पुतण्या हमीरसिंह हा ऊनमागावीं असल्याची खबर लागली. तेव्हां त्यानें त्याला मोठ्या प्रेमानें व आदरसत्कारानें आपलेकडे बोलावून घेतलें. त्या वेळीं हमीरसिंहाचें वय १३।१४ वर्षांचें होतें. तो वयानें जरी लहान होता, तरी दिसण्यांत सुंदर, तेजस्वी व भव्य असा होता. त्याला पाहून महाराण्याला अत्यानंद झाला आणि त्यानें त्याला असा हुकूम केल कीं ' तुला जर चितोडच्या क्षत्रिय राजघराण्याची चाड असेल, तर मुंजाबालेचाचा तूं ताबडतोब बंदोबस्त कर ! महाराणाजींचा हा हुकूम शिरसा वंद्य मानून हमीरसिंह बालेचाचा मोड करण्याकरितां सैन्यानिशीं निघाला. त्यानें थोडक्याच दिवसांत गोलवाड जिल्ह्यांतील सेमारीगांवीं मुंजाबालेचाचा पूर्ण मोड केला व त्याला ठार मारून त्याचें शीर कापून घेऊन तो केलवाड्याला परत आला. त्या वेळीं अजयसिंह मृत्युशय्येवर पडला होता. हमीरानें बालेचाचें शिर आणलेलें पाहून त्याला आनंद झाला. लगेच त्यानें आपली समशेर हमीराचे हातीं दिली आणि ह्मणाला कीं, ' तूं एकटाच वीर चितोडपरत घेण्यास लायक आहेस. शिवाय तूं माझ्या वडील बंधूचा पुत्र असलेनें गादीवरही तुझाच खरा हक्क आहे. ' असें ह्मणून त्यानें हमीरसिंहाला आपल्या गादीवर बसविलें. थोड्याच दिवसांत अजयसिंहाचा अंत झाला.

या सर्व प्रकारामुळें अजयसिंहाचा वडील मुलगा सज्जनसिंह याला फार वाईट वाटलें. आपली गादी गेली, तेव्हां येथें रहाण्यांत काय प्रेम आहे ? असें मनानें ठरवून त्यानें केलवाडचा त्याग केला व तो आपल्या कुटुंबाच्या मंडळीसह देशाटन करण्याकरितां निघाला. पहिल्यानें त्यानें चितोड शहरानजिक भोशी किल्ला असलेला व त्या किल्ल्याचे पायथ्याला असलेलें भोसावत नांवाचें एक लहान खेडेंगांव, तेथें आपला तळ दिला. या ठिकाणीं त्यांने बरेच दिवस कालक्रमणा केली. सज्जनसिंहानंतर दिलिपसिंग, सिंहाजी, भोंसाजी व देवराज अशा चार पिढ्या या भोसावत गांवीं त्यांच्या गेल्या. सिंहाजीनें आपल्या मुलाचें नांव आपण रहातों

६००
प्रति ९-१०-३३

त्या भोंसावत गांवावरूनच ' भोसाजी ' असें ठेवलें असावें, असें दिसतें. कारण सिसोदिया घराण्यांत या नांवाचेच वेळीं फरक केलेला आढळतो. भोंसाजीचा मुलगा देवराज हा मोठा शूर होता. मोंगलांबरोबर त्यानें बऱ्याच लढाया मारल्या. त्याचा स्वभाव लढायांत घुसून लढाई करण्याचा होता. पुढें या देवराजाला बिकट परिस्थितीमुळें स्थानत्याग करावा लागला; व तो दक्षिण प्रांतीं निघून आला. त्याचप्रमाणें त्याचा भाऊही उत्तरेकडे निघून गेला. त्याच्याच वंशजांनीं पुढें नेपाळचें स्वतंत्र राज्य स्थापन केलें देश-परत्वें माणसांचीं नांवें, आडनांवें, अगर सामाजिक राहणी यांत फरक पडत असतो. त्याप्रमाणें देवराज यांनांही आपल्या नांवाप्रमाणें आडनांवांतहि फरक करावा लागला. ज्या सिसोदिया घराण्याच्या नांवानें त्यांचेवर राजकीय आपत्ती ओढवली व स्थान-त्यागही करावा लागला, तीच आपत्ती दक्षिणेंतही त्याच आडनांवानें येण्याचा संभव होता कारण त्या वेळीं यावनी सत्ता जोरांत होती. त्या सत्तेचा अंमल सर्व दक्षिण प्रांतींही पूर्ण होता. त्यामुळें स्थलांतराप्रमाणें नामांतरही होणें स्वाभाविक होतें. देवराज यांचे वडिलांपासून ह्मणजे भोंसाजीपासून त्यांचे नांवाला दक्षिणेचें पाणी लागलें होतेंच. पूर्वींच्या चितोडच्या महाराण्यांचीं नांवें सिंह अगर सिंग या शब्दानें पूर्ण होत. तो रिवाज भोंसाजीपासून बंद झाला. चितोड अगर पुढें उदेपूरच्या ज्या दुसऱ्या क्षत्रीय शाखा इतर ठिकाणीं स्थलांतर करून गेल्या, त्यांनींही आपलीं उपनांवें बदल-विलेलीं दिसतात. राणोजी पासून जो वंश झाला, त्याला राणावत; चापाजीपासून जो झाला त्याला चापावत, अशा उपनांवांनीं त्यांच्या वंशास ओळखण्याची पद्धत आहे. त्याचप्रमाणें भोसाजीच्या वंशास भोंसावत हें उपनांव पडणें त्या काळच्या रूढीस धरूनच होतें. पुढें दक्षिणकडील नांवाच्या रूढीप्रमाणें भोंसावत याचें ' भोंसले ' असें अपभ्रंशात्मक रूपक झालें. देवराज याचा लढाईत घुसून शत्रूवर हल्ला कर-ण्याचा स्वभाव होता ह्मणून त्याला घोंसला अगर भोंसला अगर भोंसले ह्मणोत, किंवा भोंसावत गांवीं जाऊन राहिल्यानें भोंसले हें नांव पडलें असो किंवा देवरा-जच्या बापाचे नांवावरून भोंसले हें उपनांव धारण केलें गेलें असो अगर या तीन्ही नांवांच्या त्रिवेणी संगमाचे आधारानें या ' भोंसले ' उपनांवाचें वैशिष्ट्य रूढ झालें असो, कसेंही असो, ' भोंसले ' नांवाची उपपत्ती मात्र अशी आहे.

कोणत्याहि गोष्टीची एकदां घडी विस्कटली ह्मणजे पुन्हां ती पूर्ववत् बसणें फार दुरापास्त असतें. सामान्य कार्यामध्यें पुन्हां जुळवणी करायाला किती काल लागतो,

हें सांगतां येत नाहीं. मग राज्याची विस्कटलेली घडी पुन्हां बसविण्याला किती पिढ्या जातील, याचा नेम नसतो. हाच प्रकार देवराज दक्षिणेंत आल्यानंतर झाला. देशांतर केल्यानंतर सर्व गोष्टी नवीन. भाषा नवीन, लोकांच्या ओळखी नवीन, कार्यक्षेत्र नवीन, पेहराव, रहाणी, हवामान, चालीरीती वगैरे सर्वच कांहीं नवीन. अशा स्थितींत एकच कुटुंब दक्षिणेंत येऊन लोकांच्या आदराला, विश्वासाला पात्र व्हावयाला व आपणही तुमच्या पैकींच आहोंत, ही भावना उत्पन्न व्हावयाला दीर्घ कालाचीच जरूरी लागते. हाच प्रकार देवराज यांच्या बाबतींत झाला. देवराज यांचे नंतर दक्षिणेंत इंद्रसेन, शुभकृष्ण, रूपसिंहजी, भूमिंद्रजी, धापजी, बर्हटजी, खेलोजी, कर्णसिंहजी आणि संभाजी अशा पिढ्या झाल्या. या संभाजीला दोन पुत्र होते. वडील बाबाजी व धाकटा परसोजी. बाबाजी हा सातारकर भोंसल्यांचा मूळ पुरुष व परसोजी हा नागपूरकर भोंसल्यांचा मूळ पुरुष होय. या परसोजीच्या बाबतींत निरनिराळ्या इतिहासकारांचीं निरनिराळीं मतें आहेत. तेव्हां त्याचें या ठिकाणीं थोडें चिकित्सात्मक विवेचन केलेलें बरें.

'उदेपूरचा महाराणा लक्ष्मणसिंह याच्यापासून दक्षिणेंत आलेला देवराजजी 'भोंसला' हा अकरावा पुरुष होय. त्याचा पुत्र 'इंद्रसेनजी' याचा एक बंधु होता. त्याचें नांव उपलब्ध नाहीं. तो नागपूर, महादेव, देऊळगांव, वावी, कोरळ आणि मंजोर येथील 'भोंसले वंशाचा' संस्थापक असें 'मराठी रियासत * ' या पुस्तकांत रा. सरदेसाई यांनीं जी 'भोंसले' कुळाची लहानशी वंशावळ दिली आहे, तींत स्पष्ट ह्मटलें आहे. या इंद्रसेनजी पुरुषापासून श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचे पणजे 'बाबाजी' भोंसले यांचेपर्यंत वर दिल्याप्रमाणें शुभकृष्ण, रूपसिंह वगैरे मिळून दहा पुरुष होऊन गेले. त्यांच्या नामनिर्देशापलीकडे त्यांची माहिती उपलब्ध नाहीं. 'बाबाजी भोंसले' यांच्यापासून मात्र पुढें संगतवार माहिती मिळते. त्यांत देखील सर्वांची एकवाक्यता आहे, असें नाहीं. ही जशी श्रीछत्रपती शिवाजी या भोंसले कुळाची देवराजजीपासून बाबाजी भोंसले या पुरुषापर्यंत ऐतिहासिक हकीकतीची स्थिति आहे, तशीच 'नागपूरकर भोंसले' याही 'भोंसले' कुळाच्या शाखेची स्थिति आहे. देवराजजी याचा पुत्र इंद्रसेन याचा बंधु नागपूर, महादेव, देऊळगांव वगैरे 'भोंसले' या शाखेचा संस्थापक होय;

* रा. सरदेसाई यांची मराठी रियासत नवीन आवृत्ति परिशिष्ट वंशावळी.

असें रा. सरदेसाई यांच्या मराठी रियासतींत प्रसिद्ध झालेल्या वंशावळीच्या आधारें ह्मटलें आहे. त्यांच्या या वंशाच्या संस्थापकाचें नांव उपलब्ध नाहीं. त्याचप्रमाणें त्याच्यापुढील दहा पिढ्यांच्या पुरुषांचीं नावेंही उपलब्ध नाहींत. इंद्रसेनजीपासून बाबाजी भोंसल्यापर्यंत त्या शाखेंतील पुरुषांचीं नांवें तरी उपलब्ध आहेत; परंतु या शाखेची तीही गोष्ट नाहीं.

रा. सरदेसाई यांनीं साताऱ्च्या वंशावळीवरून जी वंशावळ घेतली आहे, तिच्या आधारें तूर्त एवढें ह्मणतां येतें कीं, श्रीशिवाजी छत्रपती यांचे पणजे बाबाजी भोसलें यांच्यापासून दहा पिढ्या पूर्वींचा पुरुष जो इंद्रसेनजी तो व नागपूरकर भोंसले यांचा दहाव्या पिढीचा पुरुष ज्याचें नांव उपलब्ध नाहीं तो, हे दोघे सख्खे बंधू होते. तेव्हां सातारकर छत्रपती भोंसले व नागपूरकर भोंसले या दोन वंशाच्या शाखा एकाच वंशवृक्षाच्या आहेत. बाबाजी भोंसले हे आपणास ' वेरूळकर-देऊळगांवकर ' भोंसले ह्मणवितात; त्याचप्रमाणें नागपूरकर भोंसले हे आपणास ' हिंगणीकर भोंसले ह्मणवितात. बाबाजी भोंसले याचा काल आतां निश्चित झालेला आहे. तो इ. स. १५३३ हा होय. त्याच्या पूर्वींच्या दहाव्या पिढीचा पुरूष जो इंद्रसेनजी त्याचा काल ढोबळमानानें ठरवावयाचा ह्मणजे इ. स. १२९० मध्यें अल्लाउद्दीन खिलजी यानें चितोडवर स्वारी केली तो. त्या वेळीं महाराणा लक्ष्मणसिंह याचा नातू सज्जनसिंह सुमारें २० वर्षांचा असावा असें दिसतें. त्यावेळीं त्याचा मुलगा दिलीपसिंह याचाही जन्म झाला असावा असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. दिलीपसिंहाचा जन्मकाल इ० स० १२९० ते १२९५ हा धरला तर त्याच्यानंतर सिंहाजी, भोंसाजी, देवराज व इंद्रसेनजी अशा चार पिढ्या झाल्या. प्रत्येक पिढी वीस वर्षांची धरली तर इंद्रसेनजी यांचा काल इ. स. १३७० ते १३७५ पर्यंतचा बसतो. हा काल ह्मणजे नागपूरकर भोंसले यांच्या संस्थापकाचा काल येतो. ह्मणजे चवदाव्या शतकाच्या चवथ्या चरणाचे प्रारंभीं नागपूरकर भोंसले व सातारकर भोंसले या दोन्ही शाखांचा संस्थापक बंधु बंधु होते असें रा. सरदेसाई यांनीं आपल्या मराठी रियासतींत दिलेल्या वंशावळीवरून अनुमान निघतें. आता त्याच्या अलीकडे-जेव्हांपासून श्रीशिवाजी महाराजांचे पणजे बाबाजी भोंसले यांचा काल निश्चित होऊन त्याची माहिती मिळते त्या कालपासून-ह्मणजे बाबाजी भोंसले यांच्या कालापासून नागपूरकर भोंसले यांच्या

समकालीन असलेल्या पुरुषाची कांहीं माहिती या अनुमानाला पुष्टी देणारी मिळते किंवा नाहीं हेंहि या ठिकाणीं पाहिलें पाहिजे.

' भारतवर्ष वर्ष १ लें ' या मासिक पुस्तकांत बऱ्याच वर्षांपूर्वी रा. आचार्य कालगांवकर यांनीं ' शिवछत्रपती भोंसले ' यांच्या संबंधानें एक विस्तृत लेख लिहून त्यांत शिवाजीची एक जुनी वंशावळ दिली आहे. त्या वंशावळींत शिवाजीचा पणजा जो बाबाजी भोंसले त्याला एक बंधु होता. त्याचें नांव ' परसोजी '. त्याचा वंश दक्षिणेंत गुप्त असें ह्मटलें आहे. ' परसोजी ' हा बाबाजीचा मोठा किंवा धाकटा भाऊ असल्यास त्याचा काल बाबाजी भोंसले याच्या कालावरून इ. स. १५३० किंवा १५३६ असा येतो. नागपूरकर भोंसले यांची जी वंशावळ ' नागपूरकर भोंसले यांची बखर ' विविधज्ञानविस्तार पुस्तक ९।१० यांत आणि इतर दुसऱ्या पुस्तकांतून प्रसिद्ध आहे, त्यांत ' परसोजी ' मूळ पुरुष दाखविला आहे. या परसोजीच्या पूर्वीच्या पुरुषांचीं नांवें अगर माहिती कांहींच उपलब्ध नाहीं. नागपूरकर भोंसल्यांचा मुळपुरुष ' परसोजी ' भोंसल्याचा पुत्र बिंबाजी. त्याचा पुत्र मुधोजी आणि त्याचे तीन पुत्र बापूजी, परसोजी आणि साबाजी असे होते. हे नागपूरकर भोंसले यांच्या वंशांतील तीन पुरूष श्रीछत्रपती शिवाजी यांचे समकालीन होते एवढेंच नव्हे तर त्यांच्या सैन्यांत शिलेदारीपासून मोठ्या हुद्यापर्यंत चढले होते. शिवाजीचा काल १६२७ ते १६८० पर्यंतचा आहे. तेव्हां या तीन्ही नागपूरकर भोंसल्यांच्या पुरुषांचा काल हाच बसतो. यावरून यांचा बाप मुधोजी भोंसले, नागपूरकरांचा पूर्वज हा शिवाजीचा बाप शहाजी याच्या समकालीन; मुधोजीचा बाप बिंबाजी हा शिवाजीचा आजा मालोजी याच्या समकालीन; आणि बिंबाजीचा बाप परसोजी हा शिवाजीचा पणजा बाबाजी याच्या समकालीन होता, असें ठरतें. यावरूनच ' परसोजी भोंसले ' नागपूरक-रभोंसले यांचा मुळपुरूष याचा काल इ. स. १५३० किंवा १५३६ असा वर दिला आहे. शिवाय बाबाजी भोंसले देऊळगांवकर साताऱ्या छत्रपतींचे पूर्वज आणि परसोजी भोंसले नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज या दोन्हीं शाखांच्या पिढ्या शिवाजीपर्यंत आणि दुसऱ्या परसोजी भोंसल्यापर्यंत चार चार बरोबर जुळतात; हें एक प्रमाण झालें.

प्रमाण दुसरें—शिवाजीराजे यांचे आजे मालोजी व त्यांचे बंधु विठोजी यांच्या समकालीन नागपूरकर भोंसल्याचा पुरूष बिंबाजी हा होय. मालोजीला

दोनपुत्र शहाजी आणि शरीफजी असून विठोजीला १ खेलोजी २ संभाजी ३ मालोजी ४ परसोजी वगैरे आठपुत्र होते. या विठोजीच्या मुलांत परसोजी हें नांव आढळतें. पुढें या नांवाची पुनरावृत्ति शिवाजी महाराजांच्या पुढील वंशांत झालेली दिसत नाहीं. नागपूरकर भोंसल्यांच्या वंशांत मात्र त्याची पुनरावृत्ति बरेच वेळा झालेली आहे. विठोजीराजे यांनीं आपल्या मुलांचीं जीं नांवें ठेविलीं तीं नांवें लक्षांत घेतां त्यांनीं आपल्या पूर्वजांपैकीं व अगदीं जवळच्या नात्यापैकीं ठेविलीं आहेत असें दिसून येतें. पहिल्या मुलाचें नांव खेलोजी हें विठोजीच्या खापरपणजाचें नांव. दुसरा मुलगा संभाजी हें त्याच्या आजाचें नांव. तिसरा मुलगा मालोजी हें त्याच्या भावाचेंच नांव. चवथा मुलगा परसोजी हें त्याच्या चुलत्याचें नांव. याप्रमाणें नांवें आपल्या अगदीं जवळच्या नात्याच्या मंडळींचीं ठेविलीं होतीं. विठोजीच्या मुलाच्या ‘ परसोजी ’ या नांवानंतर पुढें त्या नांवाची सातारकर भोंसल्यांच्या घराण्यांत ज्या अर्थी पुनरावृत्ति नाहीं व नागपूरकर भोंसले घराण्यांत त्याची वरचेवर पुनरावृत्ति झालेली आहे, त्या अर्थी नागपूरकर भोंसले यांचा पूर्वज परसोजी भोंसले हा श्रीछत्रपती शिवाजी यांचा पणजा बाबाजी याचा भाऊ जो परसोजी तोच असला पाहिजे, असें प्रमाण निघतें.

प्रमाण ३ रें:- इ. स. १६८० मध्यें श्रीछत्रपती शिवाजी महाराज जेव्हां दिवंगत झाले; त्या वेळीं नागपूरकर भोंसल्यांचा पूर्वज पहिला सेनासाहेब सुभा, परसोजी भोंसले याचा भाऊ साबाजी भोंसले हिंगणीकर हा रायगडीं त्यांचेजवळ होता. या साबाजी भोंसल्यास इ० स० १६७४ सालीं श्रीछत्रपती शिवाजी महाराजांनीं मौजे राक्षसवाडी व मौजे पिंपरी या दोन गांवांचें इनाम पत्र करून दिलें होतें. तें येणेंप्रमाणें:—

स्वस्तिश्रीराज्याभिषेक शके पंधराशें शहाण्णव आनंदनामसंवत्सरे आश्विन बहुल दशमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यांनीं राजेश्री साबाजी बिन मुधोजी भोंसले यांसी दिलें इनामपत्र ऐसाजेः—— तुह्मीं स्वामीचे पुरातन सेवक एकनिष्ठपणें सेवा करून स्वामींस संतुष्ट केलें. तुमचे चालविणें स्वामींस अवश्यमेव. विशाळगडाचे मुक्कामीं दर्शनास आले ते वेळेस प्रसंगीं तुह्मीं विनंति केली कीं, आपणास इनाम लेकरानलेकरीं चालेल असा दिला पाहिजे. ह्मणोन त्याज-

वरून स्वामी तुह्मांवर कृपाळु होऊन, तुह्मांस नूतन इनाम देई, कुलबाब, कुलकाम खेरीज हक्कदार व इनामदार करून पूर्व मर्यादे प्रमाणें गांव वितपशील:—

प्रत पत्रिका नं. ७८३ १-१०-३३

१ मौजें राक्षसवाडी तर्फ रासिंन देह १

२ मौजें पिंपरी कोल्हेर तर्फ कडेवली देह १

एकून देहे २ रास अजरामरात करून दिल्हे असे. तरी सदरहू गांव तुह्मी आपले मुलां लेकरीं, घेऊन इनाम तुह्मीं वडिलांचे वंशपरंपरेनें अनुभवून स्वामींचे सेवन मनोभावें करून सुखरूप राहणें जाणिजे. लेखालंकार.

हेच इनामदार साबाजी भोंसले नेहमीं शिवाजी महाराजांचे जवळ असत. हे त्यांचे जवळ शिलेदारापासून तों मोठ्या हुद्यापर्यंत चढले होते. शिवाजी महाराज दिवंगत झाले त्या वेळीं त्यांचा वडील मुलगा संभाजी हा पन्हाळा किल्ल्यावर प्रतिबंधांत होता. राजाराम महाराज रायगडींच होते. राजघराण्यांत पूर्वींची चाल अशी होती कीं, राजा मरण पावला ह्मणजे त्याचा मुलगा पहिल्यानें गादीवर बसे व नंतर राजाच्या शवाला अंत्यविधि करण्याचा नवीन बसलेल्या राजाकडून हुकूम मिळे. या रिवाजाप्रमाणें प्रत्यक्ष राजाच्या मुलाला बापाची उत्तर क्रिया करतां येत नसे. गादीवर बसले नंतर राजाला उत्तर क्रिया करतां येत नाहीं, ह्मणून ती क्रिया राजाचा अगदीं जवळचा नातलग दहा दिवसांच्या सुवेरसुतकाचा अधिकारी जो असेल, तोच राजाच्या उत्तर क्रियेचा अधिकारी असतो. साबाजी भोंसले हिंगणीकर ह्मणजे नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज यांनीं श्रीछत्रपती शिवाजी भोंसले यांची सर्व उत्तरक्रिया केली. ह्या उत्तरक्रियेचा मान दुसऱ्या कोणत्याही भोंसल्याला मिळाला नाहीं. अर्थात् साबाजी भोंसले हिंगणीकर हे शिवाजी महाराजांना अगदीं जवळचे, पिढ्या न तुटलेले, दहा दिवसांचे पूर्ण अधिकारी असेच होते. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाला त्यावेळीं जवळचे आप्त, दूरचे आप्त, पंचकुळी, सप्तकुळी, कोणाला वेदाचा अधिकार, कोणाला नाहीं याची पूर्ण छाननी झालेली होती; व पूर्ण धार्मिक दृष्टीच्या कृत्यांची जुळवणी बसविली होती. अशा धार्मिक महत्वाच्या कालाच्या वेळीं व प्रत्यक्ष छत्रपतीच्या उत्तर कार्याच्या प्रसंगीं बारा पंधरा पिढ्यांच्या अगोदरचा संबंध असलेला कोणी तरी भोंसला आणून त्याचे हस्तें त्यांची उत्तरक्रिया केली जाईल हे अगदींच संभवत नाहीं. सामान्यतः सात

६५८०

पिढ्या गेल्या ह्मणजे पिढ्या तुटल्या जातात. मग कोणी कोणाचें सुवेरसुतक पाळीत नाहीं. पण रा. सरदेसाई यांचे वंशावळीप्रमाणें त्याच्या दुप्पट पिढ्या झालेवर तें कसें व कोण पाळणार ? या गोष्टीचा सध्यांच्या काळाच्या दृष्टीनें विचार करावयाचा नसून त्या वेळेची धर्मजागृति, जातिवैशिष्ट्य या दृष्टीनें विचार केल्यास पंधरा पिढयांचे अगोदरच्या संबंधीं पुरुषास शिवाजी महाराजांची उत्तरक्रिया करण्याचा अधिकार खात्रीनें मिळण्यासारखा नव्हता; व दुसऱ्या जवळच्या भोंसल्यांनीं तो देऊंही पण दिला नसता. या एकंदर प्रकारामुळें साबाजी भोंसले हे शिवाजी महाराजांच्या अगदीं नजीकचे दोन चार पिढीचे संबंधीं असावेत असें सिद्ध होतें. यावरून शिवाजीचे पणजे बाबाजी भोंसले यांचे बंधु जे परसोजी भोंसले होते, त्यांचाच हा नागपूरकर भोंसल्यांचा वंश हें प्रमाण सिद्ध होतें.

प्रमाण ४ थें:—क्षत्रिय मराठे लोकांत एक असा रिवाज आहे कीं, त्या रिवाजानें अती निकटचे आप्तइष्ट किंवा एका रक्ताचे भाऊबंद ओळखतां येतात. तो रिवाज ह्मणजे एका ताटांत बसून जेवणें. केवळ एका रक्ताचे जवळचे भाऊबंद किंवा अगदीं जवळचे नातेवाईक ह्मणजे मुलीचे मुलगे, बहिणीचे मुलगे, सासरे वगैरे अशा प्रकारचे आप्तइष्ट एवढेच एका ताटाचे अधिकारी होऊं शकतात. या रिवाजाचा खरेपणा राजकारणांतही ग्राह्य मानला जात असे; इतका तो रिवाज शिवाजी महाराजांचे वेळेपासून महत्वाचा होऊन बसला होता. इ स. १७०९ सालीं छत्रपती संभाजी महाराजांचा मुलगा शाहु जो औरंगजेबाच्या कैदेंत इ. स. १६८९ सालापासून होता; त्याची मुक्तता औरंगजेबाच्या मरणानंतर त्याचा मुलगा बहादुरशहा यानें इ. स. १७०८ मध्यें केल्यामुळें तो दक्षिणेंत आपल्या साताऱ्च्या गादीवर बसण्याकरितां येऊं लागला. ही हकीकत नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज व पहिले सेनासाहेब सुभे परसोजी भोंसले यांना खानदेशांत समजली. त्याबरोबर ते आपल्या दहा हजार सैन्यानिशीं पहिल्यानें शाहुमहाराजांना येऊन मिळाले. त्या वेळीं साताऱ्ची गादी श्रीछत्रपति राजाराममहाराज यांची बायको राणी ताराबाई ही आपला मुलगा वेडा शिवाजी याचे नांव चालवीत होती. साताऱ्चे गादीवर बसण्याकरितां शाहु दिल्लीहून येत आहे ही वार्ता ताराबाईस समजली. त्या वेळीं ताराबाईच्या पक्षाकडील लोकांनीं शाहूला गादी न मिळतां ती ताराबाईकडेच रहावी या हेतूनें अशी हूल उठविली कीं, दिल्लीहून येणारा शाहु हा छत्रपती संभाजी यांचा

मुलगा नसून कोणी तोतयाच शाहु सातारची गादी बळकविण्याकरितां येत आहे. ही हूल अर्थात ताराबाईला योग्य व खरी वाटली. कारण, सातारच्या गादीवर दिल्लीपतींचा डोळा फार दिवसापासूनचा होता. लढाई करून हिंदुपद-पातशाही नामशेष करतां आली नाहीं म्हणून त्यांनीं ही नवीन टूम काढली असावी; अशी कल्पना ताराबाईला येणें स्वाभाविक होतें. शिवाय दुसरी गोष्ट अशी होती कीं, अधिकार आणि राज्यवैभव हीं आपलीं जावीं असें कोणाला वाटेल ! त्या दृष्टीनेंही खऱ्या शाहूनें सातारच्या गादीवर येणें ताराबाईस अनिष्टच होतें. तोतया शाहु निघाला तर त्याचें पारिपत्य करणें त्या वेळीं अगदींच सोपें होतें. कारण सातारची हिंदपदपातशाही मोगलांच्या हातीं जावी या विचाराचा एकही सरदार दक्षिणेंत त्या वेळीं नव्हता. तोतयाशाहूचें पारिपत्य करण्यास सर्व महाराष्ट्र एकजुटीनें तयारच झाला असता. पण शाहु तोतया नसतां जर खराच असला तर त्याच्या-बरोबर सामना देण्याला पूर्व तयारी करण्याची अवधी मिळावी म्हणून ताराबाईच्या पक्षानें बिनतोड अशी सल्ला काढली कीं, शाहु तोतया आहे कीं खरा आहे हें निश्चित ठरविण्याकरितां नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज व परसोजी आणि साबाजी भोंसले यांचे सख्खे बंधु बापूजी भोंसले यांस सैन्यासह त्यांचे भेटीस पाठवावें. बापूजी भोंसले हे श्रीछत्रपती शिवाजी महाराजांचे एकनिष्ठ सेवक असून पूर्ण कर्मनिष्ठ क्षत्रिय व सातारकर भोंसल्यांचे एकताटाचे अधिकारी म्हणूनच त्यांची या महत्वाचे कामीं आणि राजकारणाचे बावतींत योजना झाली होती. शिवाय बापूजी भोंसले यांनीं शाहूला अगदीं तान्ह्याबाळापासून पाहिलें होतें. ही सल्ला दरबारी मंडळींत सर्वमान्य ठरून बापूजी भोंसल्यांची शाहूच्या भेटीस रवा-नगी झाली. बापूजी भोंसल्यांची व शाहूची नाशिकजवळ गोदावरी तटाकीं भेट झाली. परस्परांची ओळख पटली व हा शाहू तोतया नसून खरा आहे याची लोकांना खातरजमा व्हावी म्हणून बापूजी, परसोजी भोंसले व शाहू महाराज सर्वांसमक्ष तेथें एका ताटांत बसून जेवले. या प्रकारानें सातारच्या गादीवर बसण्याकरतां येत असलेले शाहु महाराज तोतया नसून खरे आहेत अशी ताराबाई-सह सर्व महाराष्ट्रांतील जनतेची खात्री पटली. ज्या गोष्टीनें छत्रपतीच्या गादीच्या मालकीची उलटापालट झाली ती गोष्ट नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्वजाचे हातीं देऊन ते एका ताटांत घेऊन शाहूबरोबर जेवले, यावरून शाहूच्या खरेपणाची साक्ष ताराबाई

सारख्या धूर्त व स्वार्थसाधु स्त्रीला पटावी यांतील गर्भितार्थ कोणता निघतो ? हे बापूजी भोंसले पंधरा पिढ्यांचे मागचे सातारकर भोंसल्यांचे संबंधवाईक असते तर त्यांना असल्या नाजुक व जबाबदारीच्या कामावर पाठविण्याचें कार्य ताराबाईनें केलेंच नसतें. बरें तसें कोणत्यातरी अपरिहार्य कारणानें झालें असतें तरी त्यांच्या एक ताटांत जेवण्यानें खऱ्या शाहूची सत्यता ताराबाईच्या मनाला कधींच पटली नसती. यावरून नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज बापूजी भोंसले हे सातारकर भोंसल्यांचे निकटचे भाऊबंद होते, हें सिद्ध होतें. ह्मणून श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचे पणजे बाबाजी भोंसले यांचे बंधु परसोजी भोंसले हेच नागपूरकर भोंसल्यांचे मूळ पुरुष होत हेंच प्रमाण सिद्ध होतें.

प्रमाण ५ वें:—श्रीछत्रपती शाहुराज यांना पुत्र संतान नव्हतें. तेव्हां त्यानीं गादीला वारस पाहिजे ह्मणून दत्तक घेण्याचा विचार ठरविला. दत्तक मुलगा घ्यावयाचा ह्मणजे तो शक्य तेवढ्या जवळच्या पिढींतील घेण्याचा परिपाठ असतो. करवीरच्या भोंसले घराण्यापैकीं दत्तक घेण्यांसारखा मुलगा त्यावेळीं दृष्टिपथांत नव्हता. ह्मणून शाहूनें रघोजी भोंसले नागपूरकर यांचा मुलगा मुधोजी यास दत्तक घेण्याचें ठरविलें. ही गोष्ट सर्वत्रांचे मुखीं झाली पण या गोष्टींत पुण्याचें राजकारस्थान आडवें आलें. नानासाहेब पेशवे यांस अगोदरच नागपूरचे रघोजी भोंसले हे डोईजड झाले होते. पेशव्यांच्या राज्यविस्तारापेक्षां नागपूरकर भोंसल्यांचाच राज्यविस्तार जास्त झाला होता. त्यांत रघोजी भोंसले हे श्रीछत्रपती शाहूमहाराज यांचे साडु बंधू. त्यामुळें भोंसले कुळाच्या नात्यापेक्षां हा नवीन पुन्हां जवळचा संबंध जोडला गेलेला. अशा स्थितींत त्याचा मुलगा-मुधोजी हा साताऱ्च्या गादीचा दत्तक होऊन मालक बनल्यावर आपली धडगत लागणार नाहीं या विचारानें नानासाहेब पेशव्यांनीं राजकारस्थानाला सुरवात केली. त्यांनीं ताराबाईला हाताशीं धरलें, व ताराबाईच्या रहस्यमय नातवाला पुढें आणून शाहूकडून मुधोजीस दत्तक घेण्याचा बेत रहित करविला. दत्तकाचा प्रकार अमलांत कसाही येवो पण साताऱ्च्या गादीला दत्तक घेण्याचे वेळीं करवीरच्या भोंसल्यांत दत्तक घेण्यासारखा मुलगा नाहीं असें दिसतांच रघोजीचा मुलगा दत्तक घेण्याचा विचार शाहु छत्रपतीनीं केला यावरूनच साताऱ्च्या भोंसल्यांना दुसरे जवळचे भोंसले ह्मणजे नागपूरचे होते हें सिद्ध होतें, यावरून

श्रीछत्रपती शिवाजी भोंसले यांचे पणजे बाबाजी भोंसले यांचे बंधु परसोजी भोंसले हेच नागपूरच्या भोंसले घराण्याचे मूळपुरुष हें सिद्ध होतें.

प्रमाण ६ वें:—नागपूरकर भोंसल्यांचा पूर्वज दुसरा परसोजी भोंसले याला श्रीछत्रपती राजाराम महाराज यांनीं ' सेनासाहेब ' हा किताब आणि सरंजाम देऊन वऱ्हाडांत पाठविलें. त्यांचें खरें काम ह्मणजे चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचें होतें; परंतु ते जेथें जात तेथें ते आपला अंमल बसवीत असत. परसोजी भोंसले ' सेनासाहेब ' होऊन वऱ्हाडांत गेलेनंतर हल्लींच्या वणी तालुक्यांत ' भाम ' ह्मणून गांव आहे, त्या गांवीं त्यांनीं आपलें ठाणें बसविलें आणि तीच आपली राहण्याची मुख्य जागा केली. 'भोंसले' नागपुरास जाईपर्यंत त्यांची राहण्याची हीच मुख्य जागा होती. रा. यादवराव काळे हे आपल्या वऱ्हाडच्या इतिहासांत पुढीलप्रमाणें माहिती देतात. " भाम † हें पूर्वी लहान गांव होतें व हल्लींही लहानच आहे. परंतु तें गांव राजधानीस पसंत करण्यांत कांहीं पूर्व परंपरा होती. परसोजीचे चुलते निजामशाही राज्यांत नोकर होते. ते शिवाजीचा बाप शहाजी याच्या समकालीन होते. त्यांच्या नोकरीबद्दल त्यांना उमरावती व भाम हीं गांवें जहागीर मिळालीं होतीं. त्यामुळें परसोजीनें वरील ' भाम ' गांव पसंत केलें. परसोजी ' भाम ' येथें आला त्या वेळीं त्याचे दोघे चुलते ' भाम ' येथें आपले जहागिरिवर रहात असत."

या इतिहासप्रसिद्ध माहितीवरून शहाजीराजे यांचे समकालीन परसोजीचे दोघे चुलते निजामशाहींत कोणते नोकर होते व त्यांना उमरावती व ' भाम ' ही जहागीर केव्हां निजामशाहीकडून मिळाली होती याचा विचार करूं. परंतु तत्पूर्वी श्रीछत्रपती शिवाजी महाराजांचे पणजे बाबाजी भोंसले व आचार्य कालगांवकर यांचे वंशावळीप्रमाणें त्यांचे बंधु परसोजी भोंसले जे नागपूरकर भोंसल्यांचे मूळपुरूष या उभयतांच्या पिढ्या स्पष्टपणें लक्षांत येण्याकरितां पहिल्यानें खालीं वंशावळ देऊन त्याप्रमाणें विचार करूं. ही वंशावळ पुढें ठेवून परसोजीच्या ' भाम ' येथील दोन चुलत्यांचा विचार करावयास अर्थात विशेष सुलभ जाईल.

---

† काळेकृत वऱ्हाडचा इतिहास पान १७८.

- संभाजी
  - बाबाजी भोंसले सातारचे मूळपुरुष.
    - मालोजी
      - शहाजी
        - छत्रपती शिवाजी
      - शरीफजी
    - विठोजी
      - १ खेलोजी २ संभाजी ३ मालोजी ४ परसोजी वगैरे ८ मुलगे
  - परसोजी भोंसले नागपूरचे मूळ पुरुष
    - विंब्राजी
      - मुधोजी
        - बापूजी
        - परसोजी पहिला सेनासाहेब सुभा
        - साबाजी वगैरे ७ जण.
      - रूपाजी
        - संताजी
        - राणोजी

वरील ' वंशावळ ' समोर ठेवून विचार करतां परसोजी भोंसले सेनासाहेब ' भाम ' गांवीं आला त्या वेळीं त्याचे दोघे चुलते आपल्या जहागिरीचे गांवीं भाम येथें होते. परंतु नागपूरकरांची वंशावळी पहातां परसोजीला ' रूपाजी ' या नांवाचा एकच चुलता होता. शिवाय परसोजीचा बाप मुधोजी व चुलता रूपाजी हे शहाजीराजे यांचे समकालीन होते पण त्यांना निजामशाहीकडून जहागीर मिळाले-ल्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. ते दोघेही बंधू शहाजीच्या सैन्यांत नोकर होते व शहाजी निजामशाही सोडून आदीलशाहींत नोकर झाले तेव्हांही हे दोघे बंधू त्यांच्याच सैन्यांत असल्याबद्दल ऐतिहासिक पुरावा मिळतो. मग परसोजीचे दोन चुलते ' भाम ' येथें होते ते कोणते चुलते भामच्या जहागिरीवर असणें शक्य आहे याचा विचार पाहूं.

रा. राजवाडे यांच्या ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' याच्या चवथ्या खंडांत मालोजीराजे यांस इ. स. १६०४ च्या मार्च महिन्याच्या २६ तारखेस जी निजामशाहीकडून जहागीर मिळाली त्याचा उल्लेख आहे. पुणें, नाशिक, नगर आणि खानदेश या जिल्ह्यांतून मालोजीच्या जहागिरीचीं ठाणीं पसरलीं होतीं एवढेंच नव्हे तर † ' कांहीं वऱ्हाडांतीलही परगणे मालोजीच्या जहागिरींत होतें. ' मालोजीला ही जी जहागीर देण्यांत आली होती ती मोंगलांच्या, विजापूरकरांच्या व खानदेशांतील पुंडांच्या तडाक्यांत असलेली होती. त्यामुळें आपली जहागिर सुरक्षित ठेवण्यांत मालोजीचें बहुतेक आयुष्य गेलें. अर्थात मालोजीला मिळालेल्या जहागिरीच्या रक्षणार्थ मालोजीचा भाऊ विठोजी व त्याचे पुत्र यांस मालोजीबरोबर सहकार्य करावें लागलें. पुढें इ. स. १६३७ मध्यें दिल्लीपती शहाजहान बादशाहानें निजामशाही काबीज केली व त्याचा आणि विजापूरच्या महमद आदिलशहाचा तह ठरला. त्या तहामुळें शहाजीस विजापूरकरांच्या आश्रयास जावें लागलें. या तहामुळें निजामशाहीचा भीमेचे उत्तरेकडील मुलुख मोंगलांचे ताब्यांत गेला. अर्थात स्वत: शहाजी आपल्या वऱ्हाडच्या जहागिरीस मुकला. परंतु विठोजीचे मुलगे मात्र शहाजीबरोबर आदी-लशहाचे नोकरीकरतां विजापुरीं गेले नाहींत. ते लुकजी जाधवरावांप्रमाणें मोंगलांचे मनसबदार बनून त्यांचे नोकरींत राहिले. त्यामुळें पुढें उमरावती व भाम

† रा. राजवाडे यांची इतिहासाचीं साधनें खंड ४ पान ३६.

ही जहागीर विठोजीच्या मुलांकडे राहिली. विठोजीचा मुलगा खेलोजी हा मोंगलांचा मनसबदार होता, हा ऐतिहासिक पुरावा मिळतोच. यावरून परसोजी भोंसले हा ज्या वेळीं वऱ्हाडांत आला त्या वेळीं विठोजीच्या आठ पुत्रांपैकीं कोणी दोघे पुत्र उमरावती व भाम या गांवचे जहागीरदार 'भाम' येथें होते असें ठरतें; आणि वरील वंशावळ पहातां विठोजीराजांचे मुलगे हे परसोजी सेनासाहेब सुभे यांचे चुलत चुलते होतात हें दिसून येईल. या सर्व गोष्टींचा विचार करतां श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचे पणजे बाबाजी भोंसले व नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज परसोजी भोंसले हे सख्खे बंधू होते हेंच प्रमाण खरें ठरतें.

प्रमाण ७ वें—'मराठी साम्राजाची § छोटी बखर' यांतील परिशिष्ट १ यांत खालीलप्रमाणें विठोजीच्या आठ मुलांच्या वंशविस्ताराची माहिती दिली आहे. "विठोजीराजे, बाबाजी यांचे पुत्र, यांचा वंश. १ खेलोजी वडील. यांस अवरंगजेब बादशहानें दिल्लीस नेऊन जिवें मारलें. त्याचें घर शंभु म्हादेव, शिंगणापूर व गंगातीर येथें कळस निगुडी भीमातीर येथें, दोनी गांवांस राहतात. २ मंबाजी (ह्मणजे संभाजी) राजे यांचा वंश वाडीनजीक श्रीगोंदें येथें राहतात. ३ तिसरा पुत्र (यांचे वंशज) हिंगणी बेरडी तर्फ पाटस प्रांत पुणें येथें पाटिलकी करून आहेत. चवथा पुत्र (यांचे वंशज) मौजे देऊळगांव तर्फ पाटस प्रांत पुणें येथें पाटीलकी करून आहेत." या माहितीवरून विठोजीराजे यांचा हिंगणी, बेरडी व देऊळगांव या गांवच्या पाटिलक्यांचा संबंध होता. सातारकर भोंसल्यांना देऊळगांवकर ह्मणत असत हें मागें आलेंच आहे. त्याप्रमाणें नागपूरकर भोंसल्यांना हिंगणीकर भोंसले ह्मणत असत याचाही मागें उल्लेख आलाच आहे. देऊळगांव व हिंगणी बेरडी हीं तर्फ पाटस प्रांत पुणें पैकींच गांवें आहेत. या हिंगणी गांवासंबंधानें खालीलप्रमाणें नागपूरकर भोंसल्याच्या बखरींत नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्वजासंबधानें उल्लेख आहे. "मौजे हिंगणी × पाटस प्रांत हा गांव वैराणींत होता; सबब त्या परगण्याचे हाकमाकडे जाऊन मौजे मजकूरची वसाहत कबूल करून पाटिलकी वतनी मुधोजी भोंसले व रूपाजी भोंसल्यांच पूर्वजांनीं कबूल केली." मुधोजी व

§ मराठी साम्राज्याची छोटी बखर पान ११३.

× नागपूरकर भोंसल्यांची बखर पान ४.

रूपाजी भोंसले यांचे पूर्वज ह्मणजे मूळ परसोजी भोंसले असाच वंशावळीवरून अर्थ घ्यावा लागेल. आतां सातारकर भोंसल्यांचे पूर्वज देऊळगांवचे वतनी पाटील होते व नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज हिंगणी गांवचे वतनी पाटील होते व त्या दोन्ही गांवचे विठोजीच्या मुलांचे वंशज वतनी पाटील आहेत यांतील रहस्य काय असावें हें आतां पाहूं. विठोजीचा वडील बंधु मालोजी हा मनसबदार होऊन त्याचे वंशज पुढें छत्रपती झाल्यानें मालोजीच्या वंशजांस देऊळगांवच्या वतनी पाटीलकीची अर्थात् जरूरी राहिली नाहीं. त्याचप्रमाणें नागपूरकर भोंसल्यांचे वंशज नंतर नागपूरच्या स्वतंत्र गादीचे मालक झाल्यामुळें त्यांना हिंगणीच्या पाटीलकीचा मोह राहण्याचें कारण उरलें नाहीं. अर्थात् या जुन्या पाटिलकी वतनाचा आसरा विठोजीच्या कुटुंबाचा परिवार मोठा असल्यानें व त्याचे वंशजांस स्वतंत्र राज्य स्थापतां न आल्यानें पूर्वीची पाटिलकी वतनी कायम चालविण्याची त्यांना जरूरी वाटली व ती तेव्हांपासून विठोजीच्या घराण्याकडे आज तारखेपर्यंत चालत आहे. देऊळगांवची वतनी पाटिलकी मिळविणाऱ्या विठोजीच्या पूर्वजांशीं विठोजीचा जो हक्क संबंध पोंचतो तोच हक्कसंबंध हिंगणीची वतनी पाटिलकी मिळविणाऱ्या नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्वजांशीं त्याचा पोंचतो. ह्मणूनच विठोजीच्या वंशजांकडे या दोन्ही गांवच्या परंपरागत वतनी पाटिलक्या आज तागाईतपर्यंत चालल्या आहेत. रा. सरदेसाई यांनीं दिलेल्या इंद्रसेनजी याचे भावापासून जर नागपूरकरांची शाखा निराळी निघाली असती तर देऊळगांव व हिंगणी या गांवच्या वतनी पाटिलक्यांचें एकीकरण विठोजीच्या वंशांत झालेलें दिसलें नसतें. शिवाय दहा पिढ्या अगोदर विभक्त झालेलें घराणें तर्फ पाटस प्रांत पुणें यांतील नजीक नजीकच्या देऊळगांव व हिंगणी या गांवीं येऊन इतक्या एकत्र घराण्याच्या पद्धतीनें राहणें अगदींच अशक्य आहे. आणखी असें कीं, सातारकर भोंसले व नागपूरकर भोंसले या उभयतांच्या इतिहासाचा मूळ प्रवाह पाहतां त्याचा ओघ अगदीं एक व एकमेकांशीं अगदीं संलग्न असलेला दिसतो. यावरून असें स्पष्ट व उघड प्रमाण निघतें कीं, श्रीछत्रपती शिवाजीमहाराज यांचे पणजे बाबाजी भोंसले व नागपूरकर भोंसले यांचे पूर्वज परसोजी भोंसले हे सख्खे भाऊ होत.

वरील सात प्रमाणांवरून असें स्पष्ट होतें कीं, इंद्रसेनजी याच्या भावापासून नागपूरचें घराणें निघालें नसून तें बाबाजी भोंसले यांचे बंधु परसोजी भोंसले यांचेच

पासून निघालें आहे. ह्मणून सातारकर भोंसले व नागपूरकर भोंसले या दोन्ही शाखांचा मूळपुरुष संभाजी भोंसले हा होय. ही वंशावळ मागें दिली आहे तीवरून लक्षांत येण्यासारखें आहे.

**कुलस्वामी–कुलधर्म–कुलाचार** आणि **उपास्यः**—उदेपुरानजीक चितोड शहर आहे. तेथें श्रीजगदंबेचें स्थान व उदेपुराहून २०।२५ मैलांवर एकलिंगजी नांवाचें श्रीशंकराचें स्थान अशीं दोन देवस्थानें आहेत. हींच उदेपूरच्या सिसोदिया वंशाचीं कुलदैवतें आहेत. परंतु त्यांची शाखा जी पुढें दाक्षिणेंत ' भोंसले ' या नांवानें प्रसिद्धीला आली, तिच्या वंशजांना उत्तर हिंदुस्थानांत जाऊन आपल्या कुलदैवतांचें वारंवार दर्शन घेऊन येतां येणें परिस्थितीच्या दृष्टीनें अनुकुल नसल्यानें ते दक्षिणेंत एकलिंगजीच्या ऐवजीं शंभुमहादेव व श्रीजगदंबेच्या ऐवजीं तुळजापूरची भवानी यांना भजून तींच आपलीं कुलदैवतें मानूं लागले. तत्वतः उदेपूरच्या सिसोदियांच्या कुलदैवतांत व दक्षिणेंतील भोंसल्यांच्या कुलदैवतांत मूळचा कांहींच फरक नाहीं. पुढें श्रीशिवाजी महाराजांनीं प्रतापगडावर भवानीची स्थापना केली व ताराबाईनें कोल्हापूरचें राज्य स्थापन केल्यावर तेथें अंबाबाईची स्थापना केली. यामुळें तुळजापूरच्या भवानीचें महत्व थोडें कमी झालें. शिवाय शिवाजीमहाराजांना भवानीचा दृष्टांत झाल्यामुळें ते व त्यांची पुढील पिढी भवानीलाच भजूं लागली. नागपूरकर भोंसल्यांच्याही घराण्यांत देवीचें प्रस्थ जास्तच होतें. पहिले सेनासाहेब सुभे परसोजी भोंसले यांचे वडील मुधोजी भोंसले यांनीं साताऱ्याजवळील देऊर गांवीं मुधाई देवीची स्थापना केली. तिचा कुळाचार अद्यापि नागपूरकर भोंसल्यांच्या घराण्यांत चालू आहे. नागपूरकर भोंसले नागपुरास येण्याचे अगोदर त्यांचे घराण्यांतील श्रीशंकराचें कुलदैवत मागें पडून त्याठिकाणीं श्रीरामचंद्राचें कुलदैवत आलें. याचें कारण असें आहे कीं, पहिले रघोजी भोंसले नागपूरकर यांचे वडील बिंबाजी हे ज्या वेळीं कोंकणांत पांडववाडीस होते त्यावेळीं त्यांच्या बायकोच्या पोटांत दोन वर्षांपासून सल होतें. त्यामुळें ते फारच काळजींत असत. त्याचे उपाध्ये रामाजीपंत कोल्हटकर यांस श्रीरामचंद्राचा साक्षात्कार असे. त्यांच्याकडून बिंबाजींनीं अनुग्रह घेतला. रामाजीपंतांनीं आपल्याकडील श्रीरामचंद्रस्वामीची पंचधातूची मूर्ति बिंबाजीस पूजेकरितां दिली. ही मूर्ति अद्यापि श्रीमंत राजेबहादूर रघोजी महाराज यांच्या देवघरांत आहे. बिंबाजी आपल्या स्त्रीला या मूर्तीचें नित्य तीर्थ देऊन प्रार्थना करीत असे कीं, मला जर पुत्र झाला तर

मी श्रीरामचंद्र स्वामींचेंच त्याला नांव ठेवीन. या त्यांच्या दृढ भावनेनें इ० स० १६९८ मध्यें त्यांना पुत्ररत्न झालें. नवसाप्रमाणें त्यांनीं आपल्या पुत्राचें नांव राघव असें ठेवलें. हेच पहिले रघोजी भोंसले पुढें नागपूरच्या गादीचे संस्थापक झाले. श्रीरामचंद्राच्या प्रसादानें आपल्याला पुत्र झाला ह्मणून बिंबाजीनें त्यांची उपासना चालू ठेविली. पहिले रघोजीला श्रीरामचंद्राचीच उपासना असल्यामुळें नागपूरची गादी स्थापिल्यानंतर त्यांनीं श्रीक्षेत्र रामटेक येथें रामाच्या मंदिराची स्थापना केली. या वेळेपासून नागपूरकर भोंसल्यांच्या घराण्यांत श्रीरामचंद्र हें कुलदैवत झालें.

**कोल्हटकरांची महनीय कामगिरी**—ज्यांनीं पहिले रघोजींच्या वडिलांना व मातोश्रींना अनुग्रह दिला व नागपूरकर भोंसल्याचें घराणें राजकीय आपत्तींत पडलें असतां त्यावर उपकार करून तें वांचविलें, त्या रामाजीपंत कोल्हटकरांची थोडी माहिती येथें देणें योग्य वाटल्यावरून देत आहोंत. हे रामाजीपंत जातीचे कोंकणस्थ ब्राह्मण. त्यांचें राहण्याचें व वतनदारीचें गांव वांई तालुक्यांतील पांडवगड. रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरें गांवची देशमुखी त्यांना होती, ह्मणून त्या गांवीं त्यांना वरचेवर जावें लागें. वाटेंत कोंकणप्रांतीं कोयना नदीचे तीरीं भैरवगडाचे खालीं बापूजी व साबाजी हे दोघे ( नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज ) बंधू आपल्या कुटुंबासहित रहात होते. त्या गांवीं रामाजीपंत कोंकणांत जातांना मुक्काम करीत. त्या वेळीं हे भोंसले त्यांना आपल्या घरीं ठेवून घेऊन त्यांना शिधासामुग्री देऊन त्यांची सर-बराई ठेवीत. यामुळें दिवसेंदिवस त्यांचा स्नेह वाढू लागला. पुढें जंजिऱ्याचा मुसलमान हबसी सरदार याकूबखान यानें भोंसल्यांवर हल्ला करून त्यांची मालमत्त लुटली व भोंसल्यांच्या सर्व कुटुंबांस पकडून आपल्या कैदेंत नेऊन ठेवलें. हें रामाजीपंत यांना कळतांच त्यांनीं जंजिऱ्यास याकूबखानाकडे जाऊन भोंसल्यांची चौकशी केली. त्या वेळीं याकूबखानानें असा जबाब दिला कीं, जो कोणी तीन हजार रुपये देईल, त्याच्या स्वाधीन भोंसल्यांच्या सर्व कुटुंबास करण्यांत येईल. हें ऐकून रामाजीपंत परत आपल्या गांवीं आले. त्यांनीं आपली सर्व जिंदगी विकून तीन हजार रुपये याकूबखानास भरून भोंसल्यांचें सर्व कुटुंबास आपल्या गांवीं सुरक्षीत आणलें व पांडवगडीं ( गडाखालीं ) त्यांना घर बांधून देऊन त्यांची रहाण्याची व्यवस्था केली. शिवाय आपल्या उत्पन्नांतून त्यांच्या खर्चाचीही व्यवस्था केली. याच पांडव-गडीं पहिले रघोजींचा जन्म झाला.

पुढें इ. स. १७०८ मध्ये छत्रपति शाहू महाराज अटकेंतून सुटून दिल्लीहून दाक्षिणेंत येत आहेत, अशी बातमी रामाजीपंतांस लागली. त्या वेळीं ते आपला मुलगा कोन्हेरराम यास बरोबर घेऊन बापूजी भोंसले यांचे समवेत शाहू महाराज यांस भेटण्याकरतां गेले. गोदावरीच्या तीरीं त्यांच्या गांठी पडल्या रामाजींपंतांचा मुलगा कोन्हेरराम हा फार सुंदर व फार चलाख होता, त्याला पाहून शाहु महाराज फार खुष झाले. त्यांनीं आपल्या पदरचे एक आश्रित श्री. ठोसर यांच्या मुलीबरोबर त्याचें लग्न लावून देऊन ते त्याला ( कोन्हेरराम यास) आपला जामाताहि समजू लागले !

पुढें कोन्हेरराम यांचें साताऱ्यास वरचेवर जाणें येणें होऊं लागलें व त्यांच्या वशिल्यानें पहिल्या रघोजीची शाहुमहाराजांशीं प्रत्यक्ष ओळख झाली. अशा प्रकारें रघोजीचा प्रत्यक्ष संबंध शाहु महाराजांपाशीं आला. शेवटीं कोन्हेरराम यांच्याच मध्यस्तीनें रघोजींना, सेनासाहेब सुभा ही जागा मिळाली. रघोजी, सेनासाहेब सुभा होऊन गेले, त्यावेळीं त्यांचे दिवाण ह्मणून शाहूनें कोन्हेरराम यांस व त्यांचे धाकटे बंधु भास्करराम यांस सेनापती ह्मणून दिलें. या उभय कोल्हटकर बंधूंच्या सहाय्यानें पुढें रघोजी भोंसले यांनीं नागपूरची स्वतंत्र गादी स्थापन केली.



प्रकरण २ रें.

# पहिला सेनासाहेब सुभा

# परसोजी भोंसले

ना

गपूरकर भोंसल्यांचे पूर्वज पुणें प्रांतीं मौजें हिंगणी येथें पाटीलकी करून होते, हें मागील प्रकरणीं पर्यायानें आलेंच आहे. पुढें मुधोजी व रुपाजी भोंसले हे शहाजी राजे भोंसले यांच्या सैन्यांत मोठ्या हुद्यावर होते. त्या वेळीं त्यांची वस्ति सातारा जिल्ह्यांत देऊर गांवीं झाली. ते त्या वेळीं बरेच नांवलौकिकालों आले होते. त्यांनीं मुधाई देवीची स्थापना करून तेथें मंदीर बांधलें. देऊर गांव जवळ जवळ मुधोजीचें वतनी गांव असल्याप्रमाणेंच झालें होतें. या मुधोजीला पुत्र सात; पैकीं बापूजी, परसोजी व साबाजी हे तिघे शिवाजी महाराजांच्या सैन्यांत शिलेदारीपासून मोठया हुद्यापर्यंत चढले. या त्रिवर्ग भोंसल्यांचा पुढें एवढा दर्जा वाढला कीं कोणत्याही राजकारणांत यांची सल्लामसलत व कामगिरी याची जरूरी भासे. शिवाजी महाराजांनीं राज्याभिषेकानंतर यांना ' राक्षसवाडी व पिंपरी ' या गांवचे इनामदार करून त्यांचा दर्जाही वाढविला होता. इ. स. १६८० सालीं ज्या वेळीं छत्रपती शिवाजीमहाराज दिवंगत झाले, त्या वेळीं सोयराबाईस याच त्रिवर्ग भोंसल्यांनीं मदत करून राजारामास गादीवर बसविलें. त्या वेळीं संभाजी महाराज पन्हाळ्यावर प्रतिबंधांत होते. त्यांना ही शिवाजी महाराजांच्या मृत्यूची वार्ता बरेच दिवस समजली नव्हती. नंतर ती त्यांना कळतांच त्यांनीं पन्हाळ्यावरून आपली युक्तीनें सुटका करून घेतली आणि रायगडावर हल्ला करून रायगड काबीज केला व छत्रपतींची गादी हस्तगत केली. सोयराबाईस तिच्या कृत्याबद्दल शासन दिलें आणि तिच्या कटांत जे जे लोक सामील होते त्या त्या लोकांना देहांत प्रायश्चित्त

मिळालें. या वेळीं सोयराबाईस तिच्या माहेरच्या शिर्के लोकांचें जास्त पाठबळ होतें, ह्मणून संभाजीनें शिर्क्यांचें जवळ जवळ ' शिरकाणच ' केलें. त्या वेळीं हे त्रिवर्ग भोंसले बंधू तेथें होते. त्यांना संभाजीनें विचारिलें कीं † "तुह्मी प्रबुद्ध वडीलोपार्जित सेवक आहांत, तुमच्यासमक्ष असें व्हावें, हें तुह्मांस योग्य नव्हे, असो. तुह्मी आतां येथें न राहतां कूच करून जावें. " या संभाजीच्या हुकुमानें या त्रिवर्ग भोंसल्यांस जिवावरची शेपटावर गेली असें वाटलें. नंतर परसोजी आपल्या जमावानिशीं खानदेशांत निघून गेले व तेथें पुंडवाले लूट करीत होते, तेथें त्यांत मिळून राहिले. इकडे साबाजी भोंसले व बापूजी भोंसले आपल्या वृत्तीवर भैरवगडीं जाऊन राहिले.

परसोजीनें संभाजीच्या हुकमाप्रमाणें महाराष्ट्र सोडून खानदेश, वऱ्हाड या प्रांतांत आपलें नांव उत्तम प्रकारें गाजवून गोंडवणापर्यंतही दौड मारली. इ. स. १६८० ते १६९० पर्यंतच्या या त्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं जीं शौर्याचीं कृत्यें केलीं, त्या संबंधींची सविस्तर हकीगत कोठें उपलब्ध नाहीं. त्यामुळें त्यांची खुलासेवार माहिती देतां येत नाहीं. परंतु एवढें खरें कीं, या काळांत मोंगल बादशहा औरंगजेब याच्या फौजेनें जरी सर्व देश व्यापिला होता व त्याची फौज एकामागून एक प्रांत काबीज करीत चालली होती आणि खुद्द स्वतः तो दक्षिणेंतील मुसलमान राज्यें आदिलशाही, कुतुबशाही वगैरे बुडवून आपल्या साम्राज्यांत सामील करीत चालला होता, तरी त्यास खानदेश, वऱ्हाड, गोंडवण या प्रांतांत ' परसोजी भोंसले ' या मराठा सरदाराची चांगलीच दहशत बसली होती. अशा रीतीनें ' परसोजी भोंसले ' यानें गेल्या दहा वर्षांत आपला पराक्रम दाखविला होता.

श्री शिवाजी महाराजांचा अंतकाल होईपर्यंत ' परसोजी भोंसले ' हे शिवाजीच्या नामांकित सरदारांपैकीं एकजण होते. पण ते सर्वस्वीं त्यांचे अंकित असल्यानें त्यांस स्वतंत्रपणें आपल्या आंगचें शौर्य आणि कर्तबगारी दाखविण्यास अवसर मिळाला नव्हता. ती संधी संभाजी महाराज यांनीं त्यांला हद्दपार करून दिली आणि त्याचमुळें त्यांच्या स्वतःच्या आंगचें तेज प्रकट करण्यास त्यांस नवीन क्षेत्र प्राप्त झालें. संभाजीनें त्यांना हद्दपार करून त्यांचेवर हे उपकारच केले असें ह्मणावें लागतें. संकटाच्या वेळीं मनुष्याच्या आंगचे खरे गुण आपोआप प्रकट

† भोंसल्यांची बखर पान १३.

होत असतात ते हे असे. रूपाजी भोंसले यांच्याप्रमाणें ते जर दरबारींच राहिले असते तर वऱ्हाडांत भोंसलेशाही स्थापन करण्याचा मान किंवा नागपूरकर भोंसले राजे या घराण्याचे पहिले व सुप्रसिद्ध ' संस्थापक ' ह्मणून इतिहासांत वज्रलेप होऊन राहण्याचा मान त्यांना केव्हांही मिळाला नसता. स्वतंत्र कर्तबगारीचीं माणसें हीं अशाच संकटाच्या प्रसंगांतून उदयाला येत असतात. त्याचप्रमाणें ' परसोजी भोंसले ' हे या गेल्या दहा वर्षांत उदयाला आले होते.

इकडे गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रांतील संभाजीच्या मराठी राज्याची सर्वत्र स्थिति पार बदलून गेली होती. * " फौज पागा सर्व मोडलें गेलें. किल्ले यांचे बंदोबस्त व सामान पूर्वील धारे मोडून बेसरंजाम जाले. बंदोबस्तास यथायोग्य जेथील तेथें माणसें ठेविलीं त्यांच्या घालमेली जाल्या. सेनापति, अष्टप्रधान सर्व यांचे विध्वंस जाले. कर्तीं माणसें चार चहूंकडे लागलीं. हंबीरराव सेनापति, यांना वांईवर संभाजी राजे यांनीं रवाना केलें होते, तेथें ते गोळा लागून पडले. मोरोपंत प्रधानही वारेल. चिटणीस मारिले. खजिना खराब जाला. " याप्रमाणें संभाजीच्या राज्याची स्थिति झाली. आणि शेवटीं आपणही औरंगजेबाच्या हातून मारला गेला. अष्ट-प्रधान, चिटणीस वगैरे मोठमोठ्या मुत्सद्यांची जर अशी स्थिति झाली तर परसोजी-सारख्या सामान्य सरदाराला देशांतरास जावें लागलें यांत कोणतें नवल ? त्या प्रसंगीं त्यांच्यावर सोयराबाईच्या कटांत सामील असलेल्याचा वहीम असतां संभाजीच्या हातून ते जीवंत सुटले हेंच परसोजीचें मोठें भाग्य ह्मणावयाचें.

" नंतर राज्याचे अधिकारी शिवाजीराजे, संभाजीराजे यांचे पुत्र, लहान-वय पांच सहा वर्षांचें. त्यांस घेऊन व सर्व कुटुंब घेऊन निघोन गेलें असतां निभाव पडणार नाहीं, " अशी राजाराम, व इतर मागें राहिलेली सरदार मंडळी यांस काळजी पडली. ' जिकडे जाऊं तिकडेच पैगाम पाठीवर आधीं करितील. औरंगजे-बासारखा शत्रु यांणीं ग्रासिलें. ' असें संकट येऊन पडलें; तेव्हां येसूबाईसाहेब यांस सर्वांनीं पुढें विचार कसा करावा, ह्मणून विचारलें. ते समयीं त्यांनीं सल्ला सांगि-तली जे—' मुलाचें वय लहान, राज्य तरी गेलेंच. त्याअर्थीं तुह्मी सर्वहि पराक्रमी

* थोरले राजाराम यांचें चरित्र पान १

मनसबदार शूर यांनीं एक विचारें होऊन राजाराम साहेबांस घेऊन बाहेर पडावें. तुह्मी सर्वांनीं राजाराम साहेबांसहवर्तमान बाहेर पडून फौज जमा करून, प्रांताचा बंदोबस्त राखिला असतां सर्व मसलत तिकडे आधीं वाढ पडेल. येथें कांहीं गिल्ला पडणार नाहीं. हा किल्ला बेलाग, मजबूत, सहा महिने टिकाव पडेल. तुमचा सर्वांचा एखादे ठायीं जमाव पोक्त जाला ह्मणजे आह्मांस काढून न्यावें. शत्रूचें प्राबल्य विशेष दिसतें. त्याअर्थीं चंदी चंदावर प्रांतीं दम खाऊन पुन्हां मसलत बळावून राज्य साधन करावें. सर्वांनीं एक ठायीं मोहास पडून राहिल्यास सारी मसलत येथेंच पडून सर्वांनीं सांपडावें ऐसें घडेल, ह्मणोन सांगितलें ''

याप्रमाणें राजारामानें चंदीचंदावर प्रांतीं जावें असें सर्वांच्या मतें ठरल्यावर राजाराम दोन्ही स्त्रिया समागमें घेऊन व सर्व सरकारकून, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ चिटणीस, संताजी घोरपडे, धनाजी जाधवराव, खंडेराव दाभाडे वगैरे सरदार जितकें कार्यकर्तें माणूस तितकें घेऊन निघाले. ते रायगडाहून प्रतापगड, सातारा, परळी, विशाळगड, रांगणा प्रांतीं जाऊन बेंगळूरवरून चंदीस जाऊन पोहोंचले. ( इ० स० १६९०—९१ ).

मागें औरंगजेब बादशहाच्या फौजेनें महाराष्ट्र व्यापिला. रायगड घेऊन झुलपिकारखान व इतर फौजा पन्हाळ प्रांतीं गेल्या. कोंकण प्रांतांत पाऊस बहुत, झाडी, टिकाव नाहीं. ह्मणून महाराष्ट्राचें रक्षण करण्यास मागें ठेवलेले प्रधान रामचंद्रपंत अमात्य, विशाळगड, रांगणा बळावून जागांजागां फौज घालवणें, मारणें, करूं लागले. ' बादशहानें पन्हाळा येथें सरदार व थोडी फौज ठेवून त्यांसच सोईसोईनें किल्ले घ्यावे असें सांगून आपण सारी फौज घेऊन निघाला तो पावसाळ्याकरितां भीमेच्या कांठीं ब्रह्मपुरी येथें छावणी करून राहिला. इतक्यांत राजाराम चंदीस पोंहचल्याची त्यास बातमी लागली. तेव्हां कर्नाटकांत फौज पाठविण्याचा विचार करून मोठ्या फौजेसह झुलपिकारखान, दाऊदखान, व किलीजखान यांची त्यानें तिकडे रवानगी केली.

राजाराम चंदीस पोंहचल्यानंतर त्याच्या मुत्सद्यांच्या मसलतीनें त्याचा तिकडे लवकरच चांगला जम बसला. पूर्ववत् प्रमाणें मराठी राज्य आहे, असें सर्वांस वाटूं लागलें. जो तो उठला तो चंदीस जाऊन पोंहचला. याप्रमाणें भोंसले, पवार,

आटोळे, पांढरे, बंडगर, कोकाटे असे अनेक कर्ते सरदार चंदीस राजारामाकडे गेले. "ज्या प्रांताच्या सनदा द्याव्या, त्या प्रांतांत जाऊन पाळेगारीनें मुलूख मारून चौथाई, सरदेशमुखी, घांसदाणा अंमल बसवून राहातों, ऐसें ज्यांनीं ह्मटलें त्यांस त्याप्रमाणें किताब व सरंजामाच्या सनदा राजारामानें करून देऊन रवाना केलें. त्याप्रमाणें पवार यांस ' विश्वासराव, ' आटोळे यांस ' समशेर बहाद्दर, ' सिदोजीराव निंबाळकर यांस ' सर लष्कर, ' खंडेराव दाभाडे यांस ' सेनाधुरंधर, ' असे किताब दिले. त्यांनीं येऊन आश्रय करून झाडींत रहावें. पाळेगारी करून त्या त्या मुलुखांत अंमल बसवावा, घ्यावा. फिरोन पळावें. ऐसें करूं लागलें. व तिकडे पथकें लोक चाकरीस ठेवून चाकरी करावी. असें करूं लागले. पवार, आटोळे, निंबाळकर, दाभाडे वगैरे सरदारांनीं राजारामाकडे चंदीस जाऊन, माळवा, खान-देश, गंगथडी, गुजराथ, बागलाण वगैरे प्रांतांत मराठी राज्याचा व आपला अंमल पाळेगारीनें बसविण्यास व मोंगली बादशाही फौजेस पुनः सतावून सोडण्यास प्रारंभ केला. परंतु यापूर्वीच सुमारें दहा वर्षें 'परसोजी भोंसले' यांनीं खानदेश, वऱ्हाड, गोंडवण वगैरे प्रांतांत हाच पाळेगारीचा उपक्रम चालविला होता. यावरून यांचेंच अनुकरण पुढें इतर सरदार लोकांनीं केलें, असें ह्मणावयास हरकत नाहीं. ' परसोजी भोंसले ' हेही चंदीस राजारामाकडे जाऊन पोंचले. वरील मंडळीस त्याप्रमाणें राजारामानें नवीन किताब व नवीन प्रांतांच्या सनदा देऊन मराठी चौथ, सरदेशमुखीचा अंमल बसविण्याकरितां पाठवून दिलें, तसें परसोजी भोंसल्यांच्या बाबतींत राजाराम यास करावयाचें कारण नव्हतें, कारण त्यांनीं हें काम वऱ्हाड, गोंडवण या प्रांतीं अगोदरच केलें होतें. तेव्हां या वेळीं फक्त त्यांना किताब व त्यांनीं केलेल्या कामास राज-संमति इतरांप्रमाणें मिळावयाची होती. ती या वेळीं परसोजीनें आपण केलेली कामगिरी राजारामास कळवितांच त्याच्याकडून मिळाली; आणि एवढ्या करतां तेही इतर सरदारांप्रमाणें चंदीस गेले. ' चंदीस राजारामानें अष्टप्रधानाशिवाय कर्ती माणसें यांसी अष्टप्रधानांचे योग्यतेनें वागवावें, असें केलें. त्यांस किताबती देऊन वाढविलें. त्यांत परसोजी प्रमुख आहेत. '

" परसोजी * भोंसले बहुत कर्ते, मर्द, ह्मणोन ' सेनासाहेब सुभा ' हें पद

* राजाराम यांचें चरित्र पान ३६— ३८

त्यांस या वेळीं ( इ. स. १६९२ ) राजारामानें सन्मान सेनापतीप्रमाणें वस्त्रें, अलंकार, जरीपटका, चौघडा देऊन गोंडवण, देवगड, चांदे, वऱ्हाड वगैरे येथें अंमल (त्यांनीं) बसविला, तो सुभा त्यांस दिला." संभाजीनें परसोजीस हद्दपार केल्यापासून त्यांनीं दहा वर्षेपर्यंत जी गोंडवण, वऱ्हाड प्रांतांत पाळेगारीनें मराठी अंमल बसविण्याची मोठी कामगिरी केली व त्यामुळें आपल्या अंगचा कर्तेपणा त्यांनीं राजारामाच्या व जगाच्या निदर्शनास आणून दिला, त्याचें फळ त्यांस आतां मिळालें. ते या वेळपर्यंत जे पुंड पाळेगार ह्मणून ह्मणविले जात होते आणि त्यांच्या मर्दपणाच्या कृत्यांस आजपर्यंत जी 'पाळेगारी' बिन सनदी पदवी चालू होती, ते आतां 'सेनासाहेब सुभा' ही राजसंमत पदवी मिळवून अष्टप्रधानाप्रमाणें एक असे महत्पदास चढले. आणि त्यांच्या कृत्यांस शिक्का मोर्तबाची राज-सनद मिळून ते सनदशीर ठरले. 'हिंगणीकर' भोंसले मंडळीस परसोजीच्या भाग्योदयामुळें पुन्हां राजदरबारांत मान, सन्मान, वैभव अशी सुस्थिति प्राप्त झाली. परसोजी भोंसले यांनीं आपल्या नांवचा शिक्का या वेळेपासून ह्मणजे त्यांना 'सेनासाहेब सुभा' हें पद मिळाल्यापासून सुरू केला.

ज्या प्रांतांत ज्यानें अंमल सरकारी परवानगी नसतां बसविला, त्याचा सुभा त्यांस सांगणें किंवा नवीन प्रांतांत जाऊन अंमल बसवितों त्याच्या सनदा आह्मांस द्याव्या, असें ह्मटल्याबरोबर त्यांस त्या प्रांताच्या सनदा देऊन पाठविणें आणि नंतर मग त्याचाच सुभा त्यास सांगणें किंवा तोच प्रांत त्याला सरंजामाकरतां लावून देणें आणि चौथ व सरदेशमुखी दक्षणेचा अंमल जसा हात पोंचेल, तसें घेत जाण्यास सांगणें ह्मणजे एक प्रकारें राजरोसपणें पुंड पाळेगारी करण्यास त्या त्या सरदारांस प्रोत्साहन व परवानगी देण्यासारखेंच होतें. याचप्रमाणें परसोजी भोंसले यांनीं वऱ्हाड, देवगड या प्रांतांत केलें; आणि पवार, आटोळ, निंबाळकर वगैरे सरदारांनीं बागलाण, गुजराथ, माळवा, गंगथडी या प्रांतांत केलें. ही मराठी अंमल बसविण्याची पद्धति नवीन होती. शिवाजीच्या कारकीर्दींत ही पद्धति नव्हती. ही या वेळीं राजारामाच्या कारकीर्दींत इ. स. १६९२ सालच्या परिस्थितीमुळें अमलांत आणावी लागली. ही पद्धति संकटकालीं यशस्वी होते. स्वयंप्रकाशित माणसांना उदयाला येण्याला ही पद्धति उपयोगी पडते. याचा पाया परसोजी भोंसले यांनीं घालून यशस्वी करून दाखविलाच होता. या प्रत्यक्ष प्रमाणाचा अवलंब राजाराम यांनीं केला. त्यानें

ही पद्धति अंमलांत आणली, चालू ठेवली व ज्या माणसांनीं ही अंमलांत आणली असेल त्यांस पदाधिकार, सनदा वगैरे देऊन नांवाजणें व नवीन उमेदवारांस या बाबतींत उत्तेजन देणें यांहीकरून ती सर्वमान्य केली. कारण मराठ्यांच्या राजाचा वध करून आदिलशाही, कुतुबशाहीप्रमाणें मराठेशाहीचा अंत करण्याचा औरंगजेबानें विडा उचलून तो आपल्या प्रचंड फौजेनिशीं महाराष्ट्राच्या मध्यभागांत कित्येक वर्षें बसला होता आणि एकसारखें अनेक तऱ्हेनें प्रयत्न करीत होता. तेव्हां अशा नवीन उत्पन्न झालेल्या बिकट परिस्थितींत निदान मराठ्यांच्या अस्तित्वाकरितां तरी झगडणें व युक्त्या, नवीन पद्धति कालमानाप्रमाणें स्वीकारणें मराठी राजाच्या चालकांस त्या वेळीं भागच होतें. ' पराक्रमें पुढें राज्य क्षयास न जाणें । वृद्धि व स्थिति होय तें करणें ।। याखेरीज दुसरा मार्गच उरला नव्हता. या नवीन पद्धतीप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या, हेंच या नवीन सरंजामी पद्धतीचें रहस्य होय. ही नवीन सरंजामी पद्धति सदोष होती किंवा निर्दोष होती अथवा ती चालू ठेवणें बरें किंवा वाईट या वादग्रस्त प्रश्नांची चर्चा करण्याची येथें आवश्यकता नाहीं. पण ती या प्रसंगीं रामबाणाप्रमाणें उपयोगी पडली, एवढी गोष्ट मात्र लक्षांत ठेवणें जरूरीचें आहे. या वेळीं या पद्धतीनें मराठी राज्य, मराठी सेना, मराठी बाणा, कायम ठेवून, वीस पंचेवीस वर्षें मराठ्यांचा बीमोड करण्याचा औरंगजेब प्रयत्न करीत असतां त्या बादशहाचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले इतकेंच नव्हे तर त्यांनीं मोंगल बादशाहीस त्राही भगवन् करून सोडलें आणि मराठी राज्याचें अस्तित्व कायम ठेवलें, हेंच या पद्धतीचें सुंदर फळ आहे.

" येणेंप्रमाणें परसोजी † भोंसले यस ' सेनासाहेब सुभा ' व इतरांस सर लष्कर, वगैरे पदें देऊन या कर्ते मनुष्यांची बूज वाढवून त्यांचे हातें कार्यें करविलीं. त्यांनींही राजश्रीचा लोभ आपल्यावर असावा, चहातील तें देत आहेत, यास्तव सरकार काम ( बजावण्यांत ) जीवादारभ्य श्रम, साहस, करीत असावें. याप्रमाणें परसोजी भोंसले वगैरे नवीन पदाधिकार मिळालेल्या सरदारांनीं, दौलत फौज जमवून पादशाहाचे फौजेशीं लढान, देश, दुर्ग व ठाणीं वगैरे गोंडवण, बागलाण,

---

† राजारामाचें चरित्र पान ३९-४०

गुजराथ, गंगातीर, खानदेश, कर्नाटक प्रांत, चंदी वगैरे मुलुख काबीज करीत चालले. पादशहाची फौज प्रांतांत फिरत असतां, खातरेंत न आणतां राम सैन्या-प्रमाणें ( महाराजांचें लोकांहीं ) काम करीत असावें. याप्रमाणें पांच चार वर्षे दौलत जमत चालली. व सर्व प्रांतांत क्रम सुरू झाला. ( इ. स. १६९६-९७ ) पादशहास शेवटीं मराठी आपण मोडीत असतां मोडत नाहीं, असें वाटलें. "

पूर्वी शिवाजी व संभाजी यांच्या कारकीर्दीत ' सेनापति ' हा एकच मुख्य लष्करी अंमलदार होता. आतां राजारामाच्या कारकीर्दीत अर्थात या धामधुमीच्या काळांत ' सेनापति ' याखेरीज ' सेनासाहेब सुभा ' ' सर लष्कर ' आणि ' सेना-धुरंधर ' असे आणखी तीन नवीन लष्करी अंमलदार अस्तित्वांत आले. या नवीन तीन लष्करी अंमलदारांचा दर्जा सेनापतीप्रमाणेंच असून त्यांस जरीपटका, चौघडा, वगैरे सर्वमान देण्यांत आले. ' परसोजी भोंसले ' यांस 'सेनासाहेब सुभा' * हें नवीन पद देण्यांत आलेवर त्यांच्याच बरोबर ' सिदोजीराव निंबाळकर, ' यांस ' सरलष्कर, ' व ' खंडेराव दाभाडे ' यांस ' सेनाधुरंधर ' अशीं हीं नवीन पदें देण्यांत आलीं. या तिघांपाशीं फौजेचा जमाव चांगला असावा व तो त्यांनीं करावा ह्मणून त्यांस हुकूम झाला. त्याप्रमाणें परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांच्या-जवळ पूर्वीपासून फौजेचा जमाव चांगला होताच, आतां आणखी ठेवण्यास

---

* सेनासाहेब सुभा हें पद मिळून ' परसोजी भोंसले वऱ्हाडांत आल्यानंतर त्यानें हल्लींच्या वणी तालुक्यांत भाम या गांवीं आपलें ठाणें दिलें, व तीच आपली राहण्याची मुख्य जागा केली. भोंसले नागपुरास जाईपर्यंत त्यांची राहण्याची मुख्य जागा हीच होती.

**भाम** हें पूर्वी लहान गांव होतें. व हल्लींहि लहानच आहे. पण परसोजी व त्याचा मुलगा कान्होजी यांचे वेळेस तें एवढें वाढलें होतें कीं फक्त बैरागी लोकांचीं पांच हजार घरें होतीं. भोंसल्यांचें लष्करी ठाणें तेथें होतें. हल्लीं त्याचें सर्व वैभव गेलें असून मोठमोठ्या इमारतीच्या खुणा मात्र तेथें राहिल्या आहेत. " राजाची भाम " या नांवानें तें प्रसिद्ध असल्यानें नांवांत मात्र भोंसल्यांशीं संबंध कायम राहिला आहे.

[ वऱ्हाडचा इतिहास पा. १७९-८० ]

परवानगी मिळाल्यावर तो त्यांनीं जास्त वाढविण्यास प्रारंभ केला. तसाच सरलष्कर व सेनाधुरंधर यांनींही केला. यामुळें थोडक्याच अवधींत ' महाराजा * ( राजाराम ) कडील फौजेच्या टोळ्या तीन सेनापती, सेनासाहेब सुभा, व सरलष्कर मिळून साठ सत्तर हजार ( फौज होती ). परसोजी भोंसले यांच्याजवळ पंधरा वीस हजार फौज जय्यत असावी. शिवाय महाराजांपाशीं नेहमीं जमियत दहा हजार असावी. शिवाय हिंडती फिरती पंधरा वीस हजार होती. याप्रमाणें नवीन अंमलदार, व नवीन फौज तयार झाल्याबरोबर तिला नवीन कामगिरी सांगण्यांत आली. ती कामगिरी स्वदेशीं येऊन निरनिराळ्या प्रांतांत खंडण्या घ्याव्या. पादशहाचीं ठाणीं असतील तीं उठवावीं व आपलें नाकें जागा किल्लेकोट यांस दिलभरंवसा देऊन बराय खुद्द पादशहाचा मुकाम असेल, तेथें जाऊन छापा घालावा, मुलुख मारावा, पादशहाकडील कही लुटून हत्ती, घोडे, उंटें न्यावीं, ' ही होय.

या फौजेपैकीं कांहीं फौज चंदीकडे रहावी. कांहीं फौज देवगड, चांदें, बागलाण, गुजराथ, इकडेही रहावी. याप्रमाणें सर्व मराठी फौजेच्या तीन ‡ मोठ्या तुकड्या करण्यांत येऊन त्या निरनिराळ्या प्रांतांत ठेवण्यांत आल्या. देवगड, चांदें या प्रांतांत परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांस त्यांच्या फौजेसह ठेवण्यांत येऊन वरील

---

* राजाराम यांचें चरित्र पान ४०

‡ When he had nearly completed his tour Rajaram left Khanderao Dabhade in Baglan, Nemajee Sindia in Khandesh, Parsojee Bhonsley in Berar and Hybat Rao Nimbalkar in Ganga Thaurree to collect what they termed the outstanding balance due to the Raja. Parsojee Bhonsley when appointed to this duty in Berar got the title of Sena Saheb Subha and Hybat-Rao Nimbalkar was styled, Sur-Lashkar, both these officers received the Jaree Patka or Golden Pennon on this occasion. G. Duff Vol. I. P. 318.

बादशाही फौजेचा समाचार घेण्यास व बादशहाचा खजिना उत्तरेकडून येत असेल तो गारद करण्याची व वराड मुलूख मारून पन्हाळ्यापर्यंत फौजा बेषक याव्या, ही कामगिरी करण्याची आज्ञा झाली. गंगथडीच्या ( गंगातीरच्या ) फौजेस भागानगरपर्यंतची खंडणी घेण्याची कामगिरी सांगण्यांत आली. त्याचप्रमाणें चंदीकडे पादशाही फौजा रवाना होतील त्यांस अडवावें, लढाई करावी, प्रसंग पडल्यास लुटावें अथवा छापा घालावा आणि त्यांचा पल्ला पोहोंचूं देऊं नये. ही कामगिरी महाराष्ट्रांतील तिसऱ्या फौजेकडे सोंपविण्यांत आली. याप्रमाणें करण्यांत मराठी फौज किती आहे, याचा अदमास लागूं देऊं नये, हाच हेतु होता; आणि तो उत्तम रीतीनें शेवटास गेला. तिकडे जिंजीस वेढा बादशाही फौजेनें घातल्यापासून इकडे या तीन फौजांनीं असा धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला. ‘ इ. स. १६९४ सालीं संताजी घोरपडे याचे हाताखालीं मराठ्यांनीं औरंगजेबाच्या छावणीच्या उत्तरकडील मुलूख लुटला, व रामचंद्रपंतांनीं पश्चिमेस सोलापूरपर्यंत लढाई चालविली. इ. स. १६९५ त परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा, हैबतराव निंबाळकर यांना दिल्लीहून येणाऱ्या बादशहाच्या पलटणींना त्रास देत रहावें ह्मणून वऱ्हाड व गंगथडी या प्रांतांतच सोडून संताजी घोरपडे सेनापती यांनीं आपण स्वतः कर्नाटकापर्यंत चाल करून वेढा घातलेल्या लोकांवर हल्ला केला आणि त्यांस पिटाळून लाविलें.’

औरंगजेब बादशहासारखा शत्रू ( ज्याची ) लाखों फौज ( व ) खजीना मुबलक, छकड्यास छकडे द्रव्याचे भरोन कोटिशा ( ज्याचे ) बरोबर चालत आहेत, अशाशीं कित्येक वर्षें लढणें मराठी फौजेस कांहीं सामान्य काम नव्हतें. परंतु वराडांत, गोंडवणांत परसोजी भोंसले, गंगथडींत निंबाळकर, महाराष्ट्रांत रामचंद्रपंत व त्यांचे दोन मदतनीस परशुराम त्रिंबक आणि शंकराजी नारायण, या सर्वांनीं गनिमी काव्यानें सारखी लढाई चालवून व कित्येक वेळां चहूंकडून एकदम हुल्लड उठवून बादशाही फौजेस जेरीस आणिलें. हे सर्व सरदार शिवाजीच्या तालमींतील अनुभवलेले, वृद्ध व शूर होते. परसोजी भोंसले यांनीं वीस वर्षें शिलेदार व पुढें पागेचा सरदार ह्मणून शिवाजीच्या कारकीर्दीत त्यांच्या सैन्यांत चाकरी केली होती. त्या परसोजी भोंसले सेना साहेब सुभा यानें बादशाही फौजेस सतावून सोडण्याची या वेळीं उत्कृष्ट कामगिरी केली. वराड, गोंडवण, ही उत्तरेकडील बाजू त्यानें आपल्या पराक्रमानें संभाळून मराठी राज्यास त्याच्या ऐन संकट वेळीं चांगली मदत

केली; ती महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरकाल नमूद झालेली आहे. शेवटीं या सर्व त्रासाचें आणि मराठी राज्य इतके श्रम करून मोडीत असतां मोडलें जात नाहीं, याचें मूळ जिंजीस आहे असें वाटून जिंजी किल्ला आणि राजाराम यांस हस्तगत करावें त्याशिवाय हें खूळ मोडणार नाहीं ह्मणून जिंजिस वेढा घालणाऱ्यां सरदारांस बादशहानें सक्तीचे हुकूम पाठविले. तेव्हां तिकडील मंडळीचाही निरुपाय झाला. राजारामाला जिंजी सोडणें यामुळें भाग पडलें.

महाराष्ट्रांतील मराठी राज्याचे प्राण जे सह्याद्री बंधारीचे किल्ले ते बादशाहाच्या फौजेनें जरी एकदां घेतले होते, तरी मराठी फौजेनें ते पुन्हां परत घेऊन तेथें आपलें ठाणें पूर्वीप्रमाणें कायम केलें होतें. यामुळें पन्हाळा, विशाळगड, सातारा या ठिकाणीं मराठी अंमल होता. खुद्द रामचंद्रपंत यांनीं आपलें ठाणें विशाळगड व सातारा येथें आलटून पालटून ठेवलें होतें. त्यामुळें महाराष्ट्रांत जिंजीहून परत आल्यास राहण्यास राजारामास स्थान नव्हतें असें नाहीं. तें तयारच होतें. तेव्हां सर्वांच्या अनुमतीनें राजाराम जिंजीहून गुप्त रीतीनें निघून इ. स. १६९७ च्या अखेरीस महाराष्ट्रांत आला. आणि तिकडे मागाहून इ० स० १६९८ त झुलपिकारखानानें जिंजी किल्ला घेतला. राजाराम प्रथम विशाळगडीं येऊन नंतर साताऱ्यास रामचंद्रपंतास येऊन मिळाला. मागून सर्व सरदारही हलके हलके येऊन मिळाले. त्यांना बोलोन वस्त्रें देऊन सन्मान केला. खानदेश, बागलाण, गंगथडी वगैरेकडील सरदारही राजारामाच्या दर्शनास आले. ¶ ' आटोळ, दाभाडे, बंडगर, पोवार, पाटणकर इत्यादि सरदार आले. यांसी वस्त्रें भूषणें देऊन सन्मान करून नवाजीस केलें; आणि ' पहिल्याप्रमाणें मुलकांत अंमल करीत आहांत त्यापेक्षां अंमल जोर तलबीचा सुरू करावा तुरुक याचा गुमान धरूं नये. शिवाजी महाराजांचें पुण्य विशिष्ट आहे. त्यांचे नांवावर आजपर्यंत यश आलें पुढेंही यश येईल. त्यांची आमची भेट होय, तें सर्वत्रांनीं करावें. येवढी जोड घ्यावी. पादशाहाच्या फौजेशीं लढाई देत आहां तशी देत असावी. असें सांगून राजारामानें सर्वांस आपापल्या प्रांतांत जाण्यास आणि पूर्वक्रम आरंभण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें * ' परसू

¶ राजारामाची बखर पान ६१.

* न्या. रा. यांचा म० इतिहास जिंजी पान ११.

( परसोजी ) भोंसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, आठवले ( आटोळे ) समशेर बहाद्दर हे मराठे सरदार आपल्या देशाला परत आले. '

नंतर सुमारें एक वर्षभर महाराष्ट्रांत राहून व स्थीरस्थावर करून ' पन्हाळ्यावर ( राजारामाची ) स्वारी असतां मसलत केली कीं—मोंगली फौजेशीं आमचे फौजेनीं बहुत वेळां लढाया घेतल्या. पादशहाचा मुक्काम स्वदेशीं ( औरंगाबादेवर ) आहे,तेथें जातीनें जाऊन लढाई करावी. पादशहास कळावें शिवशाई फौज आहे. त्यांत राजाराम आहे हेंही मालुम व्हावें. खाशांस पक्कें समजावें जे—मराठी फौज हयात आहे; असें ह्मणून सातार्‍यास येऊन तेथून सिंहगडास आले. आपल्या फौजा चहूंकडे होत्या. त्या जमा करून तयारी केली. § परसोजी भोंसले, सरलष्कर वगैरे सरदारांस हुकूम जातांच तेही आपापल्या जमावानिशीं येऊन मिळाले. एकंदर फौज पन्नास हजार जमली. शिवाजीपेक्षां राजारामाची फौज जास्त झाली, असें सर्वांस वाटलें. या सर्व फौजेसह इ० स० १६९९ त ‡ स्वारीस निघून राजारामानें बादशहाच्या छावणीवर ब्रह्मपुरी येथें रात्री छापा घालून शाहूस सोडवून नेण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला. लगेंच बादशहाची फौज राजारामाच्या पाठीस लागली. तिला झुकांडे देत देत तो खानदेश, गंगथडी, वराड आणि बागलाण या प्रांतांत शिरून चौथाई, व सरदेशमुखी वसूल करीत चालला. पाठीवर पादशाही फौज होतीच. परत येतानां त्यानें जालना पेठ लुटली. नंतर भोंसल्यास ¶ ( परसोजी ) वर्‍हाडांत, दाभाड्यास बागलाणमध्यें, शिंद्यास खानदेशांत व निंबाळकरांस गंगथडींत बादशाही फौजेशीं सामना करण्याकरितां ठेवून तो मोठी दौड करून सिंहगडास येऊन पोंचला.

---

§ मरा. रिया. पा. ६७४

‡ Rajaram after he had remained a short time at Satara proceeded with his army to the northward where he was joined by Parsojee Bhonsley, Hybut Rao Nimbalkar, Nemajee Sindia, Atowlay, Shumsher Bahadur & other commanders who had for some time been plundering in Candeish ( खानदेश ) Gung Thurree & Berar
G Duff Vol. I P. 318.

¶ न्या. रानडे यांचा मराठ्यांचा इतिहास जिंजी पा. १२; मरा. रि. ६७५

तेथें या मोहिमेच्या दगदगीमुळें त्यास ज्वर येऊं लागला. त्यांतच त्याचा इ० स० १७०० मध्यें अंत झाला.

महाराष्ट्रावर हा एकदम मोठा प्रसंग येऊन गुदरला. सर्वांचें धैर्य खचण्याची ही वेळ होती. परंतु रामचंद्रपंत, व त्यांचे मदतनीस आणि इतर सरदार मंडळी यांनीं हिंमत धरून राजारामाचा मुलगा शिवाजी यास गादीवर बसवून राज्याचा शकट तसाच जोरानें हांकण्याचा संकल्प करून तो शेवटास नेला. या वेळीं रामचंद्र नीलकंठ आमात्य हुकमतपन्हा हे मुखत्यारीनें कारभार करीत असल्यानें, धनीपणा, व मुखत्यारी त्यांच्याकडे आली होती. त्यांनीं लगेंच परसोजी † भोंसले सेनासाहेब सुभा, खंडेराव दाभाडे सेनाधुरंधर, सिधोजीराव निंबाळकर सरलष्कर, आटोळे, पांढरे वगैरे सरदार जे वऱ्हाड, खानदेश वगैरे आपापले प्रांतांत फौजेनिशीं राष्ट्रकार्य करीत होते, त्या सर्वत्रांस महाराजांच्या निधनाचा मजकूर कळवून लिहिलें कीं, ‘ सर्व लज्जा तुमची आहे. ’ तसाच राज्यरक्षणाचाही मजकूर लिहिला. त्यावरून परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा, सेनाधुरंधर, वगैरे सरदारांनीं उत्तरें लिहिलीं कीं, “ महाराजांचे ठिकाणीं आपण आहां. खांसा स्वारी असतांना कामकाज उदईक करूं ह्मणून ह्मणत होतों, सांप्रत उद्यांचें आज करून आपणांस विनंति लिहीत जाऊं. आपल्या हुकुमासरसीं तृणवत् प्राण मानून उडी घेऊं. कांहीं काळजी करूं नये. ”

‘ जिंजी * काबीज करूनही राजाराम हातीं आला नाहीं, उलट मराठ्यांची सत्ता वाढतच चालली. हाताखालचे सेनापती मनापासून कामें करीत नाहींत, अशी खात्री होऊन ८१ वर्षांचा ह्मातारा औरंगजेब बादशहा स्वतः कंबर बांधून मराठ्यांचे किल्ले जिंकण्यांस ता. ९ आक्टोबर इ. स. १६९९ रोजीं ब्रह्मपुरी सोडून निघाला. मराठ्यांस जिंकण्याचा हा त्याचा शेवटचा उद्योग होय. प्रथम वसंतगड, नंतर सातारा, परळी वगैरे महाराष्ट्रांतील किल्ले त्यानें घेतले. हें काम चाललें असतांच राजाराम सिंहगड येथें मरण पावला; नंतर रामचंद्रपंत यांनीं सर्व राज्यसूत्रें

---

† राजा. रा. चं. च. पान ६७

* म. रिया. पान ६८२–८३

यांनीं ही कामगिरी केली, त्याचप्रमाणें खानदेश, गुजराथ, आणि बागलाण यांत दाभाडे व आटोळे † या सरदारांनींही केली.

या भयंकर बातम्या बादशहास तो देवापूर येथें आजारी पडला असतां कळल्या. त्यामुळें त्याची कंबर जास्तच खचली. त्यानें गाजीउद्दीन यांस ¶ वऱ्हाडांत परसोजी भोंसल्यावर, झुलपिकारखान यांस माळव्यांत आणि अजिमशहा यास गुजराथेंत मोठमोठ्या फौजा देऊन पाठविलें. भोंसले ‡ दाभाडे वगैरे सरदारांचे आणि बादशाही सरदारांचे बरेच सामने झाले. त्यांत कित्येक वेळां मराठ्यांचाही पराभव झाला, परंतु तशाही स्थितींत मराठी फौजेनें त्यास आपल्या समशेरीचें पाणी दाखवून त्यांची अगदीं तिरपीट उडवून दिली. शेवटीं आपल्या अंमलदारांच्या सांगण्यावरून मोठ्या कष्टानें कांहीं अटीवर कामबक्ष पुत्राच्यामार्फत बादशहाही मराठ्यांशीं तह करावयास कबूल झाला परंतु मराठ्यांनीं आपल्या अटी वाढविल्यामुळें तो मोडला. त्यानें मराठ्यांशीं झुंजण्याची पुन्हां तयारी चालविली. परंतु त्यांचे

† Dhanajee Jadhav took the open field confinding his operations to no particular part of the country he spread his horse in every quarter & performed many signal exploits. Nimbalkar, Bhonslay ( Pursojee ) and Dabharay likewise distinguished themselves in the same manner and levied tribute under the heads of Chouth, Surdeshmukhee & Ghasdana. etc.

*G. D. Vol. I Page 324.*

¶ म. रियासत पान ७०२

‡ In 1705 the emperor received accounts almost at the same time of their having crossed the Nerbuda in great force and extended their ravages to the heart of Malva that the whole of Candeish and Berar were overrun. *G. Duff. Vol. I Page 326.*

सर्व सरदार व फौज सुमारें वीस वर्षांच्या या दक्षिणेंतील युद्धामुळें कंटाळून गेली होती. त्याचे हुकूम विशेष कोणी मानीनात. उलट ते त्यास हा प्रयत्न सोडून देण्यास व त्याचें मन वळविण्यास उद्युक्त झाले. याच प्रयत्नास नंतर यश आलें. ' शेवटीं सर्वांच्या विनंतीला मान देऊन तो ता. ३ नवंबर सन्न १७०५ रोजीं देवापूर सोडून परत फिरला. तो डिसेंबर ता. ५ रोजीं बहादुरगड ( पेडगांव ) येथें आला. आणि तेथून ता. २० जानेवारी इ. स. १७०६ रोजीं रोजीं अहमदनगरास दाखल झाला. तेथें त्यानें एक वर्ष मोठ्या कष्टांत व दुःखांत काढून तो इ. स. १७०७ च्या फेब्रुवारींत मरण पावला. त्याच्या अंतकाळाबरोबरच मराठ्यांशीं गेलीं वीस वर्षे चाललेल्या युद्धाचाही अंत झाला; पण त्याबरोबरच मोंगल बादशाहीकरतां औरंगजेब बादशहाच्या मुलांत तंटे सुरू झाले. तेच शाहूच्या सुटकेस आणि मराठी साम्राज्यांत शाहु आणि ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी यांच्यांत भाउबंदकी माजविण्यास कारण झालें.

बादशहा देवापुराहून निघून अहमदनगरकडे गेला, तेथें त्यानें एक वर्ष काढलें. एवढ्या अवधींत इकडे मराठ्यांनीं आपले सर्व महाराष्ट्रांतील किल्ले एकामागून एक बादशाही फौजेकडून घेतले आणि तिकडे वऱ्हाडांत परसोजी भोंसले आणि खानदेशांत, गुजराथेंत दाभाडे वगैरे सरदारांनीं निरनिराळ्या प्रांतांत आपआपले पाय कायमचें रोविले. वऱ्हाडांत परसोजीच्या अंमलांत त्याचें पाऊल जें एकदां पंधरा वर्षांपूर्वीपासून पडलें तें या वेळीं येथें कायमचें रुतलें गेलें. तें मागें केव्हांच पडलें नाहीं तें उलट पुढेंच पूर्वेकडे पडत गेलें. परसोजी भोंसले या वेळीं सुमारें १५००० सैन्याचे सरदार होते.

औरंगजेबाचे मरणसमयीं शाहु अहमदनगरास त्याचेच छावणींत होता. अजीमशहाची बादशहानें माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक केल्यामुळें तो तिकडे निघून गेला. परंतु तो सुमारें वीस कोस गेला असेल नसेल, तोंच बादशहा मरण पावलेल्याची बातमी त्याला समजली. त्याबरोबर तो परत नगरास आला. बापाचा अंत्यविधि आटोपल्यावर अजीमशहा अहमदनगर येथें तख्तनशीन झाला. इतक्यांत वडील भाऊ उत्तेरस ( दिल्लींत ) राज्य आक्रमण करीत आहे, अशी बातमी आल्यामुळें त्याबरोबर लढण्यासाठीं ह्मणून अजीमशहा उत्तेरकडे निघाला. बरोबर वजीर आसदखान व त्याचा पराक्रमी पुत्र झुल्पीकारखान हे होते. तो त्यांच्याच

सल्ल्यानें चालत होता. इ. स. १७०७ च्या एप्रील महिन्यांत तो नर्मदा उतरून माळव्यांत शिरला. शाहूसही त्यानें बरोबर घेतलें होतें. ' मराठ्यांचें निर्मूलन करण्यास गुंतल्यानें आपलें घर रहात नाहीं, दुराग्रहास पडून फळ नाहीं. शाहुराजा सरकारांत बहुत दिवस कैदेंत आहे. पळून गेला नाहीं. बादशाही बंधांत दाखल झाला आहे, त्यास सोडून द्यावें. ताराबाईचें पारिपत्य करील, किल्ले घेईल, चाकर ह्मणवील.' असें झुल्पीकारखानानें अजीमशहास समजाविल्यावरून येसूबाई व शाहूच्या स्त्रिया यांस ओलीस ठेवून घेऊन अजीमशहानें माळव्यांतून शाहूस सोडून दक्षिणेंत पाठविलें. *

यात्रमाणें देशीं येऊन पावले असतां परसोजी भोंसले वऱ्हाड प्रांतीं पंधरा हजार फौजेनिशीं होते. त्यांस वृत्त समजलें; व चिमणाजी दामोदर ह्मणून पेशवे पिंगळे यांजकडील सरदार पांच हजार फौजेनिशीं खानदेशी होते, ते येऊन उभयतां सरदार फौजें खजिना खर्चास घेऊन येऊन महाराजांस भेटले, जमाव झाला. ' (इ. स. १७०७ मे. )

' शाहू अजीमशहाच्या छावणींतून निघाला तो नर्मदा उतरून सातपुड्याच्या घाटांतून बऱ्हाणपुरास आला. त्या ठिकाणीं जोत्याजी केंसरकर कागदपत्र आणण्यास मागें ठेविलेला होता तो येऊन मिळाला. मोरोपंत सबनीस, कृष्णाजी जोशी, कोंकणस्थ व गदाधर भट्ट नाशीककर हे त्या वेळीं शाहूबरोबर होते. खाफीखान ह्मणतो, " शाहू पन्नास-साठ लोकांनिशीं अजीमशहाची रजा घेऊन निघाला तो प्रथम बिजागड, सुलतानपूर, नंदुरबार, ह्या ठिकाणच्या डोंगराळ मुलुखांत सुजनसिंग नांवाचा एक जमीनदार राहत होता त्याजकडे गेला. हा सुजनसिंग धुळ्यापासून ७।८ कोसांवर लांबकानीच्या गढींत रहात असे." वऱ्हाड, खानदेश-बागलाण वगैरे प्रांतांत परसोजी भोंसले, नेमाजी शिंदे वगैरे मोठमोठे फौजबंद मराठे सरदार अंमल करीत होते. अशा वेळीं यांपैकीं एखाद्या फौजबंद मराठे सरदाराची मदत शाहूस पाहिजे होती. त्याशिवाय त्याचें चालण्यासारखें नव्हतें. ती मदत या वेळीं परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा प्रांत वऱ्हाड यांनीं प्रथम पुढें होऊन किंवा शाहूकडून मागणी आलेबरोबर ती मान्य करून केली.

* थोरले शाहु चरित्र पान १०

परसोजी भोंसले व चिमणाजी दामोदर हे शाहूस मिळाल्यानंतर तापीनदी–वरील कोकरमंडा किल्ल्याचा अधिकारी अंबू पांडे हाही शाहूस येऊन मिळाला. मुख्य परसोजी भोंसल्याचें उदाहरण पाहून त्यांच्याच तोडीचे दुसरे मराठे फौजबंद बाग-लाणांतील सरदार * हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे हेहि शाहूस मिळाले. तेव्हांपासून शाहूचा जमाव बराच वाढत चालला. मराठे लोक भराभर येऊन त्यास मिळूं लागले. या सर्व जमावासह गंगातीरास ( गोदावरीकांठीं ) आल्यावर शाहूनें 'आह्मी बादशहापासून निघोन मुक्कामास येऊन पावलों. लवकरच येतों.' असें ताराबाईस पत्र पाठविलें.

'हें वर्तमान + मातोश्री ताराबाई आईसाहेब व परशुरामपंत प्रतिनिधी यांस कळल्यावरून तोतया आहे ह्मणून ठरविलें. जर खरा असला तरी लबाड होय, असें मनुष्य योजून पाठवावें. याकरितां खंडेराव बल्लाळ चिटणीस ठीक आहेत. आमचे स्नेही आणि राजांनीं त्यांचे वडील मारले त्याचा सूड हे घेतील. हे आपले मनांतील ह्मणून बरोबर पांचशें लोक देऊन रवाना केलें. ते शाहूच्या छावणींत येऊन यांसी व राजांशीं भेटी जाल्या. राजा रांगडी बोली व हिंदुस्थानी चाल अशी वर्तणुक. तेव्हां खरा खोटा कशावरून ओळखावा. तंव केसरकर खिजमत-गारांचा नाईक याजला ओळाखिलें. आणीकही खिजमतगार बरोबर होते ते ओळखीचे पाहून चौकशी केली. केसरकरांनीं वर्तमान सांगितलें तें पक्केपणें ध्यानास आणून राजा खरा जाहला. परसोजी भोंसले व इतर सरदार बरोबर होते त्यांच्याही चिटणीसांनीं भेटी घेतल्या. तेव्हां त्यास शाहूच्या खरेपणाबद्दल शंका राहिली नाहीं. त्यांनीं आई-साहेबांस व परशुरामपंतास व तसेंच अष्ट प्रधानांस आणि जाधवराव आदिकरून सर्वत्रांस पत्रें लिहिलीं जे 'राजा खरा आहे, असें झालें.'

---

* They ( Pursojee & Chimanji ) immediately joined him. Their example was soon followed by Hybut Rao Nimbalkar, Nemajee Sindia & other chiefs.

*G. Duff Vol. I Page 340.*

+ ना. भों. ब. पा. १९

हें चिटणीसांचें पत्र आलेवर ताराबाई व सर्व त्यांची प्रधान मंडळी यांस मोठें संकट पडलें. तेव्हां रामचंद्रपंतांनीं यांस माणूस चांगलें पाठविलें पाहिजे. सारे फंदांत मिळाले, अशी आईसाहेबांस विनंति केली. एवढ्या एका गोष्टीवरून ताराबाई हातपाय गाळून स्वस्थ बसणारी बायको नसलेनें व ती मोठी मुत्सद्दी, महत्वाकांक्षी, आणि खटपटी बायको असलेनें, लगेंच तिनें दुसरी युक्ती योजली. तिनें रामचन्द्रपंतांस आज्ञा दिली कीं:—' हिंगणीकर ✦ भोंसले बापूजीबुवा हे पहिलेपासून वडिलोपार्जित, इतबारी, प्रबुद्ध आपलेजवळ आहेत. यांजला पाठवावें. शिवाजी महाराजांसमागमें कामाकाजास आलेले हे खरें ह्मणतील तर राजा खरा. ' याप्रमाणें ठरल्यानंतर बापूजी भोंसले पांडववाडीस होते, त्यांस बोलावून घेण्यांत आलें. व त्यांचेबरोबर हजार बारांशे लोक देण्याचें ठरविलें. नंतर बापूजी भोंसले व ताराबाई यांची भेट झाली. त्या वेळीं ताराबाईनीं समक्ष त्यांस असें सांगितलें कीं, " तुह्मी वडिलापासून ( आहां. ) तुमचे वडील पूर्वापार सेवा करीत, विश्वासुक, प्रबुद्ध याजकरतां पाठवितों. तोतया मनुष्य पाहून यावें ह्मणजे सर्वांची खातरजमा होईल. मग पारपत्य केलें जाईल. तुह्मीं आपलें कुळास बट्टा लावूं नये, रांगडा कोण आहे. चिटणविसांनीं शाहू केला आहे. याजवरून जाणें. तुह्मी सांगाल तेंच होईल.' याप्रमाणें ताराबाईनीं बापूजी भोंसले यांस सांगून त्यांचेसमवेत हजार लोक देऊन त्यांची शाहूकडे रवानगी केली.

बापूजीबुवा हिंगणीकर हे परसोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे सख्खे वडील बंधु हे ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें एक हजार लोकांच्या लवाजम्यानिशीं निघाले, ते गोदावरी उतरून शाहूच्या छावणीला येऊन दाखल झाले. त्यांच्या व शाहूराजाच्या ' भेटी जाहल्या. राजा रांगडा ( ह्या विषयीं ) ठिकाण नाहीं.' ताराबाई तर तोतया शाहू ह्मणते, पण हे शाहू तोतया नसून खरे आहेत, अशी त्यांची प्रत्यक्ष भेटीमुळें खात्री झाली. शाहु खरे असतां ते तोतया आहेत, अशी वार्ता कशी परसली, या विचारानें ते कांहीं वेळ ' अंदेशांत पडले. ' नंतर त्यांस चिटणविसांनीं एकांतीं नेऊन शाहूच्या खिजमतगारांचे नाईक केसरकर यांची भेट घातली. त्याचप्रमाणें बापूजीबुवांनीं आपले बंधु परसोजी भोंसले यांची भेट करून दिली. बापूजीस सर्व बाजूंनीं शाहूच्या खरेपणाबद्दल सत्यता पटली. तेव्हां चिटणविसांच्या सांगण्याप्रमाणें प्रत्यक्ष पुरांव्या-

---

✦ ना. भो. ब. पान २०

दाखल सर्वांसमक्ष हे उभयतां बंधू ( नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज ) शाहुराजास एका ताटांत घेऊन जेवले. हें सर्वत्रांनीं पाहिलें. ' तेव्हां राजा ( शाहु ) खरा झाला. तोतया नाहीं.'

बापूजी भोंसले यांचे कडून ही एक अतीशय महत्वाची कामगिरी झाली. बापूजी बुवांवर ही सोंपविलेली कामगिरी जितकी महत्वाची होती, तितकीच ती धोंक्याचीही पण होती. एका बाजूस बापूजींच्या निकालावर शाहू राजांचें अस्तित्व अवलंबून होतें व त्यामुळें महाराष्ट्राचें भवितव्य ठरणार होतें; तर दुसऱ्या बाजूस ताराबाईच्या राज्याधिकाराचें अस्तित्व कायम राहाणें हें ठरणार होतें. एवढयावरच याचा निकाल होऊन थांबणारा नव्हता. बापूजींच्या स्वत:च्या अस्तित्वाचा प्रश्न यांचेही पुढें होता. शाहु खरा असून व त्याला बापूजींनीं खरा ठरवून देखील जर ताराबाईच्या पक्षाचा जोर झाला असता व शाहूचा पराभव होऊन शाहूसह त्याचे अनुयायी जर ताराबाईच्या हस्तगत झाले असते, तर बापूजी भोंसले यांना पहिल्यानें तोतया शाहूच्या कटांत सामील असल्याबद्दल संभाजी महाराजांचे वेळीं मोठमोठया सर-दारांना जी शिक्षा मिळाली तीच या प्रसंगीं ताराबाईकडून मिळाली असती. उलट शाहु खरे असून त्यांना जर बापूजींनीं तोतया ठरविलें असतें आणि शाहूच्या विजयानंतर बापूजींना ताराबाईच्या कटांतील एक पुढारी ह्मणून इन्साफाकरितां उभें केलें असतें. आतां शाहू सद्भावी होते, ते वडिला प्रमाणेंतीव्र भावनाप्रधान नव्हते— हा प्रश्न सोडून दिला तर बापूजींना कोणता इन्साफ मिळाला असता ? याचा विचार केला ह्मणजे बापूजींची ही कामगिरी खरोखरच महत्वाची व जिवावरचीच होती. या वेळीं बापूजींनीं आपल्या कुळाला स्मरूनच शीर तळाहातावर धरूनच मोठ्या धारिष्टानें आपली कामगिरी बजावली. परसोजीनें शाहूला प्रथमत: आपल्या सैन्या-निशीं मिळून जी कामगिरी केली तेवढ्याच तोलाची बापूजींची ही कामगिरी झाली. हे उभयतां बंधूंचे उपकार ह्मणजे नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्वजांचे उपकार शाहू राजांवर व पर्यायानें पुढील सातारच्या वंशजांवर एवढे झाले आहेत कीं त्याला मोलच नाहीं. हे उपकार अमोल ह्मणण्याचें दुसरें असें कारण आहे कीं, बापूजी भोंसले यांना शाहूच्या बापानेंच ह्मणजे संभाजीनेंच देशोधडीला लावलें होतें. त्यामुळेंच त्यांना संकटाच्या परंपरेंत उडी टाकावी लागली होती. असें असतां संभाजीच्या या कृत्याबद्दल त्याच्या मुलाचा सूड घेण्याची ही सर्व साधारण मानवी

वृत्ति न स्वीकारतां अपकार कर्त्या राजाच्या मुलाला पहिल्यानें पुढाकार घेऊन पुढें सरसावण्याचें मनोधैर्य आणि थोर बुद्धी दाखविली त्या अर्थी हे उभयतां बंधू जातिवंत थोरच व त्यांची कामगिरीही तितकी अमोलच यांत शंका नाहीं.

बापूजी बुवांस शाहूकडे पाठविल्यानंतर जी हकीकत झाली, ती ताराबाईस सर्व कळली. परंतु स्वार्थ-साधु माणसांची खरा शाहु असलेबद्दल जरी खात्री झाली असली तरी त्यामुळें स्वार्थ साधणुकीची त्यांची खटपट थोडीच बंद पडणार आहे ! ताराबाईचें यामुळें मुळींच समाधान झालें नाहीं. तिनें आपल्या पूर्व संकेताप्रमाणें आणि निश्चयाप्रमाणें सर्व प्रधान, प्रतिनिधी, सेनापती यांच्याकडून आपला पक्ष सोडणार नाहीं, शाहूशीं लढूं, अशा दूध भाताच्या ताटावर शपथा घेऊन परशुरामपंत प्रतिनिधी आणि धनाजी जाधव सेनापती यांस मोठी फौज देऊन शाहूवर रवाना केलें. शाहूही परसोजी भोंसले व इतर सरदारांसह औरंगाबाद, पारद, यावरून खेडकडूस येथें येऊन दाखल झाला. या ठिकाणीं ताराबाईच्या फौजेची आणि शाहूच्या फौजेची गांठ पडली.

खेडकडूस येथें आल्यावर धनाजी जाधवराव यांच्यातर्फे बाळाजी विश्वनाथ शाहुराजांस पाहाण्याकरितां आले. त्यांच्याशीं भेट झाल्यानंतर खंडो बल्लाळ यांनीं बाळाजी विश्वनाथ यांस सांगितलें कीं, ‘ तुह्मीं अनमान कोणताही एक करूं नये. जाधवराव यांजला फौजेसुद्धां आणावें व तुह्मीं आपले पथकासहित येऊन महाराजांस अनुकूल झाल्यास तुमचे जातीस पद मातबरीचें सेनापतीचे बरोबरीचें देण्यांत येईल. परशुरामपंत आजवर दौलत आपण करीत आले, तशीच करावी, यास्तव खोटे ह्मणतात. याजकरितां तुह्मी त्यांचे ह्मणण्यावर न जावें. हिंगणीकर भोंसले उभयतां बंधू यांचे ताटांत जेवले, तेव्हां खोटे कसें ह्मणाल ? जाधवराव सेनापती हेही सोयरेच आहेत. आतां यश तुह्मीं घ्यावें. ’ हे चिटणविसांचें ह्मणणें बाळाजी विश्वनाथ यांस पटलें. त्यानें आपल्या धन्याचें मन वळविलें. ताराबाईनें पाठविलेल्या परशुरामपंत व जाधवराव या दोन सरदारांपैकीं लढाईच्या प्रसंगीं धनाजी जाधवराव हा आपल्या फौजेसह शाहूस मिळाला. ‘ लढाईस † प्रारंभ झाला; प्रतिनिधी व आईसाहेबांचे लग्याचे सरदार, बहुत लढले. तिकडून परसोजी भोंसले व चिमणाजी दामोदर

---

† थोरले शाहु याचें चरित्र पान १४

यांनीं घोडे चालवून लढाई केली. त्यांत महाराजांनीं हत्ती चालवून तिरंदाजी केली.' तेव्हां परशुरामपंत प्रतिनिधी यांचा खेडकडूसच्या मैदानावर शाहूशीं लढाई होऊन पराभव झाला. लगेंच तो आपल्या फौजेसह रणांगण सोडून निघाला तो सातान्यास येऊन किल्ल्याचा बंदोबस्त करून राहिला. शाहु महाराजही लगेंच त्याचा पाठलाग करीत निघाले. ते चाकण, चंदन वंदन हे किल्ले काबीज करून दहीगांवावरून सातान्याखालीं येऊन किल्ल्याला वेढा देऊन बसले.

या स्वारीबरोबर परसोजी भोंसले हे आपल्या सर्व सैन्यासह तर प्रामुख्यानें होतेच, पण बापूजी भोंसले व साबाजी भासेल हेही होतेच. साबाजी भोंसल्यांनीही लढाईचे वेळीं शाहूस चांगलीच मदत केली, हें त्यांना पुढें शाहूंनीं दिलेल्या इनामावरून सिद्ध होतें. याप्रमाणें या त्रिवर्ग भोंसल्यांच्या सहाय्यानें व इतर सरदारांच्या मदतीनें दोन तीन महिने सातारा किल्ल्यास वेढा देऊन शाहूस बसावें लागलें, नंतर परशुरामपंत प्रतिनिधी यांचे हाताखालील साताऱ्याच्या किल्ल्यावरचा जमादार शेखमिरा याला सामील करून घेऊन आणि त्याच्याकडून परशुरामपंतास कैद करवून शाहूनें सातारा किल्ला इ. स. १७०७ च्या सप्टेंबर महिन्यांत हस्तगत केला. तेणेंकरून मराठेशाहीच्या राजधानीस शाहूचा शह लागला, आणि नंतर लवकरच परळीड, वर्धनगड, महिमानगड वगैरे किल्ले त्याच्या ताब्यांत आले.

याप्रमाणें शाहूनें सभोंवतालच्या प्रदेशांवर आपला पूर्ण जम बसविल्यानंतर इ. स. १७०८ च्या जानेवारी महिन्यांत त्यानें आपणास सातारा येथें यथाविधि मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करवून घेतला. नंतर जे जे अष्टप्रधान, सरदार त्यास सामील झाले, त्यांस त्यांच्या पदाचीं वस्त्रें यथापद्धति देऊन कार्यें सांगितलीं. नंतर खंडेराव ¶ बल्लाळ चिटणवीस यांनीं विनंती केली कीं, 'बाळाजी विश्वनाथ व परसोजी भोंसले या उभयतांस सरफराज करावें.' यावरून राजश्रींस बहुत संतोष झाला. परसोजी भोंसले यांजवर कृपावंत पेशजीचे दयेंवरून होऊन 'सेनासाहेब सुभा' होता त्या पदाचीं वस्त्रें बहुमान देऊन त्यांस त्यांचे प्रांतीं रवाना केलें. त्यावेळीं शाहूनें परसोजी भोंसले यांस नवीन सनद करून दिली ती शके १६२९ म्हणजे इ. स. १७०८ सालीं अखेर:—

¶ ना. भो. ब. पान २२—२३

१ प्रांत रितपूर व सरकार गावेल प्रांत वऱ्हाड, प्रांत देवगड, चांद, गोंडवण.
१ आनागोंदी वगैरे वराड प्रांतीचे माहाल वितपशील.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सरकार गावेल | माहाल | ४६ |
| १ | सरकार नरनाला | माहाल | ३७ |
| १ | सरकार माहूर | माहाल | १९ |
| १ | ,, खंडले | माहाल | २१ |
| १ | ,, पवनार | ,, | ५ |
| १ | ,, कळंब | ,, | १९ |
| ६ | | | १४७ |

एकूण सहा सरकार दर शेंकडा नऊ रुपये अकरा आणि मोकाशाचे आकारास असे
२

याप्रमाणें परसोजीस शाहूनें सनद करून दिली. त्यानें सेनासाहेब सुभ्याचें पद परसोजीकडे पूर्वीपासून होतें तें कायम करून त्यास आपल्यातर्फे त्या पदाचीं वस्त्रें देऊन व बहुमान करून आपल्या पक्षास कायमचें करून घेतलें. यामुळें परसोजीचें पद स्थिर झालें, ही गोष्ट खरी; पण प्रत्यक्ष असा परसोजीचा बहुमान यामुळें झाला नव्हता तर त्याच्या अमोल कामगिरीबद्दल पारितोषिक ह्मणून शाहूनें त्याला दुसरी सनद करून दिली; तीमुळें झाला. शाहूनें परसोजीस आठ गांवच्या देशमुखीचें वतन करून दिलें. त्याबद्दलची त्या वेळीं शाहूनें परसोजीस जी सनद करून दिली ती महत्वाची असल्यानें खालीं दिली आहे.

श्री

' राजश्री § परसोजी भोंसले देशमुख महाल महालहाय, प्रांत कडेवळींतः— आज्ञा केली ऐसीजेः—स्वामी मोंगलाईतून स्वराज्यांत आले. ते समयीं तुह्मीं लांबकानी प्रांत खानदेश, येथील मुक्कामीं जमावसहीत येऊन भेटी घेतली. ती एकनिष्ठपणें सेवा केली. कितेक खस्त मेहनत केलीत. त्यावरून स्वामी तुह्मांवरी कृपाळू

§ पेशवे. डफ. माहिती ( इति. संग्रह ) पान ११९ टिपण ११५

होऊन तुम्हांस प्रांत मजकूरचे देशमुखीचें वतन पेशजी भोंसले यांचें होतें, अलीकडे मोंगलांच्या राज्यांत तरफ तरकस अलाहि ( दें ) देशमुख जाहले होते ते दूर करून तुम्हांस वतन दिलें. महाल ८ बितपशील.

येणेंप्रमाणें आठ महालांची देशमुखी तुम्हांस आजरा मऱ्हामत वतन करून दिल्ही असे. तुम्हीं व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवणें. इनाम देश-मुखीचें व हक्क लाजीमा बरहुकूम सालाबादप्रमाणें करार केले असें. तेणेंप्रमाणें अनुभवीत जाणें. ”

शाहूनें परसोजीस व त्याच्या पुत्रपौत्रादि वंशजांस हें कडवलींतील आठ महालांच देशमुखी वतन या वेळीं मात्र नवीन करून दिलें. परसोजी भोंसले हे ‘ सेनासाहेब सुभा ’ या पदवीबरोबर देशमुखही बनले. या वेळपर्यंत परसोजी व त्यांचे भाऊबंद हे हिंगणीचे जे पाटील होते ते आतां कडवलींतील महालांचे देशमूख झाले. मोठ्या पदापेक्षां दक्षिणेंतील सरदार, इनामदार वगैरे मंडळींस आपल्या पाटिलकीच्या व देशमुखीच्या वतनाचा केवढा अभिमान असतो आणि त्याकरितां पिढ्यानुपिढ्या त्यांची भाऊबंदकीची कशीं रणें माजत असतात; त्याकरितां कंगाल झालेले पुरवले पण आपला वतनदारपणा सोडण्यास ते कधींच कबूल नसतात; हें सर्वांस माहीतच आहे.

परसोजी भोंसले यांच्याबरोबर त्यांचे धाकटे बंधु साबाजी भोंसले हेही शाहूस आपल्या जमावानिशीं येऊन मिळाले होते. त्यांनाही शाहूंनीं मसूर तर्फापैकीं एक गांव इनाम देऊन सनद करून दिली. तीही सनद खालीं दिली आहे.

श्री

‘ स्वस्ति † श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारी नाम संवत्सरे चैत्र शुद्ध तृतीया, रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती यांनीं मोकदम मौजे भिकार वडोली, तर्फ मसूर यांसी आज्ञा केली ऐसीजे:—राजश्री साबाजी भोंसले हे राज्यांतील पुरातन सेवक, त्यास स्वामी दक्षिण प्रांतीं आले, ते समयीं खानदेशांत सेना समुदायेनिशीं सेवा एकनिष्ठ तेथें केली. म्हणोन स्वामी कृपाळु होऊन मौजे मजकूर इनाम कुलबाब, कुलकानूखेरीज हक्कदार व इनामदार वजा करून बाकी

† पेशवे दफ्तर माहिती टि. १२ पान २१ ( इ. सं. )

देहे करे देखील जल, तरु, पाषाण, चतुःसीमा दिले आहे. तरी हे व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें मौजे मजकुरीं उत्पन्न होईल, तें अनुभवून सुखरूप राहतील. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. हे पत्राची तालीक लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवटीयासी परतून देणें. जाणिजे.' ( इ. स. १७०८ )

परसोजीनें नंतर आपले उपाध्ये व उपकारकर्ते ब्रह्मनिष्ठ रामाजी नारायण कोल्हटकर, पांडववाडीकर यांस नेवरें येथें दाभोळी पांचशें लारींचें वर्षासन करून देववून कृष्णाजी वेंकटेश सर सुभेदार प्रांत राजापूर यांस स्वतः पत्र † लिहून 'यांचें चालवणें आम्हांस अगत्य आहे. तैसें आपणही अगत्य धरून चालविणें,' अशी ताकीद दिली. त्याचप्रमाणें शके १६३१ मार्गशीर्ष शु॥ ६ ( इ. स. १७०९-१० ) परसोजी सेनासाहेब सुभे यांनीं मौजे बिलासी प्रांत शिराळें येथें राजश्री बहिरंभट व दिवाकर गोसावी महाबळेश्वरकर या दोन रामदासी गृहस्थांस अर्धा अर्धा चावराचीं पुरातन सेतें तेथील मोकदमास पत्रें * लिहून देवविलीं.

सातारा घेऊन राज्याभिषेक झाल्यापासून पुढें सुमारें दोन वर्षे शाहूची आणि ताराबाईची जी लढाई चालली त्या लढाईत परसोजी भोंसले आपल्या फौजेसहीत त्यांस मदत करीत होते. 'ताराबाईनीं बंड केलें होतें त्यांचे पारिपत्याकरितां महाराजांस साथ देऊन बंड परागदा करून स्वराज्यावर शाहू महाराज झाले, यावरून तर परसोजी भोंसले यांची मदत त्या कठीण प्रसंगीं शाहु महाराजांस किती होती, हें स्पष्ट होत आहे. शाहूचा तोतयापणा घालविण्यास, त्यांना फौजेची मदत प्रथम करण्यास, राज्यावर बसल्यानंतर ताराबाईचें बंड मोडून सिंहासन स्थिर करण्यास, बापूजी, परसोजी आणि साबाजी भोंसले--नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज.—यांनीं सर्व प्रकारें मदत केली. ही त्यांनीं ऐन वेळेला शाहूला मदत केली नसती, तर बादशहाच्या कैदेंतून सुटून दक्षिणेंत आल्यानंतर आजन्म ताराबाईच्या कैदेंत शाहूला राहण्याचा प्रसंग आला असता. परंतु परमेश्वरानें या त्रिवर्ग भोंसले बंधूंच्या काम-

† मरा. इतिहासाचीं साधनें रा. राजवाडे यांची. खंड ३. पान १९८. लेखांक १८३ ( ता. १४ एप्रील १७०८ चें )

* श्रीसमर्थ सांप्रदायी कागदपत्र खंड सत्कार्योत्तेजक ( धुळें ) खंड लेखांक पत्र २१८-२१९

गिरीला यश दिलें व त्यामुळें आज त्यांचें महाराष्ट्राच्या इतिहासांत नांव चिरंजीव राहिलें. या कामगिरीबद्दल शाहूनें जो परसोजीचा सन्मान केला, तो पहाण्यास व त्याचा उपभोग घेण्यास ते फार दिवस जगले नाहींत. ते शाहूला ताराबाईच्या बाबतींत मदत करावयाच्या कामगिरीवर असतां दक्षिणेंत श्रीकृष्णा—वेण्यासंगमीं मौजे खेडसा जिल्हा पंवाई येथें शके १६३२ फसली सन ११९९ इ. स. १७१० त मृत्यु § पावले.

परसोजी भोंसले यांची चरित्र-कथा येथवर संपली. परंतु जो पुरुष श्रीशिवाजी महाराजांच्या सैन्यांत यःकश्चित शिलेदार होता, तोच पुढें स्वतःच्या पराक्रमानें सेनासाहेब सुभा झाला, तेव्हां अशा पराक्रमी पुरुषाच्या चरित्राचें थोडक्यांत सिंहावलोकन करून हें प्रकरण संपविलेलें बरें.

---

§ परसोजी भोंसले यांच्या मृत्युशकाबद्दल आणि स्थलाबद्दल नागपूरकर भोंसल्यांची बखर, ग्रँट डफ, शाहूचें चरित्र, यांत एकवाक्यता नाहीं. नागपूरकर भोंसल्यांच्या बखरींत ' गंगातीरीं ' ह्मणजे गोदावरीचे तीरीं वारले असें दिलें आहे. बाळाजी विश्वनाथ यांस पेशवेपद दिलें तेव्हां ह्मणजे इ. स. १७१४ च्या सुमारास वारले असें डफसाहेब ह्मणतात, परंतु ' नागपूरकर भोंसले यांचे कागदपत्र ' यांत लेखांक ५० हें पत्र छापलें आहे. त्यावरून वरील दोन्ही तिन्ही ग्रंथकारांचे शक व स्थल याबद्दलचें ह्मणणें बरोबर नाहीं हें स्पष्ट होत आहे.

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३७ ( इ० स० १७१० ) विक्रमनाम संवत्सरे आश्विन बहुल दशमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम शाहु छत्रपति स्वामी यांनीं राजश्री कान्होजी भोंसले बिन परसोजी भोंसले यांस दिल्हें इनाम पत्र ऐसाजे:—तुह्मीं किल्ले सातारियाचे सन्निध येऊन विनंति केली जे:—आपले पिते परसोजी भोंसले यांचे स्मशानस्थल श्रीकृष्णावेण्यासंगमीं मौजे खेडसा जिल्हा पंवाई येथें आहे. तेथील पुष्पवाटिका व दिवाबत्ती यांचे ऊर्जेबद्दल मौजे मजकुरीं जमीन इनाम करून देविली पाहिजे, ह्मणोन विनंति केली वगैरे—

परसोजी भोंसले हे मुधोजी भोंसले हिंगणीकर यांच्या सात मुलांपैकीं दुसरे होत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यापैकीं ' देऊर ' गांवीं झाला. त्या गांवचे ते वतनदार पाटील होते, असें § डफसाहेब आपल्या इतिहासांत एका टीपेंत ह्मणतात. हें ' देऊरगांव ' पुढें पहिले रघोजी भोंसले यांना छत्रपती शाहुमहाराज यांनीं इ. स. १७२९ मध्यें कुटुंबाच्या संरक्षणाकरितां ह्मणून इनाम करून दिलें. त्या वेळेपासून तें नागपूरकर भोंसल्यांचें मूलस्थान झालें आहे. मुधोजीचे पुत्र बापूजी, परसोजी, साबाजी वगैरेंची वस्ति प्रथम देऊर, नंतर भैरवगड, त्यानंतर पांडववाडी येथें झाली. नंतर सातारा, पुन्हां देऊर, भाम, अशी निरनिराळ्या ठिकाणीं पुढें होत गेली; तरी पहिले रघोजी नागपुरास जाऊन तेथें स्वतंत्र गादी स्थापन करी तोंपर्यंत या भोंसल्यांना परसोजीच्या पूर्वजांप्रमाणेंच हिंगणीकर भोंसले असें ह्मणत. परसोजी भोंसले यांचें वय मरणकालीं सत्तराच्या अंदाजांत होतें. त्यांचा जन्मशक नक्की आढळत नाहीं. त्यांच्या स्त्रीचेंही नांव कोठें उपलब्ध नाहीं. त्यांना कान्होजी या नांवाचा मुलगा होता, तोच पुढें सेनासाहेब सुभा झाला. त्या वेळीं त्याचें वय तीस वर्षांचें असावें. याशिवाय परसोजीस दुसरी संतती असल्याचें कोठें आढळत नाहीं. इ. स. १६६० च्यापुढें जितक्या ह्मणून लहान मोठ्या स्वाऱ्या श्रीशिवाजी महाराजांनीं केल्या या सर्व प्रसंगीं बापूजी, परसोजी आणि साबाजी हे त्रिवर्ग बंधू आपल्या शिलेदारी पेशानें आणि आपला लहानसा जमाव बाळगून कामगिरी करीत होते, असे उल्लेख सांपडतात, त्यावरून वाटतें. सुमारें पन्नास वर्षें परसोजी भोंसले लष्करी कामगिरीवर होते. प्रथम शिलेदार ह्मणून ते शिवाजी महाराजांच्या सैन्यांत शिरले. तेथें ते स्वतःच्या पराक्रमानें शिवाजी महाराजांच्या अंतकाळपर्यंत पागेचे नामांकित सरदार झाले. या काळांत इतर सरदारांप्रमाणें त्यांनींही योग्यता, थोडीशी दौलत आणि दरबारांत मान मान्यता मिळविली होती संभाजीनें त्यांना व त्यांच्या बंधूंना राज्यांतून घालवून दिल्यानंतर सुमारें दहा बारा वर्षें त्यांना पुंडपाळेगारी करून दिवस कंठावे लागले; पण त्या अवधींत त्यांनीं आपला पराक्रम व दरारा लांबच्या प्रदेशांतही बसविला. पुढें राजारामाच्या अज्ञातवासाच्या काळांत खानदेश, वऱ्हाड या प्रांतांत जी पाळेगारी करून मराठ्यांचें मराठपण,-त्यांचे हक्क-प्रस्थापित केलें ते त्या वेळीं राजाराम महाराजांच्या फार उपयोगी पडले त्या त्यांच्या कामगिरीचें चीज राजाराम आणि त्या

§ G. Duff's History 3rd Edition. Page 168 Foot Note.

वेळचें त्याचें मंत्रीमंडळ यांनीं त्यांस नुसते 'पाळेगार' ह्मणून सोडून न देतां त्यांना 'सेनासाहेब सुभा' हें बहुमानाचें पद देऊन केलें; आणि त्यांना हिंदपदपादशाहिच्या छत्राखालीं घेऊन मराठी राज्याचा दूरदूरच्या प्रांतांत अंमल बसविण्याकरतां व मराठी राज्य अद्यापि कायम आहे हें दाखविण्याकरतां त्यांचा चांगला उपयोग करून घेतला. त्याचेंच अनुकरण दाभाडे, निंबाळकर, वगैरे दुसऱ्या सरदारांनीं केलें. वऱ्हाड, देवगड, चांदा हे नवीन प्रांत मराठा सैन्याच्या हालचालींना योग्य असे बनवून त्यांतल्या त्यांत वऱ्हाड प्रांत हा मराठी राज्याचा एक घटकावयव जो करून ठेवला. याचें सर्व श्रेय परसोजी भोंसले यांच्याच कर्तबगारीला आहे. पुढें औरंगजेबाच्या फौजेला त्या बाजूनें पायबंद देण्याचें व त्याला सताऊन सोडण्याचें काम परसोजींनेंच बादशाहाच्या मृत्यूपर्यंत केलें. शाहुमहाराज दिल्लीहून सुटून आल्यानंतर त्यांना प्रथमतः आपल्या सर्व सैन्यासह मिळून त्यांना साताऱ्याच्या गादीवर नेऊन बसविण्याची जी कामगिरी त्यांनीं केली ती त्यांच्या पराक्रमाची पूर्ण द्योतक अशीच झाली. याप्रमाणें अगदीं तरुणपणापासून तें सत्तर वर्षांच्या वृद्धावस्थेपर्यंत सुमारें पन्नास वर्षें प्रथम शिलेदार. पागेचा नामांकित सरदार, आणि नंतर स्वतंत्र पाळेगार, सरदार आणि शेवटीं मराठी राज्याचा सेनापती बरोबरीचा 'सेनासाहेब सुभा' अशी एकामागून एक क्रमानें चढत्या पायरीची परसोजी भोंसले यांनीं मराठी राज्याची आमरण सेवा चाकरी केली. त्यांचे समकालीन हंबिरराव मोहिते, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, परशुराम त्रिंबक प्रतिनिधी, शंकराजी नारायण, कान्होजी आंग्रे, दाभाडे, आटोळे, पवार, निंबाळकर वगैरे अनेक शूर सरदाराच्या बरोबरीचे परसोजी भोंसले पराक्रमी व शूर होते. कोणत्याही बाबतींत ते कमी नव्हते. छत्रपती राजाराम यांनीं त्यांना 'सेनासाहेब' सुभा हें पद देतांना 'शहाणे, मर्द, कर्ते, राज्याचे पुरातन सेवक, असेंच गौरवून ह्मटलें आहे आणि हीं जीं विशेषणें त्यांनीं त्यांना त्या वेळीं देऊन गौरविलें तें अगदीं यथार्थ होतें; अशी त्यांनीं मराठीं राज्याची सेवा करून आपला व आपल्या भोंसले कुलाचा भाग्योदय करून घेतला यावरून खात्री होईल. अशा एका मोठ्या कर्त्या, शूर आणि मराठी राज्याच्या आधारस्तंभापैकीं एका प्रसिद्ध पुरुषाच्या पन्नास वर्षांच्या कर्तबगारीचीं साधनें पुरेशीं उपलब्ध नाहींत. या गोष्टीला इलाज नाहीं. जीं आहेत तीं फारच थोडीं आहेत; तरी केलेल्या विवेचनावरून त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटल्याशिवाय राहणार नाहीं असें मात्र आह्मांला वाटतें.

---

## प्रकरण ३ रें.

# दुसरा सेनासाहेब सुभा

# कान्होजी भोंसले

इ. स. १७१० ते १७२८–२९ पर्यंत.

परसोजी भोंसले वऱ्हाडचे पहिले सेनासाहेब सुभा दक्षिण प्रांतीं साताऱ्याजवळ वारल्यामुळें शाहू महाराज यांनीं लगेंच ' त्यांचे पुत्र () कान्होजी भोंसले यांना ' सेनासाहेब सुभा ' पदाचीं वस्त्रें दिलीं. ' कान्होजी भोंसले हे त्या वेळीं त्यांच्याच ‡ समागमें असून चांगले पोक्त होते. यामुळें शाहू महाराजांच्या पक्षाला एक मोठा फौजबंद सरदार कायमचा चिकटून राहिला. कारण ताराबाईशीं शाहूचें युद्ध अद्यापि चाललें होतें. तेव्हां आपल्या पक्षाला जितके फौजबंद सरदार–प्रधान मिळतील तितके जोडून ठेवणें हेंच या वेळीं शाहू महाराजांना करणें अगत्य होतें. पुढें शंकराजी नारायण सचीव वारल्या-बरोबर त्याचा अल्पवयी मुलगा नारो शंकर यांस लगेंच सचीव पदाचीं वस्त्रें देऊन त्यांसही आपल्या पक्षाकडे याच कारणाकरितां त्यांनीं ओढून घेतलें. शाहू महाराज यावेळीं जर मुत्सद्दीपणाचें धोरण न स्वीकारते, तर नाखूष झालेली सरदार मंडळी ताराबाईच्या अथवा निजामाच्या पक्षाला जाऊन लगेंच मिळती. हे दोन्ही पक्ष या वेळीं शाहूच्या विरुद्ध दक्षिणेंत असून ते थोडेसे जोरांत होते, असें ह्मटल्यास हरकत नाहीं. त्यांना कमजोर ठेवण्याची हीच युक्ती होती. त्यांतून परसोजीचा पुत्र कान्होजी दहा

() थो. शाहु. चरित्र पा. ६४.

‡ नाग. भों. ब. पान. २४.

पंधरा हजार फौजेचा सरदार. त्याच्या सारख्याची तर शाहू महाराजांस फारच अवश्यकता होती. हैबतराव निंबाळकर सरलष्कर हाही याच वेळीं मरण पावला; परंतु त्याचें पद शाहूनें त्याच्या पुत्रास न देतां दाळजी सोमवंशी यास दिल्यामुळें तो रुसून निजामाकडे गेला. धनाजी जाधव याचा पुत्र चंद्रसेन हाही पुढें शाहूचा पक्ष सोडून प्रथम ताराबाईस नंतर निजामास मिळाला. तोच मार्ग कदाचित् कान्होजी भोंसले यांना त्यांस त्यांच्या वडीलाचें पद शाहूनें दिलें नसतें तर, स्वीकारावा लागला असता. तो प्रसंग यामुळें टळला.

परसोजीच्या मरणकालीं कान्होजी हे प्रौढ असल्यानें त्यांना वडिलांच्या तालमींत तयार होण्यास अवधी मिळाला होता. त्यांच्या सर्व कामकाजाची त्यांना माहिती झाली होती. त्यामुळें त्यांस सर्व जबाबदारी घेण्यास कांहींच अडचण पडली नाहीं. त्यांस सेनासाहेब सुभा पदाचीं वस्त्रें मिळतांच ते ' तसाच फौजेस ग्रह* घालून गंगथडीस घांसदाणा वगैरे खंडण्या घेत वऱ्हाडांत आले. ' वऱ्हाडांत ह्मणजे त्यांची राहण्याची जी मुख्य जागा भाम तेथें आले. तेथें आल्यावर ते विश्रांति घेत स्वस्थ बसले नाहींत. वडिलांनीं मिळविलेल्या प्रांताचा त्यांनीं बंदोबस्त केला व रीतपूर येथें आपलें ठाणें बसविलें. त्यांस सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें मिळालीं त्या वेळेस, कटक, वऱ्हाड व हिंदुस्थानपैकीं कांहीं भाग महाल † गोंडवण, असा सुभा सांगून, या प्रांतांत स्वाऱ्या करून मराठ्यांचा अंमल जितका बसेल तितका बसवून या बादशाही प्रांतांतून जितक्या खंडण्या चौथ आणि सरदेशमुखीबद्दल येतील, तितक्या घेत जाव्या. आणि त्याबद्दल हुजूर हकीकत कळवीत जावी, अशी आज्ञा झाली होती. याप्रमाणें कान्होजीनें गेल्याबरोबर ' दारव्हें ' येथें अंमल बसविला. नंतर चंद्रपूर, देवगड, येथपर्यंत एक दोन स्वाऱ्या करून कांहीं परगणे लुटून फौज माघारे वऱ्हाडांत नेली. कान्होजींनीं आपला अंमल विशेष क्रूरतेचा सुरू केला. जसजसे ते शाहु महाराजांचे नांवें वऱ्हाड, गोंडवण, चंद्रपूर या प्रांतांत आपला अंमल बसवूं लागले आणि

---

* नागपूरकर भोंसले बखर पान २४.

† पेशव्यांची शकावली. खंड २ रा. राजवाडे यांची म. इतिहासाचीं साधनें पान २५-२६.

त्याची हकीकत इकडे साताऱ्यास शाहु महाराज यांस कळवूं लागले, तसतसा शाहु महाराजांस संतोष वाटत चालला, कारण त्याच सुमारास महाराष्ट्रांत व सातारा प्रांतांत ताराबाई आणि तिच्या पक्षाचे सरदार यांचा दंगा सुरूं असल्यानें त्यांचा अंमल उत्तम तऱ्हेनें बसला नव्हता; तेव्हां अशा स्थितींत खंडराव दाभाडे यांनीं केलेला गुजराथेंतील व कान्होजी भोंसले यांनीं केलेला वऱ्हाड, गोंडवण, चांदा वगैरे प्रांतांतील पराक्रम ऐकून त्याबद्दल त्यांस संतोष वाटणें स्वाभाविक होतें. शाहु महाराजांनीं कान्होजी भोंसल्यांचा याबद्दल 'बहुमान जरी मंदील व जरीची चादर इत्यादि पाठवून मोटा गौरव केला. त्याबद्दल त्यांनीं कान्होजी भोंसले यांचेकडून नजर वगैरे कांहीं घेतलें नाहीं.' ती शाहु महाराजांकडून सन्मानाचीं आलेलीं वस्त्रें पाहून कान्होजी भोंसले यांस फार आनंद झाला.

या वेळेपासून कान्होजी भोंसल्यांचा व त्यांच्याचप्रमाणें दुसरे सरदार जे फौजबंद असून दूर प्रांतांत कायमचें वसतिस्थान करून बसले होते, त्यांचा मुख्य राजधानीशीं आणि राजसत्तेशीं हळुहळु संबंध तुटण्यास प्रारंभ झाला. त्यांच्यांत स्वतः स्वतंत्र होण्याचें वारें हलके हलके खेळूं लागलें. मोंगल बादशाहींतील दूर-दूरच्या प्रांतावरील सुभेदारांची हीच स्थिति झाली. ते हलके हलके स्वतंत्र राजे झाले. निजामशाहीचा उगम याच वेळीं झाला आहे. आणि त्याचें बीज यांतच आहे. ही पद्धत पुढें जास्त प्रमाणानें वाढत गेली. परसोजी भोंसल्यांनीं वऱ्हाडांत जरी बरीच कामगिरी केली होती, तरी त्यांचे पुत्र कान्होजी यांस तेथें जाऊन अंमल बसवून आपली स्थिरस्थावर करण्यास पांच सहा वर्षे लागलीं. ( इ० स० १७१५—१६ ) या पांच सहा वर्षांच्या अवधींत कान्होजीनें चंद्रपूर ( चांदा ) हें राज्य वऱ्हाडाखेरीज साधलें होतें. या पांच सहा वर्षांच्या अवधींत महाराष्ट्रांत खुद्द शाहु महाराजांची व उत्तरेस मोंगल बादशहांची काय स्थिति होती याचें ढोबळ मानानें पर्यालोचन केलें पाहिजे. कारण कान्होजी भोंसले यांचा इतिहास आणि महाराष्ट्रांत शाहु व उत्तरेस मोंगलशाही यांचा इतिहास यांचे परस्परांशीं इतके निकट धागेदोरे जोडलेले आहेत कीं, त्यांचा एकेमकांचा इतिहास सांगितल्याखेरीज नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्वजांचा इतिहास संगतवारीनें लक्षांतच येणें शक्य नाहीं ह्मणून येथें तसें पर्यालोचन करणें भाग पडत आहे.

इ. स. १७०७ च्या जानेवारी महिन्यांत शाहु महाराज गादीवर बसल्यानंतर ते आक्टोबरांत पन्हाळ्याकडे गेले. नंतर ते १७०९ च्या पावसाळ्यांत ह्मणजे जूनच्या सुमारास परत आले. त्यानंतर ते १७०९ च्या आक्टोबर पासून १७१० च्या जून महिन्यापर्यंत कोल्हापुराकडे होते. पुढें इ. स. १७१० मध्यें धनाजी जाधव व त्याचे सुमारास परसोजी भोंसले वारले. शाहु महाराज सातारा प्रांतीं आले, ह्मणजे ताराबाई व तिच्या पक्षाचे सरदार कोल्हापूर प्रांतीं दंगा करीत. आणि ते कोल्हापूर प्रांतीं गेले ह्मणजे ते सातारा प्रांतीं बंड उभारीत. दामाजी व आप्पाजी थोरात, शहाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण वगैरे सरदार मंडळी तिच्या पक्षाला होती. हा दंगा इ. स. १७०८ पासून इ. स. १७१० च्या जून महिन्यापर्यंत चालला होता. शाहूच्या राज्यारोहणाच्या वेळच्या परिस्थितीवरून व त्यांच्या पक्षाकडील फौजबंद सरदारांच्या पराक्रमावरून पहातां ताराबाईचें बंड मोडणें ही गोष्ट अगदींच क्षुल्लक होती. असें असतां इतके दिवस हा दंगा शमविण्याचा शाहु प्रयत्न करीत असतां तो कां थांबला नाहीं, असा सहजिक प्रश्न उद्भवतो. याचें एवढेंच कारण दाखवितां येईल कीं शाहू राजांना 'आपलेच दांत आणि आपलेच ओंठ' अशी परिस्थिती झाली होती. कोणतेही तीव्र स्वरुपाचे उपाय योजून ताराबाईच्या बंडाळीला पायबंद घालतां येईना. शिवाय बाहेरचे तंटे भागविणें अगदींच सोपें असतें. घरचे तंटे दुसऱ्यांनीं मध्यस्थी पडून भागविणें आपल्या दर्जाच्या दृष्टीनें व लोकप्रतिष्ठेच्या दृष्टीनें गौणच. याकरतां शाहु महाराजांनीं सौम्य स्वरूपानें ताराबाईची बंडाळी मोडण्याचा उपक्रम चालविला होता. आपली काकी ताराबाई यांचा पक्ष जोरदार होऊं नये व क्रमाक्रमानें त्यांची बंडाळी न वाढतां शांत होत जाईल, एवढीच मुत्सद्दीपणाची कारवाई शाहु महाराज यांना करणें अशा भाउबंदीच्या प्रसंगीं भाग पडलें होतें.

§ कान्होजी भोंसले व चिमणाजी दामोदर हे आपापल्या सैन्यासह वऱ्हाडांत व खानदेशांत गेले. तेव्हां शाहूजवळ मोठी फौज राहिली नाहीं त्यामुळें इ. स.

---

§ परसोजी भोंसले व चिमणाजी दामोदर असें रा. राजवाडे व डफ वगैरे ग्रंथकार ह्मणतात. तें बरोबर नाहीं. कान्होजी असें पाहिजे. परसोजी नुकतेच वारले होते.

१७१० च्या जूनपासून इ. स. १७११ अखेरीपर्यंत † शाहूचा काल अत्यंत भयंकर अशा संकटाचा गेला. या चौदा महिन्यांत त्याच्याजवळ ह्मणण्या सारखें सैन्य नव्हतें. चंद्रसेन जाधव मुख्य सेनापति ताराबाईकडे गेल्यामुळें शाहूचें मुख्य सैन्य निरुपयोगी झालें होतें. तेव्हां बाळाजीनें आपल्या जवळची दोन हजार व बाहेरची तसलमातीची कांहीं फौज जमवून शाहूचें सैन्य पुन्हां नव्यानें निर्माण करून दिलें. याबद्दल शाहूनें बाळाजी विश्वनाथ यांस ‘ सेनाकर्ते ’ असें पद दिलें. त्या वेळेपासून शाहू महाराजांची बाजू सांवरण्यास सुरवात झाली. नंतर सचीव नारो शंकर यांच्याकडून आणि दमाजी थोरात व श्रीपतराव प्रनिनिधी यांच्याकडून कृष्णराव खटावकर यांच्यावर शाहु महाराजांनीं इ. स. १७१२ व इ. स. १७१३ त स्वाऱ्या करविल्या. पहिल्या स्वारींत अपयश आलें. दुसऱ्या स्वारींत प्रतीनिधींनीं जय मिळविला. नंतर इ. स. १७१४ मध्यें बहिरोपंत पिंगळे पेशवे यांस कान्होजी आंग्र्यावरें पाठविलें. त्यांत बहिरोपंत पेशवे कैद झाले. त्यामुळें बाळाजीस तिकडे पाठविलें. बाळाजीनें आंग्र्याशीं तह करून पेशव्यास सोडाविलें. तेव्हां बाळाजी विश्वनाथ पेशवे पदावर आरूढ झाले. नंतर जंजिऱ्याचा सिद्दी याच्यावर स्वारी होऊन जेव्हां त्याच्याशीं व आंग्र्यांशीं तह झाला, तेव्हां थोडीशी स्वस्थता होऊन शाहू महाराजांचा अंमल थोडथोडा बसत चालला.

इकडे औरंगजेब बादशहा मेल्यानंतर त्याच्या मुलांत बादशाही तक्ताबद्दल तंटे लागले. त्यांत वडील मोअजीम व दुसरा अजीमशहा यांच्यांत लढाई होऊन अजीमशहा मारला गेला. आणि मोअजीम गादीवर बसला. त्या वेळीं त्यानें आपल्याला बहादुरशहा अशी पदवी घेतली. तो इ. स. १७१२ त मरण पावला. त्याच्या पुत्रांत पुन्हा गादीविषयीं तंटे लागले. त्या वेळीं अबदुलखान व हुसेनखान हे दोघे सय्यद बंधू दरबारांत मुख्य होते. त्यांच्या मदतीनें मोअजीम बादशहाचा ह्मणजे बहादुरशहाचा नातु फिरुकशायर बहार प्रांताचा सुभेदार होता, तो गादीवर बसला. ( १७१३ ) तेव्हां सय्यद बंधूंचें प्रस्थ फारच माजलें. त्यांनीं त्या वेळेचा दक्षिणचा सुभेदार दाऊदखान पन्नी याच्या जागेवर निजाम उन्मुलुख याची नेमणुक केली व दाऊदखान यास गुजराथ येथें बदललें. पुढें फिरोकशायर

† पेश. शका. खंड. २ पान १०

बादशहा याला लवकरच सय्यद बंधूंचें वर्चस्व खपेनासें होऊन त्या दोघांना एकमेकांपासून अलग करण्याकरितां त्यापैकीं एकास ( सय्यदहुसेनास ) बादशहानें निजामउन्मुलुखास परत बोलावून दक्षिणेच्या सुभ्यावर पाठविलें. परंतु पहिल्या सुभ्यास ' अधिकार, देऊं नये, ' असें बादशहानें लिहिलें, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हें बादशहाचें कपट सय्यदास समजलें. इकडे गुजराथेंत खंडेराव दाभाडे यांनींही बरीच धामधुम मांडिली होती; व बादशाही फौजेवर जय मिळविले होते. दाऊदखान यानें त्यांस गुजराथची चौथाई दिली असतां सरदेशमुखी ते बळेंच घेऊं लागले. हाच प्रकार वऱ्हाड प्रांतांत, चांदे, गोंडवण इकडे कान्होजी भोंसले सेनासाहेब सुभा, यांनीं या वेळीं मोठ्या जारीनें चालविला होता; व त्या प्रांतांत आतां आपलें ठाणें कायमचें करून तेथून चौथाई, सरदेशमुखी, घांसदाणा, हे हक्क त्या बादशाही मुलखांतून जबरदस्तीनें वसूल करण्याचा एकसारखा त्यांनीं सपाटा चालविला होता.

अशा रीतीनें उत्तर, दक्षिण, पूर्व या बाजूंनीं आपल्या ( दक्षिणच्या ) सुभ्यास मराठ्यांचा एकसारखा त्रास आणि बादशहाचें अशा रीतीचें आपल्याशीं कपटी वर्तन, तेव्हां ( दक्षिणचा या वेळचा सुभेदार ) सय्यद हुसेन याचे मनांत मराठ्यांशीं स्नेह केल्याशिवाय गत्यंतर नाहीं; त्यांची मदत असल्याशिवाय दक्षिणच्या सुभेदारींत शांतता नांदणार नाहीं व आपलाही निभाव लागणार नाहीं, असें येऊन या वेळीं बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या कर्तबगारीनें शाहूमहाराजांचा महाराष्ट्रांत जम बसत चाललेला पाहून त्यांच्याकडे, त्यांच्या पदरीं पूर्वीं असलेला सक्राजी मल्हार यांस सय्यद हुसेन यानें तहाचें बोलणें करण्यास पाठविलें. ( इ. स. १७१७ ). या वेळीं कान्होजी भोंसले यांनीं वऱ्हाड, चांदा, गोंडवण या बादशाही मुलखांत मराठ्यांचा अंमल बसविला होता, परंतु दक्षिणच्या सहा सुभ्यांत चौथाई, सरदेशमुखी वसूल करण्यास जशी बादशहाची परवानगी होती, ती जरी प्रत्यक्ष सनदेच्या रूपानें नव्हती हें जरी खरें होतें तरी तशी सुद्धां तोंडी परवानगी या वऱ्हाड वगैरे तीन प्रांतांकरितां नव्हती. परसोजी भोंसले, व कान्होजी भोंसले यांनीं ते हक्क राजारामाच्या आज्ञेनें आणि स्वतःच्या तरवारीच्या जोरावर वसूल केले होते. आणि आतांही ते शाहूराजांच्या आज्ञेनें कान्होजी आपल्या सैन्याच्या जोरावर चापून वसूल करीत होते.

' सय्यदाकडून * सक्काजीपंत वकील शाहुमहाराजांकडे सातान्यास बोलणें करण्याकरितां आल्यावर महाराजांनीं त्यांचा फार गौरव केला. ते ह्मणाले—तुह्मीं सेवा व पराक्रम केले ते सर्व ऐकण्यांत आले आहेत. तुह्मी महाराजापाशीं मान्य होता, त्याप्रमाणें आह्मांस मान्य आहां. या उपरी आह्मांपाशीं राहून पूर्ववत् सेवा करावी. तुह्मांस पाहून संतोष जहाला. तेव्हां सक्काजीपंत यांनीं उत्तर केलें कीं, ' कोठेंही असलों तरी महाराजांची सेवा करून दाखवावी; राज्याची वृद्धि व्हावी, हेंच यावत् प्राण इच्छितों. ' सैय्यदांचीं बोलणीं विदित केलीं. यांत महाराजांचीं कार्यें असतील ते आज्ञा करावी. १ पन्नास हजार फौज व सरदार कुमकेस देण्याचे कोण कोण ते योजना करावी. २ यांत दरमहा काय तो नेमावा , बोलले. " या सैय्यदांच्या मागण्यांवर शाहु महाराजांचें बोलणें पडलें कीं, ' सहा सुभे दक्षिणची चौथ व सरदेशमुखी व हैदराबाद आणि विजापूर व कर्नाटक, ह्मैसूर व त्रिचनापल्ली व तंजोर यासंबंधीं मुलूख व खानदेश खेरीज करून दक्षिणेंत जो शिवाजीनें मुलूख घेतला, त्याच्या सनदा पादशहाकडून मिळाव्यात. व शिवाय गोंडवण व वऱ्हाड यांतील मुलूख † कान्होजी भोंसले यांनीं घेतला आहे तो व आपलीं मुलें माणसें दिल्लीस आहेत तीं आम्हांकडे पावती करावीं. ' हीं कामें झालीं असतां मोंगल पादशहास आपण वर्षास एक कोट खंडणी देऊं. व सरदेशमुखीबद्दल मुलुखांत चोरी वगैरे होऊं देणार नाहीं. वगैरे "......सय्यदांच्या मार्फत दिल्लीच्या बादशहाकडून जीं कामें करून घ्यावीं, ह्मणून शाहूनें सक्काजी मल्हाराजवळ मागणी केली तीं हीं होतीं. यांत कान्होजी भोंसले यांनीं वऱ्हाड व गोंडवण यांतील मुलुख घेतला आहे, त्याबद्दलही पादशहाकडून सनदा मिळाव्या, असें कलम घातलें आहे. तें याच करतां होय. या प्रांतांत खंडण्या घ्याव्या, चौथ आणि सरदेशमुखी हे हक्क वसूल करावे याबद्दल दक्षिण सहा सुभ्याप्रमाणें पातशहाची या वेळपर्यंत परवानगी नव्हती, हें स्पष्ट होत आहे. नाहींतर हें कलम घालण्याचें

* शा. म. च. पान ३९

† मरा. इति. साधनें रा. राजवाडे खंड २ पेशव्यांची शकावली. पान २० शा. च. पान ४०.

*G. Duff Vol. I P. 364.*

कांहीं कारण नव्हतें. बादशहाची सनद या संबंधानें असल्याशिवाय मोंगल सुभेदार वऱ्हाड व गोंडवण या प्रांतांतील कान्होजी भोंसले यांनीं वसूल केलेले हक्क कधींच कबूल करतेना; व करणार नाहींत. एवढ्याचकरितां कान्होजींचें हें करणें, कायदेशीर, बादशहाच्या सनदेप्रमाणेंच होतें, असें मानलें गेलें नसतें व पुढें त्यास कोणी हे हक्क वसूल करूं दिले नसते. तें न व्हावें एवढ्याचकरितां पातशाही सनद याबद्दलही पाहिजे होती. शिवाय गोंडवण वगैरे प्रांतांत कान्होजी भोंसले यांनीं ही सय्यदांकडे कलमबंदी येण्यापूर्वीं नुकताच मराठ्यांचा अंमल बसविला होता, असें जें डफचें * ह्मणणें आहे तेंहीं यामुळेंच बरोबर आहे.

हें शाहू महाराजांचें मागणें सय्यदांनीं बहुतेक मान्य केलें. परंतु त्याचा अखेरचा निकाल बादशहाकडून लागावयाचा होता. याबाबत सय्यदानें बादशहास लिहिलें; पण तें त्यानें कबूल केलें नाहीं. तेव्हां तें मान्य करून घेण्यास आणि बादशहा फिरूकशायर जो सय्यदांच्या कह्यांतून सुटून स्वतंत्र होऊं पहात होता, त्याला पुन्हां आपल्या कह्यांत आणण्याकरितां दक्षिणचा सुभेदार सय्यद हुसेन यानें आपल्या दक्षिणच्या सुभेदारीवर आपला पुतण्या आलमअली यास मागें ठेवून दिल्लीस जाण्याची तयारी केली, आणि लगेंच आपल्या बरोबर जी पन्नास हजार फौज आणि सरदार देण्याचें शाहू महाराजांनीं कबूल केलें होतें तें वचन फौज आणि सरदार पाठवून पुरें करावें असें त्यांस सांगून पाठविलें, त्याप्रमाणें शाहू महाराज यांनीं बाळाजी विश्वनाथ पेशवे याजबरोबर खंडेराव दाभाडे, उदाजी पवार, यांस जाण्याकरितां व कान्होजी भोंसले यांसहि आपल्या सैन्यासह येऊन मिळण्याकरतां हुकूम पाठविले. या प्रसंगीं कान्होजी भोंसले यांना हुकुमाप्रमाणें स्वारीवर जातां आलें नाहीं. यांचें खरें कारण काय असावें याचा कोठेंच उल्लेख नाहीं. पण हा शाहुमहाराजांचे गादीचा त्यांचेकडून पहिला अपराध झाला, असें

---

* Besids the Chouth & Surdeshmukhi of the six Soobhas of the Deccan,...........................The old districts in Carnatic were also demanded confirmation of some conquests lately made by Kanhojee Bhonslay the Sena Saheb in Gondwan & Berar.

*G. Duff. Vol. I Page 364.*

दिसतें. प्रत्येक सरदारांत आपण जिंकलेल्या प्रांतांत आपण स्वतंत्र असावें व पहिल्यानें आपल्या प्रांतांचा बंदोबस्त संभाळून नंतर जी छत्रपतीचे गादीची नोकरी करतां येईल ती करावी, अशा पद्धतीचें स्वातंत्र्याचें वारें जें खेळत होतें, असें जें न्या. रानडे ह्मणतात, त्याचाच हाही कान्होजीच्या या बाबतींत परिणाम असेल. या कारणाखेरीज कान्होजीला दुसरींही अपरिहार्य कारणें असतील, पण त्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. कान्होजी भोंसले ऐन वेळीं न आल्यामुळें त्यांचे चुलत बंधु संताजी व राणोजी भोंसले हेही आपल्या जमावानिशीं हुजुरांत मातबरीनें होते, त्यांस शेवटीं शाहु महाराजांनीं बाळाजी विश्वनाथ यांचे बरोबर दिलें. इ. स. १७१८ च्या आगष्ट महिन्यांत सय्यदाच्या मदतीकरितां पेशवे सर्व सैन्यासह निघाले, ते डिसेंबरच्या अखेरीस दिल्लीस पोंचले. पेशव्याच्या मदतीनें सय्यदांनीं बादशहाचा पराभव केला व त्याला ह्मणजे फिरुकशायर याला ठार करून त्याच्या ठिकाणीं रफी उद्दर्जात नांवाचा दुसरा बादशहा इ. स. १७१९ त बसविला. त्याचे कारकीर्दीत शाहूस दक्षिणेंतील सरदेशमुखी वगैरे अमलाविषयीं परवाने झाले होते; परंतु ते अमलांत न येतां सदरहु पादशहा क्षयरोग लागून लवकरच पांचच महिन्यांत मरण पावला. नंतर त्याचा भाऊ रफीउद्दवला याला सय्यद बंधूनीं तख्तावर बसविलें. परंतु तोही दोन महिन्यांत दिवंगत झाला. यामुळें बाळाजी विश्वनाथ यांचें, दुसरा पातशहा होईपर्यंत दिल्लीस सनदा वगैरे कार्याकरतां राहणें झालें. पुढें शहाल्लम याचा नातु रोशन एखत्यार यास महंमदशहा हें नांव देऊन सय्यद बंधूनीं दिल्लीच्या तख्तावर बसविलें. याच्या कारकीर्दीत मराठ्यांस चौथ सरदेशमुखीच्या सनदा व परवाने मिळाले. त्या वेळीं दिल्ली दरबारांत सय्यद बंधू प्रबळ झाल्यामुळें त्यांच्या-विरुद्ध एक पक्ष उत्पन्न झाला.

मागें पेशव्यांच्या बरोबर कान्होजी भोंसले यांचे चुलत बंधु संताजी व राणोजी भोंसले यांस शाहूनें दिल्लीस पाठविलें असें सांगितलें आहे. ते संताजी भोंसले दिल्लींत लढाईमध्यें मरण पावले. नंतर बाळाजी विश्वनाथ यांशीं आपण केलेले करार सर्व पुरे करून मराठे सरदारांस व फौजेस सय्यदांनीं दक्षिणेंत रवाना केलें. मदनसिंग व बायामंडळी जी पातशहानें ओलीस ठविली होती, त्या सर्वांची पेशव्याचे बरोबर रवानगी करून दिली. त्याप्रमाणें पेशवे हे सर्वांसह इ. स. १७१९ च्या जुलै महिन्यांत सातांऱ्यास परत आले.

बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीहून परत आल्यावर मागें तिकडे लवकरच घोंटाळा माजला. निजामउन्मुलुखास प्रथम इ० स० १७१३ त बादशहानें दक्षिणचा सुभेदार करून पाठविलें होतें. पुढें लवकरच त्याला परत बोलावून त्याच्या जागीं सय्यद बंधु हुसेनअल्ली यास पाठविण्यांत आलें. पुढें त्याची माळव्याच्या सुभेदारीवर इ० स० १७१८–१९ मध्यें नेमणूक झाली. परंतु तोही हलके हलके बादशाहीपासून स्वतंत्र होण्याची आणि पुनः दक्षिणची सुभेदारी पटकावण्याची संधी पहात होता. या वेळीं दक्षिणच्या सुभेदारीवर हसनअल्ली सय्यद याचा पुतण्या आलम अल्ली हा त्याच्या नांवानें अधिकार चालवीत होता.

' सय्यदांशीं तह करून शाहूचा दरारा वाढला, परंतु कोल्हापूरचे बाजूचे चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर, वगैरे सरदार जास्त जास्त प्रबळ होत चालले. त्यांनीं सय्यदांचा शत्रू जो निजाम उन्मुलुख माळव्याचा सुभेदार याचा पक्ष स्वीकारला. शाहु, बाळाजी विश्वनाथ, खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोंसले, चिमणाजी दामोदर, कान्होजी आंग्रे, व सय्यद बंधू असा एक पक्ष झाला व कोल्हापूरचा संभाजी, अमात्य, चंद्रसेन जाधव, निंबाळकर, चव्हाण व निजाम उन्मुलुख असा दुसरा पक्ष झाला. या दोन पक्षाची चढाओढ या वेळेपासून इ. स. १७१९-२० पर्यंत चालू होती. या दोन पक्षाचे मुख्य आणि त्यांचे अनुयायी मंडळ यांच्यांतही वेळप्रसंगीं या पक्षभेदाच्या कारणामुळें लहानमोठ्या चकमकी व लढाया होत होत्या.

निजाम उन्मुलुख याचे मनांत आपण स्वतंत्र व्हावें असें फार होतें. त्याची माळव्याच्या सुभेदारीवर नेमणूक झाली होती, परंतु तो दिल्लीस राहून माळव्याचा कारभार सय्यदाप्रमाणें आपल्या हस्तकाकडून चालवीत असे. सय्यदबंधूंचें व बादशहाचें वाकडें पडलें. त्यांच्या ताब्यांतून आपण सुटावें या खटपटींत बादशहा होता. ही संधी साधून यांतच आपला हेतु सिद्धीस नेण्याचा त्यानें निश्चय केला. तो एकदम दिल्लीहून निघाला तो माळव्यांतून नर्मदेवर आला. त्याच्याबरोबर सुमारें १२००० बारा हजार फौज होती. नर्मदा ओलांडल्याबरोबर दक्षिणची सुभेदारी मिळविण्याचा त्याचा हेतू प्रकट झाला. नर्मदा उतरून आल्यावर अशीरगडचा किल्ला त्यानें हस्तगत केला. आणि थोडक्याच दिवसांत त्यानें खानदेशही आपल्या ताब्यांत घेतला .याच वेळीं शाहू महाराजांवर रागाऊन गेलेले कोल्हापुरांकडील सर-

त्यांना जाऊन मिळण्या करतांलिहिलें. कान्होजी भोंसले हे त्या प्रांतांतील चांगले माहितगार होते; तेव्हां त्यांची मदत चांगली उपयोगी पडेल अशी त्यांची खात्री होती; आणि तें खरेंही पण होतें. शाहू महाराजांनीं वरील मोहिमेवर गेलेल्या सरदारांस कान्होजी भोंसले यांचे संबंधीं लिहिलें कीं ' जो मनसबा करणें तो विचारें करणें. उतावीळ न करणें. भागानगरकर मोंगल फौज तोलदार. सामान पुरा आहे. त्यांसी उतावीळ करून गांठी न घालणें, राजश्री () कानोजी भोंसले यांस सामील करून घेणें. राजश्री बाजीराऊ प्रधान यासही स्वामी रवाना तुह्मांकडे करीत आहेत. उतावळी न करणें. '' अशी ताकीद पत्रें पाठविलीं. त्याप्रमाणें कान्होजी भोंसले हे आपल्या फौजेची जमवाजमव करूं लागले.

निजामउन्मुल्क दिल्लीस वजीरीच्या कामावर गेल्यावर लवकरच त्याचें तेथें पटेनासें झालें. माळवा आणि गुजराथ येथील सुभेदाऱ्याही त्याला देण्यांत आल्या. त्या पतकरून तो उज्जनीस येऊन राहिला. त्यानें त्या प्रांतातील दंगेधोपे लवकरच मोडले. तें काम उरकून तो पुन॰ दिल्लीस गेला. परंतु बादशहा व त्याचे सल्लागार यांचें आणि निजामाचें पटेना, शेवटीं ' वकील-ई—मुतलक ' ही पदवी पतकरून त्यानें वजिराच्या जागेचा राजीनामा दिला. आणि नंतर इ. स. १७२३ च्या आक्टोबरांत शिकारीचें निमित्य करून तो दिल्लीहून दक्षिणच्या आपल्या सुभे-दारीवर निघून आला. त्यानंतर तो दिल्लीस परत केव्हांच गेला नाहीं. तो या वेळे-पासून स्वतंत्र झाला.

याप्रमाणें बादशहाशीं लबाडी करून निजाम दक्षिणेंत गेल्याचें कळल्याबरोबर बादशहानें हैदराबादचा मुबारीजखान यास " निजामास सुभेदारी देऊं नये, फौज जमवून लढाई करावी. निजामाची खोड मोडल्यास दक्षिणची सुभेदारी तुह्मांस मिळेल, '' अशी आंतून पत्रें पाठविलीं. त्यामुळें मुबारीजखानास उत्तेजन मिळून तो आपल्या प्रांताचा बंदोबस्त करून आणि फौज जमवून निजामाशीं सामना कर-ण्यास तयार झाला. बादशहानें निजामाचें वजन कमी व्हावें ह्मणून लगेंच माळव्याची व गुजराथची सुभेदारी जी त्याच्याकडे होती ती त्याच्याकडून काढून घेऊन त्या

() शाहुमहाराज यांची रोजनिशी पान २ रकाना ४।७

जागेवर दुसऱ्या सुभेदारांच्या नेमणुका केल्याचें जाहीर केलें. निजाम दिल्लीहून निघाला तो औरंगाबादेस येऊन पोहोंचला. तो या वेळीं बादशाही दरबारांत बंडखोर ह्मणूनच ठरला होता. आणि त्याच्याबरोबर लढाई करण्याकरतां मुबारीजखान याला बादशहाचा हुकूम आला होता. यामुळें दक्षिणेंत निजाम आणि बादशाही सुभेदार असे दोन पक्ष होऊन लढाई होण्याचा प्रसंग आला. जो या लढाईत विजयी होईल तो दक्षिणेचा सुभेदार होऊन मराठयांचें चौथ व सरदेशमुखीचे हक्क वसूल करून देईल. तेव्हां दोघांनाही मराठयांचे मदतीची जरूरी होती. किंवा त्यांनीं कोणऱ्याही पक्षास न मिळतां अलग रहावें अशीही उभयतांची इच्छा असणें गैर-वाजवी नव्हतें. दोन्हीही पक्षांकडे मराठे सरदार होतेच. चंद्रसेन जाधव, रावरंभा हे पूर्वीच निजामास जहागिरीच्या लालसेनें मिळाले होते. आणखी कोणी कदाचित् जहागिरीच्या आशेनें, स्वतंत्र होण्याच्या इच्छेनें किंवा अशाच प्रकारच्या अन्य कारणानें मिळतील कीं काय असें शाहू महाराजांस वाटणें सहाजिक होतें. यामुळें त्यांनीं, निजाम व शहामतखान यांचें युद्ध सुरू होण्याच्या सुमारास कान्होजी भोंसले यांस पत्र पाठवून कळविलें कीं, ' तुह्मीं आपले फौजेनिसी गाहा करून असणें. निजामउन्मुलुख व शाहामतखान यानें युद्ध आरंभिलें आहे. तरी तुह्मीं कोणाकडेही न जाणें. ' अशी जरी स्थिति होती, तरी निजाम मोठा वस्ताद होता. त्यानें आपलें धैर्य सोडलें नाहीं. त्याच्या पक्षालाही बरीच मंडळी होती. प्रथम त्यानें मुबारीजखानाशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यानें तो ऐकत नाहीं, असें पाहून व इकडे मराठ्यांशीं संधान ठेवून त्याचें कारस्थान जेव्हां पूर्णतेस आलें, तेव्हां त्यानें आपल्या फौजेसह हैदराबादेकडे कूच केलें. दोघांची इ. स. १७२४ च्या आक्टोबरांत साकरखेडलें येथें लढाई होऊन तींत मुबारीजखान मारला जाऊन त्याच्या फौजेचा नाश झाला, आणि बादशाही पक्षाविरुद्ध पुनः निजाम विजयी होऊन पूर्ण स्वतंत्र असा दक्षिणचा सुभेदार झाला. त्यानें यानंतर दिल्लीच्या तख्ताशीं विशेष संबंध ठेविला नाहीं.

निजामास यश मिळाल्यावर त्याचा पक्ष जोरावत चालला. इतक्यांत कान्होजी भोंसले निजामच्या फौजेवर चाल करून गेले. निजामानें त्यांच्यावर ऐवजखान यास पाठविलें. कान्होजी भोंसले आणि ऐवजखान यांच्या फौजेची बालाघाटांत लढाई झाली. ( इ. स. १७२५-२६ ). या लढाईत ऐवजखान याचे फौजेनें कान्होजी

भोंसले यांच्या फौजेस मार्गे रेटीत अलंद प्रांत बालाघाट येथें आणलें. कान्होजी भोंसले यांचे मदतीस चिमणाजी बल्लाळ यांस पाठविलें होतें; परंतु ते येऊन मिळण्यापूर्वीच ऐवजखानाच्या फौजेची व यांच्या फौजेची गांठ पडून लढाई झाल्यामुळें कान्होजी भोंसल्यांचा पराभव झाला. फत्तेसिंगराव भोंसले व नारोराम मंत्री यांस, कलबुर्गे प्रांतीं जाऊन प्रथम मिळावें, आणि नंतर सर्वांनीं मिळून कान्होजी भोंसले यांस सामील व्हावें व निजामाच्या फौजेशीं गांठ घालावी, अशी शाहु महाराजांनीं ताकीद दिली होती. परंतु या फौजा एकत्र होण्यापूर्वीच वरील प्रकार घडून आला. या पराभवामुळें कान्होजी भोंसले यांस फार वाईट वाटलें. कान्होजीस नंतर या फौजांची मदत येऊन मिळालेलें वर्तमान ऐवजखान याला कळतांच, जय मिळाल्यानंतर पराजिताच्या मुलखाची लूटमार व इतर अंमल प्रस्थापित करण्याची कामगिरी न करतां, तो मुकाट्यानें कान्होजीच्या मुलखांतून माघारा गेला. त्यामुळें त्याचा पाठलाग करून व त्याचेवर चढाई करून त्याचा उलट पराभव करण्यास कान्होजीस अवसर मिळाला नाहीं. या पराभवामुळें कान्होजी भासले यांची हिंमत खचूं नये ह्मणून त्याला शाहू महाराजांनीं पत्र लिहून त्यांना धीर व हिंमत दिली.

हा इकडे प्रकार झाल्यानंतर मराठ्यांनीं कर्नाटकांत भारी फौज पाठवून मोठी खळबळ उडवून दिली. ही मराठ्यांची कर्नाटकांतील पहिली स्वारी होय. ही इ. स. १७२५ च्या सप्टेंबरपासून इ. स. १७२६ जूनपर्यंत चालू होती. या स्वारींत कान्होजी भोंसले यांचा संबंध नसून त्यांचे चुलत बंधु बिंबाजी यांचा मुलगा रघोजी, जो कान्होजी भोंसलेनंतर सेनासाहेब सुभा झाला व ज्यानें नागपूरकर भोंसल्यांची गादी नागपुरीं स्थापन केली, त्याचा होता. या स्वारीचें थोडेंबहुत वर्णन पुढें रघोजीच्या प्रकरणीं येणार असल्यामुळें तें येथें देण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रांतांत मराठ्यांनीं गर्दी करून सोडल्यामुळें निजाम जरासा नरम येऊन मराठ्यांशीं तहाच्या गोष्टी बोलूं लागला, तेव्हां निजामाशीं चालू असलेली लढाई थोडी मंदावली. परंतु आंतून त्याचें दुसरें कारस्थान चालूं होतें. तो तहाच्या गोष्टी या वेळीं प्रतिनिधीच्या वगैरे मार्फत बोलूं लागला. तह पक्का झाला नव्हता. पण होणार असें वाटल्यावरून मराठ्यांच्या फौजा कांहीं परत स्वदेशीं आल्या. त्या वेळीं कान्होजी भोंसलेही साताऱ्यास आले. कारण शाहु महाराजांनीं त्यांस

दर्शनास येण्याकरतां लिहिलें होतें. शाहु महाराजांची व कान्होजी भोंसल्यांची भेट सातान्यास झाली. राणोजी भोंसले व रघोजी भोंसले हेही त्या वेळीं तेथें होते. बाळाजी विश्वनाथ यांचे कारकीर्दींत दिल्लीहून परत आल्यावर राणोजीच्या दिल्ली येथील पराक्रमाबद्दल शाहू महाराजांनीं त्यास निराळा सरंजाम व सरदारी कान्होजी भोंसल्यांच्या सरहद्दींत दिली होती. परंतु राणोजी भोंसले, रघोजी भोंसले आणि कान्होजी भोंसले यांचें पटत नव्हतें. रघोजी भोंसले तर त्यांना सोडून पूर्वींच सातान्यास आले होते. राणोजी भोंसले सातान्यास होतेच. त्यांच्या तक्रारी शाहू महाराजांच्या कानावर नेहमीं जात. या वेळीं कान्होजी हे सातान्यास आलेवर राणोजींनीं त्यांच्याविरुद्ध पुनः तक्रार केली.; यापूर्वीं बरींच वर्षे कान्होजी हे सातान्यास आले नव्हते. आतां ते समक्ष आल्यानंतर राणोजीचें व कान्होजीचें ह्मणणें स्वतः ऐकून घेऊन राणोजी व रघोजी यांस कोणच्या रीतीनें वागवावें याबद्दल दोन गोष्टी सांगून उभयतांचें समाधान करून शाहूनें कान्होजीस खालीलप्रमाणें आज्ञा केली.

‘ राजश्री कान्होजी भोंसले यांस आज्ञा केली ऐसाजे. तुह्मी स्वामीचे दर्शनास हुजूर आलेत. राजश्री राणोजी भोंसले हुजूर होते. त्यांस स्वामींनीं तुह्मां उभयतांचें समाधान करून सरंजामांची वांटणी करून दिले असे. बितपशील मसूरचे मुक्कामीं:—

राजेश्री बाळाजी पंडीत प्रधान यांचे विद्यमानें सरंजाम करार करून दिला आहे. त्या पैकीं दोन तक्षिमा तुह्मी व राजेश्री राणोजी व रघोजी भोंसले यास एक तक्षिम दिला. कलम १

हल्लीं प्रभव संवत्सरीं मार्गशीर्ष मासीं ( शके १६४८ इ. स. १७२६-२७ ) सातारियाचे मुक्कामीं स्वामींनीं हुजूरून सरंजाम दिला. त्यापैकीं तीन तक्षिमा तुह्मी व चौथाई राजश्री राणोजी भोंसले व रघोजी भोंसले यांस सरंजाम दिला. कलम १

येणेंप्रमाणें सरंजामाची वांटणी करून देऊन राजश्री राणोजी भोंसले यांस तुह्मां समागमें दिले असत. स्वामीचे आज्ञेप्रमाणें तुह्मीं मान्य करून स्वामीचे पायाची शपथ केलीत. या उपरी सदरहु वांटणीप्रमाणें सरंजाम त्यास चालविणें. ते व तुह्मीं एक विचारें वर्तोन स्वामीकार्य करणें. ते तुमचे महालांत दखल होणार

नाहींत. सरंजामाखेरीज परमुलुखांत खंडण्या घ्याल त्यापैकीं चौथाई सरदारीचा वांटा काढणें. बाकी ऐवज राहील तो तुमचे व राणोजी भोंसले ह्यांचे फौजेवर हुकूम वांटून घेत जाणें. राणोजी भोंसले व रघोजी भोंसले तुह्मां दिमतींत दिले असत. तुमचे विचारें स्वामीसेवा करतील. तुह्मीं त्यांचे चालवावयास अंतर न करणें. तुमचा दुमाला तुह्मीं करीत जाणें. सदरहु तहाप्रमाणें वर्तावयास उभयतांही अंतर न करणें. छ. ७ सवाल ( चें पत्र. १ ).

कान्होजी भोंसले यांस ज्याप्रमाणें वरील आज्ञापत्र शाहू महाराजांनीं राणोजी भोंसले व रघोजी भोंसले यांस वागविण्यासंबंधानें दिलें त्याचप्रमाणें राणोजी व रघोजी भोंसले यांनींही कान्होजी भोंसले यांच्याशीं कोणत्या प्रकारें वर्तावें याबद्दलही त्यांनीं त्यांस यानंतर सहा महिन्यांनीं आज्ञापत्र दिलें आहे. तें महत्वाचें असल्यानें साग्र खालीं दिलें आहे. हें आज्ञापत्र ह्मणजे राणोजी भोंसले यांस सरंजामाची दुसरी सनदच होय.

' स्वस्ति श्री राज्याभिषेक () शके ५३ प्लवंग नाम संवत्सरे जेष्ट शुद्ध नवमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस राजा शाहु छत्रपती स्वामी यांणीं राजमान्य राजेश्री राणोजी भोंसले यांसी आज्ञा केली ऐसीजे:—राजश्री कान्होजी भोंसले स्वामींच्या दर्शनास आले. तुह्मी हुजूर होतेत. त्यास तुह्मां उभयतांचें समाधान करून सरंजामाची वांटणी करून दिल्ही आहे. बितपशील:—

मसूरचे मुक्कामीं राजश्री बाळाजी पंडीत प्रधान यांचे विद्यमानें सरंजाम करार करून दिल्हा. त्यापैकीं दोन ताक्षिमा ( एक तक्षिम ) राजश्री कान्होजी भोंसले व एक तक्षिम तुह्मी व रघोजी भोंसले यांसी सरंजामः-

हल्लीं प्रभवनाम संवत्सरीं सातारियाचे मुक्कामीं स्वामींनीं हुजूरून सरंजाम दिल्हा आहे. त्यापैकीं तीन तक्षिमा राजश्री कान्होजी भोंसले बाकी चौथी तक्षिम तुह्मी व रघोजी भोंसले यांसी कलम १

येणेंप्रमाणें सरंजामाची वांटणी करून देऊन तुह्मांस रघोजी भोंसले देखील राजश्री कान्होजी भोंसले यांचेबरोबर दिल्हे आहे. तुह्मीं मान्य करून स्वामींच्या

() पेशवे दफ्तरांतील सनदा पत्रांतील माहिती. इति. संग्रह. पा. १८५-८६

पायाची शफत केलीत. या उपरी सदरहू वांटणीप्रमाणें तुह्मीं सरंजाम घेऊन कान्होजी भोंसले यांचे विचारें वर्तणूक करणें. तुह्मीं त्यांचे महालांत दखल न करणें ते तुमच्या महालांत दखलगिरी करणार नाहींत. सरंजाम खेरीज परमुलुखांत खंडण्या होतील, त्यापैकीं सरदारीं वांटा चौथाई काढून बाकी राहील त्यापैकीं तुमचे व त्यांचे फौजेवर हुकूम वांटून देतील. तुह्मी व रघोजी भोंसले, राजश्री कान्होजी भोंसले यांचेबरोबर राहोन एकविचारें स्वामीकार्य करणें. तुमचा मुक्काम कान्होजी भोंसले यांचेबरोबर होईल. तुह्मीं सदरहु लिहिल्याप्रमाणें वर्तणुक करणें. राजश्री कान्होजी भोंसले चालवावयास अंतर करणार नाहींत. जाणिजे." (इ.स. १७२७-२८).

याप्रमाणें कान्होजी भोंसले व राणोजी भोंसले यांचा आपसांतील सरंजाम संबंधाचा तंटा शाहु महाराजांनीं मिटवून व दोघांचेंही समाधान करून आणि त्यांच्याकडून स्वामीसेवा नीट करण्याबद्दल आपल्या पायाची शपथ त्यांच्याकडून घेववून त्यांस त्यांच्या सरंजामाच्या प्रदेशांत रवाना करून दिलें. (इ. स. १७२७). हे तंटे या वेळेपुरते मिटले गेले; ते कायमचे केव्हांच मिटले गेले नाहींत. कान्होजी भोंसले यांचेबरोबर राणोजी व रघोजी हेही या वेळीं वऱ्हाडांत आले असें दिसतें. कान्होजी भोंसले या आपल्या आप्त मंडळीस घेऊन वऱ्हाडांत पोंचल्यानंतर थोडक्याच दिवसांत पुनः निजाम आणि मराठे यांच्यांत लढाई होण्याचा प्रसंग आला. कर्नाटकांतील स्वारी संपून मराठे स्वदेशीं आले होते. मराठ्यांची वाढती सत्ता निजामाच्या पूर्ण अनुभवास येऊं लागली होती. तेव्हां त्यांच्यापासून दूर राहून त्यांच्यावर कायमचें दडपण ठेवण्याकरतां निजामानें औरंगाबाद शहर सोडून हैदराबाद हें आपलें मुख्य ठाणें केलें. तेथून कर्नाटकांत शिरून तिकडचा मराठ्यांचा उद्योग हाणून पाडण्याचा त्याचा उपक्रम होता. चौथाई सरदेशमुखीच्या निमित्तानें मराठे वाटेल तिकडे संचार करतात, तो त्रास मिटविण्याकरतां त्याबद्दल त्यांस रोख रक्कम देऊन आणि प्रतिनिधीस हाताशीं घेऊन बाजीरावास निस्तेज करण्याचा त्याचा बेत होता; कारण बाजीराव आणि प्रतिनिधी यांचें वांकडें पडलें होतें. आणि अशा रीतीनें मराठ्यांच्या दरबारांतील दुफळीचा फायदा घेऊन मराठ्यांची शक्ति दुबळी करण्याचा निजामाचा या कारस्थानांत अंतःस्थ व दूरदृष्टीचा घाट होता. हें जें प्रतिनिधीमार्फत शाहु महाराजांशीं त्याचें बोलणें चाललें होतें, तें यशस्वी झाल्यास प्रतिनिधीला त्यानें वऱ्हाडांत जहागीर देऊं केली होती. हा घाट बाजीरावास समजला. त्यानें हें

आपणास पसंत नाहीं असें शाहु महाराजांस कळविलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. हें तहाचें बोलणें व वाटाघाट इ. स. १७२६ च्या जूनपासून १७२७ च्या जून पावेतों चालली असावी.

शाहूच्या दरबारांतील या दुफळीचा फायदा घेऊन निजाम निरनिराळीं कारस्थानें करूं लागला. त्यानें कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरलें व त्याचे हस्तें शाहूबरोबर कलहाला नवीन तोंड फुटेल असा डाव टाकला. त्यामुळें शाहूस निजामाचा राग आला व त्यावर स्वारी करण्याकरतां बाजीरावास त्यानें पाठविलें. त्याचप्रमाणें बाजीरावाचे मदतीस सैन्यासह जाणेबद्दल कान्होजी भोंसले यांसही पत्र * रवाना झालें. बाजीरावानें पैठणच्या बाजूस पालखेडनजीक अत्यंत अडचणीच्या जागीं निजामास गांठून ता. २६ फेब्रुवारी सन १७२८ रोजीं लढाई दिली. या लढाईत निजामावर कठीण प्रसंग आल्यानें त्यानें ता. ६ मार्च सन १७२८ रोजीं बाजीरावाबरोबर मुंगी शेवगांवीं तह केला. या पालखेडच्या लढाईत कान्होजी भोंसले होते, परंतु बाजीरावांचे पराक्रमापुढें कान्होजीस जास्त पुढें येऊन आपली कामगिरी दाखविण्यास वाव न मिळाल्यामुळें या लढाईत कान्होजीचें नांव आलेलें दिसत नाहीं. त्यामुळें या वेळची त्याची कामगिरी समजण्यास मार्ग नाहीं.

ही लढाई होऊन तह झाल्यानंतर सर्व मराठे स्वदेशीं परत फिरले. या वेळीं कान्होजी भोंसले हेही सातार्‍यास शाहु महाराजांचे दर्शनाकरितां आले. त्यांच्या व शाहु महाराजांच्या भेटी झाल्या. या वेळीं कान्होजी भोंसल्यांचा सातार्‍यास बरास मुक्काम झाला ( इ. स. १७२८-२९ ). त्यांना वर्‍हाडांत जाऊन बरींच वर्षें झालीं होतीं. तिकडे ते स्वतंत्रपणें त्या प्रांताचे अधिकारी ‘ राजे ’ ह्मणून अठरा एकोणीस वर्षें कारभार करीत होते. एवढ्या काळांत त्यांच्यावर शाहु महाराजांची गैरमर्जी व्हावी असे प्रसंग थोडे फार आले होते. त्याचप्रमाणें राजी होण्याचेही कांहीं प्रसंग आलेच होते. कित्येक वेळां त्यांना जसें यश आलें होतें, तसे अपयश येण्याचेही प्रसंग आले होते. सारांश कान्होजी भोंसले यांची अठरा वर्षांतील वर्‍हाडांतील कामगिरी शाहु महाराजांची त्यांच्यावर पूर्ण गैरमर्जी होऊन त्यांना

* शाहु रोजनिशी पान १२, रकाना ३०.

' सेनासाहेब ' पदावरून काढून टाकण्यासारखी कांहीं झाली होती असें नाहीं. मात्र कान्होजी आंग्रे यांच्याप्रमाणें कान्होजी भोंसले यांच्या ठिकाणीं आपण आपल्या प्रदेशांत स्वतंत्र आहोंत, राजे आहोंत, आपला आणि साताऱ्च्या गादीचा संबंध आतां नांवचा राहिला आहे. अशी स्वतंत्रतेची दृढ भावना उत्पन्न झाली होती असें वाटतें. ही स्वतंत्रेची भावना उत्पन्न होऊन ती दृढ होण्यास राजधानीपासून त्यांचा प्रदेश लांब, दळणवळण त्या काळीं कमी, त्यामुळें आलेला तुटकपणा आणि पुष्कळ वर्षें बहुतेक अंशीं स्वतंत्रपणें कारभारांत गेल्यामुळें आपण स्वतंत्र आहों अशी झालेली भावना या कारणाची त्यांत भर पडली. अशामुळें आपण पूर्ण स्वतंत्र आहों, अशी त्यांची दृढभावना झाली होती असें वाटतें. कोणत्या का प्रकारें असेना पण त्यांच्या ' सेनासाहेब पदा ' वर गदा आली, एवढी मात्र गोष्ट खरी. त्याबाबत निरनिराळ्या ग्रंथकारांचीं निरनिराळीं मतें आहेत तीं अशीं:—

१ कान्होजी भोंसले सेनासाहेब सुभा यांना बरींच वर्षें संतती नव्हती. " संततीकरतां चिंता करीत असतां कांहींएक अनुष्ठानें शतचंड्या, कित्येक होमहवनें ब्राह्मणद्वारां व आपण जातीनें सोंवळें फारच करावें. ब्राह्मणाचे हातचें जेवावें असें चाललें असतां कान्होजीबोवास पुत्र जाहला. " † कान्होजीचा हा शुचिर्भूतपणाचा नित्यक्रम होता; व तो पुष्कळ वर्षें चालला होता. पुढें पुत्र झालेवर त्यांचा त्यावर दृढविश्वास बसणें स्वाभाविक होतें. त्यांचा तो सोंवळ्याचा उपक्रम पुढेंही तसाच चालला. साताऱ्यास आले किंवा कोठेंही गेले, तरी त्या नित्यक्रमांत अंतर पडण्याचे कांहींच कारण नव्हतें. त्याप्रमाणें ते लांब दूर देशीं असल्यामुळें त्यांच्या संबंधाची ही खासगी, अंतःस्थ बातमी शाहु महाराजांच्या कानांवर जाण्याचें कांहींच कारण नव्हतें. या वेळीं त्यांचा मुक्काम साताऱ्यास बरेच दिवस पडल्यामुळें, मोठ्या माणसांच्या बारीक सारिक गोष्टींसुद्धां राजांच्या कानावर जात असतात. त्याच प्रमाणें यांच्याही गोष्टी शाहुमहाराजांचे कानावर गेल्या.

नंतर कांहीं एक दिवसांनीं राजश्रीस समजलें कीं, कान्होजी ‡ भोंसले सोंवळें फार करतात. मराठ्यांचे हातचें जेवीत नाहींत. तें पहावें. ' हें महाराजांस कळल्यावर ही

† ना. भो. ब. पान २९

‡ ना. भों. बखर पान ३१

गोष्ट खरी किंवा खोटी याचें प्रत्यक्ष प्रमाण पहाण्याकरतां त्यांनीं एके दिवशीं राजवाड्यांत जेवावयास येण्याबद्दल शाहु महाराजांनीं आज्ञा केली. त्याचप्रमाणें रघोजी भोंसल्यांसही दिली. ' परंतु रघोजी बोवा अनमान न करतां भोजनास गेले. सेनासाहेबांनीं अनमान केला. परंतु आक्षेपामुळें राजश्रींचे ताटांत सेनासाहेबांस बसणें प्राप्त झालें. भोजन करून सेनासाहेब आपले बिन्हार्डीं येऊन बोटें घशांत घालून वमन केलें. हें वर्तमान राजश्रीस बातमीचे द्वारें समजलें. '

२ ' बाळाजी विश्वनाथ पेशवे यांजला दिल्लीस पेशजीं पाठविलें ते काळीं कान्होजी § भोंसले सेनासाहेब सुभा यांजला फौजेसुद्धां येण्याविषयीं लिहलें असतां प्रसंगास आले नाहींत. '

‡ ३ ' कान्होजी भोंसले यांनीं वऱ्हाड प्रांतीं बदफैलीवर जुलूम करून महाराजांसी बागी झाले. '

४ परसोजी भोंसले यांचे चिरंजीव कान्होजी भोंसले यांजला सेनासाहेब * सुभ्याचीं वस्त्रें देऊन वऱ्हाड प्रांतीं रवाना पेशजीं कांहींएक दिवस केलें होतें. तेव्हां ते वऱ्हाड प्रांतीं राहून होते. तों त्यांचे कारभाराची महाराजांचें मनांत विवृति होऊन बोलले जे " कान्होजी भोंसले यांजकडून सेनासाहेबी काढावी. त्यांस धरून आणावें. " वगैरः—

५ ' कान्होजी ● भोंसले यांनीं आज्ञा उल्लंघन केली म्हणून. '

६ ' नंतर पेशजीं हुकुमास उजूर झाला होता. सबब निमित्य ठेवून शिक्के कट्यारें मागावयास कान्होजी † भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडेस राजश्रींनीं पाठविलें. यानें आपले मनांत संशय मानिला कीं राजश्रींचे मनांत विक्षेप आला त्याअर्थीं येथें

---

§ ना. भों. ब. पान ३१.

‡ ना. भों. कागदपत्र लेखांक १, पान ३.

* ना. भों. कागदपत्र ले. २, पान ८.

● शाहु च. पान ६५.

† ना. भों. ब. पान ३१.

राहणें ठीक नाहीं. कूच करून निरोप न घेतां दर कूच कान्होजी भोंसले पळून आपले स्वस्थळास आले. '

७ ' कान्होजी ¶ भोंसले यांनीं महाराजांची अवज्ञा केली, सबब त्यास कैद करून रघूजीस पदाचीं वस्त्रें दिलीं.

' कान्होजी भोंसले सेनासाहेब सुभा यांनीं शाहु महाराजांच्या हुकमाची अमान्यता केली. ह्मणून त्यास सातार्‍यास कैद करून ठेवलें. आणि त्याच्या जागीं कान्होजीचा चुलत बंधु जो बिंबाजी त्याचा मुलगा रघूजी याची त्यांनीं नेमणूक केली. त्या वेळीं बाजीराव पेशवे तेथें नव्हते. '

कान्होजी भोंसले यांचेकडून सेनासाहेब सुभ्याचें पद शाहु महाराजांनीं काढिलें, यांबद्दल पांच निरनिराळ्या ग्रंथकारांनीं जीं कारणें दिलीं आहेत, त्या-खेरीज दुसरें एकादें यांहीपेक्षां जास्त महत्वाचें कारण कोठें असल्याचें दिसून येत नाहीं. या कारणांपैकीं मुख्य दोन कारणें आहेत; आणि एक धार्मिक स्वरूपाचें पण जातिविशिष्ट रूढी किंवा रिवाजाच्या स्वरूपाचें आहे. राजकीय स्वरूपाचीं कारणें आहेत, पण त्यापैकीं एक पुष्कळ वर्षांपूर्वीचें जुनें आहे. इ. स. १७१९ मध्यें ज्या वेळीं बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीस गेले, त्या वेळीं शाहू महाराजांचा हुकूम झाला असतां, कान्होजी भोंसले त्यांस सैन्यासह जाऊन मिळाले नाहींत. हें राजाज्ञाभंगाचें खरें व महत्वाचें कारण मनुष्य अपराधी ठरविण्याला योग्य असें आहे. परंतु या गोष्टीला पुष्कळ वर्षे झालीं होतीं. त्यानंतर कान्होजी भोंसल्यांनीं दोन तीन वेळेला निजामावर वगैरे जाऊन सातारच्या गादीची नोकरी बजाविली होती. या त्यांच्या कामगिरीमुळें पूर्वीचा आज्ञा—भंगाचा राग शाहु महाराजांचे मनांत राहिला असेल असेंच कांहीं निश्चयानें सांगतां येण्यासारखें नाहीं. परंतु साता-र्‍याला कान्होजींनीं भोजनोत्तर वमन केल्याची बातमी शाहू महाराजांस लागली व त्यांनीं त्या वेळीं त्यांची शिक्का कट्यार परत मागविली व ती त्यांनीं परत न करतां व वर्‍हाडांत परत जाण्याची आज्ञाही न मागतां ते जे निघून गेले; त्यामुळें शाहु महाराजांस आज्ञाभंग केल्याचा अपमान वाटला व त्यामुळेंच पुढें तें काम जास्त

---

¶ पेश. शका. खं. २, पान ७०.

विकोपाला गेलें. या आज्ञाभंगाच्या मुळाशीं वस्तुतः राजकारण नव्हतें; हा आज्ञाभंग जातिविशिष्ट रिवाजाच्या कारणाकरितां होता. ह्मणजे सरळ सांगावयाचें तर खासगी, घरगुती गोष्टीपैकीं होता. घरगुती कारणें हीं कित्येक वेळीं राजकारणापेक्षांही बिकट होतात, त्यापैकींच हें एक होतें. घरगुती कारणाकरतां शिक्का, कट्यार, परत मागविण्याचा हुकूम व त्या हुकुमाचा राजकारणाशीं कांहीं संबंध नाहीं असे मानणारे कान्होजी भोंसले; अर्थात शाहु महाराज व कान्होजी यांचा दृष्टीकोन निरनिराळा झाल्याबरोबर सहाजिक त्याला राजकारणाचें स्वरूप आलें. शिवाय खाजगी कारण का होईना त्यांत छत्रपतीचा आज्ञाभंग आपण करीत आहोंत हा विचार स्वतंत्रपणाचें वारें कानांत भरलेल्या कान्होजीला त्या वेळीं कोठून सुचणार ! त्याचे समजुतीनें ते वऱ्हाडांत आले. शाहु महाराजांच्या समजुतीप्रमाणें त्यांनीं आपण छत्रपती असतां आपला आज्ञाभंग केला असें वाटून त्यांनीं रघोजी भोंसले यांस 'सेनासाहेब सुभा' हें पद देऊन वऱ्हाडांत पाठविलें. येथें कान्होजी भोंसले यांची कारकीर्द संपली. यापुढें नागपूरकर भोंसले यांच्या शाखेच्या मूळ पुरुषाची हकिकत सुरू झाली. हेच रघोजी भोंसले नागपूरकर भोसल्यांचे गादीचे संस्थापक. यांनींच नागपूरकर भोंसल्यांची गादी नागपुरीं स्थापन केली. यासंबंधीं पहिले रघोजीपासून पुढें राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले यांचेपर्यंत केवळ संगतवार नागपूरकर भोंसल्यांची माहिती कळण्यापुरतांच संक्षिप्त इतिहास पुढील प्रकरणीं देत आहोंत.

## प्रकरण ४ थें.

# नागपूरकर भोंसले.

१ पहिला रघोजी:—रघोजी भोंसले यांची जन्मकथा पहिल्या प्रकरणीं आलीच आहे. बापूजी भोंसले यांचे पुत्र बिंबाजी यांचे हे चिरंजीव. पांडववाडीस असतांना श्रीरघुवीराच्या प्रसादानें हे जन्माला आले, ह्मणून यांचें नांव रघोजी ठेवण्यांत आलें. पुढें ते थोडे मोठे झाल्यानंतर कान्होजी भोंसले यांस पुत्र संतान नव्हतें ह्मणून त्यांनीं रघोजीस आपले जवळ आणून ठेवलें; त्या वेळीं रघोजी हे पांडववाडीस साबाजी भोंसले यांची स्त्री रमाबाई ह्मणजे रघोजींची चुलत आजी, त्यांस संतान नसल्यामुळें व बालपणापासून रघोजींस त्यांचाच लळा असल्यामुळें त्यांचेजवळ होते. तेथें त्यांचें बालपण गेलें. पुढें त्यांच्या बाराव्या वर्षी ह्मणजे क्षत्रिय घराण्याचें शिक्षण घेण्यासारखें त्यांचें वय झाल्यावर कान्होजी भोंसले यांनीं ह्मणजे त्यांच्या ( रघोजीच्या ) चुलत चुलत्यांनीं त्यांना वऱ्हाडांत नेलें. कान्होजीसही संतान नसल्यामुळें ते रघोजीवर मुलाप्रमाणें प्रेम करूं लागले. कान्होजी भोंसल्यांनीं रघोजीस शिक्षण मिळावें व आपल्यामागें आपलें नांव त्यानें राखावें ह्मणून त्यांच्या ताब्यांत पागा वगैरेचा कारभार त्यांनीं सोंपविला. त्यांनीं त्यांना शिकारीचेंहि शिक्षण दिलें. अशा प्रकारें आपल्या पुत्राप्रमाणें रघोजीचा सांभाळ चालविला असतां कान्होजी भोंसले यांस रामाजी नांवाचा पुत्र झाला. हा रामाजी जसजसा मोठा होऊं लागला, तशतशी कान्होजीची रघोजीवरील माया पातळ होऊं लागली. त्यामुळें अर्थातच रघोजीकडे त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें. रघोजीची काकी, कान्होजींची पत्नी, त्यांचेंही रघोजीवरून लक्ष उडालें. रामाजी आपला व रघोजी दुसऱ्याचा अशा प्रकारची वृत्ति त्यांच्या वर्तनांत रघोजीच्या नजरेस येऊं लागली. त्यामुळें त्यांची अनास्था होऊं लागणें स्वाभाविक होतें. पहिल्यानें प्रेमानें वागवून नंतर अनास्था होऊं लागली ह्मणजे त्या मनुष्याच्या अंतःकरणाला फार यातना

होऊं लागतात. मन उदास होतें. त्या ठिकाणीं राहूं नये अशी मनोदेवता साक्ष देऊं लागते. त्याचप्रमाणें रघोजींची स्थिति झाली. त्यांचें मन कान्होजी भोंसले यांचेजवळ इत:पर राहण्यास तयार होईना.

नंतर त्यांनीं एक दिवस दुसरीकडे आपणाला कोठेंही स्वतंत्र तऱ्हेनें नोकरी करून का होईना, पोट भरतां येईल या विचारानं त्यांनीं आपल्या हाताखालच्या शंभर स्वारांस बरोबर घेऊन भाम गांव सोडलें. तेथून ते कुच करीत देवगडचे राजे चांद सुलतान यांजकडे नोकरी करण्याचे उद्देशानें आले. चांद सुलतान यानें रघोजीला मोठ्या सन्मानानें ठेवून घेतलें. आपल्या स्वत:च्या मुलाप्रमाणेंच चांद सुलतानानें रघोजीस वागविलें. तेथें रघोजीनें राहून चांद सुलतान व त्यांची पत्नी या उभयतांचाही मोठा लोभ संपादन केला. तेथें कांहीं वर्षे राहिल्यानंतर ते एलीचपूरला तेथील सुभ्यांच्याकडे आले. तेथेंही त्यांचें सुभ्यांनीं मोठें आगतस्वागत केलें. रघोजी मोठे देखणे, पाणीदार, तरतरीत, मिष्ठ भाषणी आणि कर्तबगार असल्यानें ते जेथें जात, तेथें त्यांचें स्वागत उत्तम तऱ्हेनें होत असे. एलीचपूर येथें कांहीं दिवस राहिल्यानंतर ते साताऱ्यास येऊन शाहु महाराजांपाशीं राहिले. रघोजी यांचा रामाजीपंत कोल्हटकर यांनीं शाहुमहाराजांजवळ चांगलाच परिचय पूर्वी करून दिला होता. शिवाय रघोजींचें आजोबा बापूजी भोंसले यांनीं शाहू तोतया नव्हे ह्मणून ठरविण्यामध्यें शाहू महाराजांस मोठी मदत केली होती. या सर्व गोष्टींमुळें रघोजींस शाहुमहाराजांनीं आपलें जवळ केलें. तेथें रघोजीनें शाहु महाराजांची व गोविंद खंडेराव चिटणीस यांची चांगली मर्जी संपादन केली. त्याचप्रमाणें रघोजीची हुषारी व तरतरी पाहून फत्तेसिंग भोंसले यांचीही त्यांचेवर चांगलीच मर्जी बसली.

पुढें कर्नाटकच्या स्वारीवर फत्तेसिंग भोंसल्यांबरोबर रघोजींसही पाठविण्यांत आलें. या निजामाबरोबरील लढाईत फत्तेसिंग भोंसल्याबरोबर रघोजीनेंही मोठा पराक्रम करून नांव कमाविलें. या कर्नाटकच्या लढाईवरून परत आले नंतर रघोजीचा पराक्रम ऐकून शाहु महाराज फार खुष झाले. पुढें पुढें तर शाहुमहाराज त्यांना आपलेबरोबर वाघाचे शिकारीलाही नेऊं लागले. शाहु महाराजांस वाघाच्या शिकारीचा फार नाद असे. शिकारीचे कामाला माणसें मोठीं चपल व धीट अशी लागतात. रघोजींनाही वऱ्हाडांत असतांना शिकारीचें शिक्षण मिळालें होतें; ह्मणून शाहुमहाराजांच्या शिकारींत ते उत्तम काम दाखवूं लागले. एके दिवशीं नित्याप्रमाणेंच

वाघाचे शिकारीला रघोजींस घेऊन शाहु महाराज गेले असतां शाहू महाराजांचे पालकीवर वाघानें अचानक झडप घातली. ती जंगलांतील जागा अगदीं अडचणीची अशी होती. इकडे तिकडे जाण्यास मार्ग नव्हता. रघोजीमात्र घोड्यावर बसून पालकीचे मागून येत होते. वाघाचा घाला पालकीवर आल्याबरोबर रघोजींस वाटलें कीं आतां तो वाघ शाहु महाराजांची शिकार करणार; इतक्यांत त्यांनीं घोड्यावरून उडी मारली व आपल्या कमरेचा पट्टा काढून तो एका क्षणांत वाघावर चालविला. त्यामुळें वाघ तत्काळ ठार झाला व खालीं पडला हें रघोजीचें पराक्रमाचें व धाडसाचें कृत्य शाहु महाराजांनीं पाहून त्यास मोठा आनंद झाला. रघोजीमुळेंच आज आपले प्राण वांचले असें त्यांस वाटलें व त्या वेळेपासून ते रघोजीकडे निराळ्या दृष्टीनें पाहूं लागले. नंतर त्यांनीं रघोजीचें आपल्या धाकट्या राणीच्या ह्मणजे सकवार राणीसाहेबांच्या चुलत बहिणीशीं ह्मणजे सुळाबाईशीं ( सरलाबाईशीं ) लग्न करून दिलें. या दिवसापासून शाहु महाराज व रघोजी हे साडु भाऊ झाले. दिवसेंदिवस रघोजीच्या गुणामुळें ते शाहूस फार प्रिय झाले. रघोजीस कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें पुढें आणण्याची त्यांची खटपट सुरू झाली.

याच वेळीं मागील प्रकरणांत नमूद केल्याप्रमाणें कान्होजी भोंसल्यांवर शाहु महाराजांची इतराजी झाली. तेव्हा त्यांचे ‘ सेनासाहेब सुभा ’ या पदावर रघोजींची योजना करण्याचें शाहू महाराजांनीं ठरविलें.

गरम दूध पितांना तोंड पोळलें असलें ह्मणजे ताक पिण्याचे वेळींही तें फुंकून पिण्याची मनुष्याला सावधगिरी ठेवावी लागते, तशी खबरदारी रघोजींची ‘ सेनासाहेब सुभा ’ पदावर नेमणूक करण्याच्या बाबतींत शाहूनें घेतली कान्होजी भोंसले सेनासाहेब सुभा होऊन वऱ्हाडांत गेले, तेव्हां त्यांना स्वतंत्र होण्याची व राहण्याची इच्छा झाली. त्यांना आपण आपल्या मुलखांत स्वतंत्र आहोंत, राजे आहोंत. असें वाटूं लागलें. तेव्हां रघोजी भोंसले आज आपल्या तंत्रानें वागणार आहेत, उद्यां त्यांनाही आपण स्वतंत्र आहोंत असें वाटूं लागेल. स्वतंत्रता कोणाला नको ? तेव्हां कान्होजीच्या बाबतींत जी चूक झाली, ती न व्हावी ह्मणून रघोजीला ‘ सेनासाहेब ’ पद देऊन पाठविण्याचे अगोदर त्याला जेवढ्या तऱ्हेनें बांधून व गुंतून ठेवतां येईल तवढें ठेवून घेण्याचा शाहूनें प्रयत्न केला.

एकदां मनुष्य दूर देशीं गेलें व त्या नवीन ठिकाणीं त्याची ओळख पाळख होऊन तेथें तो घरदार करून कायम झाला, ह्मणजे त्याला त्याच्या पूर्वीच्या घराची आठवण होत नाहींशी होते. ह्मणून शाहू महाराजांनीं रघोजींचा दक्षिणेतील संबंध सुटूं नये व त्याचें दक्षिणेंत वर्षा दोन वर्षांनीं तरी अवश्य येणें व्हावें, यासाठीं त्याला त्यांनीं वऱ्हाडांत सडेंच पाठविण्याची युक्ती काढली. कारण साताऱ्याहून वऱ्हाडांत गेल्यावर कान्होजी हे १०।१२ वर्षें साताऱ्यास आले नव्हते. त्यामुळें त्यांना साताऱ्याचा व आपला कांहींच संबंध नाहीं असें वाटूं लागलें होतें. तें रघोजींस न वाटावें व त्यांचें दक्षिणेंत वरचेवर येणें व्हावें ह्मणून रघोजींच्या कुटुंबांतील मंडळी त्यांनीं बरोबर नेऊं नये, ही पहिली शर्त शाहूनें घातली. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे जवळ जवळ रघोजीच्या कुटुंबांतील मंडळीस शाहूनें ओलीस ठेवून घेतलें असें ह्मटल्यास हरकत नाहीं. घरचे मंडळीस भेटण्याकरतां तरी रघोजी दक्षिणेंत येत राहील, एवढाच त्यांचा हेतू आणि एवढ्याकारितांच त्यांनीं सातारा जिल्ह्यांतील 'देऊर' गांव त्यांच्या कुटुंबाच्या संरक्षणाकरतां ह्मणून इनाम करून दिलें. त्या ठिकाणीं रघोजीनें वऱ्हाडांत जाणेचे अगोदर आपल्या कुटुंबांतील मंडळीस ठेवावें, व सडें पुढें जावें. अशी अट त्यांना शाहूनें घातली. ती त्यांनीं मान्य केल्यावर प्रसंगाचे वेळीं १५ हजार फौज घेऊन मदतीस यावें व दर साल दहा लाख रुपये वसूल द्यावा.' ही दुसरी अट शाहूकडून घालण्यांत आली. ही दुसरीही अट रघोजीनें कबूल केली. या दुसऱ्या अटीबद्दल रघोजीकडून जामीन घेण्यांत आला. कान्होजीच्या गैरहुकुमी वागणुकीचाच हाही परिणाम होय. रामाजीपंत कोल्हटकर यांचे पुत्र कोन्हेरराम ज्यांना शाहु महाराजांनीं आपले जांवई ह्मणून मानलें होतें ते रघोजींच्याबद्दल जामीन राहिले. शिवाय एकट्या रघोजीवर विश्वास ठेवणें बरें नाहीं ह्मणून त्यांनीं त्यांचेबरोबर खालीलप्रमाणें मंत्रिमंडळ बनवून रवाना केलें. भावार्थ एवढाच कीं कान्होजीप्रमाणें रघोजी यांनीं वऱ्हाडांत जाऊन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न न करावा. त्या वेळीं निजामचीं वगैरे उदाहरणें प्रत्यक्ष होतीं ह्मणून शाहुमहाराजांनीं एवढी दक्षता घेतली. रघोजीबरोबर दिलेलें मंत्रीमंडळ खालील प्रमाणें होतें.

१ कोन्हेरराम कोल्हटकर, दिवाण ह्मणजे पंत अमात्य.

२ भास्करराम कोल्हटकर कोन्हेररामांचे बंधु. यांस बक्षीचें काम ह्मणजे कुल फौजेचे मुखत्यार ह्मणजे सेनापतीचा अधिकार.

३ रखमाजी गणेश परभु हे गोविंद खंडेराव चिटणवीस यांचे मामेभाऊ यांस मुख्य चिटणवीस नेमण्यांत आलें.

४ रघुनाथभट पटवर्धन झिपरे शिक्केनवीस यांचेतर्फे अनंतभट चितळे, आणि रघुनाथ पुरी, व दत्त पुरी गोसावी सावकार या त्रिवर्गांची खातरजमा कोन्हेरराम यांनीं दिल्यावरून त्यांची नेमणूक झाली.

यांशिवाय कित्येक सरदार, मुत्सद्दी मंडळी रघोजिबरोबर दिली व त्यांस वऱ्हाडांत रवाना केलें. ( इ. स. १७२९ ).

शाहु महाराजांनीं रघोजी भोंसल्यांस कान्होजी भोंसल्यांना जे अधिकार होते, ते सर्व देऊन शिवाय बंगालवर आक्रमण करण्याचाही हुकूम दिला होता. रघोजी पुन्हां वऱ्हाडांत आलेवर त्यांनीं वऱ्हाड, गोंडवण वगैरे ठिकाणीं आपला चागलाच दरारा बसविला. इ. स. १७३८ मध्यें देवगडचा राजा चांद सुलतान हा मरण पावला. त्या वेळीं त्याच्या औरस मुलांत व दासी पुत्रांत कलह सुरू झाला. दासीपुत्र वालीशाहा यानें राजकुमार मीरशहा याला जिवें मारलें पण त्याला गादी पटकवितां आली नाहीं. कारण राणी रतनकुंवर हिनें आपले पुत्र बुरानशहा व अकबर शहा यांच्या रक्षणाकरितां ( पूर्वी रघोजी भोंसले देवगडास येऊन राहिल्यामुळें परिचित होते ह्मणून ) रघोजी भोंसले यांची कुमक मागितली. त्याबरोबर रघोजी भोंसले आपल्या सेनेसह देवगडास आले. त्यांची व वालीशाहाची लढाई होऊन त्यांत वालीशहा मारला गेला. याप्रमाणें राणी रतनकुंवरला व तिचे उभय पुत्रांना रघोजीनें वालीशाहाच्या संकटांतून सोडविलें. त्यामुळें अर्थातच राणीस फार आनंद झाला. तेव्हांपासून राणी रतनकुंवरनें रघोजीस आपला तिसरा मुलगा असें मानलें. तिनें आपल्या राज्याचे बरोबर तीन हिस्से केले. पैकीं दोन हिस्से आपल्या दोन मुलांस देऊन तिसरा हिस्सा तिनें रघोजीस दिला. पुढें कांहीं वर्षांनीं या दोन भावांमध्यें ह्मणजे बुऱ्हाणशहा अकबरशहा यांचेमध्यें तंटे उत्पन्न होऊन रणें माजलीं. त्या वेळीं बुऱ्हाणशहानें रघोजीची मदत मागितली. रघोजीची व अकबर शहाची लढाई होऊन त्या लढाईत अकबरशाहा मारला गेला. व त्यामुळें भावांतील तंट्याची इतिश्री झाली. बुऱ्हाणशहानें रघोजीच्या या मदतीबद्दल अकबरशहाच्या वांट्याच्या राज्याचा हिस्सा रघोजीस दिला.

याप्रमाणें रघोजी भोंसले ' सेनासाहेब सुभा ' हें पद मिळवून आपल्या सर्व लवाजम्यानिशीं साताऱ्याहून निघाले ते घाटावर जालन्याच्या मैदानांत आले. तेथून लाखणवाड्याचा घांट उतरून बाळापुर गांवास आले. तेथें त्यांनीं कांहीं फौज ठेविली. नंतर आपल्या समागमें तीस हजार फौज घेऊन ते वऱ्हाडांत खंडण्या वसूल करूं लागले.

कान्होजी भोंसले साताऱ्याहून श्री शाहुमहाराजांची इतराजी झालेनंतर वऱ्हाडांत भाम गांवीं आले. त्यांना आपल्यावर मोठें संकट ओढवणार याची कल्पना होतीच, ह्मणून त्यांनीं तेथें आलेवर मोंगलांचा आश्रय केला होता. रघोजी तीस हजार सैन्यासह वऱ्हाडांत येऊन खंडण्या वसूल करूं लागला व आपला अंमल बसवूं लागला, ही बातमी कान्होजी भोंसले यांना समजली. समशेर बहाद्दर कृष्णाजी आठोळे हेही आपल्या चार हजार फौजेनिशीं रघोजी भोंसले यांना मिळाले, तेव्हां त्यांचेबरोबर सामना देण्याची परिस्थिती कान्होजी भोंसले यांची त्या वेळीं नव्हती. रघोजीच्या सैन्याचा मोर्चा भामकडे येत आहे, हें पाहून कान्होजी भोंसले भाम सोडून आपल्या सैन्यानिशीं वर्धा नदी ओलांडून पलीकडे गेले. रघोजीनेंहि त्यांचे सैन्याचा पाठलाग चालविला. रघोजीचे सैन्यानें कान्होजीचे सैन्याची दाणादाण उडवून दिली. शेवटीं वणीनजीक रघोजीनें कान्होजी भोंसले यांचे सैन्याच्या पराभव करून त्यांस पकडून कैद केलें. नंतर त्यांना घेऊन ते वऱ्हाडांत आले. भाम गांवीं नवीन सेनासाहेब सुभा या दृष्टीनें रघोजी भोंसले यांनीं रीतसर आपल्या मर्जीप्रमाणें आपला जम बसविला. अधिकार परत्वें बरोबर आणलेल्या सर्व नवीन दरबारी मंडळीची व्यवस्था लाविली व कान्होजी भोंसले यांना बरोबर घेऊन ते साताऱ्याला आले. त्यांनीं त्यांना शाहुमहाराजांचे स्वाधीन केलें. तेथें त्यांचे कैदेंत कान्होजी भोंसले हे मरेपर्यंत होते कान्होजी भोंसले यांची यानंतरची हकीकत व त्यांचे वंशजांची हकीकत यांचा संबंध नागपूरकर भोंसल्यांच्या इतिहासाशीं येत नसल्यामुळें तो येथें देण्याची अवश्यकता नाहीं. अन्य ठिकाणीं देण्याचा योग आल्यास तेथें या हकीकतीचा विस्तारपूर्वक विचार करावयाला ठीक पडेल.

कान्होजी भोंसले यांना साताऱ्यास पोंचवून रघोजी भोंसले पुन्हां भाम गांवीं आले. सेनासाहेब सुभ्याची गादी भाम येथेंच कान्होजी भोंसल्याप्रमाणें रघोजी भोंसले यांनीं ठेविली होती. पुढें ती कांहीं दिवसांनीं नागपुरी नेण्यांत आली.

रघोजीनें इ. स. १७४५ सालीं नागपुरीं आपली स्वतंत्र गादी स्थापन केली, तेव्हांपासून हे हिंगणीकर भोंसले नागपूरकर झाले. या वेळेपासून यांच्या वंशजांस नागपूरकर भोंसले असें संबोधूं लागले. नागपूर हें पूर्वीं गोंडाचें राज्य होतें. त्यांच्या भावांचे आपसांतील कलहामुळें ' भोंसले राजे ' नागपूरच्या गादीचे खरे राजे झाले.

गोंडवण प्रांतांतील गोंड राजाच्या राज्यापैकीं रघोजी भोंसले यांच्या वांट्याला दोन तृतियांश भाग आला. त्यामध्यें नागपूर हें शहर त्यांच्या हिश्श्याला आलें. तेव्हां या प्रांतांचा बंदोबस्त भाम या गांवीं आपली गादी ठेवून होण्यासारखा नव्हता म्हणून रघोजी भोंसले यांनीं आपली गादी भामहून उचलून नागपुरीं आणली, अशी कल्पना येते. पण त्यापेक्षां नागपुरीं गादी आणण्यांत रघोजीचा दुसरा हेतू होता. रघोजी ज्या वेळीं साताऱ्याहून निघाला त्या वेळीं त्याला वऱ्हाड, गोंडवण, चांदा वगैरे प्रांतांच्या चौथ, सरदेशमुखी, घांसदाणा वगैरे खंडण्या गोळा करण्याचा हक्क मिळालाच होता. या हक्कांची अंमलबजावणी त्याला आपली भाम गांवची राजधानी कायम ठेवून करतां येण्यासारखी होती. परंतु रघोजीची दृष्टि एवढ्यापुरतीच नव्हती. कान्होजी भोंसले यांचे कर्तबगारीनें त्या प्रांतीं मराठ्यांचा चांगलाच अंमल बसला होता. तेव्हां या तीन प्रांतांचा बंदोबस्त करणें रघोजीला आपल्या कामगिरीला फारच कोतें असें क्षेत्र वाटत होतें. त्यानें बंगाल्यावर आक्रमण करण्याचा शाहु महाराजांकडून निराळा हुकूम घेतला होता. या वेळपर्यंत मराठ्यांच्या अंमलाची मजल बंगालपर्यंत गेली नव्हती; म्हणून त्या देशाची मोकळीक रघोजीनें मुद्दाम करून घेतली होती. तेव्हां ओडिसा, बंगाल आक्रमण्याला व त्या ठिकाणीं अंमल बसविण्याला भामपेक्षां नागपूर हेंच ठिकाण मध्यवर्ति बसतें; म्हणून त्यानें भाम येथील गादी उठवून नागपुरीं आणली. नागपुरीं रघोजीनें गादी स्थापन केल्यानंतर बंगाल्याशीं त्याचा संबंध जवळचा आला व त्यामुळेंच नागपूरकर भोंसल्यांचा राज्यविस्तार पुढें पूर्वेच्या बाजूस बंगाल्याकडे होऊं लागला. बंगाल्यावरील स्वाऱ्यामुळेंच नागपूरकर भोंसले बलाढ्य व सधन बनले व त्यांचें वैभवही वाढलें. भामहून गादी काढून नागपुरीं स्वतंत्र गादी स्थापण्यांत रघोजी भोंसले यांची ही दूरदृष्टि होती. इतरही अनेक कारणें आहेत, परंतु या एकाच अत्यंत महत्वाच्या कारणापुढें त्यांची कांहींच मातब्बरी नसल्यामुळें तीं एथें देण्याची जरूर नाहीं.

खरें पाहिलें असतां नागपूरकर भोंसले यांची पूर्वपीठिका येथेंच संपली. आतां आह्मी यापुढें आमच्या चरित्र-नायकाचा ज्या विशिष्ट नागपूरकर भोंसले घराण्याशीं संबंध येतो, त्याचाच येथें संक्षेपतः विचार करीत आहोंत.

बाजीराव पेशवे इ. स. १७४० सालीं दिवंगत झाले. त्यांचेनंतर पेशवाईचीं वस्त्रें बाजीरावाचे मुलाकडे न देतां तीं बापूजी नाईक बारामतीकर यांस द्यावीं; या मताचे रघोजी भोंसले होते. कारण, पेशवे हे मराठी साम्राज्याचे मुख्य आधारस्तंभ. त्यांचेवर सर्व मराठेशाहीचा भार. तेव्हां तें पद वंशपरंपरेनें न चालवितां त्या पदाला जो लायक मनुष्य दिसेल, त्याला तें देण्यांत यावें, असें रघोजीचें मत होतें. या रघोजीच्या मतास फत्तेसिंग भोंसले वगैरे अनुकूल होते. परंतु शाहु महाराजांनीं कोणाचेंच न ऐकतां नानासाहेबांस ह्मणजे बाजीरावाचे मुलास पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. यामुळें रघोजीस सहाजीकच वाईट वाटलें व तेव्हांपासून रघोजी भोंसले व पेशवे यांचे मनोमन वितुष्ट आलें. या वितुष्टपणाचा परिणाम असा झाला कीं, शाहुमहाराज इ. स. १७४९ त कालवश होण्याच्यापूर्वीं त्यांना संतति नसल्यामुळें गादीला अधिकारी करण्याकरितां दत्तक घेणें अवश्य होतें. शाहूच्या मनांतून रघोजीचा मुलगा मुधोजी याला दत्तक घेण्याचें होतें. एकतर नागपूरकर भोंसले हे जवळचे गोत्रज व दुसरें ह्मणजे मुधोजी हा शाहुमहाराजांच्या मेहुणीचाच मुलगा. तेव्हां हा दत्तक जवळ जवळ घरचाच होता. परंतु ही गोष्ट पेशव्यास समजतांच त्याला रघोजीचा मुलगा साताऱ्च्या गादीवर येणें प्रशस्त वाटलें नाहीं. कारण रघोजी भोंसले अगोदरच नानासाहेब पेशव्याचे विरुद्ध व त्यींत त्यांचा मुलगा साताऱ्च्या गादीवर आला ह्मणजे आपलें कदाचित अस्तित्वच राहाणार नाहीं अशी भीति नानासाहेब यांस वाटली. त्यांनीं आपली मुत्सद्देगिरी लढवून व ताराबाईस हाताशीं धरून रघोजीचा मुलगा दत्तक घेण्याचें रहित केलें व ताराबाईच्या रहस्यमय नातवास दत्तक देवविलें. यामुळें रघोजीचा मुलगा साताऱ्च्या गादीवर दत्तक होऊं शकला नाहीं. ह्मणून पेशव्यांच्याबद्दल रघोजीच्या रागांत भर पडली. रघोजी भोंसले, फत्तेसिंग भोंसले, प्रतिनिधी या तिघांचीं खलबतें पेशव्याविरुद्ध होत. तेव्हां रघोजी गैरसावध आहे असें पाहून पेशव्यांनीं त्याच्या मुलखांत शिरून त्याच्याशीं लढाई केली व रघोजीचा पराभव केला. पुढें पेशवे स्वारीकरितां उत्तरेकडे निघाले कीं त्यांना रघोजीनें मागें हांकलून पिटाळून लावावें, असें चाललें, शेवटीं हें

आपसांत बरें नव्हे, असें पाहून दोघांमध्यें त्यांनीं तह घडवून आणला. त्यामध्यें पेशव्यांनीं रघोजीच्या मुलखांत जाऊं नये व बंगाल्याशीं पेशव्यांनीं संबंध ठेवूं नये असें ठरविलें. रघोजी हा पेशव्यांस अगदीं मानत नसे. या तहामुळें रघोजी बहुतेक स्वतंत्रच झाला होता. रघोजीनें बंगाल्यावर भास्करराम व कोन्हरराम यांचे मदतीनें स्वारी केली. या स्वारींत उभय ब्राह्मण बंधूंनीं फारच शौर्य गाजविलें. बंगाल, बहार, ओरिसा या प्रांतावर स्वाऱ्या करून कित्येक किल्ले व प्रांत काबीज केले. पैशाचा तुटवडा पडला कीं, रघोजी बंगाल्यावर स्वारी करी. रघोजीचा खजिना ह्मणजे जवळ जवळ बंगाल होऊनच बसला होता. या त्याच्या स्वाऱ्यांनीं इंग्रजांवर त्याचा फारच मोठा धाक बसला होता. इंग्रजांनीं रघोजीच्या भीतीनें कलकत्यास ' मराठा डिच '–अद्यापही असलेला–नांवाचा मोठा खंदक खणला होता. रघोजीनें अलिवर्दीखानावर स्वारी करून त्याचेकडून खंडणी वसूल केली. यानंतर कांहीं वर्षांनीं जेव्हां भास्कररामानें बंगालवर स्वारी केली. तेव्हां अलिवर्दीखानानें पूर्वीचा डाव मनांत ठेवून त्यांचा कपटानें घात करण्याचा घाट घातला. अलिवर्दीखानानें भास्कररामाशीं औपचारिक मित्रत्व दाखविण्यास सुरवात केली. तें कपट भास्करराम यांचे लक्षांत आलें नाहीं. अलिवर्दीखानानें भास्करामाचा सन्मान करून भास्कररामासहित सर्व सरदारांस मेजवानी देण्याचें ठरविलें. एका तंबूंत मेजवानीकरितां भास्करराम व सर्व सरदार बसले असतां तंबूच्या काढण्या बाहेरून कांपण्यांत आल्या. त्याबरोबर आंत जेवणाऱ्या मंडळीवर तंबू पडला व कापाकापी सुरू झाली. त्यांत भास्करपंतासह बावीस सरदार कापले गेले. हें रघोजीस समजतांच रघोजीनें आपला मुलगा जानोजी याचेबरोबर सैन्य देऊन अलिवर्दीखानावर रवाना केलें. जानोजीचें सैन्य पाहून अलिवर्दीखान घाबरला व त्यानें जानोजीबरोबर तह केला. या तहामुळें रघोजीस पुष्कळ मुलुख व खंडणी मिळाली. शिवाय भास्करराम वगैरे सरदारांची विश्वासघातानें कत्तल केल्याबद्दल अलिवर्दीखानाचे मुलखावर ' मुंडकटाई ' ह्मणून रघोजीनें कर बसविला.

छत्रपति शाहु इ. स. १७४९ त मरण पावले. त्यांचे गादीवर रामराज बसले. पेशव्यांचें व रघोजीचें मनांतून वैमनस्यच होतें. पुढें रामराजानें पेशव्यांचा व रघोजीचा सांगोलें मुक्कामीं सलोखा करून दिला. त्याच सुमारास नासिरजंगहीं

मरण पावला. म्हणून रघोजीनें वऱ्हाडांतील त्याचा गाविलगडचा किल्ला व त्याच्या ताब्यांतील त्याचा मुलुखही हस्तगत केला. इ. स. १७५१ मध्यें निजाम पुण्यावर स्वारी करून गेला. ही संधि पाहून निजामाबद्दलचें उलटें काढण्याकरतां त्यानें त्याचे मुलखावर स्वारी केली व बरीच लूट मिळविली. रघोजी भोंसले यांचा रघूजी करांडे नांवाचा शूर सेनापति होता.

निजामावरील या स्वारीनंतर रघोजींना मूळचाच असलेला पोटशूळाचा विकार दिवसेंदिवस असाध्य होत जाऊन त्यांतच ते इ. स. शके १६७७ फाल्गुन शु॥ ३ रोजीं नागपूर येथें दिवंगत झाले. त्यांचेबरोबर त्यांच्या तेरा स्त्रियांपैकीं आठ स्त्रियांनीं सहगमन केलें. त्यांची नागपुरीं त्यांच्या निधनस्थानीं बांधलेली नंऊकळशी छत्री अद्यापी त्यांची साक्ष देत उभी आहे.

रघोजींचे मरणसमयीं त्याच्या राज्याचा फार मोठा विस्तार होता. १ गोंडवाना ह्मणजे नागपूर देवगड, चांदा व शिवणीचा इलाखा. २ छत्तीसगड. ३ संबळपूरचें राज्य. ४ कटकचा सुभा बालेश्वर बंदरसहित. ५ वऱ्हाड इलाखा. एवढें अवाढव्य राज्य रघोजींचें होतें. रघोजीनें आपल्या बापाप्रमाणें श्रीरामाची उपासनाच आजन्म चालविली. त्यानें नागपूरचें राज्य स्थापन केल्यावर नागपूरपासून पंधरा कोसावर असलेल्या रामटेकच्या टेंकडीवर श्रीरामचंद्राचें भव्य मंदीर बांधलें. त्या ठिकाणीं अद्यापीही हजारों लोकांची यात्रा दर्शनाकरितां जाते. तें स्थान पहाण्याकरितां दूरदूरचे प्रवासी मुद्दाम येतात. रामटेकचा किल्ला व मंदीर पाहिल्यानंतर रघोजी महाराजांचा चिरंजीवपणा त्या ठिकाणीं अनुभवावयाला मिळतो. फारच रम्य स्थान आहे. रघोजी महाराजांच्या शिक्क्यामध्यें खालील प्रमाणें श्लोक आढळतो.

शाहुराजपदांभोज–भ्रमरायितचेतसः ॥
बिंबात्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते ॥ १ ॥

२ **पहिला जानोजी**:–रघोजी महाराजांचे मरणानंतर सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें त्यांचे वडील मुलास–जानोजी भोंसले यांस–सातारच्या छत्रपतीकडून मिळालीं व ते नागपूरच्या गादीवर विराजमान झाले. रघोजी भोंसले यांना चार मुलगे होते. जानोजी,

मुधोजी, साबाजी व बिंबाजी. चौघेही पराक्रमी पुरुष होते. जानोजी वडील असल्यामुळें तो सेनासाहेब सुभा झाला. दुसरे मुधोजी यांस सातारच्या छत्रपतीकडून 'सेना धुरंधर' हें पद मिळालें व ते नागपूर येथें राहून जानोजीच्या राज्याचा बंदोबस्त पाहूं लागले. साबाजी भोंसले यांना दारव्हा येथें व बिंबाजी भोंसले यांना छत्तीसगड येथें ठेवून त्या त्या प्रांताचा कारभार त्यांचेकडे सोंपविण्यांत आला. रघोजी भोंसले हे जानोजीस आपल्याबरोबर किंवा स्वतंत्रतेनेंही लढाईवर पाठवीत होते. कर्नाटक, बंगाल वगैरे प्रदेशांत जानोजीनें बरेंच शौर्य प्रकट केलें होतें. जानोजीनें आपल्याबरोबर पुष्कळ सैन्य घेऊन कर्नाटकावर स्वारी केली. ही संधि पाहून निजामानें वऱ्हाडावर स्वारी केली. हें जानोजीला कळतांच त्यानें परत फिरून निजामाचा मोड केला. तेव्हां निजामानें जानोजीबरोबर तह केला. त्या तहामुळें निजामाच्या वऱ्हाडांतील मुलखाची जानोजीनें वहिवाट करून चौथाई, सरदेशमुखी व लष्करी खर्च यांबद्दल शेकडा ६० रुपये घ्यावें व शेकडा ४० निजामास वऱ्हाडच्या मालकी हक्काबद्दल द्यावें असें ठरलें. इ. स. १७६१ सालीं पानिपतची लढाई झाली. त्या वेळीं नानासाहेब पेशव्यांनीं जानोजीस बरोबर घेतलें होतें. परंतु सदाशीवरावभाऊ यांचा भयंकर पराभव झालेली वार्ता नानासाहेबांस अलीकडेच मार्गांत समजल्यामुळें ते पुढें न जातां परत फिरले. नानासाहेब पेशवे इ० स० १७६१ मध्यें मरण पावले. नानासाहेबांनंतर माधवराव पेशवे झाले. त्या वेळीं निजामाचा पराभव करण्याकरतां राघोबादादा बरीच फौज घेऊन निजामावर चाल करून गेले. ही लढाई राक्षस-भुवन येथें झाली. या लढाईत राघोबादादांना जानोजी व मुधोजी या उभय बंधूंनीं फार मोठें शौर्य दाखविलें. या लढाईत निजामाचा पराभव झाला. राघोबादादानें, राक्षसभुवनाच्या लढाईत या जानोजी व मुधोजी बंधूंनीं फार मोठी कामगिरी केली म्हणून निजामाकडून पेशव्यांना जो साठ लाखांचा मुलुख मिळाला, त्यापैकीं बत्तीस लाखांचा मुलुख जानोजीस देऊन त्याच्या कामगिरीचें चीज केलें. माधवराव पेशवे व राघोबादादा पेशवे यांच्यामध्यें मध्यंतरीं तंटा माजला. राघोबादादा लढाईवर जाऊन शत्रूचा पराभव करीत होते, पण शत्रूच्या पराभवानंतर त्याच्याशीं तह करितांना त्याच्या नांग्या बांधून टाकून त्याला कायमचें डोकें वर काढूं न देण्याची जी मुत्सद्देगिरी, ती ते लष्करी स्वभावाचे असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं नव्हती.

निजामाकडून जो राघोबादादांना ६० लाखांचा मुलूख मिळाला, त्यापैकीं ३२ लाखांचा मुलूख त्यांनीं भोंसल्यांना दिला, हें राघोबादादाचें कृत्य माधवराव पेशवे यांस बिलकूल खपलें नाहीं. त्यांनीं त्याच रागाच्या भरांत जानोजी भोंसल्यावर स्वारी केली. या पेशव्यांच्या स्वारीची जानोजीस कल्पना नसल्यामुळें माधवराव पेशव्यानें त्यांचा पराभव केला. जानोजीचा बराच मुलुख पेशव्यानें हस्तगत केला. नागपूर शहर जाळून टाकलें. या प्रकारामुळें जानोजी व मुधोजी भोंसले खवळून गेले. त्यांनीं पेशव्यांशीं लढाई देण्याची जंगी तयारी केली. तीमुळें पेशव्याचें धाबें दणाणलें व त्यानें जानोजीबरोबर तह करण्याकरतां गोपाळराव पटवर्धन यांस पाठविलें. त्यांचे मध्यस्तीनें भोंसले बंधूंचा राग कमी झाला व कानपूर मुक्कामीं इ० स० १७६९ मध्यें माधवराव व भोंसले बंधू यांचा तह झाला. इ० स० १७७१ मध्यें पेशव्यांना भेटण्याकरितां खुद्द जानोजी पुण्यास गेले होते. त्या ठिकाणीं मुधोजीचा वडील मुलगा रघोजी ( दुसरा ) यास दत्तक घेण्याचा त्यांनीं आपला बेत त्यांस कळविला. नंतर पंढरपुरास जाऊन देवदर्शन घेऊन ते बालाघाटास आले. त्या ठिकाणीं त्यांना शूळाची व्यथा पूर्वीपासून होती ती जास्त झाली. सेनाधुरंधर मुधोजीही त्या ठिकाणीं आले. रघोजीस दत्तक देण्यांत आलें व त्याच ठिकाणीं त्यांचें प्राणोत्क्रमण ( वैशाख शु. १५ शके १६९४ तारीख १६ मे १७७२ रोजीं ) झालें. जानोजी बरोबरही त्यांच्या बायकांनीं सहगमन केलें.

३ दुसरा रघोजीः—जानोजीचें मरणानंतर रघोजी दुसरे यांस सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें मिळालीं. जानोजीनें आपला बंधु मुधोजी याचा मुलगा रघोजी यास दत्तक घेतलें, हें त्याचा दुसरा भाऊ साबाजी यास पसंत पडलें नाहीं. साबाजीनें जानोजीची सती न गेलेली बायको दर्याबाई, हिला आपल्या पक्षाला सामील करून घेऊन मुधोजीबरोबर लढाई केली. व त्याला आणि रघोजीला दोघांनाही पळवून लाविलें. ही गोष्ट पुण्यास माधवराव पेशवे यांस समजली. त्यांचा पूर्वीपासून मुधोजीवर राग होताच. त्यांनीं नंतर साबाजीस सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें देवविलीं. तेव्हां मुधोजीनें रघोजीला बरोबर घेऊन साबाजी बरोबर युद्ध करण्याकरितां फौजफांटा जमवावयास सुरवात केली.

इकडे पुण्यास माधवराव पेशवे हे कैलासवासी झाले. त्यांचे गादीवर त्यांचे धाकटे बंधु नारायणराव हे पेशवे झाले. पहिल्यानें राज्यकारभाराचीं सूत्रें

नारायणराव पेशवे " बाळ " असल्यामुळें राघोबादादा पहात होते. परंतु नारायणराव पेशवे यांच्या स्वभावाशीं त्यांचें पटेना. नारायणरावास बापूजी बरवे याच्यासारखे गैरमसलतदार मिळाल्यामुळें व तशाच खुषमस्करी लोकांचा पगडा नारायणरावावर बसल्यामुळें राघोबादादा, नानाफडणवीस, सखारामबापू, हरीपंत फडके वगैरे मोठमोठ्या मुत्सद्दी व शूर लोकांचें कांहीं चालेना. पेशव्यांवर नियंत्रण करणारी राजशक्ती ह्मणजे सातारचे छत्रपती हे बलहीन होऊन बसले होते. त्यामुळें पेशवे स्वतंत्र झाल्याप्रमाणें होते. व त्या वेळीं पेशवे ह्मणजे मराठी साम्राज्याचे मुख्य आधारस्तंभ मानले गेल्यामुळें व त्याच पेशव्यांची स्थिति व राजकारण माधवरावाच्या मरणानें बिघडून गेल्यामुळें मराठी साम्राज्यांत एकच गोंधळ माजला. नारायणराव पेशवे कोणाचेंच ऐकेनात. त्यांनीं राघोबादादा यांस कैदेंत टाकलें. ते मुख्य मुख्य मुत्सद्यांचा वरचेवर पाणउतारा करूं लागले. त्यामुळें त्यांचेजवळ हांजी हांजी करणारीं माणसेंच तेवढीं जमलीं. त्यामुळें नागपूरकर भोंसल्यांच्या युद्धाला जोर आला; हैदरअल्ली पुण्यावर स्वारी करण्याच्या तयारीला लागला; परभु प्रकरण विकोपाला चढलें; ठिकठिकाणाहून चौथाई, सरदेशमुखी वगैरे खंडणी येणेचें बंद पडलें; त्यामुळें खजिन्याला तूट भासूं लागली; दरबारांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी स्थिति झाली; मराठी साम्राज्याचे दुवे अलग अलग होऊं लागले. अशी परिस्थिति नारायणरावाच्या एकंदर आठ दहा महिन्यांच्या कारकीर्दींत उत्पन्न झाली. तेव्हां जुन्या मुत्सद्यांचा एक स्वतंत्र पक्ष उत्पन्न झाला व त्यांच्यांत नारायणरावाला कांहीं दिवस नजर कैदेंत ठेवून राघोबादादांची मुक्तता केल्याशिवाय बिघडलेली स्वराज्याची घडी पुन्हां सुधारणार नाहीं असें ठरून त्याप्रमाणें त्यांचा प्रयत्न सुरू झाला. सुमेरसिंग गारद्याकडून नारायणरावास कैद करण्याचें ठरलें. त्याचे इनामाची यथायोग्य तऱ्हेनें जामीनकी राघोबादादांनीं घेतली. त्याप्रमाणें सुमेरसिंग शनवार वाड्यांत शिरूं लागला. तेव्हां नारायणरावांचे शरीर–रक्षक फौजेशीं चकमक होऊन सुमेरसिंगानें शनवार वाडा ताब्यांत घेतला. नारायणराव त्या वेळीं दुपारची वामकुक्षी करीत होते. सुमेरसिंग त्यांना धरण्याकरितां त्यांच्या शयनमंदिरांत प्रवेश करतो, तों चांफाजी आडवा आला, त्यालाही मारण्यांत आलें. या गडबडीनें नारायणराव जागे झाले. आरडा ओरड व खुनाखुनी पाहून ते समजले कीं हा सर्व प्रकार राघोबादादांचा आहे. आपणाला

तुरुंगांत खितपत टाकण्याचा सर्वांचा डाव आहे. तुरुंगांत राहून मेलेलें जीवित कंठण्यापेक्षां स्वतंत्र स्थितींतील मरण बरें. असें मनांत आणून त्यांनीं आपले जवळील खंजीर पोटांत मारून घेऊन आत्महत्त्या केली. ( इ. स. १७७३ शके १६९५ भाद्रपद शुद्ध १३ ). या प्रकारामुळें राघोबादादांस गादीवर बसावें लागलें. राघोबादादा गादीवर आल्यामुळें मुधोजी भोंसले यांस दुप्पट जोर आला. राघोबादादांचें व मुधोजीचें सख्य होतें. मुधोजीनें साबाजीबरोबर लढण्याची तयारी करून त्याशीं लढाई केली व त्याचा कुंभारी गांवीं मोड केला. त्यामुळें साबाजी, दर्याबाई यांनीं मुधोजीबरोबर तह केला. त्या तहामुळें रघोजी दुसरा पुन्हां गादीवर बसला. व मुधोजी व साबाजी दोघेही रघोजीचा कारभार पाहूं लागले. नंतर इ. स. १७७४ सालीं पुण्यास बारभाईंचें कारस्थान सुरू झालें. त्या वेळीं साबाजी भोंसले बारभाईंस सामील झाला. मुधोजी पूर्वीपासून राघोबादादाच्या पक्षाला होताच. साबाजीनें रघोजीस आपल्या पक्षांत ओढून घेऊन सर्व राज्याचा कारभार आपल्या हातीं घेतला. तेव्हां इ. स. १७७५ सालीं मुधोजीनें साबाजीबरोबर लढाई केली व त्या लढाईंत साबाजी मरण पावला. साबाजीच्या स्त्रियांनींही सहगमन केलें.

साबाजीच्या मरणानंतर नागपूरच्या गादीचा कारभार मुधोजी पाहूं लागला. तो इ. स. १७८८ त मरण पावला. तेव्हां रघोजी स्वतंत्रपणें राज्यकारभार पाहूं लागला. त्याला खंडोजी ऊर्फ चिमणाबापू व व्यंकोजी असे दोन धाकटे भाऊ होते. चिमणाबापू हे फार पराक्रमी व भीमशक्तीचे होते. त्यांनीं कर्नाटकांत व बंगाल्यांत फारच मोठें नांव मिळविलें. त्यांचेप्रमाणें विशाल देही, भीमशक्तीचा निधड्या छातीचा वीर नागपूरकर भोंसले घराण्यांत झाला नाहीं. त्यांचा अकल्पित मृत्यु इ. स. १७८९ मध्यें झाला. त्यांच्या मरणासंबंधानें निरनिराळे तर्क आहेत. कोणी विषप्रयोग ह्मणतात, कोणी जादुटोणा ह्मणतात. कसेंही असो, परंतु त्याचे मरणानें भोंसले घराण्याचें कधीं न भरून येणारें नुकसान झालें, ही गोष्ट मात्र सत्य आहे. त्यांचे आंगचा पराक्रम पाहून त्यांना छत्रपतीकडून 'सेना बहादूर' किताब मिळाला होता. व्यंकोजीस ' सेना धुरंधर ' ही पदवी होती. छत्तीसगडाकडे जमीनदारांनीं बंड उभारलें होतें, तें रघोजीनें मोडलें. इ. स. १७९५ मध्यें जी खर्ड्याची लढाई निजाम व पेशवे यांचेमध्यें झाली, त्या लढाईंत पेशव्यांस मदत करण्याकरतां रघोजी भोंसले हे शिंदे, होळकर, गायकवाड, यांचेप्रमाणें आपण-

ही पंधरा हजार सैन्यानिशीं गेले होते. निजामाच्या पक्षाला मुसारेमू यानें उत्तम कवाईत शिकविलेल्या तेवीस पलटणी होत्या. त्या पलटणींनीं शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या सैन्यावर चाल केली. त्या वेळीं भयंकर रणकंदन झालें. या कवाईती पलटणीपुढें शिंदे व पटवर्धन यांचें कांहीं चालेना. तेव्हां त्या सैन्यावर रघोजींच्या सैन्यानें बाणांची वृष्टि चालू केली. प्रत्येक बाणाला पांच पांच सहासहा सैनीक जायबंदी होऊं लागले. त्यामुळें मुसारेमूच्या पलटणींची दाणादाण झाली. त्याचें सैनिक वाट फुटेल तिकडे पळूं लागले. या रघोजी भोंसल्यांच्या तिरंदाज लोकांच्या पराक्रमामुळें पेशव्यांस इ. स. १७७५ च्या खर्ड्याच्या लढाईंत विजय मिळाला. रघोजी भोंसले हेही उत्तम तिरंदाज होते, अशी त्यांची ख्याति आहे. पुढें पेशव्यांशीं निजामानें तह केला. त्या तहांतील दुसरें कलम पुढीलप्रमाणें होतें.

"गंगथडमिध्यें घांसदाण्यावर भोंसल्यांचा हक्क आहे, त्याबद्दल भोंसल्यांस निजामानें ३ लक्ष १८ हजार रुपये उत्पन्नाचा मुलुख निराळा तोडून द्यावा. तसेंच भोंसल्यांची वऱ्हाडच्या वांटणीपैकीं बाकी तुंबली आहे. तीबद्दल त्यांस निजामानें २९ लक्ष रुपये द्यावे, व पुढें वऱ्हाडांत भोंसल्यांचा अंमल पूर्ववत् चालू ठेवावा."

या खर्ड्याच्या लढाईंत मराठी साम्राज्याला विजय मिळाल्यामुळें मध्यंतरीं जे त्याच्यावर दुर्धर प्रसंग आले होते, व त्यामुळें त्याची उतरती पायरी सुरू झाली होती, ती बंद होऊन त्याला बरेंच स्थैर्य आलें व पुन्हां त्याला महत्व चढूं लागलें. प्रसंगविशेषीं पेशवे, शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे मराठा साम्राज्याचे घटक आपआपलीं सैन्यें घेऊन गोळा होत व शत्रूवर हल्ला करून जय मिळवीत. त्यांची पावसाळ्यांतील ओढ्याच्या प्रवाहाप्रमाणें स्थिति असे. ओढा आला कीं जिकडे तिकडे अफाट पाणी होतें व तें तितक्याच जलद ओसरूनही जातें. तद्वतच हे एकत्र झालेले मराठे कारण संपतांच तात्काळ फुटून जात. त्यामुळें मराठा साम्राज्यांतील आपुलकी नष्ट झाली. पूर्वीं शिवाजी महाराजांचें वेळीं स्वधर्म रक्षणाकरतां स्वराज्याची स्थापना ही भावना होती; स्वार्थाचें त्यांत यत्किंचितहि स्वरूप नव्हतें. त्यामुळेंच धर्मरणक्षेत्रावर निःस्वार्थी धर्मवीर उदयाला आले. मराठी साम्राज्य स्थापन झाल्यानंतर, पूर्वीची धर्मरक्षणाकरतां स्वराज्य-स्थापना ही भावना नष्ट होऊन स्वार्थमूलक केवळ स्वराज्याची भावना अंमलांत आली. तीमुळें कोणावर प्रसंग आला तर

योग्य मोबदला आपल्या पदरांत जो टाकील त्याला आपण मिळावयाचें ही स्वार्थी दृष्टी जो तो ठेवूं लागला. त्याचपैकीं हा एक खडर्यांचा लढाईचा मासला होय. यानंतर मात्र स्वार्थ असेल तर दुसऱ्याला मदत करणें, ही भावना मराठी साम्राज्यांतील पेशवे, भोंसले, शिंदे, होळकर, गायकवाड आदिकरून आधारभूत सरदारांची झाली. त्यामुळें त्या साम्राज्याचे निरनिराळे गट पडले. प्रत्येकाची आपण निराळे, आपले राज्य निराळें, आपला फायदा निराळा, आपली प्रजा निराळी ही भावना झाली व तीच भावना पुढील सर्वांच्याच नाशाला, व स्वाभिमानाच्या ऱ्हासाला कारणीभूत झाली. यापुढें मराठी साम्राज्याला कायमचीच ओहटी लागली. याचें प्रत्यक्ष प्रमाण ह्मणजे इ. स. १८०२ सालीं दुसऱ्या बाजीरावानें इंग्लिशांशीं वसई मुक्कामीं तह केला तें होय. हा दिसावयाला तह होता. परंतु त्याचें खरें स्वरूप ह्मणजे मराठी साम्राज्याच्या अस्ताचा संधीकाल हेंच होतें. पूर्वेचा सूर्य पश्चिमेला गेला ह्मणजे पूर्वेच्या राष्ट्रांना तो अस्तास गेल्याप्रमाणें होतो, परंतु तो पश्चिमेच्या राष्ट्रांचा उदय असतो. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या मराठी साम्राज्याचा झालेला अस्ताचा हा संधिकाल, तो इंग्लंडच्या साम्राज्याचा अरुणोदयच झाला यांत शंका नाहीं.

इ. स. १८०३ मध्यें इंग्लिशांस, निजाम, ह्मैसूरकर वगैरे मिळाले, व त्यांनीं भोंसल्यांशीं लढाई दिली. ही लढाई आडगांवची लढाई ह्मणून प्रसिद्ध आहे. यांत भोंसल्यांचा पराभव होऊन शेवटीं भोंसले व इंग्रज यांचा तह झाला. त्यामुळें ओरिसा, बागलाण व वऱ्हाडांतील भोंसल्यांचा मुलुख इंग्लिशांच्या हातीं गेला शिवाय कोणतेंही राजकारण करणें झाल्यास तें इंग्लिशांच्या सल्ल्यानें करावें असेंही ठरलें. पेशव्यांची वसईच्या तहामुळें जी स्थिति झाली, तीच भोंसल्यांची आडगांवच्या तहा-मुळें झाली. या लढाईच्या वेळीं होळकरांनीं आयत्या वेळीं भोंसल्यांस मदत केली नाहीं, त्यामुळें त्यांचा पराभव झाला व त्यांना इंग्रजानें तहांत कायमचें अडकवून टाकलें. पुढें रघोजीनें आपले राज्यांतील पेंढाऱ्यांचें वगैरे किरकोळ दंगे मोडले.

याच सुमारास इंग्रजांनीं नवीन युक्ति योजली. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लहान मोठ्या राजांच्या संरक्षणार्थ त्यांनीं पलटणी निर्माण केल्या. त्या पलटणीवर सर्व इंग्रज अधिकारी, पण त्या पलटणीचा खर्च जो राजा त्यांना आपल्या तैनातींत ठेवून घेईल, त्यानें द्यावयाचा; ही तैनाती सैन्याची इंग्रजी युक्ति पहिल्यानें निजामानें

आपल्या राज्याचें मराठ्यांकडून संरक्षण व्हावें, ह्मणून अंमलांत आणिली. पुढें क्रमाक्रमानें इतर राजेरजवाडेही या युक्तीला बळी पडले. आपल्या या अशा प्रकारच्या पलटणी चाकरीस ठेवण्याबद्दल इंग्रजांचा रघोजीस फार आग्रह होता. पण त्यांनीं मरेपर्यंत या पलटणी आपले चाकरीस ठेवल्या नाहींत. या पलटणी चाकरीस ठेवणें ह्मणजे जास्त पारतंत्र्य विकत घेणें हें रघोजी ओळखून होता. रघोजी इ. स. १८१६ सालीं मार्च महिन्याचे २२ तारखेस मरण पावला.

४ **परसोजी**:–रघोजी दुसरे यांचे पश्चात त्यांचे गादीवर त्यांचा मुलगा परसोजी ऊर्फ बाळासाहेब हे बसले. हे आंधळे होते. त्यामुळें त्यांच्या राज्याचा कारभार त्यांचे चुलत भाऊ ह्मणजे व्यंकोजीचा मुलगा मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब हे पाहूं लागले. परंतु बाळासाहेबांची सावत्र आई बांकाबाई, हिला आप्पासाहेबांकडे राज्याचा कारभार असलेला सहन झाला नाहीं. तिनें गुप्त कट करून आप्पासाहेबास काढून टाकण्याचा प्रयत्न चालविला. त्यामुळें गृह-कलहास प्रारंभ झाला. इतके दिवस गृहकलह नव्हते असें नाहीं; पण आपल्या राज्यावर परचक्र फिरेल अशा मोठ्या मोठ्या आपत्तीच्या भावनेपुढें ते शांत होत. परंतु आतां मराठी साम्राज्याची कल्पना नष्ट होऊन जेव्हां भोंसले नागपूरकर यांच्या गादी पुरताच दृष्टिकोण आडगांवचे तहामुळें बाकी राहिला, तेव्हां याच गादीच्या अधिकाराकरतां आपल्याच घरीं कलह उत्पन्न झाला. व तोच कलह शेवटीं नागपूरच्या पारतंत्र्यास कारणीभूत झाला.

आप्पासाहेबांस बांकाबाईच्या गुप्त कटाची माहिती लागतांच, त्यानें तिला पकडून कैदेंत टाकलें. त्यानें बाळासाहेबांचे तैनातीस जीं जुनीं माणसें होतीं, त्यांना दूर केलें, व त्या ठिकाणीं आपल्या विश्वासाचीं माणसें ठेविलीं. पुढें थोड्याच दिवसांनीं बाळासाहेबांचा ता. १ फेब्रूवारी सन १८१७ रोजीं अकल्पित मृत्यु झाला. या मृत्यूला आप्पासाहेबांची नागपूरच्या गादीच्या अधिकाराची लालसा कारणीभूत झाली. बाळासाहेबांचा अमानुषपणानें खून करण्यांत आला, असें ह्मणतात. त्या वेळीं त्यांच्या पत्नी काशिबाई या सती गेल्या. काशीबाई ही श्रेष्ठ पतिव्रता स्त्री ह्मणून तिची त्या वेळीं ख्याति होती. भोंसल्यांचें नागपुरीं जें दहनस्थान आहे त्या स्थानाला काशीबाईच्या सहगमनाचे वेळेपासून “ काशीबाईचें

मंदीर " असें नांव पडलें, तें अद्यापि चालू रूढींत आहे. नागपुरीं ही पतिव्रता काशीबाई अद्यापहि नवसाला पावते, अशी लोकांची भावना आहे.

५ **मुधोजी**—बाळासाहेबांनंतर मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब गादीवर बसले. त्यांनीं फौजफांटा जमवून इंग्रजांशीं नागपुरास लढाई दिली. ही लढाई चार पांच दिवस सारखी चालली होती. तुळशीबागेवर इंग्रजांचा हल्ला झाला असतां तुंबळ झुंज झालें. उसन्या घाईची लढाई झाली. त्या वेळीं मुंडकीं तुटलेलीं सात धडें ह्मणजे 'कबंधें' तुळशीबागेपासून लढत लढत राजे भोंसल्यांच्या लहान वाड्याचे जागीं येऊन पडलीं. त्या सर्वांच्या पडलेल्या ठिकाणांवर समाधी बांधल्या आहेत. त्या अद्याप पहाण्यास मिळतात. या चार दिवसांचे धुमश्चक्रींत आप्पासाहेबांच्या सैन्यानें इंग्रजांची त्रेधा उडवून दिली. परंतु आप्पासाहेबांच्याविरुद्ध बांकाबाईचा पक्ष होताच, त्यामुळें इंग्रजांस आप्पासाहेबांच्या सैन्यांत फितुरी करण्यास साधन मिळालें. भोंसल्यांचा सेनापति महमदअल्ली आंतून इंग्रजांस सामील झाला. त्यामुळें पुढें सिताबर्डीचे किल्ल्यावर लढाई झाली. तींत आप्पासाहेबांचा पराभव झाला ( इ. स. १८१८ ) व त्यांस इंग्रजांनीं कैद केलें.

आप्पासाहेबांस इंग्लिश लोक अलाहाबाद येथील किल्ल्यांत कैदेंत नेऊन ठेवण्याकरितां घेऊन चालले असतां मार्गांत जबलपुराजवळ तो त्यांचे हातांतून निसटला व तेथून डोंगर कठड्याचे भागानें गुप्त वेषानें निघून जोधपुरास आला. तेथें महामंदिरांत कानफाटे लोकांमध्यें अखेरपर्यंत राहिला. त्या वेळीं महामंदिरांत दहा हजार कानफाटे गोरखपंथी साधू राहत असत. त्यांपैकींच आप्पासाहेब एक होऊन राहिले. नागपुरास बाळासाहेबांचा खून आप्पासाहेबांनीं करविला, ह्मणून त्यांचें नांव 'कानफाटे' झालेंच होतें. पुढें त्यांना मरेपर्यंत कानफाटे लोकांतच रहावें लागलें. योगायोग !

## — महामंदीर —

जोधपूर येथें कानफाटे लोकांचा सुप्रसिद्ध असा जुना एक मठ आहे. दक्षिणेंत शिवाजी महाराजांचे वेळीं ज्याप्रमाणें श्रीरामदास स्वामींची सज्जनगडची गादी, त्याचप्रमाणें महामंदिर ही जोधपूरच्या राजगुरूंची गादी. ही

गादी गोरख सांप्रदायी आहे. त्या वेळीं जोधपूरच्या गादीवर मानसिंहजी आणि महामदिरच्या गुरु – गादीवर लक्ष्मीनाथजी हे होते. * या नाथ महाराजांना मानसिंहजी गुरु मानीत. मानसिंहजींनीं या महामंदिराची एवढी इभ्रत ठेविली होती कीं, महामंदिरांत एकदां कोणी नाथ महाराजांच्या आश्रयाला येऊन राहिला कीं, त्याचे कोणतेही अपराध असोत, ते त्याला क्षम्य होत. पहिल्यानें आप्पासाहेब महामंदिरांत आपल्याबरोबर एकच मनुष्य घेऊन आपण नागपूरचे एक रजपूत ह्मणून गेले. पोशाख साधूचा. लक्ष्मीनाथजी यांचें दर्शन घेतल्यानंतर त्यांना तेथें आश्रय मिळाला. आप्पासाहेबांच्या आंगीं दोन गुण होते. एक चित्रकला व दुसरा वैद्यकी. तेथें गेल्यावर त्यांनीं आपला वेळ जाण्याकरितां महामंदिरच्या आंतील बाजूच्या खोल्यांतून देवादिकांचीं चित्रें काढण्यास सुरवात केली व आश्रमांतील साधु, लोकांसही आजारीपणांत औषधोपचार सुरू केले. त्यांनीं थोडक्याच दिवसांत तेथें बरेच असाध्य रोगी बरे केले. पुढें स्वतः लक्ष्मीनाथजीहि भयंकर आजारी पडले. त्या वेळीं आप्पासाहेबांच्या औषधानें ते बरे झाले. त्यामुळें आप्पासाहेबांची महामंदिरांत विशेष चहा होऊं लागली. तेथें एकंदर त्या वेळीं दहा हजार कानफाटे साधू होते. ते सर्वच थोड्याशा अवधींत आप्पासाहेबांचे चहाते बनले.

इकडे आप्पासाहेब इंग्रज सरकाराचे कैदेंतून पळून गेल्यावर त्यांना धरून देणाऱ्यास मोठमोठीं बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं. त्यामुळें आप्पासाहेबांचा पत्ता पाडून त्यांना धरून देण्याबद्दल हिंदुस्थानांत दशदिशां हेर लोक फिरूं लागले. परंतु महामंदिरांतील लोकांना आप्पासाहेबांचा मुळींच संशय आला नाहीं. ते तेथें निर्भयपणें कालक्षेप करूं लागले. एके दिवशीं महामंदिरांत गुरूच्या गादीचा उत्सव

---

* जोधपुरास आह्मांला इ. स. १९२६ च्या नोव्हेंबर महिन्यांत राज लक्ष्मणराव साहेबांनीं ऐतिहासिक माहितीच्या शोधार्थ पाठविलें होतें. तेथें महामंदिराच्या गादीवरील गणेशपुरीजी महाराज यांचे तोंडून ही माहिती मिळाली. तेथें आह्मांस आप्पासाहेबांचे हातचीं चित्रेंही पहाण्यास मिळालीं; व त्यांचे वैद्यकीचीहि हकीकत सांगणार इतर लोक भेटले.

होता. ह्मणून त्या उत्सवाप्रीत्यर्थ गाण्याकरतां ( जोधपूर ) दरबारची एक नामांकित नायकीण तेथें आली. लक्ष्मिनाथजी महाराज आप्पासाहेबांना जवळ घेऊन तिचें गाणें ऐकत बसले होते. ती नायकीण अप्रतीम गाणारी व अभिनय—चतुर होती. आप्पासाहेबांना गाण्याचा फार नाद; शिवाय ते गायनकलेचे चांगले मर्मज्ञ होते. नागपूरचे भोंसले घराणें ह्या विद्येंत प्रवीण असल्याची अद्यापि ख्याति आहेच. गाणें अगदीं रंगांत आलें, त्या वेळीं आप्पासाहेब आपलें साधुपण विसरले. त्या नायकिणीचें गाणें ऐकून ते इतके खूष झाले कीं त्याच वेळीं आपल्या हातांतील आंगठी तिला बक्षीस देऊन ते मोकळे झाले !

तेथील कानफाटे साधूंना गाण्याची कदर जेवढी, तेवढीच आंगठीची ! त्यामुळें आप्पासाहेबांच्या या विपरीत वर्तनाची विशेष चर्चा न होतां तो समारंभ आटोपला. पुढें थोड्याच दिवसांनीं ती नायकीण मानसिंहाचे दरबारांत गाण्याकरतां गेली असतां तिच्या बोटांत महामंदिरांत इनाम मिळालेली ती आंगठी होती. गाणें गात गात अभिनय करते वेळीं तिच्या बोटांतील आंगठी दिव्याच्या प्रकाशांत फार चमकूं लागली. त्या वेळीं मानसिंह यांनीं तिला त्या आंगठीबद्दल ती कोणीं दिली वगैरे विचारपूस केली. तेव्हां महामंदिरांतील एका साधूनें ती आपणांस १५ दिवसां-पूर्वीं दिली, असें तिनें सांगितलें. ती आंगठी हिऱ्याची होती. नंतर ती तिच्याकडून घेऊन आपल्या दरबारच्या जोहरी मंडळीस मानसिंगांनीं तिची किंमत करण्यास सांगि-तलें. जोधपूरच्या सराफ कट्ट्यावरील व्यापाऱ्यांना तिची किंमत लागेना. कारण, इतका वेअयब व पाणीदार हिरा त्यांनीं कधींच पाहिला नव्हता. मानसिंहास ही हकीकत समजतांच त्यांनीं दोन तर्क बांधले. एक तर ही आंगठी कोणीं तरी एखाद्या मोठ्या राजाची चोरून आणलेली असावी; किंवा ती जर चोरीची नसेल तर तो साधु कोणी वेषांतर केलेला मोठा राजा तरी असावा. त्याप्रमाणें त्यांनीं महामंदिराचे नाथ महाराजांजवळ चौकशी केली. त्या वेळीं त्यांनीं आप्पासाहेबांस जवळ बोलावून विचारलें कीं, तुह्मी ज्या अर्थी महामंदिरांचे आश्रमांतले आहांत, त्या अर्थीं तुह्मांला पूर्ण अभय आहे. पण तुह्मी खरें कोण आहां तें आह्मांला सांगा. तुह्मीं सामान्य व्यक्ति आहांत असें आह्मांला वाटत नाहीं. त्या वेळीं ' नागपूरचे राजे आप्पासाहेब भोंसले ते आपण, ' असें त्यांनीं सांगितलें. हें ऐकून मानसिंहजींनीं त्यांना राजवाड्यांत येऊन राहण्याबद्दल विनंति केली. पण त्यांनीं ' आपण

महामंदिर सोडीत नाहीं, ' असें सांगितलें. तेव्हां महामंदिरांतच त्यांची राजकीय नात्यानें राहण्याची व्यवस्था करण्यांत आली.

ही हकीकत थोडक्याच दिवसांत इंग्रज सरकाराचे कानीं गेली. तेव्हां त्यांनीं मानसिंहजींस आप्पासाहेबांना आपल्या ताब्यांत देण्याबद्दल फर्माविलें. मानसिंहांनीं आप्पासाहेब 'महामंदिराच्या आश्रयाखालीं असल्यामुळें आपल्या ताब्यांत देतां येत नाहीं, ' असें इंग्रज सरकारास कळविलें. परंतु इंग्रज सरकारनें 'आप्पासाहेब आमचे कैदी आहेत, त्यांना आमचे ताब्यांत दिलेंच पाहिजे, ' असा निर्वाणीचा खलिता पाठविला. त्याला मानसिंहजींनीं असें उत्तर पाठविलें कीं, ' महामंदिराची इभ्रत जर आपण घेऊं इच्छित असाल, तर महामंदिराच्या मागें त्याची इभ्रत रक्षण करण्याकरितां नऊ लक्ष रजपूत आहेत, ते अगोदर मरतील, तेव्हां महामंदिर आपलें हातीं येईल. नंतर तेथील आश्रित साधू लोक आपले ताब्यांत येतील, तोंपर्यंत येऊं शकणार नाहींत, या उत्तरानें इंग्रज सरकार गप्प बसलें. नंतर बरेच वर्षांनीं आप्पासाहेब इ. स. १८४० च्या जुलै महिन्याचे १५ वे तारखेस कैलासवासी झाले. त्यांचा दहनविधि सर्व राजचिन्हांनीं युक्त असा, तेथील ' कागा ' या स्थानीं झाला. ' कागा ' हें स्थान केवळ जोधपूरच्या राजवंशाच्या दहन संस्काराचें स्थान आहे. तेथेंच त्यांचें दहन होऊन छत्री बांधण्यांत आली.

६ **तिसरा रघोजी**:– आप्पासाहेब यांस इंग्रजांनीं कैद करून नेल्यानंतर रघोजी दुसरे यांची पत्नी बांकाबाई यांनीं आपल्या सुनेच्या मांडीवर,ह्मणजे परसोजी भोंसले ऊर्फ बाळासाहेब यांची बायको दुर्गाबाई यांचे मांडीवर, बाजीराव नांवाच्या मुलास दत्तक देऊन त्याचें नांव रघोजी असें ठेविलें. हा बाजीराव, रघोजी दुसरे यांची कन्या बनुबाई इचा मुलगा. ही बनूबाई व्यंकटराव गुजर यांस दिली होती. हेच रघोजी तिसरे ऊर्फ बाजीराव महाराज होत. हे इ० स० १८२६ त वयांत आले. तेव्हां त्यांच्याबरोबर इंग्लिशांनीं नवा तह केला. त्या तहांतील एक कलम असें होतें कीं, ' आह्मी ( ह्मणजे इंग्रज लोक ), नागपूरचें राज्य वंशपरंपरागत चालवूं. ' बांकाबाई स्वतः राज्याचा कारभार चालवीत होती. इ० स० १८५३ च्या डिसेंबर महिन्याच्या ११ वे तारखेस बाजीराव महाराज परलोकवासी झाले. ते निपुत्रिक होते. मरणाचे पूर्वीं त्यांनीं गादीला वारस पाहिजे ह्मणून दत्तक घेण्याचा विचार चालविला. परंतु

दत्तक कोणता मुलगा घ्यावा, याबाबत दोन निरनिराळे पक्ष झाले. त्या पक्षाच्या भांडणांतच बाजीराव महाराज दत्तक घेण्यापूर्वी मरण पावले. त्या वेळीं लॉर्ड डलहौसी गव्हरनर जनरल होते. त्यांना एवढें निमित्त पुरें होऊन त्यांनीं इ० स० १८५४ च्या जानेवारी २६ तारखेस नागपूरचें राज्य खालसा केलें. बांकाबाईनें आपल्या मुलीच्या वंशापैकीं नानासाहेब अहेरराव यांचा मुलगा यशवंतराव यांस बाजीराव महाराजांचे पत्नीचे ह्मणजे आनंदीबाईचे मांडीवर दत्तक देऊन त्याचें नांव जानोजी ह्मणून ठेविलें. या जानोजीरावांस नागपूरकर भोंसल्यांची स्त्रीधनाची दौलत इंग्रजांनीं परत दिली. शिवाय सालीना ९० हजारांचें पेन्शन करून दिलें. ( या पेन्शनीच्या मुळाशीं बरेंच रहस्य आहे. पण हें स्थळ त्याचा उलगडा करण्याचें नव्हे. ) त्यांना राजा बहादूर ऑफ देऊर हा किताब दिला. नागपूरचें प्रचंड राज्य जाऊन आतां फक्त राजा बहादूर अशा किताबावर व दोन अडीचशें गांवांच्या मालगुजारी उत्पन्नावर ' या भोंसले राजघराण्याची स्थिति इंग्रज सरकारच्या अमदानींत आली.

**७ दुसरा जानोजीः**—हेच जानोजीराव आमचे चरित्र नायकांचे तीर्थरूप होत. हे मल्लविद्येंत चांगलेच निष्णात होते. यांना संस्कृत भाषेचा चांगलाच व्यासंग होता. यांचे पदरीं ' षड्शास्त्रसंपन्न असे पंडित होते. धार्मिक कृत्यांकडे यांचें फारच लक्ष होतें. यांनीं स्वहस्तानें लिहिलेल्या पोथ्या अद्यापि भोंसल्यांच्या वाड्यांत आहेत. यांनीं सोनगांवच्या आबाजी महाराजांना आपले मोक्षगुरु केलें होतें. यांचा बहुतेक वेळ देवपूजा जपजाप्य वगैरे धार्मिक कर्म करण्यांत जात असे. यांनीं एकंदर सहा लग्नें केलीं. राजकुंवरबाई, राधाबाई, काशीबाई, या त्यांच्या पहिल्या तीन स्त्रिया. राजकुंवरबाई या शिर्के घराण्यांतल्या. राधाबाई व काशीबाई या मोहिते घराण्यांतल्या. या तिघी राण्यांना पुत्र-संतति झाली नाहीं. ह्मणून पुन्हां त्यांनीं तीन लग्नें केलीं. लक्ष्मीबाई, अंजिराबाई व काशीबाई. या त्यांच्या नंतरच्या तीन राण्या होत. लक्ष्मीबाई, अंजिराबाई या मोहिते घराण्यांतल्या व काशीबाई महाडिक घराण्यांतल्या होत. या तीन स्त्रिया करून घेण्याचा हेतु एवढाच कीं यांपैकीं कोणाचें तरी पोटीं पुत्रसंतान होईल. पुत्रप्राप्ति होणें हाच श्रीमंतांचा खरा लाभ असतो !

जानोजी महाराजांनीं ही लग्नें करून घेण्याचा विचार केला. तेव्हां मुली पहाण्याकरितां ठिकठिकाणीं तज्ज्ञ लोकांना पाठविण्यांत आलें. मुली सप्त कुळींतलिच

करावयाच्या हा त्यांचा संकल्पच होता. तेव्हां राजघराण्याला शोभतील, अशा सप्त कुळींतील मुली ह्मणजे सातारा जिल्ह्याशिवाय दुसरीकडे विरळाच मिळावयाच्या. शिवाय, सातारा जिल्ह्यांत नागपूरकर भोंसले यांचें इनामगांव देऊर असल्यामुळें त्यांची त्या प्रांतीं विशेष वग असे. यामुळें यांच्यापूर्वींच्याहि सोयरिकी साताऱ्या कडील होत्या. शिवाय, सप्त कुळींचा विशेष अभिमान असल्यामुळें व साताऱ्याच्या बाजूच्या सप्त कुळींच्या घराण्यांची नागपूरच्या लोकांना विशेष माहिती असल्यामुळें जानोजी महाराजांना पसंत पडणाऱ्या मुली त्याच प्रांतीं मिळतील ह्मणून तिकडेच मंडळी गेली. त्या वेळीं सप्तकुळींचीं घराणीं खालीलप्रमाणें मानलीं जात होतीं.

१ भोंसले ऊर्फ शिसोदे. २ मोहिते ऊर्फ चव्हाण ३ महाडीक ऊर्फ हांडे ४ पालकर, खानविलकर ऊर्फ राणे ५ अहिरराव ऊर्फ राव ६ गुजर ऊर्फ पवार ७ शिरके ऊर्फ तुवार हीं घराणीं सप्त कुळींचीं होत.

राजघराण्यांत मुलगी लग्नाला योग्य आहे, किंवा नाहीं याची पारख करणें, हें परवांपरवांपर्यंत एक शास्त्रच मानलें जात असे. आतां इतर पद्धतीप्रमाणेंच मुली पाहण्याच्या पद्धतींतही जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे. पूर्वीं क्षत्रिय मराठ्यांच्या उपवर झालेल्या मुली प्रत्यक्ष पहाण्यास मिळणें, हें फारच अवघड असे. हल्लीं पडद्याचा रिवाज बरेच ठिकाणीं कमी झाल्यामुळें व मुलींना शाळेंत शिक्षण देण्याचा परिपाठ पडल्यामुळें मुली दृष्टीला पडणें फारच सोपें झालें आहे. क्षत्रिय मराठ्याच्या घरीं थेट स्वयंपाकघरापर्यंत जाण्याची परवानगी तितकाच निकट परिचय असल्याशिवाय कोणासही नसे. पन्नाशी उलटून गेलेल्या एखाद्या वृद्ध वैदिक ब्राह्मणालाच त्या वेळीं असें जातां येई व अशा पोक्त व विद्वान आणि कर्मशील ब्राह्मणांनाच सर्व लहान मोठ्या स्त्रियांबरोबर बोलतां येत असे. तव्हां मुली पाहण्याचें काम अशाच ब्राह्मणांकडे साहजिकच येत असे. एकादी मुलगी स्वरूपानें सुंदर दिसली ह्मणजे पहिल्यानें तिची पत्रिका पहावयाची. पत्रिका जमूनही राजघराण्यांत जाण्यासारखे तिचे ग्रह बलिष्ठ दिसत असतील, तरच पुढें त्या मुलीसबंधी चौकशी करण्यास सुरवात होत असे. नंतर पहिल्यानें वर पक्षाकडील पोक्त मानकरी बायकांना मुलीला पहाण्याकरितां रीतसर पाठविण्यांत येत असे. त्यांच्याबरोबर मुलीला सजविण्याकरितां वस्त्रालंकारादि देण्यांत येई. त्या बायांनीं मुलीची स्वतः वेणीफणी करून तिला आपल्या बरोबरच्या वस्त्रालंकारांनीं नटवून तिला

पहाण्याकरितां आलेल्या आपल्याकडील पोक्त पुरुष मंडळीला ती दाखवावयाची. हा एक प्रकार झाल्यानंतर मुलीचे आंगावर दागदागिने नसतांना व ती नेहमींच्या पोषाखांत असतांना तिला पहाण्याचा दुसरा प्रकार असे. मुलीची बोलण्याची पद्धत, तिच्या घरचा रिवाज, संतति होण्याच्या बाबतींत तिच्या घराण्याची वहिवाट, भाऊ, बहिणी वगैरेंची माहिती, निरोगी शरीरसंपत्ति वगैरे सर्व बाजूनें चौकशी करून जी मुलगी पसंत पडेल त्या मुलीस वरगृहीं नेण्यांत येत असे. जी मुलगी दागिन्यानें नटली नसली तरी ( नेहमींच्या पोषाखांतही ) सुंदर दिसणारी, रागांत धुसफुसतांना किंवा आनंदांत हंसतांना, मैत्रिणीबरोबर खेळतां बागडतांना अथवा कामधाम करतांना सुंदरच दिसेल, तीच खरी सुंदर मुलगी असें मानण्यांत येत असे. असो.

याप्रमाणें तीन मुली पसंत करण्यांत आल्या व त्यांस नागपुरीं येण्याकरतां सांगून, पहाण्यास गेलेली मंडळी परत आली. तिथि-निश्चय झाला. त्या तिथीला या तीन मुलींपैकीं दोघी ह्मणजे लक्ष्मीबाई व अंजिराबाई या आल्यामुळें त्यांचीं लग्नें झालीं. परंतु काशीबाई यांचे घरचे मंडळींना येण्याला दोन दिवस उशीर झाला. त्यामुळें ठरल्या तिथीला तें लग्न झालें नाहीं. त्या पाहुण्यांची उतरण्याची व्यवस्था तुळशीबागेंत केली होती. मुहूर्त टळला ह्मणून त्यांचें लग्न लांबणीवर पडलें. महिना झाला, दोन महिने झाले, तरी जानोजी महाराजांकडून कांहींच जबाब येईना. महाडिक मंडळी तुळशीबागेंत नुसता पाहुणचार घेत बसली होती. काशीबाईचे वडील अगदीं साधे व स्वभावाचे भोळे होते. पण त्यांचे चुलते फार तापट व लष्करी बाण्याचे होते. त्यांनीं मध्यस्थ मंडळीकडून महाराजांना पुष्कळ निरोप सांगितले, पण महाराजांकडून कांहींच जबाब मिळेना, तेव्हां नानासाहेब महाडिक काशीबाईचे चुलते चिडून गेले. त्यांनीं महाराजांची समक्ष गांठ घेऊन सोक्षमोक्ष करून घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें एके दिवशीं त्यांनीं त्यांची भेट घेतली. व त्यांना सांगितलें कीं ' आपण मुलीला मागणी घातली ह्मणून मीं दक्षिणेंतून आपल्याशीं लग्न करून देण्याकरितां मुलीला आणलें आहे. आतां आपण लग्न करणार असाल तर ठीक आहे, नाहीं ह्मणाल तर मी मुलीला परत नेणार नाहीं. आपल्या वाड्यापुढें मुलीची कत्तल करीन व मीही प्राण देईन. कोणत्याही हालतींत मी मुलीला परत घरीं नेणार नाहीं. ' हें महाडिक राजांचें निर्वाणीचें भाषण ऐकून यापुढें गोष्ट दिरंगाईवर टाकणें बरें नव्हे, असें महाराजांना,


ही वाटलें. त्यांनीं ' आठ दिवसांत काय तें नक्की सांगतों, ' असें सांगून त्यांची रवानगी केली.

आपण मागणी घालून मुलगी लग्नाकरितां तर नागपुरीं आली; तेव्हां त्याप्रमाणें लग्न करून घेणें प्राप्त आहे, असें जानोजी महाराजांना वाटलें. पण त्यापूर्वी आपण स्वत: एकदां मुलीला पहावें, असें त्यांनीं आपल्या मनाशींच ठरविलें. त्याप्रमाणें एके दिवशीं सायंकाळीं पांच वाजण्याचे सुमारास नेहमींप्रमाणें फिरण्याकरितां ते गाडींतून वाड्याच्या बाहेर पडले. नेहमीं फिरावयाला येणाऱ्या मंडळींपैकीं कोणालाही त्यांनीं बरोबर घेतलें नाहीं. एकटेच निघाले. गाडींत बसल्यावर त्यांनीं गाडी तुळशीबागेकडे नेण्यास सांगितलें. तेथें गेल्यावर बाहेर गाडी उभी केली. आपण गाडींत भगवी कफनी आंगांत घातली. ( भजनाचे वेळीं ते भगवी कफनी केव्हां केव्हां घालीत. ) व एकटेच पायीं तुळशीबागेंत शिरले. बागेंत शिरतांना त्यांनीं लांब दाढी, मिशी, व डोक्याला केसांचा टोप चढविला. थेट बैराग्याचा ' पार्ट ' घेतला. त्या वेषानें ते तुळशीबागेंत गेले. त्याच वेळीं तुळशीबागेंतील एका मोठ्या पाण्याच्या टांक्यावर काशीबाई आंत पाय सोडून पाण्याशीं खेळ खेळत होत्या. त्यांचें लक्ष पाण्यांतील माशांचे खेळ पाहाण्यांत गर्क झाल्यामुळें हे वेषधारी बैरागी मागें येऊन उभे राहिले तरी त्यांस समजलें नाहीं. जानोजी महाराजांनीं थोडा वेळ त्या मुलीकडे पाहिलें व ती आपल्याच नादांत आहे, असें पाहून त्यांनीं तेथील गुलाबाचें एक फूल तोडलें व तें काशीबाईच्या आंगावर फेंकलें. तें फूल त्यांचे ' आंगावर पडतांच त्यांनीं मागें वळून पाहिलें तों एक बैरागी आपलेकडे टक लावून पहात असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. त्यानें केलेल्या थट्टेचा काशीबाईंना मनस्वी राग आला. त्या रागानें लाल झाल्या. तेथेंच पडलेला एक दगड हातांत घेऊन त्या ह्मणाल्या, 'कोणरे मेल्या तूं साधू कीं भोंदू? माझी थट्टा करतोस ? येथून जातोस का घालूं हा गोटा तुझ्या टाळक्यांत?' महाराज हांसतच तेथें उभे राहिले. तेव्हां 'काकासाहेब, काकासाहेब!' ह्मणून काशीबाईंनीं हांक मारण्यास सुरवात केली. त्याबरोबर महाराज निघून तुळशीबागेंतून बाहेर आले व गाडींतून वाड्याकडे चालते झाले. नानासाहेब महाडीक काशीबाईच्या हांकेसरशीं बाहेर आले. काशीबाईंनीं कोणा बैराग्यानें आपली थट्टा केली, आणि आपण हांका मारूं लागतांच तो पळून गेला, असें सांगितलें. नानासाहेब, हातांत तरवार घेऊन तुळशीबागेच्या बाहेर येतात, तोंच महाराजांची गाडी वाड्याकडे गेलेली

त्यांना दिसली. साधूचा कोठेंच पत्ता नाहीं. माळ्याशीं चौकशी करतां ' बागेंत महाराजच आले होते, असें त्यानें सांगितलें.

जानोजी महाराज बैराग्याचे वेषानें मुलीला पाहण्याकरितां आले असतां, प्रत्यक्ष मुलगीच धोंडा घेऊन त्यांना मारायला उठली व रागाचे भरांत त्यांना काय वाटेल तें बोलली, तेव्हां आतां पुढें कसें ? याचीच चिंता सर्वांना लागली. काशी-बाई खजिल होऊन चोरासारख्या दडून बसल्या ! तेव्हां झालेल्या प्रकाराबद्दल महा-राजांची माफी मागावी, ह्मणून नानासाहेब महाडिक वाड्यांत आले. त्यांनीं महारा-जांची भेट घेतली व मुजरा करून खालीं मान घालून बसले. तेव्हां महाराज हंसत हंसत ह्मणाले, " कां राजे, गप्प बसला ! आह्मी मुलगी पाहिली. मुलगी मोठी पाणी-दार आहे. आम्हांला पसंत पडली. आमचा लग्न करून घेण्याचा विचार ठरला. तिथिनिश्चयाकरितां ग्रामजोशांना बोलावणें पाठविलें आहे. नानासाहेब विस्मय-चकित झाले. त्यांना हा प्रकार खरा कीं खोटा, हें कांहींच समजेना. शेवटीं ग्राम-जोशी येऊन लग्नाचा मुहूर्त पाहण्यांत आला व त्याप्रमाणें महाराजांचे हुकूमही सुटले. तेव्हां नानासाहेबांची खात्री होऊन मोठ्या आनंदानें ते तुळशीबागेंत परत आले. तोंपर्यंत सर्व मंडळी चिंतातूरच बसली होती. ही आनंदाची बातमी ऐकून सर्वांची चिंता दूर झाली. पुढें ४।८ दिवसांचे आंतच काशीबाईचें लग्न झालें व त्या लहान राणीसाहेब म्हणून राजवाड्यांत जाऊन राहिल्या. पुढें त्यांनींच जानोजी महाराजांची सर्व राण्यांपेक्षां जास्त मर्जी संपादन केली.

आतां यापुढें आमच्या चरित्रनायकांच्या जन्मकथेला सुरवात होणार अस-ल्यामुळें जानोजी महाराजांचें प्रकरण आह्मी येथेंच पुरें करणार आहोंत. त्यांचीं पुढील माहिती चरित्रनायकांचे चरित्रओघाबरोबर जेवढी येईल तेवढी पुढील प्रकरणीं वाचकांना सादर होईलच.



श्रीमंत राजे बहाद्दुर जानोजी महाराज आणि त्यांचा वंशविस्तार.

[K. P. Z. P. B.]

पृष्ठें १००-१०१.



श्रीमंत मातोश्री राणी काशीबाईसाहेब आणि त्यांचे भाग्यशील नातु

(क फो. झि. प्रे बे) श्री. कुं प्रतापसिंह. पृष्ठें १००-१०१

## प्रकरण ९ वें

# श्रीमंत राजे लक्ष्मणराव

## १ जन्मकथा.

गृह रत्नानि बालकाः

नागपूरचें भोंसले घराणें ह्मणजे नवरत्नांच्या खजिन्याचें माहेरघर. पहिले रघोजी भोंसले यांच्यापासून अशी यांची प्रसिद्धि. राजे बाजीराव महाराज यांच्या कारकीर्दीनंतर तें कुबेराचें भांडार चाळणीप्रमाणें सर्व बाजूंनीं सच्छिद्र झालें. चाळणीचा धर्म असा आहे कीं, तींतून पीठ चाळलें कीं, उत्तम पीठ तेवढें खालीं पडतें व त्यावरील कोंडा—कचरा तेवढा चाळणींतच शिल्लक राहतो. त्याप्रमाणें नागपूरच्या कुबेराच्या भांडारांतला नवरत्नांचा उत्तम तेवढा भाग निघून गेला आणि त्यावरील कचरा मात्र नागपूरच्या त्या कुबेराच्या भांडारांत शिल्लक राहिला. बाजीराव महाराजांचे मरणानंतर नागपूरची गादी बेवारसी ठरवून कुंपनी सरकारनें नागपूरचें राज्य आपल्या राज्याला जोडलें आणि आपल्या हिंदुस्थानांतील प्रांतांत सपाटून भर टाकली. तशीच आपल्या विलायती गंगाजळींत नागपूरचा भांडारखाना ओतून तिचीही समृद्धि करून टाकली. ह्यासीनंतर जो प्रकार बंगालचा झाला, तोच या वेळीं नागपूरचा झाला. नागपूरचे मालक नामधारी राजे झाले. बांकाबाई वगैरे राण्या वर्षासनें घेऊन आपलें परावलंबित निस्तेज जीवित कंठूं लागल्या.

अशाप्रकारें नागपूरचें वैभव व कुबेराचें भांडार धुऊन गेलें. तरी पण कोंड्याची भाकर खाऊनसुद्धां गरिबांना जगतां येतें, त्याप्रमाणें नागपूरचें तें कुबेराचें भांडार जरी धुऊन गेलें तरी राहिलेल्या शेष भांडारावर जानोजी महारा-

जांना ' मोतीवाले भोंसले ' ह्मणून जीवित कंठतां आलें. त्या वेळच्या इतर श्रीमंत लोकांपेक्षां कितीतरी पटीनें ते अधिक श्रीमंत होते. हिरे, पाच, मोतीं, माणिक इत्यादि नवरत्नांचे ते मालक होते. व त्याप्रमाणें त्यांचेजवळ तसा संग्रहही पण होता. परंतु या संपत्तीनें व ऐश्वर्यानें त्यांचे मनाला जेवढा आनंद व्हावा, तेवढा होत नव्हता. त्या अमोलिक नवरत्नालंकारांनीं जानोजी महाराज प्रकाशित असलेले लोकांना दिसत; पण त्यांच्या मनाला प्रकाशित करणारें त्या नवरत्नांखेरीज दुसरेंच रत्न असावें असें वाटे. नवरत्नांनीं वसुंधरा शोभा पावत असली तरी गृहमंदिराला—अर्थात् राजमंदिराला तर विशेषच शोभा देणारें पुत्ररत्नाशिवाय दुसरें कांहींच नाहीं. पुत्ररत्नाची महती नवरत्नापेक्षां कितीतरी श्रेष्ठ आहे. नवरत्नांच्या प्राप्तीपेक्षां पुत्ररत्नाचा लाभ गरिबांना देखील श्रेष्ठ वाटतो; मग श्रीमंताचे घरीं पृथ्वीच्या मोलाचीं प्रत्यक्ष नवरत्नें लोळत असतां त्यांचे मनाला अन्य महत्वाचा लाभ पुत्ररत्नाशिवाय दुसरा कोणता वाटणार! शिवाय, ज्या श्रीमंतांना आपल्या वयाची चाळिशी उलटली तरी पुत्ररत्न लाभलें नसेल, त्यांच्या मनाची स्थिति 'जावें त्याच्या वंशा तेव्हांच कळे !' श्रीमंतांचीं चाळीस वर्षे ओलांडून गेल्यानंतर पुत्ररत्नाच्या प्राप्ती करितां त्यांच्या मनाची एवढी एकाग्रता झाली असते कीं, त्या एकाग्रतेपुढें चातकाची मेघावलोकनाची मार्गप्रतीक्षा कमी दर्जाची ठरेल. जवळ जवळ असाच प्रकार श्रीमंत जानोजी महाराज यांचा झाला होता. आणि त्यांनीं जीं पुनः आणखी तीन लग्नें केलीं, तींही पण याच पुत्ररत्नांच्या प्राप्तीकरितां.

जानोजी महाराजांनीं पुत्रप्राप्तीकरतां पुष्कळ ठिकाणच्या देवांना नवस केले. कित्येक देवांच्या उपासना केल्या. शेवटीं परमेश्वरानें त्यांच्या भावनेला मान देऊन राणी अंजिराबाई साहेब यांचे पोटीं " रघोजी " नांवाचें पहिलें पुत्ररत्न दिलें. नंतर पुढें पांच वर्षांनीं राणी काशीबाईसाहेब यांचे पोटीं इ. स. १८७७ च्या आगष्ट महिन्याचे २१ वे तारखेस ह्मणजे श्रावण शुद्ध १३ शके १७९९ रोजीं आमचें चरित्र-नायक-रत्न जन्माला आलें. त्या वेळीं जानोजी महाराजांना जो आनंद झाला त्याचें यथातथ्य वर्णन करतांच येणें शक्य नाहीं. तरी पण कल्पनेनेंच त्यांच्या आनंदाची कल्पना करावयाची ह्मणजे राजा दशरथ याला राम-लक्ष्मण हे पुत्र झाल्यानें जो आनंद झाला, त्याचीच जवळ जवळ पुनरावृत्ति होय. सामान्य मनुष्याच्या आनंदाच्या क्षेत्रापेक्षां राजाचें तें क्षेत्र फारच विशाल

असतें. राजाच्या सुखदुःखाचे वांटेकरी त्याचे प्रजाजन असतात, श्रीमंत जानोजी महाराजांना द्वितीय पुत्ररत्नाचा किंवा अद्वितीय पुत्ररत्नाचा लाभ झाला. याची खबर सर्व शहरभर हां हां ह्मणतां पसरली. ही आनंदाची खबर जितक्या लवकर सर्व नागरिकांना समजेल तितक्याच त्वरेनें ते आपल्या आनंदाचे वांटेकरी होतील, याच जणों कल्पनेनें, माणसांच्याकडून ही आनंदाची बातमी अल्प काळांत सर्व नगरभर पोंचणार नाहीं, ह्मणून ती कामगिरी त्यांनीं पुत्रजन्माच्या तोफा उडवून त्यांच्या करवीं केली. राजवाड्यांत तोफांचा गगनभेदी कडकडाट सुरू होतांच, सर्व नागरिक खडबडून उठले. राणी काशीबाईसाहेब गरोदर असून त्या अगदीं दिवसांत आहेत, ही बातमी सर्व नगराला माहित होतीच. कारण राजवाड्यांत गुप्त मानली जाणारी गोष्ट सर्व नगरांत सर्वांमुखीं बहुतेक झालेली असते, असा सर्वसाधारण नियम असतो. त्यांत पर्याय एवढाच असतो कीं, राजवाड्यांतली गुप्त गोष्ट ह्मणून ती गरिबांचे गुप्त गोष्टीप्रमाणें राजमार्गावर उघडपणें बोलावयाची नसते; एवढेंच. राजवाड्यांतली प्रत्येक बारिक सारिक गोष्ट सर्व नगराला माहीत असते; पण आपल्या वाड्यांतील कोणतीही गोष्ट बाहेर फुटत नाहीं, अशी राजाची मात्र प्रामाणिक समजूत असते. हें त्यांच्यांत विशेष आहे. ह्मणून पुत्ररत्न लाभल्याचा आनंद जगजाहीर करण्याकरितां तोफांचा दणदणाट सुरू करण्यांत येतो. ह्मणतांना मात्र जन्मलेल्या पुत्राला सलामी देण्याकरितां तोफांचे आवाज काढण्यांत येतात. मुलांचें जन्मकालीं गरिबांच्याही घरांतून आवाज काढण्याची पद्धत आहे. त्यांच्या घरीं तोफा किंवा बंदुका असणें शक्य नाहीं. तेव्हां दुधाची तहान ताकावरच त्यांना भागवून घ्यावी लागते. गरिब लोक मुलगा झाला अशी बातमी येतांच एक मोठा दगड विहिरींत जोरानें टाकून तोफेप्रमाणें आवाज काढण्याचा प्रयत्न करतात. पण अलिकडे ज्या शहर गांवांत नळाचें पाणी आल्यामुळें विहिरीचा अभाव झाला आहे, त्या ठिकाणच्या लोकांनीं ही जुनी रूढी पुढें चालू ठेवण्याकरतां कोणची युक्ति अंमलांत आणली आहे हें आमचे ऐकिवांत नाहीं. असो.

सलामीच्या तोफांनीं ही आनंदाची वार्ता सर्व नगरास एका क्षणांत कळविली. त्याबरोबर राजवाड्याशीं निकट संबंध असलेले लोक आपआपले उद्योगधंदे सोडून राजवाड्याकडे निघाले. सरदार, मानकरी, उपाध्ये, जोशी, गांवांतील प्रतिष्ठित लोक, शास्त्री, पंडीत, नोकर चाकर, आश्रित मंडळी यांना हां हां ह्मणतां वाडा गजबजून

गेला. गांवांतील मंगल वाद्यवादनकार लोकांनीं सर्व वाड्याला गराडा देऊन मंगल वाद्यांच्या सुस्वर आलापांनीं जिकडे तिकडे गर्दी करून सोडली. आपल्या घरची पुरुष मंडळी वाड्यांत गेलेली पाहून बायकाही राजवाड्यांत जाण्यालायक अशा वस्त्रालंकारांनीं सुभूषित होऊन भराभर वाड्यांत गोळा होऊं लागल्या. थोड्याच वेळांत कार्तिकी पौर्णिमेच्या दीपोत्सवाप्रमाणें तें राजमंदीर शोभूं लागलें.

## २ जन्मोत्सव.

राजकुलपरंपरानुसार नगरांत साखर वांटण्यापासून पुत्रजन्मोत्सवाला सुरवात होते. ही साखर हत्तीवरून वाजत गाजत मिरवत अशी वांटली जाते. त्या करितां रोशनगज, सरनाग, सुंदरगज, पूरणगज, पंपाकली, वगैरे हत्ती राजवैभवाची सहज कल्पना करून देणाऱ्या अलंकारांनीं आणि वस्त्राभरणांनीं नटून वाड्यासमोर येऊन उभे राहिले. खाशा पागेंतील घोडेस्वारही दुतर्फा येऊन उभे राहिले. साखरेच्या गोण्या असलेल्या गाड्याही तयार झाल्या. सरदार, मानकरी आणि इतर परिवार तयार होतांच श्रीमंत जानोजी महाराज आपल्या वडील पुत्राला समवेत घेऊन हत्तीवर आरुढ झाले. बरोबर श्रीमंत राघोजीराव मोहिते, श्री. आबासाहेब गुजर, श्री. बापूसाहेब गुजर, श्री. रामचंद्रराव शिर्के, श्री. भाऊसाहेब काळू वगैरे सरदार मंडळी होती. पहिल्यानें वाड्यांतील देवघरांत श्रीरामचंद्रापुढें साखर ठेवण्यांत आली. नंतर केळीबागेचें मंदिर, श्रीजागोबाचें मदिर, श्रीखंडोबाचें मंदिर, श्रीकाशीबाईचें मंदिर या ठिकाणीं साखर ठेवण्याकरितां खुद्द जानोजी महाराज गेले होते. नंतर ते वाड्यांत परत आले आणि नागपूर नगरांत साखर वांटण्याकरितां सरदार, मानकरी, उपाध्ये यांस हत्तींवरून पाठविण्यांत आलें. ही मंडळी वाजत गाजत पहिल्यानें राजा सुलेमानसाहेब, संस्थानिक, इस्टेट किल्ला यांस साखर देण्याकरितां गेली. नंतर तेथून श्रीमंत सरदार येशवंतराव गुजर, श्री. सरदार आबासाहेब गुजर, श्री. राघोजीराव मोहिते, श्री. रामचंद्रराव शिर्के, श्री. सरदार नानासाहेब अहेरराव, श्री. सरदार प्रतापगव गुजर, श्री. जिजाबा मोहिते, श्री. तात्यासाहेब मोहिते, श्री. जिजाबा शिर्के वगैरे सरदार मंडळींच्या घरीं व त्याचप्रमाणें

श्री. अण्णासाहेब व आबासाहेब राजोपाध्ये, वे. शा. सं. देवजी धर्माधिकारी, वे. शा. सं. भाऊशास्त्री घुले, वे. शा. सं. भटजीशास्त्री घाटे नैय्यायिक, वे. शा. सं. गजाननबावा वखे नैय्यायिक, वे. शा. सं. रामचंद्रशास्त्री घोंगे, वे. शा. सं. नानाजी धुंडिराज ग्रामजोशी, श्री. काळू, चिटणीस, फडणीस, सुभेदार, कप्तान वगैरे सरदार, मानकरी, शास्त्री, पंडीत, वगैरे झाडून सर्वांचे घरीं हत्तीवरून साखर पोंचविण्यांत आली. त्याप्रमाणें किफायतखां नबाबसाहेब यांचेकडेही साखर देण्यांत आली. याप्रमाणें दिवसभर सर्व नगरांत मंगलवाद्यांच्या नानाविध राग-रागिणींच्या मधुर आलापांतून साखर वांटण्यांत आली. त्यामुळें नागपूर शहरभर आनंदीआनंद होऊन गेला.

पहिला दिवस अशा प्रकारें धांदलीचा गेला. दुसऱ्या दिवसापासून निर-निराळ्या गांवची आप्त, सोयरे, गांवखेड्याचे व तालुक्यावरील कामदार, जमीनदार वगैरे मंडळी येऊं लागली. त्याचप्रमाणें भट, भिक्षुक, शास्त्री, पंडीत, पुराणीक, कीर्तनकार, गवई, बहुरूपी, भाट, तमासगीर, दंडारवाले, साधु, संत वगैरे नाना प्रकारचे लोक, नाना रूपांनीं जानोजी महाराजांचें अगत्यानें दर्शन घेऊं लागले. प्रत्येकानें निरनिराळ्या पद्धतीनें राजे बहादुरांचे गुणाचे व भाग्याचे स्तुतिपाठ पढून त्यांच्या आनंदांत भर टाकण्याला सुरवात केली. या आनंदाच्या महोत्सवांत राजे बहादुरांच्या दर्शनाला कोणालाही मज्जाव नव्हता. याचा फायदा गांवांतील व परगांवांतील ज्योतिषांनीं पूर्णपणें घेतला. जन्माला आलेल्या मुलाचें राजे बहादुरांना संतोष वाटेल असें मनाला येईल, त्याप्रमाणें भविष्य वर्तवून स्वतःचें नशीब पारखून पाहण्याचा हा एक शुभ प्रसंग लाभल्याबद्दल ज्योतिषांना आनंद वाटला असल्यास नवल नाहीं. एका मागोमाग एक असे कित्येक ज्योतिषी राजे बहा-दुरांच्या दर्शनाला आले. प्रत्येकानें आपलें जुन्या पोथ्या, पुस्तकें वगैरे साहित्य बरोबर घेऊनच राजमंदिरांत प्रवेश केला होता. प्रत्येक ज्योतिषी आपली निरनिराळ्या प्रकारानें तारीफ करून त्यांना आपला परिचय करून देत होता. जानोजी महाराजांना न्याय, तर्क, साहित्य या शास्त्रांप्रमाणें ज्योतिषशास्त्राचाही नाद असे. पहिले पांच सहा दिवस साखर वांटणें, पाहुण्याचें आगत स्वागत करणें, भेटीस आलेल्या लोकांचें प्रिय भाषणानें समाधान करणें, सटवीपूजन वगैरे करणें, या बाबतींत त्यांना या ज्योतिषी लोकांकडे लक्ष द्यावयाला फुरसत मिळाली नाहीं.


नंतर बारशाचे दिवशीं नामकरणाकरितां ज्योतिषांची त्यांना जरूरी भासली व मुलाची कुंडली मांडून त्याच्यासंबंधीं विचार-विनिमय करण्याचें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें आपला अनुभव व विद्वत्ता दाखविण्याकरितां त्यांनीं प्रत्येक ज्योतिषाला सवड दिली. जानोजी महाराज जाणून होते कीं, हे ज्योतिषी केवळ पोटभरू आहेत. त्यांची आपणाला संभावना केली पाहिजे. शिवाय आपला गौरव झाला, असेंही त्यांना वाटलें पाहिजे आपल्या या आनंदाच्या प्रसंगीं कोणीही असंतुष्ट राहतां उपयोगाचें नाहीं म्हणून प्रत्येक ज्योतिषाला त्यांनीं मुलाची पत्रिका बारशाचे दिवशीं तयार करून घेऊन येण्यास हुकूम दिला. पण जन्मकाल--निर्णय झाल्याशिवाय पत्रिका तरी बरोबर जातकाला कशी उतरणार, म्हणून तो ठरविण्याकरितां किल्ल्यांत रमाबाई व भुलाबाई या दोघी सुईणी होत्या, त्यांच्या कसून जबान्या घेण्यांत आल्या. सूर्य अंदाजें किती घटका वर आला होता ? सूर्योदयानंतर किती वेळानें मुलगा जन्मला. मुलगा जन्मला त्या वेळीं ऊन कांठें पडलें होतें ? वाड्याची छाया कोणत्या ठिकाणीं होती ? ग्रामजोशी वाड्यांत बरोबर साडे नऊ वाजतां आले, त्या वेळीं पुत्र जन्म होऊन किती वेळ झाला होता, वगैरे वगैरे उलटसुलट प्रश्न विचारून त्या सुईणींना त्या ज्योतिषांनीं पुरें पुरें करून सोडलें. त्याचप्रमाणें जोशीबुवांचीही तपासणी झाली. शेवटीं बरोबर वेळ जमल्यामुळें ते ज्योतिषी आपआपल्या घरीं पुढील उद्योगाला लागण्याकरितां गेले आणि आपली विद्वत्ता जेवढी होती नव्हती तेवढी खर्च करून पत्रिका तयार करण्याच्या खटपटीला लागले.

कित्येक वेळां कामधंद्याच्या उद्योगी माणसांना ज्योतिषावर वादविवाद करीत बसणाऱ्या लोकांचा फार राग येतो. हा वाद त्यांना अगदीं निरर्थक आणि केवळ काळाचा आणि विचारांचा अपव्यय केल्याप्रमाणें वाटतो. ज्यांच्या अंगीं कर्तृत्वशक्ति नाहीं व ज्यांना उद्योगधंदा करून पोट भरण्याचें सामर्थ्य नाहीं, त्या लोकांनीं हा लोकफसवी मार्ग शोधून काढला आहे, अशी त्यांची समजूत असते. पण जे पिढीजात ज्योतिषी आहेत, ते या लोकांच्या समजुतीला थोडीच भीक घालायला बसले आहेत ! शिवाय त्यांना श्रीमंत राजघराण्यांतील पत्रिका करण्याचा हा योग चुकूनच यायचा. तो आल्यामुळें प्रत्येक ज्योतिषाचे आंगांत त्यामुळें चांगलाच संचार झाला. त्यांनीं आंकडे मोडावयाला सुरवात केली. मोठमोठे ग्रंथ उलथेपालथे केले. जेवण नाहीं. झोंप नाहीं. पत्रिकेशिवाय दुसरा ध्यास नाहीं. अशी त्यांची स्थिति झाली.

शिवाय जानोजी महाराज स्वतः ज्योतिषांत तज्ञ असल्यामुळें आपली केलेली पत्रिका त्यांचे मनाला पटली तर आपणाला चांगलेंच पारितोषिक मिळेल व आपली कीर्ति होईल, या विचारानेंही प्रत्येक ज्योतिषाचें गणिती डोकें शास्त्रांत जास्त जास्त खोल शिरूं लागलें होतें. शेवटीं बारशाचा दिवस उजाडला. सर्व ज्योतिषांनीं आपण तयार केलेलीं पत्रिकेचीं गुंडाळीं वाड्यांत राजे बहादुरांस आणून दिलीं. परंतु त्या सर्व पत्रिकेंत चमत्कार हा होता कीं, एका पत्रिकेंतील जातकाचा दुसऱ्या पत्रिकेशीं तिळमात्र संबंध असेल तर शपथ ! त्या सर्व पत्रिका घड्याळें दुरुस्त करणाऱ्याच्या दुकानांतील घड्याळांप्रमाणें होत्या. त्या घड्याळांकडे पाहिल्यानंतर ज्याप्रमाणें खरी वेळ दाखविणारें घड्याळ कोणतें, हें सांगणें अशक्य होतें, त्याप्रमाणें त्या पत्रिकांतील खरी पत्रिका कोणती हें ठरविणें कठीण होतें शेवटीं त्या सर्व पत्रिका बाजूस ठेवून जानोजी महाराजांनीं आपल्या ग्राम जोशांनीं तयार केलेली पत्रिका वाचून पाहिली व तीच त्यांना योग्यही पण वाटली. त्यांतील जन्मकुंडली येणेंप्रमाणें.

## जन्म-कुंडली

श्रावण शु॥ १३ रोज
बुधवार शके १७९९
ईश्वरनाम संवत्सरे




ता. २१ माहे आगष्ट
सन १८७७ इ.

राशी कुंडली, भावचलित कुंडली, नवमांश कुंडली वगैरे ज्या ज्या कुंडल्या मांडतां येणें शक्य होतें, तेवढ्या सर्व मांडण्यांत आल्या होत्या. महादशा, त्यांतील अंतरदशा पाहून जेवढें सूक्ष्म गणित करून राजेसाहेबांचें विधिलिखित लेखन करतां येण्यासारखें होतें, तेवढें ज्योतिषांनीं आपल्या बुद्धीप्रमाणें आपापल्या पत्रिकांतून लिहून ठेवलें होतें. परंतु वर सांगितल्याप्रमाणें कोणत्याही ज्योतिषाच्या जातकाचा मेळ एकमेकांशीं पडला नाहीं. परंतु राजे बहादूर यांचे जे आश्रित ग्रामजोशी होते त्यांनीं वर्तविलेल्या जातकाचा खालीलप्रमाणें सारांश आहे. व तो आमचे चरित्रनायकाचे चरित्राशीं बहुतेक जुळत असल्यानें येथें देत आहों.

**कुंडलीची फलश्रुतिः**—बालराजे जरी छत्रपति झाले नाहींत, तरी छत्रपती-प्रमाणें त्यांना लोकमान्यता मिळेल. कर्णाप्रमाणें ते दानशूर होतील. मातेच्या ठिकाणीं नितांत भक्ति राहील. बंधुप्रीतीबद्दल रामलक्ष्मणाप्रमाणें त्यांचा नांव-लौकिक राहील. पितृसौख्यापेक्षां मातृसौख्य जास्त. हे अजात-शत्रू होतील. प्रत्येक कलेंत यांची चांगली प्रगति होईल. द्विभार्या योग. पुत्रसंततीपासून सुख आणि कीर्तीची वाढ. देवब्राह्मणांचे ठिकाणीं पूर्ण श्रद्धा. धार्मिक कामांची मनापासून आवड. स्वकुलाचा व वाडवडिलांविषयीं मनापासून आदर. विरागी वृत्ति. परताप-सहिष्णुत्वाचा स्वभावधर्म. तीर्थयात्रेकडे मनाचा अहर्निश ओढा. स्वार्थापेक्षां परहित—कार्याची तळमळ. स्वतःचे हातून अनेक मंगल प्रसंग घडून येण्याचे योग. राजदरबारीं बहुमान्यता. सार्वजनिक कामाची आवड. वगैरे वगैरे गोष्टी स्थूल मानानें त्यांनीं वर्तविल्या होत्या.

जुन्या पद्धतीच्या ग्रामजोशांनीं त्या वेळीं वर्तविलेलें वरीलप्रमाणें जातक चरित्र-नायकांच्या सर्व आयुष्याचा विचार करितां बहुतेक बरोबर ठरलें. आणि हें पूर्व वर्तवि-लेलें विधिलिखित पुढें बऱ्याचशा प्रमाणांत खरें ठरतें, असें कित्येक बाबतींत अनुभ-वाला येतें, ह्मणूनच कित्येक दैववादी लोक कुडबुडे जोशांचे मागें लागतात व स्वतःची फसगत करून घेऊन पस्तावतात; व शेवटीं ज्योतिषाला नांवें ठेवतात. नेहमीं शास्त्र हें खरें असतें. पण आपण शास्त्र जाणतों असें ह्मणणारे जोशी किंवा ज्योतिषी मात्र नेहमीं खरें मिळतातच, याचा कांहीं नेम नाहीं. शास्त्रांवर विश्वास बसावयाला विश्वासु शास्त्रीच निपजावे लागतात.

बारशाचा समारंभ राजकुलाला साजेल असा टोलेजंग करण्यांत आला. लहानापासून थोरापर्यंतच्या सर्वांच्या हौशी पुरविण्याचा हाच प्रसंग होता; बारशाचें पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध वगैरे होऊन नामकरण झालें. नक्षत्रपरत्वें ' जगदीश ' पण लौकिक नांव ' लक्ष्मण ' ठेवण्यांत आलें. आपणाला अपत्य व्हावें, या चिंतेंत असलेल्या जानोजी महाराजांना राम-लक्ष्मणाची जोडी लाभल्यामुळें त्यांच्या आनंदाला सीमा नव्हती. सकाळीं धार्मिक विधी वगैरे आटोपल्यानंतर आलेले अहेर स्वीकारण्यांत आले. अहेर किती आले ते सांगतां पुरवत नाहीं. बायकांनीं मुलाला पाळण्यांत घालून आपल्या हौसा पुरवून घेतल्या. त्यांचा पाळण्यांत मुलाला घालून पाळणे ह्मणण्याचा कार्यक्रम किती तरी वेळ चालला होता.

या बारशानिमित्त जवळ जवळ आठ दहा दिवस गांवभोजनें चाललीं होतीं. अहेर आणलेल्या लोकांना त्यांच्या पद्धतीनें परत अहेर करण्यांत आले. त्याचप्रमाणें हेलकरणी, घटवाले, कासार, माळणी, तेलणी, जिनगार, सोनार, सुतार, लोहार, धीवर वगैरे लोक वाजत गाजत राजवाड्यांत आपापले अहेर घेऊन येऊन इनाम घेऊन गेले. त्याचप्रमाणें ज्योतिषी, शास्त्री, भिक्षुक, जोशी, पुराणीक, कीर्तनकार, गवई, वगैरे लोकांचीही उत्तम प्रकारें संभावना करण्यांत आली. भालदार, चोपदार, बहुरूपी, भाट, वाघे, मुरळ्या, तमासगीर या लोकांना भोजनें देऊन त्यांना इनामें वाटून त्यांच्या आजपर्यंतच्या खासगी कामगिरीचें चीज करण्यांत आलें. वे. शा. सं. बाळाभाऊ राजवैद्य, सुईणी, बारेकरणी यांनाही इनामें देऊन गौरव केला. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे या बारशाचा उत्सव जवळ जवळ एक महीना चालला होता. सर्व नगर आनंदानें भरून गेलें होतें. जानोजी महाराजांना जिकडे पहावें तिकडे आनंदीआनंदच दिसे.

## ३ बालपण.

आमचे चरित्रनायक चंद्रकलेप्रमाणें हलके हलके वाढूं लागले. “ होते झाडका चिकणापान ” अशी हिंदींत ह्मण आहे. पुढें वृक्ष कोणच्या दर्जाचा निपजणार हें पूर्वी त्याच्या पानांवरूनच अनुमान काढतां येते. त्याप्रमाणें राजेसाहेब लहानपणापासूनच निरोगी व बाळसदार होते. ते दहा महिन्यांचेच चालूं लागले व बोलूंही पण लागले. त्यांना तीन वर्षें पुरीं झालीं, तेव्हां यांना खेळायला राजवाडा पुरेनासा झाला. रोज नानाप्रकारच्या लीला दाखवून मातापितरांना व त्याचप्रमाणें इतर मंडळींना ते आनंदीत करीत. आधींच त्यांचा गौरवर्ण. चित्ताकर्षक अशी चेहऱ्याची ठेवण, गुटगुटीत असा आंगलोट, पाणीदार डोळे, हास्यवदन, यामुळें त्यांना पाहिलें कीं कोणालाही मोह उत्पन्न होई. जानोजीमहाराजांना त्यांनीं आपला फारच लळा लावला. त्यांचें देवादिकांत फार लक्ष. ते स्नान, संध्या, पूजा-जप करीत, त्या वेळींही या बालराजांनीं त्यांच्याच जवळ बसावें व ते जें जें करतील त्याचा त्याची त्यांनीं नक्कल करावी. ते जेवायाला बसले कीं त्यांच्या ताटांत यांनीं

जेवायाला बसावें. भजनाला बसले कीं त्यांचेप्रमाणेंच मांडी ठोकून आपण टाळ्या वाजवीत भजन होईपर्यंत त्यांचेच जवळ बसावें. याप्रमाणें बालराजांच्या बाललीला पाहून जानोजी महाराजांना धन्यता वाटे. आपल्या दोघां मुलांनाही भजनाची आवड आहे असें पाहून त्यांनीं या राघव—लक्ष्मणाला रामदासी पद्धतीचे पोषाख केले. भगवी कफनी, भगवी टोपी, हातांत चिपळ्या असा त्यांचा गमतीचा पोषाख बनविला. भजनाचे वेळीं तो घालून भजनी मंडळांत त्यांना ते आणीत असत. " जातीच्या सुंदरांना कांहींहीं शोभतें. " त्यांना भगवे कपडे घातले. रामदासी बनविलें तरी त्या पोषाखांतही ते नयनमनोहरच दिसत. भजनाचे वेळीं या दोघांनाही " जयजयविठ्ठल, जयहरिविठ्ठल, " ह्मणून ते नाचायाला लावीत. दोघेही बंधू तेव्हां मोठ्या आनंदानें नाचत. तें पाहून सर्वांस आनंदाचें भरतें येई. या आनंदाच्या भरांत एका मागोमाग एक असे सारखे दिवस जाऊं लागले. आनंदाचे दिवस केव्हांच भर्रकन जातात, याचा पत्ता लागत नाहीं. जानोजी महाराजांची हौस मात्र दिसेंदिवस वाढूं लागली होती.

# ४ पितृवियोग.

वडील मुलगा सात वर्षांचा होतांच त्यांचा उपनयन समारंभ साजरा करण्यांत आला. नागपूरकर भोंसल्यांकडे वेदोक्त कर्म पूर्वापार चालत असल्यामुळें रघोजींचें उपनयन मोठ्या थाटाच्या समारंभानें ' वेदोक्त ' पद्धतीनें झालें, हें कांहीं सांगावयास नको. उपनयन होऊन वर्ष दोन वर्षें लोटतात न लोटतात तों जानोजी महाराजांनीं त्यांचें लग्नही करून टाकलें. सातारच्या मोहित्यांची मुलगी सुमारें ४।५ वर्षांची नाकाडोळ्यांनी उत्तम व चलाख अशी पाहून ती वधु निश्चित केली आणि लग्नसमारंभ मोठ्या धुमधडाक्यानें नागपूरकर भोंसले राजघराण्याच्या पूर्वपरंपरेनुसार वेदोक्त पद्धतीनें करण्यांत आला. याप्रमाणें आपले इच्छेनुसार व हौसेनुसार हीं मंगल कार्यें करून प्रपंचसुख आनंदानें अनुभवीत व परमार्थाचें साधन करीत असतां ता. ५ डिसेंबर सन १८८१ इ. रोजीं जानोजी महाराज कैलासवासी झाले !



श्रीमंत राजे लक्ष्मणराव वय वर्षे ४

[K P.Z P, B.]

पृष्ठें ११०-१११.




श्रीमंत राजे लक्ष्मणराव वय वर्षे ८

पृष्ठे ११०-१११ [ K. P. Z. P. B. ]

जानोजी महाराजांच्या मृत्यूनें त्यांच्या राण्यांवर दुःखाचें आकाश कोसळलें राणी लक्ष्मीबाई यांस भागरिथीबाई या एक राणी; अंजिरावाईस रघोजी व बन्यासाहेब अशीं दोन व राणी काशीबाई यांस लक्ष्मण ह्मणजे आमचे चरित्र नायक हें एकच,अशीं आपत्यें होतीं. नंतर पुढें त्यांच्या इस्टेटीचें रीतसर कोर्ट ऑफ वॉर्ड्स झालें. त्यामुळें तीनही राण्यांवर आपापल्या मुलांचें संगोपन करण्याचा भार पडला. त्यांतल्या त्यांत राणी काशीबाईसाहेब या लहान. त्या कालपर्यंत जबाबदारी ही काय वस्तु आहे, याची त्यांना कल्पना नव्हती. प्रसंग तर बिकट ओढवलेला ! तेव्हां अशा स्थितींत आपल्या पांच वर्षांच्या बालकाकडे पाहून दिवस कंठण्याचें त्यांचे नशीबीं परमेश्वरानें आणलें. तशा स्थितींत आशेचा व मायेचा त्यांना एकच अंकुर होता. त्याचेकडे पाहून सर्व दुःख गिळून हा मुलगा हेंच आपलें सर्वस्व, ही भावना दृढ करून त्यांनीं नशीबीं आलेले दुःखाचे दिवस समाधानानें व धीरानें कंठण्यास सुरवात केली.

# ५ शिक्षण

## एकश्चंद्रस्तमो हन्ति न च तारागणोऽपि च ।

राणी काशीबाई यांच्यावर अल्प वयांत दुःखाचा पर्वत कोसळला. त्या दुःखमय अंधःकाराचा नाश करण्याची पात्रता एकाच चंद्ररूपी गुणी पुत्राचे ठिकाणीं येणें अवश्य होतें. आपलें दुःख विसरण्याला आपला मुलगा गुणी निपजला पाहिजे, ही त्यांची इच्छा होती. आपला मुलगा शहाणा व्हावा, वडिलांप्रमाणें सर्व क्षत्रिय-कर्मांत पारंगत व्हावा. लोकांनीं मुलाचें शहाणपण पाहून व त्याची चालचलणुक पाहून समाधान व्यक्त करावें, अशा पद्धतीचें शिक्षण मुलाला देण्याचा त्यांनीं विचार ठरविला. मुलांना लहानपणीं आई जें शिक्षण देईल, त्याच शिक्षणाच्या अनुरोधानें त्यांचें पुढील आयुष्याचें भवितव्य असतें, हें राणी काशीबाई जाणून होत्या. छत्रपति शिवाजी महाराजांना त्यांचे आईनेंच शिक्षण देऊन तयार केल्यामुळें त्यांनीं पुढें आपली कीर्ति दिगंतरीं पसरविली. तेव्हां आपल्या मुलाला शिवाजी महाराजांचेंच

ध्येय पुढें ठेवून शिक्षण द्यावें असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें आपण जिजाबाई व मुलगा शिवाजी अशी मनाची भावना करून त्याचप्रमाणें त्याला शिक्षण देण्याचा उपक्रम त्यांनीं सुरू केला.

मुलाला प्राथमिक शिक्षण देण्याकरितां राणी काशिबाई साहेब यांनीं शहाण्णव कुळी बाजीराव या नांवाच्या एका मराठा शिक्षकांची नेमणूक केली. हे बाजीराव जुन्या पद्धतीचे, काळजीपूर्वक शिकविणारे असे होते. त्यांनीं पहाटें पांच वाजतां वाड्यांत यावें. बालराजांना हांक मारून उठवावें. आपले देखरेखीखालीं त्यांचें मुखमार्जन वगैरे आटोपून घ्यावें. नंतर भूपाळ्या, प्रातःस्मरणाचे श्लोक वगैरे ह्मणून झाल्यावर त्यांनीं त्यांच्या नित्य शिक्षणाला प्रारंभ करावा. हें शिक्षण सकाळीं ९ वाजेपर्यंत चाले. नंतर पुन्हां ते दुपारीं दोन वाजतां येत. दोन वाजल्यापासून पांच वाजेपर्यंत पुन्हां नित्य शिक्षणाचा अभ्यास घेतला जाई. पांच वाजले कीं त्यांचे शाळेला सुटी होई. नंतर भूक लागली तर थोडें कांहीं खात व लगेंच साडे पांचाचे सुमारास राजसाहेबांचे बालगोपाल मित्र वाड्यांत येत. त्यांना बरोबर घेऊन बाजीराव खेळण्याकरितां हत्तीखान्यांत जात. तेथें त्यांच्या देखरेखीखालीं आट्यापाट्या, विटीदांडु, खो खो वगैरे खेळ अस्तमान होईपर्यंत तीं सर्व मुलें मनमुराद खेळत. दिवे लावणी झाल्यावर राजेसाहेब व त्यांचे खेळगडी यांस बरोबर घेऊन वाड्याच्या पहिल्या चौकांत राणी काशीबाई साहेब बसत, तेथें बाजीराव जात. तेथें गेल्यावर राजे साहेब मातोश्रींना मुजरा करीत. त्यांना निराळें बसण्याकरितां आसन असें, तेथें बसण्याचा त्यांना हुकूम मिळे. नंतर बाकीचीं मुलें मुजरे करीत व तीं एका रांगेनें उभेच रहात. या वेळीं त्या सर्व दिवसांत मुलाला जें शिकविलें असेल व जें जें कांहीं नवीन घडलें असल तें तें शिक्षण राणी काशीबाई साहेबांना कळवीत. मुलाकडून कांहीं चूक झाली असल्यास त्याच वेळीं त्याचा निवाडा करण्यांत येई. शिक्षकांचा सर्व दिवसाचा मुलाच्या शिक्षणाच्या बाबत रीपोर्ट ऐकल्यानंतर राजेसाहेबांचे खेळगडी यांची चौकशी करण्यांत येई. कोण आला, कोण नाहीं, कोणी आजारी आहे काय, कोणाला औषध पाण्याची जरूरी आहे काय, कोणत्या मुलाला पुस्तकाकरितां अगर फीकरितां पैशाची जरूरी आहे, कोणाला कपडे, कोणाला जेवण, वगैरेबद्दल प्रत्येक मुलाची चौकशी होई. कोणाची कांहीं अडचण असल्यास ती राणी काशीबाईसाहेब ताबडतोब दूर करीत. याप्रमाणें

मुलांची चौकशी झाल्यानंतर त्यांना घरीं जाण्याला परवानगी देण्यांत येई, व तीं मुलें पुन्हां मुजरे करून आपापल्या घरीं जात. असा हा रोजचा कार्यक्रम होता.

" मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, " अशी एक ह्मण आहे, तीं बहुतांशीं खरी आहे. लहान मुलाच्या वागणुकीवरून तो पुढें कशा प्रकारचा होईल याचा सामान्य रीतीनें तर्क बांधतां येतो. आमच्या बालराजांचा असा स्वभाव होता कीं, त्यांना एकस्थानें बसून जेवणें आवडत नसे. आपल्या बरोबरीचीं पांच दहा मुलें आपल्याजवळ बसवून घेऊन सर्वांनीं मिळून जेवलें, तरच त्यांचें जेवण बरोबर होई. नाहीं तर त्यांना अन्नच गोड लागत नसे. हा मुलाचा स्वभाव पाहून त्यांच्या वडिलांचाच स्वभाव मुलांत बरोबर उतरला, असें राणी काशीबाईसाहेब ह्मणत. यामुळें स्वतः राणीसाहेब, बालराजे, त्यांची बालमित्र मंडळी, नोकरमंडळी, आश्रित मंडळी वगैरे सर्वांना पंक्तीला घेऊन जेवण्याची व्यवस्था असे. जें आपल्या ताटांत तेंच सर्वांच्या ताटांत बरोबर आहे कीं नाहीं, ही दक्षता राणीसाहेब घेत. बालराजे जेवतांना मंडळीबरोबर हंसत खेळत जेवीत. आपल्याप्रमाणेंच सर्वांनीं आनंदानें जेवावें, असें त्यांना वाटे. हाच बालपणचा त्यांचा स्वभाव अखेरपर्यंत तसाच राहिला होता.

अशा तऱ्हेनें दोन तीन वर्षें केव्हांच गेलीं. राजे साहेबांचा उपनयन समारंभ राजघराण्याला शोभेल असाच झाला. त्याच वर्षी त्यांची मराठी चवथी इयत्ता संपली होती. इंग्रजीला सुरवात करावयाची तेव्हां निराळ्या शिक्षकाची योजना करण्याचें ठरलें नागपुरीं राघोबा बावीस्कर या नांवाचे एक विद्वान शिक्षक होते. हे अत्यंत शुचिर्भूत साधुवृत्तीचे, निःस्पृही राजकारणकुशल, धर्मशील अशा गुणांनीं संपन्न असल्याची नागपुरीं ख्याति होती. मुलाच्या शिक्षणाच्या बाबतींत राणीसाहेबांचें धोरण महत्त्वाकांक्षी होतें. मुलाला शिकविण्याकरितां बावीस्कर यांना बोलावून घेऊन त्यांना राणीसाहेबांनीं आपले मनोगत कळविलें. त्याप्रमाणें बावीस्कर यांनीं राजेसाहेबांच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्याकडे घेतली.

या राघोबा बावीस्करांची योग्यता फारच थोर होती. राजसाहेबांना ते शिकवूं लागल्यापासून त्यांना विनोदानें दादाजी कोंडदेव असें कांहीं मंडळी ह्मणत. नियमितपणाबद्दल त्यांची फार तारीफ असे. दैनिक शिक्षणाचा अभ्यासक्रम आटोपल्या-

नंतर ते मास्तर, राजेसाहेबांना एकादी बोधपर अशी गोष्ट सांगत. सामान्यतः मुलांना गोष्टी फार प्रिय असतात. व ज्या गोष्टींचा लहानपणीं त्यांच्या मनावर परिणाम होतो, त्या गोष्टी अखेरपर्यंत विसरल्या जात नाहींत. एवढेंच नव्हे, तर त्या गोष्टी ऐकून आपणही तसेंच होण्याचा प्रयत्न मुलें स्वाभाविकपणें करूं लागतात. बावीस्कर मास्तर राजेसाहेबांना रामायण, महाभारत यांतील कथा सांगत. त्याचप्रमाणें शिवाजीमहाराज वगैरे इतिहासप्रसिद्ध थोर व कर्त्या पुरुषांच्याही गोष्टी सांगत. त्या गोष्टी राजेसाहेबांना मनापासून आवडत. शिवाजीमहाराज लहान असतांना त्यांना दादोजी कोंडदेव यांनीं एक गोष्ट सांगितली होती. तीच गोष्ट या मास्तरनीं राजेसाहेबांना सांगितली. त्या गोष्टीचा परिणाम राजेसाहेबांच्या मनावर एवढा झाला होता कीं, त्या गोष्टीची ते नेहमीं आठवण करीत. ही गोष्ट विशेष बोधप्रद असल्यामुळें प्रसंग येईल त्या वेळीं ती कृतींत आणण्याचा राजेसाहेब प्रयत्न करीत. या गोष्टीनें राजेसाहेबांच्या चरित्रावर बराच प्रकाश पडणार आहे, म्हणून ती येथें देत आहों

# विश्वनगरी.

' विश्वनगरी ' या नांवाचें एक प्रसिद्ध नगर होतें. ' जगच्चालक ' नांवाचा राजा त्या नगरांत राहत असे. हा राजा सदाचरणी, सत्यभाषणी, सद्धर्माचरणानें वागणारा, असा असून आपल्या प्रजाजनांचें पुत्रवात्सल्यानें संरक्षण करणारा होता. त्यामुळें त्याच्या राज्यांतील प्रजाही राजावर पित्याप्रमाणें भक्ति करणारी, सदानंदी, सत्यभाषणी, परोपकारी, सदाचरणी अशीच होती. त्याच्या राज्यांत दुष्ट, पापी, अनीतिमान असे लोकच नव्हते. एकंदरींत त्याच्या राज्यांत दया, क्षमा, शांति आणि सुख हीं पूर्णपणें नांदत होतीं. त्याला ' हिंदुराज, ' ' इस्लाम ' जी आणि ' ख्रिस्त ' जी या नांवाचे तीन पुत्र होते. तिघेही पुत्र शहाणे, विचारी आणि सुस्वभावी असे असल्यामुळें तिघांवरही राजाचें सारखेंच प्रेम असे. पुढें राजाचा वृद्धापकाळ आल्यामुळें आपल्या मुलांत आपल्या पश्चात् तंटे भांडणें होऊं

नयेत, ह्मणून सरस निरस असे प्रदेश पाहून तिघांसही राज्याची सारखी वांटणी करून त्यानें दिली. त्याचप्रमाणें भांडारखान्याचेही सारखे तीन हिस्से करून तिघांस वांटून दिले. परंतु आणखी एका वस्तूची सारखी वांटणी कशी करावी याची राजाला मोठी पंचाईत पडली. राजाच्या गळ्यांत नवरत्नाचा एक कंठा होता. तो कंठा अमोल असल्यानें त्याची वांटणी करणें अगदींच अवघड होतें. किंमतीच्या दृष्टीनें तें जरी अवघड वाटण्यासारखें नव्हतें तरी त्या कंठ्यांत अशी एक जादू होती कीं, तो कंठा ज्याच्या गळयांत असेल, त्याच राजाच्या राज्यांत, शांति, सुख, सदाचार हीं नांदावयाचीं. हे सर्व गुण त्या कंठ्यांत असल्यामुळें तो कंठा तोडून त्याची वांटणी समान करतां येईना. बरें, तो कोणत्या तरी एका मुलाला द्यावा, तर त्या गोष्टीलाहि राजाचें मन तयार होईना. कारण राजाचें आपल्या तीनही पुत्रांवर सारखेंच प्रेम होतें. ह्मणून त्याला विचार पडला. अशा विचारांत तो निमग्न असतां त्याला एक युक्ति सुचली. त्यानें आपल्या राज्यांतील एका सुप्रसिद्ध आणि नामांकित कारागिराला बोलावून आणून त्याला तो कंठा दाखविला आणि त्याच्याकडून हुबेहूब त्याप्रमाणें असे तीन कंठे तयार करवून घेतले. ते पाहून राजाला फार आनंद झाला. त्यानें त्या कारागिराला योग्य पारितोषिक दिलें, आणि हे तीन कंठे नकली केल्याबद्दल कोणाजवळही न सांगण्याबद्दल त्यालाताकीद देऊन त्याची रवानगी केली.

पुढें राजानें आपल्या ‘ हिंदुराज ’ या वडील मुलाला जवळ बोलावून सांगितलें कीं, ‘बेटा, तूं माझा वडील मुलगा असल्यामुळें तुझ्यावर बाकीच्या तुझ्या दोन्हीं भावापेक्षां माझें प्रेम जास्त आहे, आतांपर्यंत माझ्या राज्याचे व संपत्तीचे सारखे वांटे करून तुह्मांला दिले आहेत. परंतु तुझ्यावर माझा जास्त लोभ असल्यामुळें तुला मी एक जास्त वस्तु देणार आहें. माझ्या गळ्यांतील हा कंठा तूं घे. हा कंठा घालणाऱ्याच्या राज्यांत सुख, शांति, सदाचरण, राजभक्ति, प्रजावात्सल्य वगैरे सर्व प्रकारें नांदून तो राजा कीर्तिमान, विजयी, आयुष्यमान, ऐश्वर्यवान असा होण्याची या कंठ्यांत जादू आहे. तेव्हां हा अमोल कंठा मीं तुला स्वसंतोषानें दिला आहे. आतां माझी इह-

लोकचीं यात्रा संपत आल्यामुळें माझें असें जें माझ्याजवळ शेष राहिलें होतें, तें मीं तुला दिलें आहे. तरी तूं आतां माझी ही अंतःकरणाची वस्तु चांगल्या प्रकारें संभाळ. या वस्तूबद्दल तूं तुझ्या दुसऱ्या दोघां भावांना मात्र हें कांहीं सांगूं नको, ही गोष्ट तूं पूर्णपणें गुप्त ठेव. ' याप्रमाणें राजानें आपल्या वडील मुलास सांगितलें. त्याचप्रमाणें दुसऱ्या मुलाला एकांतांत बोलावून त्याला दुसरा कंठा देऊन वरीलप्रमाणें त्यालाही सांगून पाठविलें. तिसऱ्या मुलालाही तिसरा कंठा देऊन तेंच सांगितलें. तिघांनाही ही गोष्ट गुप्त ठेवण्याबद्दल बजाविलें. तिघेहि मुलगे बापाचें प्रेम सर्वांपेक्षां आपल्यावर जास्त आहे, असें समजून मनांत फार संतोषित झाले. आपल्या गळ्यांतील अस्सल कंठा मात्र राजानें कोणालाच दिला नाहीं. तो त्यानें नापत्ताच करून टाकिला.

पुढें थोडक्याच दिवसांत तो राजा दिवंगत झाला. तिन्हीं मुलांनीं मोठ्या उत्साहानें त्याचें दिवस—कार्य केलें. याप्रमाणें थोडे दिवस लोटतात न लोटतात, तोंच राजाचें प्रेम आपल्यावर जास्त होतें, हें दाखविण्याकरितां राजानें गुप्त तऱ्हेनें दिलेला आपआपला कंठा बाहेर काढून ते वापरूं लागले. क्रमाक्रमानें तिघां भावांचे तीनही कंठे बाहेर दिसूं लागले. जो तो आपला कंठा अस्सल व दुसऱ्या दोघांचे नकली असें ह्मणूं लागला. राजाचा प्रत्येक मुलगा, आपला कंठा अस्सल, तेव्हां आपल्यावरच राजाचें प्रेम जास्त. ह्मणून त्यानें आपणाला अस्सल कंठा दिला, ह्मणे. या कारणामुळें भावाभावात तंटे उत्पन्न होऊं लागले. राजपुत्रांत तंटे सुरू झाल्यामुळें त्यांचे पक्षांतील व राज्यांतील लोकांत भांडणें उपस्थित होऊं लागली. पहिल्यानें सामोपचारानें अस्सल कंठा कोणाचा, हें ठरविण्याचा प्रयत्न झाला. त्यांत अर्थात यश मिळणें शक्यच नव्हतें. कारण तिघेही राजपुत्र समान शक्तीचे व समान दर्जाचे होते. ज्याला त्याला मी श्रेष्ठ, असें वाटे. ह्मणून सामोपचाराचा प्रयत्न थकला. तेव्हां बहुमतानें आपला कंठा अस्सल ठरवून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. अर्थात या प्रयत्नाला द्रव्य खर्च करून प्रत्येक राजपुत्राला बहुमत मिळविण्याची खटपट करावी लागली. या खटपटीला राजपुत्रांचे खजिन रिकामे होऊं लागले. तरी त्याचा निकाल लागेना. हाही

प्रयत्न तिघांही राजपुत्रांना निष्फळ आहे असें दिसून आलें. तेव्हां त्यांच्या-मध्यें लढाया, मारामाऱ्या, लूट, खून वगैरे प्रकार सुरू झाले. या प्रकारामुळें त्यांच्या सर्व राज्यांत शांतता भंग झाली. पैशाचा तुटवडा भासूं लागला, प्रत्येक घरीं, प्रत्येक गांवीं, प्रांतीं कलह माजले. कोणाच्याही जीविताचा कोणाला भरंवसा वाटेनासा झाला. उद्योगधंदे बंद पडले. बेकारी माजली. असे नाना प्रकार त्यांच्या राज्यांत होऊं लागले. तेव्हां त्या राजपुत्रांना वाटूं लागलें कीं, आपल्या बापानें कंठ्यांतील अद्भुत जादू जी आह्मांला सांगितली तिच्या उलट सर्व प्रकार आपल्या राज्यांत होत आहेत, याचें कारण काय ? आपले वडील तर खोटें सांगणारे नव्हते. शिवाय त्यांची गोष्ट खोटी मानावी तर त्यांच्या वेळीं सर्व राज्यांत दया, क्षमा, शांति वगैरे निरंतर नांदत असलेली आपण स्वत: पाहिली आहे. मग हें असें कां होतें ? हें कोडें तिघांनाही सारखें पडलें व त्याचा उलगडा करण्याकरितां तिघेही राजपुत्र एकत्र जमले. बल आणि पैसा गेल्यावर समेटाची बुद्धि स्वाभाविक होत असते. तेव्हां हे तिघेही हतबल झाल्यानंतर एके ठिकाणीं जमून विचार-विनिमय करूं लागले. तिघांचेही पुढें हा एकच प्रश्न असल्यानें त्याचा उलगडा कोणालाच होईना. ह्मणून त्यांनीं असें ठरविलें कीं, आपल्या विश्वनगरीमध्यें विवेकशास्त्री नांवाचे एक साधुवृत्तीचे, निःस्पृही गृहस्थ आहेत, त्यांना याच्याबद्दल सल्ला विचारावा. तिघा राजपुत्रांनाही ती गोष्ट पसंत पडून ते त्याप्रमाणें त्या शास्त्र्याकडे गेले. त्यांनीं शास्त्रीबुवांना सर्व गोष्ट अथपासून इतीपर्यंत सांगितली. विवेकशास्त्री न्यायकुशल असल्यामुळें त्यानें या सर्व गोष्टीचा विचार केला. तो राजपुत्रांना ह्मणाला, ‘ बाबांनो, तुमचा तुमच्या पित्याच्या शब्दावर विश्वास आहे का ? ’ ते ह्मणाले, ‘ त्यांच्या शब्दावर आमचा पूर्ण विश्वास आहे. ’ ‘ मग तुह्मीं असें करा कीं, त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून वागण्याचा प्रयत्न करा. आणि तसें वागल्यानंतर ज्याच्या राज्यांत तुमच्या पित्यानें सांगितल्याप्रमाणें कंठ्यांतील जादूचे पूर्ण गुण दिसून येतील, त्याचा कंठा अस्सल आहे व बाकीचे दोन नकल आहेत, असें मी जाहीर करीन. ह्या कंठ्यांतील अस्सल कंठा ओळखण्याची ही कसोटी आहे. तेव्हां त्याप्रमाणें तुह्मी आपापल्या राज्यांत

जाऊन कंठ्यांत असलेले गुण दाखविण्याचा प्रयत्न करा. ह्मणजे कोणाचा कंठा अस्सल हें दिसून येईल. ' ही युक्ति तिघांसही पटली व ते आपला कंठा अस्सल, खरा, व श्रेष्ठ ठरविण्याच्या मार्गाला स्वतःच्या कृतीनें लागले. या गोष्टींतील तात्पर्य एवढेंच आहे कीं, सांप्रत जगामध्यें मुख्य तीन धर्म आहेत; हिंदु, इस्लाम, ख्रिस्त. हे धर्म परमेश्वराला सारखेच प्रिय आहेत. प्रत्येक धर्माचें रहस्य, दया, क्षमा, शांति, सदाचार वगैरे नीतीनें समाजानें वागावें हेंच आहे. असें असतां एका धर्माच्या अनुयायांनीं दुसऱ्या धर्माच्या अनुयायांशीं आपला धर्म अस्सल, आपला धर्म श्रेष्ठ ह्मणून भांडावें किंवा एकमेकांच्या धर्माचा नाश करण्याचा प्रयत्न करावा व त्यामुळें जगावर अनाचार, अनीति, शांतताभंग वगैरे गोष्टी व्हाव्या हें अस्सल व श्रेष्ठ धर्माचें काम नव्हे. धर्म हा दया, क्षमा, शांति वगैरे करतांच आहे असें असतां, जर त्या धर्मामुळेंच जगांत त्याच्या विपरीत गोष्टी घडून येऊं लागल्या, तर त्या धर्माला जगांत कोणती किंमत मिळेल ? ह्मणून आपला धर्म श्रेष्ठ व अस्सल आहे, असें जगाला कृतीनें पटवून दाखवावयाचें असेल, तर त्या धर्माच्या अनुयायांनीं दया, क्षमा, शांति वगैरे तत्त्वांनींच वागलें पाहिजे.

दादोजी कोंडदेव यांनीं ही गोष्ट शिवाजी महाराजांना सांगितली, ती त्यांचे मनाला इतकी पटली कीं या गोष्टीचें रहस्य त्यांनीं आपल्या कृतींत आणण्याचा नेहमीं प्रयत्न केला. कल्याणचा खजिना त्यांनीं लुटला, त्या वेळीं कल्याणच्या सुभेदाराची रूपयौवन—संपन्न अशी सून लुटींत सांपडली. त्या वेळीं ती शिवाजी महाराजांना नजर करण्याच्या हेतूनें लोकांनीं त्यांच्यापुढें आणली. हिंदु स्त्रिया आपल्या लुटींत सांपडल्या, ह्मणजे त्यांना इस्लामी धर्माची दीक्षा देऊन त्यांची आपल्या जनान्यांत रवानगी करण्याच्या मुसलमानांच्या कृतीला 'कंटकेनैव कंटकम्' या नीतीनें ही तोडीस तोड होती. कल्याणच्या सुभेदाराची सून शिवाजी महाराजांनीं आपल्या जनान्यांत ठेवावी व त्यामुळें मुसलमान लोकांचें नाक खालीं व्हावें या हेतूनेंच त्या स्त्रीला शिवाजी महाराजांना नजर करण्यांत आलें, असें दिसतें. पण शिवाजी महाराजांच्या मनावर वरील गोष्टीचा चांगलाच परिणाम झाला होता. त्यामुळें त्या स्त्रीला त्यांनीं मातृपदाचा मान दिला आणि वस्त्रालंकारांनीं तिचा गौरव करून

तिला पतिगृहीं मोठ्या सन्मानानें पाठविलें. या गोष्टीचें रहस्य एवढेंच आहे कीं, शिवाजी महाराज हिंदुधर्माच्या संस्थापनेकरितांच अवतीर्ण झाले होते, हें उघड होतें. त्यांना हिंदुधर्म हा मूळ धर्म ह्मणजे अस्सल धर्म आहे; हाच धर्म श्रेष्ठ आहे, याची जाणीव जगाला पटवून द्यावयाची होती. आणि ही गोष्ट पटवून देण्याकरितां शिवाजी महाराज यांच्या दुसऱ्या एका गोष्टीवरून खात्री होते. मुसलमान लोकांवर हल्ला करून लूट करण्यांत आली आणि लुटींत जर इस्लामी धर्माचा पवित्र ग्रंथ ह्मणजे ' कुराण ' सांपडलें, तर तो धर्मग्रंथ शिवाजी महाराज वंद्य मानून त्याला पालखींत घालून वाजत गाजत मुसलमान लोकांच्या गोटांत नेऊन त्यांच्या स्वाधीन करीत. या गोष्टीपासून आपण काय बोध घ्यावयाचा ? ज्या वेळीं मुसलमान लोक सांपडल त्या हिंदूला धरून इस्लामी दीक्षा देत. हिंदूला पवित्र असलेल्या-गाईचा वध करीत, हिंदूंचीं मंदिरें भ्रष्ट करून त्या ठिकाणीं मशिदी उभारीत, हिंदू स्त्रियांना जनान्यांत डांबून टाकीत, हिंदूंचे धर्मग्रंथ—जे वेद—ते जाळून टाकीत; अशा प्रसंगीं—अशी हिंदूधर्मावर इस्लामी धर्माची मोहीम चालली असतां—शिवाजी महाराजांकडून त्या मोहिमेला प्रतिउत्तर ह्मणून कल्याणच्या सुभेदाराची सून सन्मानानें पाठविण्यांत यावी आणि ' कुराण ' पालखींतून वाजत गाजत परत करण्यांत यावें, या गोष्टी आपणांला काय सांगतात ? हिंदुधर्म श्रेष्ठ किंवा इस्लामीधर्म श्रेष्ठ याचा निर्णय जगानें लावावा. शिवाजी महाराज आपलें शिर तळहातावर घेऊन हिंदुधर्माकरितां लढले. याचें कारण काय ? हिंदुधर्माचीं तत्त्वेंच एवढीं उदात्त व थोर आहेत कीं त्यामुळें तो धर्म मूलतः श्रेष्ठच आहे. असें असतां, अशा श्रेष्ठ धर्मावर आपत्ति आली, अशा सत्य धर्मावर संकट ओढवलें, तर त्याचें रक्षण करण्याकरितांच परमेश्वराचा अवतार होतो.

" यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥२॥

भगवद्गीतेंतील या प्रसिद्ध श्लोकांचाही भावार्थ हाच आहे. सत्य कधीं

मरत नाहीं. असत्याचा पगडा कितीही बसला व त्यानें सत्याला कितीही गाडून टाकण्याचा प्रयत्न केला, तरी केव्हांना केव्हां तरी सत्य हे बाहेर येणारच. सत्य हें अबाधित आहे. तें तसें आहे, ह्मणूनच तें सत्य आहे. त्याचप्रमाणें हिंदुधर्म किंवा सत्यधर्म हा अबाधित आहे. त्याच्यावर संकट आलें कीं तें निसर्गतःच एकाद्या अतिमानुष व्यक्तीच्याकडून दूर करण्यात येतें; अर्थातच अशा त्या अलौकिक व्यक्तीला ईश्वरी अवतार मानण्यांत येतें. हिंदुधर्म हा गंगेच्या पाण्याप्रमाणें शुभ्र आहे. गंगेच्या पाण्याला दुसऱ्या नद्यांचें पाणी मिळून मूळच्या शुभ्रपणांत कांहीं वेळपर्यंत विकृत रूप दिसलें, तरी तें गंगेचा प्रवाह थोडा दूर गेल्यानंतर पुन्हां शुभ्रच असलेलें आपल्याला दिसतें. तसेंच हिंदु धर्माचें आहे. कांहीं कारणामुळें हिंदुधर्मांत विकृति उत्पन्न झाली, तरी ती दर्शनीय असते. त्या विकृत स्थितींत पुन्हां संस्कार झाला कीं अल्पावधींत त्याचें शुभ्रत्व आपोआप पुन्हां दिसूं लागतें. सोनें अग्नीच्या संस्कारानें जास्त सतेज बनतें, तद्वतच हिंदुधर्म संकटाच्या संस्कारानें पूर्ववत् उज्ज्वल होतो. एवढ्याचकरितां तो क्षत्रियांचा केवळ कंठमणी झाला असून त्याच्या रक्षणाची जबाबदारी सर्वस्वीं त्यांच्यावरच आहे. आणि ती जबाबदारी पार पाडीत असतां त्यांचें जीवित वेंचलें गेलें, तर सत्यलोकाची प्राप्ति होते. ह्मणजे ती क्षत्रियकृति होते, अशी आपली दृढ भावना आहे.

अशा प्रकारच्या गोष्टी राघोबा बावीस्कर राजेसाहेबांना सांगत असत. कोणत्या ना कोणत्या तरी विषयावरून गोष्ट सांगत व तिचें तात्पर्य राजेसाहेबांचे मनावर पूर्ण बिंबवून देत. अशा प्रकारच्या गोष्टी सांगून त्या पटवून देण्याला शिक्षक जितक्या लायकीचा लागतो, तितक्याच दर्जाचा विद्यार्थीही असावा लागतो. राजेसाहेबांचा विशेष कल लहानपणापासून धर्माचरणाकडे असलेला पाहूनच त्यांचे शिक्षक त्यांना अशा प्रकारची शिकवणूक देत.

अशा प्रकारें राजेसाहेबांचा विद्याभ्यास राघोबा बावीस्कर यांचे नेतृत्वाखालीं पूर्ण समाधानकारक चालला असतां, क्षत्रियांना एकदेशीय विद्याभ्यास करून चालत नाहीं, त्यांना त्यांच्या वर्णाला योग्य असेंही शिक्षण पाहिजे, ह्मणून काशीबाई साहेबांनीं राजेसाहेबांचें उपनयन होतांच त्यांना कुस्ती, दांडपट्टा, फरीगदगा, लाठी, बिनोट, कुस्ती वगैरेंचें शिक्षण मिळण्याकरितां निरनिराळ्या वस्तादांची योजना केली.

# ६ कुस्ती.

शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ।

त्या वेळीं कोणत्याही विद्येचा अगर कलेचा गुरु किंवा वस्ताद करावयाचा ह्मणजे एक प्रकारचा समारंभ करण्याची पद्धत असे. आणि त्या पद्धतीनें गुरूनें एकदां आपल्या शिष्याला किंवा शागिर्दाला दीक्षा दिली कीं, त्या दिवसापासून तो अमक्या वस्तादाचा ह्मणून ओळखला जाई. नामांकित घराण्यांतील वस्तादचा शागीर्द होणें, हें एक प्रकारचें भूषण मानलें जात असें. ह्मणून राणी काशीबाई साहेब यांनीं राजेसाहेबांस कुस्ती शिकविण्याकरितां नागपूरच्या मालदार-पुऱ्यांतील छोटुमिया वस्ताद, यांची योजना करण्याचें ठरविलें. त्या वेळीं छोटुमिया वस्ताद यांचें वय अंदाजें ६० वर्षांचें होतें. या वस्तादांनीं आपल्या जवानींत फार मोठया कुस्त्या मारल्या होत्या. त्यांचा नांवलौकिक उत्तर हिंदुस्थानांत व त्याचप्रमाणें वऱ्हाड, सी पी. या प्रांतांत फार मोठा होता. कोण-त्याही मोठ्या दंगलींत छोटुमिया वस्ताद यांचा निर्णय सर्वमान्य ठरत असे. नाग-पुरांत सर्व आखाड्यांचे लोक त्यांना पहिला मान देत. ह्मणून काशीबाई साहेबांनीं त्यांस बोलावून राजेसाहेबांस त्यांचा शागीर्द करण्याचा समारंभ केला.

सामान्यतः अशा प्रकारचा समारंभ आखाड्यांत होत असतो; ह्मणून हा समारंभ राजवाडयांतील कुस्तीच्या आखाडयांत करण्यांत आला. या समारंभाकरितां राजेसाहेबांचे इष्टमित्र, आखाडयांतील मुलें, निरनिराळ्या आखाडयाचे वस्ताद वगैरेंना निमंत्रण देऊन बोलावण्यांत आलें. आखाडा शृंगारण्यांत आला. कुस्तीचे जागीं व आखाड्याचे इष्ट देवतेपुढें उदबत्त्या लावण्यांत आल्या. ऊद, कापूर, लावून इष्ट देवतेला हार चढविण्यांत आला. आणि नारळ फोडण्यांत आला. नंतर राजेसाहेबांनीं वस्तादांच्या गळ्यांत भला मोठा हार घातला. व त्यांना पागोटीं, दुपट्टा वगैरे राजघराण्याला शोभेल असा अहेर व दक्षणा दिली. त्याचप्रमाणें प्रसादाचें चांदीचें ताट भरून पेढे वस्तादांपुढें ठेवले. नंतर छोटुमिया वस्ताद यांनीं राजेसाहेबांना आपले जवळ बसवून घेतलें. त्यांचे गळ्यांत हार घातला. आणि आपल्यापुढील पेढ्यांचे ताटांतील एक पेढा घेऊन तो राजेसाहेबांचे तोंडांत घातला.

वस्तादनीं शागीर्दांच्या तोंडांत हा पेढा घालणें याला " तोंड भरणें " ही संज्ञा आहे. शागीर्द करणें ह्मणजे त्यांतील मुख्य तंत्राची हीच एक गोष्ट प्रधान असते. नंतर निमंत्रित मंडळींना हारतुरे, अत्तर गुलाब, प्रसाद देण्यांत आला. व राजेसाहेबांना लंगोटा बांधून वस्तादांनीं आखाड्यांत उतरविलें. त्या दिवशीं दोन पकडा राजेसाहेबांना दाखवून व मुहुर्त करून हा समारंभ आटोपण्यांत आला.

छोटूमिया वस्ताद राजेसाहेबांस उठविण्याकरितां पहांटे ४ वाजतां येत. त्यांना आखाड्यांत नेऊन त्यांचेकडून दंड, बैठक, मलखांब, करेला, जोडी वगैरें जुन्या पद्धतीची कसरत घेऊन नंतर त्यांस आखाड्यांत उतरवून आपले आंगावर कुस्ती लढवीत. याप्रमाणें सतत दहा वर्षें वस्तादनीं राजेसाहेबांना शिकविलें. आठवड्यांत एक दिवस गुरुवारीं मालिसीकरतां सुटी असे. त्या दिवशीं आपले नजरेखालीं राजेसाहेबांना मालीस करण्यांत येई. सतत सहा दिवस कसरत करून सातवे दिवशीं मालीस केलें ह्मणजे कसरतीची सर्व थकाण निघून जाई. व पूर्ववत् ताजें तवानें झाल्याप्रमाणें होत असे. या दहा वर्षांच्या शिक्षणांत वस्तादनीं आपले हातखंडे डाव राजेसाहेबांस वश करून दिले होते. दस्ती, कोनीटाल, मोंडा, बगल, दस्तरान, बाहेरी, भीतरी, घिस्सा, कलाजंग, पुट्ठी, आगलबंद, एकटंगी, सवारी, दख्खनीगिरा वगैरे डाव ते फारच सफाईनें करीत. कोणत्याही डावाची तोड ते उत्तम प्रकारें करीत. त्यांची सवारी इतकी भयंकर असें कीं केवढाही मोठा जवान असो, राजे साहेबांनीं एकदां सवारी भरली कीं त्या पहेलवानानें डोळे पांढरे केलेच ह्मणून समजावें. त्यांची कुस्ती मोठी मौजेची होई. कबुतरें लढल्याप्रमाणें त्यांची कुस्ती लोकांना वाटे. त्यांच्या प्रत्येक नसेनसेंत नवीन डाव भरला आहे, असें पहाणाराला वाटे त्यांचे वस्ताद पंजाबी पहेलवानांची शागीर्द असल्यानें उभ्या उभ्यान डाव करून प्रतिस्पर्ध्याला चीत करणें, ही हातोटी राजेसाहेबांना उत्तम प्रकारें साध्य झाली होती. त्यांचा स्वभाव कोणाजवळ कांहीं गुण आहे असें वाटलें कीं हरप्रयत्नानें तो हस्तगत करून घेण्याचा होता. त्यांच्या आखाड्यांत साताऱ्याकडील कित्येक नामांकित पहेलवान येत. या पहेलवानांच्या नागपूरच्या दंगलांत कुस्त्या होत. त्यांची कुस्ती नेमली जाऊन दंगलांत कुस्ती होईपर्यंत, तो पहेलवान ज्या दर्जाचा असेल त्याप्रमाणें त्याला राजेसाहेब खिलाई देऊन दोन चार महिने आपल्या आखाड्यांत ठेवून घेऊन त्याला आश्रय देत. अर्थात रोज आखाड्यांत राजेसाहेब

उतरत, त्या वेळीं या दक्षिणी पहेलवानांबरोबरच जोर करीत. त्यामुळें राजेसाहेब दक्षिणी पद्धतीच्या कुस्तींतही तरबेज झाले होते. त्यांनीं दक्षिणी पहेलवानांकडून बैठे डावही उत्तम प्रकारें हस्तगत केले होते. यामुळें हिंदुस्थानी कुस्ती व दक्षिणी कुस्ती या दोन्ही प्रकारच्या कुस्त्या ते लढत. त्यांचेबरोबर कोणी कसाही पहेलवान लढला, तरी त्याच्या डावावर ते बरोबर तोड करीत व शेवटीं त्याचेवर मात करून त्याला चीत करीत.

याप्रमाणें सुमारें १० वर्षेपर्यंत नियमित कसरत केल्यानंतर, त्यांचें शरीर हनुमानाप्रमाणें बलिष्ट झालें. छोटुमिया वस्ताद यांना राजेसाहेबांस आपल्या आंगावर खेळविणें जड जाऊं लागलें. दुसऱ्या साधारण पहेलवानांबरोबर जोर करून राजे साहेबांना कसरत केल्याप्रमाणें वाटेनासें होऊं लागलें. त्यांना जोर करण्यासाठीं भारी पहेलवानाची जरूरी भासूं लागली. नंतर त्यांनीं दोन नामांकित पहेलवान मुद्दाम नोकरीस ठेवले. पहिल्यानें अमीरमिय्या नांवाचे पहेलवानास नोकर केलें. त्यांची ख्याति नागपूरचे बाजूस फारच होती. त्याला नोकर केल्यानंतर दद्दा पहेलवान यास नोकरीस ठेविलें. अमीरमिय्यापेक्षां दद्दा पहेलवान फारच भारी होता. त्या प्रांतीं दद्दाचें नांव माहीत नसलेला असा एकही पहेल्वान नव्हता. पुण्याचे बाजूसही दद्दा पहेलवानाचें नांव फार मोठें होतें. पुण्याचे सुप्रसिद्ध पहेलवान हंमजेखां यांचे बरोबर दद्दा पहेलवांनाची एकदां दंगलांत कुस्ती झाली. त्या वेळीं हंमजेखांवर दद्दा पहेलवान तगडा पडला होता. त्यामुळें पुणें प्रांतीं दद्दाची कीर्ति पसरली होती. हे दोन पहेलवान राजेसाहेबांनीं नोकर ठेवल्यापासून त्यांची कसरत चांगली होऊं लागली. पुढें थोड्याच दिवसांनीं पंजाबांतील गुजरणवाला येथील नामांकित पहेलवान रमजानखां यांसही राजेसाहेबांनीं नोकर ठेविलें. हे तिघेही पहेलवान कमीजास्त प्रमाणांत सारखे सारखे होते. पुढें राजेसाहेबांचा एवढा दम वाढला कीं, या तीनही पहेलवानांना हे एकटे जोर करून देत. या तिघां पहेलवानांबरोबर लढत केली कीं, राजेसाहेबांना कसरत केल्याप्रमाणें वाटे. पहांटे ४ वाजतां उठून या तीन पहेलवानांस समवेत घेऊन ते दौड करण्याकरितां जात. त्यांची दौड शुक्रवारतलावाच्या मोठ्या राऊंडाचे रस्त्यानें होत असे. या तलावाचे मोठे राऊंड १०।१५ घेतले ह्मणजे सहज सात आठ मैलांची दौड होई. नंतर ते राजवाड्यांतील आखाड्यांत येत. तेथें रोज हजारपासून बाराशें

बैठक मारीत. नंतर कुस्तीच्या आखाड्यांत उतरून दोन तीन वेळ आखाडा खोदीत व नंतर या पहेलवानांबरोबर लढत सुरू होई. ही लढत किंवा जोर सुमारें एक तासपर्यंत होई. सायंकाळीं सहा वाजतां अभ्यासक्रम आटोपल्यानंतर ते रोज सातशें आठशें दंड काढीत. ही दंड काढण्याची कसरत मात्र त्यांना आपल्या मातोश्रींच्या देखरेखीखालीं करावी लागे. राणी काशीबाईसाहेब स्वतः दंड मोजीत. कोणत्या तरी कारणानें दंड काढण्याबद्दल राजेसाहेबांनीं कुरकुर केली, तर त्यांकडे त्या कधींच लक्ष देत नसत. रोजच्या ठरावाप्रमाणेंच राजेसाहेबांकडून त्या दंड काढून घेत. शिक्षणाचे बाबतींत व कसरतीचे बाबतींत राणी काशीबाईसाहेब यांनीं मुलाचे कधींच लाड केले नाहींत.

## ७ खुराक.

पद्धतशीर रीतीनें कसरत करून घेणें हें जसें एक शास्त्र आहे, त्याचप्रमाणें कसरत केल्यानंतर ऋतु परत्वें पहेलवान लोकांना खुराक देणें हेंहीपण एक शास्त्रच आहे. ज्याला आपलें शरीर तयार करावयाचें असेल, त्यानें कसरतीबरोबर खुराकाकडेही उत्तम लक्ष पोंचविलें पाहिजे. कसरतीवर योग्य खुराक मिळत गेल्यास शरिराची वाढ उत्तम होते. पण भलत्याच ऋतूंत भलताच खुराक सेवन केल्यास शरिराची वाढ न होतां उलट रोग मात्र उत्पन्न होऊन शरिराची खराबी होऊन जाते. कसरतीपेक्षां खुराक जास्त झाला तर अपचन होतें, मेद वाढतो, सुस्ती चढते. त्यामुळें निरोगी शरीर न होतां निरनिराळे रोग उत्पन्न होतात. उलट कसरतीपेक्षां खुराक कमी पडला तर कसरतीचा ताव चढून ज्वर उत्पन्न होतो. कित्येक वेळां खुराकाच्या अभावीं तीव्र असा ताव चढून असाध्य असे रोग उत्पन्न होतात. याकरितां योग्य असा खुराक ऋतुपरत्वें कसरत करणाऱ्याला मिळणें, हें एक प्रकारचें शास्त्रच आहे. खुराकावर कसरतीची मदार अवलंबून असते. म्हणून स्वतः राणी काशीबाईसाहेब आपल्या स्वतःच्या नजरेखालीं राजेसाहेबांचा खुराक तयार करीत. व त्यांना आपल्यासमोर खाऊं घालीत. ज्या दिवशीं कसरत कमी होई, त्या दिवशीं अर्थात खुराकही कमी करण्यांत येई.

पहांटे राजेसाहेब दौड करण्याकरितां जात, त्या वेळीं पहिल्यानें त्यांना पांच मोरावळे खाण्याकरितां देण्यांत येत. हे मोरावळे देण्याची पद्धत अशी असे कीं, पांच मोरावळे घेऊन ते पाण्यानें स्वच्छ धुऊन ह्मणजे साखरेचा पाक धुऊन गेला असें पाहून नंतर कपडयानें पुसून टाकण्यांत येत. नंतर त्याच्या फांका निरनिराळ्या करून आंतील बिया काढून टाकल्यानंतर पुन्हां त्या मोरावळ्याच्या फांका कपडयानें पुसण्यांत येत. त्या फांकांतून पाण्याचा अंश निघून गेला ह्मणजे त्या फांकांना चांदीचे दहा वर्ख लावण्यांत येत. अशा पद्धतीनें मोरावळे तयार करून दौड करण्याचे पूर्वी राजेसाहेबांना राणी काशीबाईसाहेब खाऊं घालीत. या मोरावळ्या-मुळें दौड केलेल्याची गरमी शरिरांत जास्त उत्पन्न होत नसे. गळ्याला दौडीमुळे कोरड पडत नसे व पित्तही विकृत होण्याची भीति नसे.

दौडीनंतर आखाडयांत येऊन सर्व कसरत संपली ह्मणजे आंग पुसून कपडे घातल्यानंतर अर्ध्या तासानें राजेसाहेबांना बदामाची थंडाई देण्यांत येई. ही बदामाची थंडाई घेण्याची पद्धत उत्तर हिंदुस्थानात बहुतेक सर्वत्र आहे. ही थंडाई सर्दीचे दिवस वर्ज करून बाकीचे दिवसांत नेहेमीं घेण्याचा रिवाज आहे. ही तयार करण्याची पद्धत अशी आहे कीं, उत्तम कागदी बदाम फोडून बदामगीर आपणास जेवढे पाहिजेत तेवढे घ्यावे. राजेसाहेबांकरितां बदामगीर दोनशें घेत. पंजाबांत थंडाई पिसण्याकरितां ह्मणजे वांटण्याकरितां मातीच्या कुंड्या मिळतात. पाट्या वरवंट्यापेक्षां या कुंड्यांचा चांगला उपयोग होतो. त्या कुंड्यांत बदामगीर टाकून नंतर कडुलिंबाच्या लांकडाच्या सुमारें सव्वा हात लांबीच्या सोट्यानें ते बारीक पिसून नंतर त्यांत दहा वेलदोडयांचे दाणे, दहा काळीं मिऱ्यें व चवलीभार बडीशोप टाकीत नंतर ते त्या बदामाबरोबर उत्तम पिसीत नंतर त्यांत थोडें थोडें पाणी टाकून पुन्हां पिसून अगदीं लोण्याप्रमाणें मऊ वांटून झाले, ह्मणजे त्यांत अंदाजें शेर सव्वा शेर पाणी टाकून तें पातळ करीत. नंतर कपडयानें उत्तम गाळून त्यांत पिठी साखर दहा तोळे टाकीत व पुन्हां गाळून घेत; ह्मणजे थंडाई तयार झाली. उन्हाळ्याचे दिवस असल्यास बदाम पिसण्याचे वेळीं त्यांत गुलाबकळी किंवा गुलाबपाणी टाकल्यास उत्तमच अशा प्रकारची थंडाई करून राजेसाहेबांस त्यांच्या मातोश्री देत. नंतर दुपारीं भोजनाकरितां शक्य तेवढा भात कर्मा खाण्याला देण्यांत येई. भातानें शरीर वातुळ बनतें, ह्मणून भात कर्मा देत असत. गव्हाच्या

रोट्या वगैरे जास्त खाण्यांत प्रवृत्ति ठेवली जाई. तिखट आंबट व तेलकट पदार्थ, शक्य तेवढे कमी खाण्याकरितां देण्यांत येत. नंतर दुपारीं तीन वाजतां आंब्याचा शेपाचा, जांबाचा ह्मणजे पेरूचा, उंसाचा, करवंदाचा, कोव्हाळ्याचा, दुध्या भोपळ्याचा वगैरे मुरब्ब्यापैकीं रोज एक प्रकारचा मुरब्बा त्यांना देत. रात्रौं भोजनानंतर झोंपण्याचे वेळीं दोन शेर उत्तम दूध, साखर घालून तापवून व तें अगदीं थंड झाल्यानंतर पिण्याकरितां देत. अशा प्रकारचा राजेसाहेबांचा सात्विक स्वरूपाचा खुराक ते कसरत करीत असतां होता.

आठवड्यांतून एक दिवस कसरतीला सुटी असे. तेव्हां उन्हाळ्याचे दिवसांत ते मालीस करून घेतल्यानंतर पोहण्याला तेलंखेडीचे तलावाला जात. मालिसाकरतां ते नेहमीं पांढऱ्या तिळाचें तेल वापरीत. मालीस झालें ह्मणजे बरोबर दोन चार इसम घेऊन तलावांत पोहावयाला पडत. त्यांचा पोहण्याचा एवढा दम वाढला होता कीं, ते तेलंखेडी तलावांत पोहावयाला एकदां पडले कीं दोन दोन तास कांठाला येत नसत. पाण्यांत बुडून बराच वेळ आंत रहाणें, एका ठिकाणीं बुडून वीस पंचवीस हातांवर दुसरीकडे वर येणें, उलटें पोहणें, मांडी घालून पोहणें, हातपाय न हालवितां पाण्याचे सपाटीवर निश्चल उताणें पडणें, वगैरे वगैरे पोहण्याच्या सर्व कसबांत ते चांगलेच प्रवीण होते. कित्येक वेळां ते नदीच्या भर पुरांतही पोहावयाला पडत असत.

## ८ दांडपट्टा.

दांडपट्टा, गदगाफरी, बंदाट अथवा बोथाटी, आणि खांडा हें भोंसले क्षत्रिय राजघराण्याचें आद्य शिक्षण होतें. या क्षात्रविद्येंत आपल्या मुलानें पारंगत व्हावें असें राणी काशीबाई यांस मनापासून वाटे; ह्मणून त्यांनीं कुस्तीचे वस्ताद केल्यानंतर थोड्याच दिवसांत नागपूरचे प्रसिद्ध वस्ताद बकत्तावरसिंगचे चिरंजीव लक्ष्मणसिंग यांना राजेसाहेबांचे वस्ताद बनविलें. बकत्तावरसिंग हे १८५७ च्या बंडांत तावून सुलाखून निघाले असल्यामुळें त्यांची विद्या तरवारीला

नवीन धार लावल्याप्रमाणें तेज होती. त्या वेळीं काडतुसाच्या नवीन बंदुकी किंवा तोफा सर्रास सुरू झाल्या होत्या, तरी हातोहातींच्या लढायाचें महत्व तितकेंसें कमी झालें नव्हतें, प्रत्येकाला या विद्येची जरूरी आहे असें वाटे; आणि ह्मणूनच खरी विद्या असलेल्या बकत्तावरसिंगसारख्या वस्तादी घराण्यास लोक विशेष मान देत असत. त्यांचे चिरंजीव लक्ष्मणसिंग हेही बापाप्रमाणें आपल्या घराण्याच्या वस्तादी कलेंत चांगलेंच निष्णात झाले होते. त्यांचा त्या वेळीं मोठा नांवलौकिक होता. त्यांना राजेसाहेबांचे रीतसर वस्ताद केल्यानंतर ते नियमानें राजवाड्यांत राजेसाहेबांना शिकविण्याकरितां येत. डॉ. लक्ष्मणराव गर्दे, धुंडीराज ठेंगडी, बॅरिस्टर गोविंदराव देशमुख, राणोजी नाईक, हिरालाल पांडे, तात्याजी लोणकर वगैरे नागपुरांतील इतर विद्यार्थी त्या वेळीं राजसाहेबांचे सहाध्यायी होते. लक्ष्मणसिंग वस्ताद या सर्व शागिर्दांना राजवाड्या-जवळील हत्तीखान्याच्या पटांगणांत किंवा देवघरासमोरील चौकांत या क्षात्रविद्येचें शिक्षण देत. या विद्येचें शिक्षण राजेसाहेबांनीं सतत सात आठ वर्षें घेतलें. दांड-पट्यामध्यें राजसाहेबांची प्रगति चांगलीच झाली. उलटया सुलटया उड्या मारून किंवा गोलांटया घेऊन प्रेक्षकांचें मनरंजन करतां येईल, अशा दांडपटयाच्या खेळा-कडे राजे साहेबानीं कधींच लक्ष दिलें नाहीं. दांडपट्टा ही विद्या मनरंजन करण्या-करतां नसून तिचा आत्मरक्षणाकरितां उपयोग करून घ्यावयाचा आहे, हें ते उत्तम प्रकारें जाणत होते. ह्मणून दांडपटयाच्या फेंका जितक्या सफाईनें जातील, त्यांकडे त्यांचें व त्याचप्रकारें त्यांच्या वस्तादांचें लक्ष होतें. लक्ष्मणसिंग वस्ताद हे जुन्या पद्धतीनें शिक्षण घेतलेले असल्यामुळें व तें शिक्षण प्रसंगाला उपयोगी पडावें या हेतूनें घतलें असल्यामुळें पट्टयाची फेंक सफाई जाते किंवा नाहीं याची पारख केवळ डोळ्यांच्या नजरवर ते अवलंबून ठेवीत नसत. पट्टयाची एक फेंक दाखविली कीं, त्या फेंकीनें कोणतें कार्य होत असतें व त्या फेंकीवर आपलाहात जमला किंवा नाहीं याचा विश्वास वस्तादना किंवा आपणाला यावा, ह्मणून फेंकींचे प्रत्यक्ष प्रयोग केळीच्या खांबावर केले जात केळीचें झाड तोडून आणून तें पटांग-णांत पुरलें जाई. नंतर त्या केळीचे खांबावर पट्टयाची फेंक वस्ताद करून दाख-वीत. पट्टयाची फेंक सफाई गेली ह्मणजे केळीचा खांब कसा सफाई तुटतो हें वस्ताद राजेसाहेबांना दाखवीत. नंतर तीच फेंक राजेसाहेब करीत व ती सफाई येईपर्यंत राजसाहेबांना आपला हात त्या केळीच्या खांबावर फेंका करून घटवावा लागे. या-

प्रमाणें पट्ट्याचें शिक्षण केळीच्या खांबावर प्रत्यक्ष प्रयोगानें राजेसाहेबांस शिकविण्यांत आलें. नंतर राजसाहेबांचा हात सफाईनें चालतो असें पाहून वस्ताद केळीच्या खांबांत लोखंडाची बारिक सळी घालून त्यावर पट्टा चालविण्यास राजेसाहेबांस शिकवूं लागले. कित्येक दिवसपर्यंत केळीच्या खांबांतील लोखंडाची सळी राजसाहेबांना तोडतां आली नाहीं वस्तादापेक्षां आपल्या मणगटांत किती तरी जास्त शक्ति आहे, असें राजेसाहेबांना वाटत होतें; पण वस्ताद डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच सळी असलेला केळीचा खांब सफाईनें तोडून दाखवित व तोच राजेसाहेबांना कित्येक फेंका मारून तोडतां येत नसे ह्मणून त्यांना विस्मय वाटे. ही गोष्ट आपणाला साध्य व्हावी ह्मणून त्यांनीं कित्येक केळींचें नुकसान केलें. दोन तीन पट्टेही तुटून गेले. पण एकदांसुद्धां त्यांना शक्तीच्या जोरावर केळीच्या खांबांतील लोखंडाची सळी तोडतां आली नाहीं. तेव्हां ते बहुतेक निराश झाले, असें पाहून त्यांतील खरें रहस्य वस्तादांनीं राजे साहेबांना सांगितलें. पट्ट्याचा खरा मार पट्ट्याच्या सर्व पात्यांत सारखा नसतो. पट्ट्याच्या टोकांच्या अलिकडे सहा सात इंचापासून सुमारें चार पांच इंचाच्या जाग्यांत पट्ट्याच्या पात्यांत खरा जोर व कार्य करण्याची शक्ती असते. पट्ट्यचा तोल व पट्ट्याच्या पात्याची लांबी पाहून त्याच्या खऱ्या माराची जागा ठरवावी लागते. व त्या पात्याच्या बिंदूवर सफाई फेंक पडली ह्मणजे पट्ट्यानें आपलें कार्य केलेंच पाहिजे, असें दाखवून त्यांनीं पट्ट्याच्या माराच्या जागेवर त्यांना निशाण करून दिलें व त्याप्रमाणें त्यांनीं तसा प्रयत्न करावयास राजसाहेबांना लावलें. कोणत्याही विद्येची गुरुकिल्ली कित्येक दिवस गुरु आपलेच जवळ ठेवीत असतात. पण शिष्य गुरूच्या परिक्षेला एकदां उतरला ह्मणजे आपली गुरुकिल्ली तो शिष्याच्या स्वाधीन करतो. पट्ट्याचें रहस्य राजसाहेबांना कळतांच त्याप्रमाणें राजसाहेब प्रयत्न करूं लागले व त्यांना त्याप्रमाणें पांच सात दिवस प्रयत्न केल्यानंतर ती कला साध्य झाली. पुढें त्याना त्याचा फारच नाद लागला, यावर आपल्या वस्तादापेक्षां जास्त जाडीची सळी आपण तोडण्याचा त्यांनीं संकल्प केला. व पुढें तो प्रयत्नानें त्यांना साध्यही झाला. पुढें आपल्या वस्तादापेक्षां दुप्पट जाडीची सळी राजेसाहेब पट्ट्याच्या फेंकेनें तोडूं लागले. त्याचप्रमाणें आकाशांत लिंबू उडवून ते वरचेवर कापणें, पांच दहा ठिकाणीं नारळ ठेवून ते पट्ट्याच्या फेंका करीत करीत फोडणें, कपड्यांत वांगीं बांधून कपडा न फाटतां

ते कापून दाखविणें वगैरे कामेंही राजेसाहेब मोठ्या सफाईनें करूं लागले. दांडपट्ट्या-मध्यें पट्ट्याचा हात जितका सफाई जावा लागतो व पट्ट्याच्या माराची मुख्य जागा ज्याप्रमाणें अजमावून ठेवावी लागते, त्याचप्रमाणें मान्याच्या वस्तूवर बरोबर पट्ट्याच्या पात्याची मुख्य माराची जागा जाऊन पडेल, याच हिसेबाची बेतोल उड्डाणाची मर्यादा घेण्याची पायांस संवय व्हावी लागते. व उड्डाणाच्या आहारीं आपण न जातां आपल्या आहारीं उड्डाण ठेवण्याची कला साधावी लागते. ह्या कला ज्याला साधल्या, तोच दांडपट्ट्यांत प्रवीण होतो. या सर्व दांडपट्ट्याच्या बारिक सारिकसुद्धां गोष्टी राजेसाहेबांनीं आपल्याशा केल्या होत्या. राजेसाहेबांनीं आपल्या कल्पनेनें दांडपट्ट्याच्या सर्व फेंकांचा मिळून एक हात बसविला होता. या हातांत पट्ट्यानें जेवढे निरनिराळे वार करतां येणें शक्य आहे, त्या सर्वांचा समावेश होत होता. हा हात पाहून या विद्येंतील तज्ज्ञ लोकांस फार आश्चर्य वाटे. तो पट्ट्याचा हात केल्यानंतर त्याची कोणतीही नवी फेंक अगर वार करण्याचें बाकी रहात नसे. हा हात कोणत्याही वस्तादाला दाखविल्यानंतर पट्ट्यांत आणखी कांहीं नवीन शिक-ण्यासारखें आहे काय ? ह्मणून विचारल्यास त्याला तें सांगतां येत नसे. यावरून या दांडपट्ट्यांत राजेसाहेबांची प्रगति किती झाली होती, हें समजून येईल.

## ९ फरीगदगा.

फरीगदगा हें ढालतरवारीच्या युद्धाचें प्राथमिक शिक्षण होय. पहिल्यानेंच ढाल तरवार विद्यार्थ्यांच्या हातांत देऊन शिक्षण देणें धोक्याचें असल्यामुळें ढाल-ऐवजीं फरी ह्मणजे ढालेची छोटी आवृत्ति व तलवारी-ऐवजीं बारीक काठी यालाच फरी-गदगा असें ह्मणतात. फरीगदगा विद्यार्थ्यांचे हातीं देण्याचे अगोदर त्याला पवित्रे शिक-विण्यांत येतात. दांडपट्ट्यामध्यें ज्याप्रमाणें गिरक्या व उड्डाण या गोष्टी महत्वाच्या आहेत, त्याप्रमाणें फरीगदग्यामध्यें पवित्र्यांना महत्व आहे. या पवित्र्यांची कल्पना वाघाच्या हल्ला करण्याच्या पद्धतीवरून घेतलेली आहे. प्रतिस्पर्ध्यानें केलेला वार कशीं पावलें टाकून गेल्यानें सहज चुकवितां येतो, या पावलांच्या हालचालीला पवित्रे असें ह्मणतात. या पवित्र्यांच्या दोन पद्धती आहेत. दक्षिणेकडील पद्धतींत अंग-बचाव चांगला होतो, पण त्यांत पवित्रे टाकण्याचा नटवेपणा कमी असतो. हिंदु-स्थानी पद्धतींत अंग-बचावांत थोडा गौणपणा शिल्लक रहातो, पण पहाणाराला त्यांत

जास्त खुबसुरतीचा भाग दिसतो. राजेसाहेबांना या पवित्रयाच्या दोन्हीही पद्धती माहीत होत्या. समाजांत ज्या वेळीं मजेकरितां ते फरीगदगा खेळून दाखवीत, त्या वेळीं या हिंदुस्थानी पवित्रयाच्याच पद्धतीनें ते खेळत. पवित्रे पायांत बरोबर बसले ह्मणजे फरीगदगा हातांत देऊन त्याचे वार कसे व कोठें करावयाचे हें शिकविण्यांत येतें. त्याचप्रमाणें उलट आलेले वार कसे चुकवावे, हेंही शिकविलें जातें. वार करण्याचे व आत्मरक्षणाच्या वेळच्या पवित्रयाच्या हालचाली या आंगवळणी पडण्याला बरेच दिवस जावे लागतात. शत्रूवर वार करण्याला शिकण्यापेक्षां शत्रूचा आलेला वार चुकविणें यांतच गदगाफरीच्या शिक्षणाचें मुख्य रहस्य आहे. राजे साहेबांनीं या विद्येचें शिक्षण दांडपट्ट्याप्रमाणें सात आठ वर्षें घेतलें, त्यांना सगळे वार फेंका अवगत झाल्या, पवित्रेही चांगलेच आंगवळणी पडले. आपल्या सहाध्यायी मुलांबरोबर खेळतांना ते त्यांचेवर वार करीत, त्यांचेही वार चुकवीत. कित्येक वेळां आपण त्यांना चोप देत व कित्येक वेळां आपणही त्यांचेकडून चोप खात. त्यांच्या त्यांच्यामध्यें जवळ जवळ बरोबरीचाच खेळ होई. पण ते ज्या वेळीं वस्तादांचे बरोबर खेळत, त्या वेळीं मनांत असा संकल्प करीत कीं, वस्तादांचें आंगावर एक तरी आपण वार करूं. पण वस्तादाबरोबर तास तास अर्धा अर्धा तास खेळले, तरी राजे साहेबांना वस्तादांचे आंगाला वार लागेल असा एकही वार करतां येत नसे. वस्ताद मात्र थोड्याशाच अवधींत राजेसाहेबांचे आंगावर अनेक वार करून जात. शिवाय वस्तादांचे खेळण्यांत त्यांना एक अजब गुण वाटे. वस्ताद इतर वेळीं अगदीं गरीब दिसतात, त्यांच्या तोंडावरची माशीसुद्धां कधीं उडत नाहीं, इतके शांत व गरीब असतात. पण फरीगदगा खेळावयाला ते पवित्र्यांत उभे राहिले, ह्मणजे त्यांच्या चेहऱ्याकडे पहावत नाहीं व ते कोठें वार करतील याची कल्पना होत नसल्यामुळें आपण अगदीं गर्भगळित होऊन जातों. याचें खरें कारण काय असावें, याचा राजेसाहेबांना कांहींच तर्क बांधतां येईना. वाघ ज्याप्रमाणें एकाद्या जनावरापुढें उभा राहून आपल्या आंगविक्षेपांनीं व हालचालींनीं जनावराला कोंडींत पकडल्याप्रमाणें करून भयभीत करून टाकतो व त्याला जागचे जागीं अगदीं खिळून टाकल्याप्रमाणें करून सोडतो, त्याप्रमाणें वस्ताद खेळूं लागले कीं, आपली तशी स्थिति होते. वार कसा चुकवावा व वार कसा करावा याची स्मृतीच जागृत रहात नाहीं, याचें कोडें राजेसाहेबांना उकलेना. दांडपट्ट्याप्रमाणें त्यांतही

कांहीं गुरुकिल्ली वस्तादांनीं ठेवली असावी, असें त्यांना वाटलें व त्याप्रमाणें शेवटीं आपल्या वस्तादांजवळ त्यांनीं तशा पद्धतीचा प्रस्तावा केला. गुरुही आपल्या विद्यार्थ्याची परीक्षा मनाशीं करून ठेवितच असतो. लक्ष्मणसिंग वस्ताद यांचे पुष्कळ शार्गीद झाले, परंतु अशा प्रकारचा प्रश्न त्यांना कोणींच केला नव्हता. राजेसाहेबांनीं त्यांना हा प्रश्न विचारल्यानंतर त्यांना बरें वाटलें व त्यांनीं फरिगदग्यांतील शेवटच्या शिक्षणाचें रहस्य त्यांना समजावून सांगितलें. गुरुकिल्ली गुरुजी नेहमीं आपल्या जवळ ठेवीत असतात, ती सच्छिष्यालाच शेवटीं लाभत असते, याचा हा दुसरा मासला आहे.

फरीगदगा, दांडपट्टा, लाठी वगैरे यांच्यामध्यें वार करणें किंवा वार चुकविणें याच्याशिवाय एक विशेष विद्या आहे. तिला, हूल, हुलकावणी किंवा बाव्हली असें ह्मणतात. ही हूल मनुष्याला भूल पाडणारी असते. या हुलेची कल्पना माकडापासून घेतलेली आहे. माकड ज्याप्रमाणें आंगावर आल्यासारखें दाखवितें व उडी मारून दुसरीकडे निघून जातें. त्याच पद्धतीची ही हूल असते. ही हूल दाखविण्याची कला ज्याचे डोळे पाणीदार व मोठे असतात. त्याला लवकर साध्य होते. कारण हूल दाखवितांना आंगविक्षेप सोडून दिल्यास ती दाखविण्याची सर्व मदार डोळ्यांत असते. याला दृष्टीची स्थिरता साध्य करून घ्यावी लागते. आपल्या दृष्टीचा रोख व आंगविक्षेप यांनीं आपण डोक्यावर वार करितों, असें दाखवावयाचें व तोच वार डोक्यावर न करितां पायावर करावयाचा. दाखवावयाचें एक व करावयाचें दुसरें यामुळें प्रतिस्पर्धी भांबावून जातो व पराजित होतो. ही हूल, हुलकावणी किंवा बाव्हली दाखविण्याची कला फारच थोडया लोकांना साध्य होते. व ती एकदा साध्य झाली कीं, तो वस्ताद बनला. आतां हुलकावणीच्या किंवा बाव्हलीच्या डावांत आपण न सांपडण्याकरितां त्याला तोड अशी आहे कीं, आपल्यावर जो वार होतो, तो कांहीं डोळे किंवा अंगविक्षेप ह्यामुळें होत नाहीं. तर तो शत्रूच्या हातांतील शस्त्रामुळें होतो. तेव्हां या बाव्हलींत आपण सापडूं नये ह्मणून आपली दृष्टि शत्रूच्या दृष्टीला अर्थात बाव्हली दाखविणाऱ्या शत्रूच्या दृष्टीला न भिडवितां तिचा रोख नेहमीं त्याच्या शस्त्र असलेल्या हाताच्या मुठीकडे ठेवावा. हाताची मूठ जशी हालचाल करील, त्याच पद्धतीचा वार येईल, ह्मणून शत्रूच्या हाताच्या मुठीकडे आपल्या दृष्टीची स्थिरता करण्यास शिकलें पाहिजे. ह्मणजे शत्रूच्या बाव्हलीचा कांहींच उप-

योग होत नाहीं. ज्याला हूल किंवा बाव्हली याचें मर्म समजलें नाहीं, तो तावडतोब मार खातो.

हें फरी गदग्याचें रहस्य राजेसाहेबांस समजून सांगितल्यानंतर त्याप्रमाणें अभ्यासक्रम त्यांनीं सुरू केला. हुशार मनुष्याला केवळ सूचनेचीच जरूरी असते. त्यांनीं ही कला वर्ष सहा महिन्यांचे आंतच हस्तगत केली. व तीमुळें ते आपल्या सहाध्यायी मुलांस हां हां ह्मणतां मार देऊन पळवून लावूं लागले. ही कला राजसाहेबांखेरीज दुसऱ्या कोणाला साध्य झाल्याचें दिसून आलें नाहीं. व राजे-साहेबांनाही अलीकडील नवीन पद्धतीच्या विद्यार्थ्यांत ही कला असल्याचेंही विशेष दिसून आलें नाहीं. सांगलीस शारीरिक शिक्षण परिषद झाली, तिचे अध्यक्ष राजेसाहेब होते. तेथें जमखंडीचे गोपाळराव जोशी सुभेदार हे आले होते. त्यांच्या खेळांत ही बाव्हली दाखविण्याची कला आहे व हे गृहस्थ ‘झांकलें माणिक’ आहे. असें त्यांच्या थोड्याशाच परिचयावरून राजसाहेबांनीं ताडलें व त्याप्रमाणें त्यानंतर ते नेहमीं बोलूनही दाखवीत असत. ज्याला हूल, हुलकावणी किंवा बाव्हली देण्याची कला साध्य झाली नाहीं, तो खरा खेळाडूच नव्हे, असें सरते-शेवटीं राजेसाहेब अधिकार वाणीनें बोलूं लागले.

## १० बोथाटी किंवा बंधाट.

बोथाटी किंवा बंधाट ह्मणजे एक आत्मसंरक्षण करणारें साधन आहे. सुमारें सहा साडे सहा फूट लांबीच्या एका वेळूच्या काठीला दोन्ही टोकांना दोन गोल गोळे बसविले ह्मणजे बंधाट तयार झाली. हे दोन गोळे जरूरीप्रमाणें कोणी लोखंडाच्या पत्र्याचे करून बसवितात, कोणी लांकडाचे करतात. पण सामान्यत: ढाल तरवारीऐवजीं ज्याप्रमाणें फरीगदगा शिकण्याकरितां उपयोगांत आणतात. त्याचप्रमाणें या लोखंडी गोळ्याऐवजीं कपड्याचे चेंडूप्रमाणें दोन गोळे काठीच्या दोन्ही टोकांला बसविले ह्मणजे खेळ शिकविण्यालायक बंधाट तयार झाली. ही बंधाट फिरविण्याचे बरेच निरनिराळे हात आहेत. याचा मुख्य हेतु एवढाच कीं, ही बंधाट फिरवीत असतांना कोणी फिरविणाराचे आंगावर दगड फेंकला किंवा तीर सोडला किंवा दुरून दुसरें कांहीं शस्त्र फेंकलें तर त्यापासून ही बंधाट बचाव करते. ही बंधाट आपल्या आंगाभोंवतीं जितकी जलद फिरेल, तितकें आपलें जास्त संरक्षण

होतें. राजेसाहेब ही बंधाट फार वेगानं फिरवीत. ते ही फिरवीत असतांना त्यांच्याभोंवतीं सुदर्शन चक्रच आहे की काय असा पहाणाराला भास होई व घोंऽऽऽ असा सारखा आवाज निघे. ते डाव्या हातांत बंधाट व उजव्या हातांत पट्टा घेऊन बहुश: नेहमीं खेळत. या विद्येतही राजे साहेबांनीं आपली चांगलीच प्रगति केली होती. दोन्ही हातांत बंधाट घेऊनही ते उत्तम प्रकारें फिरवीत असत.

## ११ खांडा.

खांडा ह्मणजे सुमारें सव्वा हात लांबीचें तरवारीच्या घाटाचें एक वजनदार व जबरदस्त शस्त्र आहे. याच्या पात्याची रुंदी सुमारें पांच इंचांपासून सात इंचांपर्यंत असते. हें शस्त्र सामान्य मनुष्याला उपयोगांत आणतां येत नाहीं, ह्मणून अलिकडे याचा खेळ पहाण्यास मिळत नाहीं. हें शस्त्र केवळ ताकदवान व शक्तिमान माणसाकरितांच आहे. पूर्वी गदेचा खेळ अस्तित्वांत होता. गदा फार वजनदार असल्यामुळें ती ज्या वेळीं तोलण्याचें सामर्थ्य लोकांमध्यें कमी झालें, त्या वेळीं खांड्याचा खेळ लोकांत विशेष फैलावला. आतां खांडाही लोकांना तोलेना, ह्मणून तरवारीचा खेळ अस्तित्वांत आला आहे. याच्या फेंका व वार फरीगदग्याप्रमाणेंच आहेत. हें जबरदस्त शस्त्र असल्यामुळें जंगली रेड्याचीही मान एका वारांत साफ उतरून जाऊं शकते. याच्या वारांनीं किल्ल्याची मोठमोठीं कुलुपेंही तुटूं शकतात. राजे साहेबांचे आंगीं विलक्षण शक्ति असल्यामुळें व त्यांचे मणगटांत जबरदस्त ताकत असल्यामुळें खांडाचा खेळ ते मोठ्या कौतुकानें करीत. सध्यां या शस्त्राचा बहुतांशीं लोप झाल्याप्रमाणें दिसतो.

## १२ धनुर्विद्या.

राजेसाहेबांनीं धनुर्विद्येचाही चांगलाच अभ्यास केला. ही विद्या नागपूरकर भोंसल्यांचे घराण्यांत फार दिवसांपासून असलेली इतिहास-प्रसिद्ध आहे. धनुष्यबाण स्वतः तयार करण्यापासूनचें शिक्षण राजेसाहेबांना देण्यांत आलें होतें. बांबूच्या कांबी स्वतः तयार करून व बाणांना परें स्वतः बांधून घेऊन त्याचा ते उपयोग करून घेत असत. राजेसाहेब शंभर यार्डपर्यंत यानें अचुक नेम मारीत असत. डोळे बांधून

घेऊन ध्वनि वेध करण्याचाही त्यांनीं अभ्यास केला होता. हा ध्वनि-वेधाचा अभ्यास त्यांना पुढें वाघाचे शिकारींत कसा उपयोगी पडला, हें शिकार-प्रकरणांत येईलच. एकंदरींत धनुर्विद्येंतही ते चांगलेच तयार झाले.

लक्ष्मणासिंग वस्ताद यांनीं राजेसाहेबांना याप्रमाणें सात आठ वर्षे शिक्षण दिलें आपलेजवळ जी पिढीजात क्षात्रविद्या होती, त्या प्रत्येक विद्येची गुरुकिल्लीही राजेसाहेबांस त्यांनीं दिली. नंतर आपलें अंतकालचे दिवस अगदीं जवळ आले, असें वस्तादांना वाटलें, म्हणून त्यांनीं राजेसाहेबांना जवळ बोलावून घेतलें. आपल्या जवळील सर्व मंडळींना बाजूला केलें व ते राजेसाहेबांना म्हणाले कीं, आजपर्यंत माझ्याजवळ जी विद्या होती, ती मीं तुम्हांला दिली. आतां माझ्याजवळ तुम्हांला देण्यासारखें नवीन कांहीं राहिलें नाहीं. पण तुम्हांला आणखी तीन गोष्टी मला सांगावयाच्या आहेत. त्या आपण सतत मनांत जागृत ठेवून त्याप्रमाणें वागावें.

पूर्वी ही क्षात्रविद्या शिकण्याकरितां हिंदुधर्मानुसार मुलाचें उपनयन झालें कीं, त्याला गुरूच्या आश्रमांत पाठवून देण्यांत येत असे. परंतु सध्यां कालमानपरत्वें असे आश्रमही राहिले नाहींत व त्या विद्येची दिवसेंदिवस लोकांना जरूरी ही पण वाटेनाशीं झाली आहे. पण कसेंहि असलें तरी तुम्ही ज्याअर्थी माझेपासून विद्या संपादन केली आहे, त्याअर्थी पूर्व परंपरेनुसार ही विद्या शिकविल्यानंतर गुरूचा आशीर्वाद शिष्याला घ्यावा लागतो, तोच आशीर्वाद मीं आज तुम्हांला मोठ्या आनंदानें देणार आहें. पूर्वीच्या ऋषीप्रमाणें विद्यार्थ्याकडून विद्या शिकविल्याचें मोल न घेतां तुम्हांस मी विद्या शिकवली पाहिजे होती, पण मी प्रापंचिक असल्यामुळें मला तसें करतां आलें नाहीं. हा दोष माझा नसून याचा दोष सांप्रतच्या कालाकडे आहे. तेव्हां कसेंही असलें तरी गुरूच्या आशीर्वादाशिवाय दिलेल्या विद्येचें सार्थक होत नाहीं, अशी आमच्या जुन्या माणसांची कल्पना आहे. हा आशीर्वाद पूर्वीचे ऋषी बारा वर्षे विद्या शिकल्यानंतर विद्यार्थी आपल्या घरीं परत जातांना देत असत. परंतु सांप्रतच्या परिस्थितींत विद्यार्थी गुरूच्या घरून आपल्या घरीं जात असतांना मी आशिर्वाद देत नाहीं, तर मीच शिष्याला कायमचा सोडून जात असतांना देत आहें. एवढाच त्यांत फरक आहे. कसें का असेना, आज मी तुम्हांला ज्या तीन गोष्टी सांगत आहें, त्या तुम्ही नेहमा हृदयाशीं बाळगा, म्हणजे या विद्येची तुम्हांला व तुमच्या पुढील कार्याला योग्य मदत होईल.

१ या क्षात्रविद्येनें तुम्हांला नेहमीं यश मिळत गेलें पाहिजे म्हणून तुम्ही परमेश्वरी अधिष्ठान मिळविण्याचा प्रयत्न करा. हें परमेश्वरी अधिष्ठान कसें मिळत असतें, हें तुम्हांला तुमचे मोक्षगुरु सांगतील.

२ तुमची विद्या नेहमीं सतेज राहण्याकरितां आमरणान्त तुम्ही सरस्वतीची सेवा करा. याचा अर्थ एवढाच घ्यावयाचा कीं, तुम्हांला आतां विद्या आली म्हणून तुम्ही स्वस्थ न बसतां तिचा आमरण अभ्यास ठेवा. आपण आतां या विद्येत वस्ताद झालों, ही भावना मनाला यत्किंचितही न स्पर्श करूं देतां आपण विद्यार्थीदशेंतच आहोंत, असें समजून चांगलें तेवढेंच ग्रहण करण्याकडे मनाचा सतत कल ठेवा,

३ तुम्हांला मिळालेल्या विद्येच्या उपयोगानें लोकांचे आशीर्वाद घ्या. म्हणजे ही विद्या परपीडेकरितां उपयोगांत न आणतां परोपकाराला या विद्येचा उपयोग करून अनाथ, गरीब, दीन लोकांचें रक्षण करून त्यांचे आशीर्वाद घ्या.

याप्रमाणें राजेसाहेबांस लक्ष्मणसिंग वस्ताद यांनीं उपदेश करून त्यांना मनापासून आशीर्वाद देऊन त्यांचें पाठीवरून प्रेमानें हात फिरविला. याच गुरूच्या प्रेमानें हात फिरविण्यामध्यें यशस्वितेची जादु भरलेली असते. तिचा अनुभव अनुभवानेंच प्राप्त होतो.

लक्ष्मणसिंग वस्ताद यांनीं शेवटीं राजेसाहेबांस केलेला उपदेश त्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबला व त्याप्रमाणें त्यांनीं वागण्याचा मनाशीं संकल्प केला.

## १३ बिनोट.

नागपूरचे बिनोटचे सुप्रसिद्ध वस्ताद मरहुम अलिमिय्या साहेब यांस राजेसाहेबांना बिनोट शिकविण्याकरितां वस्ताद नेमलें होतें. राजेसाहेबांचे तीर्थरूप जानोजी महाराज व अलीमिय्या हे एका गुरूचे शिष्य होते. अलीमिय्या वस्ताद यांचा उत्तर हिंदुस्थानांत उदेपुरापर्यंत चांगला नांवलौकिक झाला होता; कै० जानोजी महाराजांचे अमदानींत उदेपूरचा एक प्रसिद्ध बिनोटचा वस्ताद नागपुरीं जानोजी महाराजांचें नांव ऐकून त्यांचे दरबारीं आला होता. जानोजी महाराज ‘ पंचहत्यारी ’ म्हणून त्यांचा नांवलौकिक होता. १ पट्टा, २ तरवार, ३ गदा, ४ जंबिया आणि, ५ धनुष्यबाण यांमध्यें ते त्या वेळीं अजिंक्य असे होते. म्हणून ते पांच हत्यारें लावीत.

जोंपर्यंत दुसरा कोणी वीर या पांच शस्त्रांपैकीं कोणत्याहि शस्त्रानें त्यांचबरोबर लढून त्यांचा पराभव करीत नाहीं, तोंपर्यंत हा ' पंचहत्यारें ' लावण्याचा मान ज्याचा त्याजकडे राहतो. हीं पंचहत्त्यारें ह्मणजे सध्यांचा ' गुरज ' होय. जानोजी महाराजांचें नांव ऐकून त्यांचेबरोबर बिनोट खेळण्याकरितां उदेपूरचा क्षत्रिय वस्ताद आला होता. या खेळण्यामध्यें असा एक रिवाज आहे कीं, वरच्या दर्जाच्या मनुष्याबरोबर एकदम सामना करतों ह्मटलें, तर त्याला कोणी तसें करूं देत नसे. उदेपूरच्या वस्तादानें जानोजी महाराजांस बिनोट खेळण्याचें आव्हान देतांच अल्लीमियांनीं त्याला हरकत घेतली. जानोजी महाराजांनीं मला जिंकलें आहे. तेव्हां अगोदर माझ्याबरोबर बिनोट खेळून मला पराजित केल्याशिवाय जानोजी महाराजांबरोबर खेळ होणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. उदेपूरच्या वस्तादला ही गोष्ट कबूल करावी लागली. व त्याच्या आणि अल्लीमियाच्या सामन्याचा दिवस ठरविण्यांत आला. नागपूर गांवांत ही गोष्ट समजली, तेव्हां हा सामना पाहण्याकरितां हजारों लोकांची गर्दी झाली. कित्येक तज्ज्ञ लोकही हजर राहिले होते. या सामन्यांत अल्लीमियांनीं उदेपूरच्या वस्तादास नऊ वेळ गिरफदार केलें. व उदेपूरच्या वस्तादनें अल्लीमियाला फक्त एकच वेळ गिरफदार केलें. अर्थात उदेपूरच्या वस्तादाचा पराभव झाला. व त्यामुळें जानोजी महाराजांबरोबर त्याला सामना देतां आला नाहीं. या प्रसंगामुळें अल्लीमियाचा नांवलौकिक सर्वत्र पसरला. तेव्हां जानोजी महाराजांचे वेळचा व बिनोटचा पूर्ण माहितगार इसम नागपुरीं असतां त्याचा फायदा आपल्या मुलाला देण्याची संधि राणी काशीबाईसाहेब थोड्याच वांया जाऊं देणार होत्या ! त्यांनीं राजेसाहेबांचे रीतसर वस्ताद त्यांना केलें. श्रीमंत राजे बहादुर रघोजी महाराज यांचेही बिनोटचे वस्ताद तेच होते. उभय राघव-लक्ष्मणांना अल्लीमियांनीं उत्तम रीतीनें तयार केलें. राजेसाहेब या बिनोटांतील, निमाजबंद, लंगोटबंद, मुष्कबंद, कमरबंद, गलेबंद, हातकट्टी, बेलजफर, वगैरे डाव फारच चपलतेनें व सफाईनें करीत.

इ. स. १९२९ सालीं राजे साहेबांचे द्वितीय चिरंजीव राजारामसिंह ऊर्फ बाबासाहेब यांचा व्रतबंध झाला. त्या प्रसंगीं उदेपूरचे क्षात्रविद्याकुशल असे एक क्षत्रिय युवक नागपुरीं राजेसाहेबांचा नांवलौकिक ऐकून आले होते. त्यांनीं राजे साहेबांची भेट घेतली व आपल्या आंगच्या विद्येची कल्पना राजेसाहेबांना देऊन आपल्या आंगच्या विद्येची करामत पहाण्यास सध्यां कोणीच तयार होत नाहीं व

कोठें प्रयोग करून दाखवावे तर त्या विद्येची कोणालाच कांहीं कदर नसल्यामुळें रस्त्यावरील कोलाटी लोकांच्या खेळाप्रमाणें तमासगिराएवढीसुद्धां आपली संभावना होत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. राजवाड्यांत मुलाच्या उपनयन समारंभाचा उत्सव चाललाच होता. तेव्हां त्यांत या क्षत्रिय युवकाचेही खेळ करावयाचे राजेसाहेबांनीं ठरविलें. बऱ्याच लोकांना निमंत्रणें देऊन बोलावून आणलें. राजे बहादुर रघोजीमहाराज यांसही त्याप्रमाणें कळविलें व ते येऊन हजर झाले. हे खेळ राजवाड्यांतील श्रीराममंदिराचे समोरील चौकांत झाले. त्या क्षत्रिययुवकानें धनुर्विद्येचे अप्रतीम प्रयोग करून दाखविले. एका चक्रावर निरनिराळ्या रंगाचीं मडकीं ठेवून तें चक्र वेगांत फिरत असतां आपण सांगावें त्या रंगाच्या मडक्याचा त्यानें दोन चार वेळ वेध करून दाखविला. एकदांही त्याचा वेध दुसऱ्या रंगाच्या मडक्यास लागून फुकट गेला नाहीं. त्याचे डोळे बांधून एक मडकें दूर अंतरावर ठेवून त्या मडक्यावर काठीनें आवाज करून दाखविला असतां त्यावर त्या युवकानें नेम धरून दोन चार वेळ अचुक वेध केला. ही नादवेधाची कला फारच कठीण आहे. तीही त्यानें बिनचुक करून दाखविली. त्याचप्रमाणें आकाशांत लिंबू फेंकून तें जमिनीवर पडण्याकरितां खालीं येत असतां त्याला त्यानें वेध करून दाखविला. त्याचप्रमाणें एका लांब काठीच्या दोन टोंकांला दोन बारीक दोरे बांधले व त्या दोऱ्याच्या टोंकाला दोन खडे बांधले. नंतर ती काठी आडवी करून उंच बांधली. व त्याच्या दोन टोंकाच्या दोऱ्यांस विरुद्ध गतीनें हेलकावे दिले. दोऱ्यांच्याखालीं जड वस्तु बांधली असल्यामुळें व एक दोरा दक्षिणेकडून उत्तरे-कडे जाणारा व दुसरा उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारा असल्यामुळें ते दोन दोरे मध्यभागीं कात्रीप्रमाणें आपला भाग दाखवीत. त्या दोऱ्यांच्या कात्रीचे मध्य-भागीं दोन्ही दोरे एकमेकांवरून जात असतां त्या कात्रीच्या बिंदूवर ह्मणजे ' क्रॉस ' वर वेध करून दोन्हीही दोरे त्यानें तोडून दाखविले. इतकें सूक्ष्म निशाण लावून तो वेध करीत असे. पुराणांतरींच्या मत्स्यवेधाचीही नक्कल त्यानें करून दाखविली. याशिवाय दांडपट्टाही उत्तम खेळून दाखविला. तरवारीची कापाकापीची लढाई कशी करतात, तेंही तरवार फिरवून दाखविलें. नंतर त्यानें फरीगदगा घेतला व ह्मणाला, ' हा खेळ दाखवावयाला दुसरा कोणी तरी खेळाडू पाहिजे. त्याच्याशिवाय हा खेळ दाखवितां येत नाहीं. माझ्याबरोबर मनुष्य आहे,

त्याच्याशीं मी खेळलों तर तुमचे बसलेले हात तुह्मी खेळतां, असा माझ्यावर आरोप येईल. तर जमलेल्या लोकांत कोणी माझेबरोबर खेळण्यास तयार असेल, त्यानें पुढें येऊन माझेबरोबर खेळावें, असें त्यानें आवाहन केलें. आतांपर्यंत त्याचे खेळ पाहून सर्वच थक्क झाले असल्यामुळें कोणीच पुढें येईना. त्या वेळीं राजेबहादुरांनीं आमचे चरित्रनायकांस खेळण्यास हुकूम दिला. राजेसाहेब उठले व फरी गदगा घेऊन त्या क्षत्रिय युवकाबरोबर खेळूं लागले. कोणी कोणावर वार केला व कोठें केला हें समजण्याकरितां गदग्याला काव लावण्यांत आली होती. राजेसाहेबांचा व त्या युवकाचा सुमारें पंधरा मिनिटें खेळ झाला. तेवढ्या अवधींत राजेसाहेबांनीं त्या युवकावर दोन बगलेचे, दोन मानेचे, एक पायाचा, एक मणगटाचा व एक डोक्याचा असे सात वार केले. राजेसाहेबांचे सातही वार त्या युवकाचे आंगावर स्पष्ट उठले होते. त्या युवकाचा एकच निसटता वार राजेसाहेबांचे पायाचे घोट्यावर झालेला दिसला. हा राजेसाहेबांचा खेळ पाहून तेथील सर्व मंडळींना कौतुक वाटलें. त्या क्षत्रिय युवकानेंही राजेसाहेबांची फारच तारीफ केली. नंतर तेथील कांहीं वयोवृद्ध माणसांनीं राजे बहादुरांना विनंति केली कीं, सरकारांनीं बिनोटचा खेळ एकदां आह्मांला दाखवावा. आतां बिनोट खेळणाऱ्यांपैकीं फक्त आपण उभयतां बंधूच आहांत. तेव्हां तो खेळ आपण दाखविल्यास आमचेवर उपकार होतील. शिवाय आपला खेळही या क्षत्रिय तरुणाला दिसेल. तेव्हां राजेबहादुर उठले व हंसत हंसत ह्मणाले आज योग आला आहे, तेव्हां आमच्या भावाभावाचा खेळ पाहून घ्या. यापुढें हा खेळ तुह्मांला दिसणें दुर्मिळच होईल. असें बोलून उभयतां बधुबंधू लढूं लागले. राजेबहादुरांनीं डाव करावा व त्याची तोड राजेसाहेबांनीं करावी. अशा प्रकारच्या खेळाची मजा फारच थोड्या लोकांना अनुभवावयाला मिळाली. सुमारें अर्धा तास या बिनोटाच्या खेळाची मजा उभय बंधूंनीं दाखविली. हे खेळ पाहून उदेपूरच्या क्षत्रिय युवकाला अतिशय आनंद झाला. त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले, तो ह्मणाला, ' मी पुष्कळ राजधान्या हिंडलों, पण जुनी क्षात्रविद्या जीवंत ठेवलेलें हें एकच राजघराणें मला दिसलें.' आतां आमचे चरित्र-नायकांचे पश्चात्‌ ही विद्या फक्त राजे बहादुरांजवळच शेष राहिली आहे. पण त्याचा भोक्ता कोण ? ही विद्या अशीच अंतर्धान पावणार कीं काय !

———

## १४ लाठी.

राजेसाहेबांनीं नागपूरच्या अबदुल्लामिया दख्खनी यांना लाठीचे वस्ताद केलें. त्यांचे लाठीचे सहाध्यायी हिरालाल पांडे, अग्गूमिया, गफूर वगैरे मंडळी होती. राजसाहेबांचें दांडपट्टा, फरीगदगा वगैरेचें शिक्षण आटोपल्यानंतर त्यांनीं लाठी शिकण्यास प्रारंभ केला. पूर्वी फेंका, उड्डाणी वगैरे सर्व तयार झाल्यामुळें लाठी शिकण्याला त्यांना फार दिवस लागले नाहींत. ते भर्राट फार वेगानें फिरवीत. त्या भर्राटीचा वेग एवढा असे कीं ती फिरवीत असतां जर कोणी राजेसाहेबांचे आंगावर दगड फेंकला तर तो त्यांचे आंगाला न लागतां, लाठीला लागून दूर जाऊन पडे. ते रोज या भर्राटीची मेहनत अर्धा तास करीत. राजेसाहेबांना क्षात्रविद्येपैकीं एक एक विषयाला निरनिराळा गुरु लाभला होता. व तो गुरु त्या एकच विषयांत पारंगत असलेला असाच मिळाला होता. त्यांचे गुरूला एकच विषय माहीत, तर राजेसाहेब प्रत्येक विषयांत पारंगत झाल्यामुळें पुढें त्यांचे गुरूंचेंही तेज त्यांचेपुढें पडेनासें झालें. ते गुरूंचे गुरु होऊन बसले ! नागपुरांतील मुसलमान लोकांच्या पहिल्या दंग्याचे वेळीं हिंदु लोकांना आत्मरक्षण करितां यावें ह्मणून राजेसाहेबांनीं लाठीचा वर्ग राजवाड्यांत काढला. व पुष्कळ लोकांस लाठी शिकवून त्यांना लाठी शिक्षणाची अभिरुचि उत्पन्न करून दिली. नंतर नागपुरीं लाठी शिक्षणाचे स्वतंत्र संघ त्यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झाले, ह्मणून त्यांनीं राजवाड्यांतील आपण स्वत: शिकवीत असलेला वर्ग बंद केला.

## १५ घोड्यावर बसणें.

हें क्षात्रविद्येचें शिक्षण चालू असतांनाच घोड्यावर बसण्याचें शिक्षण त्यांनीं घेतलें. राजेसाहेब घोड्यावर उत्तम प्रकारें बसत. चाळीस पन्नास मैल सारखी घोडदौड करीत जात. पोलो वगैरे ते उत्तम खेळत. कुंपणें उडून जाणें, खंदकावरून घोडे उडविणें, घोड्यावरून भाल्याची फेंक करणें, तरवार, पट्टा फिरविणें, हींही कामें ते करीत.

या प्रकारचें शिक्षण राजेसाहेबांना वयाच्या पंधरा सोळा वर्षेपर्यंत मिळालें. त्यांचें विद्याभ्यासाचे गुरुजी राघोबा बावीस्कर यांचे शिक्षण सुरूच होतें. इंग्रजी,

संस्कृत, मराठी यांचें यथायोग्य शिक्षण, त्यांनीं घेतलें. इग्रजी पांच इयत्तेपर्यंत राजेसाहेबांचें शिक्षण आलें, तेव्हां वावीस्कर दिवंगत झाले. नंतर राजसाहेव नागपूर येथील मिशन स्कूलमध्यें विद्याभ्यासाकरितां जाऊं लागले. मिशन स्कुलांत अगदीं प्राथमिक शिक्षणापासून तो बी. ए. पर्यंत शिक्षणाची सोय आहे. अगदीं श्री, ग शिकणारा मुलगा एकदां त्या शाळेंत घातला कीं, बी. ए. होई तोंपर्यंत तेथून काढण्याची गरज नाहीं. एवढी विशाल ती शिक्षणसंस्था आहे. एवढ्याचकरितां राजेसाहेबांनीं मिशन स्कूलमध्यें शिक्षण घेण्याचें ठरविलें. त्या स्कूलमध्येंही राजेसाहेबांचा अभ्यास पूर्ण समाधानकारक असाच असे. त्यांचे सहाध्यायी गडी राजेसाहेबांवर फार प्रेम करीत व मिशन सोसायटीला राजसाहेब आपल्या स्कूलमध्यें आल्यामुळें विशेष भूषण वाटूं लागलें. मास्तर व प्रोफेसर लोकांचें राजेसाहेबांवर फार प्रेम असे; व राजेसाहेबही त्यांचेबरोबर तशाच नात्यानें वागत.

# १६ प्रपंच–प्रवेश.

प्रपंचीं तें भाग्य । परमार्थीं वैराग्य ॥
दोनी यथासांग । दोहींकडे ॥ १ ॥

प्रपंचांत भाग्य आणि परमार्थांत वैराग्य या दोन्हीं गोष्टी मनुष्यमात्राला स्वाभाविक लाभल्या ह्मणजे भवसागरांतून तरून जाण्याला सुलभ जातें. या गोष्टी पूर्वदत्त ह्मणजे प्रारब्धानुसार प्राप्त होत असतात, अशी आपल्या हिंदुधर्म संस्कृतीची भावना आहे. हें प्रारब्ध किंवा भाग्य विद्वत्तेवर, पैशावर किंवा अधिकारावर अवलंबून नसतें हें मनुष्याच्या पूर्व जन्माच्या कर्मावर अगर जन्म–कालावर अवलंबून राहतें. तें मनुष्याच्या कर्तृत्वशक्तीवर नेहमींच अवलंबून राहिलेलें दिसत नाहीं. ह्मणूनच त्याला पूर्वदत्त ह्मणण्याचा प्रसंग येतो; अर्थात पूर्वजन्माच्या सुकृतानुसार या जन्माचें भाग्य उदयाला येत असतें, असेंच मनुष्य गृहीत धरून चालत असतो. कारण प्रारब्धावर अगर भाग्यावर मनुष्यमात्राचा ताबा चालत नाहीं, त्याचाच मनुष्यावर ताबा चालत असलेला दिसतो व अनुभवाला येतो, ह्मणूनच भाग्यवान पुरुषाचा अभागी लोकांनीं मत्सर करून उपयोग होत नाहीं. राजाच्या पोटीं जन्माला आल्यानें मुलगा भाग्यवान निमजतोच असें ह्मणतां येत नाहीं, अगर अठरा विसवें दारिद्र्याचा उपभोग घेणाऱ्याच्या पोटीं जन्म घेतल्यानें तो मुलगा भाग्य-



श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाईसाहेब व राजेसाहेब.

पृष्ठें १४०-१४१

[K. P. Z. P. B.]



श्रीमंत राजे साहेब [ वय वर्षे १६-१७ ] पंचहत्यारी.

[ K P.Z, P, B ]

पृष्ठे १४०-१४१.

हीनच निपजतो, असेंही नाहीं. हें भाग्य स्वाभाविकच लाभत असतें, व तें प्रत्येक मनुष्य आपल्या आयुष्यक्रमांत प्रारब्धाच्या कसोटीला लावून पारखून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. हाच प्रयत्न करण्याची मनुष्यमात्राची स्वाभाविक प्रवृत्ति हाच त्याचा पुरुषार्थ असें मानावें लागतें.

प्रपंच—संसार याला सर्वसाधारण सागराची उपमा देण्यांत येते. उपमा आणि उपमेय यांची सांगड जोडण्याकरितां सागराचें विशालत्व, गांभीर्य या गुणां-बरोबरच त्याच्या भीषणत्वाचीही कल्पना प्रपंचाशीं पूर्णपणें जुळणारीच आहे. या उपमेच्या स्पष्टार्थाखेरीज यांत कांहीं गूढार्थ आहे कीं काय व तो प्रपंच या उप-मेयाला जमतो कीं काय, हें आपण पाहूं. सर्व साधारण व्यवहारांत मनुष्य प्रपंचांत पडला, हें आपण केव्हां मानतो तर त्याचें ज्या वेळीं लग्न होतें त्या वेळीं; व त्याच सुमुहुर्तावर तो प्रपंच प्रवेश करतो अशी आपली समजूत आहे. लग्नापूर्वी मनुष्य प्रापंचिक आहे, असें मानण्याची पद्धत नाहीं. जन्मापासून लग्न होईतोंपर्यंत मनुष्य पृथ्वीतलावर वावरत असतो. त्याच्या बालक्रीडा, किंवा विद्यार्जन करण्याकरितां त्याला विशेष साधनाची जरूरी लागत नाहीं. साधारण साधनानेंच त्याचा कार्यभाग होतो. परंतु सागरांत प्रवेश करण्याला ज्याप्रमाणें पृथ्वीतलापेक्षां नौकेच्या विशेष साधनाची जरूरी असते, त्याचप्रमाणें प्रपंचांत प्रवेश करावयाचा ह्मणजे पत्नि हेंच विशेष साधन असतें. सागरांतून तरून जाण्याला ज्याप्रमाणें नौकेच्या ठिकाणीं समतोलपणा, सुदृढता आणि हलकेपणा हे गुण असले ह्मणजे सहज सागर तरून जातां येतें. त्याचप्रमाणें पत्निही सर्वगुणसंपन्न लाभली ह्मणजे प्रपंचही सुखकर होतो. अनुकूल वारा मिळाला असतां साग-रांतून ज्याप्रमाणें नौका सुरक्षित पैलतीराला जाते त्याचप्रमाणें नौकारूपीं सर्वगुणसंपन्न पत्नि व वारारूपी भाग्य अनुकूल मिळाल्यानंतर प्रपंचही सहज तरून जातां येतो. प्रपंचाला सागराची उपमा देण्यांत वरील विशेष साधनाच्या गर्भितार्थाचाही बोध होतो.

प्रपंचांत षड्गुणसंपन्न भार्या मिळणें, हें प्रपंच नेटका होण्याचें पूर्व लक्षण आहे; आणि या लक्षणावरून प्रपंचाच्या पुढील भाग्याची रूपरेखा आंखतां येते. राजेसाहेबांना त्यांच्या प्रारब्धानें षड्गुणसंपन्न अशीच भार्या लाभली. त्यांचें लग्न त्यांच्या वयाच्या पंधरावे वर्षी झालें. बडोद्याच्या राजघराण्यांतील श्रीमंत सेनापति

आनंदरावसाहेब गायकवाड यांची ज्येष्ठ कन्या राजेसाहेबांना सांगून आली. राणी काशीबाईसाहेब यांना मुलगी पसंत पडली. वडोद्यास लग्नसमारंभ होण्याचें ठरलें. राणी काशीबाईसाहेब यांना एकुलता एक मुलगा. तेव्हां लग्नांत सर्व प्रकारची हौस करून घेण्याकडे त्यांची प्रवृत्ति होतीच. त्याचप्रमाणें श्रीमन्महाराज सयाजी गायकवाड हे गादीवर बसल्यानंतर त्यांच्या किंवा त्यांच्या भावांच्या मुलांबाळांपैकीं हें पहिलेंच कार्य असल्यामुळें त्यांनाही हा लग्नसमारंभ मोठ्या थाटानें करण्याचा उत्साह होताच. एका बाजूला नागपूरचे भोंसले राजघराण्यांतील वऱ्हाडी मंडळी व दुसऱ्या बाजूला वडोद्याची राजघराण्याची मंडळी व दोनही पक्ष उत्साह, आणि आनंद यांनीं प्रेरित असलेले. मग काय विचारतां ! लग्नाचा समारंभ साजरा करण्यांत आला, त्याची कल्पना कल्पनेनेंच जास्त चांगली येईल. ' सुमुहूर्त सावधान ' होऊन राजेसाहेबांनीं प्रपंचाची पहिली पायरी आक्रमिली. महिना पंधरा दिवस लग्नांतील निरनिराळ्या समारंभाच्या हौसी करून व मान घेऊन राणी काशीबाईसाहेब सुनेला घेऊन नागपुरीं आल्या. सुनेचें नांव अन्नपूर्णाबाई असें ठेवण्यांत आलें होतें. नागपुरीं आल्यावरही नागपूरच्या नागरिकांना मोठमोठ्या मेजवान्या देण्यांत आल्या. अशाप्रकारें राजेसाहेबांचा लग्न-समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. लग्न कार्यें हीं शरीरसंबंध जोडून सामाजिक ऐक्यभाव वाढवीत असतात. परंतु कित्येक वेळां लग्नासारख्या मंगल प्रसंगीं मानापमानाच्या क्षुद्र विचारांनीं विकार-वश होऊन जन्माचे वैरी होण्याचाही कित्येकांचे नशीबीं प्रसंग येतो. परंतु तसा प्रकार या लग्न-समारंभांत कोठेंच न होतां, हा मंगल-प्रसंग ऐक्य भावनेनें व आनंदानें पार पडला, हें त्यांत विशेष आहे.

या लग्नानंतर पांच सहा वर्षें राजेसाहेबांनीं इंग्रजी विद्याभ्यासांतच घालविलीं. पुढें सन १८९९ मध्यें राजे बहादुर रघोजीराव व राजे लक्ष्मणराव या उभय बंधूंमध्यें पंचामार्फत ' भोंसला ' इस्टेटीची वांटणी झाल्यामुळें आमचे चरित्र नायकांस विद्याभ्यास सोडून इस्टेटीची व्यवस्था पहाण्याचें कार्य हातीं घ्यावें लागलें. त्यांचे वांटणीस आलेल्या इस्टेटीस ' ज्यूनियर भोंसला इस्टेट ' असें ह्मणतात. राजेसाहेब स्वतःच्या इस्टेटीचीं बरींचशीं कामें जातीनें पहात, ह्मणून त्यांची इस्टेट क्रमाक्रमानें सुधारूं लागली. त्यांना सरकारी पेन्शनही सुरू झालें.

# वाघाची शिकार.

## १ प्रास्ताविक

क्षत्रिय राजे लोकांना शिकारीचा मोठा नाद असतो; आणि त्यांना हा नाद एकदां लागला कीं मरेपर्यंत, तो त्यांचा सुटत नाहीं. साधारण हरीण, सांबर, चितळ वगैरे जनावरांच्या शिकारी निदान स्वतःच्या जीवितावर तरी बेतणाऱ्या नसतात. नदीनाल्यांतून किंवा कांटे कुट्यांतून जाऊन थोडा बहुत काय त्रास होईल तेवढाच. परंतु वाघाची किंवा रानडुकराची शिकार तशी नसते. ती साधली तर ठीकच. नाहीं तर प्राणावरच येऊन बेतण्याचा फार संभव असतो. अशी जरी स्थिति असते, तरी शिकारीचे दिवस आले कीं, शिकारी लोकांना दुसरें कांहीं दिसत नाहीं. केव्हां शिकारीचे जंगलांत जाईन, अशी त्यांचे मनाची तळमळ सुरू होते. शिकारीचे दिवस आले ह्मणजे, शिकारी लोकांच्या घरच्या मंडळींचे जीव मात्र तळमळूं लागतात. घरचा धनी शिकारीवर जाऊन केव्हां सुखरूपपणें घरीं येतो, अशी त्यांचे जिवाला हुरहुर लागून राहते. मालकानें यंदां शिकारीला जाऊं नये एवढ्याकरतां त्याचे शिकारीला जाण्यामध्यें जितके व्यत्यय आणतां येतील तेवढे आणण्याचा प्रयत्न घरची मंडळी करीत असते. लहान मुलांचीं दुखणीं त्याच वेळीं उद्भवत असतात; बायकांचीं आजारीपणें किंवा घरांतील मंगल कार्यें त्याच वेळीं निघूं लागतात. नोकर लोकांना त्याच वेळीं सुटी घ्यावीशी वाटूं लागते. ह्माताऱ्या माणसांना त्याच वेळीं काशीयात्रा वगैरे पुण्यतीर्थाला जाण्याची बुद्धि होते. एकंदरींत काय कीं, घरच्या मालकानें शिकारीला जाऊं नये. कारण सर्वांना माहीत असतें कीं, शिकारीला जाऊं नको, असें ह्मटलें तर घरधनी केव्हांही कोणाचें ऐकणार नाहीं. तेव्हां वरीलप्रमाणें त्याच्या शिकारीच्या मार्गांत कांटे उत्पन्न करण्याचा उपक्रम घरांतील माणसें करूं लागतात. शिकारी मनुष्य मात्र या सर्व गोष्टींकडे डोळे झांक करून आपणाला घरांतून कसें बाहेर पडतां येईल, एवढ्याच विवंचनेंत असतो. अशा वेळीं

घरांतील कोणी वडील आणि कळकळीच्या माणसानें शिकारीच्या कामांत आडकाठी आणलीच, तर ' आह्मी यंदां तेवढेच जातों, पुढच्या वर्षांपासून आह्मी शिकार बंद करूं. यंदां पैसा वगैरे खर्च करून शिकारीची तयारी करून ठेवली आहे, शिवाय या शिकारीला आपले कोणी मोठे स्नेही येणार आहेत, त्यांना ' नाहीं ' ह्मणतां येणार नाहीं, ' वगैरे काय वाटेल त्या थापा देऊन घरांतून पाऊल बाहेर टाकण्याचा त्याचा प्रयत्न चालू राहतो. आणि या सर्व गोष्टी प्रत्येक वर्षांच्या शिकारीच्या वेळीं होत असतात. शिकारी ' मनुष्यानें पुढच्या वर्षीं आह्मी शिकारीला जाणार नाहीं, ' ह्मणून ह्मणणें आणि म्युनिसिपालिटीच्या किंवा कौन्सिलच्या इलेक्शनला आह्मी पुढील खेपेस उमेदवार ह्मणून उभें राहणार नाहीं, ह्मणून ह्मणणें, या दोन्हीही गोष्टी अगदीं सारख्याच असतात. दोघेही आपल्या वचनाला किंवा भाषणाला स्मरून वागलेले पाहण्यांत येत नाहींत. पुन्हां शिकारीचा मोसम किंवा इलेक्शनची वेळ आली, ह्मणजे ' ये रे माझ्या मागल्या ' याप्रमाणेंच त्यांचा प्रकार चालू होतो.

आमच्या चरित्र-नायकांचें मरेपर्यंत असेंच झालें. त्यांनीं वाघाच्या शिकारीला आपल्या वयाच्या तेवीस चोवीस वर्षांपासून सुरवात केली. त्यांच्या मातोश्रींनीं ह्मणजे राणी काशीबाईसाहेब यांनीं मुलानें शिकारीला जाऊं नये, ह्मणून पुष्कळ प्रयत्न केले. त्यांचा हा एकुलता एक पुत्र, तेव्हां कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल, याचा संभव नसल्यामुळें त्यांना शिकारीला पाठविण्याचें शक्य तेवढें टाळण्याचा त्या प्रयत्न करीत. पण या एकाच गोष्टींत राजसाहेब मातोश्रींचे इच्छेबाहेर वागत. ते काय वाटेल त्या सबबी सांगत व शेवटीं मातोश्रींची कष्टानें परवानगी घेऊन शिकारीला जात. शिकारीचा नाद वेडा असतो, एवढ्याच करितां या नादापुढें प्रेम, पैसा वगैरे कांहीं दिसत नाहीं.

## २ पूर्वतयारी व प्रवासाचा मार्ग

राजसाहेब नेहमीं भंडारा जिल्ह्यांतील ' झाडी ' मध्यें वाघाचे शिकारीला जात असत. हीं शिकारीचीं ठिकाणें त्या झाडींत सुमारें पंचेवीस मैलांच्या परिघानें पसरलेलीं आहेत. वाघाच्या शिकारीचा काल साधारणतः चैत्र महिन्यापासून पावसाळा सुरू होईपर्यंत असतो. या उन्हाळ्याच्या दिवसांत जंगलांतील गवत वगैरे वाढलेलें असतें, तें गांवचे लोक कापून टाकीत असतात. किंवा जें जंगल

अत्यंत दाट आहे व ज्या ठिकाणीं हिंस्त्र पशूंची जास्त भीति आहे, त्या ठिकाणचें गवत आग लावून जाळून टाकीत असतात. त्यामुळें जंगल मोकळें होतें व वाघाला गवतांत दडून बसावयाला जागा मिळत नाहीं. शिवाय या दिवसांत वाघ हा जंगलांतील पाण्याचीं ठिकाणें सोडून लांब जात नाहीं. ज्या ठिकाणीं नदी असेल किंवा ज्या ठिकाणीं जीवंत झरे किंवा तलाव असतील, असा जंगलांतील पाण्याचा आधार घेऊनच वाघ राहतात. त्यामुळें हटकून पाण्याच्या जाग्यावर प्रत्येक दिवशीं वाघ हा येतोच. यामुळें उन्हाळ्याचे दिवस शिकारी लोकांना शिकार करण्याला फायदेशीर पडतात. पावसाळ्यांत किंवा हिंवाळ्यांत बहुतेक जंगलांत सर्व ठिकाणीं वाघांना पिण्याकरितां पाणी मिळतें, त्यामुळें त्यांना शिकारी लोकांचा थोडा जरी त्रास लागला, तरी ते जंगलांत कोठेंही बेपत्ता होऊन बसतात. पण, उन्हाळ्यांत मात्र त्यांना ठराविक पाण्याच्या जागेशिवाय दुसरीकडे पाणी मिळण्याचा संभव असत नाहीं. नदीचेंही पाणी प्रवाह आटून गेल्यामुळें ठिकठिकाणीं डोहांमध्येंच तेवढें सांपडतें. तलाव किंवा जीवंत पाण्याचे झरे ठराविकच असतात; त्यामुळें वाघाला त्या पाण्याचा आसरा सोडून जातां येत नाहीं. तो त्या ठराविक जागांवर हिंडत राहतो. त्यामुळें शिकारी लोकांना विशेष असा त्रास पडत नाहीं. एवढ्या-करितांच उन्हाळ्यांत वाघाची शिकार करण्याचा परिपाठ आहे.

रेल्वे होण्यापूर्वी राजसाहेब शिकारीला बैलगाडीनेंच जात. नागपुराहून निघते वेळीं शिधा–सामुग्री सर्व बरोबर घ्यावी लागत असे. चैत्रांत वाड्यांतील रामनवमीचा उत्सव झाला ह्मणजे शिकारीला निघत असत. हत्ती, घोडे व उंट पायरस्त्यानें अगोदरच पाठवून देण्यांत येत. आपणाला व आपल्या बरोबरीच्या शिकारी लोकांना बसण्याकरितां बैलगाड्या घेत. या बैलगाड्यांना नागपुरीं छकडे किंवा खाचेरं ह्मणतात. शिवाय रेंग्याही बरोबर असत रेंगी ह्मणजे दोनच माणसें बसण्याकरितां लहान चाकाची व अत्यंत हलकी अशी बैलगाडी आहे. या रेंगीचे बैलही घोड्याच्या टांग्याप्रमाणें पळ-णारे असतात या रेंगीचा उपयोग हरणाचे शिकारीला फार उत्तम होतो. ही रेंगी शेतांतून, नदीनाल्यांतून वगैरे अवघड ठिकाणांतून नेतां येते. शिवाय सामानाकरितां बंडी ह्मणजे खटारे आणि छकडेही असत या लवाजम्यानिशीं राजेसाहेब नागपूर सोडीत. नागपूरपासून वीस मैलांवर नवलोजीराव गुजर यांचें मालगुजारी ' माथणी मौंदा ' या नांवाचें गांव आहे, तेथें त्यांचे वाड्यांत त्यांचा पहिला मुक्काम होत असे.

तेथें जेवणखाण करून व पांच सहा तास विश्रांति घेऊन रात्रींच्या दहा वाजणेचे सुमारास पुढील मुक्कामाकरितां निघत. हा बैलगाडीचा प्रवास रात्रींच होत असे. तेथून ह्मणजे ' माथणी मौंद्या ' हून बावीस मैलांवर भंडारा शहराचे पलीकडे वैनगंगा नदीचे कांठीं ' कार्दे ' या नांवाचें एक खेडेंगांव आहे. त्या गांवीं नदीचे कांठींच त्यांचा दुसरा मुक्काम पडत असे. तेथें शिकारीच्या दौऱ्याच्या पूर्ण स्वातंत्र्याला सुरवात होई. झाडाखालीं बसणें किंवा झोंपणें, जवळच दुसऱ्या झाडाखालीं मंडळींनीं स्वयंपाक पाणी करणें, नदींत मनसोक्त पोहणें, आरडणें, ओरडणें, उड्या मारणें वगैरे पूर्ण स्वातंत्र्यानें खेळण्यास हें वैनगंगेचें स्थान राजेसाहेबांना फार आवडत असे. या ठिकाणीं उतरल्यावर राजेसाहेब उन्हापासून बचाव व्हावा ह्मणून आपला फेटा खानदेशी पाटलाप्रमाणें बांधीत व छर्रेमार बंदूक घेऊन पायींपायींच पक्षांची शिकार करण्याकरितां जात. त्यांना जितकें पळतां येई तितकें जाऊन शिकार करून येत. भूक लागली असें वाटलें, तर बोरें किंवा पेरू कोठें दिसले तर तेंही खात. परत आल्यानंतर नदींत मनाला वाटेल तेवढा वेळ पोहत व नंतर झाडाखालीं बसून सर्व मंडळीसह भोजन करीत. आधींच फिरण्यानें श्रम झालेले व त्यामुळें उत्तम भूक लागलेली असल्यामुळें तेथील जेवणही त्यांना अमृततुल्य लागे. एकंदरींत या वैनगंगेच्या कांठचा त्यांचा मुक्काम त्यांना फारच मजेचा वाटे. पिंजऱ्यांत कोंडून ठेवलेल्या राघूला सोडून दिल्यानंतर जसें खुलें व मोकळें वाटतें, त्याप्रमाणें राजेसाहेबांना आपला दर्जा, आपला बडेजाव राखण्या-करितां संभाळाव्या लागणाऱ्या संसारिक बंधनांच्या पिंजऱ्यांतून मुक्त झाल्याप्रमाणें तेथें वाटे. तेथें ते आपला राजेपणा विसरत व एकाद्या सामान्य शिकाऱ्याप्रमाणें वागत. या ' कार्दे ' गांवापासून वीस मैलांवर ' पोहरें ' ह्मणून गांव आहे. या गांवीं पुढील मुक्काम होत असे. हें गांव राजेसाहेबांचेंच मालगुजारी आहे. तेथें त्यांच वाड्यांतच उतरण्याची व्यवस्था होई. तेथून पुढील मुक्काम ' डिघोरी ' गांवीं होई. हें गांव पोहऱ्यापासून सोळा मैलांवर आहे. हें राजेसाहेबांचें तालुक्याचें ठिकाण आहे. या प्रदेशाला ' झाडी ' असें ह्मणतात. ही ' झाडी ' भंडारा जिल्ह्यांत आहे. येथें सामान्यतः कोंकणाप्रमाणें भाताचेंच पीक होतें. पाऊसही कोंकणपट्टीप्रमाणेंच पुष्कळ पडतो. कोंकणपट्टीचे लंगोटे शेतकरी येथें दिसतात. या प्रदेशांत आल्यावर हें कोंकणच असावें, असें वाटतें. या प्रदेशांतील जंगल फार मोठें आहे. हें जंगल भंडारा जिल्हा व चांदा जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांच्या

मर्यादेंत पसरलें असून तें थेट प्रतापगडापर्यंत जाऊन पोंचलें आहे. या जंगलांत अकरा फुटांपासून तेरा फुटांपर्यंत पटाईतदार वाघ अनेक आहेत. हे वाघ या 'झाडीं' त पाऊस फार असल्यानें पावसाळ्यांत प्रतापगडावर जाऊन राहतात व पावसाळा संपला ह्मणजे ते या 'झाडी' च्या प्रदेशांत उतरतात. या डिघोरी गांवापासून वीस मैलांवर 'मांडव खाल' या नांवाचें एक गांव आहे. हें शिकारीचें पहिलें ठिकाण आहे, ह्मणून डिघोरीनंतर याच गांवीं राजेसाहेब येऊन मुक्काम करीत; किंवा या गांवापासून दोन मैलांवर 'टोला' ह्मणून शंभर एक घरांच्या वस्तीचें गांव आहे तेथें मुक्काम करीत.

## ३ शिकारीचीं ठिकाणें.

**१ मांडव खाल**—हें शिकारीचें पहिलें गांव आहे. येथें सुमारें पंचवीस घरांची वस्ति आहे. येथें फक्त फुटाण तेवढेंच विकत मिळतात. येथून चार पांच मैलांवर 'महागांव' नांवाचें एक चार पांचशें घरांचें गांव आहे. तेथें साधारण बाजारपेठ आहे. या गांवीं शिधा सामुग्री मिळते. या 'मांडव खाल' पासून सुमारें दहा पंधरा कोसांच्या परिघांत शिकारीचीं दहा बारा ठिकाणें आहेत. या प्रदेशांतून 'गाढवी' नदी नागमोडी वाहत गेली आहे. 'मांडव खाल' व 'धोबल' वगैरे ठिकाणीं मोठमोठे नाले आहेत व ते गाढवी नदीचेच प्रवाह आहेत. मुख्य शिकारीच्या जागा या 'गाढवी' नदीचे व नाल्यांचे कांठा-कांठानेंच आहेत. कांहीं ठिकाणें तलावाचे कांठीं आहेत. हें 'मांडवखाल' शामीरखां मालगुजार यांचें गांव आहे. शामीरखां यांनीं पुष्कळ इंग्रज अंमलदार लोकांना वाघाच्या शिकारी या जंगलांत करवून दिल्यामुळें त्यांना हें गांव इंग्रज सरकारनें (शिकारीबद्दल) इनाम करून दिलें आहे. या गांवीं दर वर्षी पुष्कळ शिकारी लोक शिकार खेळण्याकरितां येतात.

**२ बोरी**—हें गांव 'मांडव खाल' पासून दोन मैलांवर आहे. हें केशव-राव बुट्टी यांचें मालगुजारी गांव आहे. या गांवाला 'गाढवी' नदी आहे. या गाढवी नदीच्या कांठीं वाघाची शिकार होते.

**३ धोबल**—'बोरी' पासून आठ मैलांवर 'केसोरी' या नांवाचें चारशें पांचशें घरांचें एक गांव आहे. या गांवाला बाजारपेठ आहे. हें गांव महादेव

पाटील यांचें मालगुजारी गांव आहे. या गांवीं शिकारीकरितां मुक्काम करावा लागतो. येथून दोन मैलांवर वाघाच्या शिकारीचें मोठें जंगल आहे. त्याला ' धोबल ' असें ह्मणतात. या ठिकाणीं धोबल नांवाचा नाला आहे. त्या नाल्याच्या आसमंतांत शिकार होते.

४ कळवद–' केसोरी ' च्या उत्तरेस दोन मैलांवर ' कळवद ' ह्मणून एक गांव आहे. या गांवापासून दोन मैलांवर जंगलांत एक मोठा तलाव आहे. त्याचा परीघ दोन अडीच मैल आहे. या तलावाचे आसमंतात् वाघाची शिकार होते.

५ भडक–' केसोरी ' पासून उत्तरेला ' बोणगांव ' सहा मैल आहे. शिकारीकरितां या गांवीं मुक्काम करण्याची सोय आहे. या गांवचे पाटील सुखवस्तु आहेत. त्यांचेच वाड्यांत शिकारी लोक उतरतात. तें गांव गाढवी नदीच्या कांठीं आहे. ' बोणगांव ' पासून प्रत्यक्ष शिकारीची जागा दोन मैल लांब आहे. तिला ' भडक ' असें ह्मणतात. या ठिकाणीं ' गाढवी ' नदीच्या दोन्ही बाजूंला शिकार होऊं शकते. या नदीच्या दोन्ही बाजूला येथें वेळूचें गर्द जंगल आहे. येथें दिवसाच वाघ बाहेर पडतो. येथील रस्ते दोन प्रहरीं तीन वाजतांनाच बंद होतात. माणसांवर सर्वसाधारण वाघाचे हल्ले होतात, ते याच ठिकाणीं. या रस्त्यानें एकटी दुकटी गाडी अगर माणूस जात नाहींत. दहा दहा, पंधरा पंधरा अशीं माणसें मिळून बाजारहाट वगैरे करावयाला जात असतात.

६ गोठणगांव–बोणगांवापासून दोन मैलांवर गोठणगांव आहे. हें चिंचगड पलांदूरच्या मालगुजाराचें गांव आहे. हे मालगुजार हिंदूच आहेत. हें गांव पन्नास पाऊणशें घरांच्या वस्तीचें आहे. या मालगुजारांचे घरीं हत्ती वगैरे आहेत. हे गृहस्थ श्रीमंत असून आदरातिथ्याचे बाबतींत सुप्रसिद्ध आहेत. बहुतेक शिकारी यांचे वाड्यांतच उतरत असतात. या गांवापासून जंगलांत दीड दोन मैलांवर एक मोठा तलाव आहे. याचाही परीघ दोन तीन मैलांचा आहे. या तलावाचे कांठीं गर्द झाडी आहे. यालाच लागून प्रतापगडाचा पहाड आहे. या तलावाच्या कांठानें शिकार होते.

७ डिघोरी–हें गांव हजार बाराशें घरांच्या वस्तीचें आहे. हें राजेसाहेबांचें तालुक्यांचें ठिकाण आहे. या गांवापासून जंगलांत एक फार मोठा तलाव आहे.

त्याचा परीघ चार मैलांचा आहे. त्याच्याच बाजूला 'मालद्या' चें एक फुटकें तळें आहे. या दोन्हीही ठिकाणीं शिकार होते.

८ तिडकें—डिघोरीपासून सात आठ मैलांवर 'तिडकें' या नांवाचें गांव आहे. या गांवीं पंचवीस तीस घरांचीच वस्ती आहे. या गांवापासून एक मैलांवर एक मोठें तळें आहे. याचा परीघ दोन मैलांवर आहे. या तलावाचे कांठानें शिकार होते.

९ सालेवड्डीः—'डिघोरी' पासून उत्तरेला दोन मैलांवर 'सालेबड्डी' या नांवाचें गांव आहे. पंचेवीस एक घरांची वस्ती या गांवीं आहे. या गांवाला एक मोठा नाला आहे. त्याला 'अस्वलघोडी' असें ह्मणतात. या नाल्याच्या बाजूनें वाघाची शिकार होते. या जंगलांत मोठमोठे साप, अजगर वगैरे सरपटणारेही प्राणी आहेत.

१० शिरेगांव—'डिघोरी' च्या ईशान्येस बारा मैलांवर 'शिरेगांव' या नांवाचें पन्नास साठ घरांच्या वस्तीचें एक गांव आहे. हें गांव तुकाराम पाटील यांचें मालगुजारीचें आहे. हे पाटील दोन चार गांवचे मालगुजार असून सुखवस्तु आहेत. यांचेच वाड्यांत शिकारी लोकांची उतरण्याची व्यवस्था होते. या गांवापासून दोन मैलांवर फार मोठा तलाव आहे. याचा परीघ सुमारें चार पांच मैल आहे. या तलावाचे सांडाचे बाजूनें वाघाची शिकार होते. या जंगलाला लागूनच पहाड आहे.

११ लामटा राणी तलाव—बालाघाट जिल्ह्यांत याही ठिकाणीं वाघाची शिकार होते. 'लामटा' गांवचे जमीदार श्री. गोपाळराव यांच्याच वाड्यांत श्री. राजेसाहेब मुक्काम करीत. या गांवच्या जंगलांत मोठे पट्टेदार वाघ अकरा फुटांपासून तेरा फुटांपर्यंतचे मिळतात. शिवाय मोठीं आस्वलें, लांडगे, तरस, सांबर, रुई, चितळ, जंगली रेडे व मोठमोठीं रानडुकरें यांची हमेशा शिकार होऊं शकते.

## ४ प्रत्यक्ष शिकारीची तयारी.

दर वर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदा झाली कीं, 'डिघोरी' तालुक्याचे कामदार यांना नागपुराहून हुकूम पाठविण्यांत येत असे. या कामदाराला वरील शिकारीच्या दहा गांवांची उत्तम माहिती असे. या गांवांहून माहिती मागवून घेऊन

ज्या जंगलांत वाघाची हालचाल असलेली कळेल, तेथें शिकारीचा बंदोबस्त तो कामदार करीत असे. कित्येक वेळां एकाद्या गांवच्या जंगलांत वाघाच्या हालचाली चालू असल्याचें दिसून येई, तर कित्येक वेळां पांच सात गांवांहूनही तीच खबर येत असे. श्रीमंत राजेसाहेब आपल्या गांवीं यावेत, असें प्रत्येक गांवकऱ्याला वाटे. कारण, राजेसाहेब तेथें गेले, ह्मणजे त्यांचा मुक्काम त्या गांवाला असेपर्यंत जवळ जवळ गांव-भोजनेंच होत. ह्मणून राजेसाहेबांचे येण्याबद्दल जो तो उत्सुक झालेला असे. प्रत्येक शिकारी गांवांतील लोकांना राजेसाहेब आपल्याच गांवीं यावे, असें वाटत असल्यामुळें कित्येक वेळां खरोखर जंगलांत वाघ नसतांना वाघ निघाला आहे, अशी खोटीच बातमी कामदाराला मिळत असे. या माहितीवर विश्वास ठेविल्यामुळें दोन वेळां कामदारांची फसगत झाली, ह्मणून या माहितीवर 'डिघोरी' चा कामदार अंधविश्वास ठेवीत नसे. गांवाकडून माहिती आली, ह्मणजे स्वतः 'डिघोरी' चा कामदार त्या गांवीं जाई. तेथें जाऊन तो त्या जंगलांत 'गारा' बांधत असे. एक अगदीं ह्मातारा रेडा विकत घेऊन तो जंगलांत नेऊन बांधण्यांत येत असे. या रेड्याला सुमारें दहा रुपयांपासून बारा रुपये किंमत पडे. हा रेडा सायंकाळीं पांच वाजण्याचे अगोदर जंगलांत नेऊन बांधून यावें लागे. दुसरे दिवशीं सकाळीं स्वतः कामदार त्या ठिकाणीं जात. जर रात्रीं त्या रेड्याला वाघानें मारलेलें दिसलें, तर 'गारा' झाला आणि वाघ या जंगलांत आहे, अशी खात्री कामदाराची होई. या बाबतींत कामदार पूर्ण दक्ष राहत असे. रेडा बांधलेल्या ठिकाणीं वाघाचे पंजे जमिनीवर उठले आहेत किंवा नाहींत, तेंही तो पाही. रेडा मारला गेल्यामुळें रक्त पडले आहे किंवा काय, हाडें वगैरे कोठें दिसतात कीं नाहीं याचा पूर्ण तपास कामदार यांना स्वतः करावा लागे. त्यावरून वाघ जंगलांत आहे कीं नाहीं, हें तो कामदार ठरवी. त्याची पूर्ण खात्री झाली ह्मणजे, तो सर्व हकीकतीचें पत्र राजे साहेबांना लिहित असे. वाघाचे पंजे जमिनीवरील धुरळ्यांत उमटलेले पाहून वाघ केवढा मोठा आहे, याचाही कयास त्याला करितां येई व त्याप्रमाणें तो कामदार राजेसाहेबांना कळवीत असे. श्री. राजेसाहेबांना याप्रमाणें पत्र आलें, ह्मणजे लगेंच रा. बंडोबा तुपकर जामदार यांना पुढील व्यवस्थेकरितां दर वर्षी पाठविण्यांत येई. बंडोबा तुपकर हे बालपणापासून राजेसाहेबांचे शिकारींत जात असल्यामुळें त्यांना या झाडीच्या मुलखाची पूर्ण माहिती झाली होती.

ते त्या गांवीं गेल्यानंतर वाघ कोणत्या ठिकाणीं ' गारा ' करितो, तें ठिकाण पहात. शिकार हांक्यानें होऊं शकेल कीं, गाऱ्यावर वाघ येतो, त्याच वेळीं शिकार केली पाहिजे, याचा अंदाज पाहून नंतर ते पुढील तयारीस लागत. वाघ जर ' अदमखोरा ' ह्मणजे ' माणसांना खाणारा ' असेल, तर तो हांक्यांत सांपडूं शकत नाहीं. कारण माणसाच्या रक्ताची किंवा मांसाची एकदां वाघाला चट लागली ह्मणजे, त्या वाघाला इतर जनावरें खाणें बरें वाटत नाहीं; ह्मणून तो माणसांच्याच आंगावर जाण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळें माणसें हांका करूं लागलीं कीं, हांक्यामुळें मोकळ्या रस्त्यानें तो पळून न जातां हांक्यांतील लोकांच्या आंगावरच जाण्याचा प्रयत्न करीत असतो. तेव्हां अशा स्थितींत हांका करणें धोक्याचें असतें. अशा वेळीं झाडावर 'मचान' बांधून त्या ठिकाणीं शिकारी मनुष्यानें बसून ' गारा ' करण्याकरितां जेव्हां वाघ येतो, व तो रेड्याला मारून खात बसतो, त्याच वेळीं त्याची शिकार करणें प्राप्त होतें. ह्मणून पुढील व्यवस्था करण्यापूर्वी वाघाची शिकार कोणत्या पद्धतीनें करावयाची, हें धोरण नक्की करावें लागतें. हांक्यानें शिकार होईल असें ठरल्यानंतर त्याप्रमाणें पुढील व्यवस्थेला प्रारंभ होतो. नंतर शिकारी लोकांसाठीं ' मचान ' बांधण्याकरितां उंच उंच झाडें कोठें कोठें आहेत तें, व हांका सुरू झाल्यानंतर वाघ नाल्यांतून किंवा झुडपांतून लपत लपत ' मचाना ' कडे येण्याला कसा मार्ग आहे, हें पाहून त्या धोरणानें आणि दुसरें असें कीं जंगलांतून वाघानें निघून जाऊं नये, ह्मणून पुन्हां रोज किंवा एक दिवसां आड त्याला रेड्याचें भक्ष्य द्यावें लागतें. ' गारा ' कोठें बांधावयाचा ती जागा कायम करून त्या ठिकाणीं रेडे बांधण्याची व्यवस्था करण्यांत येते. ' गारा ' बांधल्यानंतर दुसरे दिवशीं वाघानें तो खाल्ला, ह्मणजे ' वाघानें गारा केला, ताबडतोब निघावें, ' असा संदेश राजेसाहेबांना पाठविण्यांत येत असे. त्याप्रमाणें नागपुराहून राजेसाहेब आपल्या शिकारी लोकांसह व इतर नोकरचाकरमंडळीसह शिकारीला निघत.

## ५ जखमी वाघ व ह्मशींचा कळप.

रा. बंडोबा तुपकर यांना हांक्याची व्यवस्था आधींच करावी लागे. हांक्याचा पुढाकार घेणारे दोन इसम राजेसाहेबांनीं ठरवून ठेविले होते. बोरदाचे राहणारे अंता पाटील आणि मांडवखालचे वाहदखां, या दोघां इसमांना निरोप पाठविण्यांत येई.

ते जवळच्या खेड्यांतून हांक्याकरतां चार पांचशें लोक गोळा करून आणीत. त्याच-प्रमाणें एक चाळीस पन्नास ह्मशी व रेड्यांचा कळपही ठरवून ठेवित असत. या कळपाचा उपयोग वाघ गोळी लागून जखमी झाला व पळूं लागला ह्मणजे करण्यांत येत असे. वाघाला वर्मी गोळी लागली, तर तो तेथेंच पडतो; पण मस्तक किंवा छाती या ठिकाणीं गोळी न लागतां पोटांत, पुठ्यावर किंवा पायाला लागली, तर तो जखमी होऊन पळतो; आणि मातलेल्या मोहऱ्याप्रमाणें जो मनुष्य दिसेल, त्याच्या आंगावर तो हल्ला करतो. वाघ जखमी होऊन पळूं लागला, ह्मणजे तो कोणत्या दिशेनें पळूं लागेल, याचा नेम नसतो. ह्मणून बंदुकीचा आवाज होतांच हांकेवाले लोक एका मिनिटाचे आंत पटापट झाडावर चढून बसतात, व ते वाघ मेलेली खबर येईपर्यंत खालीं उतरत नाहींत. तेव्हां अशा स्थितींत वाघाचा पाठलाग करावा लागतो. त्याकरितां शिकारी लोक रेडे ह्मशींचा कळप पुढें ठेवून व मागें बंदुकी तोलून धरून वाघाचा पाठलाग करितात. जखमी झालेला वाघ सहसा ह्मशींच्या कळपावर हल्ला करीत नाहीं. वाघाच्या वासानें ह्मशी व रेडे घाबरून गेलेले असतात. त्यामुळें त्यांचेवर आत्मरक्षणाची जबाबदारी येऊन पडलेली असते. या वेळीं कळपांतील एकही जनावर कळप सोडून एकटेंच पळत नाहीं. आपला जीव संघशक्तीच्याच बळावर वांचेल, असें प्रत्येक जनावराला वाटतें, आणि त्या कळपांत जीं रेडकें असतील त्यांना त्या ह्मशी गराडा देऊन मध्यभागीं घेतात व ज्या दिशेला वाघ पळत असेल, त्या दिशेनें बंदोबस्तानें जाऊं लागतात. हा कळप बहुतेक शिकून तयारच असतो. तो नेहमीं जंगलांत चरणारा असल्यामुळें वाघापासून आपलें रक्षण करण्याचें व प्रसंग विशेषीं वाघावर हल्ला करण्याचें शिक्षण त्याला स्वभावतःच मिळालेलें असतें. वाघाचे मागून हा कळप जाऊं लागला, ह्मणजे शिकारी लोक गोळी मारण्याची परिस्थिति असली तर पुन्हां गोळी मारतात. गोळी मारण्याची परिस्थिति नसेल, ह्मणजे हांका करणाऱ्या लोकांचेच बाजूला वाघ पळत असेल, तर गोळी चालविणें धोक्याचें असतें, ह्मणून ह्मशीचा कळप एकदम वाघाचे आंगावर घालण्यांत येतो. या कळपाचे मालकानें ' घे-घे ' अशी इशारत दिली, ह्मणजे एकदम सर्व ह्मशी व रेडे वाघावर तुटून पडतात. व त्या जखमी वाघाला मारून टाकतात. या जखमी वाघापासून धोका होऊं नये अगर दुसरा एकादा वाघ जाळींत दडून वगैरे बसला असल्यास त्याचेपासून शिकारी लोक पायीं चालूं लागल्यानंतर धोका होऊं नये, ह्मणून या ह्मशींच्या कळपाची फार जरूरी असते.

वाघावर ह्मशींचे कळपानें हल्ला केल्यावर वाघाचे प्रतिकाराचे वेळीं क्वचित प्रसंगीं ह्मैसही वाघाकडून मारली जाते. त्याची किंमत शिकारी लोक देत असतात.

## ६ राजेसाहेबांची शिकार–स्वारी.

राजेसाहेबांचेबरोबर जाणारे जुने शिकारी लोक बलदारखां वस्ताद, रा. यशवंतराव मोहिते वैद्य, बाळा कोरके नाईक. परंतु अलीकडे पंधरा वीस वर्षें तरूण पिढींतील शिकारी जामदार रामराव शेळके पहेलवान, खंडोबा तुपकर जामदार, सुजातखां पहेलवान यांनाच ते बरोबर घेत. यांशिवाय ब्राह्मण मंडळीं-पैकीं श्री. वासुदेवराव संगमकर, श्री. व्यंकटराव पुणेंकर, वे. शा. सं. ताह्मनकर शास्त्री, रा. किसनलाल ओझे वगैरे मंडळी घेत. याशिवाय चपराशी, बारीदार, पांडे, वगैरे दहा पंधरा मंडळी असत. रेल्वे होण्यापूर्वी ते बैलगाडीनें जात. रेल्वे झाल्यानंतर रेल्वेनेंच ते बहुश: प्रवास करीत. नागपुरास इतवारी स्टेशनवर बसून उमरेड, नागभीड लाईननें अर्जुनी स्टेशनवर उतरावें लागे. तेथून आठ दहा मैल डिघोरी गांव पडतें. तेथें बैलगाडीनें ते जात असत. कधीं कधीं ते मोटारनेंही जात. नागपुराहून उमरेड, भिवापुर, नागभीड, येथें जाऊन तेथून ब्रह्मपुरीं येथें डाक बंगल्यांत मुक्काम करावयाचा. ही ब्रह्मपुरी नागपुराहून ऐशीं एक मैल आहे. तेथून वैनगंगा नदी ओलांडून आलमोरीच्या रस्त्यानें वडसा स्टेशन-रोडवरून येसोरें येथें मोटारीनें येत असत. येथपर्यंतच मोटारचा प्रवास होऊं शकतो. ब्रह्मपुरीपासून येसोरें तीस मैल आहे. येसोऱ्यापासून बोरी सहा मैल व बोरीपासून मांडवखाल दोन मैल. हा प्रवास बैलगाडीनेंच करावा लागत असे.

या कोणत्याही मार्गानें राजेसाहेब आल्यानंतर शिकारी लोकांचे हिशेबानें 'मचान' बांधण्यांत येत. जमिनीपासून सुमारें पंधरा वीस फूट उंचीवर फांद्यांच्या आधारानें झाडावर उलटी खाट बांधून किंवा लांकडें बांधून बसण्यासारखी जी जागा करण्यांत येते, त्याला ' मचान ' किंवा ' पार ' ह्मणतात. या मचानावर बसलेले शिकारी वाघाला दिसूं नये ह्मणून झाडांच्या डहाळ्या तोडून त्यावर झोपडी-प्रमाणें आकार होईल, अशा पद्धतीनें बांधण्यांत येतात. याप्रमाणें जितके शिकारी असतील, तितके मचान बांधावे लागतात. दुपारीं सुमारें दोन वाजण्याच्या सुमाराला शिकारी लोक मचानवर येऊन बसतात. हत्ती, उंट वगैरे मचानपासून दोन तीन फर्लांगवर

येऊन उभे राहातात. नंतर हांका करण्याकरतां इषारा करण्यांत येतो. हांका करण्याची पद्धत खालीलप्रमाणें असते.

## ७ हांकेमारी व शिकार.

हांक्याकरितां चारशें पांचशें लोक जमतात. प्रत्येकाच्या हातांत भाला, कुऱ्हाड, किंवा लाठी असते. प्रत्येकाला झाडावर चढतां येत असलें पाहिजे. हांक्याचे लोक जंगलाबाहेरचे मैदानावर जमले, ह्मणजे ते हांक्याला योग्य आहेत किंवा नाहींत, हें पाहून प्रत्येकाचे हातांत हांक्याचें तिकीट देण्यांत येत असे. तिकीटवाल्या लोकांनाच हांक्यांत भाग घेण्याचा अधिकार मिळे. या हांकेकरी लोकांना प्रत्येकी तीन आण्यांपासून चार आणे मजुरी द्यावी लागे. ती मजुरी शिकार झाल्यानंतर तिकीट परत घेऊन तेथेंच जंगलांत वाटण्यांत येई. याप्रमाणें तिकीटें वाटल्यानंतर हांक्यावरचे दोघेजण मुख्य इसम असत, त्यांचे स्वाधीन ही मंडळी होई. आतां पाटील व वहादखां यांचे हातीं बंदुका असत. याप्रमाणें ही हांका मारणारी मंडळी जंगलाला वर्तुळाकृति वेढा घालीत. हा वेढा सुमारें पहिल्यानें दोन मैलांचा पडत असे. हांकेवाले लोकांपुढें ह्मशींच कळप ठेवण्यांत येत. या वर्तुलाकार वेढ्याची एक बाजू वाघाला निघून जाण्याकरितां मोकळी सोडण्यांत येई. ती मोकळी सोडण्याची बाजू ह्मणजे ज्या बाजूला ‘ मचान ’ बांधले असतील व जेथें शिकारी लोक बसले असतील ती. याप्रमाणें तयारी करून हांकेवाले लोक तीन बाजूनें मोटमोठ्यानें ओरडूं लागले व जाळ्या झुडुपें यावर दगड फेकूं लागले ह्मणजे जंगलांतील जनावरें खडबडून उठून ज्या दिशेनें हांक्याचा आवाज येत नाहीं त्यामार्गानें लपत लपत येऊं लागतात. जसजशा हांका जवळ जवळ येत जातील, तसतशा जनावरांच्या स्वाऱ्या ‘ मचाना ’ च्या खालून जाऊं लागतात. पहिल्यानें वानरांची टोळी हुपहुप करीत आपलेवर कांहीं भयंकर संकट कोसळलें असें वाटून या शिकारी लोकांच्या मचानाखालून पळत जाते. त्यांचेमागून हरिणें कावरीं बावरीं झालेलीं पळतात. त्यांचेनंतर चितळ, सांबरें, तींही लपत लपत पळतात. नंतर आस्वलें, रानडुकरें, जंगली रेडे , तरस, लांडगे वगैरे जीं जनावरें असतील, तींही क्रमाक्रमानें निघून जातात, ही इतकी शिकार जरी ‘ मचाना ’ खालून गेली, तरी मचानावरील शिकारी लोकांना या जनावरांची मजा पहातच गप्प बसावें लागतें. कारण या जनावरांवर जर गोळी



हांकेमारी.

[K. P.Z. P, B.]

पृष्ठें १५४ १५५

ग्रंथ संग्रहालय.



आदमखोरा वाघ [पृष्ठ १७२] व राजेसाहेब.

(क फो. झि. प्रे. बे.)

पृष्ठें १५४-१५५

चालविली, तर तिच्या आवाजानें वाघ भिऊन दुसऱ्याच मार्गानें निघून जाईल. एवढ्याकरितां या सर्व शिकारी हातच्या सोडून द्याव्या लागतात. या वेळीं एकाद्या शिकारी मनुष्याला जर खोकला आला, तर तोंडांत कपड्याचा बोळा घालूनच खोकला बंद करून घ्यावा लागतो. माणसाची थोडीसुद्धां चाहुल लागूं देतां उपयोगाचें नाहीं; आणि ती जर लागेल तर शिकार फसलीच ह्मणून समजावयाचें. अशा-प्रकारें ही जंगलांतील वऱ्हाडी मंडळी एकामागून एक निघून जाऊं लागल्यानंतर मोर नाचत नाचत येत असलेले दिसूं लागतात. मोर दृष्टीला पडले कीं शिकारी मंडळी आपल्या बंदुका तोलून धरण्याला सुरवात करूं लागतात. कारण मोराच्या मागें वाघ असतो; आणि मोरही वाघाच्या आसऱ्यानेंच जंगलांत रहातात. वाघ हें जनावर एवढें दुष्ट आणि सर्व जनावरांचा संहार करणारें असलें तरी मोरानें त्याला आपलेंसें करून ठेवलेलें असतें. परमेश्वरी योगायोग कांहीं विलक्षण असतो वाघानें जनावर खाल्लें ह्मणजे त्याच्या दाढेंत मांस जाऊन अडकतें. तें मांस त्याला काढतां येत नाहीं. त्यामुळें त्याला वेदना होऊं लागतात. नंतर दुसरें भक्ष्यही त्याला त्या वेदनेमुळें खातां येत नाहीं. अशा स्थितींत तो वाघ 'आंव आंव' करीत तळमळत पडतो. तेव्हां मोर येऊन आपल्या चोंचीनें वाघाचे दाढेंतील मांस काढून खातो. तें कुजलेलें मांस मोराला आवडतें. दाढेंतील तें मांस मोर चोंचीनें काढीत असतां वाघाला बरें वाटतें. व तो डोळे झांकून स्वस्थ पडतो. मोरानें दाढेंतील मांस काढून खाल्ल्यानंतर मोर उडून जातो व त्यामुळें वाघाच्या वेदना कमी होऊन पुन्हां जनावरांचें मांस खाण्याला तो तत्पर होतो. मोराशिवाय वाघाचें चालत नाहीं व मोराला त्या दाढेंतील मांसाची चट लागल्यामुळें तो वाघाचा सहवास सोडीत नाहीं. अशा प्रकारची या दोन प्राण्यांची दोस्ती परमेश्वरानें घालून दिली आहे. यामुळें मोर दिसले ह्मणजे त्यांच्यामागून वाघाची स्वारी येत असावी असें प्रत्येक शिकाऱ्याला वाटतें. इतक्यांत लपत लपत या जाळींतून त्या जाळींत असें करीत करीत आणि छायेचा आसरा घेत घेत वाघ पुढें पुढें येऊं लागतो. सामान्यतः वाघाचें जोडपें असतें किंवा त्यांचे लहान लहान बच्चेही त्यांचेबरोबर येत असतात. या जोडप्यापैकीं नर अगर मादी मेली असली, तर एकच वाघही हांक्यामध्यें निघतो. कित्येक वेळां दोन चार मोठे वाघही निघतात. हे शिकारी लोकांच्या निशाणाच्या आटोक्यांत आले, ह्मणजे शिकारी

लोक गोळी चालवितात. सामान्यतः एका हांक्यांत एकच वाघ सांपडतो. परंतु निरनिराळ्या मचानाखालीं जर एकदम वाघ आले तर दोन तीन वाघाच्या सुद्धां शिकारी होऊं शकतात. याप्रमाणें वाघाची शिकार झाली, ह्मणजे हत्ती बोलावण्यांत येऊन त्यावर बसून नंतर राजेसाहेब गांवाकडे येत असत. वाघाला उलट्या खाटेवर निजवून व त्याला मोठमोठीं लांकडें बांधून वीस पंचवीस माणसें मिळून गांवाकडे घेऊन येत. वाघ मारलेल्याची वर्दी गांवांत गेली ह्मणजे ढोल वगैरे वाद्यें घेऊन गांवांतील सौभाग्यवती स्त्रिया आरती घेऊन वेशीजवळ येत. त्या ठिकाणीं वाघाला व शिकारी लोकांना आरती करण्यांत येते. नंतर तेथून मिरवणूक निघून मुक्कामाचे ठिकाणीं वाजत गाजत येई. गांवकरी लोकांचा हा मोठा आनंदाचा दिवस असे. रात्रीं वाघाभोंवतीं जमून ते नाचत, गाणीं ह्मणत, रात्रभर याचप्रमाणें सर्व लोक जागरण करीत अशाप्रकारें कोणत्याही शिकारीचा थाट असतो. ज्याचे त्याचे मेहनतीप्रमाणें ज्याला त्याला राजेसाहेब बक्षिसें देत असत. गरीब गुरीबांना राजेसाहेबांचा मुक्काम असेपर्यंत जेवणें मिळत असत. म्हणून शिकारीचे दिवस आले म्हणजे राजेसाहेब केव्हां येतात, याची झाडींतील लोक वाटच पहात असत. ज्या गांवीं राजेसाहेबांचा मुक्काम होई, तेथें इतर झाडींतील गांवचे लोक जमत व त्यामुळें त्या गांवाला जत्रा जमल्याप्रमाणें होत असे. दर वर्षी या शिकारीचे बाबतींत राजेसाहेबांचे चार पांच हजार रुपये खर्च होत असत.

वाघाचे शिकारीकरितां राजेसाहेब नं. ४७०, ५००, ४९०, १२ या नंबरच्या रायफली बरोबर घेत असत. शिवाय, भाले, तरवारी, कुऱ्हाडी, फरशा वगैरेंही हत्यारें त्याचेबरोबर असत.

## ८ राजेसाहेबांची बॅग ( एकंदर शिकार ).

राजेसाहेबांनीं आपल्या सर्व आयुष्यांत लहान मोठे ७३ वाघ मारले. त्यांचा तपशील—मांडवखाल—१९; बोरी—११; केसोरी—धोबल—७; केळवद—१२; बोणगांव—११; गोठणगांव—२; डिघोरी—१; तिडकें—२; सालेबड्डी—१; शिरेगांव—५; लामटा राणी तलाव २; यांशिवाय त्यांनीं सांबरें सुमारें शंभर, चितळ चाळीस, रुई पंचेवसि, तरस पंधरा , लांडगे सहा, अस्वलें पांच, रानडुकरें सुमारें दोनशें व जंगली रेडा एक, याप्रमाणें शिकार केली. नागपूरपासून दहा पंधरा मैलांचे आंतच हरणाचे

शिकारीकरितां ते जात. गुमथळें, केम, परसाळ, डिघोरी ( लहान ), पिपरी, शिवणगांव, नवलमारी, वेळें, रुई वगैरे गांवीं जात. हरणाची शिकार बहुश: ते रेंग्यांमधूनच करीत. त्यांनीं सुमारें आठशें हजार हरिणांची आपल्या आयुष्यभर शिकार केली. दोन जंगली कुत्रे मारले. उडत्या पाखरांची तर गणनाच नाहीं. याप्रमाणें राजसाहेबांनीं अनंत शिकारी केल्या. प्रत्येक शिकारीचे वेळीं निरनिराळ्या गंमती घडून आल्या. राजेसाहेब निशाणाचे बहाद्दर होते. ते उडत्या पक्षांवरही निशाण लावून त्यांचा वेध करीत. त्यांनीं पळत्या वाघाचीही शिकार केली होती. काळोखांत केवळ आवाजाचे अनुरोधानें निशाण लावून वाघाची शिकार त्यांनीं केली. अशा गंमतीच्या अनेक शिकारी त्यांनीं केल्या. त्यांपैकीं कांहीं विशेष मजेच्या असल्याकारणानें येथें देत आहोंत. या शिकारीच्या हकीकतीनें शिकारी लोकांना विशेष आनंद वाटेल.

## ९ पळत्या वाघिणीची शिकार.

इ. स. १९१० मध्यें श्रीमंत राजेसाहेब दर वर्षाची शिकारीची व्यवस्था करून शिकारीला गेले. बरोबर श्रीमंत सौ. राणी अन्नपूर्णा बाईसाहेब होत्या. शिवाय बलदारखां वस्ताद, श्री. यशवंतराव मोहिते वैद्य, बाळा नाईक ही जुनी शिकारी मंडळी बरोबर होती ही सर्व मंडळी शामीरखां वस्ताद याचें मालगुजारी गांव ‘ मांडवखाल ’ येथें गेली. त्या वेळीं गारा बांधणें, मचान बांधणें, हांका करणें वगैरे शिकारीची व्यवस्था करणें शामीरखां वस्ताद मालगुजार यांचेकडेच होती. शामीरखां वस्ताद हेही स्वत:ला मोठे शिकारी असें समजत होते. त्यांनीं मोठमोठ्या युरोपियन अंमलदारांकडून अनेक शिकारी या मांडवखालच्या जंगलांत करविल्या होत्या. त्याचप्रमाणें त्यांच्या शिकारीच्या कौशल्या-बद्दल त्यांना मोठमोठ्या लोकांकडून शिफारस पत्रेंही मिळालीं होतीं. शिवाय त्यांच्या या शिकारीच्या कलेबद्दल त्यांना सरकारकडून ‘ मांडवखाल ’ हें गांव इनाम मिळालें होतें. त्यामुळें तर शामीरखां वस्ताद हे सुप्रसिद्ध शिकारी होऊन बसले होते. शिवाय त्यांचें वयही साठीच्या जवळ झाल्यामुळें व त्यांचे काळयाचे पांढरे या जंगली शिकारींतच झाल्यामुळें त्यांना या शिकारीच्या बाबतींत लोक फार मान देत. सामा-न्यत: मनुष्याच्या साठीचा सुमार आला, ह्मणजे त्याच्या कर्तबगारीपेक्षां त्याच्या

तोंडाची वटवट जास्त होत. त्यांत हे शामीरखां वस्ताद मुसलमान, तेव्हां स्वभावतःच त्यांची मदार त्यांच्या तोंडाच्या तोफखान्यावर पहिल्यापासून होती ! त्यांत त्यांची उमर साठीच्याजवळ आलेली. मग काय विचारतां ! मुखबंद ढिला झाला होता, ह्मणण्यापेक्षां पार तुटून गेला होता. एकंदरींत त्यांच्या तोंडाची सरबत्ती सुरू झाली, ह्मणजे त्यांच्या वयमानाकडे पाहून मोठमोठी मंडळीसुद्धां गप्प बसत. त्यांचा आदर ठेवीत. अशा प्रकारच्या सुप्रसिद्ध शिकारी शामीरखांकडे शिकारीची व्यवस्था असल्यानें त्यांनीं शास्त्रोक्त गारे बांधले. शास्त्रशुद्ध तीन ' मचान ' ही बांधले. हांक्याची पद्धतशीर रचना केली. हत्ती, उंट, वगैरे योग्य जागीं नेऊन उभीं केलीं. दुपारीं सुमारें दोन वाजतां श्रीमंत राजसाहेब व बलदारखां वस्ताद यांना एका मचानवर, श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाईसाहेब व श्री. यशवंतराव मोहिते वैद्य मानकरी यांस दुसऱ्या मचानवर आणि बाळा नाईक व हरीभाऊ खासगी कामदार यांना तिसऱ्या मचानवर, याप्रमाणें बसविण्यांत आलें. शामीरखां वस्ताद एका हत्तीवर बसून हांक्याचा पुढाकार घेऊन हांका करूं लागले.

या हांक्यांत एक पट्टेदार वाघीण निघाली, असें कांहीं हांकेकरी लोकांनीं पाहिलें. त्याप्रमाणें शामीरखां वस्ताद यांनीं राजसाहेबांना आवाज दिला. सर्व शिकारी लोकांनीं बंदुका तोलून धरल्या व वाघिणीची मार्गप्रतीक्षा करूं लागले. ' हांका ' क्रमाक्रमानें जवळ येत चालला. जंगलांतील इतर वऱ्हाडी मंडळी आपल्या नेहमींच्या पद्धतीनें मिरवत मिरवत निघून गेली, तरी नवरदेवीचा पत्ता नाहीं. ' हांका ' तर अर्ध्या फर्लांग इतका जवळ आला. आतां याहीपेक्षां जर हांका जवळ येईल, तर धोका होण्याचा संभव आहे असें राजेसाहेबांना वाटलें. त्यांनीं तेथेंच हांका थांबविण्याकरितां खूण केली. आणि ह्मशीचा कळप पुढें घालून गवताच्या बाजूनें हांका करीत येण्यास खुणेनेंच कळविलें. त्याप्रमाणें गवताच्या बाजूनें ह्मशीचा कळप पुढें ठेवून हांका करण्यास सुरवात झाली. राजसाहेबांचे मचानपासून सुमारें शंभर हातांवर गवत फार मोठें वाढलेलें होतें. त्याचे जवळपास म्हशीचा कळप येतांच एका म्हशीला वाघाचा वास लागला व ती त्या गवतांत पळत घुसली. त्याबरोबर सर्व म्हशींचा कळप पळत त्या गवतांत घुसला. त्या गवतांत केव्हां व कशी ती वाघीण घुसली हें कोणालाच दिसलें नव्हतें. हा म्हशींचा कळप गवतांत धांवत घुसल्याबरोबर

त्यांतून वाघीण एकदम उडी मारून बाहेर पडली व ती शर्यतीमध्यें घोडा पळतो, त्याप्रमाणें राजेसाहेबांचे मचानखालून पळूं लागली. ती एवढ्या वेगानें पळत होती कीं, तिचें पोट जमिनीला घांसूनच जात आहे कीं काय, असें वाटलें. श्रीमंत राजेसाहेबांनीं तेवढ्यांतच चलाखी करून त्या वाघिणीवर गोळी चालविली. ही सारी गोष्ट लिहावयाला किंवा तोंडी सांगावयास जेवढा वेळ लागेल, त्याच्या सहस्रांशही घडून येण्याला लागला नाहीं. डोळ्याचें पातें लवतें न लवतें तेवढ्या अवधींत हा सर्व प्रकार घडला. बंदुकीचा आवाज कानीं पडतांच सर्व शिकारी लोक स्तंभित झाले. राजेसाहेबांजवळ बसलेले बलदारखां वस्ताद विस्मय-चकित होऊन राजेसाहेबांकडे पाहूं लागले. त्यांना राजेसाहेबांनीं बंदुक उचलली केव्हां व निशाण लावलें केव्हां याचा पत्ताच लागला नव्हता. वाघीण मात्र दृष्टिपथांतून अदृश्य झाली होती.

बंदुकीचा आवाज होतांच हांकेवाले लोक, हत्ती उंट वगैरेसह सर्व मंडळी मचानाखालीं जमली. सर्व शिकारी मंडळी मचानवरून खालीं उतरली. आजची शिकार हुकली ह्मणून जो तो निराश होऊन बसला. इतक्यांत रागानें लाल होऊन गेलेले शामीरखां वस्ताद तेथें येऊन पोंचले. ते रागानें राजेसाहेबांना ह्मणाले, ' तुफान धांवणाऱ्या वाघिणीवर गोळी चालविण्याची विद्या तुह्मांला कोणत्या वस्तादनीं शिक-विली ? ' हें ऐकून बलदारखां वस्तादनीं खालींच मान घातली. पुढें ते ह्मणाले, ' धांवत्या वाघिणीवर गोळी चालवून तुम्हीं शिकारीचा सत्यनाश करून टाकला. आतां गोळी चाललेली वाघीण या जंगलांत राहणेंच शक्य नाहीं. आमचे सर्व श्रम तुम्हीं व्यर्थ दवडले. आज गोळी चालविली नसती तर पुन्हां उद्यां हांका करून शिकार करतां आली असती. शिकारीचा कायदा सर-कारांना समजत नसला तरी त्यांच्याजवळ हे नागपूरचे वस्ताद बलदारखां होते. त्यांनीं तरी सरकारांना तसें करूं द्यावयाचें नव्हतें. पण हें वस्ताद कसले? शुद्ध हजाम आहेत. माझ्या हाताखालीं सर्व उमर घालविली, तरी माझ्या शागिर्दांची बरोबरी करतां येणार नाहीं आणि हे मोठ्या दिमाखानें सरकारचे वस्ताद बनले. अशी बेकायदा गोळी जरी माझ्या स्वतःच्या मुलानें चालविली असती तरी मीं त्याचें फिरून तोंड पाहिलें नसतें. पळत्या वाघिणीवर गोळी चालविणार शिकारी मी माझ्या भर उमरींत पाहिले नाहींत आणि ऐकिलेही पण नाहींत. पण आज हे बलदारखां

वस्ताद आणि त्यांचे हे शागीर्द राजेसाहेब पहिल्यानेंच माझ्या डोळ्याला दिसत आहेत. " याप्रमाणें ह्मातारा शामीरखां वस्ताद तोंडाला येईल तें बडबडूं लागला. निराशेच्या रागानें तोंडाला मेलगाडीची गति मिळाली होती. या मुसलमानशाई तोंडी तोफखान्यापुढें ' महांकाली ' तोफेचाही गडगडाट कमी दर्जाचा आहे, असें मंडळींना वाटूं लागलें; पण त्यांच्या तोंडाला तोबरा देण्याचें कोणालाच धाडस होईना. त्यांच्या वडीलपणाकडे पाहून सर्वच मंडळी गप्प बसली. नंतर शामीरखां वस्तादनीं हांकेवाल्या लोकांना परत जाण्याचा हुकूम दिला कीं 'आजची शिकार हुकली आतां येथें शिकार होणें शक्य नाहीं, तेव्हां तुमच्या गांवाला निघून जा. '

हा वस्तादांचा हुकूम होतांच ते जाऊं लागले. इतका वेळ सौ. राणी-साहेब गप्प बसल्या होत्या. त्यांना या वस्तादांचा मनापासून राग आला होता. वस्तादनां प्रत्युत्तर करण्याचा त्यांनीं मध्यंतरीं पुष्कळ प्रयत्न केला, पण सरकार कांहींच बोलत नाहींत, त्याअर्थीं आपण बोलणें ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेतल्यासारखें होईल, ह्मणून त्या कांहींच बोलल्या नव्हत्या; पण शेवटीं ज्या वेळीं लोक परत फिरूं लागले, त्या वेळीं मात्र त्यांच्यानें गप्प बसवलें नाहीं. त्वारागानें ह्मणाल्या, ' वस्ताद, लोकांना परत जाण्याचा हुकूम देऊं नका. सरकारांची गोळी वाघिणीला लागली आहे. मीं प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. ' यावर वस्ताद ह्मणाले, ' राणीसाहेब, मला माफी द्या. आपणाला शिकारीचा कायदा माहीत नाहीं. सरकारांच्या झालेल्या चुकीवर आपण पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला, ह्मणून वाघीण थोडीच मरणार आहे ! तुमच्यासारखीं तोंडचोपडीं माणसें सरकारांच्या मार्यचीं जवळ आहेत, ह्मणून आपला पराक्रम आपल्या बायकोला दाख-विण्याकरितां पळत्या वाघिणीवर गोळी चालविण्याचा असा प्रयत्न ते करतात. तुमचे मालक पळत्या वाघिणीवर नेम धरून तिला मारणार अर्जुनाचेच अवतार कीं नाहीं असल्या तोंडचोपड्या गोष्टी नागपूरच्या राजवाड्यांतील लोकांनाच शोभतात. जी गोष्ट आह्मीं कधीं भर उमरींत पाहिली नाहीं. किंवा ऐकिली नाहीं, किंवा शिकारीच्या शास्त्राचा जिला आधार मिळत नाहीं, अशी अद्भुत रम्य गोष्ट मला सांगून माझ्या ह्मातारपणाचीं तुह्मी अब्रू घेत आहांत. याप्रमाणें वस्तादांच्या तोंडाची टकळी चाललीच होती. बंडोबा तुपकर जामदार त्या वेळीं या शिकारी लोकांत नसत. ते हांक्यामध्यें काम करीत असत. ही

भाषा व हा संवाद चालला असतां, ते त्याच ठिकाणीं एकत उभे राहिले होते. त्यांनीं वाघीण जखमी झालेली आपण प्रत्यक्ष पाहिलें, असें राणीसाहेबांनीं सांगितलेलें ऐकलें होतें. त्यांची खात्री होती कीं, राणीसाहेब कधीं खोटें बोलणार नाहींत. शिवाय राजेसाहेबांचे निशाणाचीही त्यांना खात्री वाटत होती. ह्मणून ते ही हकीकत ऐकल्यानंतर वाघीण ज्या दिशेनें पळाली तिकडे शोधार्थ एकटेच गुपचुप गेले. वस्तादांचा तोंडाचा तोफखाना सुरूच होता. नंतर ते राणीसाहेबांना ह्मणाले, " तुमच्या मालकांच्या निशाणाची तुम्हांला जर एवढी खात्री असेल, तर मी शंभर रुपयांची पैज लावतों. तुमच्या मालकांनीं पळतें जनावर मला मारून दाखवावें. राणीसाहेब, तुमच्या मालकांप्रमाणें माझे आज शंभर दोनशें शागीर्द आहेत. तुम्हीं मला गचक दिली म्हणून मी थोडाच फसणार आहें ? "

राजसाहेबांनीं गोळी चालवून मूर्खपणा केला, आणि त्यावर आच्छादन घालण्याचा त्यांची मंडळी प्रयत्न करतात, त्यामुळें राजाचीं पोरें कशीं बिघडतात, वगैरे विषयांची पुनरावृत्ति करून आपला अनुभव, आपलें ज्ञान, आपला वस्तादी दर्जा, आपला नांवलौकिक यांची शक्य तवढी प्रशंसा करून घेऊन जमलेल्या मंडळीवर आपली पूर्ण छाप पाडण्याचा शामीरखां वस्तादांचा प्रयत्न चालूच असतांना बंडोबा जामदार पळतच राजेसाहेबांकडे आले. त्यांनीं पळसाची एक लहान डहाळी हातांतून आणली होती, ती त्यांनीं राजसाहेबांना दाखविली त्या डहाळीच्या पानांवर ताजें रक्त उडालेलें राजसाहेबांनीं पाहिलें. त्यांनीं ती डहाळी बलदारखां वस्तादांच्या हातीं दिली. तें ताजें रक्त पाहून 'शेर जखमी हो गया,' असें ते आनंदानें ओरडले. त्याबरोबर सर्वच मंडळींना आनंदानें नवजीवन आलें. राणीसाहेबांचा आनंद गगनांत मावेना. त्या आनंदाच्या भरांत ह्मणाल्या, 'मी सांगतें आहें वाघ जखमी झाला म्हणून आणि थेरडा माझ्याबरोबर पैज लावतो आहे. मेल्याची वटवट सारखी सुरू आहे. बुढ्यानें आतांपर्यंत आमचीं बेचाळीस कुळें उद्धारलीन !' राजसाहेबांनीं पुढें जास्त न बोलण्याविषयीं राणीसाहेबांना माननें खूण केल्यामुळें राणीसाहेबांना तवढ्यांतच गप्प बसावें लागलें. नाहीं तर शामीरखां वस्तादांची चांगलीच हजेरी घेण्याचा विचार त्यांचे मनांत होता. शामीरखां वस्ताद मात्र पाण्यांत ढेकूळ विरघळावें त्याप्रमाणें एकदम विरघळले. त्यांना आपण स्वप्नांत आहों कीं काय असं वाटूं लागलें त्यांच्या तोंडाला आपोआप कुलुप पडलें ! रागानें लाल झालला त्यांचा चेहरा

एका क्षणांत पांढरा फटफटीत पडून त्यावर किंचित् काळी छटा उत्पन्न झाली. डोळ्यांतील रागाची छटा मावळून त्यांच्या डोळ्यापुढें एकदम हिरव्या पिंवळ्या रेषा दिसूं लागल्या. ते आ करून डोळे फाडून दाढीवर हात ठेवून जेथच्या तेथेंच जमिनीकडे दृष्टि फिरवून स्तंभित झाले. त्यांच्या आंगावरील स्मृति जवळ जवळ उडाल्याचप्रमाणें त्यांना वाटलें. इतक्यांत बलदारखां वस्तादांच्या आंगांत बळ आलें. तेही एकाद्या लहान मुलाप्रमाणें उड्या मारूं लागले. व सर्व मंडळी ' वाघिणीच्या तपासाला चला, ' असें ओरडून ह्मणूं लागली. त्याप्रमाणें सर्व मंडळी बंदुका, भाले, तरवारी, कुऱ्हाडी, लाठ्या वगैरे सरसावून व ह्मशीचा कळप पुढें करून वाघ ज्या दिशेला पळाला होता व जेथें रक्त लहान लहान पळसाचे झाडांवर उडालें होतें, त्या धोरणानें जाऊं लागली. याप्रमाणें शोध करीत मंडळी पुढें चालली असतां एका मोठ्या झाडाच्या खोडाला जमिनीपासून सुमारें अडीच फुटावर वाघाचे केंस व रक्त लागलेली ताजी खूण दिसली. ती पाहून तर वाघ खात्रीनें जखमी झाल्याची व गोळी लागल्यानंतर वाघाला तिरीमिरी त्या झाडाला येऊन तो आदळल्याची मंडळींची खात्री झाली. व तेथेंच कोठें तरी तो मरून अगर मरणाच्या पंथाला लागून पडला असेल, असा सर्वांनीं कयास केला.

शामीरखां वस्ताद या मंडळीबरोबर एकही शब्द न बोलतां चालले होते. व मंडळींचेंही लक्ष या वेळीं त्यांचेकडे नव्हतें. वाघिणीचें लांबून निरीक्षण करण्यांत प्रत्येक जण गर्क झाला होता. ह्मशीच्या कळपाचा आसरा घेऊन व पूर्ण सावधगिरी ठेवून मंडळी हलके हलके वाघिणीच्या दिशेनें चालली होती. पुढें सुमारें अर्धा फर्लांग जागा चालून गेल्यानंतर जमिनीच्या लवणांत पळसाचे लहान लहान झाडांचें एक चिमुकलेंसें बन दिसूं लागलें. तें जसें जसें जवळ येऊं लागलें, तसतशा ह्मशी कावऱ्या बावऱ्या दिसूं लागल्या आणि त्या बनाकडे एका ह्मशीनें ताबडतोब धूम ठोकली. त्याबरोबर कळपांतील इतर ह्मशीही त्या बनाकडे धांवल्या. मागून मंडळीही धांवूं लागली. ह्मशी त्या बनांत शिरून वाघीण ज्या ठिकाणीं मरून पडली होती, तेथें तिला वेढा देऊन उभ्या राहिल्या. सर्व मंडळी तेथें येऊन पहातात, तों वाघीण मरून पडलेली दृष्टीस पडली. तें अजस्र धूड पाहून सर्वांना जो आनंद झाला, त्याचें वर्णन करणें अगदींच अशक्य आहे. शामीरखां वस्तादनीं राजेसाहेबांची उद्धारगत केली होती, त्यामुळें राजेसाहेबांच्या मंडळींना फार वाईट

वाटलें होतें. त्यानंतर ती वाघीण मेलेली दिसतांच सर्वांना अवर्णनीय आनंद झाला. पळत्या वाघिणीवर गोळी चालवून आपल्या शागीर्दानें शिकार केलेली पाहून बलदारखां वस्तादांना जो आनंद आणि जो अभिमान वाटला, तोही अवर्णनीयच होता. त्यांनीं राजसाहेबांची पाठ थोपटली; आणि ह्मणाले ' सरकार, आपण आज आमच्या दाढीची अब्रू राखली. नाहीं तर शामीरखां वस्तादनीं आमच्या हातांत हजामाची धोकटीच दिली असती. कसें काय वस्ताद ! नागपूरचे वस्ताद हजाम ना ? आतां तरी तुह्मीं कधीं न पाहिलेली व ऐकलेली शिकार डोळ्यांनीं पाहिलीत ना ? आतां तुम्ही आपला वस्तादी पेशा सोडून देऊन आमचे शागीर्द व्हा. म्हणजे तुम्हांला पळत्या वाघाची शिकार करतां येईल. कोठले जंगलांतले वस्ताद आले आणि आम्हांला आपलें ज्ञान शिकवायाला लागले. असले सत्राशें साठ वस्ताद आम्हीं बगलेंत मारले आहेत. ' वगैरे वगैरे प्रकारें बलदारखां वस्तादांचेंही तोंड आतां सुरू झालें. तेही या वेळीं आपला मुसलमानी बाणा विसरले नाहींत. भुजोरी करण्यांत व वाचाळपणाविशी दाखविण्यांत शामीरखां वस्तादापेक्षां आपण कमी वस्ताद आहों, असें त्यांनीं दिसूं दिलें नाहीं.

इतका वेळ शामीरखां वस्ताद अगदीं ओशाळून गप्प बसले होते त्यांना आपण राजेसाहेबांना कां बोललों, असें झालें होतें. परंतु यापुढें त्यांना गप्प बसतां येण्यासारखें नव्हतें. त्यांनीं डोळयांत अश्रू आणले आणि राजेसाहेबांना सद्गदीत स्वरानें ते म्हणाले 'सरकार' आपल्या निशाणाची थोरवी मी काय वर्णन करूं ? आजपासून आपण आमचे वस्ताद झाला. आम्हीं आजपर्यंत ज्या गोष्टी पाहिल्या नाहींत किंवा ऐकल्या नाहींत, ती गोष्ट आज आम्हीं डोळ्यानें प्रत्यक्ष पाहिली. तेव्हां आपण ' अल्ला ' च आहांत असें मला वाटूं लागलें आहे. राजे लोक म्हणजे नामधारी शिकारी अशी आजपर्यंतच्या माझ्या अनुभवावरून माझी कल्पना झाली होती. पण ती कल्पना काढून आज मला आपण डोळस बनविलें. राजघराण्यांत आपल्याप्रमाणें अवतारी पुरुष निपजतात, याची मला चांगली ओळख पटली. इतके दिवस मीच एक मोठा शिकारी, अशी मला घमेंड झाली होती, परंतु त्या घमेंडीचा माझा मद आज अल्लानें आपले हातून उतरविला. आजपासून मी आपलेकडे माझा वस्ताद या दृष्टीनेंच पाहात जाईन. मी वृद्ध आहें. माझ्या पांढऱ्या दाढीकडे पाहून मला आपण आणि राणीसाहेबांनीं क्षमा करावी.

इतका वेळ राजेसाहेब कांहींच बोलले नव्हते आतां मात्र त्यांना बोलल्या-शिवाय गत्यंतर नव्हतें. ते ह्मणाले, ‘ वस्ताद, यांत क्षमा कसली करावयाची ? पळत्या वाघिणीवर गोळी चालविणें हें बरोबर नाहीं, ’ ही आपली गोष्ट मला अगदीं कबूल आहे; पण वाघीण पळूं लागली आणि तिला पाहून मीं खरोखर आपलेपणा विसरून जाऊन गोळी घातली. दैवयोगानें गोळी लागून वाघीण मेली, त्यांत माझा कांहीं गुण नाहीं. परमेश्वरी योगायोग झालें. या वाघिणीचा मरण्याचा योग आला होता, ह्मणून नेम लागला. त्यांत आमच्या निशाणाची कांहींच थोरवी नाहीं. त्यांतल्या त्यांत आपल्यासारखीं वृद्ध माणसें आमचेबरोबर असल्या-नंतर आपल्या पुण्याईची त्यांत भर पडल्याशिवाय का ही शिकार झाली ? या शिकारीचें सर्व श्रेय आपलेकडेच आहे. या मंडळींना समजत नाहीं, ह्मणून काय वाटेल तें ते बोलतात. पण त्याकडे तुम्ही मुळींच लक्ष देऊं नका ! ’

राजेसाहेबांच्या या बोलण्यानें शामीरखां वस्तादांना समाधान वाटलें; नंतर सर्व मंडळींनीं खाट आणून ती उलटी ठेवून तिला मोठमोठी लांब लांकडें बांधून तीवर वाघिणीला निजवून ती मोठमोठ्या दोरांनीं बांधली आणि चोवीस चोवीस माणसांनीं ती वाहून सायंकाळीं पांच वाजण्याचे सुमारास मांडवखालला आणली. त्या ठिकाणीं राजेसाहेबांवरून कित्येक लोकांनीं सतके केले. रात्रभर केवढा मोठा जलसा झाला, तो सांगतां येत नाहीं. शामीरखां वस्ताद जो भेटेल त्याला राजेसाहेबांची तारीफ सांगत सुटला. हे वस्ताद यानंतर राजसाहेबांचे कायमचे एक स्तुतिपाठक भाटच बनले. एकंदरींत या वेळची शिकार राजेसाहेबांच्या आयुष्यांतील एक चिरस्मरणीय अशीच झाली, यांत संशय नाहीं.

## १० ध्वनि -- वेधानें केलेली शिकार.

बालाघाट जिल्ह्यांत ‘ लामटा ’ हें एक गांव आहे. हें गोपाळराव नवघरे जमीदार यांचें गांव आहे. या गांवास जाण्याकरितां नागपुराहून रेलवेनें गोंदियास जाऊन तेथें उतरून जबलपुरास जाणाऱ्या गाडींत बसावें लागतें. पुढें बालाघाट जंक्शनवरून दुसरें तिसरें स्टेशन ‘ लामटा ’ आहे; तेथें उतरावें लागतें. गेल्या दोन तीन वर्षांत झाडींत वाघ उतरले नाहींत. त्यामुळें श्रीमंत राजेसाहेबांनीं शिकारीची

माहिती मिळविण्याकरितां बलदारखां वस्ताद व बाळा नाईक या दोघांना चांदा जिल्ह्यांत पाठविलें. त्याचप्रमाणें बंडोबा तुपकर जामदार यांस 'लामटा' गांवीं पाठविलें. हे जामदार लामट्यास श्री. गोपाळराव जमीदार यांचे वाड्यांत येऊन उतरले. तेथें त्यांनीं वाघाबद्दल चौकशी केली; तेथें त्यांना समजलें कीं, त्या वेळ-पर्यंत तेथें पुष्कळ युरोपियन अंमलदार व इतर शिकारी लोक येऊन गेले, परंतु कोणाचेही हातून तेथें एकही शिकार झाली नाहीं. तेथील जंगलांत वाघ आहे, ही हकीकत समजतांच तेवढाच आनंद श्री. जामदार यांना झाला. त्यांनीं त्या जंग-लांतील कांहीं माहीतगार लोकांना बरोबर घेतलें व ते जंगलांत जाऊन निरीक्षण करूं लागले. त्या जंगलांत राणीतलाव या नांवाचा सुमारें एक मैलाच्या परि-घाचा जलसंचय आहे, तो लामटा गांवापासून सुमारें दोन मैल लांब आहे. त्या तलावाच्या बाजूबाजूनें हिंडतां हिंडतां वाघाचीं उमटलेलीं पावलें जामदार यांना दिसलीं. तीं पाहिल्यानंतर त्या जंगलांत वाघाचें वास्तव्य आहे, याची त्यांना खात्री झाली. ह्मणून त्यांनीं त्या दिवशीं तेथें 'गारा' बांधला.

दुसरे दिवशीं सकाळीं तेथें जाऊन पहातां 'गारा' झालेला त्यांना दिसला. तेव्हां वाघ कोणत्या दिशेनें येतो याची चौकशी त्यांनीं चालविली, तींत त्यांना अशी माहिती लागली कीं, लामट्यापासून सहा मैलांवर खरांकोन नांवाचें गांव आहे, त्या जंगलांत तो वाघ राहतो; व तेथून टेंकडया टेंकड्यांचे आसऱ्यानें तो राणीतलावाकडे येतो. शिवाय अशीही माहिती लागली कीं, तो वाघ फार मोठा आहे. त्याची शिकार करण्याकरितां पुष्कळ शिकारी लोकांनीं प्रयत्न केला होता. त्याच्यावर गोळ्याही चालविल्या होत्या, परंतु त्याचा कांहीं एक उपयोग न होतां, तो त्यामुळें विशेष धूर्त मात्र बनला असून तेव्हांपासून तो हांक्यांत सांपडत नाहीं. एका जंगलांत सारखें वास्तव्य करीत नाहीं. आठ दहा मैलांच्या टापूंत कोठेंही फिरत राहत आहे. यामुळें महिना महिना शिकारी लोक त्याचे पाळतीवर राहूनही कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यामुळें कंटाळून कंटाळून कित्येक शिकारी हात हालवीत परत गेले. त्या वाघाला शिकारी लोकांचा थोडा वास लागला कीं, तो कोठचे कोठें अदृश्य होत असे. त्याला निरनिराळ्या बोली बोलतां येत होत्या; आणि त्यामुळें धोक्यानें तो माणसें व इतर जनावरें मारीत असे. वानराची बोली बोलत असे. झुडपांत तो दडून बसे व वानराप्रमाणें 'खें' 'खें' असा आवाज करी. त्यामुळें वानरांना वाटे कीं, येथें आपल्यापैकीं कोणी

वानर दडून बसला आहे. त्याला पहावयाला दुसरे वानर आले कीं, एकदम झडप घालून त्यांना तो पकडत असे. त्याचप्रमाणें सांबराची बोली, म्हशीची बोली, गाईची बोली वगैरे बोली बोलून त्या जनावरांच्या तो शिकारी करी. त्याचप्रमाणें रात्रीं लामटा स्टेशनवर येऊन आगगाडीची शिटी तो बरोबर वाजवी. ती शिटी अवेळीं वाजलेली ऐकून स्टेशनवर पोर्टर, स्टेशन मास्तर यांची गडबड उडे. बाहेर येऊन पहावें तर गाडी नाहीं. स्टेशनवर माणसांची जाग असल्या-मुळें वाघाला त्या लोकांवर हल्ला करितां येत नसे. परंतु स्टेशनवर येऊन गाडीची त्यानें शीट दिली, म्हणजे तो लामटा गांवाहून स्टेशनवर जो रस्ता येतो, त्या रस्त्यावर कोठें तरी दडून बसे; आणि गांवाकडून एकटा दुकटा प्रवासी, गाडी आली असें समजून येत असल्यास, त्याचेवर छापा घालून त्याला मारीत असे. त्याच-प्रमाणें जंगलांत दुपारीं एकाद्या झाडाखालीं बसून आपल्या पंजांत एक दगड घेऊन त्या झाडावर मारीत बसे. तो आवाज जंगलांत लांकडें तोडणाऱ्या लोकांप्रमाणें होत असल्यामुळें जंगलांत हिंडून रस्ता चुकलेलें एकादें मनुष्य त्या आवाजावर तिकडे जात असे. त्या लांकूडतोड्या मनुष्याला रस्ता विचारून जावें असा त्याचा विचार असतो. पण तेथें तो मनुष्य येतांच हा वाघ त्याची शिकार करी. अशा प्रकारें निरनिराळ्या बोली बोलून तो वाघ आपला निर्वाह करीत होता.

ही हकीकत बंडोबा जामदार यांना समजतांच वाघ ' आदमखोरा ' म्हणजे माणसें खाणारा आहे, तेव्हां याची शिकार मोठ्या सावधगिरीनेंच केली पाहिजे. इतके शिकारी या वाघांकरितां प्रयत्न हरले आणि दैवयोगानें जर ही शिकार आपले राजेसाहेबांना लाभली, तर त्यांचा मोठा नांवलौकिक होईल, असा विचार करून त्यांनीं नागपुरीं राजेसाहेबांना येणेकरितां तार दिली. बंडोबा जामदार ज्या दिवशीं लामट्याला उतरले, त्याच गाडीनें चांदा जिल्ह्यांतलि युरोपियन शिकारी ' शिकार होत नाहीं, ' म्हणून परत फिरले होते. बंडोबांनीं राजेसाहेबांना येण्याविषयीं तार दिल्यानंतर एक दिवसाआड राणीतलावावर ' गारा ' बांधण्याचा त्यांचा उपक्रम चालूच होता. श्रीमंत राजेसाहेब नागपुराहून आपल्या नेहमींच्या शिकारी लोकांना म्हणजे रामराव पहेलवान, बलदारखां वस्ताद, बाळा नाईक, व्यंकटराव पुणेकर वगैरे मंडळीसह लामट्याला येऊन पोंचले. या शिकारीकरितां श्री. राजेसाहेबांनीं श्रीमंत

सौ. राणी इंदिराबाईसाहेब यांनाही बरोबर आणलें होतें. वाघाची सर्व आजपर्यंतची हकीकत त्यांनीं ऐकून घेतली व रात्रौ ' मचान ' वर बसूनच शिकार करावयाचा संकल्प त्यांनीं केला. राणीतलावाचे जवळच जेथें गारे होत, त्या ठिकाणींच एका मोठ्या पळसाचे झाडावर राजेसाहेबांकरितां ' मचान ' बांधण्यांत आला होता. त्याचप्रमाणें राजेसाहेबांचे ' मचान ' पासून अर्ध्या फर्लांगवर दुसरा ' पारचा ' रामराव व बंडोबा यांचेकरितां बांधला होता.

रोज सायंकाळीं सहा वाजतां श्रीमंत राजेसाहेब ' लामट्या ' हून हत्तीवर बसून येत, व सूर्यास्ताचे अगोदर ' मचान ' वर सर्व मंडळी जाऊन बसत. त्या ठिकाणापासून एक मैलावर जंगल गार्डाचा नाका होता, त्या नाक्यावर दोन्ही हत्ती, हिरागज व किसनगज यांना घेऊन अबदुल हमीद व अमीरमिया हे माहुत जात व त्याच ठिकाणीं सर्व रात्रींचा मुक्काम करीत. श्रीमंत राजेसाहेबांचे ' मचान ' वर आलटून पालटून व्यंकटराव पुणकर, बलदारखां वस्ताद किंवा बाळा नाईक यांपैकीं कोणीही एकजण बसत असे. या मचानवर डोळ्यांत तेल घालून सायंकाळचे सहा वाजल्यापासून सकाळीं सहा वाजेपर्यंत बसावें लागे. रोज नवीन ' गारा ' बांधावा व ' मचान ' वर वाघाची वाट पहात सर्व रात्रभर बसून रहावें. थोडें लवंडावयाला किंवा बसूनच डोळे झांकून पेंग घ्यावयालासुद्धां त्या मचानवर जागा असत नाहीं. थोडा निष्काळजीपणा दाखविला कीं मचानवरील मनुष्य सरळ जमिनीवर पडावयाचें, अशी मचानची स्थिति. असें असतां शिकारीची हौस कोणाच्या घरची ! इतका त्रास असतां त्यांतच शिकारीचा नाद आनंद उत्पन्न करून राजे साहेबांना रात्रभर जाग्रण करावयाला लावीत होता.

अशा प्रकारें डोळ्यांत तेल घालून वाघाची वाट पहात राजसाहेब बसत. परंतु वाघ किती हुशार ! तो चांदणी रात्र असतांनासुद्धां झाडाखालीं पडलेल्या सांवलींतून अगदीं पानाचाही आवाज न करितां केव्हांचे केव्हां येई व बांधलेल्या रेड्याला मारून त्याला घेऊनही जाई. पण मचानवरील राजेसाहेबांना त्याचा बिल-कूल पत्ता लागत नसे. याप्रमाणें सतत आठ दहा दिवस नित्यक्रम चालू होता. रोज यावें, गारा बांधावा, मचानावर रात्रभर डोळ्यांत तेल घालून जागावें, सकाळीं पहावें तों वाघानें गारा केलेला दिसावा व तसेंच हात हालवीत ' लामटा ' गांवांत परत

जावें. याप्रमाणें नित्य परिपाठ चालला होता. राजेसाहेबांबरोबरचे शिकारी लोक कंटाळून गेले. त्यांना भीक नको पण कुत्रा आंवर असें झालें. नित्य बसून रात्रीच्या जाग्रणानें आपण आजारी पडूं असें कांहींना वाटलें. बलदारखां वस्ताद झातारे असल्यामुळें त्यांना हें जाग्रण अगदींच परवडेना. तव्हां ते, ' आतां शिकार होणें शक्य नाहीं, आपण नागपुरीं चला, ' असा सल्ला राजेसाहेबांना देऊं लागले. पण एकएक दिवस जसा जसा जास्त होऊं लागला, तसतसा या वाघाची शिकार हटकून करावयाची असा राजेसाहेबांचा संकल्प जास्त जास्त दृढ होत चालला. ते ह्मणाले ज्यांना शिकार न करितां नागपुरीं जावयाचें असेल, त्यांनीं खुशाल जावें. आमची बिलकुल आडकाठी नाहीं. आह्मीं मात्र शिकारीचा सोक्षमोक्ष केल्याशिवाय येणार नाहीं. हा राजेसाहेबांचा निर्धार पाहून मंडळी गप्प बसली.

रोज सायंकाळीं मचानवर बसण्याकरितां ही शिकारी मंडळी जात, त्या वेळीं लामटा स्टेशनवरील स्टेशन मास्तरसहित सर्व मंडळी या शिकारी मंडळीची टवाळी करीत. ' राजे शिकारीला जातात आणि हात हालवीत परत येतात. नागपूरचे बहाद्दर शिकारी कीं नाहीं ! ' असें या मंडळींना ऐकूं जाईल, असें बोलावें व मोठमोठ्यानें हंसावें. या शिकारी मंडळींना मनांतून राग येई पण करतात काय ! त्यांना त्या वेळीं उत्तर देण्यासारखी त्यांची परिस्थितीच नव्हती ! वाघानें सुरवातीपासून एकंदर पंधरा गारे केले. शिकारी मंडाळी मचानवर बसली असतां कोणाला कांहींसुद्धां आवाज न येतां रेड्याला मारून तो त्याला अचानक घेऊन जाई, तरी त्यांना त्याचा पत्ता लागेना. तें राजेसाहेबांना मोठें आश्चर्य वाटे. शेवटीं त्यांनीं रेड्याचे गळ्यांत लोखंडी साखळदंड बांधून त्याला झाडाला मजबूत बांधण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें त्यांचे हुकमाची तामिली झाली. नित्त्याप्रमाणें राजेसाहेब व इतर शिकारी मंडळी बारावें दिवशीं मचानवर जाऊन बसली. तेथें बसल्यावर सुमारें एक तास जातो न जातो तोंच आकाशांत एकामागून एक असे ढग आक्रमण करूं लागले. थोड्याच वेळानें जोराची हवाही वाहूं लागली. त्यामुळें जंगलांत वाळून पडलेलीं पानें आकाशांत उडून जाऊन तरंगूं लागलीं. जमिनीवरील धुरळा वाऱ्याच्या जोरानें सर्व आकाश व्यापूं लागला. उंच उंच वृक्ष त्या तुफान वाऱ्याचा प्रतिकार करूं न शकल्यामुळें ते कोसळून खालीं पडूं लागले. राजेसाहेब ज्या वृक्षावरील मचानवर बसले होते, तोही वृक्ष मोडून पडतो कीं काय अशी प्रत्येक

क्षणाला धास्ती वाटूं लागली. मेघांचा गडगडाट क्रमाक्रमानें वाढतच जाऊं लागला• विद्युल्लता आपला पराक्रम दाखवूं लागली. थोडयाच अवधींत सर्व आकाश मेघांनीं व्यापून गेलें. काळाकुट्ट अंधःकार पडला. मचानवरील जवळ बसलेलाही मनुष्य डोळ्याला दिसेना. मधून मधून वीज चमके, तेवढ्यानेंच सृष्टिज्ञान होण्यासारखें होतें पण डोळे उघडले कीं आकाशांत हवेमुळें उडणारा धुरळा डोळ्यांत जाई, त्यामुळें डोळे उघडण्याचेंही धारिष्ट होत नव्हतें.

ते दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें वळवाचे पाऊस त्या प्रांतांत होत असत. व ते फारच भयंकर स्वरूपाचे होत. राजेसाहेबांना तें माहीत होतें. पण त्याच दिवशीं तसा प्रसंग येईल याची कोणालाच कल्पना नव्हती. शिवाय त्या बाजूचा उन्हाळा फारच तीव्र स्वरूपाचा असल्यामुळें आंगावरही कपडे अत्यंत पातळ व शक्य तेवढे कमीच घेण्यांत आले होते. अशी वेळ पाहूनच पर्जन्यराजानें आमचे भोंसले राजाचें धैर्य पाहण्याचा विचार केला असावा, असें दिसतें. झाडावरून खालीं उतरून गांवाकडे जाणें शक्य नाहीं व अशा प्रळयाच्या रात्रीं तेथें बसणें शक्य नाहीं, अशी स्थिति प्राप्त झाली. इतक्यांत शेंकडों तोफांचा गडगडाट व्हावा असा आकाशांत जोरानें गडगडाट सुरू झाला. वीज आपल्याच डोक्यावर चकचक करीत आहे, असें वाटूं लागलें. जंगलांत हिंस्र श्वापदांचे भीतीनें निघालेले आवाज ऐकूं येऊं लागले. अशा प्रकारची धीरोदधीलाही कंपित करून सोडणारी स्थिति प्रत्येक क्षणाला जास्तच भीषण होऊं लागली; तोंच पर्जन्यराजानें आपलें शस्त्र उभारलें. सों सों करीत जोराचा पाऊस पडूं लागला. राजेसाहेब वगैरे सर्व शिकारी मंडळी भिजून चिंब झाली. हवा जोराची असल्यामुळें सर्वांना थंडीनें कुडकुडी भरूं लागली. पण करतात काय ! शिकारीच्या हौसेपुढें याही यातना त्यांना बऱ्याच मानून घ्याव्या लागत होत्या. इतक्यांत गारा बांधलेल्या ठिकाणीं कडकड असा होत असलेला आवाज मधून मधून राजेसाहेबांना ऐकूं येऊं लागला. त्यामुळें वारा, पाऊस, थंडी वीज, मेघगर्जना यांकडील त्यांचें लक्ष उडालें व ते लक्षपूर्वक गाऱ्याकडे कान देऊन ऐकूं लागले. मधून मधून वीज चमके; परंतु गाऱ्याजवळ काय प्रकार चालला आहे, हें त्यांच्या स्पष्टपणें अवलोकनांत येईना. तो मधून मधून होणारा कडकड असा आवाज ऐकून राजेसाहेबांची पक्की खात्री झाली कीं, गाऱ्यावर वाघ आला आहे. आतां संधि दवडतां उप-

योगी नाहीं. शिवाय गांवांतील लोक आपली चेष्टा करितात, त्याचीही त्यांना आठवण झाली. त्यांनीं लगेच परमेश्वराचें नांव घेतलें आणि गाऱ्याचे बाजूला ज्या ठिकाणाहून कडकड असा आवाज येत होता, त्या आवाजाच्या धोरणानें निशाण धरलें व बंदूक झाडली. बंदुकीचा आवाज झाल्याबरोबर राजेसाहेबांचे मचानवरील व्यंकटराव पुणेकर घाबरले. त्यांना वाटलें कीं बंदूक धोक्यानें उडाली कीं काय! त्यांनीं त्या अंधारांत चांचपत राजेसाहेबांचा हात धरला व त्यांना विचारलें, ‘ आपण जीवंत आहांत ना ? का झाला धोका! ’ राजेसाहेबांनीं त्यांना सांगितलें, ‘ आह्मींच बंदूक उडविली आहे. तुह्मी घाबरूं नका. ’

इतक्यांत बंदुकीचा आवाज ऐकून दुसऱ्या मचानवरून रामराव व बंडोबा यांनीं काय प्रकार आहे, ह्मणून आवाज दिला. त्यांनाही राजेसाहेबांनीं गाऱ्यावर वाघ आला आहे, या समजुतीनें आह्मी बंदुक उडविली, असें सांगितलें. याही वेळीं पाऊस चांगलाच मोठा पडत होता. ‘ पाऊस थांबल्यानंतर पुढचा विचार करूं; तोंपर्यंत स्वस्थ बसा. ’ असें त्यांना राजेसाहेबांनीं सांगितलें. बाकी मंडळी पाऊस थांबेपर्यंत मचानवर स्वस्थ बसली, पण राजेसाहेबांचें मन मात्र स्वस्थ बसेना. त्यांचा विचार सारखा चालू होता. वाघाला गोळी लागली कीं हुकली, या विचारांनीं त्यांचें मन गर्क झालें होतें. गोळी जर लागली असती, तर वाघाची कांहींतरी धडपड ऐकूं आली असती. त्याचें ओरडणें तरी ऐकूं आलें असतें. परंतु त्याचा कांहींच मागमूस नाहीं. परंतु आपल्या निशाणाचा त्यांना विश्वास होता. तेव्हां त्यांना असेंही वाटे कीं जर निशाण बरोबर लागून वाघ मेला असेल तर काय बहार होईल. आजपर्यंत आपण सोसलेल्या सर्व त्रासांचा परिहार होईल. व आपली चेष्टा लोक करीत आहेत, त्यांनाही आपली कामगिरी दिसून येईल. आजपर्यंत जेथें वाघाची एकही शिकार झालेली नाहीं. मोठमोठे युरोपियनसुद्धां हात हालवित परत गेले; त्या ठिकाणीं आपण शिकार केली हें त्यांना कळेल तर आपला केवढा नांवलौकिक होईल, वगैरे विचार-तरंग राजेसाहेबांचे मनाला सारखे भंडावून सोडीत होते. या विचारांत केव्हांच दोन अडीच तास गेले. पाऊस थांबला. ढग विरळ होऊं लागून पुन्हां थोडथोडें चांदणें दिसूं लागलें. वाराही बंद पडला. ही अनुकूल स्थिति उत्पन्न होत चाललेली पाहतांच ‘ हत्तींना बोलवा ’ असा रामराव यांना राजेसाहेबांनीं आवाज दिला.

त्याप्रमाणें रामराव व खंडोबा यांनीं आपल्या मचानवरून मोठमोठ्यानें आरोळ्या मारून हत्ती आणण्यास सांगितलें.

सुमारें अर्ध्या तासाचे आंत दोन हत्ती व दोन उंटें घेऊन आठ दहा माणसें हातांत टेंभे घेऊन तेथें आलीं. नंतर मचानवरून सर्व मंडळी खालीं उतरली आणि सर्व शिकारी मंडळी आपल्या बंदुका तोलून धरून त्या टेंभ्याच्या प्रकाशांत गाऱ्याकडे जाऊं लागली. तोंच सर्वांना गाऱ्यावर एक जंगी वाघाचें धूड पडलेलें दिसलें ! जवळ जाऊन पाहतात तों राजेसाहेबांची गोळी वाघाच्या कपाळाचे बरोबर मध्यावर लागलेली त्यांना दिसलें. ती गोळी वर्मी लागल्यामुळें वाघाला मरतांना हां चूं ही करितां आलें नव्हतें.

ही शिकार झालेली पहातांच सर्व मंडळी आनंदानें नाचूं लागली ! सर्व मंडळी राजेसाहेबांच्या निशाणाची तारीफ करूं लागली. तें जनावर वाघ नसून वाघीण होती. तिची लांबी बारा फूट नऊ इंच होती! तिला पंधरा सोळा गारे खावयाला मिळाल्यामुळें ती खूप मातली होती. दिशा फांकल्यावर त्या वाघिणीला हत्तीवर बांधण्यांत आलें व सर्व मंडळी मोठया खुषीनें पहांटें सुमारें पांच वाजतां लामटा गांवीं आपले बिऱ्हाडीं आली. त्या वाघिणीला पाहून जमीदारसाहेबांना व त्यांचे मुक्त्यार रा. पन्नालाल यांना मोठा आनंद झाला. हां हां ह्मणतां ही बातमी सर्व लामटा गांवांत व स्टेशनवर समजली. वाघिणीला पहाण्याकरितां लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. दुपारचे बारा वाजेपर्यंत ती बातमी शेजारचे गांवींही पसरली. बरींच माणसें व जनावरें फस्त केलेली व निरनिराळ्या बोली बोलणारी वाघीण मारलेली पहाण्याकरितां लामट्याला आसपासच्या गांवाहून मंडळी धांवूं लागली. ती पाहून सर्वांना मोठा आनंद झाला. या वाघिणीपासून ज्या ज्या लोकांना उपसर्ग पोंचला होता, त्यांनीं त्यांनीं राजेसाहेबांना मनापासून आशीर्वाद दिले.

श्री. गोपाळराव जमीदार यांनीं या आनंदाचे प्रसंगीं मोठा उत्सव केला. त्यांनीं श्रीमंत राजेसाहेबांना टोलेजंग मेजवानी दिली. गांवांतील बरेच लोक व स्टेशन-वरील स्टेशन मास्तर वगैरे सर्व मंडळीस मेजवानीकरितां बोलावलें होतें. जेवणाचे वेळीं हा शिकारीचा प्रश्न निघालाच. त्या वेळीं ज्या ज्या मंडळींनीं राजेसाहेबांवर टीका केली होती, तीच मंडळी राजेसाहेबांची स्तुतिपाठक बनली होती ! त्यांनीं

राजेसाहेबांचे निशाणाची, त्यांचे धैर्याची व त्यांचे चिकाटीची भरपूर स्तुति केली. ते असेंही ह्मणाले कीं, " पूर्वी पृथ्वीराज चव्हाण हे ध्वनिवेध करीत असत, असें ह्मणतात, पण सांप्रत आपले राजेसाहेब त्यांच्याप्रमाणें ध्वनिवेध करण्यांत पटाईत आहेत, याचा आह्मांला प्रत्यक्षच अनुभव आला. " एकंदरींत या शिकारीमुळें राजेसाहेबांची कीर्ति नागपूर, चांदा, बालाघाट, वऱ्हाड या ठिकाणीं पसरली. ठिकठिकाणचे शिकारी लोक राजेसाहेबांना मोठा मान देऊं लागले. दोन दिवसांत सर्व मंडळीसह राजेसाहेब नागपुरीं आले व तेथेंही त्या वाघिणाला पाहून सर्वांना सकुतुहल आनंदीआनंद झाला.

## ११ आदमखोऱ्या वाघाची पायीं शिकार.

वाघ हें जनावर पंचहत्यारी आहे. चार पंजे व एक तोंड मिळून पांच हत्यारें त्याचीं चालतात. शिवाय हें जनावर वाऱ्याच्या वेगानें पळणारें, बारा पंधरा फूट उंच उडी मारणारें व पंधरा वीस फूट लांबीहून उडी टाकणारें असल्यामुळें त्याची पायीं शिकार करणें, मोठें धोक्याचें असतें. सिंहाप्रमाणें वाघ हा बलिष्ठ असतो, पण सिंहाप्रमाणें त्याचे ठिकाणीं धैर्य नसतें, एवढाच वाघामध्यें परमेश्वरानें अवगुण ठेविला आहे. सिंह धैर्यवान आणि शक्तिमान ह्मणून तो वनराज झाला. त्याच्या ठिकाणींही परमेश्वरानें एक अवगुण जन्मतःच उत्पन्न केल्यामुळें त्याच्या सपाट्यांतून इतर प्राणी जगूं शकले. सिंहाला तो राजा ह्मणून राजाप्रमाणें स्वभावतःच आळशी बनविलें. सिंह हें जनावर इतकें आळशी असतें कीं, त्याला कडकडून भूक लागेल, त्याच वेळीं तो भक्ष्य शोधनार्थ गुहेच्या बाहेर पडतो. त्याचें पोट भरलें असतां, त्याचेपुढून कोणतेंही जनावर गेलें, तरी तो त्याचेकडे आळसानें दुर्लक्ष्य करितो. तसें वाघाचें नाहीं. वाघ हें जनावर दुष्ट असतें. त्याचें पोट तुडुंब भरलें असतांही त्याला एकादें जनावर दिसलें, तर तो त्याच्यावर झडप घालून त्याचें नरडें फोडून रक्त तेवढें पितो आणि त्याला कोठें तरी पुरून ठेवितो. अशी दुष्ट वृत्ति असल्यामुळें वाघ दगेबाज झाला आहे. तो समोर येऊन सिंहाप्रमाणें हल्ला करीत नाहीं. लपून छपून हल्ला करण्याची, दबा धरून बसून शिकार करण्याची वाघाची पद्धत असते. वाघ इतका बलवान आणि पंचहत्यारी असतां त्याला ही कपट वृत्ति स्वीकारण्याचें कारण हेंच कीं, त्याच्या ठिकाणीं धैर्य

नसतें. त्याचें मन भितरें असतें ह्मणून मोहरा करून जनावर उभें राहिलें, ह्मणजे त्यावर झडप घालण्याचें धैर्य वाघाला होत नाहीं. त्याप्रमाणें माणसावरही त्याला दवा धरून धोक्यानें हल्ला करावा लागतो. मनुष्य वाघापुढें पवित्र्यावर उभा राहील आणि हातांत नुसती काठी घेऊन त्याचे आंगावर चाल करून जाऊं लागेल तर वाघ माघारच घेतो. माणुस बेसावध किंवा घाबरून अगदीं मेल्याप्रमाणें होईपर्यंत वाघ त्याच्यावर उडी टाकीत नाहीं. त्याच्या डोळयांत एक प्रकारची अशी कांहीं अतर्क्य शक्ति असते कीं, त्यानें माणसाकडे किंवा जनावराकडे आपली दृष्टि रोंखून लाविली कीं, तीं आपोआप निःशक्त बनतात. त्यांचे आंगाला कंप सुटतो व भीतीनें तीं आपोआप अर्धमेलीं होतात. ही वाघाची दृष्टि त्याच्या शिकारीला निम्मी मदतगार होते. वाघाची दृष्टि पडली ह्मणजे जनावराच्या किंवा माणसाच्या पायांतील बळ जातें आणि तीं त्या ठिकाणींच स्तंभित होतात.

एवढ्याकरितां वाघाची पायीं शिकार करणें फार धोक्याचें असतें. त्याच्या तीव्र दृष्टीचा आपल्या मनावर परिणाम होणार नाहीं, इतका तिचा आपणाला सराव व्हावा लागतो. या गोष्टी नित्य सरावानेंच साध्य होत असतात. ज्या शिकारी मनुष्याची नजर वाघाच्या तीक्ष्ण दृष्टीनें मेली नसेल ह्मणजे वाघाच्या दृष्टीनें मनुष्याच्या नजरेवर अगर बुद्धीवर कांहींही परिणाम होत नसेल आणि वाघ पुढें आला असतां ज्याचें प्रसंगावधान शाबूत रहात असेल, तोच शिकारी वाघाची पायीं शिकार करण्याला लायक असतो. त्यालाच ' खरा शूर ' ही पदवी योग्य असते. केवळ निशाणाचा पक्का असणारा शिकारी इसम, वाघाची पायीं शिकार करूं शकत नाहीं. वाघाची पायीं शिकार खेळणारा मनुष्य निशाणाचा व छातीचा पक्काच असावा लागतो. छातीचा यत्किंचितही कच्चा असलेल्या शिकाऱ्याला वाघ पुढें आला असतां त्याच्यावर गोळी चालविण्याकरितां हातच वर उचलवत नाहीं. अशा प्रकारचे कच्चे शिकारी, वाघाची शिकार पायीं करण्याचें धैर्य दाखवितात; परंतु ऐन प्रसंगीं आपणच वाघाला बळी पडतात. एवढयाकरितां पायीं वाघाची शिकार करणारा पुरुष, सिंहाच्या छातीचा आणि अर्जुनाप्रमाणें मजबूत निशाणाचा असावा लागतो. ह्मणजे वाघाची पायीं शिकार यशस्वी होते.

साताऱ्याचे बाजूच्या जंगलांत पट्टेदार वाघ फार नाहींत. सामान्यतः त्या जंगलांत चित्ते, तेंडवे, हेच आहेत. पट्टेदार वाघापुढें हे चित्ते, तेंडवे ' दर्यामें खस-

खस ' असल्याप्रमाणें दिसतात. ह्या पट्टेदार वाघांची शक्ति अफाट असते. ते एकाचे पंजानें केवढाही मोठा रेडा असला तरी त्याला जमिनीवर लोळवतात. रेड्यांची गर्दन तोंडांत धरून त्याला आपल्या पाठीवर टाकून वायुगतीनें ते पळत जातात. ज्यांचें भक्ष्य रोज एक रेडा हें असतें, ज्यांच्या पुढें हत्तीही चिर्‌चिर्‌ करून मोहरा पलटवून पळूं लागतात, अशा कृतांत काळरूपी पट्टेदार वाघाची शिकार करणें ह्मणजे किती भयंकर आणि साहसाचें असतें याची कल्पना येईल.

या शिकारीच्या भयंकर स्थितींत वाघ जर आदमखोरा असेल तर पहावयालाच नको. मनुष्याच्या रक्ताची आणि मांसाची त्याला चट लागली ह्मणजे इतर जनावरांचें मांस खाणें त्याच्या जिवावर येतें. त्याला मनुष्याचें भक्ष्य पंच पक्वान्नांचें भोजन, असें वाटूं लागतें. पंचपक्वान्नांपुढें अधाशी मनुष्याला जसें भाकरीचें जेवण गोड वाटत नाहीं, त्याचप्रमाणें आदमखोऱ्या वाघाची स्थिति होते. वाघ ही आधींच आधाशी जात, त्यांत मनुष्य खायला मिळाल्यानंतर आपल्यापुढें मनुष्याची शक्ति कांहींच चालत नाहीं, असा त्याला विश्वास उत्पन्न झालेला असतो. त्यामुळें माणसाची भीति त्याला वाटत नाहींशी होते व तो नंतर माणसांवर बेधडक हल्ला करूं लागतो. जिभेच्या लालसेनें हें स्वाभाविक धैर्य त्याचे आंगीं येतें. याकरितां साधारण पट्टेदार वाघापेक्षां ' आदमखोर ' वाघाची शिकार अतिशय भयंकर आणि काळाच्या जबड्यांत उडी टाकण्या इतकी घातुक अशी असते. शिकारीला निघतांना कुटुंबाचें कुंकू पुसून आणि मुलाबाळांचा शेवटचा निरोप घेऊन जाण्या इतकी ही आदमखोऱ्या वाघाची पायीं शिकार भयंकर असते.

राजेसाहेबांचा स्वभाव लहानपणापासून धाडसी होता. त्यामुळं मातोश्री राणी काशीबाईसाहेब यांना त्यांना शिकारीला जाण्याची परवानगी देणें जिवावर येत असे. राजेसाहेब शिकारीला गेले ह्मणजे ते परत येऊन त्यांचे दृष्टीला पडेपर्यंत त्यांना खाणें, पिणें, लेणें कांहींच सुचत नसे. त्यांना रोज शिकारीची हकीकत कळण्याची व्यवस्था करण्यांत येत असे, तरी त्यांच्या जिवाला काळजी ही लागतच असे. राजेसाहेब ह्मणजे त्यांचा एकुलता एक मुलगा. तेव्हां ' मन चिंती तें वैरी न चिंती, ' अशी त्यांचे मनाची स्थिति होई. शिकारीला जातांना डोळ्यांत अश्रू आणून मातोश्री, राजेसाहेबांना उपदेश करीत कीं, ' मचानवर

बसूनच शिकार करा. हांक्यानें शिकार झाली तरच शिकार करा. नाहींतर मुकाट्यानें परत या. या वर्षी शिकार झाली नाहीं तर पुढल्या वर्षी होईल. आतांपर्यंत तुह्मीं पुष्कळ शिकारी केल्या आहेत. तेव्हां हट्टाला पेटून कोणतेंही साहस करण्याचें मनांत आणूं नका. आह्मी आतां पिकलेलीं पानें झालों आहोंत. तुमच्यासमोर आमचे डोळे झांकले ह्मणजे आमचें सोनें झालें. आतां आमच्या जिवाला काळजी सोसत नाहीं. तुह्मीं आतां शिकारीचा नाद कमी केला पाहिजे. त्यांतून हे उन्हाळ्याचे दिवस. डोक्याला ऊन लागूं देऊं नका. उन्हानें तुह्मां-लाच चक्कर येईल. तुह्मी आतां मोठे झालां आहां. स्वतःची आणि मागची काळजी ठेवून लवकर परत या. मुलेंबाळें तुह्मी गेल्यावर कावरीं बावरीं होऊन तुमची वाट पहात बसतात. त्यांचें स्मरण ठेवून लवकर येण्याकडे मनाचा ओढा ठेवा. आमचा आतां विश्वास नाहीं. तेव्हां आमच्या या वयांत तुह्मीं आह्मांला सोडून जास्त दिवस बाहेर राहूं नये, असें आमचे जिवाला वाटतें. तुमचे उमेदीचे दिवस. तुमचे धाडस करण्याचें दिवस खरे, पण आमच्यानें सांगितल्याशिवाय रहावत नाहीं." अशा या नेहेमींच्या उपदेशामुळें आजपर्यंत ते पायीं शिकारीच्या कधीं भरीला पडले नाहींत, शिवाय राजसाहेबांचेबरोबर जी मंडळी जात त्यांचेकडून राजेसाहेबांचे केंसाला धक्का न लागूं देण्याबद्दल मातोश्री त्यांचेकडून आणा शपथा घेत. ह्मणून पायीं शिकार करण्याच्या सर्व मंडळी विरुद्ध असत. राजसाहेबांचेंही मन मातोश्रींच्या शब्दाबाहेर जाण्याला तयार होत नसे. असो.

इ० स० १९२० सालीं शिकारीचे दिवस आले. हा काल वसंत ऋतूचा. वसंत ऋतु लागतांच कोकिळेला कंठ फुटतो, आम्रवृक्षाला मोहोर येतो, झाडांना पालवी फुटते, या गोष्टी जशा सृष्टीच्या व्यापारांत स्वभावतः घडतात, त्याचप्रमाणें गुर्डा पाडव्याचें निशाण फडकलें कीं, शिकारी लोकांच्या हौसेला शिकारीचा आपो-आप बहर येऊं लागतो. त्यांचें सर्व लक्ष शिकारीकडे लागतें. त्यांना प्रापंचिक गोष्टीचा वीट येतो. आपण पक्षी असतों तर उडून जंगलांत गेलों असतों, अशी त्यांच्या मनाची स्थिति होते. रेसमध्यें पैसे लावणाऱ्या किंवा जुगार खेळणाऱ्याला लोकांची रेसेसचे किंवा दिवाळीचे दिवस जवळ आले, ह्मणजे जशी मनःस्थिति होते; त्याचप्रमाणें चैत्र महिना उजाडला, ह्मणजे या शिकारी लोकांच्या मनाचें होतें. शिका-रीच्या गांवाहून वाघाच्या खबरीचें पत्र केव्हां येतें, याचीच ते मार्गप्रतीक्षा करीत बसतात.

त्याप्रमाणें झाडींतून कांहीं वर्तमान येईल, ह्मणून राजेसाहेब मार्गप्रतीक्षा करीत बसत. १९२० सालच्या वसंतांत झाडींत वाघाची कोठेंच हालचाल ऐकिवांत नाहीं, असें डिघोरीचे कामदारांकडून पत्र आल्यामुळें राजेसाहेबांची निराशा झाली होती. त्या कामदाराला मातोश्री राणी काशीबाईसाहेब यांची ताकीद होती कीं, आदमखोरा वाघ असेल, तर त्याची राजेसाहेबांना वर्दी देत जाऊं नका.

अशी ही गोष्ट राजेसाहेबांना माहीत असल्यामुळें रामनवमीचा उत्सव होतांच दोन दिवसांनीं बंडोबा जामदार यांस त्यांनीं झाडींत रवाना केलें. त्याप्रमाणें ते शिरगांव, मांडवखाल या गांवीं आले. तेथें वाघाचा बिलकूल पत्ता न लागल्यामुळें ते बोरीला गेले. तेथें महागांव जिमीदारींत बारवनाचे आसमंतांत एक आदमखोरा वाघ असल्याचें समजलें. त्या वाघानें चार पांच माणसें व कित्येक बैल ढोरें खाल्लीं होतीं. त्या वाघानें महागांवचा रस्ता व बोरद्याचा रस्ता ( गाढवी नदींतून जो जातो तो टापू ) रोखून धरला होता. त्या ठिकाणीं तो दिवसा रेंग्या, माणसें यांचेवर हल्ला करीत असे. त्यामुळें जवळजवळ दोन महिने तो वाहतुकीचा रस्ता बंद पडला होता. तेथेंही बंदुकीचें लायसेन्स असलेले बरेच शिकारी लोक होते. त्यांनीं त्या वाघाची शिकार करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला होता, पण त्यांचें सर्व प्रयत्न निष्फळ झाले होते. तो वाघ केव्हां केव्हां शिकारी लोकांच्या आंगावर एकदम चाल करून येई किंवा त्यांची हालचाल दिसतांच कोठें तरी बेपत्ता होई. त्या वाघाच्या शिकारीच्या धडपडींत एक दोन शिकारी मृत्युमुखींही पडले होते. ह्मणून इतर शिकारी लोकांनीं त्याला मारण्याचा आपला नाद सोडून दिला होता.

वाघाची ही हकीकत बंडोबांनीं ऐकून घेतली. बंडोबा जामदार आले, यामुळें तेथील कांहीं शिकारी लोकांना धीर आला. ते त्यांना ह्मणूं लागले कीं, राजेसाहेब येऊन या वाघाची शिकार करतील, तर या गांवच्या लोकांवर त्यांचे अनंत उपकार होतील. या गांवचीं माणसें फार संकटांत आहेत. तरी तुह्मीं शिकारीला जरूर येण्याबद्दल राजेसाहेबांना कळवा. बंडोबांनीं त्याप्रमाणें राजेसाहेबांना कळविलें. राजेसाहेबांचे हातांत पत्र पडतांच नेहमींची मंडळी बरोबर घेऊन ते ताबडतोब बोरीला आले. राजेसाहेब शिकारीला आलेलें वर्तमान महागांव, बोरदें या गांवीं समजलें, तेव्हां सर्व लोकांना आनंद झाला. आतां सरकार आले, तेव्हां या वाघाची शिकार केल्या-

शिवाय ते जाणार नाहींत, असा लोकांना विश्वास वाटला. तेथील शिकारी लोकांनाही धीर आला. ते बोरीला राजेसाहेबांचे भेटीला येऊं लागले. डॉक्टर किंवा वैद्य, ज्याप्रमाणें रोग्याची पूर्वपीठिका लक्ष लावून ऐकून घेतात व त्याच्या बारीकसारीकही गोष्टी ते विचारून घेतात, त्याप्रमाणें या वाघासंबंधीं ज्याला जी माहिती असेल, ती राजेसाहेब स्वतः विचारीत व ऐकून घेत. गारे बांधले तरी हा वाघ गारे करीत नसे. त्याला माणसाच्या रक्ताची चट लागल्यामुळें तो दिवसासच संचार करीत फिरे. अर्थात तो हांकाही करतां येण्यासारखा नव्हता. कारण मनुष्याचा आवाज त्याला आला कीं, तो माणसांचेच आंगावर धांवून जात असे. तेव्हां शिकार कशी करावी, या विवंचनेंत राजेसाहेबांचे दोन दिवस गेले. या दोन दिवसांच्या अवधींत त्या गांवच्या लोकांना असा संशय आला कीं, राजेसाहेब ज्या अर्थी शिकारीची पुढील कांहींच तयारी करण्याचा हुकूम देत नाहींत, त्या अर्थी त्यांचेंही मन घाबरलेलें दिसतें. हा आदमखोरा वाघ फारच भयंकर असल्यामुळें त्याची शिकार न करितां राजेसाहेब परत नागपूरला जातात कीं काय, अशी साहजिक त्या संकटग्रस्त लोकांची कल्पना झाली. त्यांना वाटलें, येथील शिकारी लोकांनीं हात टेंकले आणि आतां जर राजेसाहेबही शिकारीचा प्रयत्न सोडून परत जातील, तर या काळरूपी व्याघ्राचे हातून आपल्या गांवाची सुटका करावयाला दुसरा कोणीही शिकारी येणार नाहीं; आणि आह्मी मात्र या संकटांत जीव मुठींत धरून कायमचे राहूं

असे विचार त्या गांवकरी लोकांचे मनांत आल्यामुळें तिसरे दिवशीं सकाळीं गांवची बरीच मंडळी राजेसाहेबांकडे आली. त्यांनीं राजेसाहेबांचे पाय धरले आणि त्यांना आपणाला अशा संकटांत टाकून नागपुरीं न जाण्याची त्यांनीं विनंति केली. आणखी असेंही ती मंडळी ह्मणाली कीं, ' आपण जर ही शिकार न करितां नागपुरीं जाणार असाल तर आह्मी सर्व लोक आपल्याबरोबर घरेंदारें सोडून नागपुरीं येतों. येथें या वाघाच्या भीतीनें आम्हांला रात्रीं दिवसां स्वस्थ झोंपही लागत नाहीं. केव्हां शेतवाडीकडे जातां येतां धोका होईल, याचा नेम नाहीं, अशी धास्ती वाटते. तेव्हां ही शिकार केल्याशिवाय आपण येथून जाणार नाहीं, असें आम्हांला अभय द्या, म्हणजे आमचे जीव खालीं पडतील. ' त्या ग्रामस्थ लोकांच्या केविलवाण्या विनंतीची राजेसाहेबांना कींव आली. लोकांचें संरक्षण करणें या आपल्या क्षात्रिय कर्तव्याची त्यांना जाणीव असल्यामुळें त्यांनीं त्याच स्फूर्तीनें लोकांना ती शिकार केल्याशिवाय

आपण तेथून जाणार नाहीं, असें आश्वासन दिलें. " आह्मी येथें आल्यापासून त्याच विचारांत आहोंत. शिकार थोडी धोक्याची आहे, म्हणून शिकारीचा कसा हिशेब बसवितां येईल, याच विवंचनेंत आह्मी आहोंत. परमेश्वर कृपेनें तुमच्या वरचें संकट टळेल. आपण आतां अगदीं निश्चिंत रहा. "

या राजेसाहेबांच्या भाषणानें सर्वांना धीर झाला. इतक्यांत हत्ती, उंट पायरस्त्यांनीं पाठविलीं होतीं, तीं आलीं. जामदारचें पत्र मिळतांच राजेसाहेब मोटारनें तावडतोब पुढें गेले होते. हत्ती, उंट, पायरस्त्यानें गेले. त्यांना तेथें दोन दिवस उशीर झाला. ते पोंचल्यावर दुसरें दिवशीं सकाळीं नऊ वाजतां राजेसाहेब हत्तीवर बसले. दुसरी शिकारी मंडळी दुसरा हत्ती व उंट यांवर बसली. याप्रमाणें गाढवी नदी, बारबन यांतून दोन दिवस सायंकाळचे पांच वाजेपर्यंत ती मंडळी फिरली. पण वाघाचा बिलकुल पत्ता लागला नाहीं. त्या भागांत फारच मोठी झाडी होती. नदीकांठ असल्यामुळें थंड जागीं गवतही फार मोठें वाढलें होतें. तो भाग दलदलीचा असल्यामुळें त्या भागांतून हत्तींना व उंटांना जातां येण्यासारखें नव्हतें. शिवाय कित्येक ठिकाणीं नदीचे लहान लहान ओहळ असल्यामुळें हत्तीं-उंटांना त्या मार्गानें जाणें अशक्य झालें होतें. कित्येक ठिकाणीं तर हत्तींचे पायच जमिनींत रुतूं लागले. त्यामुळें तो मार्ग सोडून बाजूबाजूनेंच वाघाचा पत्ता पाडण्याचा पहिल्या दोन दिवशीं प्रयत्न करावा लागला. या दोन दिवसांत प्रत्यक्ष जरी वाघ दिसला नाहीं, तरी बारबनामध्यें व नदीचे किनाऱ्यानें कोठें कोठें वाघाचें पंजे उमटलेले मात्र त्यांच्या पहाण्यांत आले.

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं मुक्कामीं परत आल्यावर कोणत्या रस्त्यानें आपण गेलें असतां बारबनाचे मध्यभागीं आपले हत्ती वगैरे घेऊन जातां येईल, याचा विचार करण्यांत आला. बारबनाची संपूर्ण माहिती असणारे कांहीं लोक आहेत कीं काय, याची चौकशी करितां दोन माहितगार इसम राजेसाहेबांचे बरोबर दुसरे दिवशीं जाण्याकरितां तयार झाले. ते दोघे इसम तयार होतांच आणखी चार पांच धीट इसम आपणही राजेसाहेबांबरोबर जातों असें ह्मणूं लागले. तिसरे दिवशीं सकाळीं नऊ वाजतां सर्व मंडळी न्याहारी करून बाहेर पडली. रोजची शिकारी मंडळी हत्ती व उंट यांवर व गांवची सात आठ मंडळी पायीं अशी

चालली. पायीं जाणाऱ्या लोकांचे हातीं बंदुका, तरवारी व भाले होते. ही सर्व मंडळी त्या दिवशीं बारवनांत शिरली. हिरागजवर राजेसाहेब होते. दुसऱ्या हत्तीवर रामराव जामदार व बंडोबा जामदार या जामदारांची शिकारी दुकल बसली होती. सुजातखां पहेलवान वगैरे इतर शिकारी उंटांवर बसले होते. कांहीं मंडळी घोडयांवर होती. बाकी पांच सात मंडळी पायीं चालत होती. पायीं चालणारी मडळी हत्तीचे आसऱ्यानें जात होती. अशा प्रकारें बारवनांत शोध करीत जात असतां, त्यांना एक मोठा ओहोळ लागला. तो गाढवी नदीला येऊनच मिळणारा होता. तो ओहोळ ओलांडून पलीकडे हत्तीनें जाण्यासारखा रस्ता नव्हता. शिवाय गाढवी नदीचा प्रवाह तेथून पन्नास एक हातांवर होता. त्यामुळें पुढें जाणें अशक्य वाटल्यावरून राजेसाहेबांचा हत्ती तेथें उभा राहिला. इतक्यांत त्या ओहोळाच्या खाईतून वाघ एकदम निघाला, तो हिरागजाच्या बाजूनें येऊन त्याच्यासमोर येऊन उभा राहिला ! सर्व मंडळी त्या वेळीं बहुतेक बेसावधच होती. तेथें त्या वेळीं पंधरा मिनिटें किंवा अर्धा तास विश्रांति घेण्याचाच त्या सर्वांचा विचार होता. इतक्यांत तो वाघोबा दत्त ह्मणून पुढें येऊन उभा राहिला! त्याबरोबर हिरागज एकदम चमकला आणि मोहरा फिरवून घेऊं लागला. राजेसाहेब बंदुक वर उचलतात, तोंच तो वाघ एकदम पुन्हां खाईत उडी मारून बेपत्ता झाला !

हा प्रकार दोन चार सेकंदाचे अवधींतच घडला. वाघ निघून गेल्यावर सायंकाळीं पांच वाजेपर्यंत त्याचा पत्ता पाडण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु त्याचा कोठेंच थांग लागला नाहीं; ह्मणून सर्व मंडळी मुक्कामाला जाण्याकरतां परत फिरली. आपणास तो आदमखोरा वाघ प्रत्यक्ष पाहावयाला मिळाला हाच आनंद त्या दिवशीं राजेसाहेबांना झाला. वाघ लांबीला फार नव्हता पण तो इतर पट्टेदार वाघाच्या मानानें फार उंच होता. तेवढ्या उंचीचा वाघ आजपर्यंत राजेसाहेबांनीं कधीं पाहिला नव्हता. तो वाघ बराच जून असून त्याला कल्लेही फुटलेले होते. जनावर बरेंच जोरदार असलेलें राजेसाहेबांना दिसून आलें. त्या दिवशीं मुक्कामाला येईपर्यंत रात्रींचे आठ वाजले. रात्रीं भोजन वगैरे झाल्यानंतर दुसरें दिवशीं कोणच्या युक्तीनें शिकार साधावयाची, याचा विचार करण्याकरितां सर्व मंडळी एकत्र जमली.

दुसरे दिवशीं एकादशी होती. एकादशी ही कष्टिक तिथि असल्यामुळें राजेसाहेब कधींही त्या तिथीला शिकारीला जात नसत. तेव्हां कांहीं मंडळी ह्मणाली,

' उद्यां कष्टिक तिथी असल्यामुळें राजेसाहेबांनीं शिकारीला जाऊं नये. ' परंतु राजे साहेबांना वाघ पाहिल्यापासून ' त्याची शिकार केव्हां करीन, ' असें होऊन गेलें होतें त्याचा स्वभाव मोठा करारी होता. या करारी स्वभावाचे कित्येक वेळां हट्टी स्वभावांतही रूपांतर होत असे. आणि हा हट्टी स्वभाव सर्व साधारणपणें श्रीमंत लोकांत विशेष आढळून येतो. त्यामुळें एकदां एक गोष्ट करावयाची असें त्यांच्या मनानें घेतलें कीं, त्यांत कितीही त्रास पडला किंवा पैसा खर्च झाला तरी त्याबद्दल त्यांना बिलकुल पर्वा वाटत नसे. आणि ती गोष्ट मनासारखी होईपर्यंत खाणें, पिणें, झोंपणें यांचीही त्यांना स्मृति राहत नसे. आपण ठरविलेल्या गोष्टीच्या सिद्धीकरितां ते जिवाचीही पर्वा ठेवीत नसत. आपल्या मानसिक तळमळीच्या भरांत, ' उदईक जरी एकादशी असली तरी आपण शिकारीला जाणार आणि तीही शिकार आपण पायीं करणार, ' असें राजेसाहेबांनीं सांगितलें, हें ऐकून रामराव, बंडोबा वगैरे राजे-साहेबांच्या मंडळींचें धाबें दणाणलें. त्यांचे पुढें मातोश्री राणा काशीबाईसाहेब दिसूं लागल्या. एकादशीसारखी कष्टिक तिथि आणि पायीं शिकार त्यांतून आदमखोरा वाघ; या त्रिफळांचा संयोग आल्यानें ' आतां पुढें कसें करावें ? ' या विचारानें ही मंडळी घाबरून गेली. पण करतात काय ! त्यांतून हा राजहट्ट. बालहट्ट, स्त्रीहट्ट या दोन्ही हट्टांचेंही वरच्या दर्जाचा हा राजहट्ट; हा कसा पुरवावा ! राजेसाहेब ह्मणतात त्याप्र-माणें शिकारीला जावें तरी कठीण न जावें तरी कठीण,अशी मंडळीची स्थिति झाली.

शेवटीं त्या मंडळीनें ठरविलें कीं, राजेसाहेबांनीं मनानें ठरविल्याप्रमाणें शिकारीला गेलेंच पाहिजे. आपण शिकारीला येत नाहीं ह्मटलें, तरी ते एकटेच निघून जातील. कोणाचीच पर्वा करणार नाहींत, इतके ते हट्टी आहेत. तेव्हां रामराव जामदार ह्मणाले, ' आपण आपल्या जिवाची आतां आशा सोडूं या. कोणीकडून राजेसाहेबांचे केंसाला धक्का न लागेल अशी आपण जंगलांतून जातांना योजना करूं. मी पुढें होतों, राजेसाहेबांना मध्यें ठेवावें व मागें बंडोबांनीं रहावें. ही पद्धत जंगलांत घुसल्यापासून कायम ठेवावयाची. बाकीची मंडळी बाजूनें चालतील. हा राजेसाहेबांचा हट्ट आपण पुरा पाडून नेला पाहिजे. रामराव व बंडोबा या दोघां धाडसी शिकाऱ्यांप्रमाणें रा. व्यंकटराव पुणेकर हेही एक अत्यंत धाडसी स्वभावाचे इसम होते. ते जातीचे ब्राह्मण होते, तरी राजेसाहेबांनीं त्यांना मुलाप्रमाणें वाढविलें होतें. पायीं शिकार करणार, या निश्चयामुळें राजे-

साहेबांवर कांहीं प्रसंगच आला, तर आपण पुढें उडी घालावयाची असा त्यांनीं संकल्प केला होता. अनेक वेळां रामराव व बंडोबा यांचेप्रमाणेंच राजेसाहेबांना व्यंकटराव पुणेकरांच्या धाडसी स्वभावाची ओळख पटली होती. ह्मणून ते या तीन इसमांवर पुत्रापेक्षां जास्त प्रेम करीत असत. ही तीन मंडळी त्यांचेबरोबर असली ह्मणजे त्यांना कशाचीच पर्वा वाटत नसे. या मंडळींना राजेसाहेबांनीं 'तुमचा काय विचार आहे ?' असा शेवटीं प्रश्न विचारला. तेव्हां त्या तिघांनींही, 'सरकारांचे हुकुमाबाहेर आह्मी थोडेच आहोंत!' असें उत्तर दिलें. त्याप्रमाणें 'उदईक आह्मी पायीं शिकारीला जाणार;' असें सांगून गांवांतील मंडळींना निरोप दिला. त्या वेळीं मध्यरात्र उलटून गेली होती. सर्व मंडळी आपापल्या बिछान्यावर जाऊन पडली व निद्रादेवीची आराधना करूं लागली. परंतु दुसऱ्या दिवसाच्या प्रसंगाचें चित्र ज्याच्या त्याच्या डोळ्यापुढें उभें असल्यामुळें कोणालाच झोंप आली नाहीं. 'राजेसाहेबांचे जिवाला धोका न होतां शिकार झाली, ह्मणजे आह्मांला जगाचें राज्य मिळाल्याप्रमाणें होईल,' असें त्या तिघांमंडळींना वाटत होतें. राजेसाहेबांनाही झोंप आली नाहीं. आपण काय वाटेल तें करून शिकार केली पाहिजे. वाघ आंगावर चाल करून आला, तर त्याचा हल्ला कसा चुकवावा; एक गोळी चुकली तर दुसरी गोळी आपणाला जास्तींत जास्त किती वेळानें मारतां येईल, आपले बरोबरीचे लोकांना प्रसंगाचे वेळीं कसें बचावतां येईल. आपले करतां दुसऱ्या मंडळींना धोका पोंचूं नये याला कशी शिस्त ठेवावी; या व अशाच विचारांनीं त्यांचें मन व्यग्र झालें असल्यास नवल नव्हतें. एकंदरींत जो तो आपापल्या कर्तव्याचा पूर्णपणें विचार करीत होता. त्यामुळें कोणालाच पहांटे चार वाजेपर्यंत झोंप आली नाहीं.

चार वाजतां राजेसाहेब उठले. त्याबरोबर सर्वच मंडळी उठली. ही मंडळी आपोआप उठलेली पाहून राजेसाहेबांना आश्चर्य वाटलें. कारण या मंडळीच्या झोपा कुंभकर्णाप्रमाणें असलेल्या त्यांना माहीत होत्या! रोज दहा वीस हांका मारल्याशिवाय जी मंडळीं हूं कीं चूं न करतां बिनघोर झोंपणारी, ती मंडळी हांक न मारतां कशी उठली, याबद्दल त्यांना राहून राहून आश्चर्य वाटलें. आपल्याप्रमाणेंच त्यांचेही मनाची स्थिति झाली असेल, हेंच त्यांचें उत्तर त्यांचे विचाराला त्यांना आपोआप मिळालें. राजेसाहेबांनीं आपलें प्रातर्विधी आटोपलें. स्नान केलें. संध्या, पूजा, गुरुगीता, दासबोध, भगवद्गीता, पंचपदी वगैरे आन्हिक आटोपलें. एकादशी असलेनें

भजन केलें. उपहारही केला. इतकें झाल्यावर शिकारीला ते निघाले; तेव्हां सकाळीं नऊ वाजले होते. त्यांनीं आपल्याबरोबर चाळीस म्हशी रेड्यांचा कळप घेतला. बरोबर हत्ती, उंट वगैरे घेतले. शिकारी मंडळीखेरीज गांवांतील आठ दहा मंडळीही त्यांचेबरोबर होती. ही सर्व मंडळी दहा वाजणेचे सुमारास बाराबनाला येऊन पोंचली. या आदमखोरा वाघाची त्या प्रदेशांत फारच ओरड झाल्यामुळें तो प्रदेश अगदीं निर्जन झालेला होता. मनुष्याची चाहुल कोठेंच नव्हती. रात्रीच्या वेळेचा भीषण देखावा याही वेळीं तेथें दिसत होता. पक्षांचा किलबिलाट व वान-रांचा सुळसुळाट यांखेरीज तें जंगल पूर्ण प्रशांत होतें. हत्ती वगैरे याच ठिकाणीं उभे ठेवून म्हशींचा कळप पुढें घालून ह्या शिकारी मंडळींनीं त्या बारबनांत प्रवेश केला. त्यांत प्रवेश केल्यावर प्रत्येक शिकारी इसमाच्या नितांत स्तब्धतेला प्रारंभ झाला. वाळलेल्या पानाचाही आवाज न करूं देण्याचा प्रत्येक जण प्रयत्न करीत होता. त्यामुळें तें जंगल जास्तच गंभीर आणि भीषण वाटूं लागलें. म्हशींचा कळप पुढें व मागें शिकारी मंडळी, अशी जात असल्यानें मध्यें कोठें तरी हिंस्र पशूंचा वास म्हशींना आला, म्हणजे त्या कावऱ्या बावऱ्या होऊन एकदम थांबत. तेव्हां सर्व बाजूंनीं शिकारी लोकांना निरीक्षण करून घ्यावें लागे. कित्येक ठिकाणीं या कळपाच्या पायांच्या आवाजानें शेजारच्या झुडपांतून कोठें रान-डुकर, निघावें तर कोठें चित्ते बाहेर पडून पळून जावेत. लांडगे, चितळ, सांबरें यांनींही या पलटणीला पाहून पोबारा करावा. आस्वलेंही आपला 'फतक' 'फतक' नाच करीत निघून जात. पण एका आदमखोरा वाघाकरितां या हातच्या शिकारी ते दवडूं लागले होते.

अशा प्रकारची ही सफर चालू असतां दुपारचे बारा वाजले. मार्गीत येणाऱ्या झाडीझुडपांतून, खांचखळग्यांतून, गवतजाळींतून त्या वाघाचा शोध आणि चिकि-त्सापूर्वक संशोधन त्यांचें चालू होतें. या सर्व गोष्टींचा एवढाच हेतू होता कीं, कोणीकडून त्याच दिवशीं शिकार झाली पाहिजे. याप्रमाणें तपास सुरू असतां पुढें गाढवी नदीचें वळण जवळच आलें; व तिच्या एका ओहळाची एक भयंकर खोल खाई पुढें आली. जनावरांस किंवा माणसांस उतरून जाण्यासारखी ही खाई नव्हती. म्हणून म्हशींचा कळप मागें ठेवून श्री. राजेसाहेब, रामराव, बंडोबा, व्यंकटराव पुणेकर ही मंडळी खाईचे किनाऱ्यानें खाईचें अंतरंग तपासीत पूर्ण सावध-

गिरीनें चालले होते. ही खाई सुमारें तीन हत्तीएवढी खोल होती. सर्व बाजूनें तेथें गवत वाढलें होतें. मधून मधून लहान लहान झुडपें आणि नानाविध वेलींच्या जाळ्या पसरलेल्या होत्या. त्यामुळें केवढेंही मोठें जनावर त्यांत दडून बसलें तरी एकदम दृष्टीला पडण्यासारखें नव्हतें. शिवाय उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें गवताचा रंग पिंवळट झालेला, वेलींचीं किंवा झुडपांचीं पानेंही पिकून पिंवळीं झालेलीं, अशा पिंवळट रंगाच्या आभरणांत पिंवळट रंगाचा वाघ तरी एकदम कसा दिसून येणार ! तरी पण प्रत्येक शिकारी आपल्या दृष्टीचा कमालीचा उपयोग करून निरीक्षण करीत होता. ही मंडळी या वेळीं एकाच आत्म्याचीं शकलें आहेत, याच भावनेनें एकमेकांच्या रक्षणाची जबाबदारी ओळखून चालली होती. इतक्यांत आदले दिवशीं दृष्टीला पडलेला आदमखोरा वाघ माणसांच्या वासानें खाईंतील एका जाळींतून बाहेर पडला. त्यानें खाईंतून जी एक वर उडी मारली ती राजेसाहेबांचे पुढें सुमारें चार हात अंतरावर खाईचे डगरीवर आली. दुसऱ्या उडीला त्यानें राजेसाहेबांचेंच भक्ष्य घेतलें असतें, इतक्यांत राजेसाहेबांनीं बंदुक झाडली. त्या बंदुकीची गोळी वाघाचे मस्तकावर न पडतां डोळ्याचे बाजूला लागून कानापर्यंत चाटून गेली. बंदुकीचें आवाजानें व गोळीचे निसटत्या मारानें तो वाघ एकदम खाईत पडला. रामराव बंडोबा यांनींही गोळ्या चालविल्या. परंतु त्यांच्या गोळया हुकल्या. खाईंत वाघ पडल्याबरोबर तो घाबरून जो पळाला, तो एका क्षणांत दृष्टिपंथाच्या बाहेर गेला. हा राजेसाहेबांची गोळी जर दोनच बोटें अलिकडे मस्तकाचे बाजूला लागली असती, तर मस्तक फुटून वाघ मरून तेथेंच पडला असता, आणि जर दोनच बोटें पलीकडे गेली असती तर गोळी चुकून राजेसाहेबच त्याच्या भक्षस्थानीं पडले असते. एवढा दुर्धर प्रसंग या वेळीं आला होता. परंतु त्याचा यत्किंचितही परिणाम त्यांचे मनाला शिवला नाहीं. गीतेंत म्हटल्याप्रमाणें बलवान लोकांचें बल किंवा शूर लोकांचें शौर्य हें मूर्तिमंत परमेश्वरांचें स्वरूप असतें. तें आंगीं संचरल्यावर अशाच साहसाच्या गोष्टी घडून येऊन मागें लोकांची कीर्ति चिरंजीव राहत असते. धाडसी माणसाला परमेश्वरी अधिष्ठान असतें. आणि त्याच्या जोरावरच त्याचें कार्य नेहमीं यशस्वी व कीर्तिप्रद होतें.

जखमी होऊन वाघ निघून गेल्यानंतर पुन्हां म्हशींचा कळप घेऊन त्याचा पाठलाग करण्याचें ठरलें. वाघ जखमी झाल्यामुळें तो झालेली जखम थंड होईपर्यंत

नदींत कोठें तरी पाण्यांत बसून राहणार हें निश्चित होतें. परंतु तो नदींत किती लांबपर्यंत गेला असेल याचा मात्र अंदाज करतां येण्यासारखा नव्हता. वाघ जखमी होऊन पळून जात असतां जखमेंतून वहाणारें रक्त मार्गांत गवतावर, झुडपावर अगर दगडावर पडलेलें पाहून अमक्या मार्गानें वाघ पळाला असें धोरण बांधतां येतें किंवा वाघाचे पंजे वाळूंत अथवा चिखलांत रुतलेले पाहून त्या चिन्हांवरून त्याचा माग काढतां येण्यासारखा असतो. परंतु तो वाघ खाईतून गेल्यामुळें व त्या खाईतून जातां येण्यासारखी परिस्थिति नसल्यामुळें झशींच्या कळपाच्या दोन तुकड्या करण्यांत आल्या व बाकीचे निम्मे शिकारी दुसऱ्या तुकडीला घेऊन दुसऱ्या बाजूनें गेले. खाईस जसजशीं वळणें येत तसतशीं वळणें घेऊन त्यांना आपला मार्ग आक्रमावा लागे. असें करतां करतां सुमारें एक तासानें या दोन्ही टोळ्या गाढवी नदीचे कांठीं एकत्र येऊन मिळाल्या. त्या अवधींत वाघाचा कांहींच पत्ता लागला नाहीं. तेथें नदीची परिस्थिति पहातां वाघ नदीच्या प्रवाहाच्या बाजूनें खालील दिशेस जाईल असें वाटेना, ह्मणून ही सर्व मंडळी नदीच्या कांठानें वरचे बाजूस जाऊं लागली. नदीही वांकडी तिकडी, नागमोडी असल्यानें त्यांनाही तसेंच जावें लागलें. कांटेकुटे, खांचखळगे, जंगलांत कसे असतात, दुरून जंगल डोळ्याला सुंदर दिसतें, पण आंत शिरल्यावर तें कसें कांटेरी भयंकर जाळें असतें आणि जंगली लोकांना सदा सर्वदा या कंटकमय मार्गांतूनच संचार करावा लागतो याची पूर्ण जाणीव या वेळीं राजेसाहेबांना आली आणि गरिबांच्या जीविताचीही योग्यता त्यांचे मनाला पूर्ण पटली. संकटांच्या परंपरेशीं झगडणाऱ्या माणसांची योग्यता संकटाचे वेळीं समजत असते व पटत असते यांत संशय नाहीं. मऊ पराच्या गाद्यांवर पहूडणारी ही राजेसाहेबांची स्वारी केवळ या शिकारीच्या हौसेनें जंगली माणसांच्यासुद्धां आपत्तीला मागें हटविणारे हे हाल सोशीत जात होती. शिकारीकडे तंद्री लागल्यामुळें या वेळीं या हालांकडेही त्यांचें लक्ष नव्हतें. त्यांचें डोळ्याला फक्त जखमी झालेला वाघ तेवढा दिसत होता. तंद्रीचें हें असेंच असतें. ती देवाकडे लागली तर देव येऊन पुढें उभा राहतो. पैशाकडे लागली तर पैसाही मिळतो. जिकडे तंद्री लागेल तें साध्य होतें. फक्त तंद्री लागण्याचा मात्र मनाचा धर्म असला पाहिजे. आणि अशा धर्माचें मन श्रेष्ठ लोकांचेंच असलेलें दिसून येतें.

या तंद्रींत राजेसाहेब व इतर मंडळी चालली असतां, सुमारें अर्धा फर्लांग

लांबीवर नदीच्या मध्यभागीं पाण्यांत बसलेला वाघ दिसला. त्या ठिकाणीं पाणी सुमारें गुडगाभरच खोल होतें. त्या पाण्यांत तो वाघ आपल्या डोक्याचा जखमीं झालेला भाग बुडवून बसला होता. जखमेमुळें त्या वाघाची पाण्यांत धडपड सुरू होती, गोळी लागल्यामुळें तो अगदीं घाबरून गेला होता व एकाच डोळ्यानें तो सभोंवार पहाण्याचा प्रयत्न करीत होता. अशा स्थितींत आपण पुढें जाण्याचा प्रयत्न केला तर तो तेथून पुन्हां पळून जाईल या भीतीनें शिकारी मंडळी तेथेंच दबा धरून बसली. राजेसाहेबांनीं तेथूनच निशाण धरून गोळी चालविण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें गोळी चालविली. ती गोळी वाघाचे पुढील खांद्याला निसटती लागली. त्याबरोबर तो वाघ पुन्हां उडाला व नदीच्या दुसऱ्या तीराला जाऊन पुन्हां दिसेनासा झाला! नदीच्या पलीकडील तीरावरून वाघ पळत नदीच्या उगमाचे दिशेनें जात असतां, तो लंगडत असलेला दिसला. तेव्हां दुसरी गोळीही त्याला लागली, हें निश्चित झालें होतें. पुढें ती मंडळी त्याचेमागें शोध करीत निघाली. मंडळी नदीपलीकडे जाणेकरितां नदींतून चालली. परंतु ते ज्या ठिकाणाहून पलीकडे जाऊं लागले, त्या ठिकाणीं सुरवातीला पाणी थोडें दिसलें. परंतु जसजसे ते पुढें जाऊं लागले तसतसें पाणी जास्त वाटूं लागलें. शेवटीं पाणी छातीपर्यंत आलें. सर्वांचे कपडे भिजले. तरी त्याची कोणालाच पर्वा वाटली नाहीं. पलीकडे येऊन पुन्हां नदीकांठानें ते उगमाकडे जाऊं लागले. झर्शींचा कळप नदीपलीकडेच ठेवण्यांत आला होता. सुमारें एक तास या नदीकिनाऱ्यानें वर गेल्यावर नदीचें वळण आलें. त्या वेळीं सायंकाळचे पांच वाजले होते. नदीच्या वळणानें ही मंडळी जात होती. वाघ याच वळणाचे प्रवाहांत बसला होता. ही मंडळी अगदीं जवळ आली तरी वाघाला ती दिसली नाहीं. वळणाचे टोंकाला ही मंडळी येतांच त्यांना वाघ दिसला. वाघ अगदीं जवळ होता. त्या वेळीं वाघाला गोळी घालणें धोक्याचें आहे किंवा काय याचा तिळमात्र विचार न करितां राजेसाहेबांनीं त्याच्यावर गोळी चालविली. ती बरोबर वाघाचें कानाजवळ मस्तकाला जाऊन लागली. त्यामुळें तो वाघ एकही पाऊल पुढें न जातां तेथेंच मरून पडला! मग काय विचारतां! त्या मंडळीचे आनंदाला सीमा राहिली नाहीं. पाण्याचे ओघाबरोबर तो मेलेला वाघ वाहून जाऊं लागला. तेव्हां सर्व मंडळी पुन्हां नदींत उतरली व त्यांनीं त्या वाघाला धरून किनाऱ्यावर आणलें. हत्ती येण्याकरितां आवाज दिला

हत्ती येतांच तो वाघ त्याच्यावर बांधून ही सर्व यशस्वी शिकारी मंडळी मुक्कामाला सुमारें आठ वाजतां रात्रीं परत आली. हां हां ह्मणतां ही हकीकत गांवांत पसरली. सर्व मंडळी त्या आदमखोरा वाघाला पहाण्याकरितां लोटली. गांवांतील लोकांनीं रात्रीं मोठा उत्सव केला. राजसाहेबांनीं बरोबरील मंडळीसह मोठ्या आनंदानें फराळ केला. सर्वांच्या डोळ्यांत या वेळीं झोंपेनें काहूर केला होता. ह्मणून सर्व मंडळी बिछान्यावर पडली व सकाळ होई तोंपर्यंत कोणीच जागा झाला नाहीं. बाहेर वाघापुढें लोकांचें नाचणें, गाणें, वाजविणें वगैरे जोरजोरानें चाललें होतें; परंतु या गलबल्यानें कोणत्याच शिकारी मनुष्याचा निद्राभंग झाला नाहीं. कावळ्याच्या ओरडण्यानें श्रीमंतांच्या निद्रेचा भंग होत असतो, याची थोडी तरी कल्पना या वेळीं राजेसाहेबांना होती काय !

राजेसाहेबांच्या मर्दुमकीबद्दल तेथील लोक राजेसाहेबांचें निरनिराळ्या प्रकारानें कौतुक गाऊं लागले. राजेसाहेबांनीं आपण पायीं केलेली शिकार लोकांना शक्य तेवढी न समजेल अशी खबरदारी घेतली होती. याचें कारण असें होतें कीं जर ही हकीकत मातोश्री राणी काशीबाईसाहेब यांना समजेल, तर त्या पुन्हां आपणाला शिकारीला पाठविणार नाहींत. त्यांचे धाकामुळें बरेच दिवस ही गोष्ट विशेष गुप्त ठेवण्यांत आली होती. त्या शिकारींत बलदारखां वस्ताद, बाळा कोरके, यशवंतराव मोहिते वैद्य वगैरे जुने शिकारी नसल्यामुळें व तरूण शिकारी तेवढेच असल्यामुळें ही पायीं शिकार राजेसाहेबांना करतां आली व तिची वार्ता मातोश्रींपर्यंत गेली नाहीं. या शिकारीमुळें खेड्यागांवच्या गरीब लोकांना संकटांतून सोडविल्याचें श्रेय राजेसाहेबांना मिळालें. या शिकारीचें नित्य स्मरण व्हावें ह्मणून राजेसाहेबांनीं या वाघाच्या कातड्यांत पेंढा भरून व त्याचें तोंड वगैरे बनवून रंगवून त्याचें पुढील अर्धें धड फळीवर सुबक रीतीनें बसवून आपल्या वाड्यांतील कचेरींत ठेविलें आहे. राजेसाहेबांची भेट घेण्याकरितां ज्या वेळीं मंडळी त्यांचे कचेरींत येत, त्या वेळीं अमोरासमोर बसलेले दोन वाघ लोकांना दिसत. या मृत वाघाची हकीकत समजल्यानंतर जीवंत वाघ जे राजेसाहेब, ते त्या वाघापेक्षां खात्रीनें श्रेष्ठ होते, ह्मणूनच तो वाघ राजेसाहेबांची स्पर्धा करण्याकरतां त्यांच्या कचेरींत समोर बसला आहे, असें लोकांना वाटे !

एकंदरींत वाघाच्या शिकारीचा नाद राजेसाहेबांना फार होता. मोठ-

मोठ्या पाहुण्यांनाही ते शिकारीकरतां आपल्याबरोबर नेत. राजेसाहेबांचे जामात तळेगांवचे श्रीमंत सरदार यशवंतराव दाभाडे हेही पुण्याहून शिकारीकरितां नागपुरीं येत. तेही उत्तम शिकारी होते. त्याचप्रमाणें सांगलीचे राजवैद्य आबासाहेब सांभारे हेही इ. स. १९२९ सालीं आपले चिरंजीव श्री. आप्पासाहेब यांस बरोबर घेऊन नागपुरीं शिकारीकरतां आले होते. सुमारें पंधरा दिवस नागपूर आणि झाडी या ठिकाणीं श्री. आबासाहेब राहिले. त्यांना वाघाचे शिकारीची फारच मोठी मौज वाटली. बाहेर गांवीं जाऊन इतके दिवस आनंदांत व मजेंत काढलेलें हें एकच उदाहरण श्री. आबासाहेब सांभारे यांचे आयुष्यक्रमांत घडलें. त्या वेळीं शिकारीकरितां श्रीमंत राणी इंदिराबाईसाहेब यांनाही राजेसाहेबांनीं बरोबर नेलें होतें. या शिकारींत श्रीमंत राणीसाहेबांनीं एक मोठा पट्टेदार वाघ मारला. त्याही उत्तम निशाण लावतात. या शिकारीचे वेळीं दोन मोठे पट्टेदार वाघ मारण्यांत आले. रात्रीं मोटारींतून नागपुरीं परत येतांना रस्त्यावर एक चित्ता दिसला. तोही राजेसाहेबांनीं मोटारींत बसूनच गोळी चालवून मारला. या शिकारींतील दोन पट्टेदार वाघांचीं कातडीं आबासाहेब सांभारे यांनीं सांगलीस आणली. सध्यां तीं त्यांचे घरीं भजनाचे वेळीं अंथरण्यांत येतात. अशीं कित्येक वाघांचीं कातडीं राजेसाहेबांनीं शिकारीला येणाऱ्या पाहुण्यांना शिकारीची आठवण म्हणून नजर केलीं.

राजेसाहेबांनीं मृगयाही पुष्कळ केली. मृगाचीं आसनें ते ब्राह्मणांना किंवा पुजापत्री, जप वगैरे करणाऱ्या लोकांना नेहमीं देत असत. संन्याशी लोकांनाही त्यांनीं व्याघ्रासनें व मृगासनेंही कित्येक दिलीं. मृगासन कोणीं मागितलें तर तें त्याला कधीं नकार देत नसत. अशा प्रकारें प्रपंचांत राहून त्यांनीं स्वार्थ आणि परमार्थ या दोन्ही गोष्टी या शिकारीचे बाबतींतही साधल्या.

## प्रकरण ७ वें

# सत्पुरुष-दर्शन.

राजे साहेबांचा विवाह होऊन ते प्रपंचांत पडले, ही हकीकत मागील प्रकरणीं आलीच आहे. त्यांना इ० स० १९०० मध्यें मुलगा झाला; त्याचें नांव 'मुधोजी' परंतु तो त्यांचे दुर्दैवानें आठ दहा महिन्यांतच दिवंगत झाला. त्यानंतर इ० स० १९०२ ह्मणजे शके १८२३ फाल्गुन शु० १० रोजीं कन्या झाली. तिचें नांव 'ताराराजे.' त्यांचे पाठीवर राजे साहेबांना कांहीं वर्षे संतति झाली नाहीं. ह्मणून त्यांच्या मातोश्री राणी काशीबाई साहेब यांना फार दुःख होत असे. नातवाचें कौतुक आपल्या नशीबीं पहाण्याचें नाहीं किंवा काय, अशा कल्पनांनीं त्या चिंतातुर असत. आपणाला नातु व्हावा ह्मणून त्यांनीं पुष्कळ नवस केले. पण एकही देव त्यांच्या नवसाला पावला नाहीं. शेवटीं पंढरीच्या पांडुरंगावर शेवटचा विश्वास ठेवून त्या बसल्या.

परमेश्वरही भक्ताच्या आपणावरील विश्वासाची वाटच पहात असतो. भक्ताचा दृढ विश्वास आपणावर आहे, अशी परमेश्वराची खात्री झाली, ह्मणजे तो कसकसे चमत्कार घडवून आणून आपल्या भक्ताचे मनोरथ पूर्ण करीत असतो याचें कौतुक त्यावर दृढ विश्वास ठेवून वागणाऱ्या मनुष्यालाच अनुभवितां येतें; दुसऱ्याला त्याच्या आनंदाची व कौतुकाची कल्पना करितां येणार नाहीं.

राजेसाहेबांचा पंढरपुराला वर्षांतून निदान एक वेळ तरी जाण्याचा परिपाठ होता. हा त्यांच्या वयाच्या सुमारें पंचवीस वर्षांपासून अव्याहत असा चालला होता. इ. स. १९०९ मध्यें राजेसाहेब आपल्या मातोश्रींना समागमें घेऊन पंढरीला गेले. ते तेथें नेहमीं भाट्याच्या कपोल धर्मशाळेंत उतरत असत. ही धर्मशाळा चंद्रभागेच्या अगदीं कांठावर आहे. हिच्या चंद्रभागेकडील सज्जांत उभें राहिलें ह्मणजे नदीचा संपूर्ण देखावा दृष्टीला पडतो. एके दिवशीं प्रातःकाळीं राजेसाहेब व त्यांच्या मातोश्री



श्रीमत्सद्गुरु सच्चिदानंद श्री ब्रम्हचैतन्य महाराज गोंदवलेकर.

(क फो. झि. प्रे. बे.)

पृष्ठ १८८-१८९



श्री. सौ. राणी इंदिराबाईसाहेब आणि त्यांचीं अपत्यें

[K.P.Z P, B]

पृष्ठ १८८-१८९.

या सज्जांत चंद्रभागेचा देखावा पाहात उभ्या असतां त्यांना आंगानें लठ्ठ असलेले एक गृहस्थ दिसले. त्यांना चार मंडळींनीं हातांचा खुर्चीप्रमाणें आकार करून त्यावर बसविलें होतें; व ते त्यांना नदीवर स्नानाकरितां घेऊन चालले होते. त्यांना पाहून राजेसाहेबांना व त्यांचे मातोश्रींना आश्चर्य वाटलें. त्या वेळीं राजेसाहेब म्हणाले, ' पंहलवानासारखा धष्टपुष्ट गडी आहे आणि चंद्रभागेच्या स्नानाला पायीं जायाला याला काय धाड झाली ! ' यावर राजेसाहेबांच्या मातोश्री राणी काशीबाईसाहेब म्हणाल्या, ' हातापायानें चांगला धट्टाकट्टा दिसतो. देवादिकांच्या कामांत मेल्याची श्रीमंती ही अशी कां उतूं जाऊं लागली ! ' अशा प्रकारची भाषा मायलेकरांमध्यें विशेष हलक्या आवाजांत चालली होती. या टीकात्मक भाषणाचा गंधही सज्जांत जवळच उभ्या असलेल्या राजेसाहेबांच्या इतर नोकर मंडळीस लागला नाहीं. इतक्या हलके आवाजांत ही टीका होती.

ही टीका ज्या इसमांबद्दल झाली ते श्रीसद्गुरु गोंदवलेकर ब्रह्मचैतन्य महाराज होते. त्यांच्या सांप्रदायाचे शिष्य बृहन्महाराष्ट्रांतच केवळ नव्हे तर अखिल भारतांत इतस्ततः पसरलेले आहेत. सद्गुरूंना परमेश्वराप्रमाणें मानून त्यांची सेवा करणें ही शिष्यवर्गाची भावना असल्यामुळें त्या सद्गुरु रूपी परमेश्वराला चंद्रभागेचें स्नान घालण्याकरितां भक्त मंडळी त्या वेळीं घेऊन चालली होती. भक्तांच्या भक्तिभावनेपुढें परमेश्वराचेंही कांहीं चालत नाहीं. त्याचप्रमाणें सच्छिष्यांच्या शुद्ध मनानें व निर्मल प्रेमानें आणि खऱ्या भावनेनें होत असलेल्या गोष्टीच्या बाहेर सद्गुरूंना जातां येत नाहीं. याच गोष्टीपैकीं माणसांनीं उचलून नदीवर स्नानाला सद्गुरूंना नेणें ही एक गोष्ट होती.

आपल्या हातून जाणून बुजून किंवा अजाणपणानें घाणींत दगड पडला, तरी आपल्या आंगावर घाण उडते, त्याचप्रमाणें पवित्र अशा गंगेत जरी तो दगड पडल, तरी तें पवित्र गंगोदक आपल्या आंगावर उडणारच. या दोन्ही गोष्टी आपापल्या परीनें कार्य करितात. घाण उडाली असतां मनुष्याला घाणेरडेपणा अर्थात अपवित्रता उत्पन्न होते, पण त्याच्याविरुद्ध गंगोदकाच्या सिंचनानें पवित्रता उत्पन्न होऊन मनुष्याचा उद्धारही आपोआप होऊन जातो. या गोष्टी ज्याच्या त्याच्या प्रारब्धयोगाच्या आणि पूर्वपुण्याईच्या आहेत.

राजेसाहेबांना किंवा त्यांचे मातोश्रींना श्रीसद्गुरू गोंदवलेकर महाराजांची ओळख नव्हती, किंवा त्यांचा मुक्काम पंढरपुरीं आहे, हेंही माहीत असण्याचें कारण नव्हतें. परंतु गोंदवलेकर महाराजांचें नांव, त्यांची ख्याति मात्र त्या उभयतां मायलेकरांच्या कानांवर कित्येक वेळां आली होती. राजेसाहेब व त्यांच्या मातोश्री थोडया वेळानें सज्जांतून आंत आल्यानंतर थोडयाच वेळापूर्वी माणसांनीं उचलून नेलेले गृहस्थ श्रीसद्गुरु गोंदवलेकर महाराजच होते. असें त्यांच्या नोकरांकडून त्यांना समजलें. त्याबरोबर त्या उभयतांचे मनाला अतिशय वाईट वाटलें. आपण सद्गुरूंना वाटेल तें बोललों, त्यांची निंदा केली, म्हणून त्यांना फार पश्चात्ताप झाला आणि पंढरीला येऊन पुण्य-साधन करावयाचें, तें बाजूला राहून सद्गुरूंचा द्रोह करून पाप मात्र गांठीला बांधलें, अशी मनाची समजूत होऊन त्यांचीं अंतःकरणें उदास झालीं. त्यांना पुढें काय करावें, हें सुचेना. त्यांचे हातांपायांतील शक्ति गेल्याप्रमाणें त्यांना वाटलें व बुद्धीची विचारशक्ति मावळून तीं उभयतां मायलेकरें अगदीं सचिंत बसलीं.

या त्यांच्या सचिंत स्थितींत किती वेळ गेला, याची त्यांचेपैकीं कोणालाच स्मृति नव्हती पण एवढ्यांत असा चमत्कार झाला कीं, श्रीसद्गुरु गोंदवलेकर महाराज आपल्या कांहीं शिष्यवृंदासह राजेसाहेब व त्यांच्या मातोश्री ज्या खोलींत बसल्या होत्या त्या ठिकाणीं अकल्पित आले. त्यांना पहातांच राजेसाहेबांना आनंदाचें भरतें आलें व त्यांनीं पुढें होऊन त्यांचे पाय घट्ट धरले.

## वरप्रसाद.

परमेश्वराची लीला अगाध असते. तो नानाप्रकारचे चमत्कार दाखवून भक्तांचे कोड पुरवित असतो. श्रीसद्गुरूंनीं राजेसाहेबांच्या मस्तकावर हात फिरविला व त्यांना मनापासून आशीर्वाद देऊन उठविलें. नंतर राजेसाहेबांनीं त्यांना गालीचावर बसविलें. त्यांच्या शिष्य मंडळींना बसावयाला सांगितलें व आपणही त्यांचेसमोर बसले. कांहीं वेळपर्यंत इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर मातोश्री राणी काशीबाईसाहेब म्हणाल्या, ' महाराज, आपल्या दर्शनानें आमचा उद्धार झाला. आतां म्हातारपणीं माझी एकच इच्छा राहिली आहे. माझ्या बाबांना ( राजेसाहेबांना ) मुलगा झालेला मीं पाहिला म्हणजे माझ्या डोळ्यांचें पारणें फिटेल. ' यावर श्रीसद्गुरु-

महाराज ह्मणाले, ' श्रीरामकृपेनें सर्व कांहीं तुमच्या मनाप्रमाणें होईल. पण माझ्या रामाला तुह्मीं विसरतां कामा नये. पहिल्यानें श्रीरामप्रभूची सेवा केली पाहिजे, ह्मणजे तो रामप्रभु आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो. ' नंतर त्यांनीं राजेसाहेबांना ' त्रयोदशाक्षरी ' राममंत्राचा तेरा कोटी जप करण्याची आज्ञा केली. व सांगितलें कीं, ' हा जप संपतांच आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील. ' असें ह्मणून त्यांना आशीर्वाद देऊन ते निघून गेले.

सत्पुरुषाच्या वाणीच्या अधिकाराचा प्रभाव केवढा असतो, याचें प्रत्यंतर राजेसाहेबांना तेव्हांच आलें. त्यांच्या तोंडून श्रीरामचंद्राच्या ' त्रयोदशाक्षरी ' मंत्राचा आपोआप उच्चार होऊं लागला. सद्गुरुदर्शनानें राजेसाहेबांचें मन प्रसन्न झालें आणि ते पंढरीची वारी करून नागपुरीं आनंदानें परत आले.

नागपुरीं आल्यानंतर त्यांनीं तेरा कोटी जप करण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें दिवस चांगला पाहून जपाला आरंभ केला. हा जप करण्याचे बाबतींत राजवाड्यांतील एक एक मंडळी राजेसाहेबांना येऊन मिळूं लागली. थोड्याच दिवसांत राजवाड्यांतील लहान थोर सर्वच मंडळी हातांत माळ घेऊन जप करीत असलेली दिसूं लागली. पहांटे तीन वाजल्यापासून सर्व मंडळी उठत. स्नानें करीत व जपाला बसत. वाड्यांतील पहारेकरीसुद्धां ( हिंदु पहारेकरी ) बसल्या जागीं जप करीत. मंडळीच्या उद्योगाप्रमाणें कांहींजण सकाळीं बारा वाजेपर्यंत बसत, तर कांहीजण दोन वाजल्यापासून सायंकाळीं सात वाजेपर्यंत बसून जप करीत. एकंदरींत कांहीं दिवसपर्यंत राजवाड्याच्या कोनाकोंपऱ्यांतून श्रीरामाच्या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप होऊं लागला. सर्वसाधारणपणें रोज दोन लक्षापर्यंत सर्वांचा जप होत असे. जप करणाऱ्या प्रत्येक इसमाच्या मनांत राजेसाहेबांना पुत्रसंतान व्हावें ही एकच भावना वास्तव्य करीत होती. आणि त्याच भावनेच्या जोरावर व उमेदीवर या जपाचें काम सुरू होतें. जपाचा हिशेब व्यवस्थित ठेवण्यांत येत होता.

हा तेरा कोटी जप पूर्ण व्हावयाला सुमारें सहा वर्षें लागलीं. खरें पाहिलें असतां, सुरवातीच्या मानानें जर जपाचें काम चाललें असतें तर तीन वर्षांचे आंतच तेरा कोटी जप होऊन गेला असता. पण या देवादिकांचे कामांत कांहीं आरंभशूर माणसें असतात. तीं कोणत्या तरी कारणानें आपोआप कमी होऊं लागतात. तसाच प्रकार या बाबतींतही राजवाड्यांत झाला.

जीं अगदीं खरोखर कळकळीचींच जेवढीं माणसें होतीं, तेवढींच शेवटपर्यंत कायम राहिलीं. राजेसाहेबांचा जप मात्र दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत होत असे. अशा रीतीनें हा तेरा कोटी जप व्हावयाला सहा वर्षें लागलीं.

या तेरा कोटी जपाची सांगता झालेनंतर इ. स. १९१४ सालीं तंजावर येथील सुर्वे घराण्याच्या मुलीशीं राजेसाहेबांचें लग्न झालें. त्याच श्रीमंत राणी इंदिराबाईसाहेब या होत. हें लग्न राजेसाहेबांनीं आपलें पहिलें कुटुंब श्रीमंत राणी अन्नपूर्णाबाईसाहेब यांचे संमतीनेंच केलें होतें. हा लग्नसमारंभ पुण्याला झाला. श्रीमंत मातोश्री राणी काशीबाईसाहेब यांचा या लग्नाला सर्वस्वीं पुढाकार होता.

सत्पुरुषाचें वचन ‘ शिलालिखितमक्षरम् ’ दगडावर लिहिल्याप्रमाणें अबाधित असावयाचें. तें कधींही खोटें व्हावयाचें नाहीं. ह्मणूनच त्यांना परमेश्वर स्वरूप मानण्यांत येतें. एकदां का त्यांची आपल्या भक्तांवर कृपादृष्टि झाली, ह्मणजे त्यांना जगांत कोणतीच न्यूनता भासत नाहीं.

## अपत्यलाभ.

**अनंत हस्तें कमला-वरानें । देतां किती घेशिल दों करानें ॥१॥**

अनंत हस्तांनीं परमेश्वर देऊं लागल्यानंतर भक्ताला दोन हातांनीं किती घेत येईल ! * शके १८३९ मार्गशीर्ष वद्य ३० रोज शनिवार तारीख १२ जानेवारी सन

* श्रीसग्दुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या आशीर्वादानें आपणाला पुत्रप्राप्ति झाली ह्मणून त्यांच्या समाधीच्या दर्शनाकरतां तारीख ५ जून सन १९२७ इ. रोजीं राजेसाहेब, श्री. सौ. राणी इंदिराबाईसाहेब, श्री. कु. प्रतापसिंह वगैरे मुलांसह गोंदवल्यास आले. तेथें त्यांनीं दोन दिवस मुक्काम केला. तेथील व्यवस्थेकरतां गोंदवलेकर महाराजांचे पुण्याचे एक शिष्य श्री० दामले हे तेथें आले होते. राजेसाहेबांनीं श्रीसद्गुरूंच्या समाधीवर अभिषेक केला. पूजा बांधली. चि० कु. प्रतापसिंह यांना श्रीसद्गुरूंच्या पादुकांवर घातलें. ब्राह्मणभोजन केलें. रात्रौ भजन केलें. अशाप्रकारें मोठ्या थाटाचा कार्यक्रम करण्यांत आला. या ठिकाणीं सद्गुरु महाराजांनीं देह ठेविला असला तरी त्यांचें वास्तव्य तेथें पूर्ण जागृत स्वरूपांत आहे याचा दृष्टांतरूपानें राजेसाहेबांच्या मनाला पटेल अशाच गोष्टींनीं अनुभव आला.

१९१८ इ. रोजीं श्री. राणी इंदिराबाईसाहेब यांचे पोटीं नागपूर मुक्कामीं राजेसाहेबांना पुत्ररत्न झालें. त्याचें नांव परसोजी ऊर्फ प्रतापसिंह असें ठेवण्यांत आलें. राजेसाहेबांनीं हा पुत्रजन्मोत्सव फारच मोठ्या थाटानें साजरा केला. मातोश्री राणीकाशीबाईसाहेब यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. राजेसाहेबांच्या राजवाड्यांत जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. सत्पुरुषाच्या वचनाची सर्वांना खात्री पटली.

श्री. प्रतापसिंह यांचे पाठीवर श्री. राजारामसिंह हे शके १८४१ मार्गशीर्ष वद्य ५ रोज गुरुवार तारीख ११ माहे डिसेंबर सन १९१९ इ. रोजीं नागपुरीं झालें. त्यांचे पाठीवर शके १८४३ माघ शुद्ध ३ रोज मंगळवार तारीख ३१ जानेवारी सन १९२२ इ. रोजीं नागपूर मुक्कामीं श्री. कु. वत्सलाराजे या जन्माला आल्या. त्यांचे पाठीवर श्री. कु. प्रमिला राजे यांचा जन्म शके १८४५ पौष कृ. ३० रोज मंगळवार तारीख ५ फेब्रुवारी सन १९२४ इ. रोजीं नागपुरीं झाला. त्यानंतर श्री. कु. विमला राजे यांचा जन्म शके १८४७ मार्गशीर्ष कृ० ३० रोज बुधवार तारीख १६ डिसेंबर सन १९२५ इ. रोजीं नागपुरीं झाला. नंतर श्री. कु. विक्रमसिंह ऊर्फ विजयसिंह यांचा जन्म शके १८५१ ज्येष्ठ कृ. ७ रोज शनिवार तारीख २९ जून सन १९२९ इ. रोजीं नागपुरीं झाला. त्यांचे पाठीवर राजेसाहेबांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. कु. तेजसिंह यांचा जन्म फाल्गुन शु॥ १० रोज गुरुवार शके १८५३ तारीख १७–३–३२ इसवी रोजीं नागपुरीं झाला. याप्रमाणें श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या आशीर्वादानें राजेसाहेबांना द्वितीय कुटुंबापासून चार मुलगे व तीन मुली झाल्या. जो राजवाडा पुत्रसंतान नसल्यामुळें सर्वांना शून्यवत् वाटत होता, तोच आतां श्रीसद्गुरु-प्रसादाच्या दिव्य प्रभावामुळें मुलांबाळांनीं भरून जाऊन जिकडे तिकडे आनंदीआनंद नाचूं लागला. श्रीसद्गुरु-कृपा ही अशीच अतर्क्य असते, असें अनुभवांतीं ठरतें; पण दृढविश्वास ठेवून अनुभव घेणाऱ्यांनाच तो मिळतो. इतरांना त्याचें काय !

## प्रकरण ८ वें

# विलायतचा प्रवास.

इ. स. १९१२ च्या दिल्ली दरबाराला राजेसाहेब जाऊन परत नागपुरीं आल्यानंतर विलायतला जाण्याचा त्यांनीं विचार ठरविला. त्यांच्या मनांत एकदां तरी विलायतचा प्रवास करून यावें, असें पुष्कळ दिवसांपासून होतें. परंतु तसा योग त्यांना त्या वेळपर्यंत आला नव्हता. त्या वेळीं भोंसला इस्टेटीचे बाबतींत प्रीव्ही कौन्सिलमध्यें अपील करण्याचा योग आल्यामुळें विलायतच्या प्रवासाला आपणाला ही सुसंधिच मिळाली असें वाटून त्यांनीं विलायतला जाण्याचा आपला विचार नक्की केला. त्यांच्याबरोबर त्यांच्या प्रथम पत्नि श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाई-साहेब, त्यांचे म्यानेजर रा. सा. नारायणराव व्यास, पुण्याचे बॅरिस्टर श्री. जी. के. गाडगीळ व त्यांचें कुटुंब आणि रा. रामराव जामदार इतक्या मंडळींची जाण्याची तयारी झाली व त्याप्रमाणें त्यांना पासपोर्टही मिळाले. राजेसाहेबांना पोंचविण्याकरितां मातोश्री श्री. राणीकाशीबाईसाहेब याही बोटीपर्यंत नागपुराहून मुंबईस आल्या होत्या. त्या वेळीं राजेसाहेबांची कन्या श्री. ताराराजे यांचें वय दहा वर्षांचें होतें. त्यांना श्रीमंत मातोश्रीजवळच ठेवून राजेसाहेब राणीसाहेबांना घेऊन विलायतला जाणार होते. श्री. ताराराजेही या मंडळीबरोबर मुंबईला आल्या होता. शिवाय इतर ठिकाणची दुसरी कित्येक मंडळी त्यांना पोंचविण्याकरितां मुंबईला आलीच होती. ही सर्व मंडळी मुंबईला सरदारगृहामध्यें उतरल्यामुळें तें सर्व भरून गेलें होतें. पुण्याहूनही बरीच मंडळी येऊन बॅरिस्टर गाडगीळ साहेबांना पोंचविण्याकरतां याच सरदारगृहांत उतरली होती.


तारीख २० एप्रिल सन १९१२ इ. रोजीं पी. अॅन्ड ओ. कंपनीच्या एस. एस. मांचुआ बोटींत बसण्याकरितां बंदरावर येऊन पोंचले. त्यांना पोंचविण्या-



विलायतचा प्रवास.

पृष्ठें १९४-१९५

(क.फो.झिं.प्रे.बे.)



श्री          नागपूर
सी. पी.
ता. ४-११-२८

श्री. डॉ. पां. गो. रानडे हल्ली
मु. उदेपूर मेवाड यांस.
नमस्कार आपले पत्र (३१-१०चें) आले ते पावले
मजकूर लक्षात आला वाचून आनंद
झाला. खरोखर तुम्ही येथून निघतवे
ळेसच उत्तम मुहूर्तावर निघालात व प्र
वासातही उत्तम शकुन झाले अर्थात म
ग कार्यसिद्धि का होणार नाही. परमेश्वर
तुम्हाला उभयतांना सर्वप्रकार यशस्वी क
रो. आनंदाची गोष्ट ही की जुनी वंशावळ
(हल्ली) हल्ली लागली असो. आमच्या सर्वत्रांच्या

(२)
तबियती उत्तम आहेत. वयाले कृतीव
गौरे च्या प्रकृत्या उत्तम आहेत काळ
जी नसावी. काम आनंदाने चालवाव
हे चपत्री वे. शा. स. श्री. पंडीत जी ना न
मस्कार व पायलागी कळवावे.
सर्व मुलांचा दंडवत. तसेच बाकी स
र्वत्रांचा दंडवत, नमस्कार वैजरामजी
की. कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला
(signature)

राजसाहेबांचे हस्ताक्षर.

पृष्ठ ११८–१२०                [K P.Z P.B]

करितां नागपूरची सर्व मंडळी बंदरावर आली होती. श्रीमंत मातोश्री राणीकाशीबाई-साहेब यांना आपला मुलगा व सून परदेशीं जाणार व आपण येथें एकटेंच परदेशी होऊन बसणार, ह्मणून फारच वाईट वाटत होतें. त्यांच्या डोळ्यांतून सारखा अश्रू-प्रवाह चालला होता. तेव्हां त्यांना राजेसाहेब ह्मणाले, ‘ आपण विनाकारण कां वाईट वाटून घेतां ? आम्ही लवकरच परत येऊं ! असें म्हणून त्यांनीं आपल्या मातोश्रींची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु, त्यांची कन्या श्री. ताराराजे ह्या त्यांचेजवळ जाऊन त्यांना नमस्कार करूं लागतांच एकुलत्या एकट्या ( त्या वेळीं राजेसाहेबांना एवढें एकच अपत्य होतें. ) मुलीला सोडून आपण परदेशीं जात आहोंत, पुन्हां परत येईतोंपर्यंत मुलीची व आपली भेट होणार नाहीं, या वियोग-दुःखानें राजेसाहेबांचे डोळे अश्रूंनें भरून येऊन बंधारा फुटलेल्या पाटाप्रमाणें ते वाहूं लागले. ही राजेसाहेबांची झालेली स्थिति पाहून त्यांच्या मातोश्री म्हणाल्या, “ बाबा, तुमच्या डोळ्यांत कां अश्रू आले ? ” या त्यांच्या प्रश्नाला राजेसाहेबांकडून कांहींच उत्तर मिळालें नाहीं. तेव्हां त्या पुढें त्यांना म्हणाल्या, “ प्रेमाचें हें असेंच असतें. प्रेमाचा ओघ नदीच्या प्रवाहाप्रमाणें पुढें पुढेंच वाहणारा असतो. आईचें प्रेम मुलावर; मुलाचें प्रेम त्याच्या मुलावर; अशी परंपराच आहे. कोणाच्याही डोळ्यांत विनाकारण अश्रू येत नसतात. दुःखानें आंतड्यांला पीळ पडूं लागला, ह्मणजे आपोआप डोळ्यांवाटें गंगायमुना येतात. तुह्मी सुखरूप प्रवास करून परत आलेले आमच्या डोळ्यांला दिसलां कीं, हे अश्रू आपोआप बंद झालेले तुह्मांला दिसतील. तुह्मी यापुढें प्रवासांत असणार; तेव्हां स्वतःच्या प्रकृतीबरोबर तुमच्याबरोबर असणाऱ्या सर्व मंडळीच्या प्रकृतीला जपा. प्रवासांत कधींही लहानपणा मोठेपणा हा भेदभाव ठेवूं नये. प्रत्येकानें एकमेकांच्या उपयोगी पडत असावें. पत्रें पाठविण्यांत आळस करूं नये. योग्य कामांत श्रमा-कडे व पैशाकडे पाहूं नये. भलत्याच मोठेपणाच्या नादीं लागूं नये. दिसलेला गुण घेतल्याशिवाय राहूं नये. हातीं घेतलेल्या कामांत दिरंगाई करूं नये. ” अशा प्रकारचा उपदेश करून व सुनूबाईंना मुलीबद्दल चिंता न करण्याबद्दल बजा-वून आणि मुलगा व सून यांचे पाठीवरून प्रेमाचा हात फिरवून त्यांना बोटींत जाऊन बसण्याची परवानगी त्यांनीं दिली. राजेसाहेबांनीं मातोश्रींच्या पायांवर मस्तक ठेवलें व मुजरा करून ते बोटीवर जाण्याकरितां मचव्याकडे चालले. सौ.

राणीसाहेबांनींही नमस्कार केला. त्यांनीं ताराराजे यांचें प्रेमानें चुंबन घेतलें व त्याही राजेसाहेबांच्या मागोमाग निघाल्या. त्यांचेबरोबरची मंडळीही मातोश्रींना मुजरे करून निघाली, ती मचव्यांत बसून मांचुआ बोटीवर जाऊन दाखल झाली. ठराविक वेळीं बोटीनें आरोळी ठोकली व ती विलायतचा मार्ग झपाट्यानें आक्रमण करूं लागली.

राजेसाहेब मुंबईहून निघाल्यापासून चवथे दिवशीं एडन ( आदन ) ला जाऊन पोंचले. तेथें सुमारें पांच सहा तास बोट थांबते. त्या अवधींत तें शहर पाहण्याकरतां राजेसाहेब आपल्या मंडळीसह गेले. एडन शहर फार मोठें नाहीं. त्या ठिकाणीं पहाडी वास्ति आहे. शहरही फारसें सुंदर नाहीं. एक दोन तासांतच सर्व शहरभर पायीं फिरणें होतें. त्या ठिकाणीं फळफळावळ वगैरे सर्व वस्तू मुबलक मिळतात. एडन-हून निघाल्यानंतर पोर्ट सय्यदला सुमारें आठ तास मुक्काम होतो. तें शहर पहाण्या-करितां राजेसाहेब गेले होते. सुवेजलाही राजेसाहेब गेले होते. त्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं सिगारेटचे कारखाने पाहिले. तेथून ते मार्सेलसला उतरले. त्या ठिकाणीं एक दिवस त्यांनीं मुक्काम केला. त्या ठिकाणची सर्व प्रेक्षणीय स्थळे त्यांनीं पाहिलीं नंतर तेथून ते रेल्वेनें पॅरीस शहराला आले. त्यांनीं पॅरीसला पंधरा दिवस मुक्काम केला हें शहर फारच सुंदर असल्यामुळें तें सर्व पहाण्याकरितां त्यांना तेथें तितके दिवस मुक्काम करावा लागला. त्यांनीं तेथील प्रेक्षणीय स्थळें दाखविण्याकरितां तेथील एक माहितगार मनुष्य रोज एक पौंड वेतन देऊन ठेवला होता. त्यामुळें त्यांना पॅरीसमधील सर्व प्रेक्षणीय स्थळें पहावयास मिळालीं. तेथून ते कॅलेला गेले. आणि कॅलेहून बोटींत बसून चार पांच तासांत इंग्लंडच्या किनाऱ्यावर डोव्हरला येऊन पोंचले. तेथून रेल्वेगाडीनें ते लंडन शहराला आले. तेथें ते फर्स्ट अॅव्हेन्यू हॉटेलमध्यें उतरले.

लंडन शहर ग्रेटब्रिटनची राजधानी असून तें जगांत सर्वांत मोठें व श्रीमंत शहर आहे. या शहरीं असते वेळीं इंग्रज लोकांची आपापल्या धंद्यांतील हुशारी, नियमितपणा, शिस्त आणि उद्योग या त्यांच्या गुणांचा राजेसाहेबांचे मनावर फारच मोठा परिणाम झाला. लंडन शहर त्यांना जें थोडेंसें पाहतां आलें, तेवढ्यावरून त्या शहराची सर्वांगीण रीतीनें होत असलेली वाढती भरभराट पाहून त्यांचा त्या-

बद्दल फारच अनुकूल ग्रह झाला. स्वावलंबन, आशावादित्व आणि धैर्यशीलता या गुणांनीं भरलेले असे इंग्रज लोक असल्याचें त्यांना दिसून आलें.

तेथील उच्च वर्गाच्या लोकांशीं राजेसाहेबांचा जो परिचय झाला, त्यांत त्यांना असें आढळून आलें कीं, ते लोक फारच दयाळु आणि सभ्य असून हिंदुस्थानाबद्दल माहिती मिळवून घेण्याची त्यांना फार कळकळीची इच्छा आहे, आणि त्यांची हिंदी लोकांबरोबर मित्रत्व संपादण्याचीही मनापासून प्रवृत्ति आहे.

राजे लक्ष्मणरावसाहेबांना त्या रमणीय देशांतील अत्यंत आल्हादकारक असे अनेक अनुभव मिळाले. तारीख १३ जून रोजीं सेंट जेम्स नांवाच्या राजमहाल-मध्यें बादशहांच्या दरबाराला ( लेव्हीला ) राजेसाहेबांना निमंत्रण मिळण्याचा मान मिळाल्यामुळें ते त्या दरबारला गेले होते. तसेंच तारीख १४ जून रोजीं बादशहांच्या वाढदिवसानिमित्त इंडिया ऑफीसमध्यें मुख्य प्रधानांच्या स्वागत समारंभाच्या प्रसंगींही त्यांना निमंत्रण आल्यामुळें ते हजर राहिले होते. त्याचप्रमाणें कॅनॉट-मध्यें कॅप्टन व मिसेस जॉन पी. बॉईड कारपेंटर यांनीं, हिज ग्रेस दी ड्यूक ऑफ आर्गाईल यांना व त्याचप्रमाणें हाय कमिशनर्स, एजंट्स जनरल, व बादशहांच्या ताब्यांतील इतर वसाहतींचे प्रतिनिधी आणि पाहुणे यांच्या स्वागतार्थ जो समा-रंभ केला होता, त्या समारंभाचेंही निमंत्रण राजेसाहेबांना आलें होतें. त्या वेळीं ड्यूक साहेबांची भेट घेण्याचा त्यांना सुयोग प्राप्त झाला होता. कॅनॉट रूममध्यें उभयतांचें संभाषणही झालें.

तारीख १ जुलै रोजीं पॅलेस थिएटरमध्यें रात्रौ रॉयल कमांडचा जो समा-रंभ झाला, तो अत्यंत भव्य अशा स्वरूपाचा झाला. त्या वेळीं सर्व थिएटर लंडन-मधील निवडक शिष्ट लोकांनीं गच्च भरून गेलें होतें. ' गॉड सेव्ह दी किंग ' ( परमेश्वर राजाचें रक्षण करो ) हें गाणें सर्व लोकांनीं उठून उभें राहून म्हटलें. त्या वेळीं राजे लक्ष्मणरावसाहेब यांचेपासून थोड्याच अंतरावर आसनाधिष्ठित झालेले बादशहा व महाराज्ञी सरकार उभयताही या राष्ट्रगीताला मान देण्याकरितां उभे राहिले व त्या गीताला आपली संमति देण्यासाठीं सर्व लोकांपुढें सादरानें आपल्या माना नम्र केल्या. तें पाहून राजे लक्ष्मणरावसाहेबांना इंग्रज लोकांची

आपल्या राजाराज्ञीविषयींची केवढी प्रीति व राजनिष्ठा आहे याची मोठी धन्यता वाटली.

तारीख ५ जुलै रोजीं बकिंगहॅम पॅलेसमध्यें सरकारी ' बॉलचा ' समारंभ करण्यांत आला, बादशहा व महाराज्ञी सरकार यांच्या आज्ञेवरून लॉर्ड चेंबरलेन साहेबांनीं श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब यांना निमंत्रण पाठविलें होतें, ह्मणून त्या बॉलच्या समारंभाला ते हजर राहिले होते. राजेसाहेबांना त्या वेळचा देखावा अपूर्व असाच वाटला.

तारीख १८ जुलै रोजीं वुइंडसर कॅसलमध्यें बादशहांनीं गार्डन पार्टी दिली. त्या पार्टीला राजेसाहेबांना निमंत्रण आल्यामुळें ते हजर होते. त्या प्रसंगीं बादशहा व महाराज्ञी सरकार यांचेपुढें आपली राजनिष्ठा व्यक्त करण्याची सुसंधि त्यांना मिळाली.

या सर्व प्रसंगीं व लॉर्ड ॲम्टहिल, दी राईट ऑनरेबल सर चार्लस स्वान, ऑनरेबल मि. मॅांटेग्यू वगैरेंनीं दिलेल्या अनेक पार्ट्यांच्या प्रसंगीं राजे लक्ष्मणराव-साहेब यांचें स्वागत अत्यंत प्रेमपूर्वक व आदरपूर्वक करण्यांत आलें.

तारीख २९ जुलै रोजीं हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी राईट ऑनरेबल दी मार्क्विस ऑफ क्रू यांनीं इंडिया ऑफीसमध्यें राजे लक्ष्मणरावसाहेबांना मुलाखत दिली. त्याप्रसंगीं लॉर्ड क्रू यांनीं त्यांचबरोबर केलेल्या संभाषणानें ते अत्यंत संतुष्ट झाले.

एकंदरींत राजे लक्ष्मणरावसाहेबांचा विलायतेचा प्रवास अत्यंत सुखकर असा झाला. ज्या ज्या ठिकाणीं ते गेले त्या त्या ठिकाणीं त्यांना आदरसत्काराचा व प्रेमाचाच अनुभव आला.

भारतमंत्री यांचे पोलिटिकल ए. डी. सी. सर जेम्स डनलॉपस्मिथ व त्यांचे बंधु व्हेरी रेव्हरेंड मिस्टर ( सध्यां सर ) ॲडम स्मिथ, आबर्डीन कॉलेजचे प्रिन्सिपाल, या उभयतांबद्दलच्या कृतज्ञतेचा राजेसाहेबांना कधींच विसर पडला नाहीं. या उभय बंधूंनीं मित्रत्वाच्या नात्यानें राजेसाहेबांवर फारच मोठी मेहेरबानी केली. राजेसाहेबांना लंडन येथें जे निरनिराळे सुखानुभव प्राप्त झाले, त्यांपैकीं बऱ्याच अनुभवांना या उभय बंधूंच्या मदतीच्या अभावीं त्यांना मुकावें लागलें असतें.

राजेसाहेबांना इकडील प्रांतांतून परत गेलेले कित्येक युरोपियन गृहस्थ तेथें भेटले. त्यांनींही त्यांचा अत्यंत औदार्यानें व आदरानें सन्मान केला.

राजेसाहेब लंडनमध्यें ज्या हॉटेलांत राहत असत, त्या ठिकाणीं हिंदी पद्धती-प्रमाणें जेवणाचीही व्यवस्था असे. त्या हॉटेलमध्यें जेवणाची उत्तम सोय, नीटनेटकेपणा, स्वच्छता, हवाशीर जागा व जेवणखाण्यांत पूर्ण नियमितपणा असल्यामुळें तें त्यांना सुखकर झालें. परंतु तेथील मुक्कामामध्यें श्रावण महिना आल्यामुळें श्रावणसोमवारीं मात्र ते हॉटेलांतील कोणताच पदार्थ सेवन करीत नसत. त्याचप्रमाणें राणीसाहेबांचीही वृत्ति होती. श्रावणसोमवारचा उपवास या दोघांना असल्यामुळें बाकीच्या मंडळींना लाजेकाजेस्तव तो करावाच लागे. तेव्हां त्या दिवशीं सायंकाळीं उपवास सोडावयाचा ह्मणजे स्वयंपाक सोंवळ्यानें करावा लागे. स्वयंपाक सोंवळ्यानें करावयाचा ह्मणजे कपडे स्वतःला धुऊन वाळत घातले पाहिजेत व स्वयंपाकाची जागा स्वच्छ धुऊन पुसून साफ करावी लागे. भांडींही स्वतःलाच घांसून विसळून घ्यावीं लागत. स्टोव्हही घांसून पुसून घेण्याचा प्रसंग स्वतःवरच येते. ही सर्व कामगिरी राणीसाहेबांना व बॅरिस्टरीण बाईंना करावी लागे. राजेसाहेब स्वतः बाजारांत जात. रामराव त्यांच्या मदतीला असे. बाजारांत जाऊन तांदूळ, कणीक, तूप, भाजी वगैरे जे पदार्थ लागत, ते आपल्या परीक्षेनें व आपणाला आवडणारे असेच आणीत. माल चांगला असून पैशाला दोन पैसे पडले, तरी तिकडे राजेसाहेबांचें लक्ष नसे. त्या ठिकाणीं दूध फार महाग. पण तें-सुद्धां पुरून उरेल याच बेतानें खरेदी होत असे. हिंदुस्थानांतील बहुतेक प्रत्येक वस्तु त्या ठिकाणीं खपाच्या मानानें कमी जास्त किंमतीला मिळे; याचेंच कौतुक राजेसाहेबांना वाटे. अशाप्रकारें बाजारहाट झालेवर राजेसाहेब बिऱ्हाडीं येत. श्रावण सोमवार असल्यामुळें पूजा वगैरे सर्व आन्हिक त्या दिवशीं होत असे. तेव्हां स्नानाला पाणीसुद्धां तेथील काम करणाऱ्या युरोपियन बायांनीं शिवलेलें चालत नसे. या बायांना त्या दिवशीं घरांत बहुतेक मज्जावच असे. तेव्हां स्वतः पाणी भरून तें तापवून स्नान करावें लागे. त्या दिवशीं प्रत्येकावर स्वावलंबनाचा व श्रमविभाग पद्धतीनें स्त्रीपुरुषांनीं वागण्याचाच प्रसंग येई. डाळ, तांदूळ वगैरे पुरुषांनीं निवडून द्यावें लागे. राजेसाहेब भाजीपाला नीट करून देत असत. स्वयंपाकाची जागा लहानसरच असल्यामुळें बहुतेक ती या मंडळीनेंच भरून जाई. आठवड्यांतून एक दिवस स्वयंपाक करावयाचा व तोही या फक्त सहा माणसांचा. पण या सहा माणसांच्या स्वयंपाकाला सहाच माणसें मनापासून झटत असत. हिंदी पद्धतीचा स्वयंपाक करा-

वयाचा, ह्मणजे त्याला तशाच प्रकारच्या उपकरणांची जरूरी भासे; पण तेथें त्यांचा अभाव असल्यामुळें कशीतरी वेळ मारून न्यावी लागे. चपात्या किंवा फुलक्या करावयाच्या ह्मणजे पोळपाट लाटण्याची जरूरी भासे; पण या अमोल वस्तू विलायतला मिळत नसत. ह्मणून ताटाची मागील बाजू पोळपाटाऐवजीं केली जाई व रुळाचा उपयोग लाटण्यासारखा करण्यांत येई. अशाप्रकारें नव-नवलाचा स्वयंपाक सुरू असतां पार्थिवाची पूजा ज्याप्रमाणें डाव्या हातांत पार्थिव घेऊन करावी लागते, त्याचप्रमाणें पाट किंवा देव्हारा तेथें नसल्यामुळें राजेसाहेबांना त्यांच्या दैवताची तसबीर डाव्या हातांत घेऊनच तेथेंच दुसऱ्या बाजूला पूजा करावी लागे. सामान्यतः पूजा आटोपावयाला व स्वयंपाक सिद्ध होण्याला एकच वेळ येई. हा सर्व प्रकार सोंवळयाच्या असल्यामुळें धोतराशिवाय आंगावर दुसरें कपडे घालतां येणें शक्य नव्हतें. बायकांनाही निव्वळ हिंदी रिवाजाचाच पेहेराव करणें या वेळीं भाग पडे. जेवणाला बसावयाला पाटाऐवजीं वर्तमानपत्राचे कागद उपयोगी पडत. चांदीचीं ताटें मात्र राजेसाहेबांबरोबर होतीं. तेव्हां हें जेवण ह्मणजे खालीं बसून हिंदी पद्धतीनें जेवण्याचा योग येई. अशा पद्धतीचें जेवण ह्मणजे विलायती लोकांना एक नवलाची गोष्ट वाटे. राज-साहेब उघड्या आंगानें जमिनीवर बसून हातानें जेवावयाला बसले ह्मणजे तें पहाण्याकरितां बाहेरच्या बाजूला परिचित युरोपियन स्त्रीपुरुषांची गर्दी होई. त्या लोकांना चिमटे, चमचे, कांटे आणि टेबल खुर्ची यांवांचून हे लोक कसें जेवतात, याचें आश्चर्य वाटे. शिवाय बायकांचा अगदीं निव्वळ हिंदी पोषाखही पाहून त्यांना मोठी गंमत वाटे. ही गंमत बिन पैशानें पहावयाला मिळत असे, ह्मणून सोमवारची वाटच पहात ती सर्व मंडळी बसत.

या दिवसाचा स्वयंपाक सर्वांनाच अमृताप्रमाणें रुचकर लागे. कारण हा स्वयंपाक करण्यामध्यें प्रत्येकाचे हिस्सेराशीनें श्रम होत असत. तेव्हां तो कसाही झाला, तरी नाकें न मुरडतां प्रत्येकाला ग्रहण करावा लागे. शिवाय लंडनला गेल्यानंतर हिंदी पद्धतीचा स्वयंपाक हिंदीच पद्धतीनें केलेला त्यांना खावयास न मिळाल्यामुळें व चमचे कांटे यांनीं जेवण्याची नेहमीचीं संवय नसल्यामुळें या श्रावण सोमवारीं हातानें जेवावयाला मिळाल्यानें त्यांना तें जेवण जास्त रुचकर लागे. हा दिवसही या मंडळींचा आनंदांत जाई. कारण सकाळपासून सायंकाळपर्यंत हिंदी

रिवाज, हिंदी आचार व हिंदी विचार यांमुळें त्यांना हिंदुस्थानांत असल्या-प्रमाणेंच वाटे.

अशा प्रकारें लंडन येथील कार्यक्रमणा चालली असतां राजेसाहेब फावल्या वेळीं पॉलिटेकनिकच्या एका वर्गांत फोटो काढावयाला व सीनेमाचेंही फोटो घ्यावयाला शिकले. राजेसाहेबांनीं हिंदुस्थानाला परत निघण्यापूर्वी मँचेस्टर, ग्लासगो, एडिंबरो, केंब्रीज, ब्रिस्टल, हल वगैरे शहरांस भेट दिली. त्यांनीं प्रत्येक ठिकाणचे कारखाने गिरण्या, शाळा, कॉलेजें वगैरे सर्व पाहिलीं. अशाप्रकारें विलायतचा सुखप्रवास करून ते आक्टोबर महिन्यांत हिंदुस्थानांत परत आले.

मुंबईला येऊन सरदारगृहांत उतरल्यावर पहिल्यानें त्यांनीं सशास्त्र प्रायश्चित्त घेतलें. श्रीमंत मातोश्री राणी काशीबाईसाहेब वगैरे मंडळी त्यांच्या स्वागताकरितां मुंबईला आलीच होती. राजेसाहेब विलायतचा प्रवास करून सुखरूप आल्याबद्दल सर्वांनाच अत्यानंद झाला, हें सांगणें नकोच.

राजेसाहेब विलायतेला जाऊन परत आले. परंतु तेथून येतांना ' हंसक्षीर ' न्यायानें त्यांना जेवढें जेवढें अनुकरणीय व चांगलें दिसलें तेवढेंच मात्र ते घेऊन आले; हा त्यांत विशेष आहे. राजेसाहेबांचे नित्य जपांत या प्रवासानें बिलकुल अडथळा आला नाहीं.



# प्रकरण ९ वें.

# वेदोक्त प्रकरण.

नृपति-जन-पदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ १ ॥

—सुभाषित.

धार्मिक आणि सामाजिक कामगिरी सार्वजनिक स्वरूपानें करण्याकरतां सार्वजनिक कार्याच्या आखाड्यांत उतरणें ह्मणजे आपले शील, विद्वत्ता, अधिकार, कळकळ, चिकाटी, स्वार्थत्याग वगैरे गुण कसाला लावून घेणेंच होय; कारण राजहिताकडे प्रवृत्ति ठेवणारा मनुष्य लोकनिंदेला पात्र होऊन त्याच्या धार्मिक अगर सामाजिक कार्यावर लोकांचा विश्वास बसत नाहीं; ह्मणून त्याचें कार्य निष्फळ होतें. उलटपक्षीं केवळ लोकहित साधणारा मनुष्य राजकृपेला पारखा होतो व यामुळें लोक-कल्याण करण्याला राजा त्याला संधिच साधूं देत नाहीं, ह्मणून प्रत्यक्ष कार्य करणें त्याला असाध्य होऊन बसतें. अशा स्थितींत एकाच वेळीं राजकृपा संपादन करून लोकादराला पात्र होणारा कार्यकर्ता दुर्लभ असतो. आमचे चरित्रनायक या दुर्लभ कार्यकर्त्यांच्या कोटींतले झाले. ह्मणून ते राजमान्यतेबरोबर लोकमान्यही पण बनले. कोणतीही व्यक्ति समाजापुढें येऊन आपल्या कर्तबगारीनें नांवलौकिकाला पात्र होण्याची संधि मिळावयाला 'कार्यकारणभावाची' जरूरीही लागतेच. आणि तें कारण ज्या वेळीं प्रत्यक्ष आपल्यावर आव्हान करून येतें, त्या वेळीं इतर कोणतींही महत्वाचीं कामें बाजूला सारून त्याला तोंड हें द्यावेंच लागतें. 'धर्म' हा एक असा विषय आहे कीं, तो क्षत्रियांच्या जिव्हाळीं तत्काल लागतो. असा धर्मविषयक भानगडीचा प्रसंग नागपूर येथें इ. स. १९२१ सालीं उद्भवला. त्यामुळें राजेसाहेबांना आपल्या इस्टेटीचे वगैरे सर्व व्यवहार बाजूला ठेवून सार्वजनिक कार्याच्या आखाड्यांत पाऊल टाकावें लागलें.

इ० स० १९२१ च्या डिसेंबर महिन्यांत नागपूर मुक्कामीं श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्य ( डॉ० कुर्तकोटी ) यांचे अध्यक्षतेखालीं महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषद भरली. तिचेपूर्वी थोडेच दिवस तेथील ब्रह्मवृंदाचे पुढारी वे० शा० सं० कृष्णशास्त्री तेलंग यांनीं क्षत्रिय वैश्यांच्या अभावाविषयीं तेथील “ महाराष्ट्र ” या साप्ताहिक पत्रांत एक लेख प्रसिद्ध केला. या लेखाच्या आधाराची सर्व मदार ‘ शूद्रकमलाकरां ’ तील ‘ कलावाद्यंतयोः स्थितिः ’ या वचनावर होती. कलि-युगांत क्षत्रिय आणि वैश्य हे दोन वर्ण अस्तित्वांत नसून फक्त ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच अस्तित्वांत आहेत, हें सिद्ध करून दाखविण्याचा फक्त त्यांनीं प्रयत्न केला होता. या लेखानें परिषदेच्या कार्यांत बरींच विघ्नें उत्पन्न झालीं. ‘ महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषद ’ ही चातुर्वण्य मानणारी आहे, अशी पूर्वीच्या अधिवेशनावरून नागपूरच्या कांहीं शास्त्री मंडळींची समजूत झाली होती. तेव्हां चातुर्वण्य मानणाऱ्या हिंदुधर्म परिषदेस अर्थात आपली मान्यता नाहीं, हें दर्शविण्याकरितांच तेलंग शास्त्र्यांनीं हा वाद उपस्थित केला असावा असें दिसतें. कारण श्री. शंकराचार्य ( डॉ० कुर्तकोटी ) हे परिषदेचे अध्यक्ष होते. हे धार्मिक व सामाजिक बाबतींत उदार मतवादी. ते हिंदुधर्म परिषदेच्या नांवाखालीं जुन्या मतांना व रूढींना धाब्यावर बसवून भलतींच मतें व रूढी समाजांत चालू करण्याचा प्रयत्न करतील आणि त्यामुळें समाजाची आज असलेली घडी बिघडेल, असें त्यांना वाटणें, हें त्या वेळेच्या सामाजिक परिस्थितीच्या दृष्टीनें एकपक्षी बरोबरही होतें.

याचें कारण असें कीं, महाराष्ट्रांत त्या वेळीं ब्राह्मणेतर पक्षाला जोर चढूं लागला होता. त्या पक्षांत सत्यशोधकी मतांचा पूर्णपणें संचार झाल्यामुळें ब्राह्मणेतर ह्मणवून घेणाऱ्यांना ब्राह्मण मात्र शत्रूप्रमाणें वाटूं लागला होता. शिवाय या ब्राह्मणेतर पक्षाला कोल्हापूरच्या महाराजा छत्रपतींचें पाठबळ. डॉ. कुर्तकोटी धार्मिक आणि सामाजिक बाबतींत उदारमतवादी; ह्मणूनच त्यांना छत्रपतींनीं करवीर मठाचें शंकराचार्य केलें. पण त्या उभयतांचें न पटल्यामुळें डॉ. कुर्तकोटी यांना कोल्हापूरला रामराम ठोकावा लागला. त्यावर लगेच छत्रपतींनीं एका अभिनव क्षात्र जगद्गुरुपीठाची प्राणप्रतिष्ठा करून त्यावर अर्थातच एका मराठ्याला बसविलें. ह्मणजे ब्राह्मणांकडील धर्मशास्त्र हिरावून घेतलें. ब्राह्मणांना कस्पटप्राय करण्याचा छत्रपतींचा असा प्रयत्न सत्तेच्या जोरावर चालला असतां, त्याला सहाय्यभूत होणा-

रेंच सत्यशोधकी तमाशे निघून भर समाजांत ब्राह्मणांची सर्रास निंदा होऊं लागली. या एकंदर प्रकारानें तेलंग शास्त्र्यांचें मस्तक भणाणून गेलें असल्यास नवल नाहीं. वस्तुतः कोल्हापूरचे छत्रपति भोंसले राजे स्वतः क्षत्रीय पण ते आपण ' ब्राह्मणेतर ' आहों, असें सरसकट प्रतिपादूं लागले. त्यामुळें हिंदु धर्माचें चातुर्वर्ण्य स्वरूप नष्ट झाल्याचें दाखवून त्या ऐवजीं तें ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे द्विवर्णात्मकच असल्याचें सिद्ध करण्याच्या भरीला तेलंगशास्त्री पडले असावें या आपल्या विचार-सरणीला अनुसरून आतां खऱ्या कलियुगाला खात्रीनें प्रारंभ झाला व ' शूद्र-कमलाकरां ' त " कलावाद्यंतयोः स्थितिः " असें ह्मटलेलें सप्रमाण ठरतें असें तेलंग शास्त्र्यांना वाटलें असावें.

अशा मनःस्थितींत धर्मपुस्तकाचा आधार, महाराष्ट्रांतील समाजांची परिस्थिति व नागपूरची धर्मपरिषद या त्रिवेणी संगमाचा योग आला असतां, त्या पर्वाचा तेलंग शास्त्र्यांसारखे पंडीत लाभ घेतल्याशिवाय कसे रहाणार ! शिवाय, ते नागपूरचे पुढारी शास्त्री, तेव्हां त्यांच्या नगरांत धर्मपरिषद होऊन तींत पुराणमत–सिद्धतेचा वाद उत्पन्न केला नाहीं, तर धर्म–ग्रंथ वाचलेल्याचा काय उपयोग ? प्रसंगींच आपले विचार समाजांत प्रकट करणें बरें, असें वाटून त्यांनीं आपला विद्वत्ताप्रचुर असा लेख प्रसिद्ध केला होता. परंतु त्या लेखामुळें समाजांत काय खळबळ होईल, याचा मात्र विचार शास्त्रीबुवांनीं केला नव्हता. हा लेख कोल्हापुरच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला असतां, तर कदाचित् तेथील सोंवळ्या ब्राह्मणांना त्यापासून आनंदाच्या गुदगुल्या झाल्या असत्या व तेथील ब्राह्मणेतर समाजाला त्याचा कदाचित् विधिनिषेधहि वाटला नसता. पण, तें पडलें नागपूर. कोल्हापूरचे भोंसले छत्रपति ब्राह्मणेतरपक्षाभिमानी किंवा ब्राह्मणेतर पक्षाचे जनक होते. पण नागपूरचे राजे, भोंसले असले तरी, ब्राह्मणेतर पक्षाची त्यांनीं दीक्षा घेतली नव्हती. त्यांनीं आपल्या क्षत्रिय वर्णाचा त्याग केला नसून परंपरागत क्षत्रिय-बाणा त्यांनीं जीवंत ठेविला होता, हें शास्त्रीबुवांच्या लक्षांत त्या वेळीं यावयास पाहिजे होतें. शिवाय शास्त्रीबुवांचें राजपुतान्याकडे पर्यटन झालें नसल्यामुळें व शास्त्री-मंडळींना इतिहासभूगोलाची आवश्यकता वाटत नसल्यामुळें श्रीरामचंद्रानंतर हिंदु-स्थानांत कोणतीं क्षत्रीय राजघराणीं अवशेष राहिलीं आहेत, याचा विचार करण्याची त्यांना जरूरीच राहिली नव्हती. राजपुतान्यांत अनेक क्षत्रीय राजघराणीं आज-

मितीला नांदत आहेत. त्यांत उदेपूरचे राणाजी मेरुमणि आहेत, याची कल्पना शास्त्रीबुवांना कोठून असणार ? आणि त्यांच्या 'शूद्र कमलाकर' धर्मग्रंथांत या क्षत्रीय राणाजींची तरी यादी कोठून सांपडणार ? कसेंही असो. शास्त्रीबुवांच्या लेखामुळें धर्मपरिषदेच्या कार्यवृक्षावर ' मुले कुठारः ' असा आघात झाला व तो अध्यक्षांना निस्तरतांना नाकीं नऊ आले. नागपूरच्या क्षत्रिय मराठा मंडळींत शास्त्रीबुवांच्या लेखामुळें बरीच गडबड माजली व या लेखाला आपण कोणत्या कृतीनें प्रत्युत्तर द्यावें, याचा त्यांच्यांत विचारविनिमय सुरू झाला. पण या प्रकरणाचा धर्मपरिषदेंत काय निर्णय होतो, तो पाहून पुढें कार्याला लागावें असा राजेसाहेबांचा विचार ठरला.

परिषदेचें काम सुरू झाल्यानंतर शास्त्रीबुवांनीं उपस्थित केलेला वाद परिषदे-पुढें मांडण्याकरितां अध्यक्षांनीं त्यांना बोलावूं पाठविलें. परंतु परिषदेंत हा वाद मांडण्यास तेलंगशास्त्री तयार झाले नाहींत. त्यांच्या कांहीं अनुयायी शास्त्र्यांना सभेंत येण्याचें धैर्य झालें नाहीं. हा नसता वाद कोठून उपस्थित केला, असें त्यांना झालें. शेवटीं धर्मसभेंत कलियुगांतही क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व आहे, असें इतर धर्मग्रंथांच्या आधारानें ठरवून त्याप्रमाणें अध्यक्षांनीं तसा निर्णयही दिला. तो येणेप्रमाणेः—

## कलियुगांत क्षत्रिय व वैश्य वर्ण आहेत कीं नाहींत ?

येथें (नागपुरीं) हा वाद वे. शा. सं. तैलंगशास्त्री यांच्या लेखामुळें उपस्थित झाला. वस्तुतः कलियुगांत चारही वर्ण आहेत, असें आजपर्यंत सर्व लोक मानीत आले आहेत. आद्य श्रीशंकराचार्यांनींही जी धर्माची गादी स्थापन केली, ती कलियुगांतच केली. " चातुर्वर्ण्यशिष्यवृंदास उपदेश करण्यासाठीं " असें संचाराच्या वेळीं आज्ञापत्रांत लिहिण्याची पद्धति आजपर्यंत चालत आलेली आहे. आद्य शंकराचार्यांनींही गीताभाष्यादि अनेक ग्रंथांत चारही वर्णांचा उल्लेख स्पष्ट केला आहे. क्षत्रिय, वैश्य जर कलियुगांत नसते, तर " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं, " " ब्राह्मणक्षत्रियविशां " इत्यादि भगवद्गीतेच्या श्लोकांच्या भाष्यांत त्यांनीं तसा उल्लेख स्पष्ट केला असता. पण तसा उल्लेख नाहीं. ब्रह्मसूत्र अध्याय १ पाद ३ सूत्र

३३. " भावं तु बादरायणोऽस्तिहि " या सूत्राच्या भाष्यांत त्यांनीं दृष्टांतादाखल इतकेंच ह्मटलें आहे कीं, आतां सार्वभौम क्षत्रिय नाहींत. क्षत्रिय व वैश्य मुळींच नाहींत असें ह्मटलें नाहीं. " कलौ पाराशराः स्मृताः " या वचनाप्रमाणें कलियुगांत प्रमाणभूत पाराशरस्मृति वचनः—

॥ युगे युगे च ये धर्मास्तत्र तत्र च ये द्विजाः ।
॥ तेषां निंदा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः ॥

यांत द्विज शब्दाचा उल्लेख केला आहे. द्विज शब्दांत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीनहि वर्ण येतात. आजदेखील हरिद्वार येथें प्राचीन पद्धतीनें चालणाऱ्या ऋषिकुलांत तीनही वर्णांच्या विद्यार्थ्यांना वेदाध्ययन करवितात, हें प्रत्यक्षच आहे. अशा परिस्थितींत पूर्वापार प्रकरणांचा संबंध न दर्शवितां एक दोन वाक्यांच्या आधारावर तसें लिहिण्यांत वे० शा० सं० तैलंगशास्त्री यांचा काय अभिप्राय होता हें समजलें नाहीं. हा अभिप्राय स्पष्ट करण्याकरितां धर्मपरिषदेच्या वेळीं शास्त्रीमंडळीसमक्ष तैलंगशास्त्री यांना बोलाविलें; पण ते आले नाहींत. बहुतेक शास्त्रीमंडळीचें मत " कलियुगांत क्षत्रिय व वैश्य आहेत, " असेंच पडलें.

यावरून आजला येथें उपस्थित झालेला वाद निरर्थक आहे, असें आमचें मत आहे. वरील पाराशर उक्तींत " तेषां निंदा न कर्तव्या " असें सांगितल्याप्रमाणें हा वाद या वेळीं उपस्थित व्हावयास नको व कोणी कोणाची निंदा करूं नये. "

## कोल्हापूर व नागपूर.

नागपूरची हिंदुधर्म परिषद आटोपली. परिषदेनें क्षत्रिय व वैश्य या वर्णाचें अस्तित्व कबूल केलें, तरी त्यामुळें नागपुरांतील तेलंगशास्त्री वगैरे मंडळींचें डोकें यावें तेवढें ठिकाणावर आलें नाहीं. ' सुंभ जळतें पण पीळ जळत नाहीं, ' अशी त्यांची स्थिति झाली होती. त्यांनीं आपल्या या वेडाच्या लहरी भिक्षुक लोकांत

फैलावण्याचें कार्य चालूच ठेवलें होतें. परिषदेनें क्षत्रियांचें अस्तित्व कबूल केल्या-मुळें राजेसाहेबांना सार्वजनिक दृष्ट्या कोणतेंच कार्य करण्याची जरूरी नव्हती. पण ग्रामस्थ शास्त्री व भिक्षुक मंडळीचा कल अद्यापि तेलंग शास्त्र्यांकडेच असल्याचें हें त्यांना पदोपदीं अनुभवाला येतच होतें. ही ब्रह्मवृंदांची तऱ्हा पाहून कांहीं तरुण क्षत्रिय मराठ्यांना त्यांचा राग येई व ते राजेसाहेबांना ह्मणत कीं, "आपण या ब्राह्मणांना डोक्यावर चढवून ठेवलें, त्याचें हें फळ होय. कोल्हापूर दरबारानें या ब्राह्मणांची खोड मोडली, तसा आपणही प्रयत्न केला पाहिजे. ब्राह्मणांशिवाय कोल्हापूर दरबारचें काय चालत नाहीं ? त्यांचा एवढा मोठा संस्थानी पसारा असतां ते ब्राह्मणांशिवाय आपलीं कामें निभावूं शकतात. त्यांच्या दृष्टीनें आपलें तर कांहींच नाहीं, मग आपण इतकी त्यांची पर्वा कां करतां ?" यावर राजेसाहेब त्यांचें मोठ्या शांतपणें समाधान करीत. ते ह्मणत, "तुह्मी ह्मणतां हें खरें; पण हें तुमचें तत्त्व हिंदुधर्म फोडण्याचें दृष्टीनें बरोबर आहे. आपण क्षत्रिय आहोंत. आपला धर्म हिंदुधर्म फोडण्याचा नसून तो फुटत असल्यास जोडण्याचा आहे. हिंदुधर्माचा आत्मा ह्मणजे 'वेद' आहेत. आणि सध्यांचे स्थितींत हे वेद ब्राह्मणांचे मुखीं आहेत. सध्यां वेदांच्या पोथ्या निर्माण झाल्या आहेत, तरी वेदांची मोडणीच अशी आहे कीं, ते गुरुमुखानेंच शिकावे लागतात. नुसतीं अक्षरें वाचून वेदपठण होत नाहीं. शिवाय सध्यांच्या काळांत ब्राह्मणवर्गांत हजारी एक-देखील जटाघनपाठी मिळणें कठीण झालें आहे. अशाच पद्धतीनें जर कांहीं काळ गेला, तर वेद जीवंत राहतील किंवा नाहीं, याची वानवा दिसते. **वेद जीवंत ठेवणें असेल, तर ब्राह्मणांचें रक्षण केलें पाहिजे.** त्यांना दूर करतां उपयोगाचें नाहीं. आणि वेद जीवंत राहिले, तरच हिंदुधर्म जीवंत राहिला, असें मानतां येईल. तेव्हां हा हिंदुधर्माचा संबंध ब्राह्मणांशीं पूर्ण गुंतागुंतीचा असल्यामुळें आपणाला कोल्हापूर दरबारचा कित्ता गिरवितां येत नाहीं. शिवाय, सामाजिक दृष्टीनें विचार केला, तर जवळच्या वर्णाला दूर लोटून दूरच्या वर्णाला जवळ घेण्यांत पुरुषार्थ तो कोणता ? जवळ असलेल्या लोकांना दूर न ढकलतां दूरच्यांना जवळ घेण्याचा प्रयत्न करून तो साध्य करून दाखविणें, हेंच थोर कृत्य आहे. आतां वर्णाश्रम धर्माप्रमाणें जे लोक आपलें कर्तव्य करीत नसतील, त्यांना तें करावयाला लावणें, हें क्षत्रियांचें पुण्यकर्तव्य आहे. आणि तें कर्तव्य त्यांनीं बजावणें ह्मणजे आपलें अस्तित्व जगाला

पटवून देण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, आपल्या घरांत आपली बायको स्वयंपाक करीत नाहीं असें ह्मणाली, तर तिला घालवून देऊन दुसरी बायको आणणें किंवा स्वतः स्वयंपाक करून आपण जेवणें, यांत पुरुषार्थ नाहीं. ज्याचें जें कर्तव्य असेल तें त्याचेकडून करवून घेणें, हें पुरुषार्थाचें लक्षण आहे. ब्राह्मण आपलेकडे वेदोक्त कर्म करीत नाहीं, असें ह्मणाले, तर आपले अस्तित्व त्यांना दाखवून त्यांचें काम त्यांचेचकडून करून घेणें हेंच न्यायाचें होईल. या कामीं साम, दाम, दंड, भेद ही राजनीति उपयोगांत आणावी लागली, तरी तो आपला धर्मच आहे. तेव्हां आपण ब्रह्मवृंदांच्या निष्फळ वादाकडे लक्ष देत न बसतां, आपलें कर्तव्य करीत राहिलें पाहिजे. वादानें कलह उत्पन्न होतो. कलहानें रणें माजतात. रणांनीं द्वेषबुद्धि दृढ राहते. तरी तसें न करतां प्रत्येकाला कर्तव्यतत्पर करीत राहण्याचा आपण प्रयत्न करावा. आपल्या चुका ब्राह्मणांनीं दाखविल्या तर त्या आपण सुधारण्याचा प्रयत्न करावा. ” वगैरे भाषणानें ते त्या तरुण क्षत्रिय मंडळीचें समाधान करीत व त्यांचा राग शांत करीत.

अशा प्रकारें राजसाहेब आपल्या क्षत्रिय मराठा समाजांतील मंडळीचें समाधान करीत, तरी प्रत्यक्ष जोंपर्यंत ब्राह्मण आपले घरीं येऊन वेदोक्त कृत्य करीत नाहींत, तोंपर्यंत तें समाधान त्यांना अळवावरच्या पाण्याप्रमाणें क्षणभंगुर वाटे. तेव्हां क्षत्रियांचें अस्तित्व ब्रह्मवृंदानें प्रत्यक्ष कृतीनें मान्य करून दाखविल्याशिवाय आपल्या समाजांतील मंडळींना विश्वास पटणार नाहीं. ह्मणून त्यांनीं विधायक कार्य करण्याचें ठरविलें.

## श्रीमज्जगद्गुरु व क्षत्रियत्व

राजसाहेबांनीं आपल्या वडील मुलाचें उपनयन करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं नागपुरांतील शास्त्री, पंडीत, याज्ञिक, भिक्षुक वगैरे मंडळींना निमंत्रण करून बोलाविलें. त्या वेळीं राजसाहेबांनीं सर्वांना नम्रतापूर्वक आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या व्रतबंधाकरितां आपल्याशीं सहकार्य करावें, अशी विनंती केली.

त्या वेळीं कांहीं शास्त्री मंडळींनीं ‘ आपण मुलाचा जो व्रतबंध करणार, तो वेदोक्त कीं पुराणोक्त, ’ असा सवाल केला.

कांहीं भिक्षुक मंडळी ह्मणाली कीं, ' राजेसाहेब जर मुलाचा व्रतबंध पुराणोक्त करीत असतील, तर आपण सर्वजण त्या कार्यात त्यांच्याबरोबर सहकार्य करावयाला तयार आहोंत. आणि त्यांचा असा आग्रह असेल कीं आपण वेदोक्तच उपनयन करणार तर आह्मी कोणीही त्या प्रसंगीं येणार नाहीं; राजेसाहेबांनीं आपलें आपण पाहून घ्यावें. ' राजसाहेब यावर ह्मणाले कीं, लग्नकार्य किंवा उपनयन वगैरे जे धार्मिक विधी आहेत, ते आपणां सर्वांच्या सहकार्यावरच अवलंबून आहेत. हे धार्मिक विधी आपल्याच हातून झाले पाहिजेत. या धार्मिक विधींचें जर आह्मांला ज्ञान असतें, तर आपल्या सारख्यांना मीं येथें येण्याची तसदीच दिली नसती. आमच्या कुलपरंपरेला अनुसरून मुलाचा व्रतबंध होणें उचित आहे. तुमचें वेदोक्त किंवा पुराणोक्त हें मला कांहीं समजत नाहीं. आपण उपनयनाच्या बाबतींत सर्वांनीं सहकार्य करावें, एवढीच माझी इच्छा आहे. आपण कार्याला रुकार दिला ह्मणजे कार्याला सुरवात करावयाला ठीक पडेल. '

नंतर कांहीं शास्त्री व भिक्षुक मंडळी ह्मणाली कीं, 'आह्मी सर्वजण पुराणोक्त व्रतबंध करण्याला तयार आहोंत. आपण बेलाशक पुढील कार्याला लागावें. '

राजेसाहेब पुनः ह्मणाले, ' आपण सर्वजण मीं आरंभिलेल्या उपनयनाच्या कार्याला मदत करायला तयार आहांत हें पाहून मला आनंद होतो. पण **उपनयन हा संस्कार पुराणोक्त पद्धतीनें कोणत्या धर्मग्रंथाच्या आधारें केला जातो, याबद्दल शास्त्री मंडळींनीं आह्मांला सुचविलें तर बरें होईल.** ' या राजेसाहेबांच्या प्रश्नाबरोबर सर्व शास्त्री व भिक्षुक खडबडून जागे झाले.

एका शास्त्र्यांनीं ह्मटलें, ' **उपनयन हा संस्कार मुळीं पुराणोक्त नाहींच; तो वेदोक्तच आहे.** कांहीं भिक्षुक मंडळी केवळ द्रव्याच्या लालसेनें आणि लोकांच्या वेदासंबंधींच्या अज्ञानामुळें कांहीं तरी पुराणोक्त मंत्र ह्मणून उपनयन केल्याचें दाखवितात; पण त्याला धर्मशास्त्राचा आधार नाहीं. पुराणोक्त व्रतबंध करणें ह्मणजे धर्माची आणि लोकांची निव्वळ फसवणुक आहे. '

या भाषणानें भिक्षुकांचें धाबें दणाणलें. तेव्हां राजेसाहेब ह्मणाले, ' मला कोणालाही दोष द्यावयाचा नाहीं. उलट मी स्वतः फसवून घेण्याचीही इच्छा ठेवीत नाहीं. माझ्या येथील कार्य पूर्वपरंपरेला धरून झालें पाहिजे. आणि तें

शुद्ध धार्मिक पद्धतीनेंच व्हावें, अशी माझी इच्छा आहे. हें विसावें शतक आहे. या दिवसांत पूर्वीसारखे अज्ञानी लोक राहिले नाहींत. तेव्हां मला किंवा आपल्या पवित्र हिंदुधर्माला न फसवितां आपण सांगितल्याप्रमाणें माझ्या मुलाच्या व्रतबंधाच्या कार्याला मदत करा, ह्मणजे झालें.'

तेव्हां एक प्रमुख शास्त्री ह्मणाले कीं, 'आम्ही सर्वजण विचार करून काय तें आपणाला दोन चार दिवसांत कळवितों. आम्हांला आणखी कांहीं मंडळींचा विचार घेतला पाहिजे. तेव्हां विचाराकरितां आपण सवड दिली, ह्मणजे आपणाला निश्चित मत देण्याला बरें पडेल.'

वैदिक मंडळी कालहरण करणार असें पाहून राजेसाहेब म्हणाले, 'आपला विचार आपण करा, पण यंदां मला मुलाचा व्रतबंध हा केलाच पाहिजे आपण ब्राम्हण मंडळी आहांत. आपलें काम, आमच्या जातीच्या लोकांनीं हातीं घ्यावें, या मताचा मी नाहीं. तुमचें ब्राम्हणांचें काम तुम्हींच केलें पाहिजे. कलियुगांत क्षत्रिय नाहींत, म्हणून त्यांचें घरीं वेदोक्त कर्में करण्याचा तुम्हांला अधिकार पोंचत नाहीं,' असें आमच्या बाबतींत तुम्हांला म्हणतां येणार नाहीं. आमचे घराण्यांत वेदोक्त पद्धतच चालत आली आहे. त्याचा तोंडी पुरावा येथिल शास्त्री, वैदिक मंडळींपैकीं कांहीं जण आपणाला देतीलच. पण लेखीही पुरावा आमचेजवळ पुष्कळ आहे. शृंगेरीमठाचें श्रीमज्जगद्गुरु श्रीनृसिंह भारती स्वामी यांचें इ. स. १८७३ सालीं नागपुरीं आगमन झालें असतां आमचे तीर्थरूपांनीं त्यांची वेदोक्त पाद्यपूजा केली. त्या वेळीं आमचे तीर्थरूपांचें नांवचें 'श्रीमुख' श्रीशंकराचार्य यांनीं दिलेलें आहे. तेंही आपण सर्वांनीं एकदां पाहून घ्यावें.' असें म्हणून तें 'श्रीमुख' राजेसाहेबांनीं सर्वांस वाचना-करितां दिलें. तें पुढें दिल्याप्रमाणें:—

# श्रीमज्जगद्गुरूंनीं दिलेलें श्रीमुख.

श्री

| |
|---|
| ˇ श्री० |
| श्री श्रींगेरी |
| जग्दगुरु |

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारावारपारिणयमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणसमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्याख्यानसिंव्हासनाधीश्वरसकळनिगमागमसारहृदयसांख्यत्रयप्रदिपादकवैदिकमार्गप्रवर्तकसर्वतंत्रस्वतंत्रादिराजधानीविद्यानगरमहाराजधानीकर्नाटकसिंव्हासनप्रतिष्ठापनाचार्यश्रीमद्राजाधिराजगुरुमंडलाचार्यऋष्यश्रृंगपुरवराधीश्वरतुंगभद्रातीरवासश्रीमद्विद्याशंकरपादपद्मराधकश्रीमदभिनवसच्चिदानंदभारतीस्वामीगुरुकरकमलसंजातश्रृंगेरीश्रीनृसिंव्हभारतीस्वामिभिः

श्रीमद्रमारमणपदचर्यापरायणसकलधर्मपरिपालनैकधुरिणअखंडितलक्ष्मीऐश्वर्यनिवासाधीष्टाननागपूरवास्तव्यराजधानीक्षात्रकुलावतंस श्री देव ब्राह्मण सेवातत्पर राजे जानोजी साहेब भोंसले यांसि श्रेयोभिवृद्धये अनेक आशिषाः समुल्लसतुंतराम् ।

| |
|---|
| ˇ श्री० |
| श्री श्रींगेरी |
| जग्दगुरु |

श्रीमठाकडून धर्मस्थापना विचारणापूर्वक देशसंचार करीत या नागपूर मुक्कामास स्वारी येणें जाले. या समई तुह्मी अपले सर्व राजचिन्ह गजाश्वादि सर्व लवाजमा सहित येउन विशेष समारंभें करून यथा मर्यादानुसार ग्रामाद्वहि: भेट घेउन सत्कारपूर्वक स्वारी आणून उत्तम रीतीचे कालानुसार श्रीपाद पूजा सेवा केली ती श्रीमहासंस्थानाचे पूजादि उपयोग जाले याप्रमाणें उत्तरोत्तर सेवासत्कार करित तुमचे वंशपरंपरा सुखरूप असावें इश्वर चरणारविंदिं आचरण भक्तिपूर्वक करणें पाहुन बहुत संतोष जाला. मिति शके १७९५ श्रीमुखनामसंवत्सरे श्रावण वद्य १० दशमी रविवासरे स्वारी मुक्काम नागपूर.

श्री०
श्री श्रींगेरी
जग्दगुरु.

हें ' श्रीमुख ' सर्वांनीं नीट वाचून पाहिल्यानंतर राजेसाहेब ह्मणाले कीं, ' आमच्या क्षात्रत्वाबद्दल आपणाला कोठेंच हरकत घेतां येणार नाहीं. पण माझ्या मुलाच्या व्रतबंधाबरोबर मी माझ्या ज्ञातीच्या पांच दहा मुलांचेही व्रतबंध करणार आहें. आणि तेही आमच्याप्रमाणेंच वेदोक्त पद्धतीनेंच झालें पाहिजेत. तेव्हां त्यांचेंबद्दलही आपण विचार करावा. '

तेव्हां त्या मंडळींत विचार होऊन राजेसाहेबांना असें उत्तर मिळालें कीं, ' आपणांजवळ शृंगेरी मठाकडून मिळालेलें ' श्रीमुख ' आहेच. तेव्हां आपण त्या मठाकडून येथील धर्माधिकारी यांचे नांवें आज्ञापत्र आणून दिल्यास आम्ही सर्व मंडळी येथील क्षत्रिय मराठ्यांकडे वेदोक्त कर्म करण्यास तयार आहोंत. ' हें उत्तर आलेनंतर त्याप्रमाणें आज्ञापत्र आणण्याकरतां राजे साहेबांचे खासगी कारभारी



प्रायश्चिता नंतर नागपुरांतील मराठा क्षत्रिय मंडळ.

[K P.Z. P, B]

पृष्ठ २१२-२१३.



मध्यभागां श्री कु. प्रतापसिंह.

पृष्ठ २१०–२१३

[k.p.z.p b ]

श्रीयुत वासुदेव शास्त्री संगमकर, श्रीयुत प्रयागदत्तजी पंडीत व श्रीयुत पांडुरंग गोपाळ रानडे यांस शृंगेरीस पाठविण्यांत आले.

## पाठकशास्त्री व वेदोक्त उपनयन.

ही मंडळी शृंगेरीस रवाना झाल्यानंतर थोड्याच दिवसांत नागपूरच्या ब्रह्मवृंदांत दोन तट उत्पन्न झाले. क्षत्रियांचें अस्तित्व न मानणारा तेलंग शास्त्र्यांचा एक पक्ष व क्षत्रियांचें अस्तित्व मानणारा वे० शा० सं० जनार्दनभट्ट पाठक शास्त्र्याचा दुसरा पक्ष. जनार्दनभट्ट पाठक हे नागपुरांत मोठे प्रतिष्ठित व विद्वान याज्ञिक होते. ते मोठे तेजस्वी असून आपल्या विद्येंत कोणाला हात धरूं देत नसत. त्यांच्यासारखा जटा, घनपाठी ब्राम्हण नागपुरांत विरळाच होता. त्यांचा स्वभाव, त्यांचा आंगलोट, त्यांची विद्वत्ता पाहून कांहीं मंडळी त्यांना विनोदानें गागाभट्ट म्हणत. कलियुगांत क्षत्रियांचें अस्तित्व आहे, असें मानणारे ते आहेत, हें राजेसाहेबांना समजल्यावर त्यांनीं त्यांना राजवाड्यांत बोलावून घेतलें व मुलाच्या उपनयनाच्या पुरोहितत्वाची सुपारी स्वीकारण्यास त्यांना विनंति केली. त्यांनीं ती मान्य केली. परंतु राजेसाहेबांचे ज्ञातिबांधवांचे मुलांच्या उपनयनाबद्दल त्यांनीं अशीच तक्रार केली कीं, ‘ त्या मंडळींचा कित्येक दिवसांपासून कर्मलोप झाला आहे. तेव्हां ती मंडळी कर्मलोपाबद्दल जर प्रायश्चित्त घेण्यास तयार असतील तर आम्ही वेदोक्त पद्धतीनें उपनयन संस्कार करतों.’ राजेसाहेबांस हें म्हणणें पटलें व आपण सर्वच प्रायश्चित्त घेण्यास तयार आहोंत, असें त्यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें ठरून वे० शा० सं० जनार्दनभट्ट पाठक शास्त्री व वे० शा० सं० पंडीत रेवाशंकर यांनीं पुरोहितत्वाची सुपारी स्वीकारिली.

ही सुपारी स्वीकारल्यानंतर शृंगेरीच्या मठाकडून नागपूरच्या धर्माधिकाऱ्यांना आज्ञापत्र आणण्याची जरूरी राहिली नाहीं. आपला कार्यभाग झाला म्हणून शृंगेरीस राजसाहेबांनीं तार देऊन श्रीयुत संगमकरशास्त्री वगैरे मंडळींस परत बोलावून घेतलें. शृंगेरीस ही मंडळी ता. २६ जानेवारी सन १९२३ इ. रोजीं पोंचली. पण त्या वेळीं श्रीशंकराचार्य हे आजारी असल्यामुळें त्यांची व त्या मंडळींची राजेसाहेबांची तार पोंचेतोंपर्यंत भेट झाली नव्हती. तेव्हां तारेप्रमाणें ती मंडळी शृंगेरीहून नागपुरीं निघून आली.

तारीख २६ फेब्रुवारी सन १९२३ इसवी रोजीं राजेसाहेब यांचे ज्येष्ठ पुत्र कुंवर प्रतापसिंह यांचा उपनयनविधि यथासांग, यथापद्धति वेदोक्तविधीनें विद्वान, प्रतिष्ठित अशा ब्राम्हण याज्ञिकांनीं केला. त्यांचेबरोबर आणखी सात मराठा क्षत्रिय मुलांचींही उपनयनें वेदोक्त पद्धतीनेंच यथासांग झालीं. काशी, प्रयाग, पंढरपूर, नाशीक वगैरे ठिकाणचे क्षेत्रोपाध्येही हजर होते. गांवचे व परगांवचे भिक्षुक ब्राम्हणही बरेच आले होते. राजघराण्याला अनुसरून हा उपनयन-समारंभ मोठ्या थाटाचा व उत्साहाचा असा पार पडला.

## बृहन्महाराष्ट्राची मुक्तकंठ सहानुभूति.

या वेदोक्त उपनयन समारंभाबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या वृत्तपत्रांतून राजेसाहेबांचें अभिनंदन करण्यांत आलें. त्याचप्रमाणें ठिकठिकाणांहून कित्येक अभिनंदनपर पत्रें, तारा, वगैरे आल्या. एकंदरींत बरेच दिवसपर्यंत बृहन्महाराष्ट्रांत या वेदोक्त उपनयनाचीच चर्चा होत असलेली दिसून येत होती. नागपुरांत तर सर्वांमुखीं हा एकच विषय कित्येक दिवसपर्यंत होता. कांहीं वृत्तपत्रांतील उतारे आणि डॉ मुंजे यांचें पत्र या खालीं दिलें आहे. त्यावरून बृहन्महाराष्ट्रानें ब्राम्हणांकरवींच झालेल्या या वेदोक्त उपनयनाकडे किती सहानुभूतीनें पाहिलें, हें समजून येईल.

## नागपूर,-‘ महाराष्ट्र ’ तारीख २८ फेब्रुवारी सन १९२३ इ.

नागपूरच्या भोंसले घराण्यांतील श्रीमंत लक्ष्मणराव राजेसाहेब यांचे चि० कुमार प्रतापसिंह महाराज यांचा व्रतबंध गेल्या सोमवारीं मोठ्या थाटानें व वेदोक्त विधीनें वे० शा० सं० जनार्दन भट्ट पाठक व पं. रेवाशंकर वगैरे उपाध्यायाकडून करविण्यांत आला, हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो. महाराष्ट्रांतील अस्सल मराठा जात हीं चातुर्वर्ण्यांतील क्षत्रियच होत, हें आतां निःसंशय ठरलें आहे. यासंबंधीं विद्वद्वर्य श्री० चिंतामण रावजी वैद्य यांनीं आपला अभिप्राय सप्रमाण ‘ केसरी ’ च्या गेल्या १३ फेब्रुवारीच्या अंकांत प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या ‘ मध्ययुगीन भारता ’ च्या दुसऱ्या भागांतही त्यांनीं हीच गोष्ट सिद्ध केली आहे. (परिशिष्ट ५ वें पहा ) त्यांतही भोंसले घराण्यासंबंधीं तर वादच नाहीं. शिवाजी राजांच्या

वेळेपासून त्यांच्या घराण्यांत वेदोक्त संस्कार होत आले आहेत. येथील श्री. रघूजीराव राजेसाहेब यांचीही मुंज वेदोक्त पद्धतीनें झाली. असें आम्हांस समजतें. मध्यंतरीं केव्हां केव्हां संस्कारलोप झालाच असेल, तर त्या दोषाच्या निवारणार्थ श्री. लक्ष्मणराव राजेसाहेबांनीं परवां प्रायश्चित्त विधि करवून घेतला, हेंही आमच्या वाचकांस माहीत आहेच. देशांतील क्षत्रियांनीं आपल्या कुळाची व वर्णाची जाणीव आणि अभिमान बाळगून आपले संस्कार पूर्ववत् यथाविधि करवून घेण्याचा उपक्रम केला तर त्यामुळें सर्व चातुर्वण्याभिमानी हिंदूंस आनंद व अभिमानच वाटला पाहिजे. ह्मणून आह्मी राजसाहेबांचें प्रेमपूर्वक अभिनंदन करितों.

## पुणें, ' केसरी '– ता० १३ मार्च सन १९२३ इ.

नागपूरचे श्रीमंत लक्ष्मणराव राजेसाहेब यांचे चिरंजीव प्रतापसिंह यांचा व्रतबंध नागपुरास वेदोक्तपद्धतीनें मोठ्या थाटानें झाला, हें कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो.

## पुणें, ' केसरी '– ता. २० मार्च सन १९२३ इ०

नागपूर येथील भोसल्यांच्या राजघराण्याचें साताऱ्या राजघराण्याप्रमाणेंच राज्य जाऊन फक्त घराणेंच काय तें आज शिल्लक राहिलें आहे. पण तेवढ्यानें त्यांच्या पूर्वीच्या क्षात्र तेजाचें कोणासहि विस्मरण पडणें शक्य नाहीं. त्यांनीं आपला पूर्वलौकिक कालदेशवर्तमानास अनुसरून अद्यापिहि कायम ठेवला आहे. आपण क्षात्रकुलोत्पन्न आहोंत ही ज्योत त्यांचे अन्तःकरणांत तेवत आहे हें पाहून सरकारानें निःक्षत्रिय व निर्वीर्य करून सोडलेल्या हिंदी लोकांस अभिमान वाटेल यांत शंका नाहीं. नागपूरच्या भोंसले घराण्यांतील एक विद्यमान पुरुष श्रीमंत लक्ष्मणराव राजेसाहेब यांनीं आपले चिरंजीव कुमार प्रतापसिंहमहाराज यांचा व्रतबंध वेदोक्त विधीनें वे० शा० सं० जनार्दनभट्ट पाठक व पं० रेवाशंकर यांचे हस्तें ता. २६-२-२३ इ. रोजीं नागपुरास मोठ्या थाटानें करविला. मध्यंतरींच्या संस्कारलोपाबद्दल राजेसाहेबांनीं प्रायश्चित्तहि घेतलें असें समजतें. क्षत्रियत्वाचा हा अभिमान धार्मिक विधीच्याच केवळ दृष्टीनें नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणांत प्राचीन मराठ्यांनीं जे उज्ज्वल स्थान मिळवून ठेवलें आहे त्याहि दृष्टीनें सध्यांच्या अस्स

मराठा घराण्यांतून जितका वाढेल तितका महाराष्ट्रास हवाच आहे. प्रचलित राजकारणांतील त्यांचें स्थान अद्यापि रिकामें आहे व तें मराठ्यांवांचून दुसऱ्या कोणासही भरून काढतां येणार नाहीं, याविषयीं आमच्या मराठा बंधूंची ज्या दिवशीं खात्री होईल तो सुदिन समजावयाचा !

## बेळगांव, ' चैतन्य '– ता० १२ मार्च सन १९२३ इ.

नागपूरच्या भोंसले राजघराण्यांतील श्री. राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले यांचे ज्येष्ठ चिरंजीव कुमार प्रतापसिंह महाराज यांचा व्रतबंध गेल्या सोमवारीं ता. २६-२-२३ इ. रोजीं मोठ्या थाटानें व वेदोक्त पद्धतीनें वे. शा. सं. जनार्दन भट्ट पाठक व पं. रेवाशंकर वगैरे उपाध्यायांकडून यथासांग करविण्यांत आला, हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. महाराष्ट्रांतील अस्सल मराठा जात ही चतुवर्णांतील क्षत्रीयच होत हें आतां निःसंशय खरें ठरलें आहे. यासंबंधीं नागपूर येथील गेल्या धर्मपरिषदेपासून ' केसरी ' पत्रांत बराच उहापोह होऊन शेवटीं श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं ता. १३-२-२३ इ. च्या केसरीच्या अंकांत सप्रमाण अभिप्राय देऊन निर्णय केला आहे. यावरून कलियुगांतही चतुवर्णांचा लोप झाला नाहीं हें सिद्ध होतें. त्यांतून भोंसले घराणें हें श्री छत्रपती शिवाजी महाराजांपासून आज तागायत सर्व हिंदुस्थानभर क्षत्रिय ह्मणून गाजलें जात आहे. शिवाय शृंगेरी मठाचे शंकराचार्योनींही आपल्या एका " श्रीमुखांत " या भोंसले घराण्यांतील कै० जानोजीरावसाहेब यांना ' क्षत्रियकुलावतंस ' म्हणून संबोधिलें आहे. यावरून कलियुगांतील भोंसले घराणें हें क्षत्रीय घराणें आहे यांत आतां वादच नाहीं. श्री छत्रपति शिवाजी राजे यांच्या वेळेपासून भोंसले घराण्यांत वेदोक्त संस्कार चालत आले आहेत, हें सर्वश्रुतच आहे. येथील श्रीमंत राजेबहादूर रघोजीरावसाहेब यांचा व्रतबंधही वेदोक्तपद्धतीनेंच झाला. नागपूर येथील बऱ्याच ब्राम्हणांनीं या वेदोक्त संस्कारास अंतःकरणपूर्वक व अभिमानानें सहाय्य करून समारंभ साजरा केला. श्री. प्रतापसिंह महाराज यांच्याबरोबर इतर सात मराठा मुलांच्या मुंजी करण्यांत आल्या. स्वधर्मलोप होत असलेल्या सध्यांच्या स्थितींत श्री. राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले यांनीं चातुर्वर्णाचा अभिमान राखून वेदोक्त संस्काराचा उपक्रम चालू ठेवला, याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें सांप्रत स्थितींत थोडेंच आहे.

## डॉ० मुंजे यांचें पत्र.

**DR. B. S. MOONJE,**
L. M. & S.
*Eye-surgeon.*

*Nagpur-City*
*1-3-1923.*

३९
१९२३

श्री

श्री. रा. रा. लक्ष्मणराव साहेब भोंसले यांस सविनय वि. वि.

परमेश्वर कृपेनें आपल्या चिरंजिवाचा उपनयनाविधि यथासांग यथा पद्धति वेदोक्त पद्धतीनें विद्वान प्रतिष्ठित महाराष्ट्रीय ब्राम्हण याज्ञिकांच्या द्वारें पार पडला, याबद्दल सर्वांस आनन्द होत आहे. व प्रसंगास अनुरूप असा दानधर्म ही मोठ्या प्रमाणावर केला आहे याविषयीं सर्वत्र संतोषही पसरला आहे.

कळावें, लोभाची वृध्दि असावी. ही वि.

आपला कृपाभिलाषी,

बा. शि. मुंजे

" या उपनयन समारंभाला एकंदर पंधरा वीस हजारांचा समुदाय जमला होता. दक्षणेकरितां ब्राह्मणभिक्षुकांची एकच गर्दी झाली होती. नागपूर येथील गव्हर्नर सर फ्रँक स्लाय वगैरे बहुतेक युरोपिअन ऑफिसर्स, राजेबहादूर रघोजीराव, राजे फत्तेसिंग, राजे जयसिंग, श्री. शंकरराव गायकवाड, श्री. यशवंतराव दाभाडे, ऑनरेबल चिटणीस वगैरे झाडून मोठमोठी मंडळी हजर होती......राजेबहादूर रघोजीराव व श्री. नारायणराव व्यास हे निमंत्रित पाहुण्यांचा आदरसत्कार करीत होते. इकडे बोहल्याकडे रा. वासुदेवराव संगमकर ब्राह्मणांना दक्षणा देण्याचें काम जोरानें करीत होते. स्त्रीसमुदायाकडे......ओट्या भरणें......वगैरे कामें श्री. राणी काशीबाईसाहेब आपल्या नेतृत्वाखालीं करवून घेत होत्या. एकंदरींत वे. शा. सं. जनार्दनभट्ट पाठक यांनीं विडा उचलल्याप्रमाणें निर्विघ्नपणें यथाशास्त्र वेदोक्तपद्धतीनें हा उपनयन समारंभ पार पडला; व तो ' सोन्याचा दिवस ' † सर्व

† वैद्यालंकृति रंगुबाईकृत हा काव्यरूपी मनोहर अहेर परिशिष्टांत पहावा.

लोकांनीं सोन्याप्रमाणें मानून घेतला. " ( पहा:—चित्रमयजगत्-पुरवणी ; जुलै १९२३ इ० )

## श्रीशाहू छत्रपति आणि राजे लक्ष्मणराव.

राजेसाहेबांनीं या उपनयन समारंभाप्रीत्यर्थ ब्राह्मणांना पुष्कळ दक्षणा दिली, बराच पैसा दानधर्म केला, पुष्कळ पाहुण्यांना मेजवान्या दिल्या, गांवभोजनें घातलीं, कित्येकांना बिदाग्या दिल्या, अहेर केले, मोठमोठ्या लोकांना पार्ट्या दिल्या. त्याकरितां त्यांचें अभिनंदन वृत्तपत्रांतून केलें गेलें तें कां ? त्या वृत्तपत्रकारांना राजेसाहेबांनीं कोणत्या तरी मार्गानें केव्हां तरी उपकृत करून ठेवलें होतें ह्मणून फूल नाहीं फुलाची पांकळी देऊन अंशत: तरी त्या उपकाराची फेड करावी या हेतूनें त्यांनीं या संधीचा फायदा घेऊन त्यांचें अभिनंदन केलें किंवा काय ? कारण श्रीमंत लोकांच्या उपकाराची फेड पैसा परत देऊन होत नसते तर ती त्यांच्या सन्मानानें किंवा अभिनंदनानें होत असते; ह्मणून त्यांनीं एवढा गाजावाजा केला किंवा काय ? असा प्रश्न उद्भवतो. परंतु अभिनंदनाच्या मजकुरांत दक्षणा, मेजवान्या वगैरेबद्दल कांहींच मजकूर नसल्यामुळें पहिला प्रश्न आपोआपच नाहींसा होतो. दुसऱ्या प्रश्नाबद्दलही तीच स्थिति आहे. कारण त्या वेळीं या वृत्तपत्रांचे वर्गणीदारही राजेसाहेब नव्हते. मग इनामें, देणग्या यांचा प्रश्नच कोठून राहिला ! असें असतां ज्याअर्थी त्यांचें एवढें मोठें अभिनंदन करण्यांत आलें, त्याअर्थी त्यांत कांहीं तरी श्रेष्ठ असा हेतु असला पाहिजे, हें सिद्ध होतें. आतां तो कोणता असावा हें आपण पाहूं.

## द्विवर्णिकावर परकीय सत्तेचें आक्रमण.

वेदोक्त कर्म करण्याचा अधिकार हिंदुधर्मशास्त्रानें ' ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य ' या त्रिवर्णालाच दिलेला आहे. ब्राम्हण हा वर्ण केवळ वेदाचाच अधिकारी असल्यामुळें कांहीं विशिष्ट व अकल्पित संकटाशिवाय त्यांना वैदिक कर्मांत खंड पडावयाला दुसरीं कांहीं कारणें असत नाहींत. पण क्षत्रिय आणि वैश्य या दोन वर्णांचें मात्र तसें नाहीं. हे वर्ण म्हणजे त्या धर्माची किंवा राष्ट्राची सत्ता व मत्ता या स्वरूपांत आहेत. क्षत्रिय वर्ण हा हिंदु धर्मीयांचा रक्षणकर्ता, राजदंड धारण करणारा अर्थात राष्ट्राची अधिकारारूढ सत्ता आहे. त्याचप्रमाणें वैश्य वर्ण हा

हिंदुधर्माचा व्यापारधंद्यानें धनिक बनलेला अर्थात राष्ट्राची मत्ता आहे. धर्माचें अगर राष्ट्राचें संरक्षण अगर परिपोषण मुख्यतः या दोन वर्णांवर अवलंबून असतें. शांततेच्या काळांत क्षत्रिय आणि वैश्य या दोन्ही वर्णांतील लोकांना वर्णाश्रम धर्माप्रमाणें नित्य आणि नैमित्तिक कर्में करतां येतात. पण शांततेचा काळ जाऊन धर्मावर अगर राष्ट्रावर परचक्राचा घाला येतो, त्या वेळीं त्याला सत्ताधारी जो क्षत्रिय वर्ण त्यालाच प्रथमतः तोंड द्यावें लागतें. आणि हा प्रसंग ह्मणजे ' हत्वा वा प्राप्स्यसे स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महिम् ' असाच असतो. या दोन गोष्टींतच क्षत्रियांची सामान्यतः परिसमाप्ति होत असते. शत्रूबरोबर लढाई करून जय मिळाला, तर सत्ता कायम राहते. पराजय झाला तर सत्ता जाते आणि तीबरोबर वैश्यांची मत्ताही पण जाते. ह्मणजे हे दोन वर्ण परस्परांवर अवलंबून आहेत. क्षत्रिय अस्तित्वांत असलें, ह्मणजे वैश्यांचें अस्तित्व दिसतें व क्षत्रियांचें अस्तित्व दृष्टिगोचर नसलें ह्मणजे वैश्यांचेंही तसेंच होतें. हा विचार राष्ट्राच्या अधिकाराच्या आणि अर्थाच्या दृष्टीनें झाला. पण ज्या वेळीं परधर्मीय चक्र धर्मप्रसाराच्या तीव्र लालसेनें प्रेरित होऊन येतें, त्या वेळीं आणि पराजित झाल्यानंतर याच दोन वर्णांचें जे हाल होतात, ते सांगतां येत नाहींत. सत्ता आणि मत्ता याबरोबर त्यांना वर्णाश्रम धर्माच्या कर्मांनाही मुकावें लागतें. त्या वेळीं त्यांना ' आत्मा रक्षितो धर्मः ' याच न्यायानें बीजमात्रेंकरून जीवंत रहावें लागतें.

## बीजरूप अस्तित्वाची इष्टता व शक्यता.

परशुरामानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली होती, असें पुराणांतरीं आहे. एक वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर पुन्हां क्षत्रिय निर्माण होऊन पुन्हां परशुरामावर निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचा दुसरा प्रसंग येतो, एवढेंच नव्हे तर असे एकवीस प्रसंग येतात. तेव्हां क्षत्रियवर्ण बीजासहित नष्ट होणें असा ' निःक्षत्रिय पृथ्वी ' याचा अर्थ नसून क्षत्रिय कर्माला पारखें होऊन केवळ बीजरूपानेंच जीवंत राहणें, असा असला पाहिजे, हेंच योग्य ठरतें.

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूर्वज ' देवराज सिसोदिया ' हे चितोड-वरून यावनी सत्तेमुळें हतबल होऊन दक्षिणेंत आले, तेव्हांपासून मालोजी राजे यांचे-

पर्यंत सुमारें दहा पिढ्यांना क्षत्रिय कर्माला जवळ जवळ फांटाच देण्याचा प्रसंग आला होता. त्यांना शेतवाडी करून आपला निर्वाह करून घ्यावा लागला. ती वेळ व तो प्रसंग ' क्षत्रियकर्म ' जीवंत ठेवण्यासारखा नसून ' क्षत्रियबीज ' तेवढेंच जीवंत ठेवण्याव्यतिरिक्त ह्मणजे जन्मानें क्षत्रिय वर्णाचें असण्या व्यतिरिक्त दुसरें कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. निसर्गाचा सिद्धांत असा आहे कीं, बीज क्षेत्रांत पडल्यानंतर त्या बीजाला जोंपर्यंत पाणी, हवा, खत मिळून त्याचें परिपोषण होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न होत नाहीं, तोंपर्यंत तें बीज क्षेत्रांत बीज रूपानेंच रहातें. त्याच्या परिपोषणाचीं अनुकूल द्रव्यें त्याला मिळालीं, ह्मणजे अंकूर रूपानें तीं सृष्टीवर दृष्टिगोचर होऊं लागतात.

त्याचप्रमाणें श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांना क्षात्रतेज दाखविण्याची योग्य संधि मिळाल्यामुळें महाराष्ट्राच्या क्षितिजावर ते अवतारी पुरुष ह्मणून उदयाला आले. भोंसले घराणें हें सूर्यवंशीं असल्यामुळें सूर्याच्या गतीप्रमाणेंच त्याची दैव-गति असलेली दिसते. सूर्याला ज्याप्रमाणें उदय आणि अस्त या अवस्था आहेत, त्याप्रमाणें या सूर्यवंशी क्षत्रिय घराण्यालाही त्या असून त्यांच्या फेऱ्यांतच त्याला आजपर्यंत कालक्रमणा करावी लागली. हें इतिहास पुराणें दाखवीतच आहेत. उत्तरेकडून दक्षिणेंत शिवाजीमहाराजांचा मूळ पुरूष देवराज सिसोदिया आला, तेव्हांच त्यांचा क्षात्ररवी संकटगिरीवर अस्ताला गेला होता. विपत्कालीन निशा संपण्याला मालोजी राजे यांचेपासून सुरवात झाली तोच काल भोंसले घराण्याचा अरुणोदय होय. नंतर शहाजी राजे यांचा काल ह्मणजे अरुणोदयापासून सूर्यो-दयापर्यंतचा संधिकाल होऊन शिवाजीमहाराजांबरोबर पुढें क्षत्रियरवीचा उदयकालच अनुभवास आला.

## कर्मलोप कीं वर्णलोप ?

श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांनीं आपल्या गुणकर्मानें महाराष्ट्राला आपण क्षत्रिय आहोंत, असें कबूल करावयाला लावलेंच होतें. परंतु त्या गुणकर्माला जो एक धर्माचा संस्कार लागतो, तो मात्र त्यांना झाला नव्हता. या धार्मिक संस्काराचा लोप गेल्या दहा बारा पिढ्यांपासून झाला असावा, असें दिसतें. ह्मणून धार्मिक संस्कार झाल्याशिवाय, बावन कशी सोन्याप्रमाणें शिवाजी महाराज क्षत्रिय

होऊं शकत नाहींत असें त्या वेळच्या महाराष्ट्रीय लोकांना वाटणें स्वाभाविक होतें. महाराष्ट्रांतील बहुतेक हिंदु समाज सगुण उपासक आहे, ह्मणून धर्मसंस्कारांनीं मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्याशिवाय त्या दगडांत परमेश्वरी अंश आहे अशी भावना ठेवण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति नाहीं. हीच भावना त्यांच्या हाडांमांसीं रूढ झाल्यामुळें धर्मसंस्काराशिवाय शिवाजी महाराजांना क्षत्रिय ह्मणावें, हें त्यांच्या भावनेला पटेना. शिवाय राज्याभिषेक हा धार्मिक संस्कार करून त्यांना क्षत्रिय ठरवून घ्यावें, तर द्विजत्व असल्याखेरीज ह्मणजे उपनयन संस्कारानें द्विजत्व आणल्याखेरीज राज्याभिषेक होऊं शकत नाहीं. आणि शिवाजी महाराजांचें उपनयन करण्याची मर्यादा त्या वेळीं गेलेली होती. कारण त्या वेळीं ते ब्रह्मचारी नसून त्यांना अपत्येंही झालीं होतीं. अशा स्थितींत शिवाजी महाराजांना राज्याभिषेकाचा वेदोक्त धर्मसंस्कार करून त्यांचें क्षात्रपण जगाला रीतसर कबूल करावयाला लावण्याची पात्रता त्या वेळच्या महाराष्ट्रांतील ब्रम्हवृंदांत नसल्यामुळें तो तसा यथाविधि यथासांग वेदोक्त पद्धतीनें करावयाला त्या वेळेचा महाराष्ट्रीय ब्रह्मवृंद तयार झाला नाहीं. शिवाय महाराष्ट्रांतील कांहीं ब्राम्हणांनीं आपल्या जबाबदारीवर तसें वेदोक्त कर्म चालू केलें असतें तर तें शिर्के वगैरे क्षत्रिय मराठ्यांना कितपत रुचलें असतें हा एक प्रश्नच होता. आतां भोंसल्यांना क्षत्रिय मानून त्यांना राज्याभिषेक करण्याच्या बाबतींत धर्माचे अडथळे न येण्यासारखे स्पष्ट पुरावे असतां ब्रम्हवृंद केवळ हेकेखोरपणानें वेदोक्त कर्म करण्याचें टाळतात किंवा नडवतात असें जर शिवाजीमहाराजांना वाटलें असतें, तर त्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्याची त्यांच्या बाहूंत पूर्ण शक्ति होती. परंतु **धर्माचीं बंधनें हीं शस्त्रांनीं तुटलीं न जातां उलट जास्तच खंबीर होत असतात,** या तत्त्वाच्या वातावरणांत ते वाढलेले होते, म्हणूनच त्यांनीं धर्माच्या बाबतींत कोणतीच विरुद्ध शक्ति उत्पन्न होण्याला अवकाश दिला नाहीं.

काशी हें क्षेत्र पूर्वीपासून संस्कृतचें विद्यापीठ मानलें जात असे. कोणताही धार्मिक कठीण प्रश्न काशीच्या पंडितांकडून सोडवून घेतला जात असे आणि त्यांचेंच मत म्हणजे वेदवाक्य होतें. शिवाय त्या वेळीं श्रीकाशीक्षेत्रवासी गागाभट्ट यांनीं सर्व हिंदुस्थानभर संचार करून ठिकठिकाणांहून अजिंक्यपत्रें घेतलीं होतीं. तेव्हां शिवाजीमहाराजांच्या क्षात्रत्वाचा त्यांनींच प्रश्न सोडवल्यास तो

सर्वमान्य ठरेल या विचारानें त्यांना बोलावून घेऊन त्यांचे करवीं श्रीशिवाजी महाराजांनीं राज्याभिषेक करवून घेतला व तो भारतवर्षांत सर्वमान्यही झाला. कोणतेंही कार्य जनहिताचें, पूर्ण धर्माला अनुसरून आणि सर्वमान्य ठरावयाला श्रमही तितकेंच जास्त पडत असतात. नाहींतर महाराष्ट्रांतील ब्रम्हवृंद राज्याभिषेक करावयाला तयार नाहींत, असें श्रीशिवाजी महाराजांना कळून आल्याबरोबर त्यांनीं त्यांचीं इनामें काढून घेऊन किंवा त्यांच्या वृत्त्या बुडवून एकाद्या नवीन जगद्गुरूची प्राणप्रतिष्ठा करून त्याच्याकरवीं राज्याभिषेक करवून घेण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं खास असतांही तें दाखविण्याचा विचारही आपल्या मनाला शिवूं दिला नाहीं. तसें केल्यानें आपलें कृत्य जगमान्य होणार नाहीं व हिंदुधर्मालाही तें विहित नाहीं; उलट तें घातुक आहे व त्यानें समाजावर दुष्परिणाम घडेल, हें तें पक्कें जाणून होतें. ज्याचें कर्म त्यानेंच केलें पाहिजे ते न केलें तर त्याला तसें करावयाला लावलें पाहिजे, हेंच वर्णाश्रम धर्माचें कर्तव्य. धर्म विकृत होत असलेल्या स्थितींत जो मनुष्य हें कर्तव्य करतो, तोच धर्मसंस्थापक म्हणून जगद्वंद्य होतो. श्रीशिवाजीमहाराजांनीं ब्राम्हण कर्तव्यभ्रष्ट होत असलेल्या स्थितींत त्यांना कर्मतत्पर केलें, क्षत्रिय मराठ्यांना क्षात्रधर्माचें पाठ पढविले, म्हणूनच त्यांना अवतारी पुरुष असें लोक संबोधूं लागले. आपण करतों हें चांगलें असतें, असें प्रत्येकाला वाटण्याची स्वाभाविक प्रवृत्ति असते. आपण सुंदर आहोंत, असें प्रत्येकाला वाटत असतें, पण आरशांत पाहिल्यानंतर जशी आपल्या सुंदरपणाची यथायोग्य कल्पना आपणाला होते व खरी वस्तुस्थिति समजतें, त्याचप्रमाणें आपण केलेलें कार्य समाजादर्शांत नीट निरखून पहाण्याची जो खटपट करतो, त्यालाच आपण केलेलें कार्य काय दर्जाचें झालें, हें समजतें. तें कार्य जनहिताचें किंवा धर्माला विहित असें जर झालें नाहीं, तर शहाणा मनुष्य त्या कार्याची दिशा बदलून लोकोपयोगी कामाचीच फिरून निराळी दिशा आंखतो. पण जो पुरुष समाजादर्शांत पहाण्याची संवय अगर जरूरी ठेवीत नाहीं. आणि तो जें करतों तेंच जनहिताचें असें जनतेनें मानलें पाहिजे असें हेकेखोरपणानें ह्मणतो, त्यांचेंच कार्य नाश होतें व त्यापासून जनतेचा फायदा न होतां उलट तिला त्रास मात्र अतोनात होतो. असा प्रकार शिवाजी महाराजांनीं होऊं दिला नाहीं. सरळ पद्धतीनें धर्मविषयक कामें केलीं, चातुर्वण्याची संस्थापना केली, हिंदुधर्मरक्षण केलें ह्मणूनच ते अवतारी पुरुष मानले गेले.

हा वेदोक्ताचा प्रश्न शिवाजी महाराजांनीं राज्याभिषेकाच्या वेळीं आपणास्वतः पुरताच सोडवून घेतला नाहीं. तर आपल्या स्वज्ञातीचाही प्रश्न त्यांनीं त्या वेळीं सोडवून घेतला. पंचकुळी, सप्तकुळी वगैरे कुळीचा जो प्रश्न निघाला तोही पण त्याच वेळीं. त्या कुळीचा एवढाच अर्थ घ्यावयाचा कीं त्या कुळींना वेदोक्ताचा त्या वेळीं पुन्हां संस्कार घडला. व तेव्हांपासून फिरून ते वेदोक्त कर्म आपल्या घराण्यांत चालवूं लागले.

## धर्म--रक्षकर्तेतच जातिवंत क्षत्रियत्व.

आमच्या चरित्रनायकांनीं श्रीशिवाजी महाराजांनीं अंगिकारलेल्या या तत्त्वाच्या पाऊलावर पाऊल टाकण्याचा आपल्या सामर्थ्याप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें प्रयत्न केला. श्रीशिवाजी महाराजांच्या अवताराची परिसमाप्ति झाल्यानंतर सव्वाशें दीडशें वर्षांतच पाश्चिमात्य सत्ता हिंदुस्थानांत पूर्णपणें अधिकारारूढ झाली. त्यामुळें समाजांत पाश्चिमात्य संस्कृतीचें प्राबल्य वाढूं लागलें. मानवी जात स्वभावतः प्रगमनशील असल्यानें, पाश्चिमात्य शिक्षणांत तन्मयता, पाश्चिमात्य लोकांच्या सहवासांत धन्यता मानण्याची मनोवृत्ति, पाश्चिमात्य संस्कृतीचा अभिमान, पाश्चिमात्य पद्धतीची रहाणी, पाश्चिमात्य पद्धतीचे खेळ, पाश्चिमात्य पद्धतीवर स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार, पाश्चिमात्य धर्माच्या विचार-सरणीवर हिंदुधर्माची ओढाताण करून वागण्याची हौस, वगैरे वगैरे गोष्टी हिंदुधर्म — बंधनाच्या शिथिलतेला आपोआप कारणीभूत होऊं लागल्यामुळें व मानवी जात ही स्वभावतः स्वातंत्र्यप्रिय असल्यामुळें धर्माचे बाबतींतदेखील मनाला वाटेल त्याप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य सहजच उपभोगण्याची संधि मिळूं लागली. यामुळें चातुवर्ण्याचा कित्येकांना वीट येऊन वर्णभेद, जातिभेद शक्य तेवढे कमी करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली. नवें तेवढें सर्व चांगलें ही भावना एकदां दृढ झालेवर जुन्या चाली रीती, जुन्या रूढी, जुने आचार विचार यांना हलके हलके फांटा मिळूं लागला. राजकीय घटनेप्रमाणें आजपर्यंतच्या स्थिर सामाजिक व्यवस्थेंत फेरफार करून घेण्याचा प्रसंग येऊं लागला. त्यामुळें निरनिराळे पक्ष, निरनिराळे पंथ प्रस्थापित होऊं लागले. या कारणामुळें पूर्व संस्काराच्या लोकांमध्यें व नव्या पद्धतीच्या अनुयायांमध्यें वरचेवर मतभेद दिसून येऊं लागला. अशा सर्व साधारण धर्म-

ग्लानीच्या संधिकालाच्या वेळीं ब्राह्मण आपल्या कर्माला पारखे होऊं लागले, क्षत्रियांना, क्षत्रियत्वाचा विसर पडूं लागला, वैश्यांची वैश्यवृत्ति लुप्तप्राय भासूं लागली. अशा स्थितींत वे० शा० सं० तेलंगशास्त्री यांनीं कलियुगांत क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्वच मुळीं नाहीं, असा वाद मांडला. या त्यांच्या वादामुळें राजकीय स्वरूपाच्या ब्राम्हणेतर पक्षाला पुष्टी आली ही गोष्ट निराळी पण राजकीय धोरणाच्या फेरबदला बरोबर जर धर्मांचीं अबाधित तत्त्वें बदलूं लागलीं तर राजकारण आणि धर्म कारण यांत फरक तो काय राहिला ? राजकारणाला जसें बूड असत नाहीं तसें जर धर्मांचें झालें तर त्याच्या अबाधित तत्त्वाची काय किंमत राहिली ? तेव्हां चारी बाजूनें धर्म ग्लानीची चिन्हे दिसूं लागल्यामुळें व चातुर्वण्यावर घाला येऊन पडूं लागल्यामुळें त्याचा आपले हातानें होईल तों प्रतिकार करण्याकरितां आमचे चरित्रनायक पुढें सरसावले. व मुलांचें वेदोक्त उपनयन करून तेलंगशास्त्रांच्या या उपद्व्यापाला कृतीनें उत्तर दिलें. हा उपनयनाचा दगड फेंकून राजसाहेबांनीं अचूक तीन फळें खालीं पाडलीं.

१ जे ब्राम्हण क्षत्रिय मराठ्यांना शूद्रमानून त्यांचेकडे वेदोक्त करीत नव्हत, त्याच ब्राम्हणांकडून त्याच मराठ्यांना क्षत्रिय म्हणवून त्यांचे हस्तें त्यांचेकडे वेदोक्त कर्म करावयाला लावलें. केवळ आपल्याच मुलाचें नव्हे तर आपल्या ज्ञाति बांधवांच्या सात मुलांचीं उपनयनें करून त्यांच्याकडेही तीच वेदोक्ताची पद्धत ब्राम्हणांना करावयाला भाग पाडली. म्हणजे ब्राम्हणांना कर्मतत्पर केलें.

२ जे क्षत्रिय आपण आतां शूद्राच्या मालिकेंत गेलों, म्हणून हताश झाले होते, त्यांना ठिकाणावर बसवून क्रमलोपानें मलीन होऊं पाहणाऱ्या त्यांच्या क्षात्र वृत्तीला वेदोक्त संस्कारानें सतेजता आणली.

३ क्षत्रियांचें अस्तित्व सिद्ध केल्यामुळें सहजच वैश्यांचे आस्तित्व ब्राह्मणांना मान्य करावेंच लागलें.

---

एकंदरींत धर्मांच्या गाठी तरवारीनें अगर अधिकारानें सोडवावयाच्या नसून त्या सामोपचारानें व दृढ प्रयत्नानें सोडवाव्या लागतात. त्या पद्धतीनें राजेसाहेबांनीं सोडाविल्या व हिंदु धर्मीय लोकांना योग्य धडा घालून दिला. ही लहान प्रमाणांत कां होईना, त्यानीं स्वधर्म संस्थापनाच केली, असें ह्मणावयाला हरकत नाहीं.

उगमाला नदी लहानच परंतु ती जीवंत पाण्याच्या झऱ्यांनीं वाहूं लागली म्हणजे तिला नंतर अनेक नद्या मिळून गंगेप्रमाणें ती मोठी होते. तेव्हां राजेसाहेबांची मुळाशीं जरी लहान कामगिरी दिसली, तरी ती शुद्ध विचारांच्या व अबाधित तत्त्वांच्या जीवंत झऱ्यानें लोकसमुदायांत वाहूं लागली होती. या त्यांच्या कामगिरीची योग्यता जाणून व कार्याचें रहस्य ओळखून वृत्तपत्रकारांनीं त्यांचें अभिनंदन केलें व भोंसले कुळांत जन्माला येऊन धर्माचे बाबतींत श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या पावलांवर पावलें टाकीत जाण्याची त्यांची पद्धत ध्यानीं आणून आनंद प्रदर्शित केला, हाच त्यांच्या हेतूचा निष्कर्ष निघतो.



## प्रकरण १० वें.

# डॉ. कुर्तकोटी व राजेसाहेब.

## जाहीर पाद्यपूजा-पूर्वतयारी

राजेसाहेबांनीं चिरंजिवाच्या उपनयन समारंभाचे वेळीं अगत्य हजर राहण्याबद्दल श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांना रीतसर निमंत्रण दिलें होतें. आणि निमंत्रणाचे वेळीं उपनयनाला आपण येऊं शकूं, असेंही श्रींनीं कबूल केलें होतें; परंतु आयत्या वेळीं त्यांना एका महत्वाचे कामाला जावें लागल्यामुळें ते त्या समारंभाला नागपुरीं उपस्थित होऊं शकले नाहींत. त्यामुळें राजेसाहेबांचे मनाला ती गोष्ट लागून राहिली होती. पुढें उपनयन समारंभाची एक दोन महिन्यांत सर्व गडबड आटोपल्यानंतर उन्हाळ्यानिमित्त दर वर्षाप्रमाणें राजेसाहेब लोणावळ्यास आले. तेथें येऊन थोडी स्थिरस्थावरता झाल्यानंतर श्रींचा मुक्काम पुण्यास आला असल्याचें त्यांना समजलें; ह्मणून त्यांनीं आपले खासगी कारभारी श्री. वासुदेवराव संगमकर शास्त्री यांना श्रींचे दर्शनाकरितां पुण्यास पाठविण्याचा विचार केला. मागें ह्मणजे इ. स. १८७३ सालीं शृंगेरी मठाचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीनृसिंह भारती स्वामी यांची पाद्यपूजा त्यांचे तीर्थरूप जानोजी महाराज यांनीं नागपुरीं केली; त्याचप्रमाणें उपनयन समारंभानंतर सांप्रतच्या जगद्गुरूंची आपणही पाद्यपूजा थाटानें करावी, असें नागपुरीं राजेसाहेबांचे मनांत होतें. परंतु श्रींची स्वारी त्या समारंभाला उपस्थित न झाल्यामुळें पाद्यपूजेचा विचार त्यांना मनांतच ठेवावा लागला. श्रींची स्वारी पुण्यास आहे, असें समजल्यापासून ही पाद्यपूजा पुण्यालाच आटोपून घेऊन उपनयनाच्या कार्यक्रमांतील अखेरच्या महत्वाच्या कलमांतून मोकळें व्हावें, असा त्यांनीं विचार केला; पण नागपूरप्रमाणें हत्ती, घोडे

वगैरे लवाजम्यानिशीं राजकीय थाटानेंही पाद्यपूजा पुण्यास होणें शक्य नव्हतें, म्हणून त्यांनीं जाहीर पाद्यपूजा करून सार्वजनिक समारंभाची त्याला शोभा आणण्याचा संकल्प केला. शिवाय, पुण्यांतील श्रीशिवाजीमंदिराच्या भेटीकरितां राजसाहेबांनीं यावें म्हणून त्याच्या चालकांकडून मागेंच पाचारण करण्यांत आलें होतें; तेव्हां त्याच ठिकाणीं हा पाद्यपूजेचा जाहीर समारंभ करून त्यांचे निमंत्रणालाह मान दिल्या-प्रमाणें करावें, असा सर्व बाजूंनीं विचार करून व त्याप्रमाणें श्री. वासुदेवराव संगम-कर शास्त्री यांस सांगून त्यांची त्यांनीं पुण्यास रवानगी केली. शास्त्रीबुवांनीं पुणें येथें श्रींचें दर्शन घेतलें व त्यांना राजेसाहेबांचा मानस विदित केला. श्रींनीं संतोष व्यक्त करून रविवार ता. २७ मे इ० स० १९२३ हा दिवस मुक्रर केल्याचें सांगितलें.

त्याप्रमाणें संगमकर शास्त्री यांनीं लोणावळ्यास राजेसाहेबांना कळविलें आणि पाद्यपूजेच्या समारंभाची पुणें येथें तयारी सुरू झाली. श्रीमंत बापूसाहेब नातूंच्या बागेंतील बंगल्यांत राजेसाहेबांना उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली. या समारंभा-प्रीत्यर्थ पुण्याचे प्रतिष्ठित नागरिक, शेट, सावकार, हुद्देदार, जहागीरदार, प्रोफेसर, शिक्षक, शास्त्री, पंडीत यांना स्वतंत्रपणें निमंत्रणपत्रिका पाठविण्यांत आल्या होत्या. शिवाय, पाद्यपूजेची जाहीर हस्तपत्रकें काढून पुण्याचे हिंदू नागरिकांस या जाहीर समारंभाला हजर राहण्याची विनंति करण्यांत आली होती.

## श्रीशिवाजीमंदिराचा शृंगार.

'श्रीशिवाजीमंदिर' या समारंभाला शोभेल अशाच उपकरणांनीं शृंगा-रण्यांत आलें होतें श्रीशिवाजी महाराजांचा पुतळा व मंदिराचें आवार यांमध्यें ठिक-ठिकाणीं कदली वृक्षांच्या कमानी उभारण्यांत आल्या होत्या. त्यांवरून सर्व शिव-मंदिराच्या आवारावर नूतन आम्रपल्लवांच्या मालिकांचें जणूं जाळेंच पसरलें होतें. हीं तोरणें लांबपल्ल्यावरून बांधलीं गेलीं असल्यामुळें त्यांनीं स्वभावतःच धनुष्याकृति धारण केली होती ती रात्र ज्येष्ठ शु॥ द्वादशीची असल्यामुळें चंद्रमा आपल्या शीतल किरणांनीं शिवाजी मंदिर प्रकाशित होता. त्या प्रकाशाच्या मदतीकरतां अनेक किटसनचे दिवे उभारण्यांत आले होते. चंद्रम्याच्या शुभ्र प्रकाशांत किट-सनच्या शुभ्र प्रकाशाची भर पडल्यामुळें नयनमनोहर असा प्रशीतल प्रकाश सर्व

मंदिरांत वावरूं लागला होता. त्याच प्रकाशांत नूतन आम्रपल्लवांचीं धनुष्याकृति तोरणें अनेक इंद्रधनुष्यांप्रमाणें शोभा देत होतीं. एकंदरींत या मंगलप्रद समारंभाच्या स्थलाची शोभा, पहाणाराला सहजच मंगलप्रद अशी वाटून समाधान होण्यासारखी होती.

श्रीशिवाजी महाराजांचे पुतळ्यासमोर पाद्यपूजेच्या समारंभाची तयारी केली होती. त्याच्याजवळच श्रींच्याकरतां एक स्वतंत्र व्यासपीठ तयार केलें होतें. पुतळ्याजवळच एका बाजुला श्रीमंत राणी सरकार व इतर पडदा असलेल्या स्त्रियांकरितां एक मंडप मंडित केला असून त्याला चोहोंबाजूंनीं चिकाचे पडदे लावण्यांत आले होतें. बाकी स्त्रियांकरतां भव्य ग्यालरी व निमंत्रित बड्या पाहुण्याकरितां कांहीं कोचें व खुर्च्या व सामान्य लोकांकरितां बैठक अशी योजना केली होती. ही योजना कमलपुष्पाप्रमाणें झाली होती. कमलांतील कर्णिकेच्या स्थानीं पाद्यपूजेची मांडणी व कमल पत्रांप्रमाणें प्रेक्षकांची बसण्याची योजना, यामुळें समारंभाची शोभा सर्वांना सारखी दिसावी, अशी व्यवस्था झाली होती.

या समारंभाची वेळ सायंकाळीं साडे सहा वाजतां प्रसिद्ध करण्यांत आली होती. तरीसुद्धां कित्येक मंडळी पांच वाजल्यापासून आपल्या आगमनानें शिवमंदिराला शोभा आणूं लागली होती. सहा वाजतां शिवमंदिर स्त्रीपुरुषांनीं चिकार भरून गेलें होतें या समारंभाकरितां लोटलेला स्त्रीसमुदाय इतका विविध मनोहर होता कीं, असा देखावा पहावयाला क्वचितच मिळाला असेल. हा अपूर्व समारंभ पहाण्याकरितां लोकसमूह इतका लोटला कीं, त्याची योग्य व्यवस्था ठेवितां ठेवितां राजेसाहेबांकडील हुषार हुषार मंडळीही टेंकीस आली.

## पादुकांची मिरवणूक.

हस्तपत्रकांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें बरोबर साडे सहा वाजतां आद्य शंकराचार्यांच्या पादुकांची मिरवणुक, श्रीचे निवासस्थानापासून, ह्मणजे बापू गोखल्यांच्या श्रीराममंदिरापासून निघाली. मिरवणुकींत † पुढें बँड, नगारा, वाजंत्री,

† या मिरवणुकीच्या व्यवस्थेसाठीं भारतस्वयंसेवक मंडळींचें पथक होतें.

तासे, शृंगारिलेले अश्व असून पाठीमागें पालकी आणि तिच्याबरोबर राजेसाहेबांची मानकरी मंडळी व पुण्यांतील इतर निमंत्रित लोक होते. सुरवातीलाच मिरवणूक बरीच मोठी होती व पुढें पुढें तर तींत लोकांची सारखी भर पडत गेल्यामुळें ती उत्तरोत्तर फारच मोठी होत गेली. अशाप्रकारें मिरवत मिरवत श्रीपादुकांची पालकी शिवमंदिराला येऊन पोंचली. आधींच तें मंदिर प्रेक्षकांनीं चिकार भरलें होतें. त्यांत या मिरवणुकीची भर पडल्यानंतर काय विचारतां ? वारुळावरील मुंग्यांच्या जमावा प्रमाणें शिवमंदीर शोभूं लागलें.

## सार्वजनिक पाद्यपूजा.

इतक्यांत श्रींची स्वारी मंदिरांत येऊन दाखल झाली. श्री येतांच सर्वांनीं उठून त्यांचा सत्कार केला व त्यांना त्यांच्याकरितां स्वतंत्र तयार केलेल्या व्यासपीठाकडे जाण्याला मार्ग करून दिला. श्री व्यासपीठावर विराजमान झाले. त्यांच्या समोरील खुर्च्यादिकांवर त्यांना राजकीय व सामाजिक क्षेत्रांत कार्य करणारे भिन्नभिन्न पक्षाचे पुढारी लोक, धनिक, व्यापारी, मारवाडी, गुजराथी, कॉलेजचे प्रोफेसर, सरकारी अंमलदार, पेन्शनर लोक, सरदार मंडळी, शास्त्री, पंडीत यांची गर्दी दिसत होती. स्त्रीसम्मर्द तर अलोटच होता. या निमंत्रित प्रेक्षकसमूहाकडे सकौतुक दृष्टीनें अवलोकन करीत श्री बसले आहेत, इतक्यांत श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले यांची स्वारी सोंवळ्यानें पूजास्थानीं आली. तेथें येऊन पुजेकरितां ते पाटावर बसल्यानंतर जिकडे तिकडे नितांत शांतता झाली. नंतर श्रींना पूजास्थानीं उपस्थित करण्यांत आले. वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री ताम्हनकर यांनीं आपल्या स्पष्ट आणि शुद्ध वाणीनें खड्या सुरांत वेदोक्त पद्धतीनें यथाविधि श्रींचे पादुकांची पूजा सांगण्यास प्रारंभ केला.

क्षत्रिय कुलावतंस भोंसले राजे आद्य शंकराचार्यांच्या पादुकांची मनोभावानें, भक्तिपुरस्सर पूजा करीत आहेत; श्री शंकराचार्य त्यांचे सन्मुख बसले आहेत; शास्त्रीबुवा सर्वांना उत्तम प्रकारें ऐकूं येईल अशा स्पष्ट वाणीनें व गंभीरपणानें पूजा सांगत आहेत; दुसरे शास्त्री, पंडित व भिक्षुक त्यांचे शेजारीं बसून वेदमंत्राचे स्वर मानेच्या व हातांच्या आंदोलनांनीं दिग्दर्शित करून ताम्हनकर शास्त्र्यांशीं सहकार्य करीत असल्याचें दर्शवीत आहेत व या सर्व गोष्टीला श्रीछत्रपति

शिवाजी महाराज आपल्या शिलारूप सगुण प्रतिमेंत संचार करून साक्षीभूत उभे आहेत, असा देखावा सुमारें अर्धा तास सर्व प्रेक्षकांच्या दृष्टीसमोर सारखा उभा होता. हा देखावा पाहात असतां सर्वत्र बाह्यतः पूर्ण शांतता नांदत होती. परंतु प्रत्येक प्रेक्षक आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणें बाह्य सृष्टीला पूर्णपणें पारखा होऊन या समारंभाचें वैशिष्टय शोधून काढण्याच्या विचारसृष्टींत परिभ्रमण करीत होता.

पादुकांचे पूजेनंतर राजेसाहेबांनीं श्रींची पूजा केली. त्यांना महावस्त्र व दक्षणा अर्पण केली. श्रींच्या गळ्यांत पुष्पहार घालून त्यांना त्यांनीं दंडवत घातला. श्रींनीं राजेसाहेबांना आशीर्वाद व प्रसाद दिला.

नतर राजेसाहेबांनीं श्रीशिवाजीमहाराजांचे पुतळ्याला वंदन करून त्यांच्या गळ्यांत भव्य हार घातला. त्या वेळीं स्वयंस्फूर्तीनें सर्व प्रेक्षक मंडळींनीं एकसमयावच्छेदेंकरून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून ‘ श्रीशिवाजीमहाराजकी जय ’ या नामघोषानें सर्व वातावरण दुमदुमून सोडलें. यापूर्वीं श्रीशिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अनेकांनीं हार घातले असतील व टाळ्यांच्या गजरानें प्रेक्षकांनीं आनंदही व्यक्त केला असेल, पण या वेळच्या टाळ्यांच्या गजरांत किंवा शिवनामाच्या जयघोषांत एका स्वतंत्र दिव्य भावनेचा उत्साह संमिश्रित होता, याची जाणीव प्रत्येक धर्मभावनानिष्ठ प्रेक्षकाच्या अंतःकरणाला झाल्याशिवाय कशी राहील ! शिवनामाच्या जयघोषानें दुमदुमून गेलेलें वातावरण पुन्हां शांत होईपर्यंत श्रीशिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर राजेसाहेब हात जोडूनच उभे होते. त्यांचें लक्ष या वेळीं प्रेक्षकांच्या मनोवृत्तीकडे नसून तें शिवपादकमळीं तन्मय झालें होतें. त्यांनीं या वेळीं आपल्या हातून घडलेली धर्मसेवा शिवरायांचे चरणीं अर्पण केली आणि पुढें अशीच धर्मसेवा आपल्या हातून करून घेण्याविषयीं त्यांना एकभावानें प्रार्थना केली. नंतर उपनयन झालेले राजेसाहेबांचे चि. कुमार प्रतापसिंह व कुमार राजारामसिंह यांनींही पुतळ्याला वंदन केलें. त्या वेळीं सर्वांना परम समाधान वाटलें. आणि अशाच क्षत्रिय पितापुत्रांच्या जोडया श्रीशिवाजी महाराजांच्या मंदिरांत येऊन त्यांची पूजा करीत असतांना आपणांला वेळोवेळीं पहावयाला लाभोत, असें उद्गार कित्येक भावना-प्रधान लोकांनीं त्या वेळीं काढलेही !



श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) व राजेसाहेब.

[K. P. Z. P. B.]

पृष्ठें २३०-२३१.



पुणें येथील लघुरुद्रांतील वैदिक ब्रम्हवृंद व राजसाहेब.

[K. P. Z. P. B.]

पृष्ठें २३०-२३१.

नंतर श्रीमंतांनीं विद्वान शास्त्री पंडितांना महावस्त्रें, व दक्षणा देऊन त्यांची संभावना केली. त्यांत वाईचे दिवेकरशास्त्री, चित्रावशास्त्री, पेंडसेशास्त्री, पटवर्धनशास्त्री वगैरे प्रमूख होते. त्याचप्रमाणें इतर वैदिक निमंत्रित मंडळीचीही यथायोग्य संभावना करून बाकीचे भिक्षुक मंडळींना रुपया रुपया दक्षणा देण्यांत आली. हा दक्षणा देण्याचा समारंभ पुढें बराच वेळ चालला होता.विद्वान शास्त्री पंडितांची संभावना करून दक्षणा देण्याचें काम आपल्या खासगी कारभाऱ्यांवर सोंपवून राजेसाहेब पोषाख करण्याकरितां चालते झाले. श्रींची स्वारी श्रीमंत मातोश्री राणी काशीबाईसाहेब व श्रीमंत सौ. राणी इंदिराबाईसाहेब यांना दर्शन व आशीर्वाद देण्याकरितां मंडपांत गेली. तेथें सर्वांना श्रीफल, प्रसाद वगैरेसहित आशीर्वाद देऊन श्री लवकरच प्रवचनाकरितां केलेल्या प्लॅटफॉर्मवर येऊन अधिष्ठित झाले. श्रीमंत राजेसाहेबही आपल्या दरबारी पोषाखांत येऊन आपल्या स्थानीं विराजमान झालेवर श्रींनीं वे. शा. सं. दिवेकरशास्त्री यांना ' क्षत्रियत्वा ' वर बोलण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनीं ' क्षत्रियत्व ' या विषयावर आपल्या नेहमींच्या अस्खलित वाणीनें महत्वपूर्ण असें भाषण केलें.

## क्षत्रिय आणि ब्राह्मण.

" ते ह्मणाले, शतपथ ब्राह्मणांत ' ब्रह्म व क्षत्र यांत वैषम्य आलें, ह्मणजे समाजाचा, राष्ट्राचा आणि देशाचा नाश होतो ' असें म्हटलें आहे. हल्लीं ब्राम्हण व शूद्रच तेवढे राहिले आहेत, असें कोणी म्हणतात. पण तसें नाहीं. पूर्वीप्रमाणें अजूनही चातुर्वर्ण्य आहे. हल्लीं ब्राम्हण आहेत, असें म्हटलें, तर क्षत्रियही आहेत. असे कबूल केलें पाहिजे. आणि क्षत्रिय नाहींत म्हटलेंतर ब्राम्हणही नाहींत हें मान्य करावें लागेल. जसे सांप्रत ब्राम्हण आहेत, तसे क्षत्रियही आहेत. हल्लींचे राजवाडे, सरदेसाई, वैद्य वगैरे इतिहासकार राष्ट्रकूट, आंध्र, चालुक्य इत्यादि क्षत्रिय होते, असें कागदपत्रांच्या आधारावरून सिद्ध करीत आहेत. यावरून क्षत्रियांची आवश्यकता आहे, व क्षत्रिय होते व हल्लीं आहेत हेंच ह्मणावयाचें आहे. राष्ट्राच्या उन्नतीकरितां शास्त्र व शस्त्र या दोन्हीचीही आवश्यकता आहे. वसिष्ठ ब्राम्हण व रघुनंदनासारखा क्षत्रिय एकच होते. म्हणूनच रावणासारख्या शत्रूचा नाश झाला. समर्थासारखा ब्राह्मण व श्रीशिवाजीसारखा क्षत्रिय एक होते म्हणूनच ' मराठी राज्य ' स्थापन झालें, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. पुराणें

व्यासानें लिहिलीं आहेत; व व्यासांवर ' वेदां ' इतकाच विश्वास आहे. व्यासानें कल्कि पुराणांत ' वर्ण संकर ' होणार असें लिहिलें आहे. पण तें कलियुगाच्या तृतीय चरणांत असें लिहिलें आहे. सध्यां कलियुगाचा प्रथम चरण चालू आहे, हें सर्वांना विदित आहेच. मग ' वर्णसंकर ' झाला आहे, अगर होत आहे. असें कोणी म्हणेल तर तें कसें मानावें ?

शास्त्रीबुवांचें भाषण मुद्देसूद, विनोदगर्भ, विद्वत्ताप्रचूर आणि अस्खलित म्हणूनच परिणामकारक झालें. " त्यानंतर श्रीशंकराचार्यांनीं उपसंहारात्मक भाषण केलें. श्री म्हणाले, कालाला चक्राचा दृष्टांत देतात. चक्र नेहेमीं फिरत असतें. त्या प्रमाणें फिरत्या कालानें मध्यंतरीं ' क्षात्रतेजाला ' खालीं नेण्याचा प्रयत्न केला होता. पण तेंच त्यांना आतां पुन्हां वर आणूं पहात आहे. ईश्वरी योगायोग कोणालाच कधीं कळत नाहीं. परंतु श्रीमंत लक्ष्मणरावांनीं श्रीशिवाजी महाराजांचे पुतळ्याला हार घालतांना मात्र मला फार आनंद झाला. तितका आनंद आचार्यांच्या पादुकांची त्यांनीं पूजा करतांनाहि झाला नाहीं. याचें कारण श्रीशिवाजी महाराजांच्या पुतळ्याला त्यांनीं हार घालतांना 'क्षात्रतेजाचा' हा पुनरुद्धारच होत आहे,अशी माझ्या मनांत त्या वेळीं कल्पना आली. ज्याला जें करावयाचें असतें,तेंच त्यानें करावें असें शास्त्रच आहे. सध्यां आपल्याकडे क्षत्रियत्वाचीच उणीव आहे; आणि क्षात्रतेजच आह्मांला सध्यां पाहिजे आहे. वैदिक धर्माच्या रक्षणासाठींच श्रीकृष्णाला अवतार घ्यावा लागला होता. ब्राह्मणत्वाचे गुण, शांति, दया, समता हे होत. पण हे ज्याचे त्याला रक्षण करितां येत नाहींत हें रक्षणाचें कार्य दुसऱ्यानें करावयाचें असतें. आणि हें रक्षण करणारे तेंच क्षत्रिय होत. ब्राह्मणानें या स्वतःच्या गुणांचें रक्षण करावयास सिद्ध व्हावयाचें ह्मणजे ' ब्राह्मणत्वाचा त्याग ' करावयाचा, असें ह्मटलें पाहिजे. लॉर्ड रीडिंग न्यायाधीश असतांना त्यांची ब्राह्मणबुद्धि ( न्यायबुद्धि ) कशी होती, व तेंच व्हाईसरॉय झाल्यावर ( ह्मणजे त्यांच्यावर स्वतःच्या न्यायबुद्धीचें रक्षण करण्याची जबाबदारी पडल्यावर ) त्यांना त्यांचें ' ब्राह्मण्य ' सोडून गेलें, हें सर्वश्रुतच आहे. हल्लींच्या राजकीय चळवळींत या दृष्टीनें माझ्या मतें मोठी थोरलीच चूक आहे. आपल्यांतून ' क्षत्रिय आणि वैश्य ' नाहींसे झाले नाहींत. त्यांना कांहीं अपरिहार्य कारणामुळें परचक्राच्यापुढें लपून बसावें लागलें होतें. ब्राह्मणांच्या पळीपंचपात्रीवर व शूद्रांच्या केरसुणीवर कोणीही घाला घालीत नाहीं. तर राष्ट्राचे खरे संरक्षक ' क्षत्रिय व वैश्य '

यांनाच तो घाला सोसावा लागता. व तसेंच झालेले आहे. आतां हळुहळु तो काळ बदलत आहे. मध्यंतरीं गैरसमजानें ' ब्राह्मण व क्षत्रिय ' यांत तेढ उत्पन्न झाली असेल, तर ती परस्परांनीं विसरून गेली पाहिजे. व या लपलेल्या क्षत्रियांनीं व वैश्यांनीं राष्ट्राच्या उद्धाराकरितां आतां पुढें आलें पाहिजे. आमच्या क्षत्रियांच्या डोक्यावर पूर्वीप्रमाणें राजमुकुट ठेवण्याची खरीखुरी वेळ येईपर्यंत, आपल्या मनोराज्यांत का होईना तशा प्रकारचा ध्यास ठेवला पाहिजे."

अशा आशयाचें अंत:करणाला गदगदा हालवून सोडणारें, विद्वताप्रचुर असें भाषण झाल्यावर सर्व मंडळींस हारतुरे, अत्तरगुलाब, वगैरे देण्यांत आले. शेवटीं राजेसाहेबांनीं श्रींस आणखी एकदां अभिवादन केलें व निमंत्रणाला मान देऊन आलेल्या मंडळीकडे हात जोडून सभोंवार सर्वांकडे उपकृत दृष्टीनें सानंदपूर्ण पाहिलें. नंतर सर्वांस निरोप देण्यांत आला. अशा प्रकारें श्रीशिवाजी महाराजांच्या गगनभेदी जयजयकारांत हा अपूर्व समारंभ मोठ्या अपूर्व थाटानें पार पडला.

## अस्पृश्यतेची मीमांसा.

अशा प्रकारचा वेदोक्त पाद्यपूजेचा, मोठ्या थाटानें समारंभ करण्यांत, राजेसाहेबांचा अंतिम हेतु काय होता व तो त्यांना साधतां आला किंवा नाहीं हें आपण पाहूं. कारण, वेदोक्त उपनयनाचे बाबतींत जेवढा गाजावाजा वर्तमानपत्रांतून झाला होता, त्याच्या शतपट तो, या वेदोक्त पाद्यपूजेनें झाला. ही पाद्यपूजा करण्यांत पुण्याच्या कांहीं कारस्थानी पुढाऱ्यांचें अंग असून त्यांनीं हा एक अकल्पित डाव टाकला, असा गैरसमज कित्येक पसरवूं लागले. या पाद्यपूजेच्या बुडाशीं संकेश्वरच्या मठाधीश शंकराचार्य आणि करवीर मठाधीश शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांच्यामधील तंट्याचें कांहीं गूढ रहस्य असावें, असें कांहीं गुणगुणूं लागले! कित्येकांनीं असा तर्क बांधला कीं, कोल्हापूरच्या वेदोक्ताशीं या वेदोक्त पाद्यपूजेचा कांहीं तरी निकट संबंध असावा. कोणाला तर असेंही वाटलें कीं, हें कांहीं तरी एक नवीन राजकारस्थान पुण्याला उपस्थित होत आहे. असें एक ना दोन अनेक विचार अनेकांनीं चालू केले, पण त्याला खरें असें तोंड कोठेंच फुटलें नाहीं. बरेच दिवस चर्चा होऊन सर्वांचें तर्कवितर्क जेथच्या तेथें आपोआप थंड झालें. तथापि या पाद्यपूजेशीं स्वत: राजेसाहेब कोणत्या अंतिम विचारांना संलग्न होते, हें पाहिल्यास वरील तर्कवितर्कांचा आपोआप उलगडा होईल.

जबाबदार आणि खानदानीचीं मोठीं माणसें असतात, तीं कार्याच्या उद्दिष्टाचा प्रथमतःच गोपनस्फोट करीत नाहींत. कार्याचें उद्दिष्ट साध्य झालें ह्मणजे तें जनतेच्या दृष्टीला आपोआपच येतें कित्येक कार्यांचें उद्दिष्ट अल्पकाळांत किंवा अल्प परिश्रमानें साध्य होतें, तर कित्येक कार्यें अशीं आहेत कीं, त्यांचें उद्दिष्ट साध्य व्हावयाला कितीतरी कालावधि जावा लागतो. शिवाय, कांहीं कार्यें अशीं असतात कीं, तीं अनेक प्रसंगीं अनेक कार्यांत यश संपादन करीत करीत शेवटीं तीं साध्य करून घ्यावीं लागतात. उदाहरणार्थ ' अस्पृश्यता निवारण ' घेऊं. समूळ अस्पृश्यता काढून टाकणें, हा उद्दिष्ट हेतु मानला, तर तो साध्य करून घ्यावयाचा ह्मणजे एकाच प्रसंगानें किंवा एकाच कार्यानें सर्वस्वीं साध्य होत नाहीं. तो साध्य करून घ्यावयाचा ह्मणजे क्रमाक्रमानें व पायरीपायरीनें आणि यथाकालावधीनें साध्य करून घ्यावा लागेल. परशरामक्षेत्र ह्मणजे कोंकण, हें ब्राह्मणांचें ह्मणजे ' शास्त्रा 'चें केंद्रस्थान होय. त्या परशराम क्षेत्रांत अस्पृश्य लोकांची सांवली पडली, तर सचैल स्नान केल्याशिवाय ब्राह्मण शुद्ध होत नाहीं. तेंच सह्याद्रि पर्वत ओलांडून देशावर आलें कीं, ती सांवलीची मर्यादा आंगाला आंग भिडपर्यंत ह्मणजे प्रत्यक्ष स्पर्शास्पर्शापर्यंत येऊन ठेपली. ह्मणजे कोंकणांतील सांवली पडणें व देशावर प्रत्यक्ष स्पर्श होणें, इतकें उभय स्थितींतील अंतर थोड्याशा सीमोल्लंघनानें झालें आहे तत्त्व अगर शास्त्र सीमोल्लंघनानें किंवा समुद्रोल्लंघनानें कमी जास्त प्रमाणांत रूपांतर होणारें नसतें. आणि तसें तें होईल, तर तें तत्त्व किंवा शास्त्रच नव्हे, असें ह्मणावें लागेल. आतां सांवलीची मर्यादा स्पर्शापर्यंत जर आकुंचन करता येते, तर तें शास्त्र नसून रूढि असेंच अस्पृश्याच्या बाबतींत ठरतें. रूढि ही समाजाच्या भावनांवर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, ' परमेश्वर आहे असें मानणें ' हें तत्त्व किंवा शास्त्र आहे. परंतु 'परमेश्वर' हा मूर्तीत, व्यक्तींत, पंचमहाभूतांचे ठिकाणीं, व्यक्त किंवा अव्यक्त मानणें, हें भावनेचें लक्षण आहे. आतां भावना ही सहवास, शिक्षण आणि त्याप्रमाणें येणारे अनुभव यांवर अवलंबून असते. तेव्हां रूढि व भावना यांच्याशीं शास्त्राचा तत्त्वापुरताच संबंध येतो. अशा स्थितींत शास्त्रांतील तत्त्वांचें उल्लंघन न करतां रूढी आणि भावना यांना मर्यादित करण्याचा देश, काल, वर्तमान या दृष्टीनें अधिकारी पुरुषाला अधिकार पोंचतोच. अस्पृश्यता ही रूढि मानली तर ही रूढि कोणत्या शास्त्राच्या तत्त्वावर उभारली गेली

आहे, तें पहावें लागेल. ' अस्पृश्यता ' ह्मणजे स्पर्श करण्यास अयोग्य ती. अशी ही साधी व सरळ व्याख्या होते. आतां स्पर्श करण्यास अयोग्य वस्तु कोणती, तर जी त्याग केलेली असते ती होय. जिचा आपण त्याग करतो, ती वस्तू आपणाला अस्पृश्य असते. या अस्पृश्य वस्तूंचे तीन भाग आहेत. १ कायिक २ वाचिक आणि ३ मानसिक. कायिक अस्पृश्यता म्हणजे देहानें त्याग केलेल्या वस्तू. उदाहरणार्थ, घाण, अस्वच्छता, संसर्गजन्य रोग, शारीरिक अमंगलता वगैरे गोष्टी कायिक अस्पृश्यता यांत येतात. वाचिक अस्पृश्यता ह्मणजे वाणीनें त्याग केलेल्या गोष्टी. उदाहरणार्थ, असत्य, बीभत्स किंवा अश्लील भाषण हें होय. आणि मानसिक अस्पृश्यता ह्मणजे मनानें त्याग केलेल्या गोष्टी. उदाहरणार्थ, संन्याशानें मनानें कनक आणि कांता यांचा त्याग केला असतो, ह्मणून संन्याशाला कनक आणि कांता या अस्पृश्य गोष्टी आहेत. एकंदरींत शास्त्रांतील या तत्त्वाच्या दृष्टीनें ही अस्पृश्यता झाली आणि ती तात्त्विक दृष्टीनें अबाधित अशीच आहे. परंतु तत्त्वाला न सोडतां रूढींत तिचा फेरबदल केव्हांही करतां येतो. सध्यांची अस्पृश्यता ही कायिक स्वरूपाची आहे. घाण, अस्वच्छता, संसर्गजन्य रोग आणि शारीरिक अमंगलता या तात्त्विक स्वरूपाला न सोडतां रूढींत फेरफार सहज करतां येतो. सध्यांच्या अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या लोकांना इतर स्पृश्य लोकांनीं त्याग केलेल्या गोष्टींपासून परावृत्त केलें कीं, त्यांचें अस्पृश्यत्व जाऊन ते स्पृश्यच होतील. त्यांची गलिच्छ रहाणी व त्याग केलेल्या वस्तूंचें सेवन या गोष्टी त्यांच्या बंद झाल्या, ह्मणजे ते तात्त्विक दृष्टीनें स्पृश्यच झाले. आतां तात्त्विक दृष्टीनें स्पृश्य झालेले अस्पृश्य रूढीनें स्पृश्य मानले जाणें, हें अधिकारी पुरुषाच्या कर्तबगारीवर व कार्य करण्याच्या कुशलतेवर अवलंबून असतें. तत्त्व हें वृक्षाचें मूळ आहे पण रूढिही वृक्षाच्या शाखा पल्लव, फुलें, फळें, यांनीं मनोहर बनलेली असते. ह्मणूनच धर्माचें शास्त्र किंवा तत्त्व हें अव्यक्त स्वरूप व रूढि हें व्यक्त स्वरूप बनलें आहे. समाज हें व्यक्त स्वरूपाचें घटक असल्यामुळें ' शास्त्रात् रुढिर्बलीयसि ' अशीं वचनें अस्तित्वांत आलीं. मूळ तत्त्वाला मागें सारणारी जी रूढि ती भावनाप्रधान असल्यामुळें भावनांचा उच्छेद करून रूढि बनविण्याचा प्रयत्न केला, तर भावनेच्या उच्छेदाबरोबर रूढि व तत्त्व हीं सर्वच विराम पावतील. ह्मणून सहवासानें व शिक्षणानें भावना बदलविणें व भावना बदलवून रूढींत फरक करून घेणें याच गोष्टी अस्पृश्यता निवा-

रणाच्या बाबतींत तत्त्वत: क्रमाच्या पायऱ्या आहेत, व त्या क्रमानें समाजाला चढवावयाला लावणें, हेंच अधिकारी लोकनायकांचें कर्तव्य असतें. व हें कर्तव्य पार पडण्याला काल, परिश्रम याची मुबलक मर्यादा असावी लागते. एकाच वेळेच्या प्रसंगानें अगर थोड्या परिश्रमानें तें साध्य होत नाहीं. ह्मणून तीं अनेक प्रसंगीं अनेक कार्यांत यश संपादन करीत करीत शेवटीं उद्दिष्ट साध्य करून घ्यावें लागतें, आणि उद्दिष्ट साध्य होईपर्यंत जबाबदार आणि खानदानीचीं जीं मोठीं माणसें असतात, तीं त्याचा स्फोट करीत नाहींत. समाज मात्र आपल्या बुद्धीप्रमाणें, आणि उतावळ्या स्वभावामुळें आपल्या मनाला येईल त्याप्रमाणें तर्कवितर्क रचीत असतो. पण कार्याचें महत्व जाणून थोर माणसें आपलें कर्तव्यच करीत असतात.

## शाहु छत्रपतींची चिकाटी.

हिंदुस्थानांत सांप्रत अस्पृश्य मानल्या जाणाऱ्यांची सुमारें पांच सात कोटी लोकसंख्या आहे. जगाचें राजकारण सांप्रतच्या परिस्थितींत मताधिक्याच्या बळावर चालणारें असल्यामुळें अस्पृश्य लोकांच्या पांच सात कोट लोकसंख्येची अर्थात राजकारणी लोकांना जरूरी भासून त्याकरितां त्यांच्याबद्दल राजकारणी लोकांना प्रेमाचा हलके हलके पान्हा फुटूं लागला. त्यामुळें अल्पसंख्याक अशा अन्य धर्मांच्या अनुयायांची दृष्टि आपापल्या धर्माच्या वाढीकरितां या अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या पांच सात कोटी लोकसंख्येकडे वळूं लागली. हिंदुस्थानालाही हिंदुस्थानी स्वराज्यदृष्टि फुटण्याचे अगोदर पूर्ण नि:स्वार्थ बुद्धीनें आणि हिंदुधर्माची लाज राखण्याचे हेतूनें हिंदु धर्मांतील पददलित जो अस्पृश्य समाज त्याची उन्नति आणि उद्धार करण्याकडे कोणाचीच दृष्टि गेली नव्हती. राजर्षि श्रीशाहु छत्रपति, श्री० विठ्ठल रामजी शिंदे वगैरे हाताचे बोटांवर मोजण्यासारख्या थोर व्यक्तींचे मात्र कळकळीचे प्रयत्न चालू होते. हे प्रयत्न मानवी जातीच्या व हिंदुधर्माच्या कळकळीचे किंवा नि:स्वार्थ बुद्धीचे अगर परोपकार वृत्तीचे असे होते; तरी बहुजन समुदायाला त्या वेळीं ते पटले नाहींत. उलट या थोर पुरुषांच्या कार्यांत समाज शक्य तेवढे अडथळे उत्पन्न करूं लागला. अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या समाजाची मात्र स्थिति या घोटाळ्यामुळें विपरीत झाली. आई जेऊं घालीना व बाप भीक मागूं

देईना अशी स्थिति झाली. त्यांना धड हिंदुधर्मांचा आसरा मिळेना; बरें, परधर्मांत जावें तर पूर्व संस्कारामुळें हिंदुधर्माविषयीं ज्या पूज्य भावना हाडींमासीं खिळून राहिल्या होत्या, त्या त्यांना तसं करूं देईनात. याच स्थितींत अन्य धर्मियांचेही त्यांच्यावर निरनिराळ्या स्वरूपाचे हल्ले होऊं लागले. त्यामुळें हा समाज दिशाभूल झालेल्याप्रमाणें स्तंभित झाला. आतां यापुढें हिंदुसमाजानें या अस्पृश्य समाजाकडे डोळेझांक केली, तर हा डळमळलेला समाज कोणत्या तरी परधर्मांत लवंडून पडेल व त्यामुळें हिंदुधर्मांचें नुकसान होईल, अशी श्रीशाहु छत्रपति वगैरेंची बालंबाल खात्री झाल्यामुळें व हिंदुधर्मरक्षण हें विशेषतः 'भोंसले' घराण्याचें ब्रीद असल्यामुळें छत्रपतींना या समाजाला आपला स्वतःचा पूर्ण आधार द्यावा लागला. श्रीशाहु महाराजांचा ज्याप्रमाणें विशाल देह होता, त्याचप्रमाणें त्यांची बुद्धि, धैर्य आणि कार्य करण्याची चिकाटीही परमेश्वरानें त्यांचे ठिकाणीं विशालच उत्पन्न केली होती. त्यांचा आधार या अस्पृश्य समाजाला मेरु पर्वताप्रमाणें अढळ वाटला व त्यामुळें धर्मांतराच्या वगैरे त्यांच्या कल्पना पार नाहींशा होऊन ते हिंदुधर्मांतच राहून आपली उन्नति करून घेण्याच्या सरळ मार्गाला लागले. ही शाहु महाराजांची थोर कृति, खोलविचार सरणी आणि हिंदुधर्माच्या संरक्षणाची श्रेष्ठ कामगिरी वरवर पाहणाऱ्या समाजाच्या लक्षांत कोठून येणार ! श्रीशाहुमहाराजांची ही कर्तबगारी भिक्षुक वर्गाला प्रत्यक्ष प्रळयाप्रमाणें भीषण स्वरूपाची वाटू लागली. भिक्षुक वर्ग हा सर्वसाधारण शास्त्र अगर तत्त्व याच्यापेक्षां रूढीला जास्त चिकटलेला असल्यामुळें व धार्मिक दृष्टीनें समाजावर त्याचें वजन जास्त असल्यामुळें बहुजन समाज श्रीशाहु महाराजांना निरनिराळ्या प्रकारानें नांवें ठेवूं लागला. पण ते धीरोदात्त व गाढ कर्मनिष्ठ असल्यामुळें लोकनिंदा पचवित पचवित आपलें उद्दिष्ट कार्य यथासंकल्प चालवीत राहिले.

## छत्रपति व धर्मपति.

एकदां एका निश्चयी वृत्तीच्या मनुष्यानें आपल्या कार्यक्षेत्राची रूपरेखा आंखली म्हणजे तो त्या दृष्टीनें कार्य करूं लागतो. नंतर त्याला त्या कार्यांत जीं विघ्नें येतील तीं तो आपल्या बुद्धीप्रमाणें आणि सहकारी लोकांच्या विचारानें टाळण्याचा प्रयत्न करीत असतो. याच धोरणानें आपण आंखणाऱ्या व आंखलेल्या कार्यक्षेत्रांत हिंदुधर्माच्या धार्मिक दृष्टीनें सहकारी होतील या हेतूनें डॉ० कुर्तकोटी हे

उदार मतवादी असलेनें त्यांची करवीरमठाचे गादीवर शंकराचार्य म्हणून निवड करण्यांत श्रीशाहु महाराजांनीं आपला दूरदर्शीपणा दाखविला होता. एखाद्या स्थानाकरितां योग्य मनुष्याची निवड करणें व त्याप्रमाणें त्या स्थानावर तो बसविणें हें श्रीशाहु महाराजांनीं आपल्या अधिकाराप्रमाणें व विचाराप्रमाणें बरोबर केलें. पण गादीवर बसल्यानंतर जो अधिकार मिळतो व ज्या धर्मबंधनांनीं तो अधिकार चालवावा लागतो, ती जबाबदारी मागें लागली म्हणजे केवढाही उदारमतवादी मनुष्य असला, तरी त्या बंधनांच्या दडपणाखालीं त्याला आपलीं उदार मतें मर्यादित करण्याचा प्रसंग येतो. या जबाबदारीची जाणीव होणाऱ्या शंकराचार्यांनें व नेमणाऱ्या अधिकारी पुरुषानें अशा उभयतांनींही ठेवावी लागते. डॉ० कुर्तकोटी हे शंकराचार्य झाल्यानतर त्यांच्या मठच्या परंपरेस व धर्मशासन-बंधनाला त्यांना जखडून जाणें प्राप्त झालें. उलट श्रीशाहु महाराजांना त्यांनीं आंखलेल्या कार्यक्षेत्रांत जेवढा श्रीशंकराचार्यांचा उपयोग त्यांच्या इच्छेप्रमाणें व्हावा, तेवढा होईनासा झाला भिक्षुक वर्गाची श्रीशाहु महाराजांच्या थोर व दूरदर्शी विचारसरणीचें आकलन करून घेण्याची पात्रता नव्हती. बहुजन समाजाच्या धर्मभावना भोळ्या आणि तत्त्वबाह्य; पण त्यांच्यावर भिक्षुकी वजनाचें दडपण होतें. आणि भिक्षुकांच्या धार्मिक बंधनाच्या गुंफेंत शंकराचार्य हे सांपडल्यामुळें त्यांना सामाजिक प्रगतीच्या मार्गावर स्वतंत्रपणें वळतांच येईना आणि श्रीशाहु महाराजांनाही त्याच मार्गावरून माघार घेतां येईना. कारण, खरा क्षत्रिय तोच कीं ज्याला प्रारब्धकर्मांत माघार घेण्याची कधींच संवय नसते. अशा परिस्थितींत श्रीशंकराचार्य व श्रीशाहु महाराज या उभयतांचीही आपआपल्या कार्यक्रमणाचें बाबतींत कुचंबणा होऊं लागली दोघेही पुरुष कार्यतत्पर. लोककार्य व धर्मकार्य करणें हें दोघांचेंही ध्येय. पण दोघेही एकाच कार्याला विरुद्ध दिशेनें ओढूं लागले, त्यामुळें दोघांचीही स्तंभित स्थिति झाली. तेव्हां श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) हे संचार करण्याचे उद्देशानें व स्वतंत्रपणें धर्मसेवा करण्याचे प्रेरणेनें करवीर संस्थानक्षेत्राचे बाहेर पडले.

## सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर.

श्रीशंकराचार्य करवीर संस्थानांतून बाहेर पडल्यानंतर श्रीशाहूछत्रपतींनीं अंगीकृत कार्याच्या सिद्धीकरितां हिंदुधर्माचें अधिष्ठान आपणाला पाहिजे म्हणून एका

क्षात्रजगद्गुरूंची प्राणप्रतिष्ठा केली व आपलें कार्य सुरू केलें. या गोष्टीवरून महाराष्ट्रांतील हिंदु समाजांत बराच गोंधळ माजला. भिक्षुकांना असें वाटलें कीं, करवीर संस्थानांतून ब्राह्मण्याची उचलबांगडी झाली. आतां करवीर क्षेत्रांत एकाही ब्राह्मणाला राहणें अशक्य होणार. त्यांत जोशी आणि कुलकर्णी यांच्या वतनासंबंधीं कोल्हापूरदरबारनें तेथील राज्यकारभाराला अनुसरून जे निर्णय दिले, ते जोशी व कुलकर्णी यांना अन्यायाचे वाटल्यामुळें याच्या मुळांशीं ब्राह्मणब्राह्मणेतर या वादाचेंच स्वरूप आहे, अशी त्यांची कल्पना झाली. सामान्य समाजाला असें वाटलें कीं श्रीशाहुमहाराजांनीं ब्राह्मणांची हाकालपटी केली व त्यांची जागा अस्पृश्यांना जवळ करून भरून काढली. उलटपक्षीं ब्राह्मणेतर पक्षाच्या लोकांना असें वाटलें कीं, आतां ब्राह्मण जाणार तेव्हां आपणाला संस्थानच्या मोठ्या मोठ्या नोकऱ्या मिळतील. ब्राह्मणांचें वर्चस्व निघून गेलें म्हणजे आपणांला खऱ्या स्वराज्याचा अनुभव मिळेल. भलत्याच धर्मबंधनानें आपण जखडून गेल्यामुळें श्रीशाहुमहाराजांनीं हा धर्माचा कांटाच काढून टाकून आपणांला स्वतंत्र बनविलें. वगैरेसारख्या यांच्या बुद्धीप्रमाणें त्यांनीं आपआपल्या कल्पना करून घेतल्या. या कल्पनेप्रमाणें परस्पराच्या कार्यांच्या दृष्टी बदलल्या व त्याप्रमाणें भिन्न भिन्न स्वरुपाची कार्येंही दिसूं लागलीं. सत्यशोधक पक्षानें ब्राह्मणांची उघड निंदा करण्याचा प्रयत्न चालविला त्या पक्षाच्या तत्त्वांचा फैलाव होण्याकरतां सत्यशोधकी तमाशे गांवोगांव होऊं लागले. ठिकठिकाणीं या तमाशामुळें दंगेधोपे होऊन अनवस्था प्रसंग येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. अशा प्रकारें हिंदु समाजामध्यें ज्या वेळीं खळबळ उत्पन्न झाली त्या वेळीं समाजाची घडी व धर्माची घडी फिरून बसविण्याची कामगिरी जबाबदार लोकांवर अर्थात पडली व त्याप्रमाणें त्यांच्यामध्यें विचारविनिमय सुरू झाला.

## दोन ध्रुव.

अर्थातच हाच प्रश्न आमचे चरित्र—नायकांच्या पुढेंही उपस्थित झाला. त्यांनीं श्रीशाहु महाराजांच्या अंगीकृत कार्याचा शांतपणें पूर्ण विचार केला. विचाराअंतीं त्यांच्या विचारसरणीचें रहस्य राजसाहेबांचे लक्षांत आलें. थोर माणसांच्या अंतःकरणाचा ठाव थोर माणसेंच जाणूं शकतात. त्यांनीं असा विचार केला कीं, अस्पृश्यता निवारणाचे बाबतींत श्री शाहु महाराजांनीं ज्याअर्थी

एवढा पुढाकार घेतला आहे व त्याकरितां ते ज्याअर्थी तनमनधनेंकरून एवढा प्रयत्न करीत आहेत, त्याअर्थी उथळ पाण्याच्या खळखळीप्रमाणें त्यांचा हेतु केवळ वरोपांगीं न घेतां त्यांत कोणता तरी गूढार्थ असला पाहिजे. या गूढार्थाची त्यांना एवढी कल्पना आली कीं, या प्रसंगीं ब्राह्मणांना दूर केलें तरी हरकत नाहीं, कारण, सध्यां ब्राह्मण दूर झाले, तर ते कांहीं उपाशी मरत नाहींत किंवा त्रागा करून घेऊन धर्मांतर करीत नाहींत. फार झालें तर धर्माच्या नांवाखालीं आपली व आपल्या सहकारी पक्षाची हेटाळणी करतील. त्यांचेकडून होणारी हेटाळणी परवडली, पण आज ज्या समाजाकडे दुर्लक्ष केल्यामुळें हिंदुधर्माचें कधीं न भरून येणारें नुकसान होणार आहे तें अत्यंत घातक असें त्यांना वाटून त्यांनीं हा मार्ग स्वीकारला असावा. पाण्यावर काठी मारून पाणी जसें दुभंगत नाहीं, कांहीं वेळ दूर राहून फिरून तें मिळून जातें, त्याप्रमाणें ब्राम्हण तूर्त दूर केलें तरी आपणाला कधींच सोडून जाऊं शकत नाहींत. पण अस्पृश्य लोकांना अशा गांजलेल्या स्थितींत निराधार सोडलें, तर त्यांच्यावरील परधर्मीयांचा डोळा व दिवसेंदिवस जगाची शिक्षणांतली प्रगति यामुळें भोळ्या धर्मवेड्या कल्पनांचा उत्तरोत्तर होणारा नाश या सर्व कारणपरंपरेचा दुष्परिणाम असा होईल कीं आपला पांच सात कोटींचा हिंदुसमाज परधर्मांत एकदम जाईल. आपण धर्मसंरक्षक क्षत्रिय जीवंत असतांना हें असें होणें हें कांहीं आपणाला पाहणें होणार नाहीं; ह्मणून हें कठोर कर्तव्य करण्याचें त्यांनीं अंगिकारलें असलें पाहिजे. हा श्रीशाहु महाराजांचा सद्धेतु राजेसाहेबांचे मनाला पूर्ण पटला व त्या हेतूला कोठें न दुखवतां किंवा तो हेतु कोठें उघड न मांडतां श्रीशाहु महाराजांचे कर्तव्याच्या आड जीं विघ्नें येणारीं होतीं व जी प्रतिक्रिया समाजांत उत्पन्न झाली होती व होणार होती, ती टाळण्याच्या कामगिरीचें त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र निर्माण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ते इ. स. १९२१ पासून कार्यतत्पर झाले.

राजेसाहेबांच्या कार्यक्षेत्राची मर्यादा तात्त्विक दृष्टीनें विशाल अशी होती, तरी कार्याच्या दृष्टीनें ती तितकी अशक्य कोटींतली नसली, तरी सुलभहि नव्हती. श्रीशाहु-महाराजांनीं आपलें ध्येय साध्य होईतोंपर्यंत ब्राह्मण वर्गाला ह्मणजे धर्माचे अधिकारी ह्मणणाऱ्या सोंवळ्या ब्राह्मण वर्गाला दूर केलें होतें. तरी त्यांना दूर केल्याप्रमाणें न वाटूं देतां त्यांना आपला पाठिंबा देऊन त्यांचेचकडून क्षत्रिय व वैश्य यांचीं धर्म-

कृत्यें वेदोक्त करावयाला लावणें. आणि वर्णसंकर होऊं न देतां, वर्णाश्रमधर्माप्रमाणे समाजाला आपापलीं विहित कर्मे क्रमाक्रमानें करावयाला भाग पाडून श्रीशाहु-महाराजांचा अस्पृश्यता निवारणाचा हेतु सर्व हिंदुसमाजाच्या संमतीनें आस्ते आस्ते यशस्वी करून दाखविणें, एवढें कार्य करण्याची जबाबदारी समतोल वृत्ति ठेवून राजेसाहेबांनीं आपले शिरावर घेतली.

## टीकाकारांची दिशाभूल.

ब्राम्हणांना दूर ढकलून देण्याकरितां श्रीशाहु छत्रपतींना ज्याप्रमाणें ब्राह्मणांचे शक्य तवढे संबंध तोडणें क्रमप्राप्त झालें, त्याचप्रमाणें आपण समाजांतून दूर ठेवले गेलों आहोंत, ही भावना ब्राम्हणांची न होण्याकरितां त्यांचे संबंध जितके जवळ करितां येतील तवढे करणें राजेसाहेबांना क्रमप्राप्त झालें. श्रीशाहु छत्रपति आणि राजे लक्ष्मणराव भोंसले हे उभयतांही श्रीशिवाजी महाराजांचे वंशज. उभयतांचा हिंदुधर्म-संस्थापना करण्याचा संकल्प. पण समाजाच्या दृष्टीनें उभयतांच्या कार्याची दिशा परस्पर विरोधी अशी दिसूं लागल्यामुळें श्रीशाहुमहाराजांच्या पक्षानें राजे-साहेबांवर ' भटाळले ' म्हणून टीकेचा वर्षाव करावा व राजेसाहेबांच्या पक्षानें श्रीशाहु महाराज ' अति शूद्राळले ' असें म्हणून टीका करावी. पण या टीकांकडे उभयतांनीं यत्किंचितही लक्ष दिलें नाहीं. इतकी टीका होत असतांना ज्याअर्थी ही मंडळी तिकडे लक्ष देत नाहींत, उलट जास्त उमेदीनें आपलें कार्य कर-तात याचें कारण काय असावें, इकडे ग्रंथकारांची, वृत्तपत्रकारांची, पक्षाभिमानानें प्रेरित झालेल्या समाजाची किंवा उभयपक्षीय वक्त्यांची कोणाचीच आजपर्यंत दृष्टि गेली नाहीं. पण उभय पक्षाचे टीकाकारांनीं उभयतांचा खरा हेतू काय होता हें समजून घेण्याचा प्रयत्न न करितां ज्या टीकारूपी लाठीनें पाण्याचा भंग करण्याचा प्रयत्न केला त्यानें पाणी तर भंग झालें नाहींच उलट टीकाकारांच्या अकलेचें तुट-लेले तारे मात्र पांढऱ्यावर काळे होऊन कायमचे राहिले !

## मार्ग भिन्न, ध्येय एक.

श्रीशाहु छत्रपति आणि आमचे चरित्र—नायक यांच्या कार्याच्या भिन्नत्वाची किंवा विचार-भिन्नत्वाची सरणी सामाजिक वादाला कारणीभूत झाली होती, ती केवळ

सराफी भांडणाप्रमाणें होती. सराफी दुकानावर एकाच घरांतले दोघे भाऊ घरा-ण्याची मत्ता व कीर्ति वाढविण्याकरितां व्यापाराला बसतात. गिऱ्हाईक माल विक-ण्याकरितां दुकानांत येतो. त्या दोघांपैकीं एकजण तो माल पहातो. कस लावतो व नंतर काय भावाप्रमाणे विकावयाचें असा गिऱ्हाईकाला प्रश्न विचारतो. गिऱ्हाईक आपल्या मालाला चार पैसे जास्त यावेत या हेतूनें मालाच्या योग्य किंमतीपेक्षां जास्त किंमत सांगतो. ती किंमत ऐकल्याबरोबर मालांतील असतील नसतील तेवढे सर्व दोष दाखवून योग्य किंमतीपेक्षां निम्यानें देखील आपणाला घ्यायला पर-वडत नाहीं असें म्हणून तो माल मोठ्या घमेंडीनें गिऱ्हाईकाच्या अंगावर फेंकून देतो. गिऱ्हाईक ओशाळल्याप्रमाणें होऊन माल घेऊन जाऊं लागतो. तोंपर्यंत दुसरा भाऊ सर्व प्रकार स्वस्थपणें पहात असतो. गिऱ्हाईक दुसऱ्या दुकानांत जाणार असें वाटल्याबरोबर त्याला तो दादा, बाबा करून बोलावतो. व वडील भावाला म्हणतो, ‘ दादा हें आपलें इतक्या दिवसाचें जुनें गिऱ्हाईक आणि त्याला तुह्मी दुसऱ्या दुकानांत जाऊं देतां ! तुम्ही जर आमच्या अशा जुन्या गिऱ्हाइकांना दूर ढकलाल तर तुमच्या आमच्यांत येथेंच तंटे होतील. मी आपला गप्प बसतों, म्हणून तुह्मी आपलें वाटेल तसें गिऱ्हाईक पिटाळून लावता.’ असें म्हणून त्या गिऱ्हा-इकाला ‘ बसा बाबा, ’ म्हणून माल काढण्याकरितां सांगतो. गिऱ्हाईक माल काढून दाखवितो. नंतर त्या दोघां भावांत दिखाऊ भांडण चालू होतें. धाकटा भाऊ मालाचे गुण वर्णन करतो व थोरला त्याच दोष दाखवीत असतो. मध्यंतरीं दोघां भावांत अगदीं हमरी तुमरीपर्यंतही प्रसंग येतो. तो इतका कीं, गिऱ्हाइकाला वाटतें कीं, धाकटा भाऊ आपल्याकरितां वडील भावाबरोबर वेगळा व्हावयालाही तयार होत आहे. आपलें हित व्हावें, असें त्याला वाटत आहे. तेव्हां तो जें म्हणतो, त्याच्याबाहेर आपणाला जातां कामा नये. असा विचार करून शेवटीं आपलें नुकसान होत असलें, तरी तें पतकरून धाकट्या भावाच्या शब्दाला मान देऊन तो माल विकून जातो. असा प्रकार बहुतक प्रत्येक गिऱ्हाइकाबरोबर होतोच. तात्पर्य एवढेंच कीं, उभयतां भाऊ परस्पर विरोधी बाजू घेऊन भांडतात खरें, पण तें भांडण गिऱ्हाइकाला दिसण्यापुरतेंच असतें. ह्मणून गिऱ्हाइकांनीं या दोघां भावांवर किती जरी बरी वाईट टीका केली तरी तिचा त्यांच्या मनाला बिलकुल स्पर्श होत नाहीं. उलट आपल्या कार्याचा चांगलाच परिणाम

होत आहे, असें त्यांना वाटतें. हाच प्रकार या उभयतां भोंसले बंधूंचे बाबतींत होता. धर्मसंस्थापना करणें, हें घराण्याचें कर्तव्य दोघेही बंधू तनमनधनेंकरून करीत होते. त्यांच्या कार्याचें फल त्यांना मिळत होतें, मग समाजाच्या वेड्या समजुतीप्रमाणें त्यांचेवर टीकेचा भडिमार झाला, तर त्यांना ते कशाला भीक घालणार ?

## एका म्यानांत दोन तलवारी.

श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांची पाद्यपूजा जाहीर पद्धतीनें करण्यांत राजेसाहेबांचा कोणता गर्भित हेतु होता, हें आतां चांगल्या प्रकारें लक्षांत येईल, असें आह्मांला वाटतें. शिवाय त्यांत दुसराही एक हेतु होता. श्रीशाहु महाराजांना ब्राह्मण दूर केल्यानंतर धर्मशासनाचा अधिकार आपल्या हातांत घ्यावा लागला होता. त्यांचे हातांत क्षत्रियत्वाला अनुलक्षून राजशासन तर होतेंच आणि त्याबरोबर ब्राह्मणांचें धर्मशासनही त्यांनीं हातीं घेतलें. **राजशासन आणि धर्मशासन हे दोन्ही अधिकार एका व्यक्तीच्या हातीं येणें, हें तात्त्विक दृष्ट्या अनिष्ट आहे.** एका शासनाची एक पद्धत तर त्याच्या अगदीं उलट दुसऱ्या शासनाची असल्यामुळें एका व्यक्तीला एकाच वेळीं दोन्ही पद्धतींप्रमाणें शासन देणें, अशक्य असतें. शिवाय **शास्त्र आणि शस्त्र हे दोन्ही अधिकार एका व्यक्तीला मिळाले ह्मणजे स्वभावतःच आंगीं उन्माद उत्पन्न होतो.** त्यामुळें कशी विचित्र परिस्थिति समाजांत उत्पन्न होते, हें चित्र राजेसाहेबांच्या डोळ्यांपुढें उभें होतें. पुराणकालीं परशराम, राम आणि कृष्ण हे अवतार झाले. परशराम हा ब्राह्मण असल्यामुळें शास्त्राचा अधिकारी; पण त्याला क्षत्रियांचा अधिकार जें शस्त्र तें क्षत्रियांपासून हिसकून घेण्याची बुद्धि झाली. दैवयोगानें तें त्याला मिळाल्यामुळें परशराम शास्त्र आणि शस्त्र या दोन्ही अधिकाराचा मालक झाला. त्यामुळें त्याला उन्माद होऊन एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची महत्वाकांक्षा त्याला उत्पन्न झाली. शेवटीं श्रीरामचंद्रासारखा क्षत्रिय उत्पन्न होऊन त्याच्याकडून पराभव पावून आतां आपलें सामर्थ्य चालत नाहीं ह्मणून देशांतर करून सह्याद्रि पर्वतापलीकडे हद्दपार झाल्याप्रमाणें त्याला आपला शेषकाल कंठावा लागला. याप्रमाणें ब्राह्मणानें शस्त्र हातीं धरल्यामुळें उन्माद होऊन शेवटीं शस्त्राचा

अधिकार कवडीमोल झाला. त्याचप्रमाणें शास्त्राला शस्त्राची जोड मिळून शास्त्राचेही बाबतींत उन्माद झाल्याशिवाय राहिला नाहीं. ब्राम्हण हे शास्त्रानें चालणारे त्यामुळें सामाजिक बंधनें अगदीं विकोपाला गेलीं. त्याचें पर्यवसान असें झालें कीं, केवळ काल्पनिक पातकाच्या राईचा पर्वत करून जमदग्नीनें दिलेल्या स्त्रीहत्येच्या आज्ञेची अक्षरशः बजावणी परशुरामानें तावडतोब केली. शिवाय ती स्त्री तर परशुरामाची प्रत्यक्ष माता होती ! इतका हा शास्त्र हातीं असल्याचा उन्माद. स्त्रीजात तेवढी पापी अशी याच प्रसंगानें परशुरामाची समजूत झाली व तो आजन्म ब्रह्मचारी राहिला.

पुढील माणसाला ठेंच लागली ह्मणजे मागचा शहाणा होतो, या नियमाप्रमाणें ' राम ' अवताराला सुरवात होतांच ब्राह्मणांच्या हातीं शास्त्र व क्षत्रियाच्या हातीं शस्त्र आलें. त्यामुळें धर्मशासन व राजशासन हे अधिकार विभागले गेले. त्यामुळें वसिष्ठासारखे दया, क्षमा आणि शांति आजन्म धारण करणारे ब्राह्मण झाले. त्याचप्रमाणें एकपत्नी, एकवचनी, एकबाणी असे श्रीरामचंद्रासारखे क्षत्रियही निपजले. धर्मनीति आणि राजनीति या दोन्ही दृष्टीनें राम अवतार हा सर्व अवतारांत श्रेष्ठ गणला जातो, याचें हेंच रहस्य आहे. श्रीकृष्ण अवतारीं क्षत्रियांनीं ब्राह्मणांचें शास्त्र हस्तगत केलें; त्यामुळें फिरून एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं शस्त्र आणि शास्त्र यांचे एकीकरण झालें. श्रीकृष्णांनीं शस्त्र आणि शास्त्र हातीं घेतल्यामुळें त्यांचेकडूनही परशुरामाप्रमाणें उन्मादच झाला; तो इतका कीं स्वतः क्षत्रिय असून त्यांनीं भारतीय युद्धप्रसंगीं शस्त्रसंन्यास केला. त्यामुळें धर्माची सात्विक न्यायबुद्धि नष्ट होऊन कुटिल नीतीला प्राधान्य मिळालें. शिवाय, क्षत्रियांचे हातीं शास्त्र गेल्यानें समाजांतील धर्मबंधनें शिथिल होऊन पांच पतींच्या स्त्रियेला पतिव्रता मानण्यांत आलें. सोळा हजार एकशें आठ स्त्रिया करूनही ब्रह्मचारी ह्मणवून घेण्यापर्यंत पाळी आली ! एकंदरींत परमेश्वरानें निरनिराळीं रूपें घेऊन ज्या लीला केल्या त्या केवळ गोष्टी ऐकून करमणूक करून घेण्याकरितां नव्हत. प्रत्येक गोष्ट समाजाला विचार करून आपला मार्ग सरळ आंखण्याला सुलभ जावें एवढ्याकरितां आहे. शिवाय, वंशविस्ताराच्याही दृष्टीनें विचार केला तर परशुराम ब्रह्मचारी असल्यानें त्याचा पुढें वंश नाहीं. श्रीकृष्ण सोळा हजार एकशें आठ स्त्रियांचा पति बनल्यामुळें त्याचाही पुढें वंश राहूं शकला नाहीं. त्याचप्रमाणें द्रौपदीनें पांच पती केले ह्मणून

तिचाही वंश जीवंत राहूं शकला नाहीं. परंतु श्रीरामाचा वंशविस्तारमात्र गंगेच्या ओघाप्रमाणें अखंड आहे, हें आपणाला आजमितीला दिसतें. यावरून एका वर्णाच्या मनुष्यानें दुसऱ्या वर्णाचीं कर्में हस्तगत करणें, हें सृष्टीच्या नियमाला विघातक असल्या-मुळें थोड्याशा कारणापुरतें तसें करण्याला जरी कोणतीच हरकत नसली, तरी तें वंशपरंपरेनें चालविण्याची परिस्थिति उत्पन्न होऊं देऊं नये. ज्यामुळें ही परिस्थिति अस्तित्वांत आली असेल तें कारणच निर्मूलन व्हावें व वर्णाश्रम धर्माप्रमाणें पुन्हां सर्व समाजानें चालावें, हाच हेतु राजेसाहेबांचा जाहीर पाद्यपूजेंत होता. ब्राम्हणांची क्षत्रियांकडे वेदोक्त काम करण्याची तयारी नाहीं किंवा ब्राम्हण शंकराचार्यांची वेदो-क्ताला अनुमति नाहीं असें कोणत्याही क्षत्रियाला अगर वैश्याला वाटूं नये व ब्राम्ह-णांनाही कलियुगांत क्षत्रिय आणि वैश्य यांच्या अस्तित्वाची शंका राहावयाला नको, एवढाच हेतु या शंकराचार्यांच्या पाद्यपूजेंत होता. यावरून राजेसाहेबांना ब्राम्हणांना डोक्यावर घेऊन नाचवावयाचें नव्हतें किंवा ब्राम्हणेतर पक्षाकडून निंदा करून घेऊन मोक्षप्राप्ति किंवा लोकमान्यता संपादावयाची नव्हती. त्यांचे विचार किती दूर-दर्शीपणाचे होते व ते समाजाच्या किती श्रेष्ठ हिताचे होते, हें लक्षांत येईल.

## धर्मरक्षण हेंच साध्य.

पुराणांतरींचा विषय बाजूला ठेवून आधुनिक इतिहासाकडे जरी लक्ष पोंच-विलें, तरी अशाच प्रकारचा उन्माद शास्त्र आणि शस्त्र यांच्या एकहातीं अधिकारा-मुळें होत असतो, हें आपल्या लक्षांत येईल. सातारच्या गादीवर श्रीछत्रपति शाहु महाराज बसल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांनींही शस्त्रसंन्यास घेतला. त्यामुळें पेशवे ब्राह्मण असतांनासुद्धां त्यांनीं शास्त्राबरोबर शस्त्र धारण केलें. त्याचा धार्मिक तऱ्हेनें असा उन्माद झाला कीं, थोरल्या बाजीरावाची यावनी रक्षा मस्तानी हिला मुलगा झाला. पुढें तो मोठा झाल्यावर त्याचें उपनयन करण्याचा बाजीरावानें हट्ट धरला. येथपर्यंत धर्मबंधनांचें उल्लंघन करण्याची मनोवृत्ति बाजीरावाचे ठिकाणीं उत्पन्न झाली. यावरूनही चातुर्वर्ण्याची कशी जरूरी आहे, प्रत्येक वर्णानें आपलें विहित कर्म कसें केलें पाहिजे, तें समाजाला कसें हितपरिणामी असतें, त्यामुळेंच रामावतार कसा श्रेष्ठ झाला, तसाच आपला समाज श्रेष्ठ झाला पाहिजे या हेतूनें व या विचारानें समाजाची पूर्ववत् संस्थापना करण्याची जरूरी होती ह्मणूनच हा पाद्यपूजेचा जाहीर समारंभ राजेसाहेबांनीं

केला होता. त्याचप्रमाणें इ. स. १९२६ मध्यें रायगडावर जो महोत्सव झाला, त्या महोत्सवाचे अध्यक्षाची कामगिरी बजावल्यानंतर राजेसाहेब पुण्याला आले, त्या-वेळीं साठ ब्राह्मणांकडून त्यांनीं ' लघुरुद्र ' करविला. त्याचेंही रहस्य हेंच, हें कांहीं नव्यानें सांगणें नकोच.



## प्रकरण ११ वें.

# नागपुरांतील धर्म-सत्याग्रह.

## पूर्व पीठिका.

नागपुरांत हिंदूंच्या वाद्यांबाबत जो हिंदुमुसलमानांत लढा उत्पन्न झाला होता आणि ज्या लढ्यामुळें शेवटीं हिंदूंना सत्याग्रह करून आपला धार्मिक हक्क हस्तगत करून घ्यावा लागला. त्या धर्मसत्याग्रहांत आमचे चरित्रनायकांनीं पुढाकार घेऊन व शेवटीं हिंदु-मुसलमान यांत ऐक्य घडवून आणून शांतता प्रस्थापित केली, आणि जो सत्याग्रह हिंदुस्थानांत हिंदु लोकांच्या वाद्यांचे हक्क संरक्षण करण्याबाबत आदर्शभूत झाला, त्याची थोडी विस्तारपूर्वक हकीकत दिल्यास या महत्वाच्या कामगिरीची यथायोग्य कल्पना हिंदु समाजाला येऊन त्याप्रमाणें वागण्याला बरें पडेल. ह्मणून पूर्व पीठिकेपासून आह्मी हा विषय देत आहोंत.

नागपुरांत हिंदु आणि मुसलमान या दोन्ही समाजांत पहिल्यापासून इतर ठिकाणाप्रमाणेंच ऐक्य नांदत होतें. मशिदीवरून वाद्यें वाजत गेल्यामुळें किंवा इदीच्या गोवधासंबंधीं भांडणें गेल्या पंचेवीस तीस वर्षांत झालेलीं नागपुरांतील जनतेला माहीत नव्हतीं. हिंदू लोकांच्या श्रीगजानन–विसर्जनाच्या मिरवणुकी, आषाढी कार्तिकी एकादशींच्या किंवा शिवरात्रीच्या दिंड्या; मारबद, वगैरेंच्या मिरवणुकी वगैरे वगैरे बँड, ढोल, तासे, वाजंत्री वगैरे वाजवीत मशीदीसमोरून निःशंकपणें जात असत. या वाद्यांस मुसलमान लोकांकडून कधीं प्रतिबंध झालेला कोणाला माहीत नव्हता. त्याचप्रमाणें हिंदु लोक मुसलमान बंधूंच्या मोहरमच्या उत्सवांत भागही पण घेत. पंजे, ताबूत वगैरे बसविण्याच्या बाबतींत हिंदूच लोक मुसलमान बंधूंना मदत करीत. प्रत्यक्ष नागपूरचे उभयतां राजे श्रीमंत राजे बहादूर रघोजीराव व श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले हे कित्येक वेळां मुसलमान बंधूंच्या मोहरमामध्यें प्रामुख्यानें भाग घेत. त्यांचे ताबुतांबरोबर गाड्याघोड्यांचा लवाजमा

ठेवून आपण स्वतः त्यांचे मिरवणुकींत भाग घेत असत. अशा प्रकारें उभय धर्मांचे लोक समजुतदारपणानें, एकमेकांच्या धर्मभावनांविषयीं आदर ठेवून व एकमेकांना जरूर त्या सवलती देऊन मोठ्या आनंदानें आणि गुण्यागोविंदानें नांदत आले. परंतु हें उभय समाजांतील ऐक्य कलहप्रिय लोकांना थोडेंच आवडणार आहे! उभय पक्षांत तंटा उत्पन्न करून देऊन आपण मजा पहात बसण्याची त्यांना संवयच असते. तेव्हां हिंदुमुसलमान लोकांतील ऐक्य त्यांना कसें बरें वाटेल! म्हणून त्या लोकांनीं संधि साधून उभय समाजांत धर्माच्या नांवावर कलह उत्पन्न करण्याच्या उपद्व्यापाला सुरवात केली.

## तंट्याचें मूळ—गणेशपेठेंतील नवी मशीद.

नागपुरांत शुक्रवार तलावाचे दक्षिण बाजूला ' गणेशपेठ ' या नांवाचा एक भाग आहे. त्या पेठेंत ' गणेश मंडळ ' या नांवाची सार्वजनिक उत्सव साजरे करणारी एक संस्था आहे. ही बरीच जुनी संस्था असून ती प्रत्येक वर्षी जन्माष्टमी, श्रीगणेश उत्सव, कार्तिक मासांत कांकड आरती, नामसप्ताह वगैरे धार्मिक उत्सव साजरे करीत असते. या संस्थेच्या कार्यमंदिरापासून जवळच गणेश पेठेंतील कांहीं मुसलमान रहिवाशांनीं झोंपडीवजा मशीद बांधण्यास सुरवात केली. त्या वेळीं झोंपडीवजा मशीद बांधणाऱ्या मुसलमान लोकांचें व त्या पेठेंतील इतर हिंदु लोकांचें मशीद बांधण्याचे कामीं बोलणें चालणें होऊन आमची ' मशीद तुमच्या कोणत्याही मिरवणुकीस कोणत्याही प्रकारें आड येणार नाहीं, ' अशी हमी आणाशपथा घेऊन तेथील मुसलमान लोकांनीं त्या पेठेंतील हिंदु लोकांना दिली. त्यामुळें तेथें मशीद उभारण्यास तेथील हिंदु लोकांनीं कोणत्याही प्रकारची हरकत केली नाहीं. उलट ही मशीद वाईट हेतूनें बांधली जात नसून तीमुळें गणेश पेठेंतील मुसलमान बंधूंची सोय होत आहे, म्हणून कांहीं परोपकारी हिंदु लोकांनीं ती मशीद बांधण्यास पैशाचीही मदत केली. मशीदीची जागाही एका हिंदूचीच होती. अशा हिंदु मुसलमानाच्या सलोख्यानेंच ती झोंपडीवजा मशिद उभारण्यांत आली.

## चंचुप्रवेशो मुसलप्रवेशः।

या गोष्टीला वर्ष दीड वर्ष होतें न होतें तोंच या झोंपडी वजा मशिदीचें

रूपांतर पक्क्या मशिदीमध्यें करण्यांत झालें. त्या वेळेपासून कोणत्या तरी क्षुल्लक कारणांवरून हिंदु मुसलमानांत कटकटी उत्पन्न होऊं लागल्या. ‘ समोरच्या रस्त्यानें जाऊं नका; आजुबाजूच्या घरांत किंवा देवळांत वाद्यें वाजवूं नका.’ असे अडथळे मधून मधून उपस्थित करण्यांत येऊं लागले. तेव्हां तेथील मुसलमानांना त्यांच्या वचनाची आठवण वरचेवर करून देऊन आपापले कार्यभाग कसंबसं हिंदु लोक करून घेऊं लागले. हिंदु लोकांनीं आपल्या स्वभावधर्माप्रमाणें आपल्या मुसलमान बंधूंच्या धर्मकृत्यांत अगर निमाजाच्या वेळीं कोणत्याच प्रकारचा त्यांना अडथळा करण्याचा प्रयत्न किंवा निष्कारण त्यांना उपसर्ग पोंचण्यासारखी कटकट कधींच केली नाहीं. परधर्माबद्दल विनाकारण अनादर दाखविण्याची हिंदु लोकांची स्वभावतःच प्रवृत्ति नसल्यामुळें मुसलमान बंधूंच्या निमाजाच्या वेळा चुकवून ते आपण होऊनच मोठमोठीं वाद्यें बंद करून व लहान व मंजूळ वाद्यें सुरू ठेवून मशिदीवरून मिरवणुक नेत असत. पण पुढें थोड्याच दिवसांनीं ‘ तुह्मी पखवाज बंद ठेवा, ’ असा मुसलमानांनीं हट्ट धरला. तेव्हां विनाकारण वाद व तंटा नको, ह्मणून हिंदूंनीं तीही गोष्ट कबूल केली. पण याहीपुढें टाळ, विणा, हींही वाद्यें नकोत, असें म्हणण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. तेव्हां हिंदूंनीं उभय धर्मांतील कांहीं प्रमुख मंडळीस बोलावून त्यांच्या करवीं उभयतांत सलोखा करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत यश न येतां मुसलमान बंधूंनीं शेवटीं हिंदूंना सरकार दरबार दाखविला. मे. तहशीलदार व मे. सिटी मॅजिस्ट्रेट मि. स्लेनी यांनीं गणेश पेठेंत येऊन मुसलमान मंडळींस सामोपचाराच्या चार गोष्टी सांगितल्या. ‘ तुमची मशीद अवघी दोन वर्षांची आहे, पण त्यासाठीं हिंदु लोकांचा कैक वर्षांचा हक्क तुह्मी कसा बुडवितां ? निमाजाच्या वेळां वगळून इतर वेळीं मिरवणुकी जाऊं देणस हरकत नाहीं. ’ वगैरे गोष्टी त्यांस समजावून सांगितल्या; पण हेकेखोर लोकांची थोडीच समजूत पडणार आहे ! आणि समजुत पडली तर त्यांना हेकेखोर तरी कसें म्हणतां येईल ! त्यांनीं सरकाराकडे फिरून आणखी एक अर्ज केला. उभय पक्षांच्या वकिलांचें ह्मणणें ऐकून घेऊन केवळ शांतताभंगाच्या भीतीमुळें मॅजिस्ट्रेटनें हिंदू लोकांस दिंडी न नेण्याचा हुकूम फर्माविला.

## गणपति--विसर्जन राहिलें !

हा काल म्हणजे इ० स० १९२३ च्या सप्टेंबर महिन्याचा होता. श्री

गजाननाच्या प्राणप्रतिष्ठा सर्वत्र होऊन चार आठ दिवस झाले होते. नागपुरांतील हिंदुसमाज आतां श्रीगजाननाच्या विसर्जनाच्या तयारीला लागला होता. तोंच वरील हुकूम सोडण्यांत आला. अर्थात या गणेश पेठेंतील ' गणेश मंडळाच्या ' गणपति विसर्जनाची मिरवणूक दिंडी वगैरे न काढतां गुपचुप नेणें, हें हिंदुसमाजाला रास्त दिसलें नाहीं. सरकारी हुकूम मिळवून व शांतताभंगाची भीति घालून आपली कैक वर्षांचो वहिवाट मुसलमान बंधूंनीं बंद पाडावी, हें त्यांना योग्य न वाटल्यामुळें त्यांनीं गणपतिविसर्जनाची मिरवणूक तात्पुरती बंद ठेवण्याचा संकल्प केला; आणि जाहीरनामा काढून नागपूरचे हिंदू लोकांना जाहिर केलें कीं, ' नागपुरांतील हिंदु मुसलमानांचें ऐक्य रक्षण करण्याकरितां उभय पक्षांतील पुढाऱ्यांकडून याबद्दल विचार होऊन योग्य निकाल होईपर्यंत गणपतिविसर्जन तहकूब ठेवण्यांत आलें आहे. ' अशा आशयाचें ' गणेश मंडळाचे ' सेक्रेटरी श्री. गणपतराव तितरमारे यांनीं ता. २४ सप्टेंबर सन १९२३ इ. रोजीं पत्रक काढून प्रसिद्ध केलें. त्याच दिवशीं रात्रीं गणेश पेठेंतील सार्वजनिक गणपतीसमोर हिंदूंची जाहीरसभा श्री. महादेवरावजी सोनुने यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. या सभेत हिंदुमुसलमानांतील हा तंटा प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें मध्यस्त पडून मिटवावा, असा ठराव पास झाला. व तो प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडे अध्यक्षांकडून पाठविण्यांतही आला.

## खिलाफत कमेटी आपल्या वळणावर गेली.

कॉंग्रेस ही जातिविशिष्ट संस्था नाहीं. हिंदी राजकारण हें या संस्थेचें ध्येय आहे. या संस्थेत हिंदू किंवा मुसलमान हा भेदभाव नाहीं. या संस्थेच्या कोणाही सभासदाचा दर्जा तो अमक्या धर्माचा ह्मणून कमी किंवा जास्त नाहीं. ह्मणून या सर्वमान्य संस्थेकडून आपल्याला या तंट्याचा निर्णय मिळावा या हेतूनें गणेशपेठेंतील विचारवंत हिंदूंनीं वरीलप्रमाणें ठराव करून प्रांतिक कॉंग्रेस कमिटीस न्यायदेवता मानून तिकडे धांव घेतली. कांग्रेस कमिटीसही वाटलें कीं, खिलाफत ही आपली धाकटी बहीणच आहे. तेव्हां तिच्याबरोबर विचार-विनिमय केल्यानें आपलें काम सहजच होईल. या उद्देशानें कॉंग्रेस कमिटीनें याबाबत खिलाफत कमिटीशीं पत्रद्वारें विचारणा चालविली. परंतु खिलाफत कमिटीकडून तिचें उत्तर असें आलें कीं, हिंदूंनीं सरकारी हुकमाप्रमाणें मशिदीच्या दोन्हीं बाजूंस दहा

दहा पावलें वाद्यें बंद ठेवावीं अर्थात या उत्तरानें कॉंग्रेस कमिटीला आपल्या सख्ख्या बहिणीची मदत मिळत नाहीं, उलट तीही आपणाला विरोध करणार, असें दिसलें. तेव्हां नागपूर-नगर-कांग्रेसचे कांहीं सभासद गणेश पेठेंत जाऊन हिंदूमुसलमानांचा सलोखा करण्याचे प्रयत्न करूं लागले. या गणेश पेठेच्या मशिदीला कांहीं विलक्षण स्वरूप येणार ह्मणून वेळींच त्याची पूर्व तयारी करून ठेवावी ह्मणून तेथील मुसलमानांनीं म्युनिसिपालिटीची परवानगी न घेतां रातोरात आमरस्त्याच्या बाजूला मशिदीच्या आवाराला दरवाजा नव्हता तो, नवाच त्यांनीं पाडून बांधून घेतला. नगर कॉंग्रेस कमिटीच्या मध्यस्थीचा कांहीं एक उपयोग न होतां दरवाजाचा मात्र नवीनच प्रकार घडला ! हें पाहून त्या कमिटीनें आपले हात टेंकले. यामुळें प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या प्रयत्नाचें काय फळ मिळतें, याकडे सर्वांचे डोळे लागले. प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें या गोष्टीचा विचार करण्याकरतां एक कमिटी नेमली. त्या कमिटींत डॉ. मुंजे, केळकर, ओगले, घोरपडे, टिकेकर, वगैरे सहा हिंदु आणि समीउल्लाखान, प्रो. कबीर, अबीदअल्ली असे तीन मुसलमान मिळून नऊ इसम होते. ही पोट कमिटी नेमल्यानंतर मुसलमानांची जाहीर सभा होऊन स्थानिक खिलाफत कमिटीतर्फे या प्रकरणाबाबत प्रतिनिधी ह्मणून समीउल्ला, कबीर, नातिक युसुफशरीफ व नबाब नियाजउद्दीनखान यांस निवडण्यांत आलें.

## कॉंग्रेस कमिटीचे शिकस्तीचे प्रयत्न.

मध्यंतरीं कॉंग्रेसच्या पोट कमिटीची सभा भरून पूर्ण विचाराअंतीं तिनें खालीलप्रमाणें ठराव पास केला.

" हिंदु व मुसलमान यांच्यामधील भांडणाचा निकाल लावण्यासाठीं एक ' नॅशनल पॅक्ट ' राष्ट्रीय तहनामा तयार होत आहे. तो कोकोनाडा कॉंग्रेसच्या वेळीं पास होईल. त्याच्या धोरणाप्रमाणें गणेश पेठेंतील भांडणाचाही निकाल लावण्यांत येईल, पण तो लागेपर्यंत गणेश पेठेंतील मुसलमानांनीं गणपतीची मिरवणुक जशी गेल्या वर्षी गेली, तशीच फक्त यंदांच्याही वर्षी जाऊं द्यावी. असा या कमिटीचा एक मताचा अभिप्राय आहे. "

हा कॉंग्रेस पोट कमिटीनें पास केलेला ठराव स्थानिक खिलाफत कमिटीतर्फे निवडलेल्या प्रतिनिधींपुढें ह्मणजे शरीफ, नातिक, नबाब नियाजउद्दीनखान यांचेपुढें

मांडण्यांत आला. पण ते म्हणाले, ' मशीदीच्या दोन बाजूंस दहा दहा पावलें जागा सोडून इतर जागीं हिंदूंनीं वाद्यें वाजवावींत, ' त्याला आमची कोणतीच हरकत नाहीं . फक्त मशीदीसमोरमात्र एकही वाद्य वाजवितां कामा नये; असें आमच्या जमातीचें ह्मणणें आहे. त्याच्याबाहेर आह्मांस जातां येत नाहीं; आणि तसा जाण्याचा आह्मांस अधिकारही नाहीं. याबाबत तुह्मांला तुमचा कार्यभाग सफळ व्हावा ह्मणून अशी युक्ति सुचवितों कीं, तुह्मीं मशिदीसमोर दहा पावलें जागा रिकामी सोडून दोन बाजूंला दोन वाद्यांचें ताफे वाजत उभे ठेवावे. मात्र या मधल्या जागेंतून जातांना वाद्यें बंद ठेवावीं. या योजनेनें तुमचें वाद्य बंद पडणार नाहीं व मशिदीसमोरून ठराविक जागेंतून वाद्यें वाजत गेलीं, असें आह्मांसही वाटणार नाहीं. ' अशी नवीन वकिलीयुक्ति या प्रतिनिधींनीं सुचविली. परंतु ती कोणासच पटली नाहीं. यामुळें कॉंग्रेस कमिटी व खिलाफत कमिटी यांची एकवाक्यता न झाल्यानें हा न्याय मिळण्याचा मार्गही गणेशपेठेंतील हिंदूंचा बंद पडला.

## भोंसले राजे आणि धार्मिक सत्याग्रह.

मनुष्य हा प्रयत्नवादी आहे. एकदां एका मार्गानें प्रयत्न चालू झाले, म्हणजे त्यांत त्याला जरी अपयश आलें, तरी त्यापुढें तरी यश येईल, या हेतूनें त्याचे पुढील प्रयत्न दुसऱ्या मार्गानें चालू रहातात. त्याचप्रमाणें गणेश पेठेंतील हिंदूंची स्थिति झाली. त्यांना पहिल्यानें आपसांतलि प्रयत्नांना अपयश आलें. पुढें कोर्टांतील दाव्यांतही त्यांना टोला बसला. नंतर कॉंग्रेस कमिटीची मध्यस्थीही निरुपयोगी ठरली. एकंदरींत सर्व बाजूंनीं अपयशाचा अंधःकार त्यांना दिसूं लागून पुढील मार्गही त्यामुळें त्यांना दिसेनासा झाला. गणेश पेठेंतील सार्वजनिक गणपति विसर्जन न होतां हिंदु लोकांच्या सामर्थ्याला अजमावून पाहण्याकरितां साक्षीभूत होऊन तटस्थ बसून तेथील हिंदु लोकांना दररोज 'निःक्षत्रिय पृथ्वी झाली काय ? ' ह्मणून मुग्ध प्रश्न विचारीतच होता. या मुग्ध प्रश्नाची जाणीव गणेश पेठेंतील प्रत्येक हिंदूला प्रत्येक क्षणाला होत होती. या वेळीं आपला व आपल्या धर्माचा कोणीच वाली नाहीं, असेंही कित्येकांना वाटून ते हताश होऊं लागले. परंतु परमेश्वराची लीला कांहीं और आहे. मनुष्याला प्रसंग आणून मूढ बनवितो व तोच शेवटीं त्याला मार्ग दाखवून आपल्या अस्तित्वाची साक्ष पटवून देतो.

ह्मणूनच जगांत परमेश्वर आहे, असें सरतेशेवटीं नास्तिकालाही कबूल करणें भाग पडतें.

## धर्माचे आधार क्षत्रियच.

स्वधर्मावर घाला पडला असतां त्याचें रक्षण क्षत्रियांनींच करावें व त्यांनाच त्यांत आजपर्यंत यश येत गेलें आहे. असा आजपर्यंतचा इतिहास सांगतो. तेव्हां नागपूरचे क्षत्रिय कुलावतंस श्रीमंत राजेलक्ष्मणराव भोंसले यांच्याशिवाय या धार्मिक कलहांत तनमनधनेंकरून कोणी वीर पडणार नाहीं व आपणाला यश मिळण्याचा कोणता एकच मार्ग असेल तर आपण त्यांची भेट घेऊन त्यांच्यावर या धर्माच्या संरक्षणाची जबाबदारी टाकावी; हिंदुधर्माचें रक्षण करणें हें क्षत्रियांचें ब्रीद आहे. शिवाय कलियुगांत क्षत्रिय नाहींत, असें तेलंग शास्त्र्यांसारखे ब्राह्मण धर्मग्रंथांचा आधार देऊन गर्जना करीत असतां ज्यांनीं आचारांनीं व वेदोक्त धर्मकृत्यें पार पाडून आपलें ह्मणजे क्षत्रियांचें अस्तित्व पुन्हां हिंदुलोकांना कबूल करावयाला नुकतेंच लाविलें, त्यांच्यावर त्यांच्या कर्तव्यकर्माची जबाबदारी टाकली, तर ती त्यांना नाकबूल करितां येणार नाहीं. असा विचार करून गणेश पेठेंतील हिंदूंनीं राजेसाहेबांची याबाबत भेट घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांची सल्ला घेतली. डॉ. मुंजे वगैरे हिंदु पुढारी लोकांशीं विचारविनिमय केला. आणि हा हिंदुमुसलमानांतील धार्मिक तंटा केवळ गणेश पेठेपुरता राहिला नसून त्याला सर्व हिंदुस्थानांतील हिंदुमुसलमानांच्या धार्मिक कलहाचें स्वरूप आलें आहे. तेव्हां राजेसाहेबांची भेट घेऊन त्यांनाच पुढाकार देऊन त्यांच्याच मदतीनें या तंट्याचा निकाल लावावयाचा असा सर्वांनीं श्रीगजाननासमोर दृढ निश्चय केला.

## मोहरें इरेस घातलें.

इकडे राजेसाहेबही कांहीं स्वस्थ बसले नव्हते. गणेश पेठेंतील या धार्मिक लढ्याची हकीकत त्यांच्या कानावर रोज येतच होती. पण कॉंग्रेस कमिटीसारखी सर्व जातींची, सर्व वर्णांची राजकारण साधणारी जबाबदार संस्था ज्याअर्थीं मध्यस्थी करीत आहे, त्याअर्थीं हा लढा विकोपाला न जातां तो शेवटीं आपसातींल मिटेल, असें राजेसाहेबांना अखेरपर्यंत वाटत होतें. कॉंग्रेस कमिटीची गोष्ट खिलाफत

ऐकणार नाहीं, असें मात्र राजेसाहेबांना बिलकुल वाटलें नव्हतें. म्हणूनच ते इतके दिवस निर्धास्त राहिले होते. शेवटीं निरुपायानें गणेश पेठेंतील पुढारी, व डॉ. मुंजे वगैरे हिंदु पुढारी यांनीं राजेसाहेबांची ठरल्याप्रमाणें भेट घेतली. त्यांनीं या लढ्याबाबत आजपर्यंत झालेली सर्व हकीकत राजेसाहेबांना कागदपत्रांनिशीं समजावून दिली. आतांपर्यंत सामोपचाराच्या सर्व गोष्टी झाल्या. हिंदु लोकांचें बेकायदेशीर असें कोणतेंच वर्तन झालें नाहीं, असें असतां मुसलमान लोक केवळ हेकेखोरपणाणें हिंदूंच्या धर्मकृत्यांत व्यत्यय आणतात. तेव्हां यापुढें हें प्रकरण आपण हातीं घ्यावें व आमच्या सर्वांच्या मदतीनें आपण यांत यश संपादन करावें. आतां हा लढा गणेश पेठेपुरता राहिला नसून सर्व हिंदुस्थानचा झाला आहे. वगैरे सर्व हकीकत सांगून राजेसाहेबांची सर्व बाजूनें तयारी आहे, असें पाहून या सर्व मंडळींनीं या धर्मयुद्धाची ध्वजा त्यांचे हातीं दिली, आणि नागपूरच्या हिंदु जनतेनें हें अस्सल क्षत्रिय राजमोहरें धर्मरणक्षेत्रावर ढकललें.

## पांच टाळांचा समेट.

क्षत्रियकुलावतंस असतात त्यांनीं एकदां मनाचा निश्चय करून एकाद्या कार्याचा पुरस्कार केला म्हणजे मग त्यांना खाणें. पिणें, झोंप घेणें, ऐषआराम करणें, या नित्य परिचयाच्या गोष्टींचा तेव्हांच विसर पडतो. आणि अंगीकृत कार्य हाच आपला प्राण, हेंच आपलें जीवन, हाच आपला धर्म अशी त्यांची समजूत होऊन ‘ देह जावो अथवा राहो ’ या भावनेनें ते कार्याच्या मागें लागतात. त्याप्रमाणें राजेसाहेबांस अंगीकृत कार्याचा निजध्यास लागला. त्यांनीं गणेशपेठेंतील पुढारी मुसलमान मंडळींना बोलाविलें. दुसरेच दिवशीं कांकड आरती सुरू होणार असल्यामुळें त्यांनीं त्या मुसलमानांना, ‘ कांकड आरतीच्या धर्मकृत्यांत खंड न पाडण्याकरितां मशिदीवरून केवळ पांच टाळांची दिंडी, टाळ वाजविणें मुळींच बंद न ठेवितां जाण्याबद्दल तुमची कबुली आहे किंवा नाहीं, याचें विचारपूर्वक उत्तर द्या. ’ असा सवाल केला. राजेसाहेबांनीं ही बाब आपले हातीं घेतली आहे, हें त्या मुसलमानांना कळून चुकलें होतें. राजेसाहेबांचे हे निर्वाणीचे शब्द त्यांना नाकबूल करवेना. त्यांनीं राजेसाहेबांचे शब्दाला मान दिला व त्याप्रमाणें दुसरे दिवसापासून सुरू होणाऱ्या कांकड आरतीला पांच टाळ अखंड वाजवीत जाण्याची मोठ्या समाधानानें परवानगी दिली.

## मुसलमानांनीं वचन मोडलें.

दुसरे दिवशीं ह्मणजे बुधवार ता. २४ आक्टोबर सन १९२३ इ. रोजीं पहांटे चार वाजतां उठून स्नान, संध्या, पूजा वगैरे आटोपून कांकड आरतीचे वेळीं गणेश पेठेंत मशीदीसमोर राजेसाहेब स्वतः जाऊन उभे राहिले. गणेश पेठेंतील हिंदु समाज राजेसाहेबांचे येण्याची मार्गप्रतीक्षा करीतच होता. राजेसाहेब त्या ठिकाणीं जातांच कांकड आरती निघाली. आदले दिवशीं गणेश पेठेंतील मुसलमान लोकांनीं कबूल केल्याप्रमाणें मशीदीसमोर दहा पावलांपुरती पांच टाळांची दिंडी वाजत नेऊन बुधवारची कांकड आरती तंटा न होतां राजेसाहेबांनीं उभय पक्षाची समजूत घालून पार पाडली. ही कांकड आरती याप्रमाणें पार पडलेली हकीकत गांवांतील इतर मुसलमान लोकांना समजली. गणेश पेठेंतील मुसलमान लोकांनीं आपणां सर्वांना तोंडघशीं पाडलें, हिंदू लोकांच्या वाद्यांचा तंटा एवढ्या थराला नेऊन सरकार कोर्टांतून त्यांचेविरुद्ध निकाल मिळवून शेवटीं राजेसाहेबांचे वजनाला ऐन प्रसंगीं ते वळी पडले, म्हणून त्यांना राग आला. त्यांनीं मुसलमानांच्या जमाती गोळा करण्याची खटपट चालविली. ठिकठिकाणचे मशिदींत त्यांच्या सभा भरूं लागल्या. शेवटीं त्यांनीं गणेश पेठेंतील मशीदीसमोर कोणतेंही वाद्य वाजवूं द्यावयाचें नाहीं, असा आपला हट्ट अर्थात दुराग्रह चालविण्याचा संकल्प केला. या संकल्पाला डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. गोव्हन यांनीं मशिदीसमोर वाद्यें वाजविण्याबाबत पूर्वीच पोलीस अॅक्ट कलम ३० खालीं मनाई हुकूम काढल्यानें सहजच पाठिंबा मिळाला होता. त्यामुळें मुसलमान लोकांना आपला हट्ट पुरा करून घेण्याची पूर्ण उमेद होती.

## सत्याग्रहाला तोंड लागलें.

गुरुवारीं ( ता. २४ ) मुसलमान लोकांनीं कांकड आरतीच्या वाद्यांस मनाई करण्याचा चंग बांधला. ता. २१ सप्टेंबर सन १९२३ इ. रोजीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं वाद्यांबाबत जो मनाई हुकूम काढला होता, तें शस्त्र मुसलमान लोकांनीं हातीं धरिलें. अर्थात दुसरे दिवशीं ह्मणजे गुरुवारीं सकाळीं सरकारानें गणेश पेठेंतील मशीदीसमोर पोलिसचा कडेकोट बंदोबस्त ठेवला. सकाळीं श्रीमंत राजेसाहेब तेथें येऊन पहातात, तों

गणेश पेठेंतील मुसलमान मंडळी मशीदींत नसून दुसरीच मंडळी तेथें दिसूं लागली. शिवाय पोलीसचा कडेकोट बंदोबस्त दिसल्यामुळें पकडापकडीला सुरवात होणार हें त्यांना दिसलेंच. आदले दिवशीं ज्यांनीं परवानगी दिली, ती मुसलमान मंडळी जागेवर नसून दुसरीच मुसलमान मंडळी येऊन वाद्यांला विरोध करण्याकरितां तयार झालेली पाहून मुसलमानांच्या या दुटप्पी वृत्तीचें राजेसाहेबांना सखेद कौतुकच वाटलें. पण एकदां पुढें पाऊल टाकल्यानंतर त्याचा सोक्षमोक्ष लावावयाचा हा त्यांचा बाणा असल्यामुळें त्यांनीं सत्त्याग्रहाची ताबडतोब तयारी करून दिंडी काढली. मशिदीसमोर वाद्यें येतांच पोलीसनीं दिंडीवाल्यांना रोंखलें. त्यांनीं दिंडीवाल्यांना सांगितलें कीं, 'मशीदीवरून जाणें असेल तर टाळ वगैरे वाद्यें बंद करावीं लागतील आणि तीं वाजवीत जाणें असेल, तर तुह्मीं दुसऱ्या' रस्त्यानें जावें. या रस्त्यानें तुह्मांला टाळ वाजवीत जाण्याची मनाई आहे.' पोलिसांच्या या सांगण्याला दिंडीवाल्यांनीं अर्थात जुमानिलें नाहीं. तेव्हां त्या ठिकाणीं दिंडींतील पंधरा लोकांना पोलिसांनीं पकडलें. दिंडीवाले आरतीसह टाळ वाजवीत वाजवीत पोलिसांसमवेत सिटी पोलीस कचेरींत गेले. तेथें त्यांची ताबडतोब जामीन देऊन मुक्तता करण्यांत आली. या दिवसापासून नागपूरच्या धर्म सत्याग्रहाच्या लढाईला प्रत्यक्ष तोंड लागलें.

## सरकार व पुढारी.

या पकडापकडीमुळें अर्थातच सर्व नागपूर शहरांत बरीच खळबळ उडाली. मे० डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट हे स्वत: गणेश पेठेंत येऊन सत्याग्रहाची जागा पाहून गेले. त्यांनीं त्याच दिवशीं हिंदु—मुसलमान पुढाऱ्यांना आपल्या बंगल्यावर विचारविनिमयाकरितां बोलावून घेतलें. त्यांत श्रीमंत राजे लक्ष्मणराव साहेब भोंसले, सर गंगाधरराव चिटणवीस, श्री. समाजभूषण तात्यासाहेब गुजर, डॉ. मुंजे, डॉ. परांजपे, बॅ. अभ्यंकर, श्री. भवानीशंकर, श्री. रामकृष्णपुरी वगैरे हिंदु पुढारी व नबाब नियाजउद्दीनखान, युसुफ शरीफ, कबीर वगैरे मुसलमान मंडळी होती. तेथें गणेश पेठेंतील झगड्यासंबंधीं बरीच चर्चा झाली. पुढें डॉ. मुंजे ह्मणाले कीं,' आह्मी कॉंग्रेस कमिटी आणि खिलाफत कमेटी यांच्यामध्यें आणखी एकदा तडजोड करण्याचा प्रयत्न करतों. ही कमिटी उद्यां ( शुक्रवार ता. २५ ) भरेल. तेव्हां या गोष्टीचा त्या कामिटींत निकाल लागेपर्यंत आह्मी कांहीं जास्त आतां बोलूं शकत नाहीं. सर-

कारनें मात्र या बाबतींत पकडापकडीची विनाकारण घाई करूं नये.' श्री. राजेसाहेबांनींही 'डॉ. मुंजे यांना आणखी एकदां प्रयत्न करण्याची संधि द्यावी,' असें सांगितलें. तेव्हां डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं परस्परांतील समेटाकरितां मुदत देण्याचें ठरविलें. आणि उभयपक्षांकडून रीतसर लिहून येईपर्यंत पकडापकड करणार नाहीं, असेंही मे. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं आलेल्या लोकांना अभिवचन दिलें.

या एकंदर प्रकारामुळें त्या दिवशीं सकाळीं पकडलेल्या पंधरा सत्याग्रही वीरांचे खटले मुदतींत टाकण्यांत आले. व शुक्रवारपासून कांकड आरती रीतसर सुरू होऊन पकडापकड बंद झाली.

शुक्रवारीं सायंकाळीं प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची सभा भरली. तींतदेखील कॉंग्रेस सब–कमिटीचा रीपोर्ट व स्थानिक खिलाफत कमिटीचा रीपोर्ट असे दोन्ही रीपोर्ट मांडण्यांत आले. त्या रीपोर्टांवर साधक बाधक रीतीनें भरभक्कम चर्चा झाल्यानंतर प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें आपल्या सब कमिटीचाच रीपोर्ट पास केला. नंतर त्याच दिवशीं रात्रीं कॉंग्रेस पोट कमिटीची व खिलाफत पोट कमिटीची अशी मिश्र सभा सुरू झाली. रात्रीं नऊ वाजल्यापासून एक वाजेपर्यंत या मिश्र कमिटीची चर्चा चालू होती. त्या कमिटींत निरनिराळ्या सभासदांनीं निरनिराळ्या सूचना सुचविल्या होत्या. निरनिराळे तर्कवितर्क काढले. अखेर साधक बाधक गोष्टींचा विचार होऊन खालीलप्रमाणें तडजोडीचा करार सर्वानुमतें पास झाला.

## समेटाच्या अटी.

१ हिंदूंनीं उद्यां फक्त ( एकच दिवस ) मशीदीवरून जातांना तेथें वाद्यें थांबवावीं किंवा वाद्यें वाजवितच जाणें झाल्यास दुसऱ्या रस्त्यानें जावें.

२ परवांपासून ( ह्मणजे ता. २८ किंवा २९ आक्टोबरपासून ) हिंदूंनीं जास्तींत जास्त पांच टाळ वाजवीत मशिदीवरून जावें.

या तडजोडींत उभयपक्षांनीं कबूल केलेल्या अटी समेटासाठींच कबूल करण्यांत येत असल्यामुळें त्या पुढेंमागें कोणत्याही पक्षास बंधनकारक होऊं नयेत. ही तडजोड फक्त कोकोनाडा कॉंग्रेसपर्यंतच अमलांत रहावी. आणि तडजोडीच्या अटी

हिंदुमुसलमान पुढाऱ्यांनीं आपापल्या समाजास पटन देऊन त्या त्यांच्याकडून मान्य होतील अशी खटपट करावी. असेंही करारपत्रांत म्हटलें होतें.

हा करार शुक्रवार रात्रीं एक वाजतां हिंदु मुसलमान पुढाऱ्यांच्या मिश्र कमिटीस पसंत पडून त्या करारपत्रावर उभयतांच्याही सह्या झाल्या. नबाब निजा-उद्दीनखान, कबीर, युसुफशरीफ, डॉ. मुंजे, कानिटकर, ओगले, घोरपडे यांच्या त्या करारपत्रावर सह्या झाल्या. रात्रीं एक वाजतां हा करारनामा तयार झाल्या-मुळें त्यानंतर गणेशपेठेंत जाऊन तेथील लोकांस या करारनाम्याच्या शर्ती समजावून देणें अशक्य असल्यानें करारनाम्यांतील उद्यां या शब्दाचा अर्थ रविवार समजावा, असें कमिटीचे लोकांनीं ठरविलें होतें. याप्रमाणें ही रात्रीची सभा आटोपली.

## मुसलमानांनीं पुन: कानावर हात ठेविले !

ठरल्याप्रमाणें शनिवारीं सकाळीं डॉ० मुंजे गणेश पेठेंत आले. परंतु दिंडी बहुतेक निघाल्यामुळें त्यांना गेल्या रात्रीं करार झाल्याप्रमाणें लोकांना करारपत्रांतील शर्ती समजावून सांगून त्यांचें मन वळविण्यास अवधि सांपडला नाहीं. म्हणून शनिवार ( ता. २६ ) ची दिंडी नेहमींप्रमाणें वाजत गाजत गेली. कांहीं मुसल-मानांनीं हात पुढें करून दिंडीला विरोध करण्याचा प्रयत्न केला, पण डि० मॅजिस्ट्रेट यांनीं समेटाला मुदत दिली असल्यामुळें पोलीस लोकांनीं दिंडीवाल्यांना हरकत केली नाहीं. श्रीमंत राजेसाहेब नित्याप्रमाणें तेथें हजर होतेच. गेल्या रात्रीं पास झालेल्या अटी डॉ० मुंजे यांनीं राजेसाहेबांस सांगितल्या. राजेसाहेब ह्मणाले, ‘ तसें होत असेल तर माझी हरकत नाहीं, पण पहिली अट हिंदूंनीं पाळण्याचे अगोदर दुसरी अट मुसलमान लोक पाळतीलच अशी पळून न जाणाऱ्या व कानांवर हात न ठेवणाऱ्या मुसलमान पुढाऱ्यांकडून हमी घ्या ह्मणजे झालें. हिंदूंना तुह्मीं पहिली अट पाळावयाला सांगितल्यानंतर आह्मी ती कृतींत आणूं, पण दुसरी अट मुसलमान लोकांनीं पाळली पाहिजे; एवढ्याबद्दल आम्ही तुह्मांला जबाबदार धरूं. ’ हें भाषण झाल्यानंतर तेथें मुसलमान समाजाचे पुढारी समीउल्लाखान आले होते. ते डॉ० मुंजे यांना भेटले; त्या वेळीं गेल्या रात्रीं मिश्र कमिटीचा झालेला ठराव त्यांनीं त्यांस सांगितला. तेव्हां हिंदुमुसलमानांत झालेल्या अशा तडजोडीबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त करून त्याच दिवशीं जाहीर सभा बोलावण्याचा त्यांनीं डॉ० मुंजे

यांना सल्ला दिला; व त्यांस असें सांगितलें कीं, ' मी त्या सभेंत खिलाफत कमिटीचा सेक्रेटरी या नात्यानें मुसलमान लोकांना आपल्या करारनाम्याच्या अटी समजावून देईन आणि तुह्मी काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष या नात्यानें हिन्दु लोकांना समजावून सांगा ' असें उभयतांचें ठरल्यानंतर डॉ० मुंजे यांनीं त्याच दिवशीं रात्रीं चिटणीस पार्कमध्यें जाहीर सभा बोलाविली. त्या सभेला पांच सात हजार लोक आले होते. पण ही सभा जमल्यानंतर समीउल्लाखान म्हणूं लागले कीं, ' मी या सभेंत बोलूं शकत नाहीं. कारण या समेटाच्या शर्ती मुसलमानांस पटण्यासारख्या नाहींत. फक्त हिंदूंनीं मशिदीजवळ एक दिवस टाळ बंद करावेत किंवा दुसऱ्या रस्त्यानें दिंडी काढून एक दिवस जावें. एवढाच कराराचा भाग आज सभेंत सांगण्यांत यावा. मुसलमानांनीं पाळावयाचा कराराचा दुसरा भाग आज सभेंत सांगूं नये. हिंदुलोक समेटाकरितां एक दिवस दिंडींतील वाद्यें मशीदींपुढें बंद ठेवतात, किंवा दुसऱ्या रस्त्यानें जातात, हें मुसलमानांना समजलें, म्हणजे त्यांचा राग कमी होईल व ते करारांतील दुसरी अट कबूल करावयाला तयार होतील.' याप्रमाणें समीउल्लाखानांनीं आपलें मत सांगितलें व त्याला कबीर आणि युसुफशरीफ यांनीं पुष्टि दिली. या त्यांच्या भाषणानें डॉ. मुंजे पेंचांत पडले. पण मुसलमान पुढाऱ्यांना करार मोडावयाला हिंदु पुढारी कारणीभूत झाले, अशी सबब त्यांना मिळूं नये, म्हणून याही गोष्टीला ते कबूल झाले व कराराची पहिली शर्तच तेवढी पाळण्याकरितां त्यांनीं हिंदु लोकांना सांगितलें. डॉ. मुंजे यांच्या एकतर्फी भाषणाचा अर्थ लोकांना समजेना. तेव्हां तेथेंच डॉक्टरसाहेबांना हिंदुलोकांनीं असा सवाल केला कीं, आम्हीं जर एक दिवस दिंडी बंद केली, तर दुसरे दिवसापासून बिनहरकत आमची दिंडी मशिदीवरून जाऊं देण्यास मुसलमान लोक तयार आहेत किंवा काय! या सवालाला डॉ. मुंजे यांनीं मोघम आपली स्वतःची खातरजमा दिली आणि सभा बरखास्त झाली.

## मुसलमानांचें दुटप्पी वर्तन.

डॉ. मुंजे यांनीं मिश्र पुढाऱ्यांच्या कमिटींत झालेल्या करारांची बातमी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांना कळविली होती व उभयतांत ठरलेल्या अटीही त्यांनीं त्यांचे अवलोकनार्थ त्यांचेकडे पाठविल्या होत्या. कारण, त्यांनीं समेटाकरितां मुदत दिली होती. जाहीरसभेचे दुसरे दिवशीं सकाळीं ह्मणजे रविवारीं (ता. २७)

सकाळीं डॉ. मुंजे गणेशपेठेंत आले. श्रीमंत राजेसाहेब त्यांच्या येण्याची वाट पहात होतेच. या उभयतांचें आदले दिवशींच्या सभेच्या मुद्यावर थोडा वेळ संभाषण झालें. इतक्यांत तेथें सिटी मॅजिस्ट्रेट मि. स्लेनी आले. त्यांस त्यांनीं असें कळविलें कीं, 'आज हिंदु आपली दिंडी दुसरीकडून न्यावयास तयार आहेत. मात्र मुसलमानांनीं उद्यांपासून आपण पांच टाळांची दिंडी जाऊं देऊं, असें वचन कराराच्या दुसऱ्या अटीप्रमाणें आतां द्यावें ह्मणजे झालें' या दिवसाच्या कांकडआरतीच्या पुढाऱ्यांनेंही मि. स्लेनी साहेब यांस, 'आपण आज एक दिवस दुसऱ्या रस्त्यानें कांकडआरती नेण्याला तयार आहोंत,' असें सांगितलें. पण मुसलमान लोक दुसऱ्या दिवसापासून पांच टाळांची दिंडी मशीदीवरून जाऊं देण्याचें मॅजिस्ट्रेट साहेबांपुढें कबूल करीनात. ते ह्मणाले, 'आमचा करार गुप्त होता. प्रथम हिंदूंनीं आपली दिंडी एक दिवस थांबवावी. नंतर आह्मी आमच्या जातिबांधवांना पांच टाळांची परवानगी देण्याबद्दल सांगून पाहूं. पण ते आमचें ह्मणणें ऐकतीलच, असें आह्मी आश्वासन देऊं शकत नाहीं. आजचा प्रश्न हिंदूंनीं बिनशर्त आपली अट पाळण्याचा आहे. अशाप्रकारें आपण कोणतीच अट पाळावयास तयार नाहीं. फक्त हिंदूंनींच आपली अट पाळावी. एक दिवस दिंडींतील टाळ बंद ठेवले किंवा दिंडी दुसऱ्या रस्त्यानें गेली तर लगेंच टाळ वाजविल्याशिवाय हिंदूंची दिंडी जाऊं शकते किंवा दुसऱ्या रस्त्यानें गेल्यास आजपर्यंतच्या वहिवाटींत हिंदु लोकांना फेरफार करतां येतो वगैरे कायदेशीर अडथळेच मुसलमान लोक आणूं पहात होते. समेट घडवून आणण्याकरितां मनाची जी शुद्धि असावयाला पाहिजे, ती त्यांचेजवळ मुळींच नसल्याचें अनुभवाला आल्यामुळें मुसलमानांनीं आपण होऊनच करार मोडला. आतां हिंदूंवर कोणत्याच प्रकारची नैतिक जबाबदारी नाहीं, असें डॉ. मुंजे व इतर हिंदुसमाज यांना वाटलें. त्याप्रमाणें श्रीमंत राजेसाहेबांचा सल्ला त्यांनीं घेतला. राजेसाहेब ह्मणाले, 'मुसलमान लोकांच्या दुटप्पी वर्तनाचा मला अनुभव आला आहे. तुमच्या कॉंग्रेसची खात्री होण्याकरितां आणखी एक वेळ तुह्मांला संधि द्यावी, एवढाच माझा हेतु होता. आतां तुह्मी मि. स्लेनी साहेबांना सरळ सांगा कीं, मुसलमान लोक आपली अट पाळावयाला तयार नसल्यामुळें आमचा समेटाचा प्रयत्न फसला. आतां समेट होत नाहीं. तेव्हां यापुढें सरकाराला जें योग्य वाटेल तें त्यांनीं करावें. आह्मी यापुढें जो प्रसंग येईल त्याला तोंड द्यावयाला तयार आहोंत.' असें राजेसाहेबांचें निर्वाणीचें भाषण ऐकून त्याप्रमाणें डॉ. मुंजे यांनीं मि. स्लेनीसाहेबांना कळविलें. तरी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं

डॉ. मुंजे यांना, ' फिरून समेटाचा प्रयत्न करून पहा, ' म्हणून आणखी एक दिवसाची मुदत दिली.

## सत्याग्रहाचे सर्वाधिकारी राजेसाहेब.

त्याप्रमाणें मिश्र कमिटीची पुन्हां आणखी एकदां सभा भरली. गांवांत मशीदीमध्यें मुसलमानांच्या सभा भरून वाटाघाटी सुरू झाल्या. सायंकाळीं ( सोमवार ता. २८ ) पांच वाजण्याचे सुमारास राजेसाहेबांनीं हिंदु पुढाऱ्यांची सभा आपल्या वाड्यांत बोलावली. या सभेस येण्यापूर्वीच थोडा वेळ अगोदर डॉ. मुंजे यांनीं पहावें ह्मणून डिस्ट्रिक्ट कमिशनर यांचेकडून एक पत्र आलें होतें. हें पत्र मुसलमान पुढाऱ्यांनीं डि० कमिशनर साहेब यांना पाठविलें होतें. हें पत्र घेऊन डॉ. मुंजे राजेसाहेबांचे वाड्यांत सभेकरितां आले. त्यांनीं तें पत्र सभेंत वाचून दाखविलें. त्या पत्राचा मुख्य आशय असा होता कीं, 'हिंदू बिनशर्त एक दिवस दिंडी थांबवितील व मग आमचेकडे येतील( Approach us ) तर मग आह्मी समेटाचा विचार करूं. ' अशा प्रकारानें मुसलमानांनीं हिंदु लोकांना अपमानास्पद पत्र लिहिलेलें वाचून सभेला जमलेल्या सर्व सभासदांना चीड आली. मुसलमानांच्या या अरेरावीच्या वर्तनाबद्दल डॉ. मुंजे वगैरे पुढारी लोकांचें रक्त संतापानें सळसळूं लागलेलें पाहून राजेसाहेब ह्मणाले, ' आतां तरी तुमचा समेटाचा प्रयत्न संपला ना ! असेल आणखी कांहीं मार्ग तर अझुनही करून पहा. आमची ना नाहीं.' पण सर्वांनीं,' आतां आमचा प्रयत्न संपला, आपण जसें सांगाल त्याप्रमाणें आह्मीं कोणतेंही दिव्य करावयाला तयार आहोंत, ' असें सांगितलें. नंतर राजेसाहेब ह्मणाले, ' आतां यापुढील सर्व जबाबदारी आमचेवर आहे. आतां आह्मांला जशी परमेश्वर बुद्धि देईल आणि मार्ग दाखवील आणि श्रीशिवाजी महाराज ज्याप्रमाणें स्फूर्ति देतील, त्याप्रमाणें आह्मी करूं. आपण मात्र सर्वांनीं आम्हांला एकविचारें सहाय्य केलें पाहिजे. आमचे जवळ, जहाल, मवाळ, कॉंग्रेसवाले किंवा बिन कॉंग्रेसवाले, सरकारी नोकर किंवा धंदेवाले, ब्राह्मण अगर ब्राह्मणेतर, स्पृश्य अगर अस्पृश्य हा भेदभाव नाहीं. हें धर्मकार्य आहे हें आपल्या ऐहिक आणि पारमार्थिक सुखाचें साधन आहे, असें समजून प्रत्येकानें या कार्याला मदत केली, तर आह्मांला असा भरंवसा आहे कीं, आपल्या कार्यांत खात्रीनें यश मिळेल. या धर्मकृत्याकरितां जरी आमच्या स्वतःच्या सर्वस्वावर तिलांजलि देण्याचा प्रसंग आला तरी त्याही गोष्टीला आह्मी तयार आहोंत. कारण

आतां हा प्रश्न गणेशपेठपुरता राहिला नाहीं. सर्व हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्याचा आणि हिंदु धर्माच्या इभ्रतीचा होऊन बसला आहे. तेव्हां त्याच दृष्टीनें अगादर मनाची तयारी करूनच आह्मीं पाऊल पुढें टाकलें आहे. ' असें राजेसाहेबांचें करारी बाण्याचें, निश्चयाचें भाषण ऐकल्यानंतर सर गंगाधरराव चिटणवीस, डॉ. मुंजे, बॅ. अभ्यंकर, वगैरे सर्व पक्षांच्या सर्व जातींच्या लोकांनीं आपलीही तनमनधनेंकरून तयारी असल्याचें राजेसाहेबांना सांगितलें. डॉ. मुंजे यांनीं डि. कमिशनर यांस ' समेट होत नाहीं, ' असें कळविलें.

## सत्याग्रहाची पद्धतशीर तयारी.

ही हकीकत सोमवारीं रात्रीं झाली. मध्यंतरीं समेटाकरितां मुदत देण्यांत आल्यामुळें कांकडआरतीच्या दिंडीवाल्यांना पकडण्यांत आलें नव्हतें. आतां समेट होत नसल्यामुळें दुसरे दिवसापासून मनाई हुकमाची अंमलबजावणी खात्रीनें होणार, हें सिद्धच होतें; ह्मणून दुसरे दिवशीं कांकडआरतीबरोबर जाणाऱ्या इसमांची नोंद करण्यांत आली. कारण कार्तिक शु० १५ पर्यंत कांकडआरतीकरितां सत्याग्रह करणारे सत्याग्रही वीर पाहिजे होते, या दृष्टीनें यादी करण्यांत आली होती.

## शांतताभंग आणि सरकार.

मंगळवारीं ( ता. २९ ) सकाळीं सिटी मॅजिस्ट्रेट मि. स्लनी साहेब हे गणेशपेठेंतील मशिदीजवळ आले. त्यांनीं असें जाहीर केलें कीं, ' डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनीं पोलीस अॅक्टाच्या ३० व्या कलमान्वयें हिंदूंना मशिदीजवळ टाळ वगैरे वाजवीत जाण्याची बंदी पुन्हां त्या तारखेपासून केली आहे. ही ऑर्डर दोन तीन दिवसांपुरतीच आहे. कायम नाहीं. या अवधींत नामदार गव्हर्नरसाहेब पंचमढीहून नागपुरीं येणार आहेत. त्यांचेकडे डि० मॅजिस्ट्रेटनीं हें प्रकरण पाठविलें आहे. या प्रकरणावर ते कायमचा निकाल देणार आहेत. ' यानंतर थोड्याच वेळानें कांकडआरतीची तयारी करण्यांत आली. श्रीमंत राजेसाहेबांनीं कांकडआरती घेऊन निघण्याला सांगितलें. त्या दिवशीं पकडापकड सुरू होणार ह्मणून मशीदीजवळ हजारों लोकांचा समुदाय जमला होता. डॉ० मुंजे वगैरे बहुतेक सर्व हिंदु पुढारी हजर होते. दिंडीवाले मशीदीजवळ येतांच त्या दिंडीला डि० मॅजिस्ट्रेट यांचा

हुकूम सांगून मनाई करण्यांत आली. अर्थात दिंडीवाल्यांनीं तो मनाई हुकूम मानला नाहीं. म्हणून त्यांना पकडण्यांत आलें. त्या दिंडींत फक्त एक आरतीवाला व पांचजण टाळवाले असे सहा इसम होते. त्यांना पोलीसनें कोतवालींत नेलें. त्यांचे मागोमाग दोन तीन हजार लोकांचा समुदाय कोतवालीपर्यंत गेला. पकडलेले वीर सत्याग्रही विठ्ठलाचा नामघोष करीत गेले. या सत्याग्रही लोकांकडून दहा दहा रुपयांचे जामीन घेण्यांत येऊन त्यांची मुक्तता करण्यांत आली. या लोकांचे खटले चालविण्याकरितां नागपूरचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर गोविंदराव देशमूख व श्रीयुत गोविंदराव प्रधान वकील यांना मुकर करण्यांत आले होतें. हे उभयतां गृहस्थ नागपूरच्या सार्वजनिक कामाचे उत्साही पुढारी असल्यामुळें ते मोठ्या उमेदीनें आणि निःस्वार्थ बुद्धीनें प्रत्येक धर्मसत्याग्रही इसमाचा खटला चालविण्याकरितां पुढें आले.

## धर्माची इभ्रत व हिंदू.

नागपुरांतील धर्मसत्याग्रह हा हिंदुमुसलमान धर्मांतील एक अपूर्व असा धर्मकलहाचा मासला होता. या कलहांत सरकारचा कांहींच संबंध नव्हता. कारण, या धर्माचे बाबतींत ‘ श्रीमन्महाराणी व्हिक्टोरिया ’ यांचेकडूनच पूर्वीच जाहीरनामा निघून ज्याला त्याला आपआपल्या धर्मांत पूर्ण स्वातंत्र्य राहील, असें जाहीर करण्यांत आलें होतें. तेव्हां, इंग्रज सरकारला हिंदुमुसलमानांचे धार्मिक कलहांत हात घालण्याचें कांहीं कारण नव्हतें. सरकारला एवढीच सावधगिरी ठेवावयाची होती कीं, जेणेंकरून उभय समाजांत शांतताभंग होणार नाहीं; आणि तेवढ्याचकरितां सरकारनें आपल्या समजुतीप्रमाणें मनाई हुकूम हिंदूविरूद्ध काढला होता. आतां शांततामय धर्मसत्याग्रह सुरू झाल्यानंतर फिरून शांतता राखण्याकरितां लाठ्या, गोळीबार, यांचा इलाज करण्याचें सरकारला कारणच नव्हतें. या धर्मसत्याग्रहांत जे लोक भाग घेतील, त्यांना पकडून त्यांचेवर खटले भरून कायद्याप्रमाणें त्यांना शिक्षा देणें, एवढेंच सरकारला करावयाचें होतें. मुसलमानबंधूंनाही दिंडी मशीदीवरून जाऊं लागली कीं, त्या दिंडीला हरकत केल्याची फक्त खूण म्हणून एका मुसलमानानें हात पुढें करावयाचा, याशिवाय त्यांनाही दुसरें कांहीं करावयाचें नव्हतें. या धर्म-सत्याग्रहांत प्रत्यक्ष भाग घेऊन आपल्या धर्माची इभ्रत राखण्याची मात्र सर्व जबाबदारी प्रत्येक

हिंदूवर पडली होती. ती जबाबदारी ओळखून नागपुरांतील प्रत्येक हिंदु धर्म-सत्याग्रहाकरितां पुढें येऊं लागला. यांतच हिंदूंच्या यशाची गुरु-किल्ली होती.

## मुसलमानांचा धर्मवेडेपणा.

मशीदींत बसून अल्लाची प्रार्थना करणें काय किंवा टाळ वाजवीत ईश्वराचें नामस्मरण करीत एका देवळापासून दुसऱ्या देवळांत रस्त्यानें जाणें काय, तात्त्विक दृष्टीनें दोन्ही गोष्टी सारख्याच. दोन्ही धर्मांचे मार्ग भिन्न भिन्न असतील, पण उभय धर्मांचें ईश्वर-प्राप्तीचें ध्येय एकच आहे. शेजारीपाजारीं लोकांच्या कानांचे पडदे फाटतील, अशा आरोळ्यांनीं मशीदींतून आवाज देण्यानेंसुद्धां हिंदुलोक ज्यांच्या प्रार्थनेच्या आड येत नाहींत, ते मुसलमान लोक, मशीदीसमोरील दहा पावलांच्या जागेंत पांच टाळांच्या मंजुळ वाद्यानें मशीदींतील उपासक लोकांच्या प्रार्थनेला अडथळा होतो, असें निमित्त दाखवून त्यांचे शत्रू बनतात आणि त्यांना हाल अपेष्टा सोसण्याकरितां तुरुंगांत पाठवितात, ही मुसलमान लोकांची धर्मश्रद्धा कीं धर्मवेडेपणा याचा निवाडा या धर्म-सत्याग्रहांत होणार होता. धर्माचरण करणें हें पूर्ण सात्विक कर्तव्य आहे. यांत स्वार्थ नाहीं किंवा ऐहिक बडेजावीचाही त्यांत गंध नाहीं. अशा स्थितींत मुसलमान लोकांच्या वेड्या धर्माचरणाच्या भावनांसाठीं हिंदू लोकांना कारगृहवास पतकरावा लागतो, हा मुसलमानांच्या सात्विक धर्मभावनेचा मासल आहे, हें लोकांना पटेल काय ? मुसलमान लोकांत सात्विक भावनेचे लोक अगदीं नाहींत. असें कोणीच ह्मणणार नाहीं. त्यांतही कांहीं समंजस लोक आहेतच; त्यांना अशा प्रकाराचा लढा आवडणें शक्य नाहीं. पण तमोगुणी, हट्टवादी लोकांच्या हेकेखोरपणापुढें त्या थोड्याशा सात्विक लोकांचें कोठून चालणार ! एवढ्याचकरितां हिंदूंच्या नशिबीं मुसलमान बंधूंच्याविरुद्ध धर्मसत्याग्रह करण्याचा प्रसंग आला. याशिवाय त्यांना अन्य साधन नव्हतें. कारण, कांहीं झालें तरी हिंदु आणि मुसलमान यांचें कित्येक वर्षांचें देवधूंचें नातें, कांहीं तुटण्यासारखें नाहीं. दोघांनाही पुढील सर्व काळ हिंदुस्थानांतच कंठावयाचा आहे. हिंदुस्थानावरील भावी संकटांना दोघांना सारखेंच तोंड द्यावयाचें आहे. परस्परांच्या सहाय्यामुळें उभय धर्माच्या लोकांना हिंदुस्थानांतच जगावयाचें आहे. तेव्हां परस्परांतील धर्मकलह हे रक्तपातानें सोडवून घेण्यापेक्षां आत्मक्लेशाच्या यातना सोसून व त्यामुळें मुसलमान लोकांच्या मनाची शुद्धि करूनच त्या धर्मकलहाच्या बीजाचें निर्मूलन केलेलें अधिक

चांगलें, असा सात्विक विचार करून श्रीमंत राजेसाहेबांनीं या धर्मयुद्धाची ध्वजा आपल्या हातीं घेतली होती. आणि त्यांच्या या थोर विचारसरणीमुळेंच त्यांना रावापासून रंकापर्यंत नागपुरांतील हिंदूंनीं सहाय्य करण्याचें ठरविलें होतें.

मंगळवार सकाळीं सत्याग्रह होऊन पकडापकड झाली; त्याबाबत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांचा खालीलप्रमाणें मनाई हुकूम होता.

## वाद्यांबाबत मनाई हुकूम.

" १९२० सालीं गणेश पेठेंतील मुसलमानांनीं आमसडकेपासून चाळीस फुटांवर निमाज पढण्यासाठीं एक झोंपडी बांधिली. पुढच्या वर्षी तेथें पक्की मशीद उभारण्यांत आली. व शेख गफूर नांवाचा ' मुतवाली ' तेथें नेमण्यांत आला. मशीदीच्या उत्तरेस १२० फुटांवर एक मारुतीचें देवालय आहे. व पश्चिमेस दुसरीं दोन देवळें आहेत. मशीदीच्या दक्षिणेस सुमारें २०० फुटांवर एका घरांत दरसाल गणपतीची मूर्ति मांडण्यांत येते. व ती विसर्जनासाठीं मशीदीवरून जुम्मा तलावाकडे नेण्यांत येत असते. तसेंच कार्तिकांत कांकडआरतीची दिंडी दरसाल या मशीदीवरून जाण्याची वहिवाट आहे. शेख गफूर याच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं, सन १९२१ सालीं ( मशीद झाल्यावर ) गणेशपेठेंतील हिंदुमुसलमानांनीं आपसांत एक करार केला. हिंदूंनीं मशीदीपुढें ढोलकीं किंवा झांजा वाजवूं नयेत. फक्त टाळ वाजविण्यास हरकत नाहीं. असा हा करार होता. इ. स. १९२१ सालीं उभय पक्षांनीं ही तडजोड पाळली. पण १९२२ सालीं हिंदूंनीं करार मोडून मोठीं वाद्यें वाजविलीं. तेव्हां मुसलमानांनीं कोणतींच वाद्यें वाजवूं नका, अशी हरकत घेण्यास सुरवात केली. मशिदीवरून वाद्यें वाजविण्याचे बाबतींत १९०४ सालीं सर राजनोल्डि क्रॅडॉक यांनीं नेहमींसाठीं ऑर्डर काढली होती, तींत फक्त चार मिरवणुकींखेरेजकरून बाकीच्या मिरवणुकींचे बाबतींत मशीदीसमोर वाद्यें वाजविण्यास सरकारनें बंदी केली आहे. मात्र कोणीं मुसलमानानें तक्रार केली तरच ही बंदी सरकारनें करावी, असें त्या ऑर्डरमध्यें ह्मटलें आहे. ' मशीदींत मुसलमान उपासक जमून प्रार्थना किंवा निमाज चालला नसेल अशा वेळीं मुसलमानांनीं या ऑर्डरीचा फायदा घेऊन वाद्यें बंद करण्याचा हट्ट धरूं नये.' असा सल्ला या ऑर्डरमध्यें दिला आहे. पण

दुर्दैवानें हल्लींच्या कांकडआरतीच्या झगड्यांत मला असें दिसून येतें कीं, कांकड-आरतीच्या दिंडी मशीदीवरून जाण्याची व मुसलमानांचा ' फज्र निमाज ' या दोहोंचीही वेळ सूर्योदयापूर्वी ( पावणेसहा ते सव्वासहापर्यंत ) अगदीं एकेंच येते. ही गोष्ट मुसलमानांनीं हिंदु मंडळींच्या समक्ष मला सांगितली. व ती खोटी असल्याबद्दल कोणींही उलट सांगितलें नाहीं. मध्यप्रांत सरकारचीही ऑर्डर इतर प्रांतांतील कोर्टांच्या निकालाशीं जुळणारी आहे. मुंबई हायकोर्टाचे जज्ज न्यायमूर्ती बीमन व हौटन यांनीं आपल्या एका जजमेंटांत लिहिलें आहे कीं ' सार्वजनिक रस्त्याचा उपयोग करण्याचा हक्क सर्वांस आहे, पण त्या रस्त्यावर वाद्यें वाजविण्याचाही लोकांस हक्क आहे असें ह्मणतां येत नाहीं. अर्थात कोणाची हरकत नसेल, तर सरकार वाद्यें वाजवीत जाण्यासही हरकत घेणार नाहीं. परंतु, वाद्यें वाजवीत जाण्यापासून शांतताभंग होण्याची भीति असेल किंवा वाद्यें वाजण्यामुळें कोणास त्रास किंवा कटकट होते, अशी तक्रार येईल, तर कोर्ट वाद्यें वाजविण्यास हरकतच करील." या जजमेंटांत जुनी मशीद किंवा नवी मशीद असा फरक केलेला नाहीं.

" गेल्या वर्षाच्या (१९२२च्या) आक्टोबरांत यासंबंधीं मजकडे तक्रारी आल्या; ह्मणून मी तहशीलदाराकडून या बाबतींत चौकशी करविली. गेल्या मार्च महिन्यांत सिटी मॅजिस्ट्रेटनें असा हुकूम काढला कीं, दोन्ही पक्षांनीं आपसांत कांहीं तडजोड करावी. पण सप्टेंबरपर्यंत तडजोड होऊं शकली नाहीं. ह्मणून जुन्या सरकारी ऑर्डरीप्रमाणें सिटी मॅजिस्ट्रेटनें ( गणेशोत्सवापूर्वी ) वाद्यें वाजविण्याच्या बाबतींत मनाई हुकूम काढला. " मुसलमानांच्या नमाजाच्या नक्की वेळा तरी कोणत्या ? " असें हिंदू विचारूं लागले. त्यावर मुसलमानांचें असें ह्मणणें पडलें कीं, ' दिवसाचे चोवीसही तास कोणींना कोणी मशीदींत प्रार्थना करीत असतातच. ' शेवटीं हा तंटा माझ्यापुढें आला. तेव्हां मीं दोन्ही पक्षांचें ह्मणणें एकून घेऊन पोलीस ॲक्टाच्या ३० व्या कलमाखालीं वाद्यें वाजवीत जाण्यास बंदी केली. गणपति-विसर्जनाच्या मिरवणुकीसंबंधीं हिंदूंनीं हा माझा हूकूम पाळला आहे. व गणपतीची मूर्ति अजून उपरिनिर्दिष्ट घरांत बसलीच आहे.

" यंदा कांकडआरती २४ आक्टोबरपासून सुरू झाली. आणि ता. २५ ची कांकडआरती मशीदीवरून जाऊं लागल्याकारणानें ती दिंडी

पोलिसांनीं पकडली. पण पुढें तीस सोडून दिलें. त्याच दिवशीं मीं मशीदीची जागा जाऊन पाहिली व सायंकाळीं गांवांतील सुमारें वीस हिंदुमुसलमान प्रमुख गृहस्थांस माझ्या बंगल्यावर या विषयाच्या चर्चेसाठीं बोलाविलें. चर्चेनंतर कांग्रेस व खिलाफत यांच्या प्रतिनिधींस आपसांत तडजोड करून पहाण्यास वेळ द्यावा, असें ठरलें. 'सरकारच्या मदतीशिवाय असले झगडे तुह्मीं आपसांत मिटविणें चांगलें,' हें मीं त्यांच्या मनावर शक्य तेवढें ठसविलें. व त्यांस वेळ दिला. मध्यंतरीं ता. २६ आक्टोबर रोजीं दोन्ही धर्मांच्या दृष्टीनें मीं कोर्टांत दोन्ही बाजूंचा पुरावा घेतला. कांकडआरती सूर्योदयापूर्वींच झाली पाहिजे, याबद्दल माझी खात्री झाली. परंतु कांहीं अंतरावर वाद्यें बंद ठेवण्यास हिंदु धर्माची आडकाठी आहे, याबद्दल मात्र माझी खात्री झाली नाहीं. शहरांत मशीदीजवळ वाद्यें थांबविण्याची वहिवाट आहे. सकाळीं चार वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत मुसलमान उपासक मशीदींत जमत असतील, याबद्दलही साधारपणें मला खात्री वाटते.

" तारीख २७ आक्टोबर रोजीं डॉ० मुंजे यांनीं मला उभयपक्षांत झालेल्या तडजोडीच्या अटी कळविल्या, त्या अशा:—

( १ ) एक दिवस हिंदूंनीं मशीदीसमोर वाद्यें न वाजवितां दिंडी न्यावी. व (२) पुढें ३ पासून ५ पर्यंत टाळ वाजवीत जावें. इतर वाद्यें वाजवूं नयेत ( यांपैकीं पहिली अट कधींच पाळली नाहीं.) या अटी दोन्हीं समाजांपुढें त्या त्या समाजाच्या पुढाऱ्यांनीं मांडाव्या. त्याप्रमाणें चिटणीस पार्कमध्यें झालेल्या हिंदूंच्या सभेत हिंदूंनीं त्या मान्य केल्या. पण एका मशीदींत भरलेल्या मुसलमानांच्या सभेंत मुसलमानांनीं मात्र त्याच अटी नापसंत केल्या. " सरकारी हुकूम मोडून हिंदु रोज रोज मशीदीवरून वाद्यें वाजवीत दिंडी नेत आहेत. मग तडजोड कशी करणार !" अशी मुसलमानांची तक्रार होती. या मधल्या तीन चार दिवसांत हिंदूंची दिंडी पोलीसनें थांबविली नाहीं. याचें कारण एवढेंच होतें कीं, तडजोडीच्या प्रयत्नांत उगाच बाधा पडूं नये.

" हिंदु व मुसलमान यांच्या पोट कमिट्यांमध्यें समेटाची जीं बोलणीं चाललीं होतीं, त्यांचा काय निकाल झाला हे मला ता. २८ आटोबरपर्यंत कळलें नाहीं.

ह्मणून मी डॉ. मुंजे व नबाब नियाजउद्दीनखान यांस पत्रें पाठवून " आज रात्रीं साडे-नऊ वाजेपर्यंत मला निकाल कळवा, " असें कळविलें. दोघांनींही दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंत आणखी वेळ मागितला. आणखी वेळ देणें ह्मणजे दुसऱ्या दिवशीं सकाळीं कांकडआरतीच्या वेळीं झगडा होण्यास संधि देण्यासारखेंच होतें. पण तड-जोडीच्या प्रकरणास पूर्ण वाव मिळावा, ह्मणून मीं तीही मुदत दिली. दुसरे दिवशीं पुन्हां हिंदूंनीं टाळ वाजवीत दिंडी मशीदीवरून नेलीच.त्या वेळीं उभयपक्षांचींही डोकीं भडकून गेलीं होतीं.व या 'प्रकरणाचा निकाल लवकर न लागला तर प्रसंग वाईट येईल,' असें सिटी मॅजिस्ट्रेटनें मला कळविलें. मुसलमानांनीं पुन्हां रात्रीं ९ वाजेपर्यंत वेळ मागितली. ती मीं दिली. पण आतां यापुढें दुसऱ्या दिवसाच्या पहांटेस हें प्रकरण मी लोंबत ठेवूं चहात नाहीं. असें मीं त्यांस कळविलें. नऊ वाजेपर्यंत समेट न झाला तर मला त्याच रात्रीस ( २९ आक्टोबर ) माझा हुकूम काढावाच लागेल, हें मीं उभयतांस कळविलें होतें. त्या दिवशीं मुसलमानांचा बराच मोठा जमाव माझ्या कोर्टांत आला. व त्यांनीं माझ्याकडे एक कैफियत सादर केली. त्यावरून तडजोड होत नाहीं, हें मला दिसून आलें. मुसलमानांच्या कैफियतीमध्यें ह्मटलें होतें कीं, " हिंदू जर एक दिवस बिनशर्त टाळ न वाजवितां दिंडी नेतील, तर आह्मी समेटाची वाटाघाट करावयास तयार आहों " या वाक्यांत समेटाला थोडी फार थोडी—जागा होती. मुसलमानांचें हें ह्मणणें मीं डॉ.मुंजे यांस हिंदूंच्या विचाराकरितां कळविलें. पण दोन्ही पक्षांनीं मला संध्याकाळपर्यंत कळविलें कीं, 'तडजोड होत नाहीं,' तेव्हां " उद्यांच्या ( मंगळवार ता. ३० च्या ) पहांटेची दिंडी तुह्मी माझ्या पाहिल्या ऑर्डरप्रमाणें थांबवा, " असें मी पोलिसांना कळविलें. पोलिसला हा हुकूम सोडतांना माझ्यापुढें दोन मार्ग होते. ( १ ) मशीदीपुढें वाद्यें थांबविण्याची माझी पूर्वीची २१ अक्टोबरची ऑर्डर पुन्हां अंमलांत आणावी, किंवा ( २ ) हिंदुमुसलमानांस पसंत पडलेल्या समेटाच्या अटीच मी अंमलांत आणाव्या. ह्मणजे एक दिवस हिंदूंची दिंडी साफ थांबवून दुसऱ्या दिवसापासून पांच टाळ वाज-वीत जाण्याची मोकळीक द्यावी.

" यांपैकीं दुसरा मार्ग हिंदुमुसलमानांतील विचारी पुढाऱ्यांस मान्य होता.त्या-अर्थी तोच स्वीकारण्यास हरकत नव्हती. पण गणेशपेठेतील हिंदू एक दिवस तरी वाद्यें बंद ठेवण्यास राजी दिसत नव्हते. आणि उभयतांतील पुढाऱ्यांची तडजोड

जहाल व धर्मवेडया लोकांना रुचली नसती. शहाण्यासुरत्या व समजुतदार माणसांत असल्या बाबतींत झटकन समेट झाला असता. पण माझ्यासारख्या ज्या कामगारांना सार्वजनिक शांतता संभाळावयाची असतें, त्यांना केवळ समजूतदार लोकांनाच खुष करून भागवावयाचें नसते. त्यांना धर्मवेडा व बहुजन समाजच लक्षांत घ्याव लागतो. पण मीं पहिला मार्ग पत्करला यांचें खरें कारण हेंच कीं, मशीदजिवळ वाद्यें बंद करण्याची चाल सर्वसाधारण आहे. आणि या प्रांताच्या सरकारचा हुकूम व कोर्टाचें जज्जमेंट हेंही पहिल्याच मार्गाला अनुकूल आहे. आतां माझी ही ऑर्डर हिंदूंच्या वाद्यें वाजविण्याच्या हक्कांवर गदा आणणारी आहे, असें वाटत असेल तर त्यांनीं दिवाणी कोर्टांत दावा करून आपला हक्क शाबीत करून घ्यावा. ह्मणून मी हुकूम करतों कीं, जर मशीदींतील कोणी मनुष्य कोणत्याही तऱ्हेचें वाद्य मशीदीसमोर वाजविण्यास हरकत घेईल, तर मशीदीच्या दोन्ही बाजूंस दहा दहा कदम वाद्यें बंद ठेवावीं.

" सिटी मॅजिस्ट्रेट कोर्टांत हिंदूंना दुसरी एक युक्ति सुचविण्यांत आली होती. ती अशी कीं, दिंडीबरोबरच्या वाद्यांत खंड पडूं नये ह्मणून मशीदीच्या दोन्ही बाजूंस दहा दहा कदमांवर वाद्यें वाजवीत ठेवावीं. व मशीदीसमोरून दिंडी जात असतां दोन्ही बाजूंचीं वाद्यें वाजत रहावीं. ह्मणजे वाद्यें अखंड वाजत राहून मुसलमानांची तक्रार राहणार नाहीं. पण ही युक्ति हिंदूंना पसंत पडली नाहीं. कारण, त्यांत मशीदीवरून वाद्यें वाजवीत जाण्याचा आपला हक्क बुडतो, अशी त्यांची समजूत आहे. यास्तव त्यांनीं दिवाणी कोर्टांत आपला हक्क शाबीत करून घ्यावा, असें मीं ह्मटलें आहे."

३०-१०-१९२३ इ. } एच्. सी. गोवन,
डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, नागपूर.

## मनाई हुकूमही एकतर्फीच !

या मनाई हुकुमाप्रमाणें मंगळवारीं (ता. २९) कांकडआरतीची पकडापकड झाल्यानंतर राजेसाहेबांचे वाड्यांत हिंदूंचे सर्व पुढारी जमले. पुढें काय करावें हा प्रश्न सर्वांपुढें सारखा होताच. नंतर राजेसाहेबांनीं रात्रीं हिंदु लोकांची जाहीर सभा बोलावण्याचा हुकूम सोडला. त्याप्रमाणें रात्रीं ८ वाजतां

राजेसाहेबांच्या तुळशीबागेंत प्रचंड जाहीर सभा भरली. राजेसाहेबांची ही तुळशीबाग पूर्वीपासून इतिहासप्रसिद्ध अशीच आहे. नागपूरचे आप्पासाहेब भोंसले यांच्या कारकीर्दींत इंग्रज सरकाराबरोबर जें युद्ध झालें, त्याची एक घनघोर चकमक याच तुळशीबागेंत झाली. त्यामुळें ही बाग विशेष नांवलौकिकाला आली. या बागेच्या चारी बाजूंनीं मजबूत असा परकोट आहे. त्या ठिकाणीं जाहीर सभा झाली तर तीस चाळीस हजार लोक सहज मावूं शकतात, अशी त्याची विस्तृतता आहे. यामुळें हें ठिकाण नागपूरच्या हिंदु लोकांचें आदरस्थान होऊन बसलें आहे, सकाळच्या पकडापकडीनें व सरकारच्या मनाई हुकुमानें सर्व हिंदु-समाज बिथरून गेला होता. त्यामुळें या सभेस हजारों लोक लोटले होते. हा लोकांचा जमाव पाहून राजांची तुळशीबाग ह्मणजे मुंग्यांचें एक वारुळच असें पहाणाराला वाटण्यासारखें होतें. ही सभा जमल्यानंतर सर गंगाधरराव चिटणवीस हे बोलण्याकरितां उठून त्यांनीं सभा बोलावण्याचा उद्देश सर्वांस सांगितला व असें म्हणाले कीं, ' आजच्या कार्याच्या महत्वाच्या दृष्टीनें कार्य करणारे व कार्याचा पूर्ण भार वाहणारे नागपुरांत सर्वमान्य असे एकच गृहस्थ आहेत. ते आपले परमपूज्य श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले होत. ( टाळ्या ) त्यांनींच आजच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी मी सूचना करतों. ( टाळया ) या सूचनेस चार पांच मंडळींनीं अनुमोदन दिल्यानंतर राजेसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें त्यांनीं आजपर्यंत झालेली गणेश पेठेंतील सर्व हकीकत सांगितली व हा तंटा योग्य व सनदशीर मार्गांनीं मिटविण्याची कशी आवश्यकता आहे, हें सर्वांस निवेदन केलें. नंतर हिंदु मुसलमानांच्या समेटाकरितां कांग्रेस व खिलाफत यांच्यांत काय काय गोष्टी घडल्या व शेवटीं समेट कसा फोल ठरला व सरकारी मनाई हुकूम कसा एकतर्फी निघाला. याबद्दल त्यांनीं डॉ. मुंजे यांना बोलण्यास विनंति केली. डॉ. साहेबांनीं सर्व हकीकत सांगितल्यानंतर हिंदूंचे सार्वजनिक हक्क संरक्षण करण्याकरितां हिंदुसंस्था स्थापना करण्याबाबत पहिला ठराव आणि गणेश पेठेंतील कांकडआरतीच्या मदतीकरितां दुसरा ठराव असें दोन ठराव होऊन ही सभा संपली. या सभेनें नागपुरांत फारच खळबळ उडून गेली.

## यज्ञकुंड धडाडलें.

मंगळवारीं ( ता. २९ ही ) हकीकत झाल्यानंतर बुधवार ता. ३० पासून धर्म सत्याग्रहाला क्रमाक्रमानें महत्व येऊं लागलें. सत्याग्रहांत जाण्याबद्दल धर्मवीरांची




श्री सर गंगाधरराव चिटणवीस के. सी आय. ई.

(क फो झि प्रे वे.) पृष्ठ २७०-२७१

राजे साहेबांचे धर्मसत्याग्रहांतील प्रमुख सांगाती.







१ श्री. सरदार समाज भूषण व्यंकटराव उर्फ तात्यासाहेब गुजर. २ डॉ. बा. शि. मुंजे.
३ श्रीयुत गोपाळराव ओगले, संपादक 'महाराष्ट्र'

(क.फो.झिं.प्रे.बे.)

पृष्ठ २७०-२७१

अहमहमिका सुरू झाली. पहिले सात आठ दिवस आठ दहा पासून पंधरावीस पर्यंत धर्मवीर सत्याग्रहांत गेले. याप्रमाणें रोज रोज आंकडा वाढत जाऊं लागला. नंतर प्रत्येक मोहल्या मोहल्या मोहल्याची दिंडी जाऊं लागली. पुढें ता० ८ व ९ नोव्हेंबर या दोन्ही दिवशीं नागपुरांतील प्रमुख लोकांनीं भाग घेतला. त्यांत नागपूर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष डॉ. चोळकर, डॉ. परांजपे, डॉ. खरे, डॉ. हेडगेवार, श्री. दाजीशास्त्री चांदेकर, श्री. तिजारे, श्री. गोपाळराव ओगले, महाराष्ट्र ' पत्राचे संपादक, श्री. दादाशास्त्री कायरकर, श्री. जयकृष्णपंत उपाध्ये, श्री. विश्वनाथ व्यंकोबा हरदास, श्री. नारायणराव बढे, श्री. नारायणराव वैद्य वकील, श्री. गोखले, श्री. दत्तोपंत परांजपे, श्री. गोविंदराव चोळकर, श्री. खोत वगैरे वगैरे गांवांतील प्रमुख मंडळींची दिंडी गेली. नंतर शनिवारीं ह्मणजे ता. १० रोजीं नागपूरच्या सर्व हिंदु आखाड्यांतील पहेलवान लोकांची दिंडी गेली. त्यांत उदाराम पहेलवान, नाईक, पांडुरंगसाव, धोंडीबासाव, नारायण पेंटर वगैरे सर्व पहेलवान पेशाचे लोक मिळून दोनशें सतरा इसम होते. ही दिंडी फारच मोठी होती. रोज रोज गणेशपेठेंत लोकांचा समुदाय जास्त जास्त वाढत होता. ही दिंडी अफाट असल्यामुळें या दिंडींतील सत्याग्रही वीरांना गांवांतील कोतवाल चौकांत न नेतां सीताबर्डीचे रस्त्यानें जिल्हाकचेरींत नेण्यांत आलें व तेथें मुचलके घेऊन नेहमींप्रमाणें सोडण्यांत आलें. या सत्याग्रही वीरांच्या मिरवणुकीबरोबर दररोज श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले, सर गंगाधरराव चिटणवीस, डॉ. मुंजे, श्रीमंत फत्तेसिंगराव भोंसले, श्रीमंत सरदार तात्यासाहेब गुजर व केव्हां केव्हां श्रीमंत राजेबहादुर रघोजीराव भोंसले वगैरे मंडळी असत. राजेसाहेबांनीं या सत्याग्रहाचा सर्वच भार आपले शिरावर घेतल्यामुळें पहांटे चार वाजतां ते गणेशपेठेंत जाऊन हजर रहात. ते नित्य दिंडी काढून देत व पोलीसांनीं ती दिंडी पकडली व कोतवालींत अगर जिल्हाकचेरींत मुचलके घेऊन ती मोकळी झाली, ह्मणजे ते वाड्यांत येत.

## शेवटची आहुती ?

अशाप्रकारें त्यांचा नित्यक्रम चालला होता. राजेसाहेबांबरोबर त्यांचे वाड्यांतील मंडळींपैकीं फक्त त्यांचे एक प्रेमळ स्नेही व दुसरे त्यांचे शरीरसंरक्षक रामराव पहेलवान एवढी दोनच मंडळी असत. पहेलवान लोकांची दिंडी

पकडून जिल्हा कचेरीकडे नेते वेळीं श्रीमंत राजेसाहेबांनीं ' उद्यां आपण स्वतः सत्याग्रहांत जाणार,' ह्मणून जाहीर केलें. व आपलेबरोबर आपल्या वाड्यांतील, मानकरी, ब्राह्मण, नोकर, बारीदार वगैरे आश्रित मंडळी या धर्मसत्याग्रहांत येणार, असें त्यांनीं सांगितलें. ही हकीकत पोलीस, सरकारी अंमलदार, गांवांतील हिंदुनागरिक यांचे कानांवर ह्यां ह्यां ह्मणतां गेली. मुसलमान लोक या बातमीमुळें विस्मयचकित झाले. दुसरे दिवशीं स्वतः राजेसाहेब आपल्या वाड्यांतील मंडळींसह या धर्मसत्याग्रहांत जाणार या वर्तमानामुळें सर्व नागपूर शहर हादरून गेलें. सरकारी अधिकाऱ्यांना पेंच पडला. राजेसाहेबांचे बालमित्र पण मुसलमान समाजांच पुढारी नबाब नियाजउद्दीनखान यांची तारांबळ उडाली. प्रत्येक हिंदूच्या घरीं स्वतः राजेसाहेब धर्मसत्याग्रहांत जाणार, मग आह्मांला मागें राहून काय करावयाचें आहे, अशी भाषा सुरू होऊन त्यांचेबरोबर सत्याग्रहांत जाण्याचा जो तो संकल्प करूं लागला; आणि त्याप्रमाणें आपल्या बायकामुलांना ' रविवारच्या सत्याग्रहांत आपणहि जाणार ' ह्मणून सांगूं लागला. एकंदरींत सर्व नागपूरशहरांत आबालवृद्ध रावापासून रंकापर्यंत ता. ११ च्या धर्म सत्याग्रहाचे विचार चालले होते. आणि त्याप्रमाणें जो तो आपापल्या तयारीला लागला होता.

## गव्हर्नरांचें आगमन.

नागपूरचे नामदार गव्हर्नर साहेब ( सर फ्रँक स्लाय ) हे पंचमढीहून गुरुवार ( ता. १ नोव्हेंबर ) रोजीं नागपुरीं आले. त्यांनीं हिंदुमुसलमान पुढाऱ्यांची मुलाखत घेतली. श्रीमंत राजेसाहेबांची मुलाखत झाली. नागपूरच्या भोंसले राजघराण्याबद्दल ना. गव्हर्नर सर फ्रँकसाहेब यांना फार मोठा आदर वाटत असे. त्यांच्यासारखा थोर आणि विचारी मनाचा गव्हर्नर मिळणें फार दुर्मिळ, असें लोकमत होतें. मुसलमान समाजाचे पुढारी नबाब नियाजउद्दीनखान यांची नामदार गव्हर्नरसाहेबांनीं भेट घेतली. उभयपक्षांचें बोलणें शांत चित्तानें त्यांनीं ऐकून घेतल्यानंतर समेटाच्या अटी उभय पक्षांचें पुढाऱ्यांना मान्य असतां केवळ सामान्य मुसलमानांच्या हट्टामुळेंच हा समेट घडून येत नाहीं, अशी त्यांचीही खात्री होऊं लागली.

## मनोनिग्रहाची तयारी.

श्रीमंत राजेसाहेबांनीं आपण आपल्या वाड्यांतील मंडळींसह रविवारीं ( ता. ११ ) धर्मसत्याग्रहांत जाणार असें निश्चयात्मक सांगितल्यामुळें ' तुम्ही सत्याग्रहांत भाग घेऊं नका, ' सत्याग्रहांत जा ' एवढेंच तुह्मी दुसऱ्यांना सांगा, ' अशी सल्ला त्यांना देण्याचा कोणालाच धीर होईना. त्यामुळें नागपुरांतल्या हिंदु पुढाऱ्यांना मोठा पेंच पडला. राजेसाहेबांचे इस्टेटीचे म्यानेजर रावसाहेब नारायणराव व्यास हेही घाबरून गेले. राजेसाहेब सरकारी पेन्शनदार, जहागिरदार, तेव्हां त्यांच्यावर सरकारी हुकूम मोडल्यानें कोणकोणते व कसेकसे अनर्थ ओढवले जातील, याची कल्पना सर्वांना आतां येऊं लागली. भोंसल्यांचें पूर्वीचें सर्व वैभव जाऊन आतां जें शेष राहिलेलें आपल्या डोळ्यांला थोडे दिवस दिसतें आहे, तेंही सरकाराची इतराजी झाल्यानें जाईल आणि त्याला आपण पुढारी लोक कारणीभूत होऊं, असें सर्वांना वाटूं लागलें. तेव्हां एका वयोवृद्ध गृहस्थांनीं मनाचा धडा करून फक्त ' त्यांनीं तेवढें सत्याग्रहांत जाऊं नये, ' असें राजेसाहेबांना कळकळीनें सुचविलें. त्यावर राजेसाहेब ह्मणाले, ' तुमचा हेतु ' मी समजलों. पण. आपण अशी कल्पना कां करितां, हेंच मला समजत नाहीं. कारण, आज तुह्मी माझी जी दौलत आहे, असें मानतां तीही तुमच्याच वाडवडिलांच्या मदतीनें आमच्या वाडवडिलांनीं मिळविली आहे. समजा कीं, उद्यांच्या प्रसंगानें सरकारची इतराजी आमचेवर झाली.—ती होणें शक्य नाहीं यांत तर शंकाच नाहीं.-पण तुमच्या ह्मणण्याप्रमाणें इतराजी होणार, असें गृहित धरूं या. व तीमुळें आमची इस्टेट जप्त केली जाणार, असेंही समजूं या. तरी मला त्यांत वाईट वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. पूर्वी तुमच्याच लोकांच्या मदतीनें ही इस्टेट मिळाली होती व आतां गेली तरी पुढेंही तुमच्याच लोकांच्या मदतीनें आमच्या मुलाबाळांना मिळवावी लागेल. ' या उत्तरानें राजेसाहेबांनीं त्या वृद्ध गृहस्थांना निरुत्तर केलें. पण, या उत्तरानें त्या गृहस्थांचें डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. ' धन्य आहे राजा ! ' एवढेंच शब्द त्यांचे तोंडांतून बाहेर पडले. या गोष्टीमुळें राजेसाहेब ता. ११ च्या सत्याग्रहांत खात्रीनें जाणार, हें सर्वांना समजून गेलें. त्यामुळें गांवांतील मोठमोठी मंडळी राजेसाहेबांना येऊन भेटूं लागली. त्यांतच त्यांचा वेळ जाऊं लागला. शनवारचे सायंकाळचे सहा वाजले तरी त्यांना फुरसत मिळेना, अशी परिस्थिति झाली. तेव्हां त्यांच्या वाड्यांतील एका

प्रेमळ स्नेह्यानें त्यांना उठविलें व सुचविलें कीं, उद्यां आपणाला सत्याग्रहांत जावयाचें हें निश्चित झालें आहे; तेव्हां सरकारला एक शेवटचें निर्वाणीचें पत्र आपण पाठवावें, असें मला वाटतें. या गोष्टीला राजेसाहेबांनीं संमति दिली. त्याप्रमाणें शनिवारीं रात्रीं ११ वाजतां हें पत्र श्रीमंत राजेसाहेब, सर गंगाधरराव चिटणीस व डॉ. मुंजे या तिघांच्या सहीनें मे० डि० कमिशनर साहेब यांचेकडे पाठविण्यांत आलें. व त्याची एक एक प्रत नामदार गव्हर्नरसाहेब व पोलिस सिटी सुपरिंटेन्डन्ट यांचेकडे माहितीकरतां पोंचविण्यांत आली.

## अखेरचें निर्वाणीचें पत्र.

मे० डि० कमिशनर,

नागपूर, यांसः—

साहेब,

गुरुवार तारीख ८ रोजीं दुपारीं दोन वाजतां आपल्या बंगल्यावर हिंदु व मुसलमान पुढारी मंडळीच्या मुलाखतीचा योग आपण जमवून आणला, त्या वेळीं मुसलमान पुढाऱ्यांनीं आदले दिवशीं आपणाला सांगितलेली समेटाची नवीन अट आपण आम्हांला सुचविली. ती समेटाची अट अशी कीं, गणेशपेठेंतील तंट्याच्या मशीदीचा मागील नवा दरवाजा झांकला जाईल, अशी मुसलमानांनीं एक भिंत बांधावी. व त्यानंतर हिंदूंच्या कांकडआरतीच्या पांच टाळांच्या दिंडीस मशिदीच्या दरवाजासमोरील रस्त्यावरून वाजत जाण्यास मुसलमानांची हरकत नसावी. या मुलाखतींत ठरल्याप्रमाणें ही ( मुसलमानांची नवीन ) अट हिंदु सभेच्या सर्वसाधारण सभेपुढें काल ठेवण्यांत आली. त्या कमिटीनें आह्मांला अधिकार दिल्याप्रमाणें खालील गोष्टी आह्मांस कळवीत आहोंत.

१ समेटाचे सर्व प्रयत्न पुन्हां पुन्हां निष्फळ करणारा व आपला दुराग्रह कायम ठेवणारा मुसलमान समाजच होता. या ठिकाणीं हें सांगणें आवश्यक आहे कीं, कॉंग्रेस आणि खिलाफत या कमिट्यांनीं समेटाचा जो पहिला प्रयत्न केला, त्यांत ठरलेल्या अटी उभयपक्षानें एकमतानें मान्य केल्या होत्या. त्याची नक्कल आपल्याकडे आहेच. त्या अटी इतक्या योग्य होत्या कीं, एके वेळीं या प्रकरणांत सर-

कारकडून निघणाऱ्या हुकुमाला त्या आधारभूत होण्यासारख्या आहेत, असें आपणालाही वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

याप्रमाणें आपणापुढें ही गोष्ट स्पष्टपणें मांडण्यांत आली होती कीं, मुसलमान पुढाऱ्यांनीं एकमतानें अटी मान्य करून त्यावर सह्या केल्या असूनही त्या अटी अंमलांत येऊं शकल्या नाहींत. या गोष्टीस आपल्या पुढाऱ्यांचा उपदेश व शिस्त हिंदूंनीं पाळली नाहीं, असा प्रकार नसून उलट सर्वसाधारण मुसलमानांनीं त्यांच्यां-तील पुढाऱ्यांचा उपदेश ऐकिला नाहीं, ह्मणून मुसलमानच जबाबदार आहेत.

२ हिंदूंच्या सर्व प्रकारच्या धार्मिक मिरवणुकी वाद्यांसह दिवसां अगर रात्रीं कोणत्याही वेळीं कोणत्याही सार्वजनिक रस्त्यांतून नेण्याचे हिंदूंचे हक्क आजहि अबाधितपणें चालू असूनही आह्मी हिंदूंच्या वतीनें आपणांस असें आश्वासन देण्यास तयार आहोंत कीं, अझूनसुद्धां गणेशपेठेंतील तंट्याच्या मशीदीसंबंधानें पांच टाळांचा तात्पुरता समेट कबूल करावयास आह्मी तयार आहोंत.

मुसलमान पुढाऱ्यांकडून आपणांस ता. २९।१०।१९२३ इ. चें आलेलें पत्र आपण आमच्याकडे माहितीकरितां पाठविलें. त्यांत सरसकट हिंदूंना अपमानास्पद वाटण्यासारखा मजकूर असतां तो विसरून जाऊन व मुसलमान समाज, हिंदूंप्रमाणें नामदार गव्हर्नर साहेबांच्या इच्छेला मान देण्याला तयार नसून देखील, हिंदुसमाज हा पांच टाळांचा तात्पुरता समेट कबूल करावयाला तयार होत आहे, ही गोष्ट आह्मीं मुद्दाम आपले नजरेस आणावी, असें नाहीं.

३ हिंदुसमाज हा तात्पुरता समेट खालीं दिलेल्या अटींवर कबूल करीत आहे.

अः— या प्रश्नाबाबत कोकोनाडा काँग्रेसकडून हिंदूंच्या सामाजिक, धार्मिक व सर्वसाधारण मिरवणुकी कोणत्याही वेळीं व कोणत्याही सार्वजनिक रस्त्यानें नेण्या-बद्दलचे हक्क अबाधित राखण्यासारखा एकादा ठराव पास होईपर्यंत हा समेट तात्पुरता पाळण्यांत यावयाचा आहे.

बः— नामदार गव्हर्नरसाहेब यांनीं सुचविल्याप्रमाणें सरकारकडून शक्य तवढ्या लवकर एक चौकशी कमिटी नेमण्यांत यावी. व मि० बेकर, रा. ब.

माधवराव किनखेडे आणि मुसलमानातर्फे मि. विलायतउल्ला, मि. अबदुल सतार किंवा दुसरा कोणीतरी एक मुसलमान गृहस्थ अशा तिघांची कमिटी बसवून त्या कमिटीनें पूर्ण चौकशी करून त्याबाबत योग्य तो रीपोर्ट सरकारकडे करावा.

क:—हा तात्पुरता समेट मुसलमानांना कबूल आहे किंवा नाहीं व त्याप्रमाणें ते वागण्यास तयार आहेत किंवा नाहींत, याबद्दलचा लेखी खुलासा त्यांनीं हें पत्र आपणास पोंचल्यापासून चोवीस तासांचे आंत केला पाहिजे.

ड:—जर मुसलमान समाज याही वेळीं या समेटाच्या अटी कबूल करण्यास तयार नसेल, तर सरकारनें हल्लीं हिंदूंच्याविरुद्ध काढलेला हुकूम परत घ्यावा. आणि हिंदूंच्या धार्मिक मिरवणुकी ( दिंड्या ) कोणत्याही वेळीं दिवसां किंवा रात्रीं कोणत्याही सार्वजनिक रस्त्यानें बिनहरकत नेण्यास मंजुरी देणारा हुकूम सरकारकडून काढण्यांत यावा.

इ:— कांकडआरतीच्या मिरवणुकींत ज्यांनीं ज्यांनीं भाग घेतला आहे, त्यांवर केलेले व पुढें केले जाणारे खटले काढून घेण्यांत यावे आणि त्यांचे मुचलके रद्द व्हावे.

नागपूर सी. पी.<br>तारीख १०–११–१९२३ इ.

( सह्या )

लक्ष्मणराव भोंसले.<br>जी. एम्. चिटणवीस.<br>बी. एस्. मुंजे.

## श्रीशंकराचार्यांची धांव !

नागपुरास धर्मसत्याग्रह चालू आहे, हें श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांना नाशिकाला समजलें. ही धर्माची बाब असूनही ती फक्त ऐकून घेऊन कानांवर हात ठेवून स्वस्थ बसणाऱ्या शंकराचार्यांपैकीं ते नव्हते. ते जगद्गुरु-मठाच्या आर्थिक हक्कांवर पाणी सोडून केवळ धर्मसेवा घडावी, या उच्च हेतूनें बाहेर पडले होते. तेव्हां अशी महत्वाची बाब उपस्थित झाल्यानंतर त्यांना नाशिकांत गप्प बसून राहणें कसें आवडेल ? त्यांनीं राजेसाहेबांना तार देऊन कळविलें कीं, आम्ही रविवारीं सकाळीं सात वाजतां नागपूर स्टेशनवर नागपूर-

मेलनें उतरत आहेत. या तारेनें राजेसाहेबांनाही आनंद झाला. श्रींची आपल्या तुळशीबागेंत उतरण्याची व्यवस्था करावयास आणि त्याचप्रमाणें स्टेशनवर त्यांचे स्वागताकरितां हत्ती, घोडे, गाड्या, मोटारी वगैरे लवाजमा पाठविण्यासही खासगी कामदारांस त्यांनीं हुकूम दिला.

## राजाश्रित सत्याग्रही.

रविवारीं ( ता. ११ नोव्हेंबर ) पहांटे चार वाजतां नित्यनेमाप्रमाणें राजेसाहेब स्नान, संध्या, पूजा वगैरे आन्हिक आटोपून तयार झाले. त्यांचेबरोबर सत्याग्रहांत जाणारी पुढीलप्रमाणें वाड्यांतील मंडळीही तयार होऊन पूर्वीच बसली होती. १ श्री. पां. गो. रानडे, २ रा. रामजी शिवराम गुरु, ३ रा व्यंकटराव सीताराम पुणेकर, ४ श्री. भाऊसाहेब मोहिते, ५ श्री. आप्पासाहेब महाडिक, ६ श्री. धोंडीबा पालकर, ७ श्री. बाळासाहेब भोंसले, ८ श्री. गणपतराव मोहिते वैद्य, ९ श्री. बाबूराव महाडिक, १० श्री. नानासाहेब शिर्के, ११ श्री. बाळासाहेब मोहिते, १२ पंडित घाशीरामजी, १३ रा. बंडोबा तुपकर जामदार, १४ रा. रामराव शेळके पेहलवान जामदार, १५ मा. रा. कदम, १६ आनंदराव सीताराम नन्नवरे, १७ रा. ल. भोयर, १८ गणपतराव वाघ, १९ बा. वि. पांडे, २० ना. पी. मुदबके, २१ रा. गणपतराव घाडगे, २२ कि. गो. मोहिते, २३ बा. कृ. मोहिते २४ मा. ल. गुबे, २५ दादा मराठे, २६ विठोबा डफेदार २७ लहानबा पालकर, २८ आसराबा मराठे, २९ ठाकूर बदलुसिंग, ३० नामदेव शिंपी, ३१ अ. ना. शिंपी, ३२ हरबाजी गोंधळी, ३३ बाबूराव सोनार, ३४ यादवराव मराठे, ३५ सदबाजी महाली, ३६ पांडोबा मराठे, ३७ केशवराव मराठे, ३८ बापूराव ढगे, ३९ रा. शिरपुरकर ४० रा. एकनाथ वगैरे मंडळी होती.

## सत्याग्रहाचें विराट स्वरूप !

या मंडळींस राजसाहेबांनीं पुढें पाठविलें. देवघरांत जाऊन श्रीरामाचें दर्शन त्यांनीं घेतलें. मातोश्रींचे पायांवर डोकें ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला. व आपल्या नेहमींच्या दोन इसमांबरोबर मोटारींत बसून ते गणेशपेठेकडे निघाले.

त्या दिवशींचा गणेशपेठेचा देखावा कांहीं और होता. रविवार असल्या-

मुळें सर्व गिरण्या, सर्व ऑफिसें बंद होतीं. त्या दिवशींच्या सत्याग्रहांत राजेसाहेब जाणार, ही हकीकत नागपूरच्या कोनाकोपऱ्याला समजली होती. त्यामुळें पहांट होते, केव्हां व आपण गणेशपेठेंत जातों केव्हां, असें प्रत्येकाला झालें होतें. या अलम दुनियेंत प्राणापेक्षां जास्त प्रिय असें कोणत्याही हिंदूला काय वाटत असेल तर त्याचा प्रिय ' हिंदु-धर्म ' होय. आपल्या प्रिय धर्माकरतां आपला राजा आज धर्मसत्याग्रहांत जाऊन कारागृहवास पत्करण्याला सिद्ध झाला आहे, या विचारानें नागपूरच्या प्रत्येक हिंदूचें अंतःकरण धडपड करूं लागलें होतें. त्यामुळें आपणही राजेसाहेबांबरोबर सत्याग्रहांत जावें, अशी हरएक हिंदूंच्या मनाची तयारी झाली होती. श्री छत्रपतिशिवाजीमहाराजांचे वेळीं धर्मरक्षणाकरितां लढाईवर येण्याबद्दल एकदां द्वाही फिरली, ह्मणजे ज्याप्रमाणें धर्मवीरांच्या आंगीं रणदेवता संचार करून हातीं मिळेल तें शस्त्र घेऊन प्रत्येकाला रणमैदानावर धांवत जाण्याकरतां उत्सुक करीत असे, त्याप्रमाणें या धर्मवीरांची स्थिति होऊं लागली. गणेशपेठेंतील धर्म-क्षेत्रावर सत्याग्रहरूपी लढाई करण्याकरतां ज्याला जें आयुध सांपडेल तें ह्मणजे टाळ, वीणा, मृदंग, चिपळ्या, झांज यांपैकीं कोणतेंही आयुध आपल्या घरीं मिळाल्यास तें अगर शेजारपाजारीं किंवा देवळांतून मागून घेऊन जो तो गणेशपेठेकडे पळत होता. त्या दिवशीं या भजनी साहित्याचा तुटवडा भासूं लागल्यामुळें मेळेवाल्या मुलांनीं टिपऱ्या घेऊनच घरून गणेशपेठेकडे पलायन केलें होतें. अफाट जनसंमर्दामधून कपाळावर ठळक पांढऱ्या गंधाचा टिळा लाव-लेला सत्याग्रही धर्मवीर तात्काळ नजरेंत भरत होता. हे धर्मवीर गणेशपेठेमध्यें नागपूरच्या चारी दिशेनें उतरत होते. आपल्या घरच्या धर्मवीरांना धर्मक्षेत्राच्या सीमेपर्यंत पोंचविण्याकरितां प्रेमळ हृदयाच्या आयाबहिणी आपापल्या कडेवर तान्ह्या मुलांना घेऊन गणेशपेठकडे धांव घेत होत्या. हा एकंदर प्रकार चालला आहे, तोंच राजेसाहेबांची मोटार शुक्रवार तलावाचे पूर्वेस मॉडेल मिलचा आणि गणेशपेठेचा रस्ता यांच्या चौकांत आली. तेथें इतकी गर्दी होती कीं, त्या रस्त्यानें गणेशपेठेंत मोटार जाणें अशक्य झालें होतें. ज्या ज्या ठिकाणीं केवळ पाय ठेवण्या-पुरती जागा सांपडेल तेथें तेथें गर्दी करून मनुष्य खेंचून उभें राहिलें होतें. यासाठीं राजेसाहेब तेथेंच उतरले व आपल्या अनुयायी सत्याग्रही वीरांसमवेत पायींच गणेश पेठेकडे निघाले. राजेसाहेबांना पाहिल्याबरोबर त्या लोकसमुदायांत भांगाप्रमाणें आपो-

आप मार्ग पडूं लागला. 'लक्ष्मणरावमहाराजकी जय,' या जयघोषानें सर्व आकाश दुमदुमूं लागलें. या भांगवजा पडत असलेल्या मार्गांतून राजेसाहेब चालले असतां प्रत्येक हिंदु त्यांना पूर्ण आदरानें मुजरा करीत होता. राजेसाहेबही तेवढ्याच प्रेमानें मुजरे घेत घेत चालले होते. प्रत्येक वर्षी राजेसाहेबांची दसऱ्याची स्वारी पहावयाला सर्व नागपूर शहर लोटत असे. राजेसाहेब आपल्या भव्य हत्तीवरील अंबारींत बसून सीमोल्लंघनाला जाऊं लागले, ह्मणजे त्यांना जो तो मुजरा करून आपला आनंद व्यक्त करीत असे. पण तशा प्रकारचा हेतु त्या दिवशींच्या त्या वेळच्या मुजरा करण्यांत लोकांचा नव्हता. दसऱ्याचा समारंभ आणि धर्मसत्याग्रहाचें सात्विक रणक्षेत्र यांमधील अंतराप्रमाणेंच या मुजऱ्यामध्येंही जमीनअस्मानाचें अंतर होतें. राज्याभिषेकाकरितां अयोध्या नगरींत येत असतांना श्रीरामचंद्रांना लोकांनीं अभिवादन केलें आणि अयोध्या सोडून वनवासाला ते जाऊं लागले, तेव्हांही त्यांनीं अभिवादनच केलें. या भिन्न प्रसंगांच्या अभिवादनांत जेवढें अंतर होतें, तेवढेंच तें राजेसाहेबांना करण्यांत आलेल्या दोन्ही वेळच्या या मुजऱ्यांत खात्रीनें होतें. प्रजावात्सल्य, सदाचरण, धर्मश्रद्धा, लोककल्याणाकडे सदाप्रवृत्ति, गोब्राह्मणांविषयीं आदरबुद्धि, या गुणांमुळें श्रीरामचंद्र लोकवंद्य झाले होते व त्यांनीं त्यामुळें लोकांचीं मनें आपल्याकडे ओढून घेतलीं होतीं. त्याचप्रमाणें आमचे चरित्रनायकांची स्थिति होती. ते आपल्या सद्गुणांनीं नागपूरचा आत्मा होऊन बसले होते. त्यांचा कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें नागपूरच्या सर्वसाधारण नागरिकांशीं प्रत्यक्ष संबंध येई. नागपुरांतील चाळीस पन्नास आखाड्यांच्या लोकांना ते आपलेसे वाटत. म्युनिसिपालिटी, डिस्ट्रिक्ट कौन्सिल, कॉलेजें, हायस्कुलें, प्राथमिक शाळा, मुलींच्या शाळा त्याचप्रमाणें आणखी कित्येक लहानमोठ्या संस्थांशींही राजेसाहेबांचा संबंध होता. सार्वजानिक गणेश उत्सव, मिरवणुकी, सभा, टुर्नामेंट्स यामध्येंही राजेसाहेब भाग घेतच असत. एकंदरींत नागपूरच्या लोकांना राजेसाहेब ह्मणजे आपल्या घरांतील एक आदरणीय पुरुष असें सर्वांना वाटत होतें. वनवासाला जाते वेळीं सर्व अयोध्या नगरींत प्रत्येक नागरीक भावनोद्दीपित होऊन श्रीरामचंद्राला प्रेमाचा निरोप देण्याकरितां ज्याप्रमाणें घरून धांवून आला होता, तोच प्रकार थोड्याबहुत प्रमाणांत त्या दिवशीं नागपुरांत पाहावयाला मिळाला. कैकयीच्या दुराग्रहामुळें श्रीरामाला वनवासाला पाठविण्याचा दुःसह, दुर्धर आणि दुष्कीर्तिकर प्रसंग दशरथाच्या नशिबीं आला,

तसाच तो श्रीमंत राजेसाहेबांना कारागृहाच्या वाटेला लावणारा मुसलमान बंधूंच्या धर्मवेडामुळें सरकारावर आला ! तात्त्विक दृष्टीनें दोन्हीही प्रसंग सारखेच.

## नागपूरच्या हिंदुत्वाची परीक्षा.

श्रीमंत राजेसाहेब कसेबसे आपल्या सत्याग्रही धर्मवीरांसह मशीदीजवळ आले. तेथें आल्यानंतर नागपूरच्या लोकसमुदायाची खरी कल्पना त्यांना आली. सुमारें तीस चाळीस हजार लोकसमुदाय सर्व बाजूंनीं गणेशपेठेला वेढा घातल्याप्रमाणें दिसूं लागला. आज किती लोक सत्याग्रहांत जाणार याचा कोणालाच कांहीं पत्ता लागेना. सर्वांचीच तयारी असल्याप्रमाणें दिसत होती. इतक्यांत डॉ. मुंजे राजेसाहेबांना भेटले. तेही दिंडींत जाण्याच्या तयारीनेंच आले होते, राजेसाहेबांना वाटलें कीं, आज आपल्याबरोबर नागपूरचे सर्वच हिंदु लोक दिंडींत जाणार. सर्वांच्याच अंतःकरणांमध्यें आज हिंदुधर्माकरितां श्रीशिवाजी महाराजांनीं संचार केल्याप्रमाणें दिसत होतें. ' स्वधर्मे निधनं श्रेयः, ' या भगवंताचे उक्तीचा आज नागपूरकरांच्या मनावर पूर्णपणें परिणाम झाला असें वाटलें. स्वधर्मरक्षणाकरितां परमेश्वरानें जणों काय तें विराट स्वरूपच धारण केलें होतें. अर्थातच यशाची ध्वजा उभारली जाण्याचीच ती पूर्वतयारी होती. मनाची तयारी व्हावयालाच उशीर लागत असतो. कार्याच्या ठिकाणीं समरस होऊन मनावरील मायाजाळाचा पगडा उठला कीं, त्या ठिकाणीं परमेश्वरी संचार व्हावयाचाच. हा संचार सर्वसाधारण जनतेच्या आंगीं झाला कीं, तीच जनार्दनाची मूर्ति व शक्ति होय. अशी ही शक्ति आविर्भूत झाल्यावर इष्ट कार्यसिद्धीला अवकाश कसला ! परमेश्वरी कौतुक हें कौतुकानेंच पहावें लागतें.

## तात्पुरता समेट.

निमित्तमात्रं भव सव्यसाची ।

तेथें जमलेल्या हिंदु पुढाऱ्यांबरोबर दिंडी काढण्याचा विचार राजेसाहेब करीत आहेत, तोंच त्यांना नागपूरचे डि. एस्. पी. मि. स्मिथ, नबाब नियाजउद्दीनखान व सिटीसाहेब संतसिंग हे आपल्याचकडे येत असलेले दिसले. डॉ. मुंजे, ' महा-

राष्ट्र ' पत्राचे संपादक श्री. ओगले, समाजभूषण श्री. तात्यासाहेब गुजर वगैरे मंडळी राजेसाहेबांजवळ उभी होतीच. मि. स्मिथ यांनीं राजेसाहेबांना येऊन सांगितलें कीं, ' सार्वजनिक रस्त्याकडील नवीन पाडलेला मशीदीचा दरवाजा मुसलमान लोकांनीं बंद करून घेतला आहे; आणि आतां ते मशीदीवरून पांच टाळांची दिंडी जाऊं द्यावयाला तयार झाले आहेत. तरी त्याप्रमाणें आतां पांच टाळांची दिंडी आपण जाऊं द्यावी. ' हें मि स्मिथ यांचें भाषण ऐकल्यानंतर राजेसाहेबांनीं नबाब नियाज-उद्दीनखान यांचेकडे पाहिलें. त्यांनींही ' ती गोष्ट आपल्या मुसलमान समाजाला कबूल व पसंत असल्याचें ' सांगितलें. आणि ते ह्मणाले, ' आतां हिंदुमुसल-मानांतील समेट प्रत्यक्ष कृतीनें घडवून आणण्याची सर्व मदार आपलेवर आहे. या वेळीं हा अफाट जमलेला हिंदुसमाज अगदीं बिथरून गेला आहे. त्या समाजाला आतां आपणच शांत करून समेट घडवून आणल्याचें श्रेय घ्या. ' हें आपल्या बाल-मित्राचें-पण मुसलमानांचे पुढारी असल्यामुळें कार्यापुरते शत्रू बनलेल्या-नबाबसाहेबांचें भाषण ऐकून राजेसाहेबांनीं मुसलमान लोकांकडून हिंदूंचा झालेला अपमान लगेंच विसरून जाऊन मोठ्या प्रेमानें त्यांना आलिंगन दिलें. आणि ' तुमचा आमचा प्रेमाचा समेट झाला, ' असें त्यांना सांगितलें. नंतर मि. स्मिथ, डि. एस्. पी. नागपूर, यांना तसा सरकारी हुकूम लिहून देण्यास सुचविण्यांत आल्यावरून त्यांनीं तेथेंच पांच टाळांचा हुकूम लिहून श्रीमंत राजेसाहेबांच्या हातीं दिला.

नंतर राजेसाहेब मशीदीजवळून दिंडी ज्या देवळांतून निघत असे, त्या ठिकाणीं आले. आतांपर्यंत समेटाबद्दल काय भानगड झाली, हें कोणाला विशेष समजलें नव्हतें. तेथें एवढी विलक्षण गर्दी झाली होती आणि एवढा गलबला होऊन गेला होता कीं, शेजारीं काय झालें, हेंसुद्धां समजून येत नव्हतें. जो तो सत्याग्रहाच्या पुढल्या तयारींत होता. दिंडी निघण्याचीच वाट होती. वे. शा. सं. कृष्णशास्त्री घुले हातांत आरती घेऊन उभे होते. धर्मवीर सत्याग्रहांत उडी टाक-ण्याकरितां सज्ज होते. मुसलमान लोकांच्या हेकेखोरपणाच्या अतिरेकानें हिंदूजन-समूह बेफाम झाला होता. त्याची पायाची आग मस्तकाला गेली होती. अशा वेळीं कोणत्याही वक्त्याची लोकांच्या भडकून गेलेल्या चित्तवृत्तींना शांत करण्याची शक्ति नव्हती. केवढाही उत्तम वक्ता शांत असलेल्या जनसमुदायाला आपल्या आवेशाच्या भाषणानें बिथरवूं शकेल, पण बिथरलेला समुदाय शांत करणें ही गोष्ट

अगदीं असामान्य आहे. हें काम एकादाच थोर पुण्यवान पुरुष करूं शकेल.

## नागपूरचा आत्मा.

राजेसाहेब हा समेटाचा प्रकार सांगण्याकरितांच दिंडी निघत असलेल्या ठिकाणीं गेले. पण डॉ. मुंजे वगैरे पुढारी लोकांना या वेळीं हिंदुसमाज आपल्या शब्दाला मान देईल कीं नाहीं, अशी भिति वाटत होती. कारण, ही गोष्ट एवढ्या थराला गेली होती कीं, ती पुढाऱ्यांच्या हातावेगळी झाली होती. कोणीही सामान्य घोडेस्वार आपल्या चाबकाच्या फटकाऱ्यानें एकाद्या घोड्याला तुफान पळवूं शकेल, पण तुफान पळणाऱ्या घोड्याला एकादाच कुशल घोडेस्वार आपल्या ताब्यांत आणील ही स्थिति नागपूरच्या हिंदू लोकांची झाल्यामुळें उपदेशाच्या दोन गोष्टी ऐकून घेण्याचीही कोणाची मनोवृत्ति ठिकाणावर नव्हती. सामोपचाराच्या गोष्टी सांगण्याचा कोणी प्रयत्न केला असता, तर त्या वेळीं जहाल व धर्मवेड्या लोकांनीं आपल्या संचाराच्या भरांत त्या मनुष्याची चटणीच केली असती. अशा वेळीं अशा लोकांची समजूत घालणें अगदींच अशक्य असें सर्व हिंदुपुढाऱ्यांना वाटलें होतें. ह्मणून जो तो स्तंभित होऊन बसला होता.

राजसाहेबांच्या आजपर्यंतच्या पुण्याईची, धर्मावरील श्रद्धेची, लोककल्याणाची, आणि कर्तबगारीची कसोटीला लागण्याची हीच वेळ होती. त्यांचें क्षत्रिय तेज प्रकट होण्याचा योग्य प्रसंग हाच होता. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या अधिष्ठानाचा प्रभाव दिसावयाला हीच वेळ योग्य होती. त्यांच्या आंगीं त्या वेळीं आपल्या सर्व तेजाचा एकदम संचार झाला. दिंडी निघूं लागली असतां, ती रोखण्याबद्दल त्यांनीं एकदम भीमगर्जना केली. तत्काल जिकडे तिकडे शांतता होऊं लागून ती अफाट दिंडी रोंखली गेली. नंतर त्यांनीं आपल्या उच्च स्वरानें लोकांना सांगितलें कीं, "रोज पांच टाळांची दिंडी वाजत नेण्याची अट आह्मीं तात्पुरत्या समेटाकरितां कबूल केली आहे. त्याप्रमाणें आजच आह्मी पांचच टाळांची दिंडी मशीदीवरून नेणार आहोंत. तुमचे मताविरुद्ध आह्मीं ही अट मान्य केली असली, तरी तुह्मीं आमच्याकरितां ह्या गोष्टीस राजी व्हावें."

हें राजेसाहेबांचें निर्वाणीचें भाषण ऐकून सर्वच मंडळी एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागली, परंतु त्यांना जास्त अवसर न देतां राजेसाहेब पुढें झाले. त्यांनीं पांच टाळांची दिंडी बरोबर घेतली. वे. शा. सं. कृष्णशास्त्री घुले यांना आरती घेऊन पुढें केलें, व त्या अभिन्न दिसणाऱ्या जनप्रवाहांतून मार्ग काढून मशीदीवरून पांच टाळांची दिंडी काढून दिली. ही राजेसाहेबांची कामगिरी पाहून डॉ. मुंजे वगैरे पुढारी, ' वहावा रे शेर, शाबास क्षत्रिय वीरा ! ' असें ह्मणून राजेसाहेबांची पाठ थोपटूं लागले. हिंदु लोक तर त्यांच्या त्या कामगिरीबद्दल पाठ थोपटतीलच, पण मुसलमान पुढाऱ्यांनींही हिंदुलोकांवरील राजेसाहेबांचें वजन पाहून तोंडांत बोटें घातलीं. सरकारी अधिकारी राजेसाहेबांची ही कामगिरी पाहून थक्क झाले.

## शंकराचार्यांनीं अखेर साधली !

इकडे हा प्रकार चालू आहे, तोंच त्या ठिकाणीं श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांची स्वारी स्टेशनवरून मोटारींतून येऊन पोंचली. आपल्या उतरण्याच्या ठिकाणाकडे न जातां स्टेशनवर त्यांना ' राजेसाहेब आज सत्याग्रहांत जाणार,' ही हकिकत समजली, ह्मणून ते तसेच सत्याग्रहाच्या जागीं आले होते. या धर्मक्षेत्रावर धर्मगुरूंची स्वारी आलेली अवलोकन करून सर्व मंडळीला अधिकच आनंद झाला. समेट व्हावयाला व धर्मगुरु येऊन पोंचावयाला एकच गांठ पडली. तेव्हां सर्वानुमतें असें ठरलें कीं, गणेशपेठेंतून तुळशीबागेपर्यंत श्रीशंकराचार्यांची मिरवणूक काढावी. राजेसाहेबांचा हत्ती, घोडे, उंट वगैरे लवाजमा स्टेशनपासून गणेशपेठेपर्यंत आलाच होता. हजारों टाळ, शेंकडों पखवाज वगैरे दिंडींचें अपूर्व साधन तयार होतेंच. कोणत्याही मिरवणुकीला जमणार नाहीं, एवढा मोठा समुदाय होता. सर्व पुढारी मंडळीही हजर होतीच. मिरवणूक काढण्याचें ठरल्यानंतर दहा पंधरा मिनिटांतच पद्धतशीर मिरवणुकीची रचना करण्यांत आली. श्रींना मोटारींत बसविण्यांत येऊन त्यांचे गळ्यांत तथेंच शेंकडों हार घालण्यांत आले. त्यांची मोटार हलके हलके चालूं लागली. तीमार्गें शेंकडों मोटारीही चालल्या. ' जय विठ्ठल जय जय विठ्ठल ' या नामघोषांत आणि टाळ व पखवाज यांच्या खणखणाटांत मंदगतीनें मिरवणूक चालूच होती. मधून मधून ' श्रीछत्रपती शिवाजी महाराजकी जय, ' ' श्रीशंकराचार्य महाराजकी जय ' ' श्री लक्ष्मणराव महाराजकी

जय ' याही जयघोषानें आकाश दुमदुमून जात होतें. ही मिरवणुक एवढी लांब होती कीं, सुरवात कोठें व ती संपणार कोठें हें ओळखणेंच अशक्य होतें. कारण, गणेशपेठेपासून तुळशीबागेपर्यंत लोकांची मुंग्यांप्रमाणें रांग लागली होती. सुमार बारा वाजतां श्रींची मिरवणूक तुळशीबागेंत येऊन पोंचली. तेथें सर्व मंडळींनीं श्रींचा व राजसाहेबांचा निरोप घेतला, सर्व लोक आनंदानें आपापल्या घरीं निघून गेल्यावर राजेसाहेबांनीं श्रींचे चरणावर मस्तक ठेविलें आणि आशीर्वाद घेऊन आपल्या राजवाड्यांत आले.

## जयजयकार !

याप्रमाणें रक्ताचा एकही बिंदु न सांडतां हिंदु मुसलमानांत वाद्याचे बाबतींत समेट घडवून आणण्याचें श्रेय नागपूरच्या हिंदुमुसलमानांनीं राजसाहेबांना दिलें. ही गोष्ट हिंदुमुसलमानांतील वाद्यांच्या तंट्याच्या इतिहासांत अजरामर होऊन राहील, यांत संशय नाहीं. ' जो साहसाचें कार्य करी त्याचा परमात्मा कैवारी. ' कोणतेंही थोर आणि असाधारण कार्य करावयाचें असलें, ह्मणजे तें अशाच साहसाच्या धडाडीनें करावें लागतें. आणि ही साहसाची धडाडी धर्मवीर क्षत्रियांमध्येंच स्वयंभू असते. याची कल्पना प्रसंगाशिवाय लोकांना येत नसते. ती या प्रसंगानें सर्वांना आणून दिली व राजसाहेब तावून, सुलाखून, कसोटीला लागून सर्वांच्या परीक्षेला उतरले. हेंच त्यांच्या वीरवृत्तीचें भूषण होतें. राजसाहेबांच्या या अपूर्व कामगिरीमुळें ते जसे हिंदुलोकांना प्रिय झाले, त्याचप्रमाणें ते मुसलमानांच्याही आदराला पात्र झाले, त्याचप्रमाणें सरकारी अंमलदारही त्यांचेवर खूष झाले. कारण, कोणत्याही अप्रिय साधनानें शांतता प्रस्थापित करण्याचा प्रसंग त्यांचेवर आला नाहीं. या सर्व गोष्टींच्या एकीकरणानें हें नागपुरांतील धर्मसत्याग्रहाचें कार्य पार पाडलें व शेवटीं केवळ राजेसाहेबांच्याच नव्हे, तर नागपूरच्या सर्व हिंदु जनतेच्या गळ्यांत विजयश्रीनें माळ घालून आनंदाचा दिवस दाखविला.

## अभिनंदनीय अभिनंदन


दुपारपर्यंत हा प्रकार झाल्यावर डि० कमिशनरसाहेब व नामदार गव्हर्नरसाहेब या उभयतांकडून राजसाहेबांच्या सकाळच्या कामगिरीबद्दल त्यांना अभि-



मध्यभागीं ना० सर फ्रँक स्लाय, नागपूरचे गव्हर्नर.

(क. फो. शि. प्रे. बे.)

पृष्ठ २८३-२८४



राजेसाहेबांची दसऱ्याची स्वारी [ पृष्ठ २७९ ]

(क.फो.झिं.प्रे.बे.)

पृष्ठें २८४–२८५

नंदनपर पत्रें आलीं. त्यांपैकीं नामदार गव्हर्नर साहेबांचें पत्र जशाच्या तसें खालीं देत आहों, तें येणेप्रमाणें:—

11th Nov. 1923. *Government House,*

**NAGPUR.**

**Dear Kuar Sahib,**

It has given me great satisfaction to hear that a settlement has been reached in the unhappy dispute between the Hindu and Muhammadan Communities. I have been informed how greatly your influence has helped in this settlement and the support given to you by Mr. Venkat Rao Gujar and other friends. I desire to express my thanks for the efforts made by you and your friends in the cause of peace and good feelings between the communities. I feel sure that you will continue your good offices in order to secure that the settlement will be observed.

With kind regards

*Yours sincerely,*

*Sd/*—**F. G. Sly.**

To,

*Kuar Laxman Rao Bhonsle.*

हें नामदार गव्हरनर साहेबांचें पत्र आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं कांकड-आरतींत पकडून ज्यांचेवर खटलें करण्यांत आलें होतें व ज्यांच्याकडून मुचलके घेण्यांत आले होते, त्यांचेवरील सर्व खटले काढून घेण्यांत आले व मुचलकेही रद्द करण्यांत आले. याप्रमाणें राजसाहेबांच्या निर्वाणीच्या शेवटच्या पत्राला अनुसरून सर्व गोष्टी हिंदु समाजाच्या मनाप्रमाणें झाल्या. आणि कांकडआरतीच्या तंट्याची परिसमाप्ति होऊन धर्मसत्याग्रहाचा आनंदांत समारोप झाला.

प्रकरण १२ वें.

# नागपूर हिंदुसभेची स्थापना.

## टौन हॉलमधील सभा.

तारीख ३० आक्टोबर सन १९२३ इ. रोजीं तुळशीबागेंत जाहीर सभा होऊन हिंदुसभा स्थापन करण्यासंबंधीं जी कमिटी स्थापन झाली होती, त्या कमिटीनें हिंदुसभेची संघटना तयार करून ठेविली होती. आतां ती संघटना जाहीर सभेपुढें आणून हिंदुसभेची मुहुर्त मेढ रोंवण्याचेच बाकी राहिलें होतें. श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) नागपुरीं आलेच होते. तेव्हां त्यांच्या नेतृत्वाखालीं हा हिंदुसभेच्या स्थापनेचा योग जुळवून आणणेकरितां रविवार तारीख ११ नोव्हेंबर सन १९२३ इ. रोजीं रात्रौ ८ वाजतां टौन हॉलमध्यें हिंदु नागरिकांची जाहीर सभा बोलावण्यांत आली. सभेस आठ दहा हजार लोक आले होत. श्रीशंकराचार्य आणि राजेसाहेब मिळून सभास्थानीं आले, त्या वेळीं सर्वांनीं उभे राहून आणि टाळ्यांच्या गजर करून त्यांचें स्वागत केलें. उभयतांही उच्चासनावर बसल्यानंतर सर गंगाधरराव चिटणवीस व श्रीमंत समाजभूषण तात्यासाहेब गुजर यांनीं राजेसाहेबांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल सूचना केली. त्याप्रमाणें राजेसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारून पुढील आशयाचें भाषण केलें.

### अध्यक्षांचें भाषण.

ते ह्मणाले, " आज आपण ज्या कार्याकरतां येथें जमलों आहोंत, तें किती महत्वाचें आणि जबाबदारीचें आहे, हे आपण जाणतच आहां. हिंदुधर्माचा कैवारी हिंदूंशिवाय या जगांत दुसरा कोणीच नाहीं. हिंदुधर्मावरील संकटें हिंदूंनींच तोंड देऊन टाळल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. सांप्रत हिंदुमुसलमानांतील

झगडा उद्भवला आहे,त्या झगड्याच्या बुडाशीं धार्मिक दृष्टीनें क्षुल्लक कारणें दिसलीं, तरी तीं हिंदुसमाजाला मानवी धर्मस्वातंत्र्याला किती बाधक आहेत, हें आपणां सर्वांना नुकत्याच आलेल्या अनुभवानें कळून चुकलें आहे. हिंदुधर्माचे हक्क सर्व हिंदूंना हिंदुस्थानांतच उपभोगतां आले पाहिजेत. ते हक्क हिंदुस्थानांतच हिंदूंच्या मातृभूमींत उपभोगतां येणार नाहींत, तर त्यांनीं पृथ्वीच्या दुसऱ्या कोणत्या भागावर उपभोगावे ? हिंदुधर्म ह्मणजे गणेश पेठेंतील कांकडआरती किंवा गणपतीची मिरवणुक एवढ्यापुरताच नाहीं. हीं भांडणें ह्मणजे आंधळ्या हिंदु लोकांना दृष्टि आणणारीं अंजनेंच होत. ह्मणून आतांतरी सावध व्हा. नीट डोळे उघडून पहा. ह्मणजे हिंदुधर्माच्या रक्षणाची योजना करणें, आजच्या घटकेला किती जरूरीची आहे, हें तुह्मांला दिसून येईल. आजची सभा हिंदुधर्मांतील एखाद्या विशिष्ट वर्णाचें किंवा एकाद्या विशिष्ट धार्मिक हक्काचें रक्षण करण्याकरितां नसून ती हिंदु ह्यां धर्माच्या सर्व हक्कांचें रक्षण करण्याकरितां आहे.आपल्या हिंदु लोकांत संघशक्ति आणि स्वधर्मविषयक उत्साह वाढला, ह्मणजे यशाचा वांटा आपल्या पदरांत पडेल, हें नक्की लक्षांत ठेवा.कोणतेही हक्क भिक्षा मागून मिळत नसतात. ते स्वत:च्या पराक्रमावर मिळ-वावे लागतात. धर्म ही अशी वस्तु नाहीं कीं ती दुसऱ्यानें देऊन मिळेल. ती आपणाला जन्मत:च मिळालेली आहे. पण ती रक्षण करण्याची जबाबदारी मात्र आपल्या संघशक्तीच्या जोरावर अवलंबून आहे. आमचें असें ह्मणणें आहे कीं, आपण धार्मिक संघशक्ति वाढवूं या, ह्मणजे आपणाला धार्मिक जन्मसिद्ध हक्क खात्रीनें सोडून जाणार नाहींत; ह्मणून आपण चातुर्वर्णीय हिंदु बांधवांनीं मनांत कोणताही भेदभाव किंवा व्यक्तिविषयक मत्सरबुद्धि न आणतां केवळ हिंदुधर्माचें रक्षण कोणत्या उपायांनीं होईल, ही एकच कल्पना मनांत ठेवून शांत चित्तानें या पुण्य कार्याला मदत करावी, अशी माझी नम्र विनंति आहे." असें राजेसाहेबांनीं भाषण केल्यानंतर त्यांनीं हिंदु सभेची घटना सभेपुढें मांडण्याकारितां सुचविलें. श्रीयुत गोपाळराव दळवी यांनीं नागपूर हिंदुसभेच्या संघटनेचा मसुदा सर्वांना वाचून दाखविला व ती घटना पास करण्याबद्दलचा ठराव सभेपुढें मांडला. ती संघटना पुढें दिल्या प्रमाणें

## नागपूर हिंदु सभेची संघटना.

१ नांव:— आज जी संस्था स्थापन करण्यांत येत आहे, तिचें नांव 'नागपूर

हिंदु सभा ' असें राहील. या सभेनें प्रांतभर कार्य करण्यासाठीं ' नागपूर प्रांतिक हिंदुसभा ' स्थापना करण्याची योजना शक्य तितक्या लवकर तयार करावी.

२ उद्देशः– ( अ ) या नगरांतील हिंदुमात्रांचें धार्मिक व सार्वजनिक संरक्षण करण्याची सर्व प्रकारें व्यवस्था करणें.

( ब ) चातुर्वर्ण्य व्यवस्थात्मक हिंदु समाजांतील जातींजातींत ऐक्य व प्रेम वृद्धिंगत करणें.

( क ) वहिवाटीप्रमाणें प्रत्येक मोहल्यांतील सर्व जातींच्या लोकांनीं रोज सायंकाळीं एकदां तरी नियमित वेळीं त्या त्या मोहल्यांतील नियत केलेल्या देवळांत देवदर्शनास येण्याचा प्रघात ठेवणें.

( ड ) प्रसंगीं हिंदु स्त्रीपुरुषांचें संरक्षण करण्याकरितां प्रत्येक मोहल्यांतील १८ वर्षांपासून ३० वर्षांपर्यंतच्या तरुण पुरुषांचे संघ उभारणें; आणि आग, चोरी, दंगा, मारामारी, इत्यादि प्रसंगीं संरक्षणाची कशी व्यवस्था ठेवावी, याचें शिक्षण देण्याकरितां आठवड्यांतून निदान एकदां तरी नियमित वेळीं व नियमित स्थानीं या संघांतील सभासदांची परेड करण्याचा प्रघात ठेवणें.

( ई ) प्रत्येक मोहल्यांतील बारा वर्षांपासून अठरा वर्षांपर्यंतच्या मुलांच्या शारीरिक शिक्षणाची सोय करणें. आणि केवळ वैद्यकीय दृष्ट्या हरकत असलेलीं मुलें खेरीजकरून इतर सर्व मुलांना वरील शारीरिक शिक्षण अवश्य करण्याची नैतिक जबाबदारी त्यांचे पालकवर्गावर सोंपविणें.

३ आसिंधु-सिंधु-पर्यंता यस्य भारत-भूमिका । पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृतः ॥ १ ॥

यांप्रमाणें हिंदुसमाजांत सनातन, बौद्ध, जैन, आर्यसमाज इत्यादि विविध पंथांच्या लोकांची गणना होते. यांपैकीं ज्यांचें वय १८ वर्षांपेक्षां अधिक असेल व जो या संस्थेची वार्षिक वर्गणी आठ आणे आगाऊ देईल व या सभेचे हल्लीं असलेले व पुढें वेळोवेळीं नियत केले जाणारे उद्देश व नियम मान्य करील व या सभेच्या ठरावाप्रमाणें वागण्याचें कबूल करून सभेनें नियम केलेल्या प्रतिज्ञापत्रिकेवर सही करील, तो या सभेचा सभासद समजला जाईल.

४ (१) आश्रय दाते मंडळ, (२) सहाय्यक मंडळ, (३) कार्यकारी मंडळ, (४) धर्मशास्त्र सल्लागार मंडळ, (५) कायदा सल्लागार मंडळ, (६) स्वयंसेवक सल्लागार मंडळ, (७) प्रचारक मंडळ अशीं सात निरनिराळीं मंडळें असून प्रत्येक मंडळांत पांचपासून सत्तरपर्यंत सभासद होते. मुख्य कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले; साहाध्यक्ष सर गंगाधरराव चिटणवीस; उपाध्यक्ष समाजभूषण श्रीमंत व्यंकटराव ऊर्फ तात्यासाहेब गुजर आणि डॉ. मुंजे; सेक्रेटरी श्री. गोपाळराव दळवी, डॉ. हेडगेवार, श्री. पांडुरंग साव, श्री. केशवराव काळे; आणि खजिनदार रा. ब. बन्सीलाल अबीरचंद याप्रमाणें ठराव सभेपुढें मांडण्यांत आला. त्याला. ना. केळकर यांनीं दुजोरा दिल्यानंतर हा ठराव पास झाला. नंतर राजेसाहेबांनीं श्रीशंकराचार्य यांना उपदेशाचे चार शब्द सांगण्याकरितां विनंति केली. त्याप्रमाणें सुमारें एक तास श्रींनीं भाषण केलें. रसाळ, विचारपरिप्लुत आणि हिंदुधर्माच्या संरक्षणाबाबत त्यांनीं केलेलें भाषण ऐकून सर्वांना पराकाष्ठेचा आनंद झाला. हें भाषण ऐकल्यानंतर लोक बोलूं लागले कीं, सध्यांच्या परिस्थितींत असेच शंकराचार्य पाहिजेत. हे शंकराचार्य आद्य शंकराचार्यांचेच अवतार असावेत असे कांहीं धर्मभोळे लोक बोलूं लागले. कित्येक असेंही ह्मणूं लागले कीं, श्रीशंकराचार्य ( डॉ कुर्तकोटी ) हे श्रीरामदासस्वामींचे अवतार असून श्रीमंत राजेलक्ष्मणराव भोंसले हे श्रीशिवाजी महाराजांचेच अवतार असावे. त्याशिवाय ही गुरुशिष्यांची जोडी स्वधर्मरक्षणाकरितां इतकी झटत नाहीं. अशा रीतीनें प्रत्येकाच्या विचाराप्रमाणें व बुद्धीप्रमाणें तर्कवितर्क करीत सभा संपतांच मंडळी आपआपल्या घराकडे निघाली. जातेवेळीं ' श्रीशंकराचार्य महाराजकी जय, ' ' श्रीलक्ष्मणराव महाराजकी जय ' या जयघोषानें सर्व आकाश दुमदुमून सोडावयाला मात्र आलेली मंडळी विसरली नाहीं.

याप्रमाणें नागपूर हिंदुसभेची प्राणप्रतिष्ठा श्रीशंकराचार्यांचे नेतृत्वाखालीं श्रीमंत राजेसाहेबांनीं केली आणि तिचें धूरिणत्व आपण स्वीकारून तिची आमरण सेवा त्यांनीं तनमनधनेंकरून केली. सामान्यतः राजेलोक ह्मणजे उंच परांच्या गाद्यांवर सदासर्वदा पहुडणारे; मग त्यांना धार्मिक अगर सामाजिक लोककल्याणाचा कंटकमय मार्ग आक्रमण करणें कसें सहन होणार ! पण ईश्वरी चमत्कारच असा आहे कीं, जरूर त्या वेळीं असा लोकोत्तर राजपुरुष उत्पन्न होतो; आणि तो जनतेच्या हृदयमंदिरांत प्रवेश करून तथेंच सदैव स्थानापन्न होऊन राहतो.



## प्रकरण १३ वें.

# नागपुरांतील मुसलमानांचा दंगा.

### तडजोडीचा निष्कर्ष.

हिंदुमुसलमानांत तात्पुरती तडजोड होऊन गणेशपेठेंतील कांकडआरतीचा तंटा तूर्तातूर्त मिटला, त्याला आठच दिवस झाले होते, पण नागपूरच्या कांहीं जहाल मुसलमान लोकांना ह्या तडजोडीनें चैन पडेना. त्यांना त्यामुळें आपला पराभव झाला असें वाटलें. शिवाय हिंदूंनीं हिंदुसभा स्थापन केली. मग तर काय वैषम्याग्नीला चैतन्य येण्याला तें एक जबरदस्त कारण झालें. हिंदूंचा सूड घेण्याची संधि केव्हां येईल, असें त्या कलहप्रिय मुसलमानांना होऊन गेलें होतें. अशांतच सोमवार तारीख १९ माहे नोव्हेंबर सन १९२३ इ. रोजीं कार्तिकी एकादशी आली. कार्तिकी एकादशीच्या दिवशीं दरसाल नागपूर शहरांतून दिंड्या निघतात व निर्वेधपणें गांवांतील अनेक रस्त्यांतून मशीदींवरून टाळ मृदंग वाजवीत जातात. त्याप्रमाणें यंदांही गेल्या असत्या. परंतु नुकत्याच झालेल्या गणेशपेठ प्रकरणामुळें नाहक चिडून गेलेल्या कांहीं मुसलमानांनीं सरकारकडे तक्रार केली, व क्रॅडॉक साहेबांच्या वेळीं निघालेल्या हुकुमाच्या आधारावर दिंड्या मशीदींवरून टाळ मृदंग वाजवीत न जातील अशी व्यवस्था करा, नाहींतर दंगाधोपा होईल, असेंही सरकाराला कळविलें असावें, असें दिसतें. यामुळें नामदार गव्हरनर साहेबांनीं तारीख १८ नोव्हेंबर सन १९२३ इ० रोजीं हिंदु पुढाऱ्यांस बोलावून यासंबंधीं बोलणें चालणें केलें. हिंदु पुढाऱ्यांनीं त्यांना कळविलें कीं, नेहमीं दरसाल जशा दिंड्या निघतात, तशा यंदांही निघतील. कमी किंवा जास्त बिलकूल निघणार नाहींत, व ज्या निघतील त्याही नागपूर शहरांतील वहिवाटीप्रमाणें टाळ, मृदंग, वीणा वाजवीत रस्त्यानें जातील. विशेष असें कांहीं होणार नाहीं.' यानंतर नामदार गव्हरनर

साहेबांनीं इतरत्र चौकशी करून व मुसलमान पुढाऱ्यांशीं बोलणें करून असें ठरविलें कीं, ' हिंदूंच्या दिंड्या नेहमींप्रमाणें निघण्यास हरकत नाहीं. पण त्यांनीं निमाजाच्या वेळा चुकवून ' आपल्या दिंड्या न्याव्या ह्मणजे झालें. '' निमाजाच्या वेळा मुसलमान पुढाऱ्यांना विचारून ठरविल्या गेल्या व रविवारीं रात्रौं १ ते २ वाजतां व पुन्हां सोमवारीं सकाळीं नागपूर शहरभर दवंडी फिरविण्यांत आली कीं, निमाजाच्या वेळा चुकवून हिंदूंनीं आपल्या दिंड्या सालाबादप्रमाणें मशीदीवरून न्याव्यात. '' निमाजाच्या पांच वेळा जाहीर करण्यांत आल्या होत्या. ( १ ) सकाळीं ५॥ ते ६॥ वाजेपर्यंत. ( २ ) दुपारीं १ ते २ वाजेपर्यंत. ( ३ ) तिसऱ्या प्रहरीं ४ ते ४॥ वाजेपर्यंत. ( ४ ) सायंकाळीं ५। ते ६ वाजेपर्यंत. ( ५ ) रात्रौ ८ ते ९ वाजेपर्यंत. एवढ्या पांच वेळा सोडून दिंड्या मशीदीवरून न्याव्या. असा सरकारी हुकूम होता. श्रीमंत राजेसाहेबांनीं हा सरकारी हुकूम नागपूर हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांना कळविला; आणि त्याप्रमाणें सर्व शहरभर बंदोबस्त करण्यास त्यांनीं सर्वांस ताकीद दिली.

सोमवारीं सकाळीं ह्मणजे कार्तिकी एकादशीच्या दिवशीं सकाळीं आपण स्वतः, कुंवर श्रीमंत फत्तेसिंगराव भोंसले, सर गंगाधरराव चिटणवीस, समाजभूषण श्रीमंत तात्यासाहेब गुजर, डॉक्टर मुंजे, शेठ नागरमल्ल, उदाराम पहेलवान, डॉ० हेडगेवार इत्यादि हिंदु पुढाऱ्यांसह सर्व शहरांत हिंडून सरकारी हुकुमाप्रमाणें निमाजाच्या वेळा सोडून दिंड्या मशीदीवरून नेण्याविषयीं ठिकठिकाणीं जाऊन सर्वांस ताकीद देऊन आले. गांवांत पुन्हां पुन्हां हिंदु पुढारी फिरतच होते. आपणांकडून दंगा होण्यास अवसर मिळूं द्यावयाचा नाहीं, असा हिंदु पुढाऱ्यांनीं निश्चय केला होता. या दिंड्या ठिकठिकाणच्या पेठेंतून किंवा मोहल्यांतून निघून नागपुरीं श्रीजागृतेश्वर किंवा जागोबाचें पुरातन मंदिर आहे, त्या ठिकाणीं जाऊन देवदर्शन घेऊन परत फिरण्याची पद्धत आज कित्येक वर्षें हिंदूंची चालली आहे. या मंदिराला जाण्याकरितां कोणत्या दिंडीला एकादीच मशीद लागते, तर दुसऱ्या कोणत्या दिंडीला चार पांचही मशीदी लागतात. शिवाय, नागपूर हें विस्तीर्ण शहर असल्यामुळें श्रीजागोबाच्या मंदिरापासून एकादी दिंडी दोन मैलही लांबीच्या भागांतून जाणारी असूं शकते. निघाल्यापासून भजन करीत करीत दिंडी निघाली ह्मणजे तिला परत यावयाला यामुळें पांच सहा तासही लागतात.सर्व साधारणपणें दुपारीं दोन वाजतां

आपापल्या ठिकाणावरून दिंड्या निघतात. त्याप्रमाणें त्या काढण्यांत आल्या; व आपल्या नेहमींच्या सार्वजनिक रस्त्यानें जाऊं लागल्या. वाटेंत मशीद लागली आणि ती वेळ जर मुसलमानांच्या ठराविक पांच वेळेपैकीं असली, तर ती वेळ निघून जाई-पर्यंत हिंदु सभेचे पुढारी लोक त्या दिंडीला भजन करीत तेथेंच थांबवीत. नमाजाची वेळ संपली कीं, दिंडी वाजत गाजत मशीदीवरून जाई. याप्रमाणें दिंडी जाण्याचें काम पद्धतशीर सुरू झालें. परंतु निमाजाच्या पांच वेळां वगळून सर्रास दिंड्या मशीदीवरून वाजत नेण्याचा सरकारी हुकूम कांहीं दांभिक, धर्मवेड्या आणि भांडखोर मुसलमानांना आवडला नाहीं. त्यांनीं सायंकाळीं कुरापत काढण्याला सुरवात केली. ठिकठिकाणच्या मशीदीजवळ पोलीसचा बंदोबस्त होता.

## गणेशपेठेंतील दिंडी व मुसलमानांचा हल्ला.

गणेशपेठेंतील कांकडआरतीच्या तंट्याचा शेवट हिंदुमुसलमानांतील समेटामुळें झाला. तेथील हिंदू लोकांबद्दल मुसलमान लोकांचे मनांत द्वेषबुद्धि कायम होती असें दिसून येतें. कारण, त्याच दिंडीवर मुसलमान लोकांनीं सरकारी बंदोबस्ताला न जुमानतां हल्ला केला. ही गणेशपेठेंतील दिंडी रीतसर निघून त्यांच्या नेहमींच्या रस्त्यानें मध्यतरीं लागणाऱ्या मशींदीवरून वाजत गाजत, अभंग वगैरे ह्मणत, भजन करीत, विठ्ठलाचा नामघोष करीत, श्रीजागोबाचे मंदिराला गेली. श्रीमंत राजे-साहेब मोटारींत बसून प्रत्येक मशीदीसमोर मोटार उभी करून, दिंडी मशीदीपलीकडे सुरक्षीत जाईपर्यंत तेथें थांबून, नंतर तिच्यापुढचे मशीदीकडे जात असत. अशा-प्रकारें त्यांनीं शहरांतील बहुतेक दिंड्या आपल्या नजरेखालीं मशीदींवरून पार पाडल्या. परंतु सुमारें साडेचार वाजतां गणेशपेठेची दिंडी श्रीजागोबाचे देवळा-कडून परत येत असतां गांजाखेतावरील मशीदीजवळ आली. त्या वेळीं मशीदींत जमलेल्या मुसलमानांनीं त्या दिंडीवर मशीदींतून दगड आणि जोडे फेंकण्याला सुरवात केली. सुमारें दहा बारा पोलीस तेथें हजर होते. मागाहून जास्त पोलीस आले. मशीदीच्या बाजूला रांग धरून पोलीस बंदोबस्त करीत होते. पण मशीदीला आंतून कडी लावून घेतल्यामुळें पोलीसचें कांहीं चालेना. दगड व जोडे यांचा सारखा मारा मशीदींतून चाललाच होता. मशीदीसमोरच्या इमारतींतूनही दगड येत असलेले दिसत होते. या दगडांनीं कांहीं लोकांचीं डोकीं फुटलीं. कित्येक

लोक जखमी झाले. एका मुलाच्या डोक्याला भयंकर खोंक पडून त्यांतून जोराचा रक्तप्रवाह वाहूं लागला. या वेळीं श्री. राजेसाहेब मंगळवारींतील मशीदीसमोरून एक दिंडी पार करून देत होते. तेथें त्यांना ही हकीकत समजली. लगेंच ते या दगडफेंकीच्या मशीदीजवळ आले. त्यांनीं जखमी लोकांना ड्रेसिंगकरितां मोटारींतून दवाखान्यांत रवाना केलें. या वेळीं दगडफेंक बंद पडली व पुढें ती दिंडी तशीच चालविली. राजेसाहेब या दिंडीबरोबर चालले. त्यामुळें सर्व लोकांना धीर आला. नंतर ही दिंडी व्यंकटेशथिएटरजवळ आली. तेथील मशीदींत कांहीं मुसलमान लोक जमले होते. या मशीदीवरून दिंडी निघून जाते न जाते, तोंच त्या मशीदींतून दिंडीचे मागील लोकांवर पुन्हां गोटमार सुरू झाली. एक मुसलमान हातांत लाठी घेऊन हिंदूंच्या आंगावर मारामारी करण्याकरितां आला. पण त्याची ती लाठी हिस्कावून घेण्यांत आली. थिएटरच्या बाजूस चिटणीस पार्कमध्यें कांहीं मुसलमान होते, तेही मधून मधून दगड फेंकीत होते. त्यांपैकीं कांहीं मुसलमानांस हिंदूंनीं पकडून आणून पोलीसच्या स्वाधीन केलें. मशीदीजवळ पोलीस व मुसलमानलोक यांच्यांत थोडी वाचावाची होऊन चकमक उडाली. उभयपक्षांतील लोक थोडे बहुत जखमी झाले. या गोटमारीचा थोडाबहुत प्रसाद राजेसाहेबांनाही मिळाला. अशाप्रकारें ही गणेशपेठेंतील दिंडी शुक्रवारीच्या चौरस्त्यावरून गणेशपेठेंत पोंचती करण्यांत आली. हे मुसलमानांचे हल्ले सामान्य होते. व त्यांच्या या हल्ल्यांमुळें लोकांना थोड्याफार जखमा झाल्या. याशिवाय दुसरें कांहीं नुकसान झालें नाहीं. तरी या सर्व प्रकारामुळें गांवांत मात्र फारच खळबळ उडाली.

## द्वादशीचा दंगा आणि उदाराम पहेलवानांचें शौर्य.

हा घडलेला प्रकार एकादशी पुरताच असावा, अशी सर्वांची कल्पना होती. तरी हिंदु मोहल्यांतील पुढाऱ्यांना आपापल्या मोहल्यांत बंदोबस्त ठेवण्याबद्दल राजेसाहेबांनीं सूचना दिलीच होती. द्वादशीस कोणतीही दिंडी निघत नसते, असें असतां मुसलमान लोकांत एक खोटीच अफवा उठली कीं, त्याही दिवशीं हिंदूंची दिंडी निघणार आहे. या अफवेचा आधार गुंड व भांडखोर मुसलमान लोकांना पुरे झाला. त्यांच्या कानांत धर्मवेडेपणाचें वारें शिरलें. कांहीं मोमीन व कांहीं रिकामटेकडे मुसलमान

लोक हातांत काठ्या घेऊन ठिकठिकाणीं गोळा होऊं लागले. सायंकाळीं पांच वाजण्याच्या अंदाजाला सुमारें चार पांचशें मुसलमान, इतवारी स्टेशनच्या बाजूला हातांत काठ्या घेऊन बसले होते; सिटीसाहेब व इतर पोलीस अधिकारी यांनीं त्यांस "आज हिंदूंची दिंडी निघत नाहीं, उगाच जमाव कां करतां?" असें सांगून घालवून देण्याचा प्रयत्न केला; पण ते सामोपचारानें जाईनात; ह्मणून धाकदपटशा देऊन त्यांना हलके हलके घालवून द्यावें लागलें. या प्रकारामुळें इतावरी स्टेशनजवळील जमाव मोडला खरा, परंतु दुसरीकडे दोनतीनशें मुसलमानांचा जमाव होऊन ते जमावानेंच राजाराम थिएटरकडून पांचपावलीकडे चालले. त्यांच्या हातांत काठ्या व तरवारी होत्या. मारामारी करण्याचा त्यांचा स्पष्ट हेतु होता, हें दिसत होतें. सुमारें सायंकाळचे सात वाजतां हे दोनतीनशें मुसलमान चाल करून येत आहेत, हें कोष्टीपुऱ्यांतील लोकांना समजलें. तेव्हां उदाराम नांवाच्या एका तरुण पहेलवानाच्या नेतृत्वाखालीं तीस चाळीस जवान कोष्टी बोरीकराच्या घराच्या आसपास गोळा झाले. त्यांनीं मुसलमानांच्या टोळीस पुढें न जाऊं देण्याचें ठरविलें. कारण, तो मुसलमान लोकांचा जमाव हातांत काठ्या, तरवारी घेऊन ज्याअर्थी रात्रींच्या सुमारास कोष्टीपुऱ्याकडे जात आहे, त्याअर्थी यांचा कांहीं काळाबेरा हेतु असावा, असें त्यांना वाटलें. तेव्हां गरीबगुरीबांवर अगर बायकांपोरांवर कहर माजूं नये, याच विचारानें त्यांनीं या मुसलमान लोकांच्या टोळीस तिकडे न जाऊं देण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें ते लोक जवळ येतांच त्यांनीं त्यांस परत फिरण्याकरितां सांगितलें. पण त्यांचें ऐकणार कोण! उलट सांगणाऱ्या लोकांवर त्यांनीं काठ्या चालविण्यास सुरवात केली. तेव्हां उदाराम पहेलवान वगैरे लोकांना आत्मसंरक्षणाकरितां उलट लाठी चालविण्याचा निरुपायानें प्रसंग आला. ती चकमक सुमारें दहापंधरा मिनिटें झालीं. पण ती बरीच उग्र स्वरुपाची चकमक झाली. यांत दहावीस लोकांना जबर जखमा झाल्या. त्या मारामारींत कोष्टी लोकांनीं मुसलमान लोकांना मागें हटवीत हटवीत हंसापुरी-इतवारी या मोहल्यांकडे त्यांना जीव घेऊन पळवून लाविलें. या प्रकारामुळें मुसलमान लोकांना हिंदूंचा चांगलाच धाक बसला. जखमी झालेल्यापैकीं कांहीं लोकांना हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत आलें. त्यानंतर पोलीस तेथें आले. रात्रभर त्यांनीं त्या जागेवर सशस्त्र पाहारा ठेवला.

## आत्मरक्षणाची तयारी.

या मारामारीची सर्व जबाबदारी अर्थातच विनाकारण चाल करून दुसऱ्यांच्या मोहल्यांत काठ्या, तलवारी घेऊन ' दीन दीन ' करीत घुसणाऱ्या मुसलमान लोकांवरच होती हा जमाव हिंदु मोहल्यांत घुसला तर काय अनर्थ ओढवेल या भीतीनें कोष्टीपुऱ्यांतील जवान कोष्ट्यांनीं एकत्र जमून खवळलेल्या बेफाम मुसलमान लोकांना प्रतिकार करून मागें हटविलें, हें ठीकच झालें. हिंदूंना आपल्या बचावासाठीं काठी उचलावी लागली. दुसऱ्याच्या मोहल्यांत घुसून मारामारी किंवा अत्याचार करण्याचा त्यांचा विचार नव्हता व पुढेंही असण्याचा संभव नव्हता. ज्या हिंदु जवानांनीं आपल्या मोहल्यांच्या बचावासाठीं आपला जीव धोक्यांत घालून हा हल्ला परतविला, ते शूर जवान सर्व हिंदु-मुसलमान या दोन्ही समाजांच्या कृतज्ञतेला पात्र आहेत. या प्रकारामुळें सर्व शहरांत चिंतामग्नता उत्पन्न झाली. सर्व मोहल्यांत प्रसंग आला तर आत्मसंरक्षण कसें करितां येईल, याचा विचार सुरू झाला. कांहीं हिंदु पुढाऱ्यांवर कडव्या मुसलमानांचा विशेष डोळा असल्यानें त्यांना आपण मार देऊं असें कांहीं मुसलमान भर रस्त्यांत बडबड करूं लागले. ही बडबड " गर्जेल तें पडेल काय, " इतकी क्षुल्लक मानण्यासारखे ते दिवस नसल्यामुळें श्रीमंत राजेसाहेबांनीं या मुसलमान लोकांच्या सूचनेचा पहिल्यानें विचार केला. त्यांनीं प्रत्येक हिंदु मोहल्यांतील पुढाऱ्यांना बोलावून प्रत्येक मोहल्याच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वांवर वांटून दिली. रात्रीची घस्त घालण्याचीं कामें प्रत्येक मोहल्यांतील तरुण मंडळीवर सोंपविण्यांत आली. प्रसंगाचे वेळीं सर्वांनीं कसें व कोठें जमावें व एकमेकांच्या सहाय्यानें कसें काम करावें, याची सर्व योजना व जुळवाजुळव त्यांनीं करून दिली व त्याप्रमाणें प्रत्येक मोहल्याचा बंदोबस्त होतो किंवा नाहीं हें ते वेळोवेळीं जाऊन स्वतः पाहूं लागले. रोज सकाळीं प्रत्येक हिंदु मोहल्यांतून त्यांना वर्दी मिळूं लागली. रात्रीं अपरात्रीं केव्हांही कोणी वर्दी घेऊन आला तर त्याची दाद आपणाला लागावी म्हणून त्यांनीं आपल्या वाड्यांतही तशी योजना केली. या सर्व बंदोबस्तामुळें नागपूरच्या हिंदु मोहल्यांतून घाबरून गेलेल्या लोकांना धीर आला व अशा रीतीनें आपण आपलें रक्षण करूं शकूं, असा सर्वांना आत्मविश्वासही वाटूं लागला.

## गणेशपेठेंतील गणपति-विसर्जन.

आतां राजेसाहेबांवर गणेशपेठेंतील गणपतिविसर्जनाची एक जोखीम शिल्लक राहिली होती. मशीदीवरून वाद्यें बंद करून जाण्याचा जेव्हां मुसलमान लोकांनीं हट्ट धरिला आणि सरकारनें त्याबाबत मनाई हुकूम काढला, तेव्हांपासून सुमारें दोन महिने हा गणपति, विसर्जन करण्याचें तहकूब करण्यांत आलें होतें. आणि मशीदीपुढें वाद्यें वाजविण्याचा हुकूम मिळेपर्यंत गणपति विसर्जन करावयाचा नाहीं, असें हिंदूंनीं ठरविलें होतें. परंतु आतां हिंदुमुसलमानांत वाद्यांचे बाबतींत समेट झाल्यामुळें पांचच टाळ, का होईनात ते तरी श्रीगजाननाचे कृपेनें वाजविण्यास मिळतात, तेव्हां गणपतीनें आपल्या लोकांचा संकल्प पुरा केला, या भावनेनें आतां गजाननाचें विसर्जन करावयाचें, असें राजेसाहेबांनीं सर्व मंडळींचा विचार घेऊन ठरविलें. ही गणपति-विसर्जनाची मिरवणुक शुक्रवार तारीख २३ नोव्हेंबर सन १९२३ इ. कार्तिक पौर्णिमेचे दिवशीं दुपारीं तीन वाजतां काढण्याची ठरविली व त्याप्रमाणें सर्व नागपूरभर हस्तपत्रकें वांटून कळविण्यांत आलें. या वेळीं या गणेशपेठेंतील गणपतीमुळें लोकांची अशी भावना झाली होती कीं, आत्मसंरक्षणाचे बाबतींत अलिकडे पूर्ण उदासीन व झोंपी गेलेला हिंदुसमाज खडबडून जागा करण्याची कामगिरी या गणपतीनें केली. तेव्हां त्या गणपतींत कांहीं दैविक सामर्थ्य उत्पन्न झालेलें लोकांच्या अनुभवाला आल्यानें त्याच्या विसर्जनाकरितां सुमारें पंचवीस तीस हजार हिंदू लोक हातांत लाठ्या घेऊन मिरवणुकींत हजर झाले होते. लाठ्या घेऊन हजर राहण्याचा त्यांचा हेतु एवढाच होता कीं, गेल्या दोन तीन दिवसांत नागपूरचें वातारण क्षुब्ध झालें होतें व मधून मधून मुसलमानांचे एकट्या दुकट्या हिंदूवर रात्रीं अपरात्रीं गल्लीकुचींतून चोरटे हल्ले होत होते, त्यामुळें प्रसंगोपात् आत्मरक्षण आणि श्रीगजाननमूर्तीचें संरक्षण करतां यावें, या कल्पनेनें त्या प्रसंगीं सर्व हिंदु लोक तयार होऊन आले होते. त्या मिरवणुकींत श्रीमंत राजे बहादुर रघोजीराव भोंसले, श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले, श्रीमंत कुमार फत्तेसिंगराव भोंसले, श्रीमंत सरदार समाजभूषण तात्यासाहेब गुजर, श्री. सर गंगाधरराव चिटणवीस, डॉ. मुंजे, डॉ. परांजपे डॉ. चोळकर, डॉ. हेडगेवार, श्री. काळे, बॅरिस्टर गोविंदराव देशमूख, श्री. गोविंदराव प्रधान वगैरे झाडून सर्व हिंदु पुढारी हजर होते. ही गणेशपेठेंतील गणपतीची पंचवीस तीस हजार लोकांची लाठ्यांसह

मिरवणुक पाहून व त्या मिरवणुकींतील लष्करी शिस्त पाहून प्रतिस्पर्धी लोकांची तारांबळ उडाली. पोलिसांचाही बंदोबस्त उत्तम होता. ही मिरवणुक शांतपणें आणि कोठेंही व्यत्यय न येतां सालाबादप्रमाणें शुक्रवार तलावावर आली. तेथें मोठ्या आनंदानें श्रीगजाननाचे मूर्तीला नौकेंत बसवून तलावाचे मध्यभागीं नेऊन सर्व मंडळीचे ' मोरया ' ' मोरया ' या नामघोषाच्या गर्जनेंत ती विसर्जन करण्यांत आली. या कामगिरीमुळें श्रीमंत राजेसाहेबांवरील आणि त्याचप्रमाणें हिंदुसमाजावरील एक मोठी जबाबदारी पार पडली, असें सर्वांना वाटलें. निश्चयानें केलेलें कार्य शेवटीं असेंच आनंदपर्यवसायी होत असतें.

## हिंदु–संघटन.

राजेसाहेबांच्या या कामगिरीमुळें आपले धार्मिक हक्क कसे संरक्षण करून चालवावे लागतात, याची शिकवणुक हिंदु समाजाला मिळाली. त्याशिवाय या प्रसंगानें राजेसाहेबांना दुसरी एक मोठी गोष्ट करतां आली. समाजांत मध्यंतरीं जे निरनिराळे पक्ष उत्पन्न होऊन पक्षापक्षांतील हिंदूंनीं एकमेकांचें तोंड पहाणेंही बंद केलें होतें, आणि त्या अंतःकलहामुळें हिंदुसंघटनेंचें कार्य दुरापास्त झालें होतें, तें या वेळीं राजेसाहेबांनीं घडवून आणलें. सर्व हिंदुसमाज त्यांनीं एकत्रित केला. ठिक-ठिकाणीं लाठी वर्ग सुरू केले. संघ निर्माण करून हिंदुसंघटना कायम राहण्याची योजना केली. आपसांतील दुही नष्ट केली. हिंदुसभा स्थापन करून हिंदु लोकांना पाठिंबा देणारी शक्ति अस्तित्वांत आणली नागपुरांतील गरीब, श्रीमंत, लहान थोर, निरनिराळ्या पक्षाचे, निरनिराळ्या पेशाचे, निरनिराळ्या धंद्याचे सर्व हिंदू एका माळेंत गोंवण्याकरतां माळेचें सूत्र आपण बनले व सर्वांना एकीचा फायदा व एकीची शक्ति काय असते व ती केवढी विशाल असते, हें अनुभवानें त्यांनीं पटवून दाखविलें.

## उपसंहार.

अशाप्रकारें राजेसाहेबांनीं हिंदुसंघटन केलें; परंतु मुसलमान लोकांचे मनांतील हिंदुलोकांबद्दल मत्सरबुद्धि मात्र कायमच होती. त्यांचे मनांत हिंदूंच्या वाद्यांबद्दल डिंवचतच होतें. आपला पराभव झाला ही त्यांची कल्पना त्यांना त्रास देत होती, कुरापत काढावयाला गणपति, कार्तिकी एकादशी, शिवरात्र किंवा आषाढी एकादशी

हे दिवस त्यांना चांगले असतात. कारण त्या वेळीं दिंड्या श्रीजागेश्वराला जातात. तेव्हां त्या संधीचा फायदा त्यांना घेतां येतो. कांहीं मुसलमानांच्या मनांत द्वेषाग्नि पेटत होता. त्याचा पुन्हां एकदां भडका इ. स. १९२४ च्या जुलै महिन्याच्या बारा तेरा तारखेस उडाला. त्या वेळीं आषाढी एकादशा दोन आल्या होत्या. शिवाय मुसलमान लोकांच्या ईदेचा सणही त्याच दिवशीं आला होता. तेव्हां दोन्हीही धर्मांचे कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडणें धोक्याचें होते. त्या वेळीं हिंदु मुसलमान लोकांत जोराची मारामारी होऊन मुसलमान लोकांचे तीस पस्तीस लोक जखमी झाले होते. सरकारकडून लाठी वापरण्यास मनाई हुकूम सुटलं होते. मुसलमान लोकांचे भुरटे हल्ले चालले होते. अशा वेळीं राजेसाहेबांनीं हिंदूंच्या संरक्षणाकरितां फार मोठी कामगिरी केली. कित्येक वेळां त्यांनीं आपलाही जीव धोक्यांत घातला. मुसलमान मोहल्यांतील हिंदु लोक आपापलीं घरें सोडून दुसरीकडे रहावयास गेले. रात्रीं अपरात्रीं धोका होईल म्हणून घाबरून गेल्यामुळें शांतता होईपर्यंत कित्येक हिंदु लोकांना त्यांनीं आपल्या वाड्यांत आश्रय दिला. शेंकडों लोक आश्रया-करितां आपलें डबोलें बरोबर घेऊन राजवाड्यांत झोंपण्यास येत. त्यांना जागा देऊन वाड्याचा पहारा त्यांनीं विशेष बंदोबस्ताचा केला. आपण स्वतः रात्रीं गांवांत घस्त घालीत. अशाप्रकारें या दुसऱ्या मुसलमानांच्या दंग्यांत त्यांनीं कल्पने-बाहेर काम केलें. तिसऱ्याही दंग्याचे वेळीं त्यांनीं याचप्रमाणें काम करून हिंदू संघटित झाले असतां मुसलमानांना सहज भारी होतात, हें सिद्ध करून दाखविलें. या बाबतींत राजेसाहेबांची हिंदूंना अशी शिकवणुक असे कीं, आपण कधींही दुस ऱ्यावर हल्ला करूं नये. दुसरा जर विनाकारण त्रास देण्याच्या बुद्धीनें आप-णावर हल्ला करील, तर आत्मरक्षणाकरितां आलेला हल्ला परतविण्याचें मात्र आपलें आंगीं पूर्ण सामर्थ्य पाहिजे. आणि तें अशा प्रसंगीं प्रत्येकानें दाखविलेंच पाहिजे. या राजेसाहेबांच्या विचाराप्रमाणें नागपूरचे हिंदु लोक वागले, म्हणूनच त्यांना मुस-ल्मानांच्या हल्ल्यांतून आपलें खरें अस्तित्व राखतां आलें.

## नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ।

नागपुरच्या हिंदुमुसलमानांचे लढ्यांतील राजेसाहेबांची कामगिरी सर्व हिंदु-स्थानाला मनापासून पटली. इंग्रज सरकारलाही राजेसाहेबांची कामगिरी बहुमोलाची

वाटली ह्मणून त्यांनीं ता. १ जानेवारी सन १९२५ इ. रोजीं "राजा" हा किताब देऊन त्यांचा बहुमान केला. या किताबाची सनद खालीं दिल्याप्रमाणें:—

# Sanad.

To,

*Kuar Laxmanrao Bhonsle of Nagpur,*
CENTRAL PROVINCES

*I hereby Confer upon you the Title of* RAJA *as a Personal Distinction.*

Sd/- READING

DELHI,
The 1st January 1925. } *Viceroy & Governor-General of India.*

याप्रमाणें इंग्रज सरकारकडून राजेसाहेबांचा गौरव झाला. त्याचप्रमाणें श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) मठ करवीर ह्यांनीं राजेसाहेबांना 'धर्मवीर' ही पदवी मठाकडून दिली. शिवाय श्रीकाशीक्षेत्राच्या श्रीभारतधर्म 'महामंडळ' या संस्थेकडून त्यांना 'धर्मविभूषण' ही पदवी देण्यांत आली. ती खालीं दिल्याप्रमाणें आहे.

श्रीः

यं पृथग्धर्म्मचरणाः पृथग्धर्म्मफलैषिणः ।
पृथग्धर्म्मैः समर्चन्ति तस्मै धर्म्मात्मने नमः ॥

# धर्म्म मानपत्रम् ।

## श्रीयुक्त राजा लक्ष्मणराव भोंसले साहिब
## नागपुर ( सी. पी. )

मोहमूर्छितामिमामार्य्यजातिं धर्म्मशक्तिप्रदानेन प्रकृतिस्थां विधाय निजकर्त्तव्येषु नियोजयितुं जगत्कल्याणसाधनार्थं सनातनधर्म्मस्य पुनरभ्युदयं सम्पादयितुमज्ञानं दूरीकृत्य संस्कृतविद्यायाः पुनः प्रचारपुरस्सरं ज्ञानज्योतिर्विस्तारयितुं वर्णाश्रमसदाचारपुनः प्रतिष्ठापनपूर्वकमार्य्यजातेः परमं कल्याणं च साधयितुं सकलधर्म्मसभाधर्मालयानां समष्टिरूपा श्रीभारतधर्म्ममहामण्डलाभिधा विराड्धर्म्मसभाऽऽविरभूत् ।

अस्यां पवित्रतमकर्म्मभूमौ भारतवर्षे यत्र ये केचिद्धर्म्मप्राणाः सज्जनाः केनाऽपि प्रकारेण परोपकारबुद्ध्या सर्वभूतहितकरस्य विश्वद्रीचीनसमवृत्तेः सनातनधर्म्मस्य सेवायां रतास्ते सर्वेऽप्यस्य विराड्धर्म्मसभारूपस्व महायज्ञस्य साधका इति भवतो धर्म्मानुकूलपुरुषार्थैः प्रसन्नेयं स्वजातीयविराड्धर्म्मसभा भवन्तं **धर्मविभूषण** धर्म्मोपाधिरूपाऽलङ्कारेणाऽलङ्कुर्वाणा परमाल्हादं

प्राप्नोति । परमकारुणिकस्य सर्व्वशक्तिमतः परमेश्वरस्य चरणारविन्दयोः प्रार्थयते च यद्भवत उत्तरोत्तरमाध्यत्मिक्युन्नतिर्भूयादिति शम् ।

श्रीकाशीधाम्नि<br>
श्रीभारतधर्म्ममहामण्डल<br>
प्रधान कार्य्यालयः<br>
१० तिथौ शुक्ल पक्षे पौष मासे<br>
१९८१ वर्षे<br>
**कवींद्र नारायण सिंह**<br>
**प्रधानाध्यक्षः ।**

मिथिलाधिपति आनरेबल, जी.<br>
सी. आई, ई; के. बी. ई.<br>
इत्याद्युपाधिकः श्रीदरभङ्गानरेश्वरः<br>
**श्रीरमेश्वर**<br>
**प्रधानसभापतिः**<br>
श्रीभारतधर्म्ममहामण्डलस्य ।

त्याचप्रमाणें नागपूरचे सुप्रसिद्ध महामहोपाध्याय प्रोफेसर केशव गोपाळ ताम्हन एम. ए. यांनीं राजेसाहेबांना एक काव्यमय अलंकार अर्पण करून त्यांचा मोटा सन्मान केला. तो खालीलप्रमाणें:—

॥ श्री ॥

गोविप्रावनशालिनां क्षितिभुजां प्रख्यातवंशे जनुः ।<br>
सच्छीलाभरणा—निसर्गसुभगा—सौम्यानुभावा—तनुः ॥<br>
हेम्नो गंध इवेदमत्र भवतो राजेति भव्यं पदम् ।<br>
युष्माँल्लक्ष्मण पूर्वजोऽवतु चिरायेत्थं नृपालार्चितान् ॥ १ ॥

**महामहोपाध्याय केशव गोपाळ ताह्मन,**

**एम. ए. नागपूर.**

याप्रमाणें आमचे चरित्र नायकांचा गौरव करण्यांत आला. सर्व वर्तमानपत्रांतून पत्रांतून राजसाहेबांचे कामगिरीची वाहवा झाली ती निराळीच. एकंदरींत आमचे चरित्रनायक जसे राजमान्य झाले, तसेच ते लोकमान्यही झाले. एकाच वेळीं राजमान्य व लोकमान्य होणें हा मान एकाद्याच कार्यकर्त्या पुरुषाला मिळत असतो. तो मान राजसाहेबांना लाभला यावरून त्यांचे कामगिरीची, यथायोग्य कल्पना वाचकांना येण्यासारखी आहे.



## प्रकरण १४ वें.

# महाराष्ट्र–हिंदुधर्म–परिषद.

## अधिवेशन ४ थें–पुणें.

### लोकमान्य–लोकसेवा.

अधिकार अगर फलाची इच्छा न ठेवतां केवळ कर्तव्यकर्म ह्मणून कार्याच्या लागणाऱ्याचें मागें कार्य लोकवंद्य असेंच होत असतें. कोणाही कार्यकर्त्या पुरुषाच्या कार्यात स्वार्थीपणाचा लवलेश नाहीं अशी समाजाची खात्री झाली कीं त्याला निःस्वार्थ बुद्धीचे आणि प्रामाणिक असे अनुयायी मिळतात. अशा अनुयायांच्या प्रमाणाबरोबरच कार्याचें महत्व समजलें जातें व त्या महत्वावरच समाजाच्या अभ्युदयाचा प्रश्न अवलंबून राहत असतो. कार्य, कार्यकर्ता आणि त्याचे अनुयायी यांची एकतानता झालेली कीं, यशप्राप्तीचें फल पदरांत पडतें. आमचे चरित्रनायक भोंसले राजे यांनीं हिंदुधर्म–संस्थापनेचें आपल्या थोर कुळाला अनुलक्षूनच जें कार्य हातीं घेतलें, तें पूर्ण निःस्वार्थ बुद्धीचें आणि समाजाच्या पूर्ण हिताचें असेंच असल्यामुळें लोकमताच्या कसोटीला दिवसेंदिवस तें उतरूं लागलें. राजसाहेबांची देव, ब्राह्मण ( वेद ) यांचे ठिकाणीं अचल निष्ठा, स्वतः चातुर्वर्ण्य सांप्रदायी आणि स्वधर्माभिमानी असा त्यांचा स्वभाव असल्यामुळें त्यांचे ठायीं लोकांचा विश्वास बसला. क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व सिद्ध करून घेतलें ही त्यांची प्रत्यक्ष कामगिरी, ब्राह्मणांनीं स्वकार्यतत्पर व्हावें, अशी त्यांची खटपट, हिंदुधर्मावर घाला आला असतां सर्व वर्णांनीं तनमनधनानें त्याचा प्रतिकार करावा अशी त्यांची सर्व संग्राहक योजना या गोष्टींमुळें बृहन्महाराष्ट्रांतील हिंदुसमाजाच्या अंतःकरणांत त्यांना उच्चासन मिळालें होतें. यामुळेंच पुणें मुक्कामीं जी महाराष्ट्र हिंदुधर्म परिषद ता.

२८ जून सन १९२४ इसवी रोजीं भरणार होती. तिच्या अध्यक्षपदाचा मान राजेसाहेबांना एकमतानें देण्याचें ठरलें. परिषदेचें अध्यक्ष व्हावें ह्मणून आलेल्या स्वागतमंडळाच्या निमंत्रणाला राजेसाहेबांनीं सन्मानपूर्वक मान्यता दिली. त्यामुळें पुण्याच्या यॉं परिषदेचें कार्य पूर्ण यशस्वी होण्याचीं लोकांना चिन्हें दिसूं लागलीं.

## मराठा तितुका मेळवावा.

महाराष्ट्र हिंदुधर्मपरिषदेच्या अधिवेशनाची तयारी श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांच्या देखरेखीखालीं एक आठवडाभर जोरांत सुरू होती. राजेसाहेब पंढरपुरला सालाबादप्रमाणें श्रीविठ्ठलाचें दर्शनाकरितां गेले होते. तेथून ते ता. २७ जून रोजीं परिषदेचे नियोजित अध्यक्ष ह्मणून सकाळचे गाडीनें पुण्यास आले. त्यांच्या स्वागतार्थ परिषदेचे स्वागताध्यक्ष, कार्यकारी मंडळी, पुण्याचे अनेक प्रमुख गृहस्थ स्टेशनवर सामोरे आले होते. त्यांनीं अध्यक्षांना हारतुरे देऊन त्यांचा सन्मान केला. स्टेशनवरून राजेसाहेब श्रींच्या दर्शनाला रास्ते यांचे वाड्यांत गेले. तेथून त्यांना नियोजित स्थळीं पोंचविण्यांत आलें.

दुसरे दिवशीं ( तारीख २८ रोज शनिवारीं ) सायंकाळीं पांच वाजतां नूतन आर्यभूषण थिएटर स्वागतमडळ, प्रतिनिधी, प्रेक्षक यांनीं चिकार भरून गेलें होतें. स्वयंसेवकांनीं चोख व्यवस्था ठेवण्याचें काम उत्साहानें चालविलें होतें. स्वागतमंडळांत शहरांतील बहुतेक सर्व जातींच्या व पक्षांच्या ठळक ठळक मंडळींचा समावेश झाला होता. परगांवाहून आलेल्या प्रतिनिधींची संख्याही बरीच मोठी होती. अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधीही सभेंत स्पृश्य लोकांबरोबर परिषदेच्या कार्यांत भाग घेत होते. या परिषदेंत वे. शा. सं. श्रीधरशास्त्री पाठक, नारायणशास्त्री मराठे, रा. ज. स. करंदीकर, रा. दादासाहेब करंदीकर, दिवेकर-शास्त्री, नगरचे फडके शास्त्री, रा. शंकरराव लवाटे, चित्रावशास्त्री, ठाण्याचे पांडुरंग शास्त्री, वे. शा. सं. धुंडीराज दीक्षित बापट वगैरे जुन्या सांप्रदायाची मंडळी; रा. ब. चिनमुलगुंद, रा. वामनराव पटवर्धन, रा. न. चिं. केळकर, डॉ. केतकर, रा. वामनराव पोतदार, बॅ. गोविंदराव गाडगीळ, रा. निळकंठराव सहस्रबुद्धे, प्रि० घारपुरे, रा. हिंगणेकर, रा. माटे, रा. भोपटकर, रा. मुंडले वगैरे नवीन विचारसरणीची ब्राह्मण मंडळी, त्याचप्रमाणें रा. नारायणराव गुंजाळ, रा. काशिनाथबुवा

जाधव, रा. आटव प्रभृति जुन्या परंपरेची मंडळी, बेळगांवचे रा. बळवंतराव माने, रा. बाबूराव जगताप वगैरे सत्यशोधक मताचे ब्राह्मणेतर गृहस्थ; त्याचप्रमाणें अस्पृश्य मानलेल्या जातींतील सुभेदार घाडगे, रा. सकट, रा. श्रीपतराव थोरात, रा. तात्याबा गायकवाड, रा. बाळजी गायकवाड, वगैरे मंडळींनीं या परिषदेंत भाग घेतल्यामुळें पूर्वींच्या तीन अधिवेशनांपेक्षां या अधिवेशनाचें कार्य विशेष यशस्वी होईल या भावनेनें परिषदेला आलेल्या लोकांना विशेष उत्साह वाटत होता. अध्यक्षांचे टेबलासमोर श्रीसमर्थ रामदासस्वामी, श्रीछत्रपती शिवाजीमहाराज आणि लोकमान्य टिळक यांचे पुष्पहार मंडित फोटो ठेवण्यांत आले होते. यामुळें हे तीनही अवतारी पुरुष या धर्मपरिषदेला आशीर्वाद देण्याकरितां उपस्थित झाले कीं काय असें वाटत होतें.

स्वागताध्यक्ष रा. नारायणराव गुंजाळ यांचें स्वागतपर मार्मिक भाषण झालें. नंतर अध्यक्षांनीं श्रींना आशीर्वादपर चार शब्द सांगण्याकरितां विनंति केली. त्याप्रमाणें श्रींनीं धर्मोपदेशाचें रसाळ भाषण करून परिषद यशस्वी होण्याबद्दल आशीर्वाद दिला. नंतर परिषदेच्या हितचिंतकांकडून आलेलीं पत्रें व तारा वाचून दाखविण्यांत आल्यानंतर अध्यक्ष श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले हे भाषण करण्याकरितां उठले.

## त्रिसूत्री.

ते ह्मणाले " अशा महत्त्वाच्या कार्याला अध्यक्ष होण्याचा माझा अधिकार व योग्यता नसतांना श्रीमज्जगद्गुरूंनीं व आपण सर्वांनीं जो मला बहुमान देऊन माझा गौरव केला, त्याबद्दल मनापासून सर्वांविषयीं कृतज्ञता व्यक्त केल्यावांचून मला भाषणास सुरवात करवत नाहीं. श्रींकडून व परिषदेच्या कार्यकारी मंडळाकडून अगत्याचें व आग्रहाचें पत्र आल्यामुळें त्यांच्या ह्मणण्यास रुकार न देणें माझे जिवावर आलें, ह्मणूनच मला आपल्या सर्वांच्या अनुमतीनें अशा महत्त्वाच्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारणें भाग पडलें. तथापि अशा जोखमीचें काम माझ्याकडून करवून घेण्याची जबाबदारी आपणां सर्वांच्या शिरावर आहे. या भरंवशानेंच " वेडेंवांकुडें गाईन । परि तुझाचि ह्मणवीन ॥ " या साधुश्रेष्ठ तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणें जनतारूपी जनार्दनापुढें मी माझे विचार मांडतों.

" धर्मासारख्या नाजूक व गहन विषयांत माझी पारंगतता नसल्यामुळें हा विषय श्रींसारख्या अधिकारी पुरुषांनीं आपणांपुढें आशीर्वादात्मक भाषणांत विशद रीतीनें जो मांडला आहे, त्यानें माझा बराच कार्यभाग झाला आहे; असें मी समजतों. श्रीनीं आपल्या आशीर्वादात्मक भाषणांत सप्रमाण दाखविल्याप्रमाणें सनातन धर्माच्या रक्षणासाठीं क्षत्रियांचें व ब्राह्मणांचें ऐक्य अत्यंत आवश्यक आहे. आणि अशी ऐक्याची परंपरा, पूर्वकाळाकडे पाहिलें असतां, स्पष्टपणें दिसून येतें. जनकराजासारख्या विदेही राजर्षीच्या दरबारीं ब्रह्मर्षी एकत्र बसून तत्त्वज्ञानाचा व धर्माचा खल करीत असत. सध्यांच्या परिस्थितींत देखील तीच पद्धति आपण ठेवल्यावांचून स्वधर्माचें रक्षण होऊं शकत नाहीं, अशी माझी समजूत आहे. सध्यांच्या परिस्थितीप्रमाणें हिंदुधर्माविषयीं विचार करतांना तीन मुद्दे प्रामुख्यानें पुढें येतात. ते ह्मणजे—( १ ) संघटना, ( २ ) शुद्धिकार्य व ( ३ ) अस्पृश्योद्धार हे होत. या तिहींबद्दल मी संक्षेपानें माझा अभिप्राय, आपण सर्वांनीं त्याचा नीट विचार करावा ह्मणून, आपणापुढें मांडतों.

" त्यांपैकीं पहिल्या संघटनेच्या बाबतींत हल्लीं किती आवश्यकता आहे हें कोणालाहि सांगावयास नकोच. धर्माबद्दल जिकडे तिकडे औदासीन्य दिसून येत आहे, असें वरवर वाटतें; तरी पण ती गोष्ट खरी नाहीं. तसें जर असतें, तर धर्मासंबंधीं निरनिराळ्या प्रकारच्या चळवळी चालू झाल्या नसत्या. यावरून अद्याप आपल्या मनांत धर्मभावना जीवंत आहेत हें उघड होतें. अलीकडच्या धार्मिक चळवळींमुळें धर्मविषयक बरीच जागृति उत्पन्न झाली आहे. आर्यसंस्कृतीचें दिव्य तेज प्रज्वलित करण्याचें जर खरें श्रेय कोणीं घेतलें असेल तर तें आपल्या मुसलमान बंधूंनींच ! गारगोटींतील गुप्त अग्नि घर्षणाच्या योगानें जसा दृग्गोचर होतो तसें आपल्या धर्माचें दिव्य चैतन्य मुसलमानांच्या धर्मवेडामुळेंच प्रगट होऊं लागलें. मुसलमान बंधू शक्य तितक्या प्रकारें एकजुटीनें वागून गनिमी काव्यानें आपल्या धर्माशीं विरोध करीत आहेत. अशा या आणीबाणीच्या वेळीं आपणांमधील कलह कसे मोडतील व विस्कळीत झालेल्या हिंदुसमाजांत ऐक्य व परस्परांबद्दल सात्त्विक प्रेम कसें उत्पन्न करितां येईल, याचें विचारी माणसांना कोडें पडलें आहे. निरनिराळ्या संघांनीं निरनिराळें बसून हा नाजूक प्रश्न सुटणें शक्य नाहीं. ह्मणूनच सर्वांनीं एकत्र जमून सरळ मनानेंच चर्चा केली पाहिजे. आपसांतील मतभेद या

प्रसंगीं एका बाजूला ठेविले पाहिजेत आह्मांला मुसलमानांसारख्या परधर्मीयांशीं देखील विरोध करावयाचा नाहीं. फक्त आपल्याला धर्माचें व संस्कृतीचें रक्षण करावयाचें आहे, हें केव्हांहि आपण विसरतां कामा नये. या धोरणानेंच सर्वत्र हिंदूंच्या सभा स्थापन होत आहेत. श्रींनीं आपल्या आशीर्वादाच्या भाषणांत नागपूर येथील हिंदुमहासभेच्या कार्याबद्दल उल्लेख केलाच आहे. त्याच पद्धतीवर सर्व महाराष्ट्रांत संघटणा झाली पाहिजे अशी माझी इच्छा आहे

" दुसरा महत्वाचा मुद्दा ह्मणजे शुद्धिकार्य हा होय. जुलमानें व फसवून बाटवलेल्या लोकांना परत आपल्या धर्मांत घेणें शास्त्रसंमत आहे. आणि आमचे पूर्वज श्रीशिवछत्रपतिसारख्यांनीं घालून दिलेल्या उदाहरणांचा इतिहास प्रसिद्धच आहे. ही गोष्ट, मलबारांत मोपल्यांनीं बळानें हिंदूंना जेव्हां बाटवलें, तेव्हां नागपूर येथें जाहीर सभेत श्रींनीं सिद्ध करून सर्वांना पटवून दिली होती. त्यानंतर नागपूर येथें भरलेल्या याच हिंदुधर्मपरिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनांत व यवतमाळ येथें भरलेल्या तिसऱ्या अधिवेशनांत आणि काशी व प्रयाग येथें भरलेल्या हिंदुमहासभेच्या दोनही अधिवेशनांत शुद्धिकरण हें सर्वानुमतें शास्त्रविहित टरलें गेलें आहे शिवाय, तशा रीतीनें फसलेल्या एका ब्राह्मणाच्या मुलाला याच पुणें शहरीं शुद्ध करून आपल्या मूळ जातींत घेण्याचा कित्ता घालून दिल्याचें आपणां सर्वांस विदित आहेच. नागपूर येथें देखील श्रींचे समक्ष शुद्धिकार्यास सुरवात होऊन तें काम वे. शा. सं. ताह्मनकरशास्त्री यांनीं पुण्याप्रमाणें तेथें पुढें चालू ठेवलें आहे. या तऱ्हेचें शुद्धिकार्य ठिकठिकाणीं जारीनें सुरू केले पाहिजे, असें माझें प्रांजल मत आहे. या कामांतहि आम्हांला परधर्मीयांशी विरोध मुळींच करावयाचा नाहीं. मूळचे हिंदू पण कोणत्याहि कारणांनीं परधर्मांत ओढले असून ज्यांना आतां परत आपल्या हिंदु धर्मांत येण्याची इच्छा असेल, त्यांची आह्मीं अज्ञानानें उपेक्षा न करतां शास्त्र व प्राचीन रूढी यांस अनुसरून यथाविधि प्रायश्चित्तानें शुद्ध करून मूळच्या आपल्या हिंदुधर्मांत त्यांना परत घेतलें पाहिजे, हेंच शुद्धिकरणाचें खरें स्वरूप आहे.

" आतां राहिलेला तिसरा महत्वाचा मुद्दा ह्मणजे अस्पृश्योद्धार होय. निरनिराळे तंतू ज्याप्रमाणें एकत्र विणले असतां वस्त्र होतें, त्याचप्रमाणें हिंदुसमाजाच्या विस्काळित झालेल्या तंतूंची एकतानता अस्पृश्योद्धार झाल्यामुळें होणार आहे. या

बाबतींत स्वामी विवेकानंदांचे उद्गार मला आठवतात. त्यांनीं कळकळीनें असें ह्मटलें आहे कीं, खालच्या वर्गांतल्या लोकांची उपेक्षा हेंच आपल्या समाजाच्या अधः-पाताच्या अनेक कारणांपैकीं एक कारण आहे. या आपल्या चुकीकडे आह्मीं पूर्ण लक्ष पुरविलें पाहिजे. माझ्या मतें खालच्या वर्गांतील लोकांना योग्य शिक्षण देऊन त्यांची उन्नति केल्याशिवाय आणि त्यांना पोटभर अन्न मिळून त्यांची सर्वप्रकारें सुस्थिति घडवून आणल्याशिवाय आपण समाजाच्या उन्नतीसाठीं कितीही प्रयत्न केले तरी त्यांचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. हिंदुस्थान पुनः उन्नत व्हावा अशी आपली इच्छा असेल तर प्रथम या अस्पृश्य वर्गाची स्थिति सुधारून त्यांच्या मनोभावना न दुखवितां या समाजाला कुरवाळून आणि थापटून-थोपटून उत्क्रांती-कडे नेलें तर पाहिजे. हिंदुस्थानच्या इतिहासाचीं पानें आपण चाळून पाहिलीं तर समाजसुधारकांचें अस्तित्व फार प्राचीन काळापासून आढळून येतें. श्रीशंकराचार्य, रामानुजाचार्य, ज्ञानदेव, तुकाराम आदिकरून थोर पुरुष कोण होते ? खालच्या वर्गांची उन्नति व्हावी ह्मणून प्रयत्न करणारेच ते होते. शास्त्राला व काळाला सांगडें घालून समाजाच्या उन्नतीसाठीं ते झटत होते, ह्मणून तेच खरे समाजसुधा-रक होत. आपणहि त्यांच्या धोरणाला अनुसरून अस्पृश्योद्धार केला पाहिजे. या विषयाबद्दल राष्ट्रभर भिन्न भिन्न दिशेनें चळवळी सुरू झाल्या आहेत. तपशिलाच्या बाबतींत मतभेद असला, तरी अस्पृश्य वर्गाच्या उद्धाराच्या तत्त्वाच्या बाबतींत कोण-त्याहि पक्षाचा मतभेद नाहीं. या गोष्टीकडे लक्ष देऊन अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या लोकांनीं असंतुष्ट होऊन परधर्मांत शिरण्याची वेडगळ कल्पना आतां आपल्या मनांत आणूं नये अशी माझी त्यांना कळकळीची सूचना आहे. यापुढें त्यांचेकडे आमचें दुर्लक्ष होणार नाहीं हा त्यांनीं विश्वास बाळगावा. यवतमाळ येथें भर-लेल्या हिंदुधर्म परिषदेच्या गेल्या अधिवेशनांत देवस्थान वगैरे पवित्र ठिकाणें आणि पाणवठ्याच्या जागा यांखेरीज इतर सर्व सार्वजनिक ठिकाणीं अस्पृश्यता मानली जाऊं नये, या अभिप्रायाचा ठराव झाल्याचें मला आठवतें. अस्पृश्यांची पाण्या-संबंधीं गैरसोय किती होते याची जाणीव मीं आपणास करून देण्याची जरूरी आहे असें मला वाटत नाहीं. ह्यासंबंधीं आपणास निश्चित धोरण आंखल्याशिवाय आता गत्यंतर नाहीं. सभेच्या पुढें हा प्रश्न प्रामुख्यानें असल्यामुळें त्याचा सभेंत सांगो-पांग विचार होऊन निश्चित मार्ग आंखला जावा असें मी इच्छितों. देवस्थानाचा प्र-

अत्यंत नाजूक आहे. समाजांत या प्रश्नानें फार गडबड उडेल, ह्मणून तो प्रश्न तूर्त टाकावा असा माझा अभिप्राय आहे. मुख्यत्वेंकरून अस्पृश्य वर्गांच्या शिक्षणाकडे आणि स्वच्छता वगैरे सुधारणांकडे सर्वांनीं कळकळीनें लक्ष पुरविलें पाहिजे.

" याप्रमाणें माझ्या दृष्टीनें महत्वाच्या वाटणाऱ्या तीनही मुद्यांवर मीं माझें प्रांजल मत आपणां सर्वांपुढें मांडलें आहे. राजकीय बाबतींत ही परिषद पडत नाहीं, हें पूर्वीच्या अनुभवावरून मी जाणतों. ह्मणूनच मी या अधिवेशनांत भाग घेण्याचें कबूल केलें आहे. तसा कोणत्याहि प्रकारचा बखेडा होण्याचा संभव दिसतांच मला कोणत्याहि तऱ्हेचा भाग घेतां येणार नाहीं, हें अगोदरच आपणास सूचवून ठेवणें मला आपलें कर्तव्य वाटतें. याबद्दल कोणी राग मानूं नये, अशी सर्वांस माझी विनंति आहे. योग्य रीतीनें पुढचें काम चालवून आपणहि श्रेय घ्याल व मलाहि द्याल अशी आशा बाळगून मी आपलें भाषण संपवतों. "

याप्रमाणें राजेसाहेबांचें भाषण झाल्यानंतर परिषदेपुढें पुढील ठराव मांडण्यांत आले.

## ठराव.

ठराव १ लाः—निगडी येथील जमिनी मुसलमानांना घेण्यास मदत करूं नये, अशा अर्थाचा ठराव श्री. वामनराव पोतदार यांनीं मांडला. तो सर्वानुमतें पास झाला.

ठराव २ राः—वे० शा० सं० श्रीधरशास्त्री पाठक यांनीं 'पतित-परावर्तन' हा ठराव मांडला तो असा. 'फसगत, जुलुमजबरदस्ती, छन्न, अपकृत्य व तत्सम कारणांनीं ( वस्तुतः धर्मांतर होतच नाहीं. ) ज्याचेवर अशी आपत्ति आली असेल त्यांना ती आपत्ती दूर होतांच घडलेल्या संसर्गाबद्दल यथाशास्त्र प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होतां येतें असें या सभेचें मत आहे.' या ठरावाचे अनुरोधानें पाठक शास्त्री यांनीं देवलस्मृति, मनुस्मृति आणि व्यवहारांतील कांहीं गोष्टी सांगून ठराव सभेपुढें मांडला. ठराव मांडल्यावर काश्मीर येथील महाराजांनीं पंडीत लोकांकडून जें धर्मशास्त्र तयार केलें त्यांतील शुद्धिकार्याचा भाग त्यांनीं वाचून दाखविला. नंतर या कार्याला पुणें येथील विद्वान लोकांची संमति मिळाली आहे. त्यांचीं नांवें वाचून

दाखविलीं तीं अशीः—वे० शा० सं० काशीनाथ शास्त्री आगाशे, वे० शा० सं० विष्णुशास्त्री बापट, वे० शा० सं० बाळशास्त्री उपासनी, वे० शा० सं० शंकरशास्त्री मारुळकर, वे० शा. सं० गणेशशास्त्री गोडबोले, वे० शा० सं० अनंतशास्त्री फडके, वे० शा० सं० उवरकरशास्त्री पंढरपुर. या ठरावाला सर्वांनीं पाठिंबा द्यावा अशी विनंति केल्यावर वे० शा० सं० गोविंदशास्त्री फडके व वे० शा० सं० रामशास्त्री बापट धुळें, यांनीं पुष्टि दिल्यावर हा ठराव सर्वानुमतें पास झाला.

ठराव ३ राः—पतित-परावर्तनाचाच व्यावहारिक स्वरूपाचा पण रूढीला असंमत वाटणारा असा ठराव नं. २ मध्यें न येणारा ह्मणजे जाणूनबुजून परधर्मांत गेला असेल व नंतर त्याला पश्चात्ताप झाला असेल त्याची शुद्धि करून घेण्याचा रा. माटे यांनीं सभेपुढें मांडला. त्याला वे० शा० सं० मुंडले, वे० शा० सं० दिवेकर, पंडित सीतारामदास शास्त्री, वे० शा० सं० ताम्हनकर शास्त्री यांनीं पुष्टि दिल्यानंतर हाही ठराव बहुमतानें पास झाला.

ठराव ४ थाः—क्षत्रिय व वैश्य यांचे वर्तमानकाळींही अस्तित्व आहे हें शास्त्रसिद्ध व इतिहाससिद्ध आहे. ज्या क्षत्रियवैश्य घराण्यांत संस्कार लोप झाला असेल त्यांनीं इच्छा दर्शविल्यास त्यांना संस्कारलोपाबद्दल प्रायश्चित्त देऊन त्यांचीं धर्मकृत्यें शास्त्रविहित पद्धतीनें ( वेदोक्त पद्धतीनें ) ब्राह्मणांनीं करण्यास हरकत नाहीं, असें या सभेचें मत आहे. हा ठराव वे० शा० सं० नारायणशास्त्री मराठे यांनीं मांडला. ठरावाला अनुसरून शास्त्रांतील वचनांचे आधार आणि ऐतिहासिक गोष्टी सांगून त्यांनीं आपलें भाषण केलें. या ठरावाला वे० शा० सं० धोंडीराज शास्त्री दीक्षित बापट, वे० शा० सं० लक्ष्मणशास्त्री मुरगुडकर, वे० शा० सं० पांडुरंग शास्त्री पालये बदलापूर, या मंडळींनीं शास्त्राचे आधार देऊन समयोचित भाषण करून पुष्टि दिली. प्रचंड बहुमतानें हा ठराव पास झाला.

ठराव ५ वाः—अस्पृश्यता निवारणाचा ठराव वे. शा. सं. दिवेकर शास्त्री यांनीं सभेपुढें मांडला. याला रा. थोरात पुणें, रा. वामनराव पोतदार, डॉ. गोपाळराव पळसुले, रा. माने, रा. सकट यांनीं पुष्टि दिल्यानंतर श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांचें भाषण झालें. ते ह्मणाले, ' अस्पृश्यता काढून टाकण्याबद्दल शास्त्रांत कोठें सांगितलेलें नाहीं. करितां अस्पृश्यता कशानें प्राप्त झाली हें

पाहून अस्पृश्यांनीं मृतमांस सेवन न करणें, इत्यादि व पवित्र आचरण ठेवणें ह्मणजे त्यांची अस्पृश्यता मुळांतच नाहींशी होईल.' याप्रमाणें भाषण झाल्यानंतर प्रचंड बहुमतानें हा ठराव पास झाला. या ठरावांत मंदिरें खेरीजकरून सर्व सार्वजनिक स्थळीं अस्पृश्यता मानण्यांत येऊं नये असा मजकूर होता.

**ठराव ६ वा:**—नागपूरच्या हिंदुमुसलमानांच्या लढ्यांत श्रीमंत भोंसले राजे यांनीं जी हिंदुधर्माची कामगिरी केली तीबद्दल त्यांचे आभार मानण्याचा ठराव.

**ठराव ७ वा:**—निगडी येथील चिंचवड देवांच्या ताब्यांत असलेल्या जमिनी मुसलमानांना न देण्याबद्दल ट्रस्टींना विनंति.

**ठराव ८ वा:**—भोपाळ व हैद्राबाद येथील हिंदूंना नडणाऱ्या कायद्यांबद्दल निषेध, व हिंदु संस्थानिकांना अनाथ व अस्पृश्य यांच्या रक्षणाची तजवीज करण्याची विनंति.

**ठराव ९ वा:**—प्रत्येक हिंदु कुटुंबांत गाय पाळावी, आणि गोविक्रय करणें धर्माचे विरुद्ध असल्यानें हिंदूंनीं वधिकांना गोविक्रय करूं नये.

**ठराव १० वा:**—नंदुरबार, खेड, चिपळूण वगैरे ठिकाणच्या मुसलमानांच्या अत्याचाराचा निषेध.

**ठराव ११ वा:**—स्वामी श्रद्धानंदजींच्या शुद्धिकार्याचें अभिनंदन व त्या कार्याला पाठिंबा.

**ठराव १२ वा:**—मुसलमानांच्या धार्मिक समारंभांत हिंदूंनीं धार्मिक बुद्धीनें भाग घेणें हें धर्मबाह्य आहे.

**ठराव १३ वा:**—हिंदुसंघटन व शुद्धिकार्य यांना प्रोत्साहन देण्याविषयीं हिंदु वृत्तपत्रकारांना विनंति व याविरुद्ध वागणाऱ्यांचा निषेध आणि हिंदुसंघटना करण्याचा प्रयत्न.

**ठराव १४ वा:**—पुढील सभा जळगांव येथें भरण्यांत यावी.

याप्रमाणें ठराव पास होऊन परिषदेचें कार्य आटोपल्यानंतर श्रीमंत राजेसाहेबांनीं समारोपादाखल भाषण केलें.

## क्षत्रियांचें गुप्त-मंजुष.

ते ह्मणाले, " परवांपासून आजपर्यंत या परिषदेपुढें जे जे ठराव आले व ते सर्व मंजूर करण्यांत चारही वर्णांच्या लोकांनीं आपापले मनांचा जो उदारपणा व्यक्त केला, यावरून आजपावेतों परस्परांविषयीं परस्परांचे ठिकाणीं वसत असलेली साशंकता नाहींशी झाली आहे असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. ( टाळ्या ) आपणाला ज्या कांहीं धार्मिक सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत, त्या आपल्या धर्मशास्त्राला सुसंगत अशाच घडवून आणल्या पाहिजेत. चातुर्वर्ण्य व्यवस्था कायम ठेवूनच त्या त्या वर्णांतील लोकांचें ठिकाणीं स्वकर्मांविषयीं जागृति उत्पन्न केली पाहिजे. ' स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ' भगवान् श्रीकृष्णाच्या या उक्तीप्रमाणें प्रत्येकानें आपापलीं वर्णविहित कर्मे आचरून ऐहिक आणि पारलौकिक सिद्धी मिळावयाच्या आहेत. चातुर्वर्ण्यरूपी आपल्या या हिंदु समाजाला शरिराची उपमा अगदीं लागू पडते. शरिरांतील अवयव ज्याप्रमाणे आपापलें ठिकाणीं राहूनच सहकार्य करतात व त्यायोगें शरिराचें पोषण होऊन त्याकरवीं मोठमोठीं कार्यें होतात, तशीच अवयवरूपी या चारी वर्णांनीं एकमेकांची उपयुक्तता लक्षांत आणून धर्माची सेवा करावी, केवळ ऐहिक सुखांची प्राप्ति हेंच आपल्या हिंदुधर्माचें तत्त्व नसून काल वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे यांनीं सांगितल्याप्रमाणें ' निःश्रेयस साधनम् ' ह्मणजे मोक्षप्राप्ति, हें आपलें अंतिम ध्येय आहे. यासाठीं चातुर्वर्णीयांनीं आपली बुद्धि संकुचित न ठेवतां उदार आणि उच्च प्रतीची ठेवली पाहिजे. ऐहिक मानापमानाला भुलून जाऊन आपल्यांतील सर्व वर्णांचे लोक आपलेपणाला विसरून परधर्मीयांचे अनुकरण करूं लागले आहेत. प्रत्येक वर्णानें आपापली कामगिरी बजावून कार्य केल्यास हिंदु समाजाचें कल्याण होईल. सर्वस्वी हिंदु समाजाचें नेतृत्व आणि बौद्धिक उन्नति करण्याची जबाबदारी ज्या ब्राह्मण वर्गावर आहे त्यांची स्थिति फारच असमाधान-कारक झाली आहे. आणि त्यामुळें अप्रस्तुत वाद निर्माण झाले आहेत. वास्तविक या वर्णावर टीका करण्याचा माझा अधिकार नाहीं. तथापि बालादपि सुभाषितं ग्राह्यं ' या न्यायानें यांतून चांगला अर्थ तेवढा घ्यावा अशी माझी त्यांस विनंति आहे. क्षत्रियवैश्यांसंबंधीं वाद नाहींसा झाला खरा. परंतु यापुढील व्यवहार नीटपणें चालू राहतील अशी व्यवस्था होणें अत्यंत जरूर आहे. नुसत्या

शाब्दिक ठरावानें कांहीं उपयोग होणार नाहीं. खरी कळकळ व्यक्त होऊन ती कृतींत उतरावयास पाहिजे. आज महाराष्ट्रांत निरानिराळे पंथ निघत आहेत. त्यांपैकींच सत्यशोधक हाहि एक प्रकार होय. क्षत्रियवैश्यांबद्दल वाद त्यापूर्वीच नाहींसा झाला असतां सुदैवानें तो वाद आतां मिटला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तरी सत्यशोधकी मंडळींनीं यापुढें इतरांस चीड येण्यासारखें वर्तन करणें इष्ट नाहीं. आमचे कै. श्रीमंत शाहू छत्रपति महाराज कोल्हापूर यांना ज्या गोष्टींची आजन्म तळमळ लागून राहिली होती, त्या गोष्टीचा निकाल, त्यांच्याचपैकीं एक असलेल्या माझ्या अध्यक्षतेखालीं आज हिंदुधर्म परिषदेपुढें होत आहे, हें पाहून मला अत्यानंद व धन्यता वाटत आहे. ( टाळ्या ) अस्पृश्यासंबंधीं ज्याप्रमाणें आपण डोळ्यांत तेल घालून त्यांचें अपवित्रपणाबद्दल पाहणी करतों त्याबरोबर पवित्र आणि स्पृश्य ह्मणविणाऱ्या लोकांचीहि वागणूक कशी आहे आणि ते स्पृश्य ह्मणविण्यास लायक कीं नालायक याचीहि चिकित्सा व्हावयास पाहिजे. ( टाळ्या ) अस्पृश्यांपेक्षांहि ज्यांची नीच वागणूक आहे व जे खाण्यापिण्याचे बाबतींत कोणताहि निर्बंध पाळींत नाहींत, अशा स्पृश्य ह्मणविणाऱ्या लोकांना अस्पृश्यांत कां टाकूं नये ? ( टाळ्यांचा गजर. ) ‘ परोपदेशवेलायां सर्वे शिष्टाभवन्निहि ’ हा पंक्तिप्रपंच नको. कालच अस्पृश्योद्धाराचे ठरावास संमति देतांना आपल्या एका अस्पृश्य बंधूनीं जें समाधान व्यक्त केलें त्याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. विस्कळित झालेला हिंदुसमाज संघटित होऊन कार्यक्षम कसा होईल, या गोष्टीकडे सर्वांचें लक्ष वेधलें आहे. संघटनेशिवाय कार्यक्षमता उत्पन्न होत नाहीं. समाजांतील उत्पन्न झालेली बेदिली नष्ट कशी व्हावी, तुटत चाललेलें जातीजातींचें संबंध वाढवून पुनः त्यांचेमध्यें आत्मियता कशी निर्माण होईल, या दृष्टीनें प्रयत्न केले पाहिजेत. जुने आचार–विचार सद्यःस्थितीपुढें टिकेनासे झाले, जुने धंदे सुटून नव्या धंद्यांकडे लोकांचीं तोंडें वळलीं, आर्थिक स्थितीमध्यें एकदम फरक झाला. अशी समाजाची गोंधळलेली स्थिति सांप्रत दिसत आहे. अशा परिस्थितींत समाजांत प्रेमवृद्धि कशी करावी आणि तुटत चाललेले सांखळीचे दुवे पुनः निगडित कसे करावे याबद्दल विचारी लोकांना मोठी चिंता लागून राहिली आहे. अशा परिस्थितींत कार्य करण्याची जबाबदारी जरी सर्व समाजावर सारखीच पडत असली तरी ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यावरच सर्व जबाबदारी पडणें प्रसंग-प्राप्तच आहे. समाजाचा गाडा या

दोन चाकांशिवाय सुरळित चालणें शक्य नाहीं. युक्ति आणि शक्ति यांना विलग करून कोणतेंच काम तडीस जाणार नाहीं. ह्मणून दोन्ही समाजांना माझी विनंति आहे कीं, आपिलीं घरांतील भांडणें आपण खासगी बैठकींत तोडूं. आपल्यावर ज्या समाजाची जबाबदारी आहे, त्या समाजाच्या कार्यापुढें आह्मीं आपल्या खासगी प्रश्नांकडे दुर्लक्ष केलें पाहिजे. (टाळ्या) घराला आग लागली असतांना घरांतील प्रत्येक जण आपली भाऊबंदकी विसरून जाऊन आग विझविण्यास धांवतो. त्याचप्रमाणें धर्मावर घाला आला असतांना खासगी भांडणें उकरून काढून कच खाणें हें ब्राह्मण किंवा क्षत्रिय या दोघांनाहि लज्जास्पद आहे. शरीराच्या मदतीशिवाय हात असून नसण्यासारखे आहेत, त्याचप्रमाणें ब्राह्मण-क्षत्रियांचें अस्तित्व आणि मोठेपणा हा इतर समाजावर अवलंबून आहे. आपल्या परिषदेनें अस्पृश्यांसंबंधीं निश्चित धोरण जाहिर करून एक मोठी कामगिरी केली आहे. अस्पृश्य वर्गहि आपल्या मार्गांतील अडचणी जाणतो आहे. कोणतेंहि काम करतांना कार्यसाधनाकडे लक्ष द्यावें लागतें. त्याप्रमाणेंच तें कार्य साधण्यासाठीं केलेल्या प्रयत्नापासून दुसरेंच अनर्थ उत्पन्न न होण्याबद्दल काळजी घ्यावी लागते. या दृष्टीनें अस्पृश्यासंबंधींच्या ठरावाकडे पाहिलें असतां त्यांत कर्तृत्वाची छटा उघड दिसते. कार्य करण्याची खरी पद्धति सग्राहक बुद्धींत आहे. व तो संग्राहकपणा परिषदेनें यशस्वी करून दाखविला आहे; नागपूरसारख्या परप्रांतांत रहाणारा, परंतु भाषा, आचार, विचार यांनीं तमच्यांतील व एक असणारा असा जो मी, या मला, या परिषदेचें अध्यक्ष करून माझ्याबद्दल जो आपण आपलेपणा प्रगट केला त्यायोगें माझें अंतःकरण प्रेमानें सद्गदित होत आहे. या ठिकाणीं आलेली परठिकाणची मंडळी व स्थानिक विद्वान मंडळी यांनीं रात्रंदिवस बसून तीन दिवस प्रत्येक धार्मिक प्रश्नाचा अत्यत चिकित्सापूर्वक जो खल केला यावरून कार्याचें महत्व आणि निर्दोषित्व सर्वांच्या ध्यानांत आलेंच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. श्रीमत जगद्गुरु शंकराचार्य महाराज ( डॉ कुर्तकोटी ) यांच्याच आशीर्वादानें ही परिषद यशस्वी रीतीनें पार पडलेली आहे. परिषदेंत प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या विद्वान मंडळींचे, परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे, स्वागत मंडळाचे, सभेच्या चिटणिसांचे, चालकांचे वगैरे सर्वांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून शेवटीं हिंदुसमाजाला अभ्युदय आणि निःश्रेयस यांचा लाभ घडून धर्माची वृद्धि होवो, अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे." याप्रमाणें राजेसाहेबांनीं भाषण करून या परिषदेचें काम संपविलें.

## हिंदुधर्माचें धर्मत्व.

या हिंदुधर्म परिषदेच्या अध्यक्षाची कामगिरी ह्मणजे राजेसाहेबांच्या सार्वजनिक कार्याचा आदर्श आहे. तेव्हां त्याची मीमांसा येथें थोडक्यांत करणें अत्यंत जरूरीचें आहे. या परिषदेनें जे ठराव पास केले त्यांपैकीं तीन ठराव विशेष महत्वाचे आहेत. १ पतित-परावर्तन ह्मणजे शुद्धिकार्याला शास्त्राची अनुमति. २ क्षत्रिय व वैश्य यांचें कलियुगांत अस्तित्व शास्त्राच्या आधारानें मानलें जाऊन त्यांचे धार्मिक वैदिक विधी ब्राह्मणांना करण्यास मिळालेली मोकळिक व ३ अस्पृश्यता-निवारण. हे तीन महत्वाचे ठराव परिषदेपुढें येऊन त्यांची साधकबाधक चर्चा या धर्मपरिषदेंत झाली आणि या तीनही ठरावाला धर्माचा शास्त्राधारानें पाठिंबा मिळून ते पास झाले. यांतच या परिषदेचें आणि श्रीमंत राजेसाहेब यांच्या आंगीकृत कार्याचें यश निगडित झालेलें आहे. श्रीमंत राजेसाहेब हे या धर्मपरिषदेचे अध्यक्ष होते ह्मणूनच ते हिंदुधर्मशास्त्रांत पारंगत होते किंवा हिंदुधर्ममार्तंड होते असांतला भाग नाहीं. परंतु हिंदुधर्माचा किंवा हिंदुधर्मशास्त्राचा अन्य धर्मशास्त्रांशीं त्यांनीं तुलनात्मक विचार केला होता, यांत मात्र संशय नाहीं. अन्य धर्मशास्त्रांशीं हिंदुधर्माचीं शास्त्रें ताडून पहातां त्यांत त्यांना हिंदुधर्माचें एक वैशिष्ठ्य दिसून आलें. **हिंदुधर्मशास्त्र हें मानवी जातीनें योजलेली किंवा ठरावलेली गोष्ट कशी करावी, हें सांगतें.** अन्य धर्मशास्त्रें मात्र मानवी जातीनें अगर त्या धर्माच्या अनुयायांनीं कोणती गोष्ट करावी, एवढेंच सांगतात. खोटें बोलावें कीं बोलूं नये; चोरी करावी कीं करूं नये; मद्य प्यावें कीं पिऊं नये, हिंसा करावी कीं करूं नये, अस्पृश्यता मानावी कीं मानूं नये वगैरे प्रश्नांची होकारार्थी किंवा नकारार्थी उत्तरें अन्य धर्मांचीं शास्त्रें देतील. परंतु हिंदुधर्मशास्त्राचें तसें नाहीं. **हिंदुधर्म अखिल मानवी जातीकरितां आहे. प्रत्येक मानवी प्राण्याच्या अडीअडचणींचा धार्मिक दृष्टीनें हिंदुधर्मशास्त्रानें प्रश्न सोडविलेला आहे.** खोटें बोलणें, चोरी करणें, मद्य पिणें, हिंसा करणें किंवा अस्पृश्यता काढून टाकणें अशांपैकीं जें कार्य **मनुष्याला करणें असेल** अगर करणें भाग पडेल तें त्यानें करण्याचा विचार ठरविल्यानंतर **तें कसें केलें असतां धर्मशास्त्र-संमत होत असतें हें हिंदुधर्म शिकवितो.** खोटें बोलणें हें धर्मसंमत नाहीं असें एक धर्म सांगतो, पण हिंदुधर्म खोटें

बोललें असतां तेंही धर्मशास्त्र–संमत कसें असतें, हें सांगतो. उदाहरणार्थ, आपण असें घेऊं. एक कुलवती तरूण स्त्री आहे. तिच्यामागें एक कामांध परपुरुष लागला. पुढें स्त्री पळते आहे व मागून तो कामांध परपुरुष पळतो आहे. पळतां पळतां रस्त्याला वळण येऊन चार दिशेला चार लहान बोळ जात असून त्यांपैकीं एका बोळानें ती तरूण स्त्री त्या कामांधाची नजर चुकवून पळाली आहे. त्या चौरस्त्यावर उभा असलेल्या एका मनुष्याला त्या कामांध पुरुषानें विचारलें कीं, पळणारी स्त्री कोणीकडे गेली ? अशा स्थितींत खरें बोललें असतां त्या बाईचें पातिव्रत्य भ्रष्ट होतें, खरें न सांगावें, तर खोटें बोलल्याप्रमाणें होतें. **अशा स्थितींत खोटें बोलणें हेंच धर्मशास्त्र–संमत असतें.** अशा प्रसंगीं खरें बोलणें हेंच धर्माला सोडून असतें. अशाच प्रकारची शिकवणुक इतरही बाबतींत आहे हिंदुधर्म कसें करावें हें **शिकवितो म्हणूनच तो इतर धर्मांपेक्षां श्रेष्ठ** आहे असें जगाला दाखवितो. हें हिंदुधर्माचें रहस्य राजेसाहेब उत्तम प्रकारें जाणत असल्यामुळें सांप्रतच्या परिस्थितींत समाजाला कोणती गोष्ट हितावह आहे व कोणती गोष्ट करणें कालमानाप्रमाणें विहित आहे, हें ठरल्यानंतर ती हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें कशी करितां येईल, हे ते पहात असत. ज्या वेळीं परधर्मीयांचा हल्ला हिंदुधर्मावर होऊन हिंदु-लोक बाटूं लागल्यामुळें हिंदुधर्माला गळती लागली व असेच डोळे झांकून हिंदूंनीं दिवस काढल तर कांहीं वर्षांनतर हिंदुस्थानांत अजब घरांत ठेवावयाला तरी हिंदु मिळेल कीं नाहीं, अशी ज्या वेळीं त्यांना शंका आली, त्या वेळीं शुद्धिकार्याचें शस्त्र त्यांना हातीं घ्यावें लागलें व त्याला पुण्याच्या हिंदुधर्मपरिषदेनें चांगलेंच पाठबळ दिलें. या परिषदेच्या ज्या तीन परिषदा पूर्वीं झाल्या, त्या परिषदांत पुराणमताभिमानी शास्त्री मंडळींनीं भाग घेतला नव्हता. परंतु या परिषदेंत याही शास्त्री मंडळींनीं थोडा बहुत भाग घेऊन ‘ शुद्धि ’ शास्त्र संमत आहे, हें प्रमाणसिद्ध ठरवून त्याप्रमाणें शुद्धि कार्याचे दोन ठराव पास करून घेतले. ही पुण्याच्या धर्मपरिषदेच्या यशाची पहिली पायरी झाली.

## कोल्हापुरी वेदोक्ताची अनवश्यकता.

नागपूरच्या धर्मपरिषदेंत कलियुगांत क्षत्रिय व वैश्य नाहींत असा वाद उत्पन्न करण्यांत आला होता. त्या प्रकरणीं येथील परिषदेनें जरी कलियुगांत क्षत्रिय व

वैश्य आहेत असा निर्णय दिला होता, तरी त्याला शास्त्री, पंडित, याज्ञिक मंडळीचें जसें पाठबळ मिळावयाला पाहिजे होतें, तसें तेथील परिषदेंत मिळालें नव्हतें. परंतु, राजेसाहेबांच्या तीन वर्षांच्या कामगिरीमुळें या पुण्याच्या परिषदेला याविषयानें महत्व आलें. या परिषदेंत क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व शास्त्रानें सिद्ध झालें व त्याला शास्त्री, पंडीत यांनीं पूर्णपणें पाठबळ दिलें. हा ठराव पास झाल्यामुळें कलियुगांतील क्षत्रिय आणि वैश्य लोकांना वैदिक धर्मकृत्यें ब्राह्मणांकडून करून घेण्याला मोकळीक मिळाली. कोल्हापुरास वेदोक्त प्रकरण माजलें पण त्याचें पर्यवसान ब्राह्मणांना दूर ढकलून आपल्याच लोकांकडून वेदोक्त संस्कार करून घेण्याचा ब्राह्मणेतर पक्षाला प्रसंग आला. यामुळें कांहीं दिवस हिंदुसमाजांत दुफळी माजली. परंतु त्या दुफळीचा कांटाच या पुण्याचे परिषदेनें काढून टाकला. या परिषदेनें क्षत्रिय आणि वैश्य यांचे वेदाचे अधिकार मान्य केले व त्याप्रमाणें त्यांचे घरीं वैदिक धर्मकृत्यें करण्याची भिक्षुकांना पूर्ण मोकळीक दिली. यामुळें पुण्याची धर्मपरिषद यशाची दुसरी पायरी चढली.

## अस्पृश्यतेचा जाहीर इन्कार.

नाशकाला जी पहिली धर्म परिषद भरली, तींत त्यावेळीं अस्पृश्य लोकांना बसण्याकरितां वेगळी जागा राखून ठेवण्यांत आली होती. परंतु तेथून पुण्या-पर्यंच्या परिषदेच्या प्रवासांत कालाच्या ओघाला अनुसरून व विविध परिस्थितीला अनुलक्षून जी विचारक्रांती घडून आली, तिचें पर्यवसान असें झालें कीं, पुण्याच्या परिषदेच्या जागेंत अस्पृश्यांकरितां वेगळी जागा तर राखून ठेवली गेलीच नाहीं, पण परिषदेचे जागीं प्रत्यक्ष अध्यक्षांचें जवळ उच्चासनावरही अस्पृश्य सभासदांना बसूं देण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें कांहीं महार मंडळीही स्वामी शंकराचार्य यांच्या पायाला स्पर्श करून त्यांनीं चालविलेल्या सत्कार्याबद्दल आदर व्यक्त करीत होती. डॉ. कुर्तकोटी यांनीं अस्पृश्यता—निवारणाचे बाबतींत कोणालाही यत्किंचितही असमाधान न वाटूं देतां दोन पावलें जाहीर रीतीनें पुढें टाकण्याचें कार्य केलें होतें. याशिवाय कांहीं अस्पृश्य मंडळी इतस्ततः स्पृश्य मंडळींत बसली होती. परंतु त्यामुळें कोठें कुजबुज किंवा असंतोष दिसून आला नाहीं. अस्पृश्यता निवारणासंबंधीं परिषदेनें पुढीलप्रमाणें ठराव पास•

केला. ( अ ) ' स्पृश्य जातींना हिंदु समाजांत जे हक्क आहेत ते अस्पृश्यांना शक्य तितके यथाशास्त्र लवकर मिळाले पाहिजेत, हें तत्त्व ह्या परिषदेस पूर्ण मान्य आहे. ' परंतु हजारों वर्षें जनसमाजाच्या मनावर रूढ असलेले संस्कार एकदम नष्ट होणें शक्य नाहीं, हें जाणून व देवयात्रा विवाहेषु यज्ञप्रकरणेषु च । तीर्थे विवाहे यात्रायां संग्रामे देशविप्लवे । नगरग्रामदाहे च स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ प्राकार रोधे विषमप्रदेशे सेवानिवेशे भुवनस्य दाहे । आरब्धयज्ञेषु महोत्सवेषु तथैव दोषा न विकल्पनीयाः ॥ कूपकुण्डे शिलाखण्डे नौकायां गजमस्तके । विवाहतीर्थयात्रायां स्पर्शदोषो न विद्यते ॥ इत्यादि वचनांस अनुसरून अस्पृश्यता मोडण्यासंबंधीं या परिषदेनें स्पृश्य जातींना आग्रहाची विनंति केली आहे. यावरून या पुण्याच्या हिंदु परिषदेनें विचाराची नवीन दिशा कशी स्वीकारली, हें वाचकांच्या दृष्टीला येईल. अस्पृश्यतानिवारणाचे बाबतींत नव्या जुन्या मतांच्या लोकांनीं पास केलेला हा ठराव ह्मणजे एक प्रकारचा जाहीरनामाच होय. हा जाहीरनामा समाजसुधारणेच्या बाबतींत ठिकठिकाणच्या कार्यकर्त्या माणसांना, लोकलबोर्ड, म्युनिसिपालिट्या इत्यादि सार्वजनिक संस्थांना हिंदुसमाजाला उज्ज्वल आणि संघटित स्वरूप आणावयाला विशेष फायदेशीर होणारा आहे. अशा प्रकारचा अस्पृश्यतानिवारणाचा तिसरा ठराव पास करून ही पुण्याची हिंदुधर्म परिषद यशाची तिसरी पायरी चढली.

## पुनर्मीलन.

या सर्व गोष्टींनीं ही परिषद विशेष यशस्वी झाली असें सांगण्याचें कारण राहिलें नाहीं. समारोप करतेवेळीं राजेसाहेबांनीं जें भाषण केलें, तें अत्यंत महत्वाचें असें आहे. त्यांत ते ह्मणतात, ' कै० श्रीमंत शाहूछत्रपतिमहाराज कोल्हापूर यांना ज्या गोष्टीची आजन्म तळमळ लागून राहिली होती, त्या गोष्टीचा निकाल त्यांच्याचपैकीं एक असलेल्या माझ्या अध्यक्षतेखालीं आज हिंदुधर्मपरिषदेपुढें होत आहे, हें पाहून मला अत्यानंद व धन्यता वाटत आहे. ' राजेसाहेबांच्या या भाषणावरून राजर्षि श्रीशाहूमहाराज यांनीं अस्पृश्यता निवारणाच्या अंगिकारलेल्या कार्याला आमचे चरित्रनायक सर्व हिंदुसमाजाला फुटूं न देतां सर्वांचें सहाय्य घेऊन कशा कुशलतेनें मदत करीत होते, हें वाचकांच्या लक्षांत येईल. हिंदुसंघटन करणें हें

श्रीशिवाजीमहाराजांचें व्रत हे दोघे भोंसले बंधू उत्तम प्रकारें चालवीत होते. समाजाच्या परिस्थितीप्रमाणें आपलें ध्येय गांठण्याकरितां कार्याची दिशा उभयतांना निरनिराळी आक्रमावी लागली; ह्मणूनच हें संघटणेचें कार्य यशस्वी झालें. श्रीशाहुमहाराज दक्षिण प्रांतीं राहणारे ह्मणून त्यांनीं उत्तर दिशा आक्रमिली व आमचे चरित्रनायक उत्तर प्रांतीं राहणारे ह्मणून त्यांनीं दक्षिण दिशेला आक्रमण केलें. दिशेच्या आक्रमण करण्याच्या पद्धतींत उत्तर दक्षिण इतकें जरी त्यांत लोकांच्या दृष्टीनें महदंतर दिसलें तरी पुणें या मध्यस्थलाचे जागीं उभयतां भोंसले बंधूंनीं आपलें अस्पृश्यता निवारणाचें ध्येय गांठलें, हें वाचकांच्या लक्षांत येईल. श्रीमहर्षी शाहुमहाराज आणि श्रीमंत राजे लक्ष्मणरावमहाराज हे उभयतां भोंसलें घराण्याच्या संघटनेच्या ध्येयामध्यें कसे समरस होऊन कार्य करीत होते हें निराळें सांगणेची आतां आवश्यकतां राहिली नाहीं. समाज मात्र आपल्या बुद्धीप्रमाणें त्यांच्या कार्याचें आकलन करून त्यांच्याविषयीं अनुकूल अगर प्रतिकूल असें आपलें मत करवीत होता याचा दोष कोणाकडे ?

## कार्य—गौरव.

सदर परिषदेचें कार्य यशस्वी तऱ्हेनें पार पडल्यानंतर पुण्यांतील कित्येक संस्थांनीं आणि बड्या बड्या लोकांनीं आपापल्या परीनें पानसुपारीला बोलावून किंवा उपहार-भोजनें वगैरे देऊन त्याचा यथायोग्य सन्मान केला. त्याचप्रमाणें पुणें येथील भारत हायस्कूलचे सुपरिन्टेन्डेन्ट साहेबांनीं त्याच हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक श्री. वि. म. तैलंग यांचेकरवीं काव्य—अलंकार तयार करवून घेऊन तो ता. २-७ १९२४ इ. रोजीं राजसाहेबांना बहुमानानें अर्पण केला. तो

## काव्यालंकार

ज्ञानोत्पदैर्विविधविषयैः पण्डितैः सेव्यमानो ।
नानालोकैरतुलचरितैस्सादरं दृश्यमानः ॥
सोयं नित्यं निजगुणयशश्चंद्रिकामूयमानः ।
स्वीयैस्सार्धं विलसतु जनैर्लक्ष्मणो भूमिपालः॥ १॥

---

## प्रकरण १९ वें.

# रायगड येथील चवथा महोत्सव.

### स्मारकांचें विशिष्टत्व.

चैत्र वद्य पंचमी तारीख ३ एप्रील सन १९२६ इसवी रोजीं श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले यांचे अध्यक्षतेखालीं श्रीशिवाजी—स्मारक—मंडळानें रायगड येथील चवथा महोत्सव साजरा केला. राजेसाहेबांच्या चरित्रांतील तो एक चिरस्मरणीय असा प्रसंग झाला, यांत संशय नाहीं. राजेसाहेबांनीं आजपर्यंत जी लोकसेवेची तपश्चर्या केली, ती लोकसमाजाच्या कसोटीला कितपत उतरते, हें सिद्ध होण्याचाच हा प्रसंग होता. आजपर्यंत राजेसाहेबांनीं चातुर्वर्ण्य संस्थापनेच्या बाबतींत कामगिरी केली, नागपूर येथील हिंदुमुसलमानांच्या झगड्यांत आपलें तेजस्वी कर्तव्यकर्म बजावलें, नागपूर हिंदुसभेचें धूरिणत्व पतकरून धर्मकार्य सुसंघटित केलें, पुण्याच्या धर्मपरिषदेचे अध्यक्ष होऊन हिंदुसमाजसंघटनेच्या धोरणाची रूपरेखा आंखून दिली, इत्यादि गोष्टींनीं ते लोकांच्या आदराला व विश्वासाला पात्र होऊन लोकमान्य झाले होते. त्याचप्रमाणें राजकृपेचेंही छत्र त्यांचेवर आलें होतें. राजेसाहेब ह्मणजे सरकारी पेन्शनदार, जहागिरदार, सरदार, त्यांतून नागपूरकर भोंसले राजघराण्यांतील प्रसिद्ध व्यक्ति, त्यांच्या राजमान्य कामगिरीबद्दल त्यांना ‘ राजा ’ ही राजमान्य पदवी मिळालेली, त्याचप्रमाणें राजेरजवाडे, संस्थानिक यांच्या दरबारीं प्रतिष्ठा असलेले राजपुरुष, पुण्याच्या राजमान्य ‘ अखिल हिंद श्रीशिवाजी-स्मारक—कमिटीचे ’ उपाध्यक्ष यांहींकरून ते राजमान्यही गणले जात. तेव्हां राजेसाहेबांच्या मनाच्या तराजूचें पारडें राजमान्यतेकडे जास्त झुकणारें आहे कीं लोकमान्यतेकडे विशेष कलणारें आहे, याची परीक्षाच पहाण्याचा संकल्प बृहन्महाराष्ट्राच्या

जनतेनें त्यांना रायगडच्या उत्सवाचे अध्यक्ष निवडण्याचे वेळीं केला असावा, असें दिसतें. कारण, रायगड येथें जें श्रीशिवाजीमहाराजांचें स्मारक करण्यांत येत होतें, त्याला पुण्याच्या राजमान्य श्रीशिवाजीस्मारकाप्रमाणें सरकारी अधिष्ठान नव्हतें. रायगडच्या शिवस्मारकाचा उगम 'लोकमान्य टिळक' यांच्या कर्तव्यस्थानापासून ह्मणजे अर्थात जनहित साधणाऱ्या शुद्ध वातावरणाच्या स्थलापासून झाला असल्यामुळें या स्मारकाला बृहन्महाराष्ट्राच्या जनतेचेंच अधिष्ठान लाभलें होतें व त्या अधिष्ठानाच्या जोरावर व स्फूर्तीवर हें स्मारकाचें काम सुरू झालें होतें.

श्रीशिवाजीमहाराजांचीं राजमान्य व लोकमान्य अशा पक्षांकडून दोन निरनिराळीं स्मारकें उभारण्यांत आलीं. या दोन्ही स्मारकांच्या मुळाशीं दोनही पक्षांचा हेतु एकच होता. शिवाजीमहाराज लुटारू, दरवडेखोर असून ते डोंगरांतले उंदीर होते, असें शिवाजीमहाराजांच्या शत्रूंचें ह्मणणें असे. शिवाजीमहाराजांच्या चरित्राला लागलेला हा किळसवाणा डाग धुऊन काढण्याकरितां हे दोन्ही पक्ष आप-आपल्या मगदुराप्रमाणें सरकारचें अगर लोकांचें अधिष्ठान मिळवून प्रयत्न करीत होते. अशा प्रकारचा किंतु सदोष दृष्टीनें पहाणाऱ्या अगर विचार करणाऱ्या कोणाच्याही मनांत आला असला, तरी पण स्मारक करणाऱ्या दोन्हीही पक्षांचे मनांत वरील क:पदार्थ कल्पना खास नव्हती. कारण, श्रीशिवाजी-महाराजांचें चरित्र इतकें तेजस्वी आहे कीं, त्यांच्या कोणत्याही निंद-कानें त्यांच्याबद्दल वेडेंवांकडें लिहिण्याचा अगर बोलण्याचा कसला व केवढाही प्रयत्न केला, तरी तो सूर्यावर थुंकणाऱ्याच्या फजितीप्रमाणेंच हास्यास्पद आणि व्यर्थ होणार, यांत कांहींच संशय नको. तेव्हां श्रीशिवाजीमहाराजांच्यावरील आरोप धुऊन काढण्याकरितां नसून त्यांच्या स्मारकरूपी आदर्शांत आपण स्वत: कसे दिसतों हें पाहण्यासाठींच त्यांचें स्मारक करण्याची ही सारी खटपट होती. स्वधर्मरक्षण करण्याकरितां जरूर असलेल्या सुव्यवस्थित स्वराज्याची किती आवश्यकता आहे, स्वधर्माचरण हेंच मोक्षाचें साधन असतें ह्मणून स्वधर्माप्रमाणें सतत आचरण चालू रहाण्याची परिस्थिति उत्पन्न होण्याकरितां ह्मणजे तसें सुव्यवस्थित स्वराज्य स्थापण्या-करितां धारातीर्थी प्राण वेंचणें, हेंही एक मोक्षसाधनच आहे. आणि तें स्थापन करणें हें व्यक्तीच्या बडेजावीचें साधन नसून नि:श्रेयस–साधन आहे, या गोष्टींचें अहर्निश स्मरण होण्याकरितांच हीं स्मारकें करण्याचा उभय पक्षांचे लोकांचा हेतु

असणें, हें स्वाभाविक होतें. परंतु स्मारकांचें वैशिष्ट्य समजण्याच्या भावनेमध्यें मात्र मनुष्याच्या मनोधर्माप्रमाणें फरक राहूं शकतो. हिऱ्याला ज्याप्रमाणें सुवर्णाच्या कोंदणांचें क्षेत्र मिळालें, ह्मणजे त्यापासून हिऱ्यालाही महत्व येतें, त्याप्रमाणें स्मारकाला योग्य क्षेत्राची जोड मिळाली ह्मणजे स्मारकाचेंही विशेष महत्व लोकांना वाटूं लागतें. शिवाय, त्या स्मारकस्थलाविषयीं जितक्या जास्त लोकांना आत्मीय भाव वाटेल तितकेंच त्याचें महत्वही वाढूं लागतें. श्रीशिवाजीमहाराजांचा अश्वारूढ पुतळा लोकांच्या नजरेला नेहमीं पडावा आणि त्याच्या सतत दर्शनानें हिंदुमात्राच्या मनांत त्यांच्या कर्तव्याची जाणीव रहावी, ही कल्पना पुण्याच्या तें स्मारककर्त्यांची होती. शिवाय, शिवाजीमहाराजांचें पहिलें कार्यक्षेत्र ह्मणजे मावळप्रांत व त्या प्रांताचें सांप्रतचें मुख्य केंद्र व मोठें स्थान ह्मणजे पुणें, त्या ठिकाणीं त्यांचे दर्शनाला वर्तमानकालीं सहज कोणालाही येतां येण्यासारखें आहे. राजमान्य लोकांनीं पुणें येथें श्रीमंती थाटाचें स्मारक केलें तें या हेतूनें. परंतु बहुजनसमाज सर्वसाधारण लोकांचा असतो. त्यांचे विचार जास्त भावनाप्रधान असतात. यास्तव लोकमान्यपक्षानें श्रीशिवाजीमहाराजांचें स्मारक रायगडीं करण्याचें ठरविलें. ज्या रायगडावर हिंदपदपादशाहीची गादी स्थापन झाली, ज्या पुण्यस्थलीं श्रीशिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला व ज्या क्षेत्रावर त्यांनीं आपला अवतारी देह कायमचा ठेवला, अशा त्या थोर रायगडच्या पुण्यक्षेत्राचे ठिकाणीं शिवाजीमहाराजांचें स्मारक करणें बहुजनसमाजाला जास्त प्रिय वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं उपक्रम चालू केला. या स्मारकाला लोकांनीं पैपैशापासून यथाशक्ति व आत्मीय भावानें मदत केली, ह्मणून या स्मारकाचें बृहन्महाराष्ट्रांतील लोकांना विशेष प्रेम वाटणें सहाजिकच आहे.

## स्वधर्मसंस्थापकाच्या स्मारकोत्सवाला स्वधर्मसंरक्षक अध्यक्ष.

रायगड येथील या महोत्सवाचे वेळीं श्रीशिवाजीमहाराजांचे दहनस्थळीं बांधलेल्या सुंदर छत्रीचें लोकांना दर्शन होणार होतें. या उत्सवांतील हा एक विशेष होता. शिवाय अशा महोत्साहाला श्रीशिवाजी महाराजांच्याच वंशांतील एकाद्या प्रसिद्ध पुरुषाचें अध्यक्षपण लाभणें हाही आणखी एक विशेष होता. पण 'भोंसले' घराण्यांतील राजपुरुष ह्मणजे मोटार गाड्यांतून हिंडणारे; त्यांना रायगडसारख्या अव-

घड व श्रीमंतांना दुर्गम वाटणाऱ्या स्थलीं जाण्याची हौस कशी असणार ? उत्सव-मंडळाच्या शोधक दृष्टीला तसा योग्य पुरुष श्री. राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले यांचे-शिवाय दुसरा कोणी दिसेना; ह्मणून त्यांनीं राजेसाहेबांची अध्यक्षस्थानीं एकमतानें निवड केली व त्याप्रमाणें राजेसाहेबांना विनंति केली. राजेसाहेब या रायगडच्या उत्सवाचें महत्व पूर्ण जाणून होतें. त्यांना हें निमंत्रण येतांच अतिशय आनंद झाला; व ' आपण रायगडीं जाणार, ' असें त्यांनीं मनानें ठरविलें; परंतु राजेसाहेब हे मनानें जरी स्वतंत्र होते, तरी त्यांना सार्वजनिक बाबतींत काम करण्यामध्यें मागें खेचणारी कांहीं वडील मंडळी होती. सरकारविरुद्ध यत्किंचितसुद्धां कोणतीही कामगिरी राजे-साहेबांची होऊं नंय व सरकारविरुद्ध लोकांच्या कोणत्याही महत्वाच्या कार्यांत त्यांनीं भाग घेऊं नये, असें त्यांना वाटे. ह्मणून ती मंडळी राजेसाहेबांवर विशेष लक्ष ठेवींत. त्या मंडळीचा राजेसाहेबांनीं सल्ला घेतला, पण रायगडच्या महोत्स-वाचें अध्यक्षस्थान त्यांनीं स्वीकारावें, असें मत त्यांचेकडून त्यांना मिळालें नाहीं. तेव्हां राजेसाहेबांना मोठी पंचाईत पडली. त्यांचे बरोबरीची नेहमींची स्नेही मंडळी होती; त्यांचें मत मात्र 'रायगडीं जाणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे, ' असें पडलें. या मित्र मंडळीच्या मतावरच राजेसाहेबांचा, आजपर्यंतच्या अनुभवावरून, विशेष विश्वास बसला होता. तरीपण कोणतीही गोष्ट स्वतः विचार करून ठरविण्याची त्यांची नेहमींची पद्धत असे; ह्मणजे ' ऐकावें जनाचें व करावें मनाचें ' ही ह्मण ते नित्य आचरणांत आणीत होते. ह्मणून अध्यक्षपदाचा स्वीकार केल्याबद्दल दुसरे दिवशीं निश्चितपणें सांगण्याचें त्यांनीं ठरविलें.

## ऐतिहासिक हद्दपारीची वर्तमानकालीन सन्माननीय निष्कृति.

यापूर्वीं राजेसाहेबांना कित्येक प्रसंगीं अध्यक्षपदाचा मान मिळाला होता; पण या रायगडच्या उत्सवाचें अध्यक्ष होण्याचें विनंतिपर निमंत्रण येतांच, त्यांना मना-पासून आनंद झाला. तसा आनंद अध्यक्षपदाच्या पूर्वीच्या मानाचे वेळीं झाला नव्हता. तेव्हां या आनंदाच्या विशेष चिन्हावरून रायगडच्या उत्सवाचें अध्यक्ष-स्थान आपण स्वीकारणें हें आपलें एक विशेष कर्तव्य आहे, अशी मनाची स्वाभाविक स्फूर्ति राजेसाहेबांना आंतून मदत करीत होती. त्यामुळें त्यांच्या आनंदाला व स्फूर्तीला मदत करणारेच विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले. त्यांच्या डोळ्यांपुढें

शिवाजीमहाराजांचे वेळचा रायगड दिसूं लागला. राजेसाहेबांचा इतिहासाचा व्यासंग फारच मोठा असल्यामुळें व रायगडप्रकरण हेंच नागपूरकर भोंसल्यांच्या • अभ्युदयाचें खरें कारण आहे, हा इतिहास राजेसाहेबांचे मनांत साद्यंत सारखा घोळत असल्यामुळें, त्याच इतिहासाची पुनरावृत्ति त्यांचे मनांत या वेळीं होऊं लागली. श्रीशिवाजीमहाराजांचे अंतकाळीं नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज साबाजी भोंसले हे त्यांचेजवळ होते. त्यांच्याच हस्तें शिवाजी महाराजांचा अंत्यविधि रायगडावर झाला होता. श्रीशिवप्रभूविषयींच्या कर्तव्यकर्मांची अखेरी साधण्याचा मान नागपूरकर भोंसल्यांनाच त्या वेळीं मिळाला असतां त्यांच्याच वंशजाला त्याच ठिकाणीं शिवाजीमहाराजांच्या नवीन तयार झालेल्या समाधीची सांगता करण्याचा मान लाभणें हा एक अतर्क्य योगायोग होय! यासाठींच हें अध्य-क्षपद स्वीकारणें हेंच राजेसाहेबांना योग्य वाटलें. त्यांना त्यांची मनोदेवता हें अध्य-क्षपद स्वीकारण्याबद्दल आग्रह करूं लागली. मनोदेवतेनें तसा आग्रह करावा, याला आणखीही एक ऐतिहासिक महत्वाचें बलवत्तर कारण होतें. शिवाजीमहाराजांचे मरणानंतर पन्हाळ्यावरून नजर कैदेंतून निसटून संभाजीमहाराज रायगडावर आले, त्या वेळीं सोयराबाईच्या पक्षाला नागपूरकर भोंसल्यांचे पूर्वज परसोजी, बापूजी व साबाजी, हें त्रिवर्ग भोंसले बंधू सामील आहेत, असा संशय आला असतां, सोयरा-बाईच्या पक्षांतील इतर लोकांची संभाजीनें कत्तल केली, तशी त्यांची न करतां शिवाजीमहाराजांचे वेळची त्यांची कामगिरी लक्षांत घेऊन त्यांची त्यानें रायगडा-वरूनच हद्दपारी केली होती. त्या नशीबपालट्या हद्दपारीनंतर नागपूरकर भोंसले-राजांना रायगडावर पुन्हां जाण्याचा कधींच प्रसंग आलेला इतिहासांत नमूद नाहीं. शाहुमहाराज दिल्लीहून परत दाक्षिणेंत आले, त्या वेळीं परसोजीनें त्यांना सर्व प्रकारची मदत पहिल्यानें देऊन त्यांना गादीवर बसविलें. पण तेव्हां ती गादी रायगडावरून साताऱ्यास आली होती, त्यामुळें परसोजीस रायगडावर पुन्हां परत जाण्याचा प्रसंग आला नाहीं. संभाजीमहाराजांनीं या त्रिवर्ग भोंसले बंधूंवर राजद्रोहाचा गुन्हा लादून त्यांना हद्दपार केलें, तरी त्याच त्रिवर्ग बंधूंनीं त्याच्याच मुलाला सर्वस्वीं मदत करून साताऱ्च्या गादीवर बसविलें. यामुळें त्यांची ती राजद्रोह–दूषित हद्दपारी तत्त्वतः गेलीच होती. सातारा हें राजधानीचें शहर झाल्यानंतर आजतागाईतपर्यंत नागपूरकर भोंसल्यांच्या वंशजांना रायगडीं जाण्याचा प्रसंग आला नव्हता. तो या

उत्सवप्रसंगानें आला. तेव्हां नागपूरकर भोंसल्यांची रायगडावरून झालेली ऐतिहासिक हद्दपारी सन्मानपूर्वक रद्बातल झाल्याची सुसंधि त्यांच्याच वंशांतील पुरुषाला ऐतिहासिक कार्य करतांनाच यावी, ही विधिघटना अतर्क्य खरीच. ही अनाहूत पण अलभ्य संधि आपण साधावीच साधावी, असेंही राजेसाहेबांचें मन त्यांना सुचवूं लागलें. राजेसाहेबांच्या या उत्साहवर्धक विचाराच्या भरांत अवांतर गोष्टींचा विचार करावयाला त्यांना सवडच झाली नाहीं. आपलें आतां पन्नास वर्षांचें वय झालें, वयपरत्वें शरीरही क्षीण झालें, अशा स्थितींत रायगडचा सात आठ मैलांचा चढाव चढून जाण्याची आपले आंगीं शक्ति आहे किंवा नाहीं, या संबंधाचे विचार त्यांचे मनाला बिलकुल शिवले नाहींत. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं त्यांनीं 'रायगडाच्या महोत्सवाचें अध्यक्षस्थान आपण आनंदानें स्वीकारलें,' असें पुण्याचे कार्याध्यक्षांस कळविलें व त्याप्रमाणें रायगडच्या स्वारीची त्यांची तयारी चालू झाली.

## पांढरपेशे व मावळे.

नागपूरचे भोंसले राजे रायगडच्या महोत्सवाचे अध्यक्ष होणार, ही बातमी सर्व बृहन्महाराष्ट्रांत तेव्हांच पसरली. त्यामुळें ठिकठिकाणच्या पुढारी लोकांना विशेष उत्साह आला. राजेसाहेबांच्या मोठेपणाला अनुरूप अशी उत्सवाची तयारी जोरांत सुरू झाली. महाड येथील कार्यकर्त्या लोकांनीं कमर बांधली आणि उत्सवास येणाऱ्या सर्व पाहुण्यांची यथायोग्य सोय लावण्याचा त्यांनीं संकल्प केला.

श्री. राजेसाहेब गुरुवार ता. १ एप्रील रोजीं नाशीकहून रात्रींचे गाडीनें रायगडीं जाण्यास निघाले. उन्हाळा असल्यामुळें नेहमींप्रमाणें ते चैत्र महिन्यांतील श्रीरामाचें नवरात्र आटोपून नाशकास राहण्याकरितां आले होते. नाशिकाहून कल्याण व कल्याणहून कर्जतला शुक्रवारीं सकाळीं दहा साडे दहाला पोंचले. तेथें त्यांच्या उपाहाराची वगैरे व्यवस्था करण्यांत आली होती. तेथून मोटारनें ते महाडास आले. कर्जतपासून महाडापर्यंतचा त्यांचा मोटारीचा प्रवास फारच मजेचा झाला. महाडला आल्यानंतर तेथें सर्व पाहुणे मंडळींची जेवणाखाणाची सोय करण्यांत आली होती. याच ठिकाणीं पुणें, वाई, सातारा, कऱ्हाड, सांगली, बेळगांव जमखंडी वगैरे बाजूची मंडळी व नागपूर, उमरावती, अकोला, नाशिक, मुंबई,

रत्नागिरी वगैरेकडील मंडळी यांची भेट होणार होती; ह्मणून रायगडच्या मोहिमे-साठीं मुख्य तळ पडण्याचें ठिकाण महाड हें झालें होतें. गुरुवारपासून महाडला येणाऱ्या मोटारींची वाहतुक जोरानें सुरू झाली. शुक्रवारीं तर सर्व महाड शहर मोटार-मय होऊन बसलें होतें. जिकडे तिकडे ठिकठिकाणचे पाहुणेच शहरांत दिसूं लागले. शुक्रवारीं दुपारीं तीन वाजतां राजेसाहेबांनीं व त्याचप्रमाणें प्रमुख राष्ट्रनेत्यांनीं महाड शहर सोडलें आणि रात्रौ सुमारें आठ वाजतां रायगडच्या पायथ्याला कोंझर ह्मणून एक खेडें आहे, तेथें येऊन ही मंडळी पोंचली. या वेळीं राजेसाहेबांच्या बरोबर त्यांचे परम स्नेही डॉ. मुंजे हे होते. त्याचप्रमाणें श्री. पां. गो. रानडे, श्री. वासुदेवराव संगम-कर, वे. शा. सं. ताह्मनकर शास्त्री, रा. रामराव जामदार, रा. व्यंकटराव पुणेकर वगैरे त्यांच्या नेहमींच्या दौऱ्यांतील पंधरा वीस मंडळीही होती, कोंझर गांवापासून रायगडचे चढावाला सुरवात होत असल्यामुळें गडावर न्यावयाचें सामानसुमान येथूनच माणसांच्या डोक्यावर देऊन वर न्यावें लागतें. हें काम करणारीं माणसें येथें मजुरीनें मिळतात. या उत्सवप्रसंगीं परगांवच्या खेड्यांचींही कित्येक माणसें मजुरी करण्याकरितां या कोंझरगांवीं आलीं होतीं. पांढरपेशा लोकांना आपले सामान घेऊन सात आठ मैलांचा चढ चढण्याची सामान्यतः संवय नसल्यामुळें प्रत्येक जण आपलें सामान गडावर नेण्याकरितां निदान एक तरी मजूर करीत असे. या मजूर लोकांच्या समुदायांत वृद्धतरुण स्त्रीपुरुष, मुलें वगैरे सर्वच होतीं. सामा-नाच्या वजनावर आठ आण्यांपासून रुपयापर्यंत मजुरी द्यावी लागे. हीं मजुरीनें लाग-लेलीं गरीब कोंकणीं माणसें अत्यंत प्रामाणिक होतीं. त्यांचे स्वाधीन सामान करून गडावर अमुक एका माणसाला तें सामान नेऊन द्यावयाचें अशी चिट्ठी लिहून त्यांचे स्वाधीन केली, ह्मणजे तें सामान सुरक्षितपणें गडावर मिळत असे. या लोकांचे आंगीं चपळाई असल्यामुळें व गड चढण्याची त्यांना नेहमींची संवय असल्यामुळें हे लोक सामान घेऊनसुद्धां गड फार जलद चढत. त्यांच्या चढउताराच्या दोन दोन खेपा झाल्या, तरी नवशिके पांढरपेशाचे लोक गड चढत असलेलेच त्यांना दिसत !

## राजेसाहेबांना रायगडची सलामी !

कोंझरपासून सुमारें एक मैल चढून गेल्यानंतर पाचाड या नांवाचें एक ठिकाण आहे. या ठिकाणापर्यंत डोंगरांतून सडक नेण्यांत आली आहे; परंतु चढ

फार असल्यामुळें व रस्त्याला वळणेंही बरींच आल्यामुळें तेथपर्यंत मोटार नेणें, त्या वेळीं फार धोक्याचें होतें. ह्मणून कोंझरपासूनच सर्व मंडळी गड चढूं लागली. राजेसाहेबांच्या मोटारवाल्यानें मात्र पाचाडपर्यंत मोटार नेण्याचें धैर्य दाखविलें. रात्रीं सुमारें नऊ वाजण्याचे सुमारास कोंझरपासून पाचाडला जाण्याकरितां त्यांची मोटार निघाली. ती रात्र चैत्र वद्य चतुर्थीची असल्यामुळें नुकताच चंद्रोदय झाला होता. राजेसाहेबांची मोटार हलके हलके रायगडाचा चढ चढूं लागली. त्यांच्याबरोबरची तेवढीच मंडळी त्यांचेबरोबर होती. बाकीची सर्व मंडळी पायींच पुढें हलके हलके निघून गेली होती. राजेसाहेबांची मोटार सुमारें अर्धा मैल गेल्यावर एक मोठा चढ लागला. तेव्हां सर्व मंडळीना घेऊन मोटार लॉरी हा चढ चढणार नाहीं, अशी मोटारड्रायव्हरला शंका आल्यामुळें राजेसाहेबांखेरीज बाकीची मंडळी खालीं उतरली व मोटारीला मागाहून ढकलण्याकरितां जोर देऊन तो चढ ती चढूं लागली. मोटार अर्धाअधिक चढ चढून जात आहे, इतक्यांत एंजीन बंद पडलें व मोटार ब्रेक घातला तरी खालीं घसरूं लागली. मागील लोकांनीं मोटार रेंटून धरण्याची शिकस्त केली. पण व्यर्थ. मोटार माणसांचे जोराला न जुमानतां खालीं घसरत घसरत येऊं लागली. सर्वांना त्या वेळीं वाटलें कीं, आतां मोटार घसरत जाऊन डोंगराच्या उतारावरून खालीं दरींत पडणार. ही कल्पना मागून रेंटीत असलेल्या राजेसाहेबांच्या नोकर मंडळींच्या मनांत येतांच, त्यांनीं आपल्या मालकाच्या प्राणाचें रक्षण करण्याकरितां ' श्रीछत्रपति-शिवाजीमहाराजकी जय ' या नांवाचा जयघोष करून आपली सर्वशक्ति एकवटून लाविली. मोटारीचें एक चाक सुमारें सहाच इंच खालीं येण्याचा अवकाश होता. इतक्यांत सुदैवानें रस्त्यावर पडलेला एक दगड मोटारीच्या मागील चाकाला लागला. त्यामुळें मागील लोकांना मोटार तेथेंच थांबवून धरण्याला नेट पोंचला. हा दगड मोटारीला लागला नसता तर सर्व माणसांसहित राजेसाहेब दरींत कोंसळून पडून त्यांचीं हाडेंसुद्धां सांपडणें शक्य झालें नसतें. एवढा प्रसंग त्या वेळीं राजेसाहेबांवर गुदरला होता ! मोटार दगडाला लागून थोडी थांबतांच मोटारीखालीं राजेसाहेबांनीं उडी टाकली, व आपल्यावरील संकट श्रीशिवरायांनीं टाळलें असें ते ह्मणाले. त्या वेळीं त्यांचे तोंडून सहज उद्गार निघाले कीं, ' आमचेवर आतां जो प्रसंग आला, त्याचें कारण आपण रायगडासारख्या पवित्र स्थानीं श्रीशिवाजीमहाराजांच्या

उत्सवाला पायीं जायचें सोडून मोटारींतून जाऊं लागलों, त्यामुळें आपण श्रीशिवाजीमहाराजांचा अपमान करीत आहोंत, अशी रायगडाला शंका आली; ह्मणून त्यानें आमचा कडेलोट करण्याचा हा प्रयत्न केला; पण श्रीशिवाजीमहाराजांनीं आपलें रक्षण केलें. आतां आपण मोटारींत न बसतां पायींच जाण्याचा संकल्प केला आहे; ' असें ह्मणून ते पायीं जाऊं लागले. रात्रौ सुमारें अकरा वाजतां सर्व मंडळी पाचाड येथें पोंचली. त्या ठिकाणीं राजेसाहेबांना गडावर नेण्याकरितां खुर्चीची व्यवस्था करण्यांत आली होती. ही व्यवस्था ह्मणजे एक चांगली मजबूत खुर्ची घेऊन तिच्या बैठकीखालून सुमारें आठ फूट लांबीचे दोन मजबूत बांबू बांधण्यांत आले होते. खुर्चीवर मनुष्य बसल्यानंतर त्याच्या बोजाप्रमाणें पुढील बाजूस दोन किंवा चार आणि मागील बाजूस दोन किंवा चार अशीं माणसें लागून ते, बांबू खांद्यावर घेऊन, मेणा नेल्याप्रमाणें ती घेऊन जात. राजेसाहेबांची खुर्ची नेण्याकरितां सोळा माणसांची योजना करण्यांत आली होती. हे सोळाही इसम रायगडच्या रस्त्याचे पूर्ण माहितगार व चांगले सशक्त असे होते. डोक्याला रुमालाऐवजीं बांधलेलें लहानसें धोतर, खांद्यावर घोंगडी, नेसावयाला लंगोटी व हातांत वेळूची काठी, एवढाच त्यांचा पोषाख होता. ते लोक बांध्यानें अगदीं सडसडीत पण हाडापरानें चांगलेच मजबूत होते. त्या लोकांना पाहून राजेसाहेबांना अशी शंका आली कीं, आपल्या एका थपडेचाही एकएक मनुष्य नाहीं आणि आपलें स्वतःचें तर जवळ जवळ बंगाली तीन मणाचें ओझें. हें घेऊन हे लोक कसे जातील ? पण शेवटीं त्यांची ही शंका निरर्थक ठरली. राजेसाहेबांचे मनांत गडावर पायींच जावें, असें मनापासून होतें. कारण, वाहनादि सुखोपभोग आपल्या नशिबीं कायमचेच लागले आहेत. पण आपण ज्या अर्थीं रायगडसारख्या पुण्य क्षेत्रीं जात आहोंत त्या अर्थीं पायीं जाण्याचें तेवढेंच पुण्य पदरांत पडेल, अशी त्यांची भावना होती. शिवाय मोटारीचा अपघात होण्याच्या संकटांतून त्यांची नुक्तीच मुक्तता झाल्यामुळें खुर्चीवरही बसून जाणें त्यांना मनापासून नको वाटत होतें. परंतु सर्वांच्याच मनाला राजेसाहेबांचें पायीं जाणें रुचणारें नसल्यामुळें त्यांच्या केवळ आग्रहास्तव ते खुर्चीवर बसले व आठ इसम त्यांना मोठ्या हौसेनें घेऊन रायगड चढूं लागले.

शिवाजीमहाराजांचे अवतार-समाप्तीनंतर थोड्याच वर्षांत रायगडचा वैभवसूर्य अस्ताला गेला. तेव्हांपासून त्याची इतकी अनास्था होत आली आहे कीं,

त्याचे त्या संपत्काळचे राजमार्गदेखील नष्ट झाले आहेत. क्वचित् कोठें कोठें त्यांचे अवशेष मात्र साक्षीभूत दिसत आहेत. त्यामुळें सांप्रत राजेलोकांनासुद्धां तो राजमार्ग पारखा होऊन गडाच्या दुर्गमतेची पूर्ण साक्ष पटविणाऱ्या जंगली मार्गांचें अवलंबन करावें लागत आहे. श्रीमंत राजेसाहेबांना देखील खुर्चीवर बसूनही वाटेच्या अवघडपणाची कल्पना आली. ती वेळ रात्रींची अकरा वाजण्याची होती. तरीपण डोंगरकडा, दऱ्या इत्यादिकांतून जंगली श्वापदांचा आवाज कोठेंच ऐकूं येत नव्हता. चांदणें शुभ्र पडलें असल्यामुळें त्याच्या प्रकाशांत पर्वतांचीं उत्तुंग शिखरें नयनमनोहर दिसत होतीं. त्या शिखरांवर जाऊं पहाणाऱ्या प्रवाशांना तीं गगनभेदीच वाटत होतीं. गडावर जाण्याचा मार्ग टेंकड्यांना वेष्टन घालून जाणारा असल्यामुळें त्याच्या कांहीं भागावर चंद्रम्याचा शीतल प्रकाश व कांहीं भागावर छायेनें पडलेला पूर्ण अंधःकार अशी सुखदुःखमय स्थिति येत गेल्यामुळें प्रत्येक प्रवाशाला भवचक्राची आठवण झाल्याशिवाय राहत नसे. अनेक लहानमोठ्या टेंकड्यांचें वेष्टन रायगडाचे सभोंवार झाल्यामुळें त्याला त्यांचा निसर्गसिद्ध परकोटच बांधला गेला असून त्यामुळें तो विशेषच दुर्गम झाला आहे. एका टेंकडीवरून दुसऱ्या टेंकडीचा मार्ग आक्रमिण्याकरितां चढउताराची मजल प्रत्येकाला घ्यावी लागत होती. त्यामुळें वैभवाच्या उच्च स्थानाला जाण्याचा या संसारमय जगताचा मार्ग हा असाच असावयाचा, याची प्रत्येक प्रवाशाच्या मनाला खात्री पटत होती. कित्येक वर्षेंपर्यंत हा प्रदेश निर्जन होऊन बसल्यामुळें भर दिवसां या मार्गानें गडावर जाणें भीतिप्रद होऊन बसलें होतें. पण त्या दिवशींच्या त्या मध्यरात्रींच्या वेळींही ती भीति कोठें लपून बसलीं होती, तिचा पत्ताच लागण्यासारखा नव्हता. त्या वेळीं रायगडावरील राजमहालाचे स्थानापासून तों गडाखालीं कोंझर गांवापर्यंत माणसांची सारखी रीग लागलेली होती. 'श्रीशिवाजी महाराजकी जय' या एकच नांवाचा जयघोष खालपासून वरपर्यंत त्या सात आठ मैलांच्या टापूंत सारखा होत होता. या जयघोषाचें अनुकरण निर्जीव अशा टेंकड्यांसुद्धां आनंदाच्या भरांत शतपटीनें सारख्या करीत होत्या. अवघड मार्ग चालूनच संपवावा लागतो. तो सुखानें बसून संपतही नाहीं आणि त्याला स्वावलंबनाचीच आवश्यकता असते, याची कल्पना या वेळीं प्रत्येक प्रवाशाला सहज चांगली येत होती. एकच ध्येय पुढें ठेवून चालणाऱ्या लोकांना परस्परांकडून कशी मदत होत असते, याचे अनुभव पहावयाला पदोपदीं मिळत होते. मार्गांत कोणी पाय घसरून पडला,

कोणाला दुखापत झाली, कोणाला अडचणीचे जागेंतून जातां येईनासें झालें, कोणाचा तहानेनें जीव व्याकूळ झाला, कोणाला आपलें ओझें जड झालें, वगैरे येणाऱ्या अडचणी परस्परांची ओळखदेख नसतांनादेखील योग्य मदत मिळून दूर होत होत्या. अस्पृश्यता निवारणाबद्दल मोठमोठ्या सभा भरून व शास्त्राचे निरनिराळे आधार देऊन जें कार्य झालें नाहीं, तें कार्य सहजच त्या ठिकाणीं शुद्ध मनानें होत असलेलें दिसून येत होतें. एकंदरींत एकाच ध्येयानें प्रेरित झालेला लोकसमुदाय विविक्षित मार्गानें आक्रमण करूं लागला ह्मणजे त्याच्या ठिकाणीं धर्ममत्सर, वर्णभेद, जातिकलह, स्पृश्यास्पृश्यता, उचनीचभाव, गरिबीश्रीमंती, लहानथोरवृत्ति, अशिक्षित सुशिक्षित याची कल्पना, वगैरे भेदाभेद पहाण्याची बुद्धिच राहत नाहीं; ही बुद्धि केवळ स्वार्थसाधू आणि स्वतः खरोखर कार्यतत्पर नसतां कार्यतत्पर आपण आहों, असें दाखविणाऱ्या दांभिक लोकांमध्येंच असते, याची जाणीव त्या वेळीं आपोआप प्रत्येकाला होत होती.

## पहाडी दैवतें.

अशा प्रकारचे अनेक अनुभव पदोपदीं घेत आणि श्रीशिवाजीमहाराजांच्या वेळेचे अनेक प्रसंग आठवून त्याच प्रसंगापैकीं त्या रात्रीचा गडावर जाण्याचा आपलाही हा एक प्रसंग आहे, अशा भावनेशीं समरस होऊन प्रत्येक प्रवाशी वाट चालत होता. तो एकंदर देखावा पाहून राजेसाहेबांचे मनांत विचारांचें सारखें काहूर माजलें होतें. शिवाजीमहाराज आपला घोडा अशा अवघड ठिकाणाहून कसा नेत असतील, किंवा त्या वेळीं गडावर जाण्याचा दुसराच मार्ग होता ? हजारों लोकांच्या खाण्यापिण्याचे जिन्नस लोकांच्या डोक्यावरून वाहून नेऊन कसे पुरीं पडत होते ? स्त्रियांना नेण्याकरितां किती पालक्या, मेणे पुरे पडणार होते ? का त्या वेळच्या स्त्रियाही गड सहज चढण्याइतक्या सशक्त होत्या ? श्रीमंत लोकांनासुद्धां गरिबांप्रमाणें पायींच जाण्याची संवय होती ? पायीं जाणाऱ्या लोकांनासुद्धां त्या वेळीं श्रीमंत ह्मणवून घेणें शोभत होतें कीं काय ? वगैरे अनेक विचार त्यांच्या मनांत येत व त्याचें उत्तरही त्यांना आपोआप मिळे. कोंझरगांवापासून गडावर माणसांच्या डोक्यावरून उत्सवाला आलेल्या लोकांचें सामान नेण्याचें काम चाललें होतें, त्या ओझें वहाणाऱ्यांमध्यें कित्येक बायकाही होत्या. त्यांपैकीं बऱ्याच

बायकांचे कडेवर मूल व डोक्यावर ओझें होतें. तें पाहून राजेसाहेबांना धन्यता वाटे व ते त्यांना हात जोडून नमस्कार करीत. आम्ही पुरुषासारखे पुरुष धट्टेकट्टे असून आम्हांला नुसतें चालत जाणें शक्य होत नाहीं, त्या ठिकाणीं या स्त्रियांनीं डोक्यावर ओझीं व कडेवर मुलें घेऊन गडावर चढत जात असतांना आमचेकडे पाहून आमच्याबद्दल कां आदर ठेवावा ? याबद्दल त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. त्यांना या विचारामुळें खुर्चीवर बसवेना. या विचारांच्या ओघाबरोबर त्यांना खुर्चीवरून आपण खालीं घसरतोंच असें वाटूं लागलें. चढ आला कीं आपण मागें कलंडतों व उतार आला म्हणजे तोंडघशीं पडतों, असें त्यांना वाटूं लागलें. खुर्चीवर बसल्यापासून सुमारें अर्धा मैलाच्या आंतच त्यांची तशी स्थिति होऊं लागली. त्या विचाराच्या ओघाचा त्यांच्या मनावर इतका पगडा बसला कीं, त्यांनीं ती खुर्ची खालीं उतरविली आणि आपण पायउतारा झाले. बरोबरच्या मंडळींनीं अनेक कारण दाखवून खुर्चीवरून गड चढून जाण्याचा त्यांना आग्रह पुष्कळच केला. पण आपण ‘ आतां चालतच गडावर जाणार,’ असें त्यांनीं सर्वांना निक्षून सांगितलें. त्यांच्या त्या निश्चयाचे आड कोणालाच इत:पर येतां येण्यासारखें नव्हतें.

## भोंसले राजेसाहेब आणि केळकर तात्यासाहेब.

चालण्याची संवय नसलेल्या मनुष्याला एकादे प्रसंगीं केवळ चालण्याचा नव्हे तर डोंगरी मार्ग चढण्याचा प्रसंग आला, म्हणजे त्याला काय त्रास होतो, तो कांहीं सांगतां पुरवत नाहीं. राजेसाहेबांची या वेळीं मोठी बिकट स्थिति झाली. शिकारीच्या वेळीं जंगलांतून ते हिंडले होते आणि लहानपणींही त्यांनीं पळण्याची संवय केली होती; पण वयाचे पन्नाशीला ती कशी काय उपयोगी पडणार ! शिवाय, सरळ रस्त्यावरून चालण्याची गोष्ट निराळी व डोंगर-कड्यांतून चढउतार करीत चालण्याची गोष्ट वेगळी. त्यांतून मनुष्य सडपातळ असेल तर गोष्ट निराळी; पण ज्याचें शरीर पैलवानी पद्धतीचें वजनदार असेल, त्याला हा चढउताराचा प्रवास म्हणजे एक दिव्यच होय. ‘ श्रीशिवाजीमहाराजांच्या स्मारकाची कामगिरी आपल्या हातून दुसरे दिवशीं होणार, ’ या स्फूर्तिदायक विचारानें राजेसाहेब आपली श्रीमंतीच विसरून गेले होते. चालू लागल्यानंतर सुमारें एक तासाचे आंतच त्यांचे पायाला स्लीपर

लागूं लागला. त्यामुळें तो काढून त्यांना अनवाणीच चालण्याचा प्रसंग आला! रात्रींची वेळ असल्यामुळें सूर्याचें तापाची भीति नव्हती. पण चालण्याच्या परिश्रमामुळें सर्वांगाला घाम फुटूं लागला व आंगावर कपडे ठेवून चालणें त्यांना त्रासाचें वाटूं लागलें. ह्मणून त्यांनीं फेटा व कोट काढून टाकला. अनवाणी चालण्याची त्यांना कधींच संवय नव्हती. त्यामुळें मार्गावरील खडे पायाला रुतूं लागले. पण हे सर्व हालकष्ट मनांत न आणतां श्रीशिवाजीमहाराजांचें नामस्मरण करीत ते उल्हासानें मार्ग काढीत होते. मधून मधून कोणी तरी हिय्या करून त्यांना खुर्चीचा आश्रय घेण्याचा आग्रह करीत. पण "आपण सर्वांनीं चालावें आणि आह्मीं खुर्चीवर बसून जावें, हें शिवाजीमहाराजांना कसें बरें वाटेल? एवढ्याकरतांच आह्मी चालत आहोंत," अशा किंवा या प्रकारच्या उत्तरानें त्या लोकसमाजाला राजेसाहेबांच्या विषयींचा आदर विशेषच वाटूं लागला. सात आठ मैलांचाच प्रवास, पण तो डोंगरांतील चढणीचा व बिकट होता, त्यामुळें सर्व रात्रभर ह्मणजे एकंदर ६।७ तास चालून जावें लागलें. चढतां चढतां थकवा येई, तेव्हां राजेसाहेब थोडी विश्रांति घेत. त्यांच्या बरोबरची मंडळी 'रायगड आतां अगदीं जवळ आला,' असें ह्मणून राजेसाहेबांना धीर देण्याचा प्रयत्न करीत; पण एका पर्वताचें शिखर चढून जावें, तर रायगड न दिसतां दुसऱ्या पर्वताचें शिखरच दिसे; त्या शिखरावर जावें तर तिसरें दिसे; त्यामुळें ही अखंड पर्वतश्रेणी सपंते केव्हां आणि आपण रायगड पहातों केव्हां, असें त्यांना होऊन गेलें. शेवटीं सूर्योदयाबरोबर राजेसाहेबांनीं रायगड गांठला! गडाला पाय लागतांच वाट चालीचे व उभ्या रात्रीचे सर्व श्रम परिहार झाले असें त्यांना वाटलें. गडावर येतांच महोत्सवाचे सेक्रेटरी श्री. न. चिं. केळकर हे स्वागत मंडळाच्या प्रमुख लोकांसह त्यांना सामोरे आले. व त्यांचे गळ्यांत हार घालून त्यांचे हातीं त्यांनीं श्रीफल दिलें. तेथून राजेसाहेबांच्या हस्तें ज्या धर्मशाळेची कोनशीला बसविण्यांत येणार होती, त्या ठिकाणीं त्यांना नेण्यांत आलें. त्या धर्मशाळेचा पाया भरून झालेली जागा त्यांनीं सभोंवार फिरून पाहिली. तेथून ते आपल्या उतरण्याचा नियोजित जागीं येऊन पोंचले.

## रायगडचें नैसर्गिक सौंदर्य.

ही जागा बाह्य दृष्टीनें जितकी दिसण्यांत कुरूप होती तितकीच ती ऐतिहासिक दृष्टीनें महत्वसुंदर होती. शिवाजी महाराजांनीं 'गंगासागर' नांवाचें जें तीर्थ राय-

गडावर बनविलें आहे, त्याला लागून असलेल्या राजमहालाच्या द्वारावरील अवशेष राहिलेली, दोन बाजूंच्या बुरुजांपैकीं एका बुरुजावरील ही एक ओंवरी होती. तिनें गतकालचें वैभव व कला लोपून गेल्यामुळें आपली वार्धक्याची साक्ष देत ती अद्याप जीवंत राहिली होती. रायगडावर चढते वेळीं जसे चढउतार लागतात, त्यांचाच जणुं नकाशा त्या ओंवरीच्या बसण्याचे जागेवर आपोआप निघाल्याप्रमाणें दिसत होता. ही ओंवरी अष्टकोनाकृति असून तिच्या दोन कोंपऱ्यांच्या मध्यभागीं एक एक खिडकी ठेवण्यांत आली असून, ती तिच्या लहान आकारावरूनच ओळखण्यांत येतें. कारण, ती उघडझांक करण्याच्या स्थितींत नसून तिच्या आकाराची भिंतींत पोकळ जागा असलेलीच तेवढी दिसत होती. ह्या खिडक्यांतून शीतल वारा येण्याकरितां पल्लवयुक्त वृक्षांच्या बारीक शाखांचे जाळीदार पडदे लावण्यांत आले होते. या ओंवरींत कित्येक वर्षें वस्ति नसल्यामुळें या उत्सवाला येणाऱ्या शिवभक्तांना कदाचित वस्ति करण्याची भीति वाटेल ह्मणूनच कीं काय, त्या ठिकाणीं भिंतींच्या भोंकांतून चिमण्यांनीं आपलीं घरटीं बांधून वस्ति केली होती व त्या पाहुण्यांचें आगतस्वागत वरचेवर तेथें येऊन करीत होत्या. त्या ‘ चिंव चिंव ’ असें कर्णमधुर गायन करीत. त्यामुळें तेथें उतरलेल्या पाहुण्यांस तो शब्द ‘ चिंव चिंव ’ नसून ‘ शिव शिव ’ ह्मणजे शिवाजीमहाराजांचें तें गाणें असावें असा भास होई. त्या खिडक्यांत बसलें ह्मणजे ‘ गंगासागराचें तीर्थ, ’ खालीं जवळच दिसे. त्या तीर्थांत स्नानाकरितां उतरावयाच्या पूर्वींच्या पायऱ्या सर्व पडून गेल्या असून बाजूच्या बांधकामाचीही कोठेंच साक्ष पटण्यासारखा अवशेष राहिलला नाहीं. तरीपण सध्यांच्या त्याच्या हीन परिस्थितीवरूनही पूर्वींचें त्याचें नयनमनोहर स्वरूप कसें असेल, याची कल्पना येण्यासारखी आहे. हें ‘ गंगासागर ’ निर्माण करण्याचा शिवाजीमहाराजांचा कोणता हेतु होता, हें इतिहासप्रसिद्ध असल्यानें त्याच तीर्थावर राजेसाहेबांनीं स्नान केलें.

## पूर्वज–पूजन व प्रसाद.

रात्रभर गड चढून जाण्याचे श्रम झाल्यामुळें स्नानाचे आधीं राजेसाहेबांनीं चांगलीं तास दोन तास विश्रांति घेतली. नंतर तीर्थावर स्नान करून ते शिवाजीमहाराजांचे छत्रीकडे पूजेकरितां गेले. तेथें त्यांनीं समाधीची यथाविधि वेदमंत्र–पठणपूर्वक पूजा

केली. वे० शा० सं० ताह्मनकर शास्त्री हे पूजा सांगण्याकरितां होतेच. इतर कांहीं ब्राह्मणही होते. त्या ठिकाणीं राजेसाहेबांनीं लघुरुद्राचें उदक सोडलें. राजघराण्यांतील पूर्वापार पद्धतीप्रमाणें त्यांनीं शिवाजीमहाराजांच्या समाधीला उंची वस्त्रांचा अहेर केला. आलेल्या ब्राह्मणांना त्यांनीं दक्षणा दिली व ते गडावर प्रसादाकरितां बसलेल्या पंक्तींतून थोडा वेळ हिंडले. त्या समाराधनेच्या पंक्ती उघडया माळावर उन्हांत बसल्या होत्या. त्या पंक्तींत एका टोंकाला कट्टा कर्मठ ब्राह्मण तर दुसऱ्या टोंकाला मूर्तिमंत अस्पृश्यांचा प्रतिनिधि जेवावयास बसलेला त्यांना दिसला. त्या प्रसंगीं गडावर सुमारें पांच सात हजार लोकांचा समुदाय जमला होता. त्यांत गरीब श्रीमंत सर्व प्रकारचे लोक होते. श्रीमंतांनीं पत्रावळींना चांदिचींच ताटें मानून घेतलीं व केळीच्या द्रोणांना पाणी पिण्याचे पेलेही केले. कोठें कोणाला कांहीं कमी पडलें असें कोणाचेंच मुखचर्येवरून दिसून आलें नाहीं. सर्वच मंडळी मोठ्या आनंदानें व उत्साहानें प्रसाद सेवन करीत होती. त्या पंक्तीचा व भोजनाचा तो थाट पाहून व आदरभाव विसरून आनंदांत भोजन करणाऱ्या त्या ‘ लोकांना स्वस्थ चित्तानें भोजन करा,’ असें सांगून राजेसाहेब स्वत: प्रसाद घेण्याकरितां स्वस्थानीं गेले.

राजेसाहेबांकरितां निराळ्या स्वयंपाकाची वगैरे कांहींच व्यवस्था नव्हती. समाराधनेचा प्रसाद त्यांचेकरितां वाढून आणण्यांत आला होता. तो प्रसाद त्यांना इतका रुचकर, व गोड लागला कीं, रोजचीं त्यांचीं पंचपक्वान्नें त्या प्रसादापुढें त्यांना फिक्कीं वाटलीं. त्यांनीं रात्रीं भोजन केलें नव्हतें आणि त्यांतच चालण्याचे श्रम यथास्थित झालेले त्यामुळें त्यांना भूक उत्तम लागून तो प्रसाद त्यांना अमृतप्राय वाटला. त्या अन्नाला कांहीं विशेष रुचि होती, असें राजेसाहेब प्रसंगोपात् ह्मणत. श्रीशिवाजी महाराजांवरील राजेसाहेबांची भक्ति अढळ होती, तिचेंच हें द्योतक होय.

## धर्मशाळेची कोनशीला.

उत्सवाच्या कार्यक्रमाला दुपारीं बरोबर ४॥ वाजतां सुरवात झाली. गडावर कुलाबा जिल्हा लोकलबोर्डाकडून जी धर्मशाळा बांधली जात होती, तिच्या शेजारीं घातलेल्या भव्य मंडपांत राजेसाहेबांना अध्यक्ष निवडल्यानंतर बोर्डाचे अध्यक्ष श्री. सीतारामपंत टिळक यांनीं प्रास्ताविक भाषण करून धर्मशाळेची कल्पना कशी

निघाली वगैरे हकीकत सांगितली. पूर्व वैभवाचे स्मरणाकरितां शिवाजी महाराजांची छत्री व छत्रीच्या दर्शनाला येणाऱ्या लोकांकरतां धर्मशाळा; अर्थात अशा त्या धर्मशाळेला विशेष महत्व हें असणारच. नंतर त्या धर्मशाळेची कोनशीला बसविण्याकरितां राजेसाहेबांना विनंति करण्यांत आली. त्यांनीं सुंदर चांदीच्या करणीनें चुना घेऊन कोनशीला बसविली. त्या ठिकाणीं राजेसाहेबांनीं समयोचित असें भाषण करून धर्म शाळेला १५१ रुपयांची देणगी दिल्याचें जाहीर केलें.

## राजेसाहेबांचा श्रीशिवरायचरित्रावरील अभिप्राय.

नंतर तेथून सर्व मंडळी राजवाड्यांत आली. राजेसाहेबांनीं शिवाजीमहाराजांचे प्रतिमेपुढें नारळ ठेवून नमस्कार केला. नंतर ती मूर्ति पालखींत घालून छबिन्याची मिरवणूक वाजत गाजत शिवाजीमहाराजांचे छत्रीकडे नेण्यांत आली. या मिरवणुकींत गडावर आलेले पांच सात हजार लोक असल्यामुळें ती फारच मोठी व सर्व गडावर पसरलेली अशी दिसत होती. ही मिरवणूक समाधीजवळ गेल्यानंतर तेथें पालखी उतरण्यांत आली. आणि आरती पदें वगैरे ह्मणण्यांत आली. त्यानंतर तेथून ती मिरवणुक राजवाड्याच्या जागीं उभारलेल्या विस्तीर्ण मंडपांत आली. हीच पुण्यभूमि हिंदपदपादशाहीच्या गादीची होय. सांप्रत चौथरा व त्यापुढील भव्य पटांगण एवढेंच काय तें त्या भव्य ऐश्वर्याची स्मृति जागृत करण्याकरितां कालाचे धक्के सहन करीत जीव धरून राहिलें आहे.

उत्सवाच्या या मुख्य मंडपांत मिरवणुक आल्यानंतर श्री. गोसावी यांनीं राजेसाहेबांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याकरितां विनंति केली. त्यांच्यामागून तीनचार वक्त्यांचीं भाषणें अनुमोदनपर झालीं. नंतर राजेसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें. राजेसाहेबांचें प्रसंगाला योग्य असेंच झालें. भाषणें करण्यांत निरढावलेल्या वक्त्यांनाही त्यांच्या भाषणानें क्षणभर मोहिनी पडली. सुमारें ३०० वर्षांनीं गडावर जमलेल्या समाजाचे मनांत शिवाजी महाराजांच्या काळाविषयीं काय विचार येत असतील, इतिहासाची प्रत्येक गोष्टींत कशी पुनरावृत्ति होऊं शकते, शिवरायासारखा धैर्यशील आणि विवेकी समाजधूरीण व धर्मसंरक्षक लोकोत्तर पुरुष या देशांत निर्माण करण्याविषयीं आज परमेश्वराला प्रार्थना करण्याची वेळ कशी आली आहे,

बालचरित्रापासून शिवाजीमहाराजांनीं आपण मानधन आहों, हें कसें दाखविलें, तरुणपणीं शौर्याबरोबर आपल्या मुत्सद्दीगिरीचें तेज शिवरायांनीं कसें पाडलें, याचें हृदयंगम शब्दचित्र श्रोत्यांच्या मनःपटावर उमटवून 'राजमुकुट—धारण ही धर्म-रक्षण व देशरक्षण याची शपथ व दीक्षा आपण मानतों,' या शिवाजीमहा-राजांच्या उद्गाराची आठवण त्यांनीं आपल्या श्रोत्यांना करून दिली. राज्याभिषे-काच्या प्रसंगीं सर्व देशांतील विद्वान, पंडीत, शास्त्री हजर होते, त्यावरून ब्राह्मणांनीं शिवाजीमहाराजांना शूद्रत्वाची सबब सांगून राज्याभिषेकाला विघ्न केलें, ही गोष्ट कशी खोटी ठरते, महाराजांनीं पतितपरावर्तनाचा धडा बाबाजी निंबाळकराला शुद्ध करून घेऊन स्वतःच कसा घालून दिला, यावरून स्वराज्यस्थापना करावयाची ह्मणजे समाजाच्या सर्वांगिण कल्याणाची तयारी कशी केली पाहिजे, याची जाणीव श्रीशिवरायाला होती, हें त्यांनीं विशद केलें. त्या प्रसंगाचा त्यांच्या मनावर इतका विशेष परिणाम झाला होता कीं, त्यामुळें त्यांचें तें भाषण फारच गंभीर व कळकळीचें झालें. राजेसाहेबांच्या भाषणानंतर कित्येक ठराव सभेपुढें मांडण्यांत आले व त्या ठरावांवर निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें होऊन ते पास झाले.

## ' भवानीचा अहेर. '

शेवटीं राजेसाहेबांचा अध्यक्ष या नात्यानें सन्मान करण्यांत आला. त्यांना हार घालण्यांत आल्यानंतर त्या उत्साहाची त्यांना निरंतर आठवण रहावी ह्मणून उत्सवमंडळानें मुद्दाम तयार करविलेली एक चांदीची तरवार व मानाचा नारळ हीं त्यांना देण्यांत आलीं. ती तरवार स्वीकारतांना राजेसाहेबांना गहिंवरून आलें; व 'त्या दिवसांत तरवारीची देणगी स्वीकारणाराची लाज एक शिवाजीमहाराजच राखूं जाणत,' अशा हृदयस्पर्शी उद्गारांनीं त्यांनीं त्या अपूर्व देणगीचा स्वीकार केला. त्या वेळीं राजेसाहेबांनींही कार्यकारीमंडळाचा गौरव केला. तसें करणें त्यांना योग्यच वाटलें. त्यांनीं श्री. न. चिं केळकर मुख्य चिटणीस व श्री. नारायणराव गुंजाळ मदत चिटणीस यांना उंची वस्त्रांचा अहेर केला. त्या उभयतांनीं सर्व कार्यकारीमंडळ व उत्सवमंडळ यांच्यातर्फे व त्यांच्याकरितां त्या अहेराचा साभार स्वीकार करून त्याचा विनियोग सार्वजनिक कार्याकडे करूं, असें सांगितलें. याप्रमाणें वीरस्मृतीची निरंतर आठवण ठेवणारी अशी ती सभा

मोठ्या उत्साहानें पार पडली. गवई लोकांचें गाणें, कीर्तन, पोवाडे वगैरे कार्यक्रम त्या रात्रभर चालूच होते. राजेसाहेबांनीं पुण्याचे देसाई यांना शिवाजीमहाराजांचा पोवाडा उत्तम करून ह्मणून दाखविल्याबद्दल वीस रुपयांची देणगी दिली.

या उत्सवाला सर्वच प्रकारचे व वर्गाचे लोक आले होते. एका टोंकाला शिवाजी महाराजांच्या प्रत्यक्ष वंशांतील श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब तर दुसऱ्या टोंकाला उत्सवांतील कार्यक्रमांतील व्याख्यान किंवा कीर्तन यांपैकीं एकाही अक्षराचा बोध न होणारा अशिक्षित मावळा असा, चातुवर्ण्यघटित हिंदुधर्म तेथें सामावला होता. ही मंडळी श्रीशिवाजीमहाराजांविषयीं असलेल्या आपल्या शुद्ध भावनेच्या एक सूत्रांत बांधली गेली असल्यामुळें व उत्सवाचे कार्यांत सर्वच समरस झाल्यामुळें उत्सवाला एक प्रकारचें अवर्णनीय महत्व प्राप्त झालें होतें. तसेंच साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी अशा ज्या तत्त्वामुळें मनुष्य या जड सृष्टीवर आपलें वर्चस्व ठेवीत असतो, त्याच तत्त्वाचा दृक्प्रत्यय या उत्सवाच्या प्रसंगीं आला. गालिचे, शालजोड्या, रेशमी व जरतारी वस्त्रें यांनींही या प्रसंगीं रायगडाची धूळभेट घेतली. तहानभूक, ऊन, वारा यांचीही कोणीं पर्वा केली नाहीं. रात्रींच्या प्रसंगीं गडावरील कातळाचा बिछाना, दगडांच्या उशा व झुडपांच्या मच्छरदाण्या करून सर्वांनींच सुषुप्तीचा खरा उपभोग घेतला. यामुळें शिवकालिन स्वातंत्र्यवैभव या मंडळींनीं एक दिवस तरी उपभोगिलें अशी कल्पना केल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं ! अगोदर कष्ट करून नंतर स्वाभाविक होणाऱ्या या आनंदाचा उत्सवाला आलेल्या प्रत्येक मनुष्याला मनमुराद उपभोग घेतां आला. अशा प्रकारचा आनंद पुण्याच्या श्रीमंती शिवस्मारकानें खास होणारा नव्हता व त्या ठिकाणीं राहून या आनंदाची कल्पनाही करतां येण्यासारखी नव्हती.

## रायगडची अखेरची सलामी.

सभेचें मुख्य काम आटोपल्यावर रात्रीं सुमारें दोन वाजल्यापासून आपापल्या सोईप्रमाणें गड उतरण्याचा कांहीं मंडळी उपक्रम करूं लागली. राजेसाहेब मात्र सकाळीं सात वाजतां गड उतरूं लागले. सुमारें अकरा वाजतां गडाखालीं कोंझर गांवीं राजेसाहेब आपल्या बरोबरीच्या सर्व मंडळीसह आले. आधींच राजेसाहेबांना

चढउताराचा प्रवास करण्याची संवय नव्हती. त्यांत तो सात आठ मैलांचा सारखा उताराचा पल्ला; पायाला जोडा लागलेला, त्यामुळें अनवाणी चालावें लागलेलें; भारी वजनाच्या त्या शरीराचा भार सर्वस्वीं पावलांच्या चवड्यांवरच पडलेला; त्यामुळें बारीक दगड रुतून त्यानें तळपायांला फोड आले व ते फुटून त्यांचें कातडेंही निघून गेलें. शरिराच्या भारानें पायांत रक्त उतरलें व त्यामुळें त्यांचे पाय सुजल्याप्रमाणें दिसूं लागले. कोंझरगांवीं पाटलाचे घरीं राजेसाहेबांची उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. त्या ठिकाणीं राजेसाहेब एकदांचे येऊन पोंचले.

पाटलांचें घर ह्मणजे गवताची एक लहानशी चंद्रमौळी झोंपडी होती. या झोंपडीच्या बाहेर आंगण असून त्यावर मंडप घातला होता. त्या मंडपावर झाडाच्या ताज्या बारीक डहाळ्या टाकल्या असल्यामुळें आंगणांत शीतल छाया पडली होती. आंगण सारवून त्यावर रंगवल्ली काढण्यांत आली होती. कोंकणपट्टींतील खेडेगांवच्या घराच्या राहणीच्या पद्धतीला शोभेल व जमेल अशीच पाटलांची पोशाखाची पद्धत होती. लाज राखण्यापुरती लंगोटी, व डोक्याला एक मोठें कसें तरी गुंडाळलेलें लाल पागोटें होतें. हें पागोटें सर्वसाधारण लग्नकार्यापुरतेंच पाटील वापरीत असत. घुंगूर लाविलेला पानसुपारीचा चंचीवजा बटवा त्यांनीं कमरेला आपल्या कटिबंधांत अडकविला होता व खांद्यावर एक काळें कंबल टाकलेलें असून हातांत खांद्याला पोंचेल अशी एक वेळूची काठी होती. नागपूरचे भोंसलेराजे आज आपल्या घरीं पाहुणे ह्मणून येणार यामुळें त्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला होता. पाटलांचे घरीं राजा येणार ह्मणून त्या गांवांतील लहानमोठीं सर्वच माणसें त्यांच्या घराला त्या दिवशीं वेढा देऊन बसलीं होतीं. पाटलांना फक्त शिवाजीराजे यांचेंच नांव माहिती होतें. रायगड हा पूर्वीं शिवाजीराजे यांचे मालकीचा होता, एवढेंच ऐतिहासिक ज्ञान त्यांना होतें. शिवाजीराजांना सर्व लोक ईश्वराप्रमाणें भजतात, तेव्हां राजा ह्मणजे प्रत्यक्ष ईश्वर असतो, एवढीच कल्पना पाटलांना होती. आपल्या घरीं राजा येणार, ह्मणजे ईश्वराचेंच आगमन होणार, या भावनेनें पाटलांना आनंद झाला होता. तेव्हां त्यांचें स्वागत कशा प्रकारें करावें, याची चिंता करण्याचें कारण त्यांना नव्हतें. गणेशचतुर्थीला गणपति घरीं येतो व त्याकरितां जी व्यवस्था पाटील करीत असत, तेवढीच व्यवस्था त्यांनीं करून ठेविली होती. राजेसाहेब त्यांचे घरीं उतरणार

हें पाटलांना सकाळीं आठ वाजतां समजलें होतें. दोन तीन तासांत त्यांनीं मंडप तयार केला. आंगण व घर उत्तम सारवून ठेवून रांगोळ्या घातल्या. आंब्याचे डहाळे मंडपाला चारी बाजूंनीं बांधले. केळीच्या झाडांच्या कमानी केल्या. आंगणाच्या पुढील मोकळ्या जागेवर सडा टाकून सर्व साफ केलें. त्याचप्रमाणें राजेसाहेब दमून येतील, ह्मणून त्यांचे स्नानाकरितां पाणी तापविण्याचें मडकें साफ घांसून व तें ताज्या पाण्यानें भरून चुलीवर, भाताच्या कोंडयाचा विस्तव करून, तापत ठेवलें. राजेसाहेबांना भूक लागली असेल, ह्मणून थोडें दूध व पेज तयार करून ठेवण्याबद्दल त्यांनीं पाटलीणबाईला हुकूम देऊन ठेविला होता. पाटलीणबाईनीं राजेसाहेबांचे स्वागताकरितां आरती करून तयार ठेविली होती.

## राजा व पाटील.

याप्रमाणें तयारी झाल्यानंतर राजेसाहेबांचें आगमन झालें. पाटलीणबाईनीं राजेसाहेबांचे पायावर दूध ओतलें व त्यावर पाणी टाकून लिंबलोण उतरून आरती केली. पाटलांनीं त्यांना झोपडींत नेलें व आपले आंगावरील कांबळें अंथरून त्यावर राजेसाहेबांना मोठ्या आदरानें बसविलें. पाटलीणबाई पुढें उभ्या होत्याच, राजेसाहेबांच्या पायांकडे दूध व पाणी ओततें वेळीं नजर गेलीच होती. पायाचीं सालडीं गेलेलीं व पायांत रक्त उतरलेलें पाहून त्या ह्मणाल्या, ‘ माझ्या राजाला चालन्याचं लई सरम झालं. पायांतनं रगतं निघालीं. राजाचं पाय लोन्यावानी. त्यांनीं चालावं कशा पाय ? ’ असें ह्मणून त्या बाईनें मातीच्या लोटींतील खोबऱ्याचें तेल काढलें व ती राजेसाहेबांपुढें आपल्या दोघी सुनांना बोलावून घेऊन बसली. तिनें राजेसाहेबांचे कपडे उतरविण्यास सांगितलें व पायांना तेल लावून गरम गरम पाणी घालतों, ह्मणजे बरें वाटेल असें आपल्या भाषेनें तिनें कळविलें, ‘ माझे नोकर लोक माझ्याबरोबर आहेत, ते सर्व माझी सेवा करतात. तुह्मी त्रास घेऊं नका. ’ वगैरे नाना प्रकारानें राजेसाहेबांनीं त्या पाटलीणबाईला सांगितलें; पण त्या ऐकेनात. त्यांनीं डोळ्यांत पाणी आणून ह्मटलें ‘ आमच्या राजाची सेवा, आमच्या देवाची सेवा, आह्मांला एक दिवस तरी लाभूं दे. ’ या भाषणानें राजेसाहेबांचेही डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. गरिबीमुळें अंतःकरणांतील शुद्ध भावनेचा प्रेमळ झरा कांहीं आटूं शकत नाहीं. सख्ख्या मायबहिणींच्या हृदयांत आपली स्थिति

पाहून जें दुःख होणार नाहीं, तें या पाटलीणबाईंना झालेलें पाहून त्यांनीं त्यांच्या विनंतीला मान दिला व त्यांचेकडून पायांना तेल लावून घेतलें. त्यांवर गरम पाणी घालून ते चांगले शेकले गेल्यामुळें राजेसाहेबांना चालून झालेल्या परिश्रमांचा परिहार झाला. त्यांनीं नंतर स्नान केलें. पूजा वगैरे आटोपल्यावर त्यांनीं भोजन केलें. सुमारें दोन तास त्यांनीं वामकुक्षि केली व पुन्हां ताजेतवाने होऊन मोटारीच्या पुढील प्रवासाकरितां ते पूर्ववत तयार झाले. या ठिकाणचें अन्नही राजेसाहेबांना अमृताप्रमाणें लागलें. राजेसाहेबांच्या स्वयपाक्यानें उघड्यावर मैदानांत केलेला स्वयंपाक व झऱ्याचें गोड पाणी आणि त्यांतून सकाळपासून झालेले अंगमोडून श्रम यामुळें अन्नाला विशेष गोडी आली असल्यास नवल नाहीं.

## आनंदीआनंद.

तेथून राजेसाहेब रात्रीं महाडला येऊन पोंचले. तेथें रात्रींची वस्ति करून दुसरे दिवशीं कर्जतला आले. तेथून पुण्यावरून ते पंढरीस देवदर्शनाकरतां गेले. तेथून पुण्यास त्यांनीं दोन दिवस मुक्काम केला. त्या अवधींत तेथें त्यांनीं रामयर्डी उदक सोडल्याप्रमाणें ' लघुरुद्र ' मोठ्या थाटानें केला. साठ ब्राह्मण बोलावण्यांत आले होते. ब्राह्मणांना यथायोग्य दक्षणा व सुग्रास भोजन देऊन त्यांची त्यांनीं योग्य संभावना केली. तेथून ते नाशिकाला येऊन सुखरूप पोंचले.

रायगडावरून परत ते महाडाला आले, त्या वेळीं तेथील लोकांनीं त्यांना मानपत्र दिलें. त्याचप्रमाणें ते पंढरपुरला गेले. तेथेंही तेथील प्रतिष्ठित नागरिकांनीं त्यांना मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. हीं दोन्हीही मानपत्रें खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

या उत्सवप्रसंगानें महाराष्ट्राच्या मनांत राजेसाहेबांच्याबद्दल आदर व भक्ति किती उत्कट उत्पन्न झाली, याचें प्रत्यंतर ह्मणजेच हीं मानपत्रें होत.

# महाड येथील मानपत्र.

श्री

## क्षत्रिय कुलावतंस श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले नागपूरकर, यांचे सेवेशीं.

राजेसाहेब,

आह्मी महाडकर नागरिक आपलें अत्यंत प्रेमादरपूर्वक स्वागत करितों. आपण रायगडावर क्षात्रकुलावतंस छत्रपति शिवाजीमहाराजांच्या उत्सवाकरितां जाण्यासाठीं येथें येऊन व आपले भेटीचा लाभ देऊन आह्मांस अत्यंत उपकृत केलें आहे. स्वराज्यसंस्थापक गोब्राह्मणप्रतिपालक श्रीशिवाजीमहाराजांचे वंशज या नात्यानें आपण आह्मांस अत्यंत पूज्य आहांच; परंतु देशकालवर्तमानानुसार आपण स्वधर्मरक्षणाचें व गोब्राह्मणप्रतिपालनाचें कर्तव्य या कालांतही उत्कृष्टपणें बजावीत असल्यामुळें आपल्या विषयींची आमच्या ठिकाणची पूज्यबुद्धि साहजिकच द्विगुणित झाली आहे. रायगडवर चढण्याचें जे परिश्रम आपण घेतले व तेथें काल श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांविषयींची आपली अपूर्वभक्ति आपण प्रगट केली, त्याचेयोगानें बृहन्–महाराष्ट्राचा आपल्याविषयींचा प्रेमादर वाढल्याखेरीज राहणार नाहीं.

हिंदुसंघटन व शुद्धि या धार्मिक चळवळींना पूण पाठिंबा देऊन आपण आपल्या घराण्याचें ब्रीद परिस्थित्यनुरूप उत्कृष्टपणें राखल्याबद्दल आह्मीं आपलें मनःपूर्वक अभिनंदन करितों. परमेश्वर आपणांस उदंड आयुरारोग्य देवो व हिंदवी–स्वराज्य–संस्थापक आणि गोब्राह्मणप्रतिपालक श्रीशिवाजीमहाराजांच्या आशीर्वादानें आपल्या हातून या मातृभूमीचें दैन्य फिटो व उत्तरोत्तर आपला उत्कर्ष होवो, अशी परमेश्वराचे चरणाशीं प्रार्थना आहे.

महाड. ४।४।१९२६ इ.

महाड नगरवासीजन.

# श्रीक्षेत्र पंढरपूर येथील मानपत्र.

॥ ॐ ॥

## धर्मवीर गोब्राह्मण प्रतिपालक
## श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले नागपूरकर
## यांचे सेवेशीं.

आपण ह्या पुण्य क्षेत्रीं आज आल्यानें आह्मांस विशेष आनंद होत आहे. आपण बरेच वेळां ह्या क्षेत्रीं आला असाल, पण ह्या वेळीं आपला विशेष गौरव करावासा वाटतो. ह्याचें कारण श्रीशिवछत्रपतींचे वंशज ह्या नात्यानें आपण रायगड येथील महोत्सव साजरा करून परत येत आहां.

आपल्या ठायीं श्रीसनातत धर्माविषयीं अभिमान वास करीत आहे. व धर्मरक्षणासाठीं आपणावर वाटेल तें संकट आलें तरी त्यास खऱ्या क्षत्रियास शोभेल असें तोंड द्यावयाचें असा आपला योग्य बाणा आहे. ह्याचेंच प्रत्यंतर नागपूर येथील कांकडआरतीचे तंट्याचे वेळीं लोकांना आलें आहे. ह्या आपल्या गुणांबद्दल आह्मांसही मोठा अभिमान वाटत आहे.

हल्लीं बृहन्महाराष्ट्रांत ब्राह्मण—ब्राह्मणेतर वादास जें एक अनिष्ट वळण लागलें आहे व ज्या वळणामुळें धर्मांचे अपरमित नुकसान होत आहे, अशा वादाचें खरें स्वरूप आपण साधेल त्या वेळीं जगापुढें मांडून सदरहू वाद कसा धर्म-घातक आहे, हें आपण जगास पटवून देत आहां.

आपल्यासारख्या शिवछत्रपतींच्या वंशजांकडून सदर चळवळीचें खरें स्वरूपाविष्करण होत आहे, ह्याबद्दल आपणांस कोणीही धर्मप्रेमी माणूस धन्यवादच

देईल. आपल्यासारख्या विभूती जोंपर्यंत ह्या गोष्टींचा विचार करणाऱ्या आहेत, तोंपर्यंत सदर चळवळ फार दिवस मूळ धरून राहील, असें कोणासही वाटण्याचें कारण नाहीं.

आपले धर्माभिमानी श्रीशिवरायांच्या भोंसले कुळाकडूनच महाराष्ट्राचा उद्धार व्हावा, ह्यांतच आह्मां महाराष्ट्रियांस भूषण वाटत आहे. सदर धर्मोद्धारक कार्य आपले हातून सतत होण्यासाठीं आपणांस श्रीपांडुरंगानें दीर्घायुष्य द्यावें, अशी त्याची प्रार्थना करून हें मानपत्र आपण स्वीकारावें, अशी आपणास विनंति करतों.

## आपले नम्र,

पंढरीनाथ गणेश धारूरकर, वकील
गणेश वामन जोशी
रघुनाथ गोविंद जोशी, वकील
मनोहर दाजी जोशी
गोपाळ अनंत अराधणे
वासुदेव रामचंद्र पटवर्धन
दत्तात्रय गोपाळ टेंभुर्णीकर
विष्णु वामन आपटे
गोपाळ पंढरीनाथ देशपांडे
वैद्य गणेशभाऊ मुंबईकर
गोविंद सखाराम बिडकर
गणेश सखाराम अभंगराव
दत्तात्रय दिगंबर पंचाडकर



## प्रकरण १६ वें.

# श्री. पहिले रघोजीराव भोंसले यांची पुण्यतिथि.

नागपूरच्या भोंसले राजघराण्याचे मूळपुरुष व राज्यसंस्थापक कै. वा. श्री. राजे पहिले रघोजीराव भोंसले यांची पुण्यतिथि फाल्गुन शुद्ध ३ शके १८४८ रविवार तारीख ६ माहे मार्च सन १९२७ इ. रोजीं नागपूर येथें पहिल्यानेंच 'राष्ट्रीय उत्सवमंडळातर्फे' सार्वजनिक उत्सवसमारंभानें साजरी करण्यांत आली. आजपर्यंत ही पुण्यतिथि साजरी न होण्याचें कारण पहिले रघोजीराव यांच्या पुण्यतिथीच्या दिवसाचा खात्रीलायख ऐतिहासिक पुरावा सांपडला नव्हता. नागपूरकर भोंसल्यांच्या इतिहासावर बरेंच दिवस श्री. रानडे यांचा व्यासंग चालू होता. त्यांत त्यांना बरीच अनुपलब्ध माहिती मिळाली. श्री. पहिले रघोजीराव भोंसले यांच्या पुण्यतिथीचा नक्की दिवस श्री. रानडे यांना या आपल्या व्यासंगांतच नक्की करतां आला. त्याप्रमाणें उत्सव मंडळानें हा समारंभ साजरा करण्याचें ठरविलें. श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब यांचे सर्वस्वीं पाठबळ या उत्सवाला होतें.

या पुण्यतिथि दिनोत्सवामध्यें नागपूरच्या सर्व नागरिकांनीं भाग घेतला होता. श्री. सर गंगाधरराव चिटणवीस, श्रीमंत यशवंतराव गुजर, श्रीमंत व्यंकटराव गुजर, श्रीमंत दाजीसाहेब बुटी, डॉ. मुंजे, श्री. माधवराव चिटणीस, श्री. बापूसाहेब शिंदे, डॉ. हेडगेवार; श्री. रावसाहेब शिर्के, श्री. शंकरराव खोत, या प्रतिष्ठित नागरिकांच्या सहीनें पुण्यतिथिदिनोत्सवाचीं हस्तपत्रकें काढण्यांत येऊन त्यामध्यें कार्यक्रमही देण्यांत आला होता. सकाळीं काशीबाईच्या मंदिरांत रघूजींच्या छत्रीवर वे. शा. सं. ताम्हनकर शास्त्रिप्रभृति वैदिकांनीं अभिषेक केला. नंतर प्रथम

रघूजींची तसबीरमध्यें ठेवून शेजारीं बसलेल्या राजे, मानकरी, सरदार लोकांच्या फोटोची मिरवणूक निघाली. तींत उभयतां राजेसाहब, घोड्यांवर बसून सरदार मंडळी लव्याजम्यासह सामील होती. शिवाय, दांडपट्ट्याचे व पहिलवानांचे अनेक आखाडे, स्वयंसैनिक दळें, प्रमुख नागरिक व विद्यार्थी वगैरे सर्व जातींची सुमारें १५ हजार मंडळी, अर्धा मैल लांबीच्या मिरवणुकींत चालली होती. ती पांचपावली, गांजाखेत, इतवारी चौक, महाल या वाटेनें नगरभवनांत येऊन पोंचली. वाटेंत ठिकठिकाणीं तसबिरीला हार घालण्यांत आले. तसबिरीची स्थापना टौनहॉलच्या पटांगणांत करण्यांत आली. सर्वांनीं यथाक्रम तसबिरीस मुजरे केल्यावर मिरवणूक संपली.

## मर्दानी खेळांचे सामने.


दुपारीं ३ वाजतां राजे लक्ष्मणराव यांच्या हत्तीखान्यांत १५ आखाड्यांचे मर्दानी सामने झाले. ते पाहण्यासाठीं मोठा समुदाय लोटला होता. कुमार प्रतापसिंह भोंसले ( राजे लक्ष्मणराव यांचे ज्येष्ठ चिरंजीव ) यांनीं हजारों लोकांसमक्ष दांडपट्टा व लाठी खेळून सुरवात केली. कुंवर प्रतापसिंह यांचें वय नऊ वर्षांचें होतें. प्रतापी भोंसले कुळांतील हा बालवीर ज्या वेळीं निर्भय मनानें पट्ट्याची फेंक करूं लागला त्या वेळीं पुष्कळांचे नेत्र कौतुकानें भरून आले. मग प्रत्येक आखाड्यानें आपले कमालीचे खेळ करून दाखविले. श्री० राजे लक्ष्मणराव यांचे हस्तें सर्व वस्तादांची संभावना करण्यांत आली. हें खेळ सायंकाळीं ६ वाजतां आटोपले, नंतर ७ वाजतां टौनहॉलच्या भव्य पटांगणांत तसबिरीच्या सन्निध श्री० राजेबहादूर रघूजीराव भोंसले ( विद्यमान ) यांचे अध्यक्षतेखालीं जाहीरसभा झाली. सुमारें १०–१२ हजार नागरिक हजर होते. प्रथम श्री० रानडे यांनीं प्रथम समारंभासाठीं मुद्दाम रचलेलीं पद्यें भजनभूषण श्री. बापूजी वाईवारांनीं सुस्वर गाऊन दाखविलीं. नंतर स्वागताध्यक्ष सर गंगाधरराव चिटणवीस त्यांचे बंधु सर शंकरराव यांनीं वाचून दाखविलें. नंतर समारंभाचे अध्यक्ष श्रीमंत राजेबहादूर रघोजीराव भोंसले यांचें भाषण झालें. त्याचा सारांश खालीलप्रमाणें:—



श्री० पहिले रघोजी यांची छत्री व तेथील समारंभ.

[K P.Z. P, B.]

पृष्ठें ३४६-३४७.



श्री० पाहिले रघोजी यांच्या पुण्यतिथीची मिरवणूक.

[K. P. Z. P, B.]

पृष्ठ ३४६-३४७.

## श्री० राजेबहादूर रघुजीराव यांचें भाषण.

" सद्गृहस्थहो, आज आपण अध्यक्षपदाचा जो मान मला दिला, तो स्वीकारणें माझें कर्तव्य आहे, ह्मणूनच मी स्वीकारीत आहें. हें स्थान स्वीकारण्याबद्दल, शिसोदिया क्षात्रकुलावतंस शहापुरानरेश यांना राष्ट्रीय उत्सव-मंडळाच्या कार्यकारी मंडळानें विनंति केली होती. परंतु, त्यांना दिल्लीस जरूरीचें काम असल्यामुळें ते येऊं शकले नाहींत. ते आले असते तर या प्रसंगाला आणि या स्थानाला विशेष शोभा आली असती. कै. प्रथम रघोजीराव भोंसले, ज्यांनीं नागपूरकर भोंसल्यांच्या गादीची स्थापना केली, श्रीछत्रपती शिवाजीमहाराज यांचे 'गोब्राह्मण प्रतिपालनाचें' ध्येय आचरणांत आणलें, ज्यांनीं आपल्या प्रजेला वात्सल्यप्रेमानें वागविलें, ज्यांचा स्वतंत्र वातावरणांत कालक्षेप झाला, अशा धर्मवीर पुरुषाच्या पुण्यतिथीला तशाच प्रकारचा अध्यक्ष जर मिळता, तर यापेक्षां कितीतरी पटीनें प्रसंगाला जास्त शोभा आली असती. परंतु 'कर्मणो गहना गतिः'—कालचक्राबरोबर परिस्थितीही बदलत जाते. एवढ्याचकरितां त्याला अनुसरून आपलें कर्तव्य करावें लागत आहे.

## उत्सवांचें स्वरूप व उपयोग.

" पुण्यतिथीचा उत्सव करण्यांत ती पुण्यतिथि ज्या पुरुषाची असेल त्या पुरुषाच्या वेळची जनतेची जी परिस्थिति होती, तशी परिस्थिति सध्यांच्या समाजान निर्माण करण्याच्या प्रयत्नाला लागणें, हा अंतिम हेतु असतो. या दृष्टीनें विचार करतां उत्सव ह्मणजे एक प्रकारचा समाजाकरितां आदर्श तयार करणें होय. आदर्शांत आपण आपलें तोंड पहातों. कांचेच्या आदर्शांत लोकदृष्टीनें आपलें रूप कसें आहे, हें दाखविण्याची शक्ति नसते. परंतु, या समाजादर्शांत लोकप्रियता, आपलें धाडस, आपली कर्तबगारी, आपली विद्वत्ता, या गोष्टी दिसूं शकतात. सामान्यतः सर्वच उत्सवांतून तो ज्या पुरुषाचा उत्सव असेल, त्याचें सर्वसाधारण चरित्र लोकांना समजावून सांगण्याचा परिपाठ असतो. तो पुरुष कशा स्वभावाचा होता, त्या वेळीं कशा प्रकारची परिस्थिति होती, त्यानें लोकसंग्रह करण्याकरितां कोणते प्रयत्न केले, त्याचें राष्ट्रियत्वाचें ध्येय होतें किंवा स्वधर्मरक्षणाचें होतें, त्याच्यावर कोणकोणत्या आपत्ती आल्या,

त्यांतून तो कसा सुटून गेला, त्याचें शरीरसामर्थ्य कशा प्रकारचें होतें वगैरे त्याच्या गुणांचें वर्णन करितात. याशिवाय त्या उत्सवानिमित्त मर्दानी खेळ, कुस्त्या, शर्यती वगैरे करतात, त्या पुरुषाचें स्मारक ह्मणून आखाडे उघडतात, पुतळे उभारतात. अशा पुष्कळ गोष्टी केल्या जातात. त्या त्या पुरुषाच्या गुणाप्रमाणें उत्सवाच्या कार्यक्रमाची पद्धत असते. उत्सवप्रसंगीं त्या त्या व्यक्तींच्या स्वभावाला आणि गुणाला योग्य असा कार्यक्रम जशा स्वरूपाचा होईल त्याप्रमाणें समाज त्याकडे पाहून अनुकरण करण्याचा प्रयत्न करूं लागतो. उत्सवाचें हे आदर्श जर मर्दानी स्वरूपाचे असतील, तर समाजाला आपण सबळ आहोंत किंवा दुर्बळ आहोंत, धैर्यवान आहोंत किंवा भीरू आहोंत, कर्तृत्ववान आहोंत किंवा कर्तव्यशून्य आहोंत हें त्यांत अजमावयाला सांपडेल. या उत्सवादर्शांत आपलीं कांहीं व्यंगें आपणांला दिसलीं, तर तीं आपण खात्रीनें दूर करण्याच्या प्रयत्नाला लागूं.

## हिंदुसमाजाचें कर्तव्य.

" यंदां हा जो प्रथम रघोजीमहाराज यांच्या पुण्यतिथीचा उत्सव सुरू केला आहे, यापासून पुष्कळशा गोष्टी जनतेला घेतां येतील. सध्यां धर्माच्या बाबतींत हिंदु समाज फारच उदासीन आहे. प्रथम रघोजीमहाराज यांच्या वेळच्याप्रमाणें आतां लोकांची धर्मभावना तीव्र राहिलेली नाहीं. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं घालून दिलेल्या ' गोब्राह्मणप्रतिपालकत्वा ' चा कोणी अंतःकरणपूर्वक विचार करीत नाहीं. सामाजिक ध्येय नेहमीं एक असावें, याची पूर्वींची शिकवण आतां कोणीच मनांत ठेवीत नाहीं. पूर्वीप्रमाणें चातुर्वर्ण्य व्यवस्थेला विहित अशीं कर्मे करण्याकडे लोकांचें लक्ष नाहीं. यामुळें हिंदुधर्माचा ऱ्हास होत आहे. आपलेच लोक परकीय धर्मतत्वाचा गोंधळ आपल्या धर्मांत घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. श्रीकृष्णांनीं गीतेंत ह्मटलें आहे कीं, ' श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ' परक्याचा धर्म सुखानें आचरतां आला, तरी त्यापेक्षां आपला धर्म, ह्मणजे चातुर्ण्यविहित कर्म, सदोष असलें तरी तेंच श्रेयस्कर आहे. याप्रमाणें वर्णभेदाला विहित अशीं कर्मे करून ' गोब्राह्मणप्रतिपालकत्व ' हें एकच ध्येय हिंदुलोकांनीं कायम ठेवलें, तरच हिंदुधर्माचा तरणोपाय आहे.

" हिंदुधर्माला पोषक असणाऱ्या एका गोष्टीचें आपल्यामध्यें न्यून असल्याचें दिसून येतें. ती गोष्ट ही कीं. परकीय धर्मांचे लोक हिंदुधर्मावर ज्या वेळीं हल्ला करतात, त्या वेळीं हिंदुधर्माचें रक्षण करण्याकरितां शरीरसामर्थ्याची अत्यंत जरूरी असते. परंतु सध्यांचा समाज शरीरसामर्थ्याचे बाबतींत अत्यंत मागसलेला आहे. तो जर व्यवस्थित रीतीनें सुधारला जाईल, तर हिंदुधर्मरक्षणाचें बरेंच मोठें कार्य होईल. याकडे येथील हिंदुसभेनें विशेष लक्ष पुरविल्यास सुलभ रीतीनें आणि लवकर, कार्य होईल.

## इतिहास–संशोधनाची आवश्यकता.

ही जी पुण्यतिथि यंदां येथें सुरू झाली, ती कदाचित यापूर्वींही झाली असती. परंतु आमच्या ऐतिहासिक ज्ञानाकडील दुर्लक्षामुळें प्रथम रघोजीमहाराज यांची निश्चयात्मक पुण्यतिथि मिळाली नाहीं व त्यामुळें हा उत्सव इतके दिवस लांबणीवर पडला. यंदां हा उत्सव निश्चयात्मक तिथि मिळाल्यामुळें ' राष्ट्रीय-उत्सव '-मंडळीनें पुढाकार घेऊन साजरा केला. ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. या उत्सवाचे सुरवातीनें इतिहास-संशोधनाकडे समाजाचें लक्ष वेधलें जाईल व त्यामुळें नागपूरकर भोंसल्यांचा व त्यांच्या पदरीं असलेल्या गुजर, मोहिते, अहेरराव, शिर्के, पालकर, महाडीक, सुर्वे, घाटगे, कदम, करांडे, घाटमाथे वगैरे घराण्यांचा आणि चिटणवीस, चितळे, उपाध्ये, काळू, काळीकर, कप्तान, जामदार, वगैरे मंडळींचा अज्ञानांत असलेला इतिहास प्रसिद्धीस आणण्याची जरूरी वाटूं लागेल. आणि हें सर्व कार्य पुण्यतिथीचा उत्सव सुरू करण्यानें होईल, असें मला वाटतें. तसें झाल्यास त्याचें सर्व श्रेय राष्ट्रीय-उत्सव-मंडळाच्या कार्यकारी मंडळाकडे राहील, यांत संशय नाहीं. या पुण्यतिथीचा सर्व खर्च आह्मींच करून आमच्या तर्फेनें ही पुण्यतिथि जर साजरी केली असती तर, या सार्वजनिक स्वरूपानें केलेल्या पुण्यतिथीएवढी मजा किंवा लोकांचा एवढा उत्साह दिसून आला नसता. कोणतेही सार्वजनिक स्वरुपाचे उत्सव विशेष परिणामकारक होत असतात.

शेवटीं, येथील सन्माननीय नागरिकांनीं भोंसले घराण्यावरील पूर्वींचें प्रेम आणि भक्ति हीं जागृत ठेवून हा पुण्यतिथीचा उत्सव सुरू केला व ह्या समारंभाचे

अध्यक्षस्थान देऊन माझ्याबद्दलहि आदर दाखविला याबद्दल मी सर्वांचे आभार मानतों. आणि यापुढें आपण माझ्याकडून अशीच समाजसेवा घ्यावी, असें मी इच्छितों. ''

यानंतर युवराज प्रतापसिंह यांनीं आपलें भाषण वाचून दाखविलें. तेंही लोकांनीं मोठ्या कौतुकानें ऐकिलें.

## कुमार प्रतापसिंह यांचें भाषण.

" आज आपण आपल्या नागपूरच्या गादीचे संस्थापक कै. पहिले रघोजी महाराज भोंसले यांच्या पुण्यतिथीचा दिवस साजरा करण्याकरतां जमलों आहोंत, याबद्दल मला आनंद वाटतो. या पुण्यतिथीच्या निमित्तानें मला पुष्कळच नवीन गोष्टी समजल्या. पहिले रघोजी माझ्याच पूर्वजांपैकीं होते, रामटेकचे देऊळ त्यांनींच बांधलें, बंगाल्यावर त्यांनीं चार स्वाऱ्या केल्या, कर्नाटकावरही त्यांनीं दोन स्वाऱ्या केल्या. त्यांच्याजवळ चाळीस हजार घोडेस्वार होते, पंचवीस हजार पायदळ होतें. ते साताऱ्च्या छत्रपतींचे सेनासाहेबसुभा होते. वगैरे ऐतिहासिक माहिती या पुण्यतिथीच्या निमित्तानें मला मिळाली.

## राजा उन्हांतून कां हिंडतो ?

या पुण्यातिथीकरतां आमच्या वाड्यांत पहिल्या रघोजी महाराजांची तसबीर एक चितारी आमच्या तीर्थरूपांच्या देखरेखीखालीं रंगवित होता. मी फावल्या वेळीं तो ती कशी रंगवितो, तें पहात असें. त्या तसबिरींत पहिले रघोजी महाराज घोड्यावर बसून चालले आहेत, कांहीं लोक पायीं चालले आहेत, कांहीं घोडेस्वार मागाहून येत आहेत, असा देखावा आहे. तो पाहून मी आमच्या घरच्या मास्तरांना विचारलें कीं, हे रघोजी महाराज एवढे मोठे राजे होते, असें तुह्मी ह्मणतां; मग तें असें उन्हांतून घोड्यावर बसून कां जातात ? आह्मी जातों त्याप्रमाणें ते मोटारींतून कां जात नव्हते ? तेंव्हां मास्तर ह्मणाले, " ते पूर्वीचे उन्हांतून घोड्यांवर बसून जाणारे राजे झाडांवरून उडणाऱ्या राघूप्रमाणें होते आणि सध्यांचे मोटारींतून हिंडणारे सर्व राजे घरांतल्या सोन्याच्या

पिंजऱ्यांत कोंडून ठेवलेल्या राघूप्रमाणें आहेत." ( टाळ्या ) या मास्तरांच्या उत्तराचा अर्थ मला मुळींच समजला नाहीं, असें मी त्यांना सांगितलें. तेव्हां ते ह्मणाले, 'याचा अर्थ तूं वयांत आलास ह्मणजे तुला आपोआप समजेल.' असो. या पुण्यतिथीच्या निमित्तानें आह्मां मुलांनासुद्धां पुष्कळ नवीन नवीन गोष्टी समजल्या. या सर्व गोष्टींचें खरें श्रेय येथील सन्माननीय नागरिकांनाच आहे."

यानंतर श्री. यशवंतराव मोहिते यांचा 'ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव' या विषयावर लिहिलेला निबंध त्यांनीं वाचला. श्री. पां. गो. रानडे यांनीं लिहिलेला 'नागपूरकर भोंसल्यांचा कुलवृत्तांत' वेळेच्या अभावीं अंशतः वाचून दाखविण्यांत आला. नंतर वऱ्हाडांतील प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्रीयुत यादवराव काळे, 'वऱ्हाडचा इतिहास' या पुस्तकाचे कर्ते, यांचें 'नागपूरकर भोंसले' या विषयावर सुंदर भाषण झालें. आपण नागपूरकर भोंसले घराण्याचा इतिहास लिहिण्याच्या खटपटींत असून आपल्या देखरेखीखालीं नुकतेंच तरुण व उत्साही संशोधकांचें एक मंडळ नागपुरांत स्थापन झालें आहे; त्यांना राजे, मानकरी, सरदार व जुन्या घराण्यांतील नागरिक यांच्यापाशीं असलेले कागदपत्र वगैरे पाहण्यास देऊन सर्वांनीं मदत करावी, अशी श्री. काळे यांनीं सर्वांस विनंति केली. शेवटीं अध्यक्षांतर्फे राजे लक्ष्मणराव यांनीं समारोप केला व डॉ० परांजपे यांनीं सर्वांचे आभार मानले. नंतर पानसुपारी हारतुरे होऊन सभा संपली. रात्रीं १०॥ वाजतां नागपूरचे श्री० सदाशिवराव शाहीर यांनीं स्वतः मुद्दाम तयार केलेला प्रथम रघूजींचा पोवाडा उत्तम प्रकारें गाऊन दाखविला. नंतर कवि टेकाडे यांनीं आपलें 'तारितों महाराष्ट्राला' हें पद्य ह्मणून दाखविलें. श्री. दळवी यांनीं उपसंहार केल्यावर रात्रीं १ वाजतां हा सभारंभ आटोपला.

याप्रमाणें सकाळपासून तों रात्रींचे एक वाजेपर्यंतचा काळ नागपूरच्या नागरिकांना पूर्वज वीरस्मृतीचा गेला. राजेसाहेबांनीं जे अनेक नवीन उपक्रम सुरू केले, त्यांपैकींच हा एक मासला आहे.

# प्रकरण १७ वें.

# युवराजांचें शिक्षण

श्रीमंत कुंवर प्रतापसिंह यांच्या शिक्षणाबद्दल राजेसाहेबांनीं स्वतः फारच काळजी घेतली. आपल्याप्रमाणेंच शाळें-तील शिक्षणाकरितां त्यांनीं शिक्षक-वर्गाची योजना केली होती. प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणाकरितां नागपूरच्या सुप्रसिद्ध सोमलवार हायस्कूलमध्यें त्यांना घालण्यांत आलें. तेथूनच ते पुढें इ० स० १९३३ मध्यें पंजाब युनिव्हरसिटीच्या मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला बसले.

याप्रमाणें शाळाखात्यांतील शिक्षणाची त्यांनीं एकमार्गी जरी व्यवस्था लावली होती, तरी आपल्या भोंसले घराण्यांतील क्षत्रिय शिक्षण त्यांना निरनिराळ्या वस्तादां-करवीं देण्याचा त्यांचा उपक्रम चालू होता. दांडपट्टा, फरीगदगा, लाठी, बोथाटी, घोड्यावर बसणें, कुस्ती यांचें शिक्षणही त्यांना चालू होतेंच. राजेसाहेब युवराजांना पहांटे चार वाजतां उठवून त्यांची दौड व कसरत घेत असत. त्याचप्रमाणें धार्मिक कामाकडेही त्यांचें लक्ष लागावें म्हणून त्यांचा व्रतबंध झाल्यानंतर त्यांना संध्या, पूजा वगैरे शिकविण्याकरितां स्वतंत्र वैदिक ब्राम्हणाची योजना करण्यांत आली होती. राजेसाहेबांचें स्वतः देवधर्माकडे फार लक्ष असल्यामुळें मुलांनींही तसेंच झालें पाहिजे असें त्यांना वाटे. युवराजांबरोबर ज्या दुसऱ्या क्षत्रिय मराठ्यांच्या मुंजी झाल्या, त्यांनाही संध्या पाठ यावी व त्यांचें कोठें आडूं नये म्हणून राजेसाहेबांनीं ' क्षत्रिय-आन्हिककर्मविधि ' ही पोथी त्यांच्याकरितां व नागपूरच्या क्षत्रिय मराठ्यांकरितां छापून प्रसिद्ध केली. या पोथीवरून युवराजांना त्यांचे गुरुजी संथा देत असत. महाराष्ट्रांत क्षत्रिय मराठ्यांना व्रतबंधाचे वेळीं जो गायत्रीमंत्र देण्यांत येतो, तो क्षत्रिय गायत्री मंत्र नसून दुसराच असतो. परंतु नागपूरकर भोंसल्याचें घराण्यांत उदेपूरच्या क्षत्रिय घराण्याप्रमाणेंच क्षत्रिय गायत्री मंत्र देण्याचा परिपाठ आहे. हा मंत्र ब्रह्मगायत्री



श्रीमंत कुंवर प्रतापसिंह भोंसले.

(क.फो.झि.प्रे बे)

पृष्ठें २५२-२५३

श्रीमंत कुंवर बालवीर प्रतापसिंह भोंसले.



[ टोपी घालून पुढें दांडपट्टा हातांत घेतलेले ]
यांनी श्री. पहिले रघोजी भोंसले यांच्या पुण्यतिथीच्या
दिवशीं दांडपट्ट्याच्या सुंदर फेका करून दाखविल्या
(पृष्ठ ३४६)

पृष्ठें ३५२-३५३.

K.P.Z.P.B.

मंत्रापेक्षां बराच मोठा आहे. ही संध्या गुरुमुखानें स्वरासहित शिकण्याकरितां युवराजांना राजेसाहेबांची सक्त ताकीद असे. रोज स्नान, संध्या, जप केल्याशिवाय तोंडांत पाणी घालावयाचें नाहीं, हें नागपूरकर भोंसले घराण्याचें व्रत राजेसाहेबांनीं युवराजांना आचारावयाला शिकविलें. युवराजांचा व्रतबंध झाल्यावर भोंसले घराण्यांतील कुलाचारही ते त्यांचेकडूनच क्रमाक्रमानें करवून घेऊं लागले.

लहानपणीं युवराजांना रात्रीं झोंपण्याचे वेळीं गोष्टी ऐकण्याचा मोठा नाद असे. रोज रात्रीं नवीन गोष्ट ऐकल्याशिवाय त्यांना झोंप येत नसे. तेव्हां त्यांना इतिहासपुराणांचें सहज ज्ञान होण्याकरितां त्यांचे शिक्षक त्यांना त्यांतील गोष्टी सांगत असत. 'युद्धस्य कथा रम्या.' इतिहासपुराणांतील गोष्टी बहुतेक लढायांच्याच असल्यामुळें त्या युवराजांना मनापासून आवडत. कित्येक वेळां राजेसाहेबही त्यांना गोष्टी सांगत असत. राजेसाहेबांच्या गोष्टींमध्यें नेहमींच सुंदर तात्पर्यार्थ असे. त्यांच्या गोष्टींपैकीं येथें एकच गोष्ट विशेष उद्बोधक अशी देत आहों. या गोष्टीवरून युवराजांनीं कशा प्रकारचें तयार व्हावें, अशी राजेसाहेबांची अपेक्षा होती, याची कल्पना लक्षांत येईल.

## धर्मजागृति.

एका डोंगराळ प्रदेशांत एक धनगर राहत असे. त्याच्याजवळ बऱ्याच मेंढ्या होत्या. तो त्या मेंढ्या रोज चारण्याकरितां जंगलांत नेत असे. वाघ, लांडगे यांपासून मेंढ्यांना बराच त्रास होई; ह्मणून त्यानें मेंढ्यांच्या रक्षणाकरितां पांच पंचेवीस कुत्रे पाळले होते. तरीसुद्धां मेंढ्यांचें जसें रक्षण व्हावें, तसें होईना, ह्मणून तो नेहेमीं काळजींत असे. पुढें एके दिवशीं एक वाघीण पिलें घालीत जात असतांना त्या धनगराला दिसली. वाघीण एके ठिकाणीं बसून पिलें घालीत नाहीं. तिला प्रसूतिवेदना होऊं लागल्या, ह्मणजे ती पळूं लागते आणि पळतां पळतांच ती प्रसूत होत जाते. त्यामुळें एक पोर एके जागीं तर दुसरें पोर दुसऱ्या जागीं असें पडतें. प्रसूत होऊन सर्व पोरें पडलीं ह्मणजे ती मागें फिरते. पडलेल्या जागेवरून जें पोर उठून चालूं लागलें असेल, तें जगांत 'वाघ' या जातींत जन्माला येऊन जगण्याला लायक आहे, असें समजून ती वाघीण त्या पिलाला तोंडांत धरून आपल्या गुहेंत नेऊन

ठेवते; आणि जें पोर पडलेल्या ठिकाणींच बसून राहिलेलें तिला दिसेल, तें पोर जरी वाघाच्या जातींत जन्माला आलें असलें, तरी तें ' वाघाच्या ' जाति-धर्माला अयोग्य आहे, व असें पोर जीवंत असून मेल्याप्रमाणें आपलें जीवित कंठित राहून ' वाघाच्या जातीला ' काळिमा आणण्यापेक्षां तें मेलेलें बरें, असें त्या वाघिणीला वाटतें. तें अशक्त पोर पुढें जंगलांतील हलक्या दर्जाच्या जनावरांकडून मारलें गेल्यास आपल्या ' वाघाच्या जातीला ' काळिमा लागेल, या तीव्र कल्पनेनें ती, त्या पोराची आई, आपली सर्व माया विसरून जाऊन भयंकर दिव्य करण्याला तयार होते. ती आपल्या जाति—धर्माचा दर्जा कायम ठेवण्याकरितां त्या पोराला आपणच खाऊन टाकते. त्या धन-गरानें मोठ्या युक्तीनें त्यांपैकीं एक पिलूं उचलून घेऊन आपल्या घरीं आणलें.

त्या धनगरानें त्या वाघाच्या पिलाला मेंढीचें दूध पाजून मोठ्या काळजीनें वाढविलें. याप्रमाणें तें मेंढ्यांच्या कळपांत त्यांचें दूध पिऊन क्रमाक्रमानें वाढूं लागलें. कालांतरानें तें आपल्या पूर्ण वाढीला येऊन पुढें तो मोठा पट्टेदार वाघ दिसूं लागला. तो धनगर त्या वाघाला रोज मेंढ्यांचे कळपांतून जंगलांत नेत असे. तो वाघ त्या मेंढयांच्या कळपांतून हिंडे व त्यामुळें जंगलांतील वाघ किंवा लांडगे मेंढ्यांच्या वाटेला जाईनातसे झाले. आपण वाढविलेला वाघ आपल्या मेंढ्यांचें उत्तम प्रकारें रक्षण करितो, आणि त्यामुळें आतां कुत्र्यांचेंही काम राहिलें नाहीं, असें पाहून त्या धनगरालाही आनंद झाला. अशाप्रकारें त्या धनगराचे दिवस निर्भयपणें आनंदांत जाऊं लागले.

पुढें एके दिवशीं दुपारीं मेंढ्या आनंदानें चरत होत्या. धनगर एका झाडाच्या शीतल छायेखालीं निर्भयपणानें झोंपी गेला होता. इतक्यांत एका झुडपामधून एक मोठा वाघ बाहेर निघाला. त्यानें मेंढ्या चरत असतांना पाहिलें व आपणाला मुबलक खाद्य आहे, असें पाहून तो त्यांवर हल्ला करूं लागला. तेव्हां मेंढ्यांच्या रक्षणाकरितां फिरत असलेल्या धनगराच्या वाघानें त्या जंगली वाघाला पाहिलें व तो त्याच्या आंगावर धांवून गेला; आणि ह्मणाला, ' खबरदार, या माझ्या मेंढयांना त्रास देशील,

तर तुला ठारच मारून टाकीन. ' हें त्याचें भाषण ऐकून तो जंगली वाघ विस्मय–चकित झाला; आणि मनांत ह्मणाला, ' हा वाघ तर माझ्या जातीचा, माझ्या धर्माचा दिसतो. हा मेंढ्यांना मारून खाण्या- ऐवजीं त्यांचें रक्षण करितो आहे; हें काय गौडबंगाल असावें ! याला याच्या जाति–धर्माची विस्मृति पडलेली दिसते. ' असा आपल्या मनांत विचार करून तो जंगली वाघ त्या धनगराच्या वाघाला ह्मणाला, ' का रे गड्या, तुझी जात कोणती ? ' तेव्हां तो ह्मणाला, ' माझी जात कोणती ह्मणजे ! मी मेंढा आहें, हें तुला दिसत नाहीं वाटतें ? ' हें त्याचें उत्तर ऐकून त्या जंगली वाघाची खात्री झाली कीं, ' या वाघाला आपल्या जाति–धर्माची विस्मृति पडली आहे, आणि ह्मणूनच हा आपल्या कर्तव्य-कर्माला पारखा झाला आहे. '

नंतर त्यानें त्याला एका स्वच्छ पाण्याच्या झऱ्यावर नेलें; आणि ह्मणाला, ' तुला या पाण्यांत तुझें स्वरूप कसें दिसतें तें पहा. त्या मेंढ्यांप्रमाणें तुझें स्वरूप तुला दिसतें, का माझ्याप्रमाणें दिसतें, तें मला सांग. ' त्या धनग-राच्या वाघाला त्याचें प्रतिबिंब पाण्यांत स्वच्छ दिसलें. तें पाहून तो ह्मणाला, माझें स्वरूप मेंढ्यांप्रमाणें बिलकुल दिसत नाहीं. तें अगदीं तुझ्याप्रमाणें दिसतें आहे. ' वाघ वीरश्रीची गर्जना जमिनीला तोंड लावून करीत असतो. त्याप्रमाणें त्या जंगली वाघानें एक मोठी डरकाळी फोडली; आणि त्या वाघाला ह्मणाला, ' माझ्याप्रमाणें तूंही गर्जना कर पाहूं. ' नंतर त्या वाघानेंही तशीच डरकाळी फोडली. तेव्हां तो जंगली वाघ म्हणाला, ' मित्रा, तुलाही ' माझ्याप्रमाणेंच गर्जना करतां येते. आतां तूंच पहा. तुझें स्वरूप मेंढ्यां-प्रमाणें नाहीं, तुझा आवाजही त्यांच्यासारखा नाहीं. तुझ्या पायांना शस्त्रा-प्रमाणें तीक्ष्ण नखें परमेश्वरानें तुला दिलीं आहेत. तशीं कांहीं मेंढ्यांच्या पायांना दिलीं नाहींत. तुझ्या दाढा कृतांतकाळाप्रमाणें आहेत. तशा मेंढ्यांना कोठें आहेत ? असें असतां, निःशस्त्र, दीन, दुबळी अशी जी मेंढ्यांची जात, त्यांत तूं शिरून आपल्या पराक्रमी जातीचें कां हंसें करून घेतोस ? ' तेव्हां तो धनगराचा वाघ ह्मणाला, ' मी जर मेंढा नव्हें, तर माझी जात तरी कोणती ? ' तेव्हां तो जंगली वाघ ह्मणाला, ' तूं जातीचा

अस्सल शेर आहेस. तुझें नांव ऐकिल्याबरोबर सर्व जनावरांनीं भिऊन पळालें पाहिजे. तुझा क्षत्रियधर्म आहे. तुला तुझ्या धर्माप्रमाणें मेलेलें अन्न खाण्याचा प्रतिबंध आहे. तूं तुझ्या शौर्यानें शिकार मिळवूनच आपली उपजीविका केली पाहिजे. क्षत्रिय जातीच्या वाघांनीं किंवा सिंहांनीं मेंढयां-प्रमाणें आपण आहोंत असें मानून घेणें ह्मणजे आपल्या जाति–धर्माला बट्टा लावण्यासारखें आहे.' हें त्या जंगली वाघाचें भाषण ऐकतांच त्या धनगराच्या वाघाच्या आंगांत जाति–धर्माचें तेज झळकूं लागलें. त्या धनगरानें आपल्याला आपल्या जाति–धर्माच्या अज्ञानांत ठेवल्याबद्दल त्या वाघाला अतिशय संताप आला; आणि त्या संतापाच्या भरांत त्या दोन्ही वाघांनीं त्या मेंढयांवर हल्ला चढवून तीं फस्त करून टाकिलीं. तात्पर्य एवढेंच कीं, जाति–धर्माचें सत्य स्वरूप समजणें, हेंच प्राणिमात्राचें खरें अस्तित्व प्रकट करणारें साधन आहे. हें साधन ह्मणजे इतिहासाचें खरें ज्ञान होणें, हें होय.

अशा प्रकारच्या उद्बोधक गोष्टी राजेसाहेब युवराजांना नेहमीं सांगत. आपला क्षत्रिय बाणा कायम राहण्याकरितां खऱ्या इतिहासाचें ज्ञान आपल्या मुलांना पाहिजे, असें त्यांना नेहेमीं वाटे; ह्मणून असे प्रसंग नेहेमीं जुळवून आणण्याचे ते प्रयत्न करीत असत. पहिले रघोजी भोंसले यांची पुण्यतिथि नागपुरीं सुरू करण्यांतही त्यांचा हाच हेतु होता. श्रीछत्रपति शिवाजीमहाराज, तानाजी, रघोजी, झांशीच्या लक्ष्मीबाई वगैरे शूर, वीर आणि रणधीर अशांचे पोवाडे युवराजांना राजेसाहेब नेहेमीं ऐकवीत, याचेंही कारण हेंच होतें. त्याचप्रमाणें युवराजांचा वाढदिवस दरवर्षी मोठ्या थाटानें करण्यांत येत असे. त्यांचें उपनयन झाल्यानंतर तर त्याला विशेष महत्व आलें होतें. त्यांचे वाढदिवशीं राजवाड्यांत दरबार भरत असे. त्या दरबारांत युवराजांना इतर अहेरांबरोबर प्रसंगपरत्वें ऐतिहासिक अगर सामाजिक विषयांचें ज्ञान होण्याकरितां काव्यात्मक अहेर करण्यांत येई. त्या काव्यात्मक अहेरांमध्यें 'नागपूरकर भोंसल्यांची वंशावळ' आर्यावृत्तांत रचून ती युवराजांच्या बाराव्या वाढदिवशीं इ. स. १९३० मध्यें अहेर ह्मणून करण्यांत आली. ही वंशावळ सूर्यवंशांतील श्रीरामचंद्रांपासून पंचाहत्तरावे पुरुष जे लक्ष्मणसिंह झाले, यांचेपासून युवराजांच्या पिढीपर्यंत दाखविली गेली आहे. ती पुढीलप्रमाणें:—

॥ श्रीराम प्रसन्न ॥

* गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रिय कुलावतंस

# नागपूरकर भोंसले राजे यांचा वंशवृक्ष.

श्रीधर–पद्–कमलावर ठेवुनि निज उत्तमांग करिं नमन ॥
मंदमती या कविला द्यावी प्रतिभा करावया कवन ॥१॥
तरु हा साररुपानें वंशाचा भोंसले कुळाचा हो ॥
क्षत्रीय सूर्यवंशी देतों स्मरणांत नित्य हा राहो ॥२॥
त्रिअधिकदश वर्षारंभीं राजे प्रतापसिंहांना ॥
यत्न करी सांगाया त्यांच्या त्या पूर्वपुरुषसिंहांना ॥ ३ ॥
कुल जें रघुवंशाचें शोभविलें रामचंद्र राजांनीं ॥
लागें पाउणशत पिढि लक्ष्मणसिंह † त्याजपासोनी ॥४॥
वदती सिसोदिया ते राणे ज्यां राज्यपद गड चितोड ॥
तन्मय क्षत्रिय कर्मीं धर्माचीही असे तयां जोड ॥५॥
सज्जन दिलीप सिंहजि भोंसाजी देवराज जे पुढतीं ॥

---

* या आर्यांतील पहिलें अक्षर वाचलें ह्मणजे पुढीलप्रमाणें मजकूर असलेला लक्षांत येईल. 'श्रीमंत क्षत्रिय कुलावतंस बालवीर प्रतापसिंह राजे भोंसले नागपूरकर यांचे बारावे वाढदिवसप्रसंगकालीं पां० गो० रानडे यांनीं केलेला काव्यमय शुभचिंतनरूपी कुसुमहार त्यांस सप्रेम नजर करितो; स्वीकार व्हावा अशी आशा.'

† महाराणा लक्ष्मणसिंग यांचेपासून कितवी पिढी याचा द्योतक आं क ड

बाहेर ते चितोडा त्यागुनि निघती सुराज गादी ती ॥६॥
लवकर दक्षिण भार्गी भोंसावत आडनांव लावोनी ॥ .
वीर पुढें ते आले, उदयाला भोंसलेच नांवांनीं ॥७॥
रणवीर इंद्र[८]सेनजि शुभकृष्णजि[९] रूपसिंह[९] भूमिंद्र[१०] ॥
प्रद्योत धापजी[११] ते होती तेव्हां जसा असे चंद्र ॥८॥
तारी बरहट[१२] वंशा पुढतीं खेलोजि[१३] कर्ण[१४] संभाजी[१५] ॥
परिमल कीर्ती पसरे होतां त्यांना सुपुत्रद्वय गाजी ॥९॥
सिंहासमान असती बाबाजी[१६] थोर बाळ परसोजी[१६] ॥
हल्लीं त्यांच्या शाखा सातारा नागपूर ऐशा जी ॥१०॥
राहति हिंगणि गांवीं हिंगाणिकर नांव त्यांस तें ह्मणुनी ॥
जे जे परक्या गांवीं जाती, वदती तशाच नावांनीं ॥११॥
भोळे बाबाजी ते त्यांना मालो[१७] शहा[१८] शिवाजी[१९] हो ॥
सत्पुत्र पौत्र तैसे छत्रपति शिव प्रपौत्र त्यांचे हो ॥१२॥
लेखक पुढतीं सांगे बाबाजीचा सुबंधु परसोजी ॥
नांव तया पुत्राचें शीलाचा सत्यनिष्ठ बिंबाजी[१७] ॥ १३ ॥
गर्जे त्यांचा सुत तो मूधोजी[१८] दक्षिण प्रदेशांत ॥
पुर तें देउर त्याचें, सेनानायक हुशार युद्धांत ॥ १४ ॥
रचिलें तेथें मंदिर मूधाईबाइचें दिसे साक्षी ॥
कारिती भक्ति तियेची प्रेमानें शुद्ध मानसीं लक्षी ॥ १५ ॥
रणवीर पुत्र बापू[१९] परसोजी[१९] तो तृतीय साबाजी[१९] ॥
यांचे लहान आबा[१९] कान्हो[१९] दुर्गा[१९] तसेच हावाजी[१९] ॥ १६ ॥
चेला शिवरायाचा साबाजी[१९] जो सदा तयापाशीं ॥

बारा वर्षे सेवुनि, $ उत्तरकार्या करी अखेरीशीं ॥१७॥
राजे शाहू जेव्हां दिल्लीहुनि दक्षिणेकडे आले ॥
वेळींच धैर्य धरुनी बापू[१९] परसोजिही पुढें सरले ॥ १८ ॥
वार्ता शाहूची ती पसरे कीं तोतया अशी जगतीं ॥
ढकली दुर्जन-वार्ता ती सहजीं उभय बंधुच्या मदतीं ॥ १९ ॥
दिन होय महत्वाचा जैं एका पात्रिं भोजना बसती ॥
वदनें दुष्टांचीं तैं त्रिवर्ग एकत्र पाहुनी सुकती ॥ २० ॥
सहर्ष शाहूराजें परसोजीला दिली नवी पदवी ॥
प्रख्यात स्वयंतेजें ' सेनासाहिब ' जना सदा दिपवी ॥ २१ ॥
संग्रामशूर त्याचा कान्होजी[२०] हा सुपुत्र विख्यात ॥
कमला धर्माचा तो माध्यान्हींचा सुमित्र साक्षात ॥ २२ ॥
कारण कांहीं झालें इतराजीला तया § नृपें नेलें ॥
लीला प्रारब्धाची कारागृहिं त्या अखंड ठेवियलें ॥ २३ ॥
पांडवगडचे चुलते बापू † यांचे सुपुत्र बिंबाजी[२] ॥
गो-ब्रह्म-धर्म-पालक रघुजी[२१] विख्यात पुत्र जाणा जी ॥ २४ ॥
राजें § कान्होजीचें पद शिक्का सर्व या रघोजीला ॥
नवल कृपा राजाची दिधलें देऊर आणखीं त्याला ॥ २५ ॥
डरेदाखल होउनि शुभ दिवशीं प्रांतिं आपुल्या गेला ॥
याच प्रतापी रायें नागपुरीं स्थापिलें निज पदाला ॥ २६ ॥

$ याचा साबाजी भोंसल्यानें श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांची उत्तर क्रिया केली.

§ श्रीछत्रपती शाहु महाराजांनीं

† बापूजी

नीत नवी मुलुखागिरी करुनी लुटला समस्त बंगाला ॥
केले जर्जर सगळे वीर धुरंधर कधीं नसे झाला ॥ २७ ॥
लेक तयाला चारहि जानोजी[२२] ज्येष्ठ आणि मूधोजी[२२] ॥
लाना तो बिंबाजी[२२] होता मधला तसाच साबाजी[२२] ॥२८॥
कांता रघुराजाची छत्रपती शाहु-पत्निची भगिनी ॥
व्यवहार-दक्ष शाहू घडवी संबंध हा नवा ह्मणुनि ॥२९॥
मनिंची त्यांची इच्छा मूधोजीलीं[२२] निजांकिं बसवावें ॥
यत्न परी व्यर्थचि तो ताराबाई करी स्वलोभानें ॥३०॥
शुक्र जसा अस्ताला रघुजी गेला स्त्रियांसवें स्वर्गीं ॥
भरुनी काढी जागा जानोजी[२२] ती पराक्रमी मार्गीं ॥३१॥
चिमणाबापू[२३] मधले राघव[२३] दुसरे कनिष्ठ व्यंकोजी[२३] ॥
तत्पर क्षत्रिय-कामीं मूधोजीचे[२२] सुपुत्र ऐसे जी ॥३२॥
नच सुत जानोजीलीं[२२] ह्मणुनी रघुजी[२३] निजांकिं ते घेती ॥
रूपगुणी ते राजे झाले गादीवरी सुखी जगतीं ॥३३॥
पीडित-रोग तयाचा परसोजी[२४] * हा असे तया पुत्र ॥
कुसुमापरि ती त्यांची भार्या काशी पतिव्रता मात्र ॥३४॥
सुगुणी परसोजीला[२४] मूधोजीनें[२४] × स्वराज्य रुमोहानें ॥
मति लोभ - दुष्ट धरुनी वधि त्या गादीवरी बसे मानें ॥३५॥
हालत पतिची ऐसी काशीबाई बघोनि सति गेली ॥

---

* बाळासाहेब.

× दुसरे रघोजी यांचे बंधु व्यंकोजी यांचा मुलगा मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब, परसोजीचा चुलत भाऊ.

रक्षा-स्थळिंही § दिसतें मंदिर ¶ त्यांचें उभें अशा वेळीं ॥ ३६ ॥
त्यांचेनंतर धरिला नेला लढुनी [२४]मुँधोजि † सरकारें ॥
समया पाहुनि पळुनी जोधपुरीं राहिलाहि परभारें ॥ ३७ ॥
सत्वर गादीमाजीं [२५]रघुजी तिसरे विराजले साचे ॥
प्रेमाचे दत्तक जे परसो[२४]जींचे नजीक आप्ताचे ॥ ३८ ॥
मग ती गादी गेली त्यांनाही पुत्ररत्न नसल्यानें ॥
नंतर दत्तक त्यांची विधवा घेई निजांकिं यत्नानें ॥ ३९ ॥
जरि रघुजी दत्तक घे मरणापूर्वीं तरी टिके गादी ॥
रक्षण राज्यचि होतें परि दैवानें दिली जलसमाधी ॥ ४० ॥
कर्ते दत्तक होती [२६]जानोजी जे अहेररावांचे ॥
रिघले कुळिं राजाच्या त्यांना ते दोन पुत्र भाग्याचे ॥ ४१ ॥
तोषति पाहुनि सगळे [२७]राघव ¶ [२७]लक्ष्मण ‡ सुरम्य ते बंधु
स्वीकृत कार्यामाजीं दक्ष सदा राहती कृपा सिंधु ॥ ४२ ॥
कार्यीं धार्मिक तत्पर [२७]राघव यांना सुपुत्र द्वय असती ॥
रम्य असे [२८]जयसिंगहि [२८]फत्तेसिंगाचि वडील त्यां वदती ॥ ४३ ॥
व्हावे सुपुत्र पोटीं लक्ष्मण[२७]राजे ह्मणोनि प्रार्थीती ॥
वाटे अतर्क्य लीला देवाची ती अमोघ या जगतीं ॥ ४४ ॥

---

§ स्मशानभूमी

¶ नागपुरीं काशीबाईचें मंदिर या नांवानें प्रसिद्ध आहे

† इंग्रजसरकारानें.

¶ राजा बहादुर रघोजीराव.

‡ धर्मवीर लक्ष्मणराव, आमचे चरित्र नायक.

**अलभ्य लाभ जहाला प्रथम नृपाला * प्रतापसिंहाचा ॥**
**शीक चढे आनंदा त्या राजाराम विजय ‡ जन्माचा ॥ ४५ ॥**
**आज्ञाधारक भगिनी तारासाहेब, वत्सला दुसरी ॥**
**शान्तचि प्रमिला विमला सत्वगुणी धाकुटी सदा हंसरी ॥ ४६ ॥**

अशा प्रकारें राजेसाहेब सुप्रसंग पाहून युवराजांना शिक्षण देत. यामुळें त्यांना उत्तेजन मिळत असे व शिवाय ऐतिहासिक विषयाचें ज्ञानही होत असे. ही शिक्षणाची प्रत्यक्ष पद्धत विशेष परिणामकारक असते, असें त्यांचें मत होतें, ह्मणून त्यांनीं हा उपक्रम चालू ठेवला होता.

त्याचप्रमाणें कोणी कितीही विद्वान झाला तरी जबाबदारी आंगावर पडल्याशिवाय त्याला सार्वजनिक कार्य किंवा कोणतेंही लोककल्याणाचें कार्य स्वतःच्या हिंमतीवर किंवा लोकसमुदायाच्या मदतीनें पार पाडण्याची कला साधत नाहीं. ती युवराजांना साध्य व्हावी ह्मणून त्यांनीं त्यांना नागपूर येथील ' तरुण मराठा क्षत्रिय समाजा'चें अध्यक्ष केलें. त्या समाजाचे अध्यक्ष युवराज झाल्यानंतर त्या समाजातर्फे सार्वजनिक गणपति त्यांनीं बसवावयाचें ठरविलें. या गणपतीपुढील कार्यक्रमाची जबाबदारी त्यामुळें त्यांचेवर पडली. लोकांनीं या समाजाच्या गणपतीपुढील कार्यक्रम उत्तम झाले असें ह्मणावें, अशी स्वाभाविक इच्छा युवराजांना उत्पन्न झाली. आपली इच्छा परिपूर्ण होण्याकरितां अनुयायी तरुण मंडळींना हाताखालीं कसें वागवून घ्यावें. व त्यांच्याकडून आनंदानें काम कसें करवून घ्यावें. हें त्यांना समजुन आलें. आपणाला मोठेपणा मिळाला तर तो कसा टिकवावा आणि तो सर्वमान्य होण्याला आपली वागणूक कशी ठेवावी, याचें सहज ज्ञान त्यांना हें अध्यक्षपद दिल्यामुळें

* राजे लक्ष्मणराव.

‡ या वेळीं राजेसाहेबांचे चवथे चिरंजीव श्री. कुं. तेजासिंह जन्माला आले नव्हते, ह्मणून या ठिकाणीं त्यांचा नामनिर्देश झालेला नाहीं.

समजून आलें. आपल्या समाजांत एकी नांदावी याकरितां अध्यक्षांनीं इतर सभासदांवर कसें वजन ठेवावें व कसें निःपक्षपातानें वागावें हीही गोष्ट त्यांना त्यामुळें कळून आली. त्याचप्रमाणें आपण अध्यक्ष झाल्यानंतर निमंत्रित लोकांचा कसा गौरव करावा, त्यांना प्रेमानें कसें आपलेंसें करून घ्यावें, दुसऱ्याच्या उपयोगी आपण कसें पडावें व त्यांना आपल्या कार्याला कसें आपलेंसें करून घ्यावें हा व्यवहारही त्यांना यामुळें कळूं लागला. समाजाचें अध्यक्षपद मिळाल्यानंतर प्रसंगविशेषीं समाजांत उभें राहून न भितां समयोचित भाषण करण्याची त्यांना अर्थात जबाबदारी वाटूं लागली व ती जबाबदारी त्यांनीं ओळखून अध्यक्षपदाचें काम उत्तम तऱ्हेनें निभावून नेलें.

युवराजांचें वय दहा वर्षांचें होतें, त्या वेळीं राजेसाहेबांनीं त्यांना ' तरुण मराठा क्षत्रिय समाजाचे ' अध्यक्ष केलें. तारीख १२ सप्टेंबर सन १९२६ इ. रोजीं या समाजाच्या एका कार्यक्रमप्रसंगीं बालवीर कुंवर प्रतापसिंह यांनीं मोठ्या धिटाईनें भाषण केलें. त्यांचें अवघें दहा वर्षांचें वय असतां अशा बालवयांत त्यांनीं इतकें व्यवस्थित भाषण केलेलें पाहून सर्वांना आनंद झाला. तें भाषण खालीं दिल्याप्रमाणें होतें.

## श्री. कुं. बालवीर प्रतापसिंह भोंसले यांचें

# भाषण.

" श्री. राजेबहादूर रघोजीरावसाहेब आणि माझ्या क्षत्रिय वीर बांधवांनो, तरुण मराठा क्षत्रियसमाजाच्या गणेश उत्सवाचा हा दुसरा वार्षिक उत्सव आहे. या उत्सवाचें सर्व श्रेय आमचे तीर्थस्वरूप राजेबहादूर बाबासाहेब यांनाच आहे. कारण, या समाजाच्या विनंतीला मान देऊन श्रीमंतांनीं हा गोल बंगला गणेशोत्सवाकरितां आह्मांला दिला. याबद्दल हा समाज श्रीमंतांचा फार फार आभारी आहे.

" आतां मी आमच्या समाजाकडे वळतों. प्रिय बांधवहो ! आपण सर्व मिळून श्रीगणपतीचे कृपेनें दोन वर्षें उत्सवाचें काम अत्यंत उत्साहानें आणि उत्तम तऱ्हेनें पार पडलें. या पुढेंही श्रीगणेशकृपेनें आपण तें नेटानें चालवूंच. प्रिय बांधवहो ! या वर्षी मला फार आनंद होत आहे. तो इतका कीं, या लहान मुखीं माझ्यानें

वदवत नाहीं. तरी मला याविषयीं दोन शब्द बोलल्याशिवाय राहवत नाहीं. आमच्या नागपूरच्या मराठा क्षत्रिय ज्ञातींत आजपर्यंत ज्या दोन फळ्या होत्या, त्या श्रीगणपतिप्रसादेंकरून भाद्रपद शुद्ध द्वादशीस एकत्रित झाल्या, हें पाहून मला आनंदाचें इतकें भरतें आलें कीं, त्यामुळें मला प्रेमाश्रू आले. या कामीं तीर्थस्वरूप श्री. कुं फत्तेसिंहराव, श्री. सरदार यशवंतरावसाहेब गुजर, श्री. समाजभूषण सरदार तात्यासाहेब गुजर, तीर्थस्वरूप श्री. मामा यशवंतराव मोहिते या चौघां जणांनीं विशेष मेहनत घेतली ह्मणून त्यांचे व बाकी सर्व आमच्या ज्ञातिबांधवांचे मी फार आभार मानतों.

" श्रीगणरायानें या वर्षी सद्बुद्धि देऊन जसें आपणां सर्वांना एकत्रित केलें आहे, तसें यापुढें समाजाला मार्गदर्शक होऊन आह्मां बालकांना योग्य शिक्षण देऊन क्षत्रियकुलोचित विद्या व सर्व प्रकारचें ज्ञान करून द्यावें. कारण, ' महाजनो येन गतः स पंथा । ' वडील माणसें जसा आह्मांला मार्ग दाखवितील त्याप्रमाणेंच आह्मी जाणार; तरी आह्मांला स्वतःच्या आचरणानें योग्य मार्ग दाखविणें हें वडील माणसांचें काम आहे. व त्याप्रमाणें आचरण करून आत्मोद्धार करणें, हें आमचें काम आहे.

" शेवटीं, या समाजाच्या विनंतीला मान देऊन वे. शा. सं. बापूजी बाईवार, श्री. बापूजी पेंडके, श्री. माधवराव वैद्य, श्री. दीक्षित, श्री. नारायणराव पालकर, श्री. संगमकर, श्री. बोधनकर, श्री. बेदरकर वगैरे मंडळी येथें भजन करण्याकरितां आली व त्यांनीं श्रीगजाननापुढें सुश्राव्य असें भजन केलें, त्याबद्दल मी समाजातर्फे सर्वांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. वे. शा. सं. बापूजी बाईवार हे सध्यां निरनिराळ्या कार्यक्रमांत गुंतले असतांही त्यांनीं हें भजनाचें आमंत्रण स्वीकारलें, याबद्दल त्यांचे व आपणा सर्वांचे समाजातर्फे पुन्हां एकवार आभार मानून मी आपलें भाषण पुरें करतों. "

अशाप्रकारें सार्वजनिक कार्य स्वतः जबाबदारी घेऊन करावयाला शिकावें ह्मणून राजेसाहेबांनीं युवराजांना वरीलप्रमाणें शिक्षण देण्याचा उपक्रम चालविला होता. त्याप्रमाणें नागपूरकर भोंसले घराण्याचा आत्मा बनून राहिलेली जी मल्लविद्या ती आपल्या पश्चात् मृतप्राय न होतां जीवंत स्वरूपांत रहावी व युवराजांनीं

ती हस्तगत करून पुढें ती परंपरेनें कायम ठेवावी, या हेतूनें श्री. कुं. प्रतापसिंह यांचेवर तिची थोड्यातरी प्रमाणांत जबाबदारी टाकावी अशी त्यांनीं योजना केली.

नागपुरांत राजेसाहेबांच्या तीर्थरूपांच्या वेळेपासून शिवरामगुरु या नांवाचे एक प्रख्यात मल्लविद्याविशारद होते. त्यांनीं नागपूर येथें कुंभारपुऱ्यांत आपला स्वतःचा आखाडा स्थापन केला होता. या आखाड्यांत राजेसाहेबांचे तीर्थरूप कै० वा० जानोजीमहाराज हे भोंसले घराण्यांत दत्तक येण्याचे पूर्वी जात असत. ते शिवरामगुरूंचे शिष्य होते. त्याचप्रमाणें साताऱ्याचे छत्रपति कै० वा० राजाराम-महाराज हे साताऱ्याच्या गादीवर दत्तक होऊन जाण्यापूर्वी नागपुरांत राहत होते. हे मूळ शेडगांवकर भोंसले घराण्यांतले असून नागपुरीं रहात.. ते शिवरामगुरु यांचे शिष्य होते. त्यांच्याच आखाड्यांत ते जात व त्यांच्याजवळच त्यांनीं मल्लविद्येचा अभ्यास केला. नंतर ते दत्तक होऊन साताऱ्याला गेले व तेथें ते पुढें इमामउद्दीन वस्तादांचे शिष्य झाले. परंतु त्यांनीं शेवटपर्यंत शिवरामगुरूंचा संबंध सोडला नव्हता. नागपुरीं ते आपले व्याही रघोजीराव मोहिते यांचेकडे वेळोंवेळीं येत असत. त्या वेळीं ते मुद्दाम शिवरामगुरूंचें दर्शन घेत. त्यांचे ठिकाणीं त्यांची शेवटपर्यंत मोठी श्रद्धा होती. छत्रपति राजाराममहाराज व शिवरामगुरु यांची मल्लविद्येविषयीं बरीच चर्चा होत असे.

कै० वा० अहिलोजीरावसाहेब, कै० वा० राघोजीराव मोहिते, कै० वा० गणपतराव मोहिते, अबदुलअली रिसालदार ही नागपुरांतील मोठमोठी आखाडबाज मंडळी शिवरामगुरु यांच्याच आखाड्यांत शिकून तयार झाली होती. शिवरामगुरु यांचे-जवळ शिक्षण घेतल्यानंतर त्यांनीं आपआपल्या घरीं व आपापल्या मोहल्यामध्यें स्वतःचे आखाडे उघडले होते.

नंतर महाजन शिंपी, इस्माईल खलिपा, महीबूब पहेलवान, दद्दा पहेलवान यांनींही शिवरामगुरु यांचेजवळ शिक्षण घेतलें त्यानंतर श्री. गोविंदराव इंदूरकर, वे. शा. सं. पंढरीनाथ शास्त्री घाटे, वे. शा. सं. बापू आपाजी बाळमुकुंद ही मंडळी त्यांच्याचजवळ तयार झाली.

अशा जुन्या परंपरेचा असलेला शिवराम गुरु यांचा आखाडा त्यांच्या कैलास-वासानंतर त्यांचे चिरंजीव रामाजी गुरु यांनीं व्यवस्थित चालविला. त्यांनींही पुष्कळ

शिष्यांना शिकवून जुनी परंपरा चालू ठेवली. पुढें त्यांच्या वृद्धापकाळामुळें त्यांना तो आखाडा सुव्यवस्थेनें चालविणें अशक्य झालें. आखाड्याची इमारत मोडकळीला आली. आखाड्यांतील कसरत करण्याचें सामान दृष्टिआड होऊं लागलें, तेव्हां अशा परिस्थितींत आखाडा बंद पडतो कीं काय, अशी धास्ती रामाजी गुरु यांना वाटूं लागली. तेव्हां त्यांनीं आखाडयाचा जीर्णोद्धार करण्याकरितां तो आखाडा श्रीमंत राजेसाहेब यांचे नांवें करून दिला. नंतर राजेसाहेबांनीं या आखाडयाप्रीत्यर्थ बरीच रक्कम खर्च करून त्याचा जीर्णोद्धार केला व हा आखाडा पुढें नीट व्यवस्थेनें चालावा व तो पूर्वींच्या कीर्तीप्रमाणें भरभराटीला यावा, या हेतूनें त्याची जबाबदारी तरुण पिढीवर टाकली आणि त्या धोरणानेंच त्या आखाडयाला युवराजांचें नांव देण्याचें त्यांनीं ठरविलें.

## प्रतापसिंह आखाडा.

युवराजांचें लक्ष आपल्याप्रमाणेंच आखाडयांकडे लागावें व त्यांच्या अमदानींत पूर्वींप्रमाणें उत्तम पहेलवान तयार व्हावे व भोंसले घराण्यांतील मल्लविद्या अशीच परंपरेनें लोकांचे हातीं पडावी, ह्मणून त्यांनीं आपली जबाबदारी युवराजांवर टाकली. त्या आखाडयाला युवराजांचें नांव दिलें. व त्याचा अनावरण समारंभ श्रीमंत राजेबहादूर रघोजीराव भोंसले यांचे हस्तें करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तो समारंभ तारीख १८ माहे आक्टोबर सन १९२६ मध्यें झाला. या समारंभाला बराच मोठा समुदाय जमला होता. त्या प्रसंगीं श्रीमंत राजेसाहेब व श्री. कुं. प्रतापसिंह यांच्या भाषणांचा सारांश आह्मी देत आहोंत. या भाषणांवरून युवराजांना शिक्षण देण्याचे बाबतींत राजेसाहेबांची कशी पद्धत होती व युवराजही आपणावर पडणारी जबाबदारी कशी ओळखीत होते, हें लक्षांत येईल.

## श्री. राजे लक्ष्मणराव यांचें भाषण.

" अध्यक्ष महाराज आणि इतर सभ्य गृहस्थहो, आजचा दिवस खरोखर मोठ्या आनंदाचा समजला पाहिजे. कारण, श्रीमंत राजे बहादूर आजच्या समारंभाचे अध्यक्ष, आह्मी वक्ते आणि कुमार प्रतापसिंहांच्या आखाडयाचा अनावरण समारंभ असा त्रिवेणी संगम आज जमून आला आहे. आह्मां क्षत्रियांना आखाडा

ह्मणजे एक प्रकारचें आनंदाचें साम्राज्यच वाटत असतें. ‘ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ’ या उक्तीप्रमाणें आह्मी आपलें शारीरिक बल याच आखाड्यांत वाढवितों. या एकाच ठिकाणीं पुरुषार्थाला शोभेल असें शिक्षण मिळतें. या आखाड्यांना मी आरोग्याची शाळा असेंच समजतों. या शाळांतून मनुष्याचा अभ्यासक्रम जितका चांगल्या प्रकारें पार पडेल तितक्याच उत्तम तऱ्हेनें त्याच्याकडून पुरुषार्थाचीं कामें घडून येतील.

“ मनुष्याला मजबूत मशिनरी म्हणजे आरोग्य-संपन्न शरीर व त्याला लागणारें पेट्रोल ह्मणजे विद्याव्यासंगानें मिळविलेलें ज्ञान या दोन्ही गोष्टींची जरूरी असते. वर्णाश्रमधर्माच्या दृष्टीनें विचार केला तर प्रत्यक्ष कार्य करण्याची बरीचशी जबाबदारी आह्मां क्षत्रियांवर पडते. म्हणून क्षत्रिय मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा हे आखाडेच आहेत, असें मी समजतों. आखाड्यांची आस्था आमच्या पुढील पिढीला लागावी म्हणून कु० प्रतापसिंह यांना या आखाड्याचे एक मुख्य आधारस्तंभ करून तो उत्तम प्रकारें नांवलौकिकाला आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपवितांना मला आज मोठा आनंद होत आहे. ”

या वेळीं युवराजांचें वय अवघें अकरा वर्षांचें होतें. या वयांतच राजसाहेबांनीं वर ह्मटल्याप्रमाणें त्यांना या आखाड्याचें एक आधारस्तंभ बनविलें. यावरून युवराजांना राजेसाहेब कसें शिक्षण देत होते, याची कल्पना येईल.

“ आमचे परमपूज्य तीर्थरूप कै० जानोजी साहेब हे भोंसले घराण्यांत दत्तक येण्यापूर्वी, व सातारचे छत्रपती कै० राजाराममहाराज हेही दत्तविधानापूर्वी नागपुरांत असतांना, याच आखाडयांत जात. ते कै० शिवराम गुरु यांचेच शिष्य होते. ”

“ त्याचप्रमाणें कै० श्री. अहिलोजी आहेरराव, कै० श्री. राघोजी रावसाहेब मोहिते, कै० श्री. गणपतरावसाहेब मोहिते रिसालदार ही नागपुरांतील बडी बडी मंडळी याच आखाड्यांत कसरत करीत असत. ”

श्री. गोविंदराव इंदुरकर, वे. शा. सं. पंढरीनाथ शास्त्री घाटे, वगैरे हल्लींचे लोक याच आखाड्यांत तयार झाले, अशाप्रकारें शिवराम गुरूंनीं आपल्या मल्लविद्येचा लाभ मंडळींना दिला.

"मलाहि अशी इच्छा झाली कीं, दहा पहेलवानासारखे नामांकित पहेलवान ज्या गुरूजवळ शिकले, त्या शिवराम गुरूजवळ आपणहि थोडे दिवस शिकून कांहीं विद्या हस्तगत करावी; या हेतूनें मी त्यांचेकडे जाऊं लागलों."

"त्यांनींही मोठ्या ममतेनें मला अल्पस्वल्प शिक्षण दिलें. तेव्हांपासून आह्मां उभयतांचा विशेष परिचय होऊन त्यांची माझेवर कृपा झाली; व त्यांच्याबद्दल माझ्या मनांत परमादर वास करूं लागला."

"असो. आज माझ्या सुदैवानें माझे प्रिय बंधु तीर्थस्वरुप श्रीमंत राजे बहाद्दूर, यांच्या हस्तें या आखाड्याचा अनावरण समारंभ झाला, ही आजच्या आनंदांत दूधसाखरेचीच भर पडत आहे यांत संशय नाहीं. शेवटीं श्री. बाळा-साहेब इंदोरकर यांनीं कार्यांत विशेष मन घालून आणि फार मेहनत घेऊन एक महिन्याचें आंत हें काम पूर्ण करविलें. आखाड्यांत लावलेला शिवरामगुरूंचा फोटो त्यांनींच एनलॉर्ज केला आहे, याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. आणि हें कार्य हातीं घेतल्याप्रमाणें तें निर्विघ्नपणें पार पडल्याबद्दल जगन्नियंत्या परमेश्वराची प्रार्थना करून मी माझें भाषण पुरें करतों."

यानंतर खालीलप्रमाणें युवराजांनीं आपलें भाषण केलें. त्यांतही ते त्यांच्या वडिलांनीं जी जबाबदारी त्यांचेवर सोंपविली, ती पार पाडण्याची त्यांची तयारी असल्याबद्दल त्यांनीं उल्लेख केला आहे.

## श्री. कुं. प्रतापसिंह यांचें भाषण.

तीर्थस्वरूप श्रीमंत राजे बहाद्दूर आणि इतर सभ्य गृहस्थहो, आद्य कै. वा. मल्लविद्याविशारद श्रीयुत शिवरामगुरू यांच्या आखाड्याचा जीर्णोद्धार होऊन उद्घाटन समारंभ करण्याचा सुयोग आला आहे. हा आखाडा फार जुना असून कै. शिवरामगुरु यांनीं आपल्या हयातींत याच आखाड्यांतून चांगले नामांकित पैलवान तयार केले. आमचे तीर्थरूप श्रीमंत दादासाहेब यांच्याकडून वेळोवेळीं मला शिवरामगुरूसंबंधीं ज्या आख्यायिका सांगण्यांत येतात, त्यांवरून शिवरामगुरु हे फार धाडशी, शक्तिमान, चतुर आणि कुस्तीगीर होते, हें मला कळून आलें.

॥ श्री ॥

# श्रीमंत बालराजे प्रतापसिंह भोंसले यांच्या
# — नवव्या वाढ दिवसाचें —

॥ काव्यात्मक शुभचिंतन ॥

आर्या

श्रीराम नाम वाचें वदतां शोभेल तें तरी वदन ॥
मंद-समीरण-पावन-कुमुदें नसती तडाग तरि वद न ॥१॥
तरुंना सुंदर पालव पालवितें जेविं सेव्य तें सुफल ॥
वाग्म चमत्कृति अव्यापारें होईल कर्म का सफल ॥२॥
लतिकांना बहर नवा सुमनांचा गंधहीन नच साजे ॥
राजिव सुंदर सुदृढ नर विद्येवांचुनी जसा लाजे ॥३॥
जे जे केले जगदीशानें जगतीं अपूर्व जन सारे ॥
प्रकृति जाणुनि मानव योजक होतां भवासि पार करे ॥४॥
तारुण्य-योग्य सहसा साहस-कार्यासि साजरें असतें ॥
परि वय विद्यार्थ्यांचें विद्याव्यासंग त्या सुशोभवितें ॥५॥
सिंह व्याघ्रादिक पशु असती कितिही महीतलावरती ॥
हरि तो हरिपण घे शुभ करुनी सिंहावलोकनें जगतीं ॥६॥
भोगास भोंसल्यांचीं चारित्र्यें नित्य अन्न मानूनी ॥
सन्मार्ग मार्ग चालत जातां उदयास तो प्रभू आणी ॥७॥
लेकुरपण त्यापासुन राजे, तुमच्या मनांत बाणावें ॥
याकरितां अपुला हा कवि करितो "पांडुरंग" हीं कवनें ॥८॥

॥ शुभं भवतु ॥

नागपूर. मिति मार्गशीर्ष व० ३० शके १८४८.

[K P. Z P, B.]

॥ श्री. ॥

# संक्रांतीनिमित्त.

## धर्मवीर राजेसाहेबांस प्रेमपूर्वक अर्पण.

### तिळगुळ घ्या आणि गोड बोला !

वृत्त- द्रुतविलंबित

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्व | कु | ल | ता | र | क | ल | क्ष्म | ण | भों | स | ले |
| ब | कु | ल | पु | ष्प | ज | सें | न | व | भा | स | लें |
| वि | म | ल | की | र्ति | सु | धा | उ | प | भो | गि | ती |
| वि | भ | व | ता | वि | प | दे | वि | ण | भो | गि | ती |
| क | रि | नि | वा | र | ण | सू | क्ष्म | ज | री | पि | डा |
| प | र | सु | र | क्ष | क | ल | क्ष | क | रीं | वि | डा |
| ब | हु | त | वि | ष्णु | क | ल | त्र | दि | लें | क | रीं |
| म | न | अ | वी | र | त | ल | क्ष्म | ण | भ्रा | त | रीं |
| स | द | य | ता | अ | स | तां | गु | ण | वी | र | ता |
| न | व | ल | भू | ष | ण | त्यां | नृ | प | भो | गि | तां |
| न | कु | ल | भा | व | त | यां | त | वि | का | स | लें |
| स्व | कु | ल | ता | र | क | ल | क्ष्म | ण | भों | स | ले |

तारीख १०-१-१९२८ इ०


पांडुरंग गोपाळ रानडे.

महाराष्ट्र औषधी कारखाना, बेळगांव.

त्यांनीं शक्तीचीं अचाट कामें केलीं. त्यांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव श्रीयुत राजेश्री रामजीपंत गुरुजी यांनीही कांहीं दिवसपर्यंत आखाड्यांतील विद्यार्थ्यांना कुस्तीच्या डावपेचांचें थोडेंबहुत शिक्षण देऊन वाडिलांचा नांवलौकिक राखण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांच्या शरीरप्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें त्यांना या कार्यांतून आपलें लक्ष काढून घेणें भाग पडलें. तरी पण कै० शिवराम गुरूंचे शिष्यांपैकीं कांहींनीं तें काम आपलेकडे घेऊन गुरूंची शिक्षणपरंपरा कायम ठेविली. अलीकडे या आखाड्याची इमारत बरीच मोडकळीस आल्यामुळें तिचा जीर्णोद्धार व्हावा व कैलासवासी गुरूंचें नांव पुढें चालावें, ह्मणून त्यांनीं हा आखाडा आमचे तिर्थरूप श्रीमंत दादासाहेब यांच्या स्वाधीन केला व त्यांनीं आपल्या खर्चानें आखाड्याच्या इमारतीचें काम पूर्ण करविलें. हें काम इतक्या लौकर पूर्ण होण्यास कै० गुरुसंबंधीं आमच्या तीर्थरूपांचें ठिकाणीं असलेली निष्ठा आणि अभिमान हींच मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालीं. या आखाड्यास माझें नांव देऊन त्याबरोबरच फारच मोठी जबाबदारी माझ्यावर ठेविली गेली आहे, हें मी जाणून आहें. परमेश्वर तीही माझ्या हातून पार पाडो अशी माझी नम्र प्रार्थना आहे. आतां आखाड्याचा अनावरण समारंभ तीर्थस्वरूप श्रीमंत राजे बहादूर यांचे हस्तें करण्यांत येईल. '

याप्रमाणें युवराजांचें भाषण झालें. त्यांनीं त्यांचे वडिलांनीं जी आखाड्याची जबाबदारी त्यांचेवर सोंपविली ती ते घेण्याला आपल्या खुषीनें तयार झाले. यावरून पूर्वपरंपरेप्रमाणें चालण्याचें शिक्षण घरंदाज घराण्यांत जें असे, तेंच राजेसाहेब युवराजांना देत असत. राजेसाहेबांचे मनांत युवराजांना डेराडून येथील लष्करी कॉलेजांत शिक्षणाकरितां ठेवण्याचें फार होतें व त्याप्रमाणें त्यांचे प्रयत्नही चालू होते. परंतु त्यापूर्वी त्यांचेवर निर्घृण काळानें झडप घातल्यामुळें त्यांचे विचार जागच्या जागींच राहिले. क्षत्रियांना क्षत्रिय शिक्षणच पाहिजे, मग तें कालपरत्वें आधुनिक पद्धतीचें असलें तरी चालेल, अशी त्यांची समज होती. जुन्या पद्धतीचें शिक्षण येत असावें, तें मात्र शिकल्याखेरीज राहूं नये, असें त्यांना वाटे. आपणां

क्षत्रियांवर धर्मरक्षणाची, देशरक्षणाची, लोकरक्षणाची जबाबदारी आहे व त्याला योग्य असें लष्करी शिक्षण ( क्षात्रविद्येचें शिक्षण ) युवराजांनीं घ्यावें व त्यांना तसा योग आणून द्यावा अशी त्यांची फार इच्छा होती. त्यांची ती इच्छा॰ सांप्रतच्या परिस्थितींत कशी कृतींत उतरते, तें युवराजांच्या दैवावर आतां सर्वस्वीं अवलंबून आहे. परमेश्वराची इच्छा !



# बेळगांव येथील संस्मरणीय कामगिरी.

## राजेसाहेब व अस्पृश्यता.

नागपूरचे श्रीमंत धर्मवीर, धर्मविभूषण राजे लक्ष्मणराव भोंसले हे तारीख ७-६-१९२७ इ० रोज मंगळवारीं बेळगांवीं येणार ह्मणून बेळगांव हिंदुसभेतर्फे सर्वांना जाहीर झालें होतें. नागपूर हिंदुसभेचे अध्यक्ष नात्यानें ते प्रसिद्धच होते; शिवाय ते ठिकठिकाणच्या अनेक परिषदांचे अध्यक्ष झाले असल्यामुळें त्यांची कामगिरी वेळोवेळीं वर्तमानपत्रांच्या द्वारें बेळगांवांतील नागरिकांना समजलेलीच होती. त्यामुळें त्या वेळीं बेळगांवांत चालू असलेल्या अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीबद्दल राजेसाहेबांचीं खुलासेवार मतें लोकांना समजून घेण्याची इच्छा झाली. राजेसाहेबांवर 'भटाळले' वगैरे आरोप कांहीं वर्तमानपत्रांतून होत होते, त्यामुळें ते अस्पृश्यता निवारणाचे बाबतींत विरुद्ध असणार, असें कांहीं मंडळींना वाटत होते. तेव्हां कोणाची त्यांचेविषयीं भलतीच कल्पना होऊं नये, ह्मणून बेळगांव हिंदुसभेतर्फे बुधवार तारीख ८ जून १९२७ इ. रोजीं रात्रौं ९॥ वाजतां श्रीमारुतीच्या देवालयांत राजेसाहेबांचे अध्यक्षतेखालीं श्री. केशवराव आजेरकर उपाध्यक्ष बेळगांव हिंदुसभा यांचें 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर भाषण ठरवून बेळगांव हिंदु नागरिकांची जाहीर सभा बोलावण्यांत आली.

## मराठे व कानविंदे.

या सभेला कांहीं अस्पृश्यही आले होते. राजेसाहेबांची रीतसर अध्यक्षस्थानीं निवड झालेवर श्री. आजेरकर वकील यांनीं अस्पृश्यता निवारणाची सांप्रतच्या परिस्थितींत किती जरूरी आहे, हें मुद्देसूद भाषणानें लोकांना पटविण्याचा प्रयत्न करून आपलें भाषण संपविलें. नंतर श्री. मोरोपंत मराठे यांनींही सामाजिक अस्पृश्यता निवारण न केल्यास हिंदुसमाजाचा नाश होणार

आहे, अशा पद्धतीची विचारसरणी मांडण्याचा प्रयत्न चालविला असतां, जुन्या मताच्या एका भाविक गृहस्थानें पाण्याची बालडी त्यांच्यापुढें आणून ठेविली व तींतील पाणी एका लोट्यांत घेऊन तें एका अस्पृश्याच्या हातीं दिलें व वक्त्यांना असें आव्हान केलें कीं, ' तुह्मी हें अस्पृश्याच्या हातचें पाणी प्या, ह्मणजे तुमच्या भाषणांत कांहीं तरी अर्थ आहे असें आह्मांला वाटेल. ' मोरोपंत मराठे यांस त्या गृहस्थांनीं मुळींच ओळखलें नव्हतें. मोरोपंतांच्याविरुद्ध असलेल्या बद्धमूल विरोधकांच्या, त्यांच्या व्यक्तिविषयक, प्रलापांवर विश्वसल्यामुळें त्या गृहस्थाला मोरोपंत मराठे हे पाणी पिण्यास घाबरतील असें वाटलें होतें. परंतु ते पडले मोरोपंत! सर्वांसमक्ष तें पाणी ते गटागटा प्याले! त्याचप्रमाणें बेळगांवीं अस्पृश्यता निवारणाची चळवळ जातिवंतपणें करणारे श्री. वामनराव कानविंदे, संपादक ' परीक्षक, ' यांनींही तें पाणी पिऊन आपली उक्ति व कृति एकच आहे, असें दाखविलें. या प्रकारामुळें अस्पृश्यता निवारणाची चळवळ ही केवळ वरपांगी व अस्पृश्य लोकांना केवळ भुलथाप देण्याकरितां नसून ती मनुष्यजातीचे जन्मसिद्ध हक्क प्राप्त करून देण्याकरितांच आहे, हें जुन्या पद्धतीच्या लोकांना समजून आलें. शेवटीं राजेसाहेबांचे विचार ऐकण्याची लोकांना उत्कंठा असल्यामुळें राजेसाहेबांचें 'अस्पृश्यता -निवारण' या विषयावर अत्यंत महत्वाचें असें भाषण झालें. ते ह्मणालेः—

## अस्पृश्यताविषयक सारासार विचार.

" हिंदुसंघटनाच्या दृष्टीनें अस्पृश्यता—निवारण अत्यंत आवश्यक होऊन बसलें आहे. आमच्या अस्पृश्य मानलेल्या बंधूंस बहिष्कृतांप्रमाणें दूर ठेवून यापुढें चालणार नाहीं. परंपरागत रूढीमुळें सध्या तो प्रश्न सोडविणें, बरेंच कठीण आहे. तथापि तो समाधानकारक रीतीनें सोडविला पाहिजे. सर्व स्पृश्य हिंदूंमध्यें जेवढी व जेथें शिवाशिव चालते, तेवढी व तेथें अस्पृश्य मानलेल्या लोकांशींही चालली पाहिजे. आह्मां सर्वांवरील संस्कार थोडे फार प्रबलच आहेस, ही गोष्ट खरी; परंतु परिस्थितीकडे लक्ष देऊन आपण त्यांना सार्वजनिक बाबतींत स्पृश्य हिंदूंप्रमाणेंच सर्व हक्क दिले पाहिजेत, असें माझें मत आहे. मी माझ्या घरीं वाटेल तेवढें सोंवळेंओंवळें केलें, तरी आगगाडींत, मोटारींत, सभेंत, शाळेंत, बाजारांत, माझ्या सोंवळ्यासाठीं महारमांगांनीं मला

शिवाशिव करूं नये, असें ह्मणण्याचा मला अधिकार नाहीं. फार तर काय पण सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना मज्जाव करणें हा अन्याय आहे, हें सर्वत्रांनीं कबूल केलें पाहिजे. तथापि सर्वत्रांची समजूत पाडण्याचें प्रयत्न आपणाकडून झाले पाहिजेत. ते प्रयत्न आपण मनापासून करूं तर महारमांगादि लोक जबरदस्तीनें आपले हक्क चालविण्याची घाई करावयाचे नाहींत. पण आमची जर कुचराई होईल तर त्यांना घाई करण्याचा हक्क अलबत आहे, व तशी त्यांनीं केली, तर त्यांना त्या कामीं विरोध करणारांनाच मी दोष देईन.

## अस्पृश्य व मंदिरप्रवेश.

" पाणवठ्यासंबंधानें इतकें सांगितलें; पण सार्वजनिक हिंदुदेवालयांत त्यांना समान हक्क देण्यासंबंधाचा प्रश्न जास्त बिकट आहे. कारण देवळांचें व देवांचें पावित्र्य राखण्याचे प्रघात शेंकडों वर्षांपासून भिन्न भिन्न ठिकाणीं भिन्न भिन्न आहेत. हे भेद ( ब्राह्मण—ब्राह्मणेतर—अस्पृश्य इत्यादिक ) सर्वांनाच आजपर्यंत पाळावे लागत आले आहेत. हा बराचसा धर्मभावनेचा प्रश्न असून, विशेषसें धर्मभीरु नसलेल्या लोकांनासुद्धां रूढीविरुद्ध थोडेंसें कांहीं नवीन झाल्यास चीड येणें साहजिक होऊन बसलें आहे. अशी जरी वस्तुस्थिति आहे, तरी स्पृश्य हिंदूंप्रमाणेंच सर्व समान हक्क देवालयांत देखील अस्पृश्यांना दिल्या-वांचून त्यांना आपल्या हिंदुत्वाचा अभिमान वाटणें शक्य नाहीं. या बाबतींत अस्पृश्यांना देवालयें मोकळीं करून देण्याची सत्ता माझ्या हातीं नाहीं किंवा सरकार-च्याही हातीं नाहीं. ती हिंदुसमाजाच्या हातीं आहे. हिंदुसमाजाची अनुकूलता मिळविणें हेंच कार्य सर्व हिंदु पुढाऱ्यांपुढें आहे. ठिकठिकाणच्या हिंदु पुढाऱ्यांनीं आपल्या गांवच्या निरनिराळ्या देवळांच्या बाबतींत सर्वांना समान हक्क कसे देतां येतील, याचा निर्णय ठरवून एकेक देवालय अस्पृश्यांना स्पृश्याइतकेंच मोकळें करून देण्याचा प्रयत्न करावा. कदाचित् समाधानानें व समंजसपणानें घेतल्यास अस्पृश्य लोक योग्य तडजोडीसही कबूल होणार नाहींत, असें नाहीं. परंपरागत रूढी एकदम मोडावयास पुढारीही समर्थ होणार नाहींत, ही गोष्ट अस्पृश्यांनींहि लक्षांत घेऊन त्यांच्यासाठीं खटपट करणाऱ्या स्पृश्य पुढाऱ्यांशीं मिळतें घेण्याचें धोरण ते ठेवतील तर त्यांचा प्रश्न सुटण्यास जास्त मदत होईल. पण स्पृश्यांस माझें असें सांगणें

आहे कीं, त्यांनीं अस्पृश्यांना स्पृश्यांस असलेले सर्व सामान्य हक्क देण्याचा मनाचा धडा करावा, हें त्यांना जास्त भूषणास्पद आहे.

## विधायक सूचना.

" या संबधानें मी इतकेंच आज सुचावितों कीं, हिंदूंच्या जाहीर सभा वरचेवर भरवून त्यांचीं मनें वळविण्यासाठीं या प्रश्नाची चर्चा शांतपणें व निर्भीडपणानें करण्यास सर्वत्रांस मोकळीक देण्यांत यावी व गांवच्या सर्व किंवा ठराविक देवालयांत सर्व स्पृश्यांना व अस्पृश्यांना समान हक्क असल्याबद्दलचे ठराव पास होईपर्यंत पुढाऱ्यांनीं चळवळ चालू ठेवावी. तसा ठराव पास झाला तरी तो तात्काळ अंमलांत आणावा, असें मी ह्मणत नाहीं. त्या ठरावाविरुद्ध कोणाच्या हरकती असतील, तर योग्य मुदत देऊन एकदां–दोनदां–तीनदां–पुनः सभा भरवून पुनः चर्चा करून तो ठराव पुनः पुनः बहुमतानें पास होतो, असें ठरल्यानंतर तो अमलांत आणण्यास हरकत नाहीं. जरूर वाटल्यास धर्मगुरूंची अनुमति घेण्याची अटही ठेविल्यास चालेल–न ठेविल्यासहि चालेल ! सारांश, होताहोईतों सर्व स्पृश्यांच्या मनास ठराव पटवून देण्याच्या प्रयत्नांत पुढाऱ्यांनीं कसूर करूं नये व असे प्रामाणिक प्रयत्न चालले असतां होणाऱ्या विलंबाबद्दल अस्पृश्यांनीं अधीर न होतां त्यांचे हक्क त्यांनीं मिळविण्याची घाई करून स्पृश्य पुढाऱ्यांच्या प्रयत्नास अडथळे आणूं नयेत. स्पृश्यांनींहि वेळ काळ लक्षांत घेऊन प्राप्त परिस्थितीप्रमाणें वागण्यास भलताच दुराग्रह धरून हा अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यास अकारण विलंब लावूं नये, अशी माझी त्यांना आग्रहपूर्वक विनंति आहे. "

याप्रमाणें स्पृश्य-अस्पृश्य अशा उभयपक्षाला हितपरिणामी होईल, असें कळकळीचें भाषण केल्यानंतर सभा बर्खास्त झाली. राजेसाहेबांच्या या भाषणानें बेळगांवांतील कांहीं लोकांचे अस्पृश्यता--निवारणाचे बाबतींत राजेसाहेबांच्या विचारांसंबंधीं जे तर्कवितर्क होते, ते साफ निघून गेले. पुन्हां एका महिन्याच्या आंत बेळगांवीं येण्याचें आश्वासन देऊन राजेसाहेब दुसरेच दिवशीं कांहीं कामानिमित्त तंजावराला निघून गेले.

याच सुमारास अखिल भारतीय हिंदुमहासभेचे अध्यक्ष ह्मणून डॉ. मुंजे यांनीं आपला दौरा काढला होता. त्या दौऱ्यामध्यें ते बेळगांवींही येणार होते. राजेसाहेब पुन्हां एका महिन्याचे आंत बेळगांवीं येणार होते व त्याच सुमारास डॉ. मुंजेही येणार, तेव्हां त्या उभयतांचा बेळगांवच्या हिंदु नागरिकांनीं कोणत्या प्रकारचा सन्मान करावा, याचा विचार करण्याकरितां अनेक गृहस्थांच्या सहीनें हस्तपत्रकें निघून तारीख २१-६-२७ इ. रोजीं सायंकाळीं श्रीमारुतीचे देवालयांत जाहीर सभा बोलावण्यांत आली. या सभेस पुष्कळ प्रमुख गृहस्थ हजर होते. या सभेचें अध्यक्षस्थान श्री. बेळवी वकील यांना देण्यांत आलें होतें. श्री. रानडे यांनीं बेळगांवीं येणाऱ्या उपरोक्त लोकमान्य पुढाऱ्यांच्या कामगिरीची माहिती सांगून त्यांना मानपत्रें देण्यासंबंधाचा ठराव मांडला. त्याला यथायोग्य आणि रीतसर पाठिंबा मिळाल्यानंतर तो ठराव पास होऊन मानपत्र तयार करण्याकरितां कमिटीही स्थापन झाली. त्याप्रमाणें त्या कमिटीनें दोन मानपत्रें तयार करून ठेवलीं.

ठरल्याप्रमाणें ता. २६।६।२७ इ. रोजी डॉ. मुंजे यांच्या मानपत्राचा समारंभ झाला. त्याच दिवशीं राजेसाहेब येणार होते, परंतु त्यांना येतां न आल्यानें त्यांच्या मानपत्राचा समारंभ पुढें ढकलण्यांत आला. राजेसाहेब ता. २५-७-२७ इ. रोजीं बेळगांवीं आले. त्याच दिवशीं त्यांना मानपत्र देण्याच्या समारंभाची व्यवस्था करण्यांत आली.

## मानपत्र समारंभाची हकीकत.

सोमवार ता. २५-७-२७ इ. रोजीं सायंकाळीं श्रीमारुतीचे देवालयांत हा समारंभ साजरा करण्यांत आला. मारुतीचें देवालय या समारंभाला शोभेल असें सुशोभित करण्यांत आलें होतें. मंगलवाद्यें सुस्वर आलाप घेत आहेत, देऊळ स्त्री-पुरुषांनीं चिकार भरून गेलें आहे, अशा वेळीं श्रीमंत राजेसाहेबांची स्वारी दरबारी पोषाखांत येऊन दाखल झाली. लगेच समारंभाच्या कार्यक्रमाला सुरवात झाली. प्रथमतः स्वागताध्यक्ष बेळगांवचे वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध असे श्री. रावजी गंगाधर खोत यांचीच सभेच्या अध्यक्षस्थानीं, श्री. मराठे वकील, भीमराव पाटील व नगरकर वकील यांच्या सूचनेवरून योजना करण्यांत आली. राजेसाहेबांचे मानपत्राला विरोध होणार आहे, असें पूर्वींच प्रसिद्ध झाल्यामुळें अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत

मानपत्र-विरोधकांस आपलें ह्मणणें सभेपुढें मांडण्याला भरपूर अवधि मिळेल, असें सांगितलें. तदनंतर श्री. रामभाऊ केळकर यांनीं स्वागतपर पदें मधुर कंठानें म्हटल्यानंतर अध्यक्षांचें सूचनेवरून सेक्रेटरी श्री. रानडे यांनीं मानपत्र वाचून दाखविण्यास सुरुवात केली. तें मानपत्र खालीं दिल्याप्रमाणें:—

॥ श्री ॥

**श्रीक्षात्रकुलावतंस श्रीमंत धर्मवीर धर्मविभूषण,**

# राजे लक्ष्मणराव साहेब भोंसले

## नागपूरकर, यांचे सेवेशीः—

महाराज ! हिंदुसमाजाची व हिंदुधर्माची आपण आजवर केलेली निस्सीम सेवा व तीच अखंड चालू ठेवण्याचें आपण घेतलेलें पवित्र व्रत याबद्दल कृतज्ञ अंतःकरणानें आमचें प्रेम आपणास जाहीर रीतीनें अर्पण करण्यास आजच्या प्रसंगीं आह्मां वेणुपुरस्थ समस्त हिंदुजनतेस परम आनंद वाटत आहे.

महाराज ! आपण नागपूर हिंदुसभेचें अध्यक्षत्व पत्करून हिंदुसमाजहिताची धुरा आपल्या खांद्यावर घेतलेली आहे. हिंदुसमाजांतर्गत असलेले अनेक धर्मभेद, पंथभेद, जातिभेद व पक्षभेद या सर्वांशीं समबुद्धि स्वतः ठेवून त्या सर्वांमध्येंहि परस्परांबद्दल समबुद्धि जागृत करून हिंदु समाजाची घडी पूर्ववत्

बसविण्याचें हिंदुसंघटनेचें कार्य आपण अत्यंत कौशल्यानें व काळजीनें अहर्निश चालविलेलें आहे. हिंदु लोकांस त्यांच्या शारीरिक, धार्मिक व मानसिक अवनतींतून वर काढण्यासाठीं आपणांस जी तळमळ लागून राहिलेली आहे व तीमुळें आपणाकडून त्याप्रीत्यर्थ जे कळकळीचे प्रयत्न चाललेले आहेत त्याबद्दल आह्मी आपले अतिशय ऋणी आहों.

महाराज ! गोब्राह्मणप्रतिपालक अशा परम पवित्र 'भोंसले' कुळांत आपला जन्म झाला असून त्या कुळाची ती कीर्ति अविरत प्रकाशित ठेवणारें असेंच आपेंल धर्माचरण आहे. गाईच्या पवित्र दुधानें प्रत्येक हिंदूचें शारीरिक किंवा ऐहिक तेज व ब्राह्मणाच्या पवित्र तपानें प्रत्येक हिंदूचें मानसिक किंवा पारमार्थिक तेज आपल्या भरतखंडांत पूर्णपणें झळकत होतें. तशीच तेजस्विता आजही आपल्या हिंदुसमाजांत तळपत ठेवण्यासाठीं गाईच्या दुधाची व ब्राह्मणाच्या तपाचरणाची उत्तम जोपासना करणें, हेंच क्षत्रियांचें परंपरागत कर्तव्य आपण आचरीत आहां. हिंदुसमाज हा पवित्र आचरणांत जगाला आदर्शभूत पूर्वीं होता व पुढेंहि राहिला पाहिजे. गाय व ब्राह्मण हीं हिंदुधर्माच्या रहस्याचीं निशाणें आहेत व त्या रहस्याकडे लक्ष दिल्यास गो-ब्राह्मणप्रतिपालन ह्मणजे ऐहिक व पारमार्थिक परम कल्याणप्रद परमोच्च तत्त्वांचेंच प्रतिपालन करणें होय; अशाच दृष्टीनें महाराज !

आपण आपलें धर्मकार्य करीत आहां, असा आम्हांस दृढ विश्वास वाटत आहे.

महाराज ! आपण नागपूरच्या हिंदुमुसलमानांच्या तंटयाच्या वेळीं हिंदुसमाजाचें धुरीणत्व पत्करून जी अमोलिक कामगिरी केली, तीबद्दल आम्ही आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करितों.

महाराज ! आपण नागपूर येथें ' क्षात्रिय परिषद ' भरविण्याचा योग जुळवून आणून त्या परिषदेच्या स्वागताध्यक्षाचें काम उत्कृष्ट प्रकारें केलें व उत्तर हिंदुस्थानांतील आणि महाराष्ट्रांतील क्षत्रियांचें एकीकरण घडवून आणण्याचे प्रयत्न केले व तें कार्य पूर्णतेस नेण्यासाठीं आपले परिश्रम जोरानें चालूं आहेत, याबद्दल आह्मी आपले आभार मानतों. पुणें, कामठी इत्यादि ठिकाणीं झालेल्या हिंदूधर्मपरिषदांचें व रायगडावरील श्रीशिवछत्रपतींच्या स्मारकासारख्या समारंभाचें अध्यक्षत्व पत्करून आपण जी महत्वाची कामगिरी केली आहे, तिचा विसर आह्मांस केव्हांहि पडणें शक्य नाहीं.

महाराज ! आपण हिंदुसमाजाच्या व हिंदुधर्माच्या हिताच्या दृष्टीनें हिंदुसंघटन, शुद्धिकरण व अस्पृश्यतानिवारण या तीन कार्यांचें सुकाणूं आपल्या हातीं धरिलें असून तें परिस्थितीकडे सर्व बाजूंनीं लक्ष देऊन सावधगिरीनें चालविलेलें आहे, असा आह्मांस भरंवसा वाटत आहे; आणि ह्मणूनच आह्मी



वेळगांवच्या मानपत्रानंतर. मध्यभागीं राजेसाहेब.

पृष्ठ ३७८-३७९

[ K. P. Z. P. B. ]

अशी आशा करितों कीं, आपण त्या कार्याप्रीत्यर्थ स्वीकारलेल्या नायकत्वास भिन्न भिन्न मतांतरांच्या हिंदूंकडून परिपूर्ण पाठिंबा मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

महाराज ! आपण बाह्यतः हिंदुसमाजाचें व हिंदुधर्माचें कार्य जरी आपल्या हातीं घेतलें आहे, तरी तें भरतभूमींतील अन्य समाजांस व अन्य धर्मास विरोधक होणार नाहीं, अशी शक्य तेवढी खबरदारी आपण घेत आहां, याबद्दल आह्मांस आपला विशेषच गौरव करावासा वाटतो. हिंदभूमि ही सात्विकतेची, समानतेची व शांततेची मूर्तिमंत देवता आहे. शांततेचें साम्राज्य सर्व जगभर स्थापित करणें हा त्या देवतेचा अधिकार आहे. परांना जिंकणें ह्मणजे परांना आपलेंसें करून घेणें होय. परमेश्वर आपणास परंजय ह्या पदाची प्राप्ति करून देवो इतकींच त्याच्या चरणीं आह्मां बेळगांवकर हिंदूंची अनन्य भावानें प्रार्थना आहे.

बेळगांव. } **बेळगांवच्या हिंदु नागरिकांतर्फे.**
ता. २५ जुलै १९२७इ. } रावजी गंगाधर खोत,

**स्वागताध्यक्ष.**

हें मानपत्र वाचून दाखवीत असतांना प्रत्येक कलमाचे शेवटीं लोक टाळ्यांचा गजर करून आपली संमति प्रदर्शित करीत होते. 'गोब्राह्मणप्रतिपालक' हे शब्द असलेलें तिसरें कलम वाचलें जात असतांना 'आमचा यास विरोध आहे, हें कलम गाळून टाका,' अशी चार दोन मंडळींनीं ओरड केली; परंतु तें

कलम वाचून होतांच अधिक जोराची टाळी देऊन लोकांनीं आपली विशेष पसंती दाखविली.

## ब्राह्मण शब्दाबद्दल क्षणभंगुर विरोध.

याप्रमाणें मानपत्राचें वाचन संपल्यानंतर ' विरोधकांस कांहीं सांगणें असेल, तर त्यांनीं तें सांगावें, ' असें अध्यक्षांनीं सुचविलें, तेव्हां एका गृहस्थांनीं मानपत्राला विरोध दर्शविणारें एक पत्रक वाचून दाखविलें. त्या पत्राचा थोडक्यांत एवढाच भावार्थ होता कीं, ' गोब्राह्मणप्रतिपालक भोंसले ' असें न ह्मणतां त्यांतील 'ब्राह्मण' शब्द काढून टाकावा. अर्थात विरोधाची गुरुकिल्ली फक्त 'ब्राह्मण' या शब्दांतच होती. श्री. मराठे, श्री. रानडे, श्री. नगरकर, श्री. भीमराव पाटील, श्री. वामनराव कानविंदे, इत्यादिकांनीं भाषणें करून गोब्राह्मणप्रतिपालक याचा अर्थ उघड करून दाखविला. तरी कांहीं ब्राह्मणेतरपक्षांचें समाधान होईना. त्यांनीं गडबड सुरू ठेवलीच होती. नंतर अध्यक्ष श्री. खोत हेही बोलावयाला उठले. त्या वेळीं त्यांच्या भाषणांतील कांहीं शब्दांचा विपर्यास करून सभेंत जास्तच गोंगाट माजविण्याचा विरोधी लोकांनीं प्रयत्न चालविला. तेव्हां अध्यक्षांनीं दंगा न करण्याबद्दल विरोधी लोकांची हात जोडून क्षमा मागितली.

## राजाचा न्याय.

हा असा प्रकार चालू असतां श्री. राजेसाहेब मध्यंतरीं उठून उभे राहिले व त्यांनीं विरोधी लोकांना सवाल केला कीं, ' तुह्मी, जो विरोध करीत आहां, तो कोणत्या पक्षातर्फे ? ' या सवालाला, ' ब्राह्मणेतरपक्षातर्फे, ' असें उत्तर मिळालें. त्यावर राजेसाहेब ह्मणाले, ' तुमचा विरोध मानपत्रांतील ' ब्राह्मण ' या शब्दापुरताच आहेना ? ' त्यालाही ' होय ' हेंच उत्तर मिळालें. तेव्हां राजेसाहेब ह्मणाले, तुह्मीं जर ' ब्राह्मणेतर ' पक्षाचे खरे अनुयायी असाल, तर तुम्हांला ' ब्राम्हण ' या शब्दाबद्दल विरोध करण्याचा हक्कच प्राप्त होत नाहीं. तुमच्या पक्षाच्या ' ब्राम्हणेतर ' या नांवांतच ' ब्राम्हण ' शब्दाला प्राधान्य दिलेलें आहे. तेव्हां त्या नांवांतील ' ब्राम्हण ' शब्दाचेंच तुम्हांला उच्चाटन पहिल्यानें केलें पाहिजे, तरच नंतर मानपत्रांतील ' ब्राह्मण या शब्दाबद्दल तुह्मांला कायदेशीर विरोध करितां येईल.

या भाषणानें विरोधकांचे तोंड सहजच बंद झालें व जिकडे तिकडे शांतता फैलावली.

## निर्ढावलेला सभापति.

नंतर मानपत्राला उत्तर ह्मणून भाषण करतांना राजेसाहेब ह्मणाले, "आजच्या सभेंत जो थोडासा प्रकार झाला, तो कांहीं माझ्या अनुभवाला आलेला पहिलाच प्रकार नाहीं. यापूर्वीही असे प्रकार मला पहावयाला मिळालेले आहेत. त्यामुळें मला त्याबद्दल बरें किंवा वाईट कांहींच वाटत नाहीं." राजेसाहेबांच्या या शब्दांत गर्भितार्थ होता. 'ब्राह्मणेतर' पक्षाच्या लोकांनीं त्यांचेवर 'भटाळले' वगैरे शब्दांनीं टीकेचा भडीमार केलेलाच होता. परंतु या टीकेचा किंवा विरोधाचा त्यांच्या मनावर परिणाम होण्याचें कांहींच कारण नव्हतें. असे प्रसंग या वेळपर्यंत त्यांचेवर अनेक आले होते. असें असतां व असा प्रत्यक्ष विरोध चाललेला असतां त्याबद्दल त्यांना बरें किंवा वाईट कांहींच वाटत नाहीं, असें ह्मणण्याचा हेतु काय, याकडे कोणाचेंच आजपर्यंत लक्ष गेलें नव्हतें. याचा खरा हेतु आह्मीं 'वेदोक्त प्रकरणांत' दाखविल्याप्रमाणेंच होता. श्रीशाहुछत्रपति यांनीं 'ब्राह्मणेतर' पक्ष निर्माण केला; व त्या पक्षाला त्यांनीं आपलें पूर्ण पाठबळ देऊन हिंदुसंघटनेचें कार्य केलें. राजेसाहेबांनीं 'ब्राह्मण' पक्षाला पाठिंबा देऊन तेंच कार्य केलें. हे दोघे भोंसले बंधू आपल्या घराण्याचें कर्तव्यकर्म बजाविण्याकरितां जणों काय सराफी भांडणच करीत होते. अशा परिस्थितींत लोकांनीं त्यांचेवर टीका केली, तर त्यांत त्यांना बरें किंवा वाईट वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. या उभय भोंसले बंधूंचा खरा हेतु न समजल्यामुळें केवळ अज्ञानानें कोणीही वाटेल तसें बडबडत सुटला, तर त्याचा राजेसाहेबांचें मनाला बिलकूल विधिनिषेध वाटण्याचें प्रयोजन नव्हतें. एवढाच हेतु वरील त्यांच्या भाषणांत होता. राजेसाहेब पुढें ह्मणाले, 'आज येथें जमलेल्या माझ्या सर्व हिंदुबांधवांनीं मानपत्र वगैरे देऊन माझा जो बहुमतानें बहुमान केला, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. मला आतां जे चार शब्द सांगावयाचे आहेत, ते मला या किंवा त्या पक्षाचा अभिमान धरून सांगावयाचे नाहींत. 'ब्राह्मण' शब्दाच्या अर्थाबद्दल निरनिराळ्या वक्त्यांनीं स्पष्ट खुलासा केलाच आहे. तो योग्य आहे असें मला ह्मणावयाचें नाहीं व अयोग्य आहे असेंही मला सांगावयाचें नाहीं. तसेंच अध्यक्षांच्या तोंडून जे शब्द निघाले, तेही योग्य किंवा अयोग्य हेंही मी सांगत नाहीं.

## पुणेकरांस छत्रपतींची ओळख.

एकदां पुण्यांत मोठी सभा भरली होती. त्या वेळीं मीच अध्यक्ष होतों. अस्पृश्यांसंबंधानें विषय होता. मोठमोठे शास्त्री पंडीत हजर होते त्यांनीं अस्पृश्यतानिवारणाला आपली संमति दिली. अस्पृश्यांना स्पृश्य समजावें. त्यांना देवळांत देखील येऊं द्यावें, असें त्यांनीं आपलें मत दिलें. एकटाही ब्राह्मण त्या मताच्या विरुद्ध बोलला नाहीं. शेवटीं नरसोपंत केळकर बोलावयास उठले. त्यांच्या तोंडून असेंच कांहीं शब्द निघाले. ते ह्मणाले, ' ब्राह्मणांनीं आपलें काम केलें. पण कांही ' मराठे ' आतां काय करतात, याची धास्ती वाटते. मी ' मराठा, ' मला ते शब्द झोंबले. मी उठलों आणि विचारलें, ' अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न कोणापासून निघाला, हें माहीत आहे काय? कोल्हापूरचे कै० शाहू महाराज कोण होते? सांगा पाहू! ' त्याबरोबर टाळ्यांचा एकच कडकडाट झाला, आणि केळकर ह्मणाले, ' चुकलों. मी माझे शब्द परत घेतों. ' शब्द परत घेण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतें. पण बोलतांना असे शब्द जातात, व अशी मौज होते, एवढेंच मला दाखवावयाचें होतें. ' राजेसाहेबांच्या या भाषणावरून श्रीमंत कै० शाहू छत्रपतिमहाराज यांचेविषयीं राजेसाहेबांचे मनांत केवढा आदर व केवढें प्रेम होतें व उभयतांचें कार्य लोकांचे दृष्टीनें जरी भिन्न दिसलें, तरी तें भिन्न नसून अगदीं एकच स्वरूपाचें होतें, हें दिसून येतें.

## क्षत्रियांचा आत्मघात ह्मणजे पळिपंचपात्री हातांत.

पुढें राजेसाहेब ह्मणाले, " आतां ब्राह्मण श्रेष्ठ कीं क्षत्रिय श्रेष्ठ,. या वादावर मला कांहीं बोलावयाचें नाहीं. मी क्षत्रिय आहें व क्षत्रियत्वाबद्दल मला अभिमान आहे, इतकेंच मी सांगतों. क्षत्रियांचे अधिकार व कर्तव्यें काय आहेत, हें जर पाहिलें, तर ते मला फारच श्रेष्ठ वाटतात. ब्राह्मणांपेक्षां ते कमी श्रेष्ठ आहेत, असें मला मुळींच वाटत नाहीं. आतां ब्राह्मणांना आह्मी वंदन कां करितों? ते यज्ञयाग, अध्ययन-अध्यापनादि कामें करणारे आहेत. सारें आयुष्य त्यांना तसल्याच स्नान-संध्या, श्राद्ध-पक्ष, लग्नें वगैरे धार्मिक विधि करण्यांत घालवावयाचें असतें. ह्मणून त्यांचीं हीं कामें क्षत्रियांनीं करण्याची इच्छा करावी, याचें मला फार वाईट वाटतें. ब्राह्मण आपलीं यज्ञयागादि कामें बरोबर करीत नसतील, तर

तीं त्यांना करावयाला लावणें, हा क्षत्रियांचा अधिकार आहे. इतर त्रिवर्णियांचें नियंत्रण करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. त्यांनीं पळीपंचपात्री हातांत घेऊन् लग्नें लावीत, श्राद्धपक्ष उरकीत किंवा सत्यनारायणाच्या पूजा सांगत फिरणें, हें मला योग्य दिसत नाहीं. अशाप्रकारें क्षत्रियांच्या दोनचार पिढ्या गेल्यावर जर कधीं लढण्यासवरण्याचा प्रसंग आला आणि त्यांना कोणीं म्हटलें कीं, ' चला या आमच्याबरोबर ! ' तर त्या वेळीं ते ह्मणतील, ऊंहूं ! आमचें तें काम नाहीं. आह्मीं 'ब्राह्मण' आहों ! आज क्षत्रियांनीं ब्राह्मणांचीं कामें करणें म्हणजे त्यांनीं आपली संख्या कमी करून घेणें होय. " या राजसाहेबांच्या भाषणावरून ' वेदोक्त प्रकरणांत ' दाखविल्याप्रमाणें शस्त्र आणि शास्त्र एका वर्णाचे स्वाधीन असणें इष्ट नाहीं, ही गोष्ट त्यांनीं याही वेळीं ध्वनित केलीच आहे.

## आजा मेला, नातु झाला !

पुढें ते ह्मणाले, " हल्लीं हिंदुसंघटनेची भयंकर आवश्यकता उत्पन्न झाली असून, ती घडवून आणण्यासाठीं मोठमोठे थोर पुरुष तळमळत आहेत. अशा प्रसंगीं एका बाजूनें रात्रंदिवस आपल्यामध्यें असलेले ' ब्राह्मण, ' बाहेर हुसकून लावावयाचे व दूर लोटलेले ' अस्पृश्य, ' जवळ करावयाचे; ह्मणजे गोळाबेरीज जेवढ्यास तेवढीच ! ' आजा मेला आणि नातु झाला; ' घरांतील माणसांची बेरीज कांहीं वाढली नाहीं. हे जे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण आहेत, ते परमेश्वरानेंच आपल्या योजनेप्रमाणें केलेले असावेत, असें मला वाटतें. ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें ज्याला त्याला परमेश्वरानें वर्ण लावून दिलेला असेल. मला माझा क्षत्रिय वर्ण प्रिय वाटतो, इतकेंच मी निश्चयानें सांगूं शकतों. त्या वर्णाला उचित असेंच प्रत्येक ' खास ' क्षत्रियाचें वर्तन असावयास पाहिजे असें मला वाटतें. ' खास ' असा शब्द माझ्यादेखील तोंडून निघाला ! कितीही झालें तरी असे शब्द बोलण्यांत निघून जातात. सगळे वर्ण, सगळ्या जाती आपापल्या परीनें श्रेष्ठच आहेत. आपली जात, आपला धर्म, याची पर्वा न करितां अन्य धर्माच्या लोकांशीं विवाह करून रक्त दूषित करणें, मी केव्हांही चांगलें ह्मणणार नाहीं. धर्म, जात, कुल, शील, यांचीं बंधनें हानिकारक आहेत, असें ह्मणावयाला मी तयार नाहीं. प्रत्येकानें

आपल्या कुलाचें व जातीचें रक्त शुद्ध राखूनच आपली उत्तरोत्तर उन्नति करून घेऊन वाटेल तितकें दुसऱ्याच्या बरोबरीस यावें किंवा त्याच्याही-पेक्षां वर चढावें.

## अस्सल आणि कमस्सल.

" दोन पायांचा एक प्राणी आहे. हा प्राणी बेळगांवांत आहे किंवा नाहीं मला माहीत नाहीं. नसल्यास मी नागपुराहून मागवून बेळगांवकरांस दाखवीन. हा प्राणी ह्मणजे कोंबडा. या कोंबडयाच्या तीन जाती आहेत. या तीन्ही जातींच्या कोंबडयांचें पाणी तीन दर्जांचें आहे. पहिल्या जातीच्या कोंब-डयाला ' असील ' जातीचा कोंबडा ह्मणतात. या जातीच्या दोन कोंबडयांची झुंज तीन दिवसपर्यंत चालेल; पण त्यांतील एकटा ठार झाल्याशिवाय ती झुंज ते सोडावयाचे नाहींत. दुसऱ्या जातीच्या कोंबडयाला ' दोगला ' ह्मणतात ही मिश्र जात होय. या जातीचें कोंबडे तीनचार तास झुंजून दमले, ह्मणजे त्यांची झुंज आटो-पते. तिसरी एक कोंबडयाची जात आहे. तिला 'फिटियाल' असें ह्मणतात. या जातीचे कोंबडे चारपांच मिनिटें झुंजून उभयतांही दोन्हीकडे पळ काढतात! या उदाहरणावरून जातींजातींमधील रक्ताचे गुण कमी जास्त असतात, हें सहज कळण्याजोगें आहे. ह्मणून ज्यांना आपल्या जातीचा किंवा वर्णाचा अभिमान असेल, ते दुसऱ्या जातीशीं किंवा वर्णाशीं सोयरिक करून आपली किंवा त्यांची किंवा उभयतांची प्रजा कमअस्सल करण्याचें पाप अर्थातच करणार नाहींत. ज्यांनीं त्यांनीं आपापल्या जातीला व वर्णाला आपल्या कर्तबगारीनें अधिक उच्च दर्जा प्राप्त करून घ्यावा, यांतच सर्वांचें हित आहे; अशी माझी समजूत आहे. सर्व हिंदु बांधवांनीं परस्पर जातीशीं प्रेमानें व सलोख्यानें वागणें, हेंच श्रेयस्कर आहे. मला जें आपण मानपत्र दिलें आहे, त्याबद्दल मला मोठासा आनंद झाला आहे, असें नाहीं. आपण सर्वजण जर तें मला स्वसंतोषानें देत असाल, तरच मला आनंद वाटेल ( यावर ' सर्व ' ' सर्व ' असा एकच ध्वनी निघाला. उलट प्रकारचा ध्वनी कोठूनही निघाला नाहीं. ) तर मी आतां या मानपत्राचा मोठ्या आनंदानें स्वीकार करितों. "

असें बोलून कोणाच्या पोटांतील पाणी हालूं न देतां आपला आशय श्रोत्यांच्या अंत:करणावर उत्तम प्रकारें बिंबवणारें, सामोपचाराचें, मार्मिक व सुंदर असें आपलें भाषण राजेसाहेबांनीं टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत पुरें केलें. या मानपत्राबरोबरच, नागपूर येथील हिंदुमुसलमानांच्या लढ्यामध्यें राजेसाहेबांनीं महत्वाची कामगिरी केली, तिच्या स्मरणाकरितां एक सुंदर ' लाठी ' श्री. भीमराव पाटील, उपाध्यक्ष बेळगांव हिंदुसभा, यांचे हस्तें राजेसाहेबांना देण्यांत आली. सर्वांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांनीं ' शेवट गोड झाल्याबद्दल ' आनंद प्रदर्शित करून सभा बर्खास्त केली.

## प्रामाणिक विरोध—खरी देशभक्ति.

या मानपत्राच्या समारंभाच्या वेळीं पक्षाभिमानानें प्रेरित झालेल्या कांहीं मंडळींनीं विरोध करण्याच्या बुद्धीनें थोडी फार गडबड केली, तरी राजेसाहेबांच्या भाषणानें सर्वांचें समाधान झालें, ही गोष्ट विशेष समाधानाची झाली. राजेसाहेबांचें भाषण चालू असतांना ब्राम्हण--ब्राम्हणेतरांच्या प्रचंड समुदायानें शांततेनें राहून समारंभ थाटानें यथासांग सिद्धीस नेण्यांत जी वीरवृत्तीची अनुपम शिस्त दाखविली, त्यायोगानें बेळगांवच्या इतिहासांत हा प्रसंग चिरस्मरणीय होऊन राहील यांत शंका नाहीं. या प्रसंगीं ज्यांनीं आपल्या प्रामाणिक बुद्धीनें विरोध केला,—मग तो गैरसमजुतीचा असो किंवा पक्षाभिमानानें केलेला असो—उघडपणें विरोधाचीं हस्तपत्रकें काढून व तीं सभेंत वाचून दाखवून आपलीं मतें लोकांना समजावून देण्याचें धैर्य दाखविलें, त्याबद्दलही विरोधी मंडळी नि:संशय स्तुतीला पात्र आहेत. आपल्या प्रामाणिक बुद्धीला खरोखर जसें वाटतें, तसें बोलून दाखवून व त्याप्रमाणें कृतींत उतरविण्याचा जे लोक प्रयत्न करतात, तेच खरे कळकळीचे राष्ट्रभक्त असतात. मनांत एक व कृति भलतीच असे दांभिक लोक राष्ट्राचा केव्हांही घातच करणारे असतात. यावरूनही विरोध करणारी मंडळी खरे देशसेवक व खरे देशभक्त आहेत, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. या सभेंतील प्रचंड लोकसमुदायाला राजेसाहेबांसारख्या थोर गृहस्थांच्या मानपत्राला विरोध करणाऱ्या लोकांचा बराच संताप आला होता; परंतु राजसाहेब हे पूर्ण शांत व गंभीरपणानें हा प्रकार पहात आनंदानें बसले होते व शेवटीं आपल्या भाषणानें त्यांनीं सर्वांचें समाधानही केलें.

या सर्व प्रकारावरून ' परंजय ' म्हणजे परांना जिंकणारा, म्हणजे परांना आपलेंसें करून घेणारा, ही जी पदवी मानपत्राच्या योगानें राजेसाहेबांना मिळाली, ती सार्थ होती, असें तेथेंच सर्वांच्या नजरेला येऊन चुकलें.

या मानपत्राच्या बाबतींत निरनिराळ्या पत्रांतून प्रशंसावर लेख आले. त्यांपैकीं ' श्रद्धानंद ' पत्रांतील मजकूर विशेष मार्मिक असल्यानें त्याचा उतारा येथें दिला आहे.

## श्रद्धानन्दांतील उतारा.

# बेळगांवची सभा.

"बेळगांव ह्मणजे कर्नाटकाची राजधानी. गेल्या २५वर्षांतील राजकीय चळवळींत बेळगांवनें महत्वाची कामगिरी केलेली आहे. अर्थात तेथील मारुतीच्या देवळांत सभा भरवून तेथील हिंदु नागरिकांनीं धर्मवीरांना जें मानपत्र अर्पण केलें, त्यांत कर्नाटकाचें हृद्गत प्रतिबिंबित झालेलें आहे, असें ह्मणावयास प्रत्यवाय नाहीं. हिंदुसभेच्या प्रत्येक बाबीला व एकंदर विचार-सरणीला त्यांत निःसंदिग्ध रीतीनें मान्यता दिलेली आहे. इतकेंच नव्हे तर हिंदूनीं हल्लींच्या पुढें पाऊल टाकून बचावाबरोबर कांहीं प्रसंगीं चढावाचें धोरण स्वीकारण्यासही हरकत नाहीं, असें त्यांत ह्मटलें आहे. " हिंदुसंघटना ही हिंदुमुसलमानाच्या म्हणजेच देशाच्या ऐक्यास विघातक गोष्ट नसून तें ऐक्य लवकर घडवून आणण्याचीच गुरुकिल्ली आहे. वैरभावाचा खेळ खेळण्याचा प्रसंग आल्यास तो न खेळणें ह्मणजे असत्याच्या दंडेलीखालीं सत्यानें मरून जाण्यास राजी होणें होय. सत्याला स्वतः मरण्याचा अधिकार नसून असत्याचा पाडाव करण्याचाच विशेष अधिकार आहे. ह्मणून आपला सनातन हिंदुधर्म जर सत्य असेल तर तो मरूं देतां कामा नये; आणि ह्मणूनच त्या धर्मांतून निसटून गेलेल्या लोकांसच नव्हे, तर खास परधर्मीय लोकांनामुद्धां आपल्या सनातन हिंदुधर्माची श्रेष्ठता, पवित्रता व पूज्यता पटवून देऊन स्वधर्मांत घेण्यास आपण जीवापाड खटपट केली पाहिजे. " हे......उद्गार खरोखर तेजस्वी आणि वीरवृत्तीचे आहेत. "

प्रकरण १९ वें.

# महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद.

## तृतीय अधिवेशन, सांगली.

सन १९२९ च्या जून महिन्याच्या पहिले तारखेस सांगली मुक्कामीं महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचें तिसरें अधिवेशन झालें. या अधिवेशनाकरितां परिषदेच्या स्वागत मंडळानें एकमतानें श्रीमंत राजे लक्ष्मण रावसाहेब भोंसले यांची निवड केली. ही निवड करण्यांत सांगलीच्या व्यायाम प्रेमी लोकांची विशेष कुशलता होती. कारण, सांगली हें शहर संस्थानी स्वराज्यापैकीं असलेमुळें परिषदेच्या अध्यक्षाची योग्य निवड होऊन तो अध्यक्ष परिषदेला लाभणें, हेंच मोठें नाजूक काम होतें. परिषदेच्या स्वागत मंडळाला पूर्णपणें अध्यक्ष पटणारा व त्याचप्रमाणें सांगलीच्या राजदरबाराला तो अमान्य नसलेला अशाच अध्यक्षाची निवड व्हावयाला पाहिजे होती. ह्मणून, असा अध्यक्ष लाभण्यावर परिषदेच्या सर्व यशाची मदार होती. सन १९२८ इ. मध्यें श्रीमंत भोंसले राजे हे सांगलीस औषधोपचाराकरितां सांगली दरबारचे पाहुणे ह्मणून महिने दोन महिने रहाण्याकरितां आले होते राजवैद्य आबासाहेब सांभारे यांचा त्यांना औषधोपचार सुरू होता. त्या वेळीं सांगलीच्या व्यायामप्रेमी लोकांचा राजेसाहेबांना थोडाबहुत परिचय झाला होता. त्याचप्रमाणें लोकांमध्येंही राजेसाहेबांच्या शस्त्रविद्येबद्दल व मल्लविद्याविशारदतेबद्दल बराच बोलबाला झाला होता. याशिवाय राजेसाहेबांच्या धार्मिक आणि सार्वजनिक कामगिरीची ख्याति वर्तमानपत्राच्याद्वारें सर्वांना कळलेलीच होती. तेव्हां सांगलीच्या शारीरिक शिक्षण परिषदेला राजेसाहेबांच्यासारखा अध्यक्ष लाभल्यास परिषदेचें अधिवेशन यशस्वी रीतीनें पार पडेल, असें सर्वांना वाटणें स्वाभाविकच होतें. या परिषदेच्या स्वागतमंडळाचे अध्यक्ष तेथील सुप्रसिद्ध डॉक्टर देसाई हे होते. ते

तेथील जिमखान्याचे पुरस्कर्ते असून नितांत व्यायामप्रेमी असल्यामुळें आणि लोकदरबारांत आणि राजदरबारांत त्यांचेबद्दल सारखीच आदरबुद्धि असल्यानें त्यांना स्वागताध्यक्षाचा मान मिळाला होता. त्या वेळीं धर्मवीर राजे भोंसले यांचा मुक्काम नाशिक येथें उन्हाळ्याप्रीत्यर्थ होता. तेथें स्वागतमंडळातर्फे मंडळींनीं जाऊन राजेसाहेबांची भेट घेतली व परिषदेचें अध्यक्षस्थान मंडित करण्याबद्दल विनंति केली. तो विषय भोंसले घराण्याच्या जिव्हाळ्याचा असल्यामुळें त्यांच्या विनंतीला राजेसाहेबांनीं मान दिला. राजेसाहेबांचा रुकार मिळाला, ही बातमी स्वागतमंडळाला समजतांच परिषदेच्या यशस्वितेबद्दल व अपूर्वतेबद्दल कोणाला शंका उरली नाहीं. अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष उभयतांही लोकमान्य व राजमान्य आणि स्वतः सांगली संस्थानाधिपतींचा या परिषदेला शुभाशीर्वाद असा त्रिवेणी संगमाचा योग जमल्यामुळें परिषदेच्या कार्यकर्त्यांना विशेष उमेद व उत्साह येऊन ते नेटानें परिषदेच्या कार्याला लागले.

महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेच्या अंतर्गत, ध्वजारोपणाचा समारंभ, व्यायामाच्या उपकरणांचें प्रदर्शन, कुस्त्या, दांडपट्टा, हुतुतू, नमस्कार वगैरेंचे सामने वगैरे वगैरेंची व्यवस्था कडेकोट करण्यांत आली. तारीख १ जून रोजीं परिषदेचे नियोजित अध्यक्ष धर्मवीर राजेसाहेब लक्ष्मणराव भोंसले हे सांगलीस सकाळीं ६॥ वाजतां येऊन पोंचले. स्वागतमंडळातर्फे वैद्य खाडीलकर व श्री. दत्तोपंत रानडे बुधगांव स्टेशनवर त्यांना सामोरे गेले होते. मिरज स्टेशनावर तेथील अंबाबाई तालीम संस्थेतर्फे अध्यक्षांना हार घालण्यांत येऊन पानसुपारी झाली. खुद्द सांगली स्टेशनवर त्यांचें स्वागत करण्याकरितां परिषदेचे स्वागताध्यक्ष, स्वयंसेवक व इतर अनेक प्रमुख मंडळी आली होती. डब्यांतून उतरल्याबरोबर स्वयंसेवकांच्या खास समर्थपथकानें अध्यक्षांना सलामी दिली आणि परिषदेतर्फे स्वागताध्यक्षांनीं हार घातल्यानंतर त्यांची स्वारी खणबंगल्याकडे रवाना झाली. त्या बंगल्यांत सांगली दरबारचे पाहुणे ह्मणून राजेसाहेबांची राहण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. साडेसात वाजतां उघड्या मोटारींतून अध्यक्षांची मिरवणूक काढण्यांत आली. मिरवणुकीच अग्रभागीं बँड, त्याच्यामागें लाठीदल, त्याच्यामागें लेजीम पथकें, मोटारीच्याजवळ भालाईत व तिच्यामागें प्रमुख नागरिक व प्रतिनिधी अशी व्यवस्थित

चित्ताकर्षक रचना करण्यांत आली होती. वाटेंत नव्या पेठेंत व्यापारी वर्गातर्फे, बालाजीच्या चौकांत तरुण हिंदुसभा व गाडगीळ यांचे कापडाचे दुकानातर्फे, मंडपाच्या द्वाराशीं सिटी हायस्कूल व श्रीसमर्थ व्यायामशाळा इत्यादि प्रमुख संस्थांनीं अध्यक्षांना हार घालून त्यांचा सन्मान केला. याप्रमाणें ठिकठिकाणीं लेजिम वगैरे खेळ खेळत आणि प्रेक्षक समुदाय वाढवीत वाढवीत मिरवणूक ९॥ वाजतां परिषदेच्या मंडपांत पोंचली. मंडप व जवळचा रस्ता कमानी उभारून व तोरणें पताका बांधून उत्तम शृंगारिला होता.

अध्यक्षांची मिरवणूक सभास्थानीं आल्यानंतर कार्याध्यक्षांनीं त्या दिवसाचा कार्यक्रम सांगून ध्वजावंदन आणि प्रदर्शन—अनावरण हे समारंभ त्याच वेळीं होणार असल्याचें जाहीर केलें. पुण्याचे देशभक्त श्री. नारायणराव गुंजाळ, यांचे हस्तें ध्वजावंदनाचा व सांगलीचे प्रमुख व्यापारी शेठ दीपचंद भाईचंद व्होरा वकील, यांच्या हस्तें व्यायामाच्या उपकरणाचें प्रदर्शन उघडण्याचा, असे दोन्हीही समारंभ थाटानें करण्यांत आले. सायंकाळीं कुस्त्या, हुतुतू वगैरेंचे सामने झाले.

दुसरे दिवशीं ह्मणजे रविवार ता. २ जून रोजीं दुपारीं साडेबारा वाजतां परिषदेच्या कामाला सुरवात झाली. व्यायामविषयक उपदेशक ह्मणी, पताका वगैरेंनीं मंडप शृंगारला होता. अग्रभागीं शक्तिदेवता श्रीबलभीमाची मूर्ती हार घालून मांडण्यांत आली होती. सुमारें हजार बाराशें प्रेक्षकांचा समावेश होईल, अशी व्यवस्था करण्यांत आली होती. महाराष्ट्रांतील अनेक पाहुणे, प्रतिनिधी, प्रेक्षक, स्त्रीसमाज यांनीं मंडप चिकार भरून गेला होता. नियोजित अध्यक्षांची स्वारी बरोबर साडेबारा वाजतां सभास्थानीं आली. स्वयंसेवकांच्या सलामी वगैरे होऊन अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर स्वागतपर गीतगान प्रार्थना वगैरे आटोपलें. नंतर अध्यक्षांची निवड रीतसर झाली. परिषदेला यशश्चिंतनपर आलेले संदेश वाचून दाखविण्यांत येत असतां सांगली संस्थानाधिपति श्रीमंत सर आप्पासाहेब पटवर्धन यांचें आगमन परिषदेच्या सभास्थानीं झालें. अध्यक्ष राजे भोंसले यांनीं परिषदेतर्फे टाळ्यांच्या गजरांत त्यांना पुष्पहार घातला व अध्यक्षपदा-वरून आपलें प्रास्ताविक भाषण सुरू केलें.

श्रीमंत राजेसाहेब आपल्या प्रास्ताविक भाषणांत श्रीमंत सर आप्पासाहेब आणि सन्मान्य बंधु भागिनींना उद्देशून ह्मणाले:—

" आपण आज मला या महाराष्ट्र-शारीरिक-शिक्षण-परिषदेच्या अध्यक्षपदाचा हा जो मान दिला, याबद्दल मी आपला आभारी आहें. त्याचप्रमाणें येथील संस्थानाधिपति श्रीमंत सर आप्पासाहेब महाराज यांनींहि या गोष्टीला आपली अनुमति दिली, याबद्दल मी त्यांचाहि आभारी आहें.

## अध्यक्षपद कां स्वीकारलें ?

" गेल्या दोन अधिवेशनांच्या अध्यक्षांप्रमाणें या अधिवेशनास जर एखादा विद्वान अध्यक्ष लाभला असता तर, माझ्या मतें याहीपेक्षां या परिषदेचें कार्य विशेष महत्वाचें झालें असतें. परंतु, येथील स्वागत–मंडळानें माझी निवड करून आपल्यातर्फे माझी संमति घेण्याकरितां जेव्हां कांहीं मंडळी माझ्याकडे पाठविली आणि मला आपला मनोदय कळविला, तेव्हां अध्यक्षपदाबद्दल माझ्या योग्यायोग्यतेच्या विचारांनीं व कल्पनांनीं हें अध्यक्षांचें स्थान, दुसऱ्याच एकाद्या विद्वानानें स्वीकारावें अशी माझी मनोदेवता मला सुचवूं लागली. पण त्याच क्षणीं श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांच्या महाराष्ट्रांतील क्रीडांगणांत, श्रीमंत परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या निवासक्षेत्रांत आणि महाराष्ट्रांतील एका सुधारलेल्या हिंदी संस्थानी स्वराज्यांत, ज्या ठिकाणीं पूर्वीच्या लोकांना शारीरिक शिक्षण जन्मतःच मिळालेलें असें; डोंगर, दऱ्या, खोरीं हीं ज्यांचीं टेनिस–कोर्टें किंवा क्रिकेट ग्राऊंडस् होतीं; लढाईंतील आट्यापाट्यांचे खेळ खेळण्याकरितां, कृष्णानदीप्रमाणें वैभवशाली नद्यांचें ज्यांना पाठबळ होतें; ज्या महाराष्ट्राच्या पुण्यभूमींत श्रीछत्रपति संभाजीमहाराजांप्रमाणें भीमशक्ति माणसें निर्माण झालीं व श्री० कै० छत्रपति शाहुमहाराजांप्रमाणें भीमशक्तीचीं माणसें आह्मीं प्रत्यक्ष पाहिलीं; अशाप्रकारच्या नानाविध कल्पनांचा चित्रपट डोळ्यांसमोरून सारखा जाऊं लागल्यानें अध्यक्षपदाचा मान मिळत आहे, याच आनंदांत माझ्या योग्यायोग्यतेचा विचार मावळून हें अध्यक्षपद ' स्वीकारल्याचें ' मीं येथील स्वागत-मंडळास कळविलें. या बाबतींत असाहि एक विचार मनाला स्पर्श करून गेला कीं, शारीरिक शिक्षण ही भोंसले घराण्यांत वंशपरंपरेनेंच स्वभावतः चालत

आलेली देणगी आहे; ज्यामुळें भोंसले कुळाचा एका काळीं अभ्युदय झाला व पुढेंहि कदाचित् दैववशात् त्याचमुळें होईल, हेंच शारीरिक शिक्षण आमच्या भोंसल्यांचें खरें जीवन होतें व आहे आणि पुढेंहि आपणां सर्वांप्रमाणें यावरच त्याला जगावें लागणार आहे, या विचारांच्या उसळीला बळी पडून मीं हें अध्यक्षस्थान स्वीकारिलें आहे ! आतां सर्वतोंपरीं तें निभावून घेऊन या परिषदेचें कार्य अमोल करणें हें आपणां सर्वांच्या सहकारितेवर अवलंबून आहे, असें सांगून मी माझ्या मुख्य विषया-कडे वळतों. सृष्टीचा नियमच असा आहे कीं, कोणत्याहि कार्याला कार्यकारणभाव असावा लागतो, भूक लागल्याशिवाय कोणाला जेवावें असें वाटत नाहीं, किंवा तहान लागल्याशिवाय कोणी पाण्याची अपेक्षा करीत नाहीं. कॉंग्रेस अस्तित्वांत कां आली ? हिंदुसभा कां स्थापिली गेली ? शेतकरीसंघ निर्माण होण्याची कां आवश्यकता भासली? कोणत्या ना कोणत्या कार्याला कारण हें असावें लागतेंच.

## परिषदेच्या स्थापनेचें कारण.

" ह्याप्रमाणें ही महाराष्ट्र-शारीरिक-शिक्षण-परिषद भरण्यालाहि तशींच कारणें झालीं, ह्मणूनच आज ही परिषद भरवावी लागत आहे. या परिषदेचें हें तिसरेंच अधिवेशन आहे, यावरूनच ही परिषद भरविण्याचें कारण चार पांच वर्षांपूर्वीच घडलें असावें, असें अनुमान निघतें. गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत काठीला सोनें बांधून काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत प्रवास केला तरी चोरांपासून भीति वाटत नव्हती किंवा रात्रीं अपरात्रीं एकट्यानें हिंडलें तरी कोणी अपणांला ठार मारील अशी धास्ती वाटत नव्हती. एवढा निर्भयतेचा काळ दयाळु इंग्रज सरकारचे राज्यांत गेला. या अवधींत जीवन आणि वित्त यांच्या रक्षणाची जबाबदारी कोणावरहि पडली नसल्यानें शारीरिक शिक्षणाची कोणालाच आवश्यकता वाटली नाहीं. परंतु, नागपूर आदिकरून हिंदुस्थानांतील पुष्कळ ठिकाणीं झाल्यामुळें हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांमुळें आत्मसंरक्षणाची जबाबदारी नेहमीं होतां होईल तों 'स्वत:वरच घेणें बरें' ही जाणीव 'परस्वाधीन जीवित' आहे, असें मानणाऱ्या हिंदु-समाजाला झाली व तेव्हांपासून शारीरिक शिक्षणाशिवाय तरणोपाय नाहीं, अशी खात्री होऊन त्या दिशेने प्रयत्न होऊं लागले. त्याच-पैकीं शारीरिक-शिक्षण-परिषद हा एक प्रयत्न होय ! आमच्या मुसलमानबंधूंनीं

आह्मांस शारीरिक शिक्षणाच्या उदासीनतेंतून जागृत करून त्याचे पाठ पढविण्यास लाविलें, हे त्यांचे आह्मांवर अनंत उपकारच आहेत, असें मानण्यास हरकत नाहीं.

" असो. आतां शारीरिक शिक्षण घेण्याचा " काळ आला ह्मणून ह्मणा " किंवा " आत्मसंरक्षणाकरितां ह्मणून ह्मणा " अगर " ऐहिक व पारमार्थिक सुखप्राप्तीचें सुदृढ शरीरसंपत्ति हें एक साधन आहे ह्मणून ह्मणा, कोणत्याहि कारणामुळें ह्मणा, सध्यां शारीरिक शिक्षणाची अत्यंत जरूरी आपणांला वाटत आहे, एवढी मात्र गोष्ट सत्य आहे. त्या दृष्टीनें शारीरिक शिक्षणाची मीमांसा करण्याकडे आपण वळूं.

## शारीरिक–शिक्षणमीमांसा.

"शारीरिक शिक्षणांत शरीर सुदृढ बनविणें, सुदृढ शरीर टिकविण्यास शिकणें, सुदृढ शरीर होण्यास पोषक द्रव्यांची योजना करणें, शरीरसंपत्तीचा ऱ्हास करणाऱ्या गोष्टींपासून अलिप्त रहाणें आणि आत्मसंरक्षण करतां येणें इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होतो. शरीर सुदृढ, बांधेसूद आणि निरोगी होण्यास कसरतीशिवाय अन्य साधन नाहीं. कुस्ती, मल्लखांब, जोडी, दंड, बैठका वगैरे तालीमखान्यांतील खेळ आणि आट्यापाट्या, खोखो, विटीदांडू, पळणें, पोहणें वगैरे बाहेरील खेळ हे आपल्या हिंदी पद्धतीचे सर्व खेळ खेळल्यानें शरिराच्या सर्व भागांस सारखी मेहनत होऊन शरीर सुदृढ बनतें. ज्यांना घराबाहेर जाण्याची सवड होत नाहीं, त्यांनीं नमस्काराचा व्यायाम घ्यावा. या व्यायामांत दोन फायदे होतात. एक उत्तम व्यायाम होतो व दुसरें धार्मिक दृष्टीनें त्याचें मोठें महत्व आहे. ऐहिक आणि पारमार्थिक असे दोन्हीहि मार्ग नमस्कार घातल्यापासून साधतां येतात.

## पैशाचा खेळ कीं खेळाचा पैसा !

" पाश्चिमात्य खेळांपैकीं क्रिकेट, टेनिस, हॉकी, फुटबॉल, बॉक्सिंग, डंबेल्स् वगैरे खेळांनींहि सर्व शरिरांस श्रम होऊन तें सशक्त बनूं शकतें. पण तशा पद्धतीचे खेळ आपल्या मुलांना सर्वसाधारण पद्धतीनें घेतां येतील किंवा नाहीं याचा विचार करणें झाल्यास तो मात्र आपल्या आर्थिक दृष्टीनें करावा लागेल. सांप्रत हिंदुस्थानची व त्यांतल्या त्यांत हिंदूंची आर्थिक दृष्टीनें इतकी अवनति झालेली आहे कीं, पूर्वकालीं प्रत्यक्ष शत्रूंचीही अशी दैना झालेली लोकांना बरी वाटत नसे. 'दांतीं तृण' धरून

येणाऱ्या शत्रूला आपले पूर्वज जीवदान देत असत. पण सध्यां तृणांवर आमच्यांतील कित्येकांना आपलें जीवित कंठावें लागत आहे, तरी त्यांकडेसुद्धां आम्ही डोळेझांक करून त्यांनी मरू देत आहोंत. अशा आर्थिक अनवस्थेच्या पेंचांत सर्वसाधारण जनता असल्यानें पाश्चिमात्य पद्धतीचे श्रीमंती खेळ त्यांनीं खेळण्यास शिकावें, असें आह्मांस वाटत नाहीं. हे पाश्चिमात्य खेळ करमणुकीचे किंवा शरीर-सुधारणेचे केवळ नसून ते फक्त पैशाचेच खेळ आहेत, असें ह्मटल्यास तें अतिशयोक्तीचें आहे असें कोणाला वाटणार नाहीं. आपले पौर्वात्य खेळ हे पैशाचे खेळ नसून करमणुकीचे व श्रमाचे खेळ आहेत हें कांहीं उदाहरणांवरून आपणांस सिद्ध करून देत आहें. उदाहरणार्थ, विटीदांडू करण्याला एक पैशाचाहि खर्च नाहीं, पण तो खेळ खेळतांना एका बाजूला २५ गडी व दुसऱ्या बाजूला २५ गडी हा खेळ खेळून एका तासांत दमून जातात. त्याचप्रमाणें आटयापाटया अगदीं कोठेंहि बिनधोकपणें खेळतां येण्यासारख्या असून खेळायला पैशाचा खर्च नाहीं; पण उत्तम श्रम होऊन करमणूक मात्र फुकटांत पदरांत पडते. याचप्रमाणें इतर देशी खेळ असेच आहेत. असेच बिन पैशाचे खेळ खेळून हिंदी मल्ल-विद्या-विशारद गामा पैलवान यांनीं पैशाचे खेळ खेळणाऱ्या जगविख्यात झिस्कोला पराभूत करून खेळाचे पैसे मात्र जिंकले. तात्पर्य, एवढेंच कीं, आपले देशी खेळ हें पैशाचे खेळ नसून प्रसंगविशेषीं खेळाचे पैसे करणारे आहेत. व तेच सध्यांच्या काळाला, व परिस्थितीला योग्य आहेत, अशी आमची समजूत आहे.

## ब्रह्मचर्य ! ब्रह्मचर्य !!

" आतां शरीर सुदृढ बनविण्याकरितां व्यायामाची आवश्यकता आहे, व तो व्यायाम कोणते खेळ खेळल्यानें होतो, यासंबंधीं थोडक्यांत माझे विचार सांगितले. पण व्यायामानें शरीर सुदृढ झाल्यानंतर ते कसे टिकवावें, याचीही जबाबदारी आपल्यावरच पूर्णपणें आहे, हें मात्र आपण विसरतां कामा नये ! द्रव्य संपादन करणें, हें जसें महत्त्वाचें कार्य आहे, तसेंच तें रक्षण करणें हेंहि महत्त्वाचें आहे; किंबहुना जास्त महत्वाचें आहे. तसेंच या शरीरसंपत्तीचें आहे. संपत्तीच्या आंगीं उन्माद करण्याची जशी शक्ति आहे, तशीच या शरीरसंपत्तींतहि आहे. त्याकारितां तिचा उन्माद न होईल अशा पथ्यानेंच वागलें पाहिजे. याला मुख्य पथ्य ह्मणजे ब्रह्मचर्य हें होय ! ब्रह्मचर्य हें नराला

'नारायण' करणारें, वीराला प्रभावशाली बनविणारें, आयुर्मर्यादा वाढविणारें, बुद्धि आणि सामर्थ्य यांत तेजस्विता उत्पन्न करणारें एक अमोघ मंत्रसाधन आहे. याची ज्यानें जोपासना केली तोच खरा नरश्रेष्ठ होय. आतां आपण सर्वच भीष्माचार्य किंवा श्रीबलभीम मारुतिराय व्हावें, ह्मणण्याचा आमचा आशय नाहीं. तर प्रत्येक सामर्थ्यसंपन्न होऊं इच्छिणाऱ्या तरुणानें वयाच्या कमींत कमी २५ वर्षेपर्यंत आपलें पूर्ण ब्रह्मचर्य पाळावें, असें आमचें सांगणें आहे. व पुढेंहि आपली नीतिमत्ता संरक्षण करून आयुर्वेदांत दिनचर्या व रात्रिचर्या या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें वर्तन ठेवावें, व तेंच परिणामीं हितकर आहे. आयुर्वेदशास्त्र हें बल, आयु, यांच्या संवर्धनाकरितां व रोगविमोचनाकरितांच अस्तित्वांत आलें आहे. त्याच्याकडे कोणीं कधींहि डोळेझांक करतां कामा नये. सध्यांच्या काळांत मुलांच्या आईबापांना वाटत असतें कीं, माझ्या मुलाचें लग्न केव्हां होईल, त्याला संतति केव्हां होईल, यापलीकडे त्यांचें लक्ष नसतें. त्याच्या आरोग्याकडे किंवा त्याच्या शरीरसंपत्तीकडे ते पूर्ण उदास असल्याप्रमाणें दिसतात. आणि त्यामुळेंच आज पंचवीस वर्षांच्या मुलांचे व मुलींचे केंसहि पांढरे होऊन त्यांना बालपणींच वार्धक्य आलेलें दिसतें. आपणांला एरंडाचें झाड माहित आहे. तें एकदम वाढून मोठें होतें, त्याला फळें लौकर येतात आणि त्याचा अंतहि त्याचप्रमाणें लौकर होतो. परंतु तोच आम्रवृक्ष घ्या. धीरे धीरे वाढतो, त्याला दीर्घकालानें फळें लागूं लागतात व त्यामुळेंच त्याचें आयुष्यही तसेंच दीर्घकाल असतें. या सृष्टिनियमाप्रमाणें मनुष्याचेंहि आहे. पूर्वी तीस वर्षांच्या मनुष्यास मुलगा समजत असत. त्याला ४० वर्षांच्या सुमारास मूल होत असे. ह्मणूनच त्याचें आयुष्य सहज शंभर वर्षांवर जात असे. सध्यां हिंदुस्थानांत मुलाला १८ वर्षांच्या आंतच मूल ! आणि ४० वर्षांच्या आंतच समाधि !! असा प्रकार दिसून येत असलेला आपण पहातोंच आहों ! यापासून आपणांला काय उपदेश घेतां येण्यासारखा असेल तो घ्यावा. सध्यां आपल्या समाजाला पाश्चिमात्य लोकांचें अनुकरण करण्याचें एक जबरदस्त व्यसन लागलें आहे आणि ज्या ज्या गोष्टींत त्यानें त्यांचें अनुकरण केलें आहे, त्या त्या बाबतींत त्यानें फारच प्रगतिहि केलेली आपल्या अनुभवाला येईल. या बाबतींत नमुन्यादाखल चहापान घेऊं.

# चहापान कीं विषपान !

"या चहापेयाचा प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे आला. नदी ज्याप्रमाणें उगमाच्या ठिकाणीं संकुचित असते व ती पुढें जशी वहात जाईल तसतसा तिचा प्रवाह मोठमोठा होत जातो व ती ज्या ठिकाणीं मिळते त्या ठिकाणीं तिचें रूप ज्याप्रमाणें विशाल असतें, त्याप्रमाणें, या चहापेयाची नदी पश्चिमेकडून निघून पूर्वेकडे हिंदुस्थानाला येऊन मिळाली; नदी उगमाच्या ठिकाणीं जशी नेहमीं मर्यादितच असतें त्याप्रमाणें हें चहापान अद्यापि पश्चिमेकडे मर्यादित आहे. परंतु तें हिंदुस्थानांत इतकें अमर्यादित आणि विशाळ झालें आहे कीं, कित्येक लोक केवळ चहापानावर आपला जीव धरून राहिलेले दिसतात ! पश्चिमेकडे जर प्रत्येक मनुष्य दोन वेळां किंवा चार वेळां चहा घेत असेल, तर आमचे हिंदी लोक अनुकरणप्रिय असल्यानें दिवसांतुन १५–२० कप सहज लीलेनें पचविणारे प्रगतिप्रिय वीर आहेत. धन्य हे वीर ! धन्य त्यांची अनुकरणप्रियता !! पश्चिमेकडील हिमप्रदेशांतील थंड हवेंत या चहापानापासून शरिरांत उष्णता उत्पन्न होते खरी, पण आमचे अनुकरणप्रिय वीर हिंदुस्थानासारख्या उष्ण प्रदेशांत ज्या ठिकाणीं उन्हाळ्यांत १२० डिग्रीपर्यंत उष्णतेचें हवामान असतें, ज्या प्रदेशांत सनस्ट्रोक होतात, अशा उष्णतम प्रदेशांतहि चहाचें आकंठ पान करून आपलें रक्त जाळून घेतात, रोगाचें आपणाला माहेरघर करतात, आयुष्याचा नाश करतात, जन्मतः क्षयरोगी संतति निर्माण करतात. अशा लोकांना अनुकरणप्रिय ह्मणावें कीं आत्मघातकी, संतानघातकी, समाजकंटक किंवा देशद्रोही ह्मणावें हेंच आह्मांला समजत नाहीं. त्यांना काय म्हणावें, हें आपणच आपल्या मनाशीं ठरवा ! ह्या चहापानाच्या आक्काबाईनें जेव्हां हिंदुस्थानावर स्वारी केली, त्या वेळेपासून आह्मां लोकांची दुधाची तहान पाण्यावर भागू लागली ! त्या वेळेपासून आमच्या क्षीरसागर ज्या गोमाता त्यांची स्वाभाविकच उपेक्षा होऊं लागली ! गोमातांची उपेक्षा होण्याबरोबरच कृषिकर्मवाहक जे वृषभ त्यांची पैदास कमी झाली ! त्यांच्यापासून उत्पन्न होणारें खत शेतांत कमी पडूं लागलें, त्यामुळें धान्य निःसत्व निघूं लागलें; अपक्व व निःसत्व धान्य सतत भक्षण करीत गेल्यानें मलेरियासारखे दुष्ट रोग उत्पन्न झाले; त्या रोगांच्या शमनाकरितां क्विनाईनच्या रतिबामुळें क्षय, पंडूसारखे मूर्तिमंत काळरोग त्याला भक्षण करूं लागले ! अतएव एका चहापानरूपी अक्काबाईनें शरीरहानि केली. संतति दुर्बल ह्मणजे समाजकटंक बनविली, हिंदु लोकांचें जें

पूज्य दैवत गोमाता त्यांचा अपरमित ऱ्हास केला, शेतकी बुडविली, रोग उत्पन्न केले, बालमृत्यूची संख्या वाढविली. अशा क्रमानें संकटपरंपरा आमच्यावर ओढविली. अशा अक्काबाईला कायमचें हद्दपार केल्याशिवाय अशा शेंकडों शारीरिक-शिक्षण-परिषदा भरविल्या तरी त्याचा तिळमात्र उपयोग होणार नाहीं. हें आमचें भाषण कांहीं ' चहाप्रेमी ' लोकांना विषासारखें वाटेल. कारण त्यांना लागलेलें हें व्यसन त्यांना सहसा सोडतां येणार नाहीं. पण आमची अशी नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं निदान अंकुररूपानें जन्म पावणाऱ्या अर्भकांना तरी या अक्काबाईच्या व्यसनापासून मुक्त ठेवावें आणि भावी पिढीच्या शापापासून मोकळें व्हावें.

## खुराकाची अनवश्यकता.

" आतां कसरतीनें शरीर सदृढ होण्यास पोषक द्रव्यांची जरूरीच आहे, असें आम्हांला वाटत नाहीं. कारण, तसेंच जर असतें तर, कांदा-भाकर खाऊन आणि नदीचें पाणी पिऊन नेताजी, तानाजीसारखे नरकेसरी झालेच नसते. अद्यापिहि खेडोंपाडीं कांदा-भाकरीवर उपजीविका करून अचाट शक्तिमान् असलेलीं माणसें दिसतात. परमेश्वरानें जीवमात्राच्या जठराग्नीच्या ठिकाणीं अशी कांहीं अचाट शक्ति ठेविली आहे कीं, भक्षण केलेल्या अन्नापासून जरूरीचे रस आपोआप उत्पन्न होतात. आणि त्यामुळें शरिराचें उत्तम प्रकारें पोषण होतें. आतां कांहीं विशिष्ट प्रकारच्या कसरतीस ह्मणजे पहिलवानी कसरतीस पौष्टिक द्रव्यांची जोड लागते, व ती घेण्याचाहि परिपाठ आहे. यावरून ज्यांना पौष्टिक पदार्थ सेवन करण्याची पात्रता नाहीं, ते वरील अन्न उत्तम प्रकारें पचेतोंपर्यंत व्यायाम घेऊं शकतात आणि सशक्त व निरोगी होऊं शकतात, एवढेंच आमचें मत आहे. ज्यांना परमेश्वरकृपेनें थोडे बहुत पौष्टिक पदार्थ घेण्याचें साधन दिलें आहे, त्यांनीं प्रथमतः गाईचेंच दूध सेवन करावें. नमस्कार घालण्यांत ज्याप्रमाणें स्वार्थ व परमार्थ निगडित आहेत, त्याचप्रमाणें गाईचें दूध सेवन करीत गेल्यानें स्वार्थ व परमार्थ साधला जातो, हें विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं. गाईचें दूध हें पचण्याला हलकें व निरोगी आहे.

## संरक्षणाचें साधन-लाठी.

" आतां शरीर निरोगी व सशक्त बनलें तरी तें प्रसंगविशेषीं रक्षण

करण्याच्या जबाबदारींतून मनुष्य विमुक्त होऊं शकत नाहीं. शरीर रक्षण करण्याची जबाबदारी त्याच्यावर कायमचीच राहते. याकरितां त्याला आत्मसंरक्षणाचें शिक्षणहि घ्यावें लागतें. सध्यांच्या परिस्थितींत आत्म-संक्षणाकरितां आणि आपल्या सामर्थ्यावर जीव धरून काळ कंठणाऱ्या आपल्या आयाबहिणींच्या रक्षणाकरितां लाठी–दांडपट्टा यांसारख्या साधनांचें शिक्षण घ्यावें लागतें आणि तें आबालवृद्धांनाहि अल्प परिश्रमानें साध्य करितां येतें, हा त्यांत विशेष आहे. हातांत लाठी आल्यावर त्या लाठीचा वार दुसऱ्यावर कसा करावा, हें शिकविण्याचें विशेषसें कारण नसतें. पण दुसऱ्याचा प्रहार चुकविण्याचें शिक्षण घेणें अत्यंत जरूरीचें आहे. याशिवाय दुसरीं अनेक साधनें आहेत. त्यांच्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें त्यांचेंहि शिक्षण घ्यावें. या शिक्षणांतहि अनायासें दोन कामें होतात. एक उत्तम व्यायाम होतो व दुसरें आत्मसंरक्षणाचें साधन होतें. याकरितां लाठीचें शिक्षण प्रत्येकानें घेतलेंच पाहिजे, अशी आमची सर्वांस आग्रहाची विनंति आहे.

## स्त्रियांना शारीरिक शिक्षण युक्तिप्रधान.

" पुरुषांना शारीरिक शिक्षणाची जशी आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें स्त्रियांनाहि आहे. परंतु तें शिक्षण घेण्याचे मार्ग जरी विशेष भिन्न नसले तरी ते कांहीं अंशीं भिन्न आहेत, अशी आमची समजूत आहे. निसर्गतः स्त्रिया पुरुषांपेक्षां नाजूक आणि अशक्त असतात, ह्मणून, पुरुषांना शक्तिप्रधान व्यायाम हितकर होतो; तर, स्त्रियांना युक्तिप्रधान व्यायाम गुणावह वाटतो. उदाहरणार्थ, दंड, बैठक, कुस्ती हे शक्तिप्रधान व्यायाम होत. त्याचप्रमाणें फुगडी, निसरफुगडी, वर्तुलाकृति दोरी फिरवून त्यांतून उलट सुलट उड्या मारणें, पिंगा घालणें, हे मुलींचे खेळ युक्तिप्रधान आहेत. हे खेळ शरीर तोलून धरून युक्तीनें व नाजुकपणानें खेळावयाचे असतात. या सुख-श्रम खेळापासून कमी व्यायाम होतो असें नाहीं. तो त्यांच्या स्वभावतः नाजुक असलेल्या शरिराला पुरेसा असाच होतो. हा व्यायाम त्यांना केव्हांहि आपल्या घरांत घेतां येण्यासारखा असून व्यवहारयोग्य असाच असतो. या व्यायामानें मुलींचा कटिप्रदेश ' सिंहकटि ' प्रमाणें रहातो व तोच त्यांच्या पुढील आरोग्याला कारणीभूत होतो. सध्यां मुलांप्रमाणें मुलींकडूनहि नमस्कार घालविण्याची पद्धत ठिक-

ठिकाणीं सुरू केलेली दिसते. परंतु अशा प्रकारचा व्यायाम मुलींकडून घेतल्यानें तो कितपत यशस्वी होणारा आहे याबद्दल आह्मी अद्यापि साशंकच आहोंत. लाठी, दांडपट्टा, फरीगदगा, बिनोट हे खेळ युक्तिप्रधानच आहेत. हे खेळ स्त्रियांनीं अवश्य शिकावेत. या खेळांपासून उत्तम व स्त्रियांना योग्य असा व्यायाम होऊन आत्म-रक्षणाचीहि विद्या या खेळांपासून प्राप्त होते. हे खेळ स्त्रियांना शिकविण्याचा सांप्रदाय पूर्वीं होता, हें इतिहास–पुराणांवरून दिसून येतें. महासती सीतादेवी धनुर्विद्येंत पारंगत होत्या; झांशीची महाराणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर हीं स्त्रीरत्नेंहि शस्त्रविद्येंत प्रवीण होतीं. तेव्हां अशा प्रकारचें शिक्षण आर्यस्त्रियांनीं घ्यावें व तसें शिक्षण त्यांना देण्याची सुखसोय आर्यांनीं करावी, असें आह्मांला वाटतें. याशिवाय पोहणें, झाडांवर चढणें हेंहि शिक्षण स्त्रियांना आवश्यक असेंच आहे.

## स्त्रीशिक्षणाचा दुष्परिणाम सूपशास्त्राचा लोप !

“ हें स्त्रियांच्या शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत झालें. परंतु, याशिवाय स्त्रियांवर याहीपेक्षां मोठी जबाबदारी आहे, ती कोणती, तर “ अन्नमय प्राण व प्राणमय परा-क्रम ” ही होय. पराक्रमी संतति होण्याला प्राणरक्षण केलें पाहिजे व प्राणरक्षणाला शुद्ध अन्न पोटांत गेलें पाहिजे. शुद्ध आणि रुचिकर अन्न तयार करण्याची सर्व जबाबदारी स्त्रियांवर आहे, हें अन्न तयार करण्याचें ‘ सूपशास्त्र ’ अलीकडे स्त्री–शिक्षणानें हिरावून नेल्यानें शारीरिक प्रगतीचा ऱ्हास होण्याला तेंहि एक कारण झालें आहे, असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. यामुळें कांहीं स्त्री–शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांना आमचा राग येईल, ही गोष्ट सत्य आहे. पण सूपशास्त्र दिवसेंदिवस लोपूं लागलें आहे, ही गोष्ट मात्र त्यांना अमान्य करितां येण्यासारखी नाहीं. आम-चाहि मुद्दा तेवढ्यापुरताच आहे. स्त्रियांकडून सूपशास्त्राची अवहेलना होत आहे, अर्थात् त्यामुळें कुटुंबाच्या आरोग्याला धक्का बसत आहे, एवढेंच आमचें ह्मणणें आहे. एवढी सुधारणा आमच्या परमपूज्य स्त्रीवर्गानें केली कीं, शारीरिक–शिक्षण–परिषदेच्या प्रदेशांतील आमचा विषय आटोपला !

## सार्वजनिक आरोग्य.

आतां बालसंगोपन हा विषय स्त्रियांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यानें

त्यासंबंधीं पुरेसें शिक्षण त्या घेण्यास अगदीं विसरणार नाहींत, अशी आह्मांस खात्री वाटते.

" सामुदायिक आरोग्याची जबाबदारी पूर्वी राजांवर होती. आतां ती स्थानिक स्वराज्याच्या हातीं आलेली आहे. परंतु ती जबाबदारी ओळखण्याइतकी तयारी स्थानिक स्वराज्याची आहे, असें मात्र अनुभवास येत नाहीं. कारण, कित्येक शहरांत मलेरिया, दोषी ज्वर, कॉलरा व प्लेगसारखे रोग कायमचे पाहुणे होऊन बसले आहेत; बालमृत्यूची संख्या दुणावूं लागली; कित्येक गर्भवती स्त्रिया मृत्युमुखीं पडूं लागल्या; तरुणांवर इन्फ्लुएन्झा छापा घालूं लागला; क्षयरोग आपलें ठाणें दिवसेंदिवस मजबूत करूं लागला. वगैरेंचीं कारणें शोधून काढून त्याला प्रतिबंध घालण्याचे कांहीं प्रयत्न करण्यांत आले, असें मात्र दिसत नाहीं. पूर्वी शहराच्या आरोग्याची जबाबदारी राजावर होती, आणि ती तो ओळखून चालत होता. याबद्दल रामायणांत एक गोष्ट आहे. त्या सर्व गोष्टींकडे जरी आपल्याला पाहण्याची जरूरी नसली तरी, त्यांत कांहीं तत्त्व आहे, तेवढेंच आपण घेऊं. श्रीरामचंद्रजींकडे एक वृद्ध ब्राह्मण आपला ' पुत्र कां मेला ? ' ह्मणून पृच्छा करण्याकरितां गेला. सध्यांच्या काळांत तो राजाला केलेला प्रश्न व्यवहारशून्यतेचा वाटेल, कदाचित् त्या ब्राह्मणाला कांहीं लोक वेडाहि ठरवितील. पण रामचंद्रजींच्या वेळचा तो ब्राह्मण अर्थात वेडा असणें संभवत नाहीं.

" त्याला आपल्या नागरिकत्वाचा कसा हक्क गाजवावा हें चांगलें समजत होतें. म्हाताऱ्यांनीं अगोदर मरावें असा आरोग्यशास्त्राचा नियम असतां त्याच्या विपरीत गोष्ट कां घडली ? अर्थात् शहराच्या आरोग्याकडे राजाचें दुर्लक्ष झालें व त्याचा जाब विचारण्याचा हक्क कोणत्याहि नागरिकाला आहे, ह्मणूनच तो त्यानें बजाविला. सध्यां राजाऐवजीं नगराध्यक्षाची योजना असते. तेव्हां असा जर कोणी प्रश्न नगराध्यक्षाला केला तर तो ह्मणेल, 'हें काम माझें नाहीं, डॉक्टरला याचें उत्तर विचार.' डॉक्टरला तोच प्रश्न विचारला तर, तो ह्मणेल कीं, ' तुझा मुलगा प्लेगनें मेला ' तर तूं प्लेगला जाऊन विचार. भावार्थ, एवढाच कीं, शारीरिक-शिक्षण-परिषदेच्या क्षेत्रांत सामुदायिक आरोग्याकडे विशेष लक्ष पुरविण्याचें ठिकठिकाणच्या नगरपालकांस भाग पाडणें हाहि एक विषय घेऊं शकतो.

" आतां या शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत कोणीं किती परिश्रम घेतले याचें थोडक्यांत समालोचन करूं.

## शारीर शिक्षणाचे आदर्श.



श्रीछत्रपति शाहूमहाराज हे या विषयाचे परमश्रेष्ठ भक्त होते. तसा विराटदेही आणि भीमशक्तीचा पुरुष हिंदुस्थानांत पहावयाला क्वचितच सांपडेल ! त्यांनीं मल्लविद्येची आराधना बरीच केली होती. त्यांनीं कित्येक आखाडे उदयाला आणिले, अनेक पहेलवान पाळले, क्रीडाभुवनें निर्माण केलीं, कित्येकांना कसरतीचा नाद लाविला. तेव्हां आपणांस ते शारीरिक प्रगतीच्या बाबतींत आदर्शभूत आहेत. त्यांच्याविषयीं कोणाचा अनादरहि असूं शकेल, पण या शारीरिक प्रगतीच्या बाबतींत त्यांच्या प्रत्यक्ष शत्रूंनाहि ते प्रिय वाटावे, असेंच त्यांचें कार्य आहे.

" त्याचप्रमाणें सांगली संस्थानचे अधिपती श्रीमंत सर आप्पासाहेब यांनीं प्रत्यक्ष पहेलवान पाळून जरी मल्ल-विद्येचा प्रसार केला नाहीं, तरी शाळेंतील विद्यार्थ्यांना मल्ल -विद्येचें उत्तेजन मिळावें ह्मणून बाक्षिसें वांटणें, वेळोंवेळीं कुस्त्यांची दंगल करणें, आखाडे, व्यायाममंदिरें यांना मोफत जमिनी देऊन त्यांना उत्तेजन देणें वगैरे बाबतींत बरीच मोठी कामगिरी त्यांच्या हातून झाली आहे. याबद्दल व्यायामप्रेमी मंडळी त्यांची सदैव कृतज्ञच राहतील.

" तसेंच औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधि, कुरुंदवाडचे कै. श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर, जमखंडीचे कै. श्रीमंत भाऊसाहेब जमखंडीकर आणि मिरजेचे श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांनाही कसरतीचा विशेष नाद असून

त्यांनीं आपल्या सान्निध्यांत मोठमोठे पाहिलवान ठेवून लोकांत मल्लविद्येची अभिरुचि उत्पन्न केली आहे.

" उमरावतीचे डॉ० पटवर्धन यांच्या 'हनुमान-व्यायामशाळेचें' कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. त्यांनीं कित्येकांना या शारीरिक शिक्षणाचे पाठ पढविले व कित्येक शिक्षक निर्माण करून ठिकठिकाणीं त्या संस्थेच्या शाखा स्थापण्याचें कार्य सुरू केलें आहे. त्यांचें कार्य अमोल होत आहे, यांत तिळमात्र संदेह नाहीं. त्याच-प्रमाणें बडोद्याचे श्रीमंत **सयाजीराव महाराज** यांच्या पदरीं असलेले प्रो. **माणिक-राव** हें एक वीररत्न बडोद्याला लाभलें आहे. त्यांचेहि अनेक शिष्य आज हिंदु-स्थानांत आहेत. श्री. सद्गुरु ब्रह्मचारी **विनायक महाराज मसूरकर** हे समर्थ-पंथी असून त्यांनीं नमस्काराची गोडी तरुणांना लाविली, दासबोधाचे असंख्य ग्रंथ लोकांना वांटले, ब्रह्मचर्याचें तेज केवढें असतें याची जाणीव करून दिली, ही त्यांची कामगिरी महाराष्ट्र कधींही विसरणार नाहीं. त्याप्रमाणें डॉ. परांजपे यांनींहि नमस्काराच्या बाबतींत चांगलीच प्रगति केल्याचें समजतें. तसेंच पुण्याचे वझे मास्तर, जमखंडीचें गोपाळराव जोशी, कोल्हापूरचे गोविंदराव कुळकर्णी यांची काम-गिरी बरीच मोठी आहे. याशिवाय उल्लेख करण्यासारख्या महाराष्ट्रांत अनेक संस्था व अनेक व्यक्ती आहेत, त्यांचा उल्लेख करणें अत्यंत अवश्य आहे. परंतु कालसंकोचामुळें आह्मी सर्वांचे कार्याबद्दल एकदमच अभिनंदन करितों.

## शक्ति ह्मणजेच परमेश्वरप्राप्ति.

" आतां शेवटीं गीतेंत ह्मटल्याप्रमाणें " बलं बलवतामस्मि " ह्मणजे भगवान् श्रीकृष्ण आपल्या विराटस्वरूपवर्णनांत ' मी बलवानाचें बल आहें, ' असें सांगतात. परंतु " अशक्तानाम् अशक्तता " असें मुळींच सांगत नाहींत. यावरून परमेश्वर-देखील बलवानांचाच अभिमानी आणि सहाय्यकारी होत असतो, हें सिद्ध होतें. तेव्हां आपण सर्वजण बलवान् व बुद्धिमान् व्हा ! बलाशिवाय आत्मविश्वास नाहीं. आणि आत्मविश्वासाशिवाय इच्छित कार्य फलद्रप होत नाहीं. एवढें सांगून व येथील व्यायामशाळांनीं हें अधिवेशन भरविल्याचें श्रेय घेतलें, त्याबद्दल त्यांचे आणि श्रीमंत **सर आप्पासाहेब महाराज** यांनीं आपला अमोल वेळ खर्च करून परिषदेस येण्याचें केलें त्याबद्दल त्यांचेंहि अंतःकरणपूर्वक आभार मानून व आपण सर्वांनीं

आमचें भाषण शांतपणें ऐकून घेतलें त्याबद्दल आपले सर्वांचे आभार मानून आह्मी आमचें भाषण पुरें करितों. ”

हें भाषण किती अनुभवसिद्ध, केवढें उद्बोधक आणि कसें मार्गदर्शक आहे, हें कांहीं निराळें सांगण्यास नको. या भाषणांत, राजेसाहेबांनीं आपल्या सर्व आयुष्यांतली शारीरिक कमाई मूर्तिमंत अधिष्ठापिली आहे. तरुणपिढीची महत्वाकांक्षा कशी असावी; राष्ट्राचा जीवनाधार काय; पुरुषार्थाचा आधार कोणता; जगण्याकरितां जेवावयाचें कीं जेवणाकरितां जगायचें; धर्माकरितां स्वराज्य, स्वराज्याकरितां देहबुद्धीला तिलांजुलि आणि अशी देहबुद्धीची तिलांजुली, आणि अशी देहबुद्धीची संन्यस्तवृत्ति ह्मणजेच पारमार्थिक सत्पदाची प्राप्ति, ह्मणजेच नेटका संसार आणि धडका परमार्थ यांचें उभयविध सुंदर एकीकरण; वगैरे सर्व आयुष्यभर आपल्या मनाशीं घोळविलेले आणि नित्यवर्तनांत आणलेले, नित्य व्यवहारांतले पण गुंतागुंतीचें प्रश्न, राजेसाहेबांनीं फारच व्यवस्थितपणें सोडविले आहेत. शारीरिक शिक्षणाच्या राजरस्त्यावर राजसाहेबांचें हें भाषण नेहेमींच मार्गदर्शक राहील, यांत संशय नाहीं.

श्रीमंत राजेसाहेबांचें भाषण संपल्यानंतर सभेपुढें रीतसर ठराव आले व ते पास झाले. पहिले दहा मुख्य पुढें दिल्याप्रमाणें:—

## परिषदेमध्यें पास झालेले मुख्य ठराव.

**ठराव १ ला:**—सुप्रसिद्ध जगज्जेता गामा पहिलवान यांनीं प्रसिद्ध युरोपियन मल्ल पिटर्सन याजबरोबर जाहलेल्या सामन्यांत जय मिळवून जगज्जेतेपद व हिंदी मल्लविद्येचें श्रेष्ठत्व कायम राखिलें, याबद्दल ही परिषद गामा यांचें अभिनंदन करीत आहे.

**ठराव २ रा:**—डॉ० मुंजे यांनीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत, विद्यार्थ्यांत सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू करण्याचा ठराव मंजूर करून घेतला, या त्यांच्या बहुमोल कामगिरीबद्दल ही परिषद त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**ठराव ३ रा:**—चहापानाचें व्यसन समाजांतून नाहींसें करण्यासाठीं आमरण चहा पिणार नाहीं, ह्मणून प्रतिज्ञा करणाऱ्यांच्या सह्या गोळा करण्याचें कार्य हातीं

घेऊन तें जोरानें चालवीत असल्याबद्दल मुंबईच्या 'सत्कार्य-सेवा-समाजा' चें ही परिषद अभिनंदन करीत आहे.

**ठराव ४ थाः**—साष्टांग नमस्कार व शारीरिक शिक्षणाचे इतर प्रकार हे आपल्या शाळांतून ज्या शिक्षण-संस्थांनीं सक्तीचे ह्मणून सुरू केले आहेत, त्या सर्व शिक्षण-संस्थांचें ही परिषद अभिनंदन करीत आहे.

**ठराव ५ वाः**—शारीरिक शिक्षणाच्या कार्यास पोषक अशा, स्वयंसेवक संघ, सेवादल, नागरिक व संरक्षणदल, बालवीर व बालचरदल इत्यादि ज्या चळवळी महाराष्ट्रांत सुरू आहेत, त्या चळवळींचें व त्यांचा पुरस्कार करणाऱ्या संस्थांचें ही सभा अभिनंदन करीत आहे.

**ठराव ६ वाः**—१९२८ च्या दुसऱ्या अधिवेशनांत मंजूर झालेली "महाराष्ट्रीय–शारीरिक–शिक्षण–मंडळाची" घटना महाराष्ट्रांतील सर्व शारीरिक शिक्षणसंस्थांकडे व तज्ज्ञांकडे माहितीकरितां व त्यावर सूचना मागविण्याकरितां पाठविण्यांत यावी व त्या संस्था आणि तज्ज्ञ यांच्याकडून आलेल्या सूचनांचा विचार करून दुरुस्त घटना १९३० च्या पूर्वीं पुन्हां सर्व शारीरिक शिक्षण–संस्था व तज्ज्ञ यांच्याकडे पाठवून पुढील परिषदेंत विचारासाठीं ठेवण्यांत यावी; तोंपर्यंत प्रचलित घटना अमलांत राहील.

**ठराव ७ वाः**—महाराष्ट्रीय शारीरिक शिक्षण मंडळाची कचेरी, परिषद झालेल्या गांवीं परिषद झाल्यानंतर ८ महिने असावी व त्यानंतर ४ महिने पुढील परिषदेच्या गांवीं जावी.

**ठराव ८ वाः**—पुढील वर्षासाठीं अकरा इसमांचें कार्यकारी–मंडळ असावें.

**ठराव ९ वाः**—पुढील वर्षी कार्यकारी–मंडळानें मुख्यतः खालील गोष्टीं-कडे लक्ष पुरवावें.

( १ ) शारीरिक शिक्षणसंस्थांची सूची.

( २ ) मुंबई सरकारचा शारीरिक शिक्षण-कमिटीचा-रीपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर

त्याचा तज्ज्ञांच्या मदतीनें विचार करून आपली योजना मुंबई सरकारकडे पाठवावी.

( ३ ) ' महाराष्ट्र-शारीरिक-शिक्षण मंडळाच्या घटनेबद्दलचा ठराव.

( ४ ) ' बाण ' चिन्हाचा प्रसार.

**ठराव १० वा:**—महाराष्ट्र उर्फ घाटमाथा ह्या विभागातर्फे पुण्याचें आमंत्रण पुढील परिषदेच्या अधिवेशनाकरितां स्वीकारण्यांत येत आहे.

याप्रमाणें ठराव पास झाल्यानंतर राजेसाहेबांनीं अध्यक्ष नात्यानें समारोप केला. ' बाणचिन्ह ' हें श्रीरामाच्या बाणाचें प्रतीक असल्यानें श्रीरामाच्या एकवचनी, एकबाणी व एकपत्निव्रताची आपणाला अखंड आठवण देणारें आहे, ह्मणून सर्वांनीं तें त्या हेतूनें धारण करावें; तसेंच आजच्या कालांत आखाडे स्थापन करून स्त्रिया, पुरुष व मुलें या सर्वांनीं तेजस्वी व आत्मसंरक्षणपर बनणें किती जरूर आहे, आरोग्याच्या दृष्टीनें चहापानादि व्यसनांचें निर्मूलन करण्याची आवश्यकता किती आहे, वगैरे मुद्यांवर आपल्या ओजस्वी शब्दांत त्यांनीं प्रतिपादन केलें. याप्रमाणें ही परिषद् विशेष तऱ्हेनें यशस्वी झाली, याचें श्रेय बहुतांशीं राजेसाहेबांच्याकडे आहे, हें निराळें सांगणें नलगे.



## प्रकरण २० वें.

# श्रीरंगूबाई पॅलेसचा कोनशीला-समारंभ.

श्रीमंत धर्मवीर, धर्मविभूषण, परंजय राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले यांचे हस्तें बेळगांव येथील 'श्रीरंगूबाईपॅलेस' या इमारतीचा कोनशीळा बसविण्याचा समारंभ शनिवार तारीख ८ माहे जून सन १९२९ इ. रोजीं मोठ्या थाटानें करण्यांत आला. या समारंभाकरितां श्रीमंत राजेसाहेब सांगली येथील शारीरिक शिक्षण परिषदेच्या अध्यक्षाचें काम आटोपून बेळगांवीं आले होते. त्यांचेबरोबर त्यांचे चिरंजीव श्री० कुं० राजारामसिंह हे होते.

बेळगांवीं 'श्रीरंगूबाई पॅलेस' या नांवाची एक सर्वांग सुंदर आणि भव्य अशी इमारत बांधण्याचें काम गेल्या दोन वर्षांपासून चाललें होतें. या प्रासादवजा इमारतीचा विनियोग 'महाराष्ट्र औषधी कारखान्याकरितां' आणि दवाखान्यासाठीं होणार होता. ह्मणून आयुर्वेदासंबंधीं आस्था व कळकळ असणाऱ्या थोर पुरुषाच्या हस्तें या इमारतीचा कोनशीळा समारंभ होणें योग्य, असें त्या इमारतीच्या मालकांना वाटणें स्वाभाविक होतें.

### महाराष्ट्र औषधी कारखाना.

राजेसाहेबांना देशी औषधांचा विशेष अभिमान होता, एवढेंच नव्हे तर त्यांची आर्यवैद्यिकांत चांगलीच प्रगति होती. त्यांना कित्येक दिव्य वनस्पतींची व आयुर्वेदिक शास्त्रोक्त औषधांची चांगलीच माहिती होती. कॉलरा, मूळव्याध, व्रण वगैरे दुर्धर रोगांवर रामबाण अशीं औषधें ते स्वतः घरींच तयार करीत असत.

नागपुरीं आणि नागपुराच्या आसपास खेड्यांतून ज्या वेळीं कॉलऱ्याचा प्रादुर्भाव झाला होता, त्या वेळीं हजारों लोकांना धर्मार्थ औषधें देऊन आपल्या रामबाण औषधींची सत्यता त्यांनीं लोकांना उत्तम प्रकारें पटविली होती. त्यांच्या राजवाड्यांत लाग-णारीं आयुर्वेदिक औषधें ते स्वतःच तयार करीत असत. परंतु, बेळगांवीं ' महाराष्ट्र औषधी कारखाना ' निघून त्यांतील औषधें पूर्ण शास्त्रीय पद्धतीचीं असल्याबद्दल राजेसाहेबांची अनुभवांतीं ज्या वेळीं खात्री झाली, त्या वेळेपासून ते त्याच कार-खान्यांतील मात्रा, रस, भस्में, गुटिका, तेलें, चूर्णें वगैरे औषधें विकत घेऊन वापरूं लागले. राजेसाहेबांना आयुर्वेदिक औषधांच्या गुणांबद्दल आणि पथ्यपाण्याच्या हितपरिणामी अशा पद्धतीबद्दल फार आदर वाटत असे. आयुर्वेदिक औषधें शास्त्रशुद्ध पद्धतीनें निर्माण करणारे अनेक कारखाने हिंदुस्थानांत निर्माण झाल्या-शिवाय आयुर्वेदाच्या तेजस्वी प्रभावाचा दृक्प्रत्यय लोकांना दाखवितां येणार नाहीं आणि जोंपर्यंत तसा अनुभव लोकांना येत नाहीं, तोंपर्यंत सर्वसाधारण जनतेचा त्याच्यावर विश्वासही बसणार नाहीं, हें राजेसाहेब पूर्ण जाणून होते

राजेसाहेबांची आयुर्वेदाबद्दल विशेष सहानुभूति आणि कळकळ हीं महाराष्ट्र औषधी कारखान्याच्या मालकांना माहीत असल्यामुळें त्यांचेच हस्तें ' श्रीरंगूबाई पॅलेस ' ची कोनशीळा बसविण्याचें त्यांनीं मनानें ठरविलें व त्याप्रमाणें श्रीमंत राजेसाहेबांना त्यांनीं तशी विनंति केली. या आयुर्वेदिक कारखान्याबद्दल राजेसाहेबांचे ठिकाणीं विशेष सहानुभूति असल्यामुळें व त्यांचा तो आवडीचा विषय असल्यामुळें त्यांनीं त्या समारंभाला बेळगांवीं येण्याचें कबूल केलें. परंतु कार्यबाहुल्यामुळें त्यांना त्या वर्षीं येतां आलें नाहीं. अशा स्थितींत कोनशीळा बसविण्याची जागा सोडून पॅलेसचें बांधकाम जवळजवळ एक मजल्यापर्यंत चढवून घ्यावें लागलें.

राजेसाहेब सांगलीस परिषदेकरितां आले, त्या वेळीं ' श्रीरंगूबाई पॅलेस ' च्या कोनशीळा-समारंभाकरितां बेळगांवीं आपण येतों, असें त्यांनीं कळविलें. त्याप्रमाणें समारंभाची पूर्व तयारी सुरू झाली. बेळगांवीं वळवाचे पाऊस मे महिन्यांतच सुरू होतात. तेव्हां पावसापासून समारंभाचा विरस होऊं नये म्हणून पत्रे टाकून विस्तीर्ण मंडप उभारण्यांत आला होता. तोरणें, पताका लावून आणि कमानी वगैरे उभारून मंडप शक्य तेवढा सुशोभित करण्यांत आला. बेळगांवच्या

सर्व प्रतिष्ठित नागरिकांना या समारंभाच्या पत्रिकाही पाठविण्यांत आल्या.

राजेसाहेबांची स्वारी बेळगांवीं तारीख ७ जूनला आली. दुसरे दिवशीं ह्मणजे शनिवार तारीख ८ जून रोजीं सकाळीं आठ वाजतां कोनशीळा—समारंभाचा कार्यक्रम होता. त्या दिवशीं सकाळीं सहा वाजल्यापासून 'श्रीरंगूबाई पॅलेस' पुढें मंगल वाद्यें वाजूं लागलीं. बेळगांवचे सुप्रसिद्ध सनईकार रा. बसवाणी आपल्या सनईतून सुस्वर मंगल आलाप घेऊं लागले. समारंभाच्या निमंत्रित मंडळींचें स्वागत करण्याकरतां बँड मधून मधून सलामी देऊं लागला. आठ वाजण्याचे सुमारास समारंभ—मंडप चिकार भरून गेला. इतर प्रेक्षक मंडळींनीं सार्वजनिक रस्ताही फुलून गेला. या समारंभाला बेळगांवांतील बहुतेक झाडून प्रतिष्ठित लोक आले होते. स्त्रीसंमर्दही वाखाणण्यासारखा होता. राजेसाहेबांची स्वारी बरोबर आठ वाजतां मंडपांत हजर झाली. त्यांचेबरोबर त्यांचे चिरंजीव श्री. कुं. राजारामसिंह हे होते. त्यांच्या स्वागतार्थ झालेल्या टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत ते उच्चासनाधिष्ठित झाले. प्रथमतः 'बळवंत संगीत मंडळीं' तील मुलांनीं स्वागतपर पदें रागदारींत सुस्वर गायल्यानंतर 'महाराष्ट्र औषधी कारखान्या' चे एक मालक रा. पांडुरंग गोपाळ रानडे, यांनीं भाषण केलें. राजेसाहेबांचे आणि निमंत्रित मंडळींचें समयोचित शब्दांमध्यें स्वागत केल्यानंतर 'महाराष्ट्र औषधी कारखान्या'ची माहिती देतांना ते ह्मणाले,

## महाराष्ट्र औषधी कारखान्याची व्याप्ति.

बेळगांव येथें महाराष्ट्र औषधी कारखान्याला जन्मून अवघीं दहा बारा वर्षें झालीं. एवढ्या अल्प अवधींत दुसऱ्या मोठमोठ्या आर्यौषधी कारखान्यांच्या जोडीला हाही कारखाना येऊन बसला आहे. यांत सर्व प्रकारचीं भस्में, मात्रा, गुटिका, कुपिस्थ रसायनें, आंसवें, चूर्णें, तेलें, मलमें वगैरे शास्त्रशुद्ध तयार होतात. हेमगर्भ, त्रैलोक्यचिंतामणीसारख्या मोठमोठ्या मात्रा व वीस प्रकारचीं कुपिस्थ रसायनें या कारखान्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कारखान्यांत एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत नाहींत. बेळगांव येथील कॉंग्रेसच्या वेळीं या कारखान्याचें सुंदर प्रदर्शन मांडण्यांत आलें होतें. आणि त्या वेळीं भरलेल्या आयुर्वेदिक संमेलनाकडून आमच्या

कारखान्याचीं औषधें शास्त्रशुद्ध असल्याबद्दल शिफारसपत्र व सुवर्णपदकही त्यांचेकडून आह्मांला मिळालें आहे. इ० स० १९२६ मध्यें विजापूर मुक्कामीं जें ' कर्नाटक आयुर्वेदिक संमेलन ' झालें, त्या वेळीं या कारखान्याच्या मुख्य मालक श्री. वैद्या-लंकृति, देवी धन्वंतरी, रंगूबाईसाहेब, या स्वतः या संमेलनाकरितां विजापुरीं गेल्या होत्या. त्या ठिकाणीं ' महाराष्ट्र औषधी कारखान्यां ' तील शास्त्रशुद्ध औषधांचें प्रदर्शन मांडण्यांत आलें होतें.

'बेळगांवच्या महाराष्ट्र औषधी कारखान्या' च्या मालक वैद्यालंकृती श्री. रंगूबाई यांनीं आपल्या कारखान्यांत शास्त्रशुद्ध तयार केलेल्या मात्रारस, कुपिस्थरसायनें, चूर्णे, तेलें, आंसवें, मलमें, भस्में, पोटलीरस, वगैरे निरनिराळ्या ३००-४०० औषधांचें सुंदर प्रदर्शन मांडलें होतें. या कर्तबगार आणि आयुर्वेदाची निःसीम सेवा करणाऱ्या बाईनीं सुमारें पन्नास साठ हजार रुपये या कारखान्यांत भांडवल गुंतवून तो चांगलाच नांवलौकिकाला आणला आहे. व त्यांत त्यांनीं सहा प्रकारचे दुर्मिळ असे हेमगर्भ पोटलीरस, वीस प्रकारची कुपिस्थ रसायनें, स्वर्ण, पारद, लोह, त्रिवंग इत्यादि वारि-तर ( पाण्यांत तरणारीं ) भस्में तयार करून कारखान्यास विशेष शोभा आणली आहे. हीं औषधें उत्तम साधल्याबद्दल तेथील डॉक्टर व वैद्य यांनीं आपला अभिप्राय-व्यक्त केला आहे. या कारखान्यांतील औषधें गुण व किंमत या दृष्टीनें पाहतां लोकल-बोर्डें व म्युनिसिपालिट्या यांनीं जे दवाखाने सुरू केले आहेत; त्यांना हीं औषधें वापरण्यास योग्य अशींच आहेत. '' अशा प्रकारें वृत्तपत्रांतून विजापूरच्या आयुर्वेदिक संमेलनांत वैद्यालंकृति श्री० रंगुबाई यांचा गौरव झाला, याबद्दल उल्लेख आला आहे. या संमेलनाकडून प्रथम वर्गाचें सुवर्णपदक व शिफारसपत्र मिळालें आहे. याचप्रमाणें बागलकोट येथील संमेलनाकडूनही अशाच प्रकारचा गौरव झाला आहे. श्री० रंगूबाईसाहेब यांच्या कर्त-बगारीमुळें त्यांना श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांचे मठामार्फत ' वैद्यालंकृति ' ही पदवी देण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणें श्रीसद्गुरु सिद्धारूढस्वामी महाराज हुबळी यांनीं त्यांना आपला प्रसाद ह्मणून ' देवी धन्वंतरी ' ही पदवी दिली आहे. या कारखान्यांतील औषधांचा फैलावा बृहन्महाराष्ट्रभर झाला आहे. सध्यां कारखान्याची असलेली इमारत अपुरी पडूं लागल्यामुळें ही विस्तीर्ण अशी इमारत बांधण्याचें काम सुरू आहे. ही इमारत

बांधण्याचे कामीं श्री. गोपाळराव आरास इंजीनियर, श्री. आण्णासाहेब घाणेकर इंजीनियर, श्री. विनायकराव सुंठणकर इंजीनीयर, रा. ब. परोळकर इंजीनीयर व त्याचप्रमाणें पुण्याचे श्री. तुळजाराम मेस्त्री बढाई यांची वेळोंवेळीं सल्ला व मदत होत असते. त्यांतल्या त्यांत श्री. गोपाळराव आरास हे परोपकारवृत्तीचे आणि उत्साही गृहस्थ असल्यामुळें त्यांची विशेष पहाणी या इमारतीकडे असते. या इमारतीची कोनशीळा श्रीमंत राजेसाहेब यांच्या हस्तें बसविण्याचा सुयोग आला, हा आयुर्वेदाचा उद्धारच होत आहे, असें आह्मांला वाटतें.'


## आर्यांकरितांच आयुर्वेद.

नंतर राजेसाहेब ह्मणाले, 'सांप्रतच्या परिस्थितींत आयुर्वेदिक पद्धतिचीं औषधें वापरून तो भरभराटीला आणणें, हें आपलें आद्यकर्तव्य आहे. हीं औषधें तयार करण्याचे बाबतींत केवळ धंद्याची दृष्टि असतां कामा नये. शास्त्रशुद्ध औषधें निर्माण करून त्यांचा योग्य विनियोग करणें, हीच आयुर्वेदाची खरी सेवा आहे. शास्त्रशुद्ध औषधें विकावयाला महाग पडलीं तरी हरकत नाहीं. हीं औषधें कितीही महाग असलीं, तरी त्यांच्या गुणाच्या दृष्टीनें तीं विलायती औषधांपेक्षां खात्रीनें सवंगच पडतील. मी देशी औषधांचाच भोक्ता व अभिमानी आहें. या महाराष्ट्र औषधी कारखान्यांतील बरींच औषधें, भस्में, मात्रा, गुटिका, वगैरे गेल्या पांच सात वर्षांपासून मी वापरीत असतों. तीं निर्दोष आणि गुणावह असल्याबद्दल अनुभवांतीं माझी पूर्ण खात्री झाली आहे. इंग्रजी औषधांत क्विनाईन, सॅन्टोनाईनसारखीं कित्येक जालीम औषधें आहेत. त्याचा खपही जगाच्या पाठीवर अतोनात आहे. परंतु एकाद्या स्वतंत्र रोगावर तीं जरी रामबाण अशीं औषधें असलीं, तरी त्यांच्या रामबाण गुणाइतकेच त्यांत अवगुणही भरलेले आहेत. क्विनाईन हें मलेरिया तापावर जरी रामबाण औषध असलें, तरी त्यामुळें शरीरांतील रक्तांत दूषित उष्णता उत्पन्न होऊन त्यापासून पित्त, कावीळ, पंडु हे रोग उत्पन्न करण्याचे परिपूर्ण अवगुणही आहेत. हीं औषधें तात्काळ गुण दाखविणारीं जरी असलीं, तरी तीं कायमचा परिणाम टिकविणारीं असत नाहींत. आयुर्वेदिक औषधांचें तसें नाहीं. तीं गुण येण्याला जरी अवकाश दाखवित असलीं, तरी तीं टिकाऊ गुण देतात, हें आपण विसरतां कामा नये. इंग्रजी औषधें हिंदुस्थानांत येऊन त्यांचा फैलाव होण्याचे अगोदर हिंदुस्थानाचें आरोग्य कसें

होतें, हें जुन्या ह्मातान्या लोकांकडे दृष्टि फेंकून पहा. नागपुरांत सिद्दी पेहलवान नांवाचा एक इसम आहे. त्याचें वय जवळ जवळ एकशें वीस वर्षांचें आहे. त्याला अद्यापि सुंठीचें कुडें खाल्लेलें माहीत नाहीं. सध्यां इंग्रजी औषधांच्या बाटल्या रोज सेवन करणारे तीस वर्षांचे तरुण ऐंशीं वर्षांप्रमाणें ह्मातारे दिसतात. मला इंग्रजी औषधांवर टीका करावयाची नाहीं. तीं औषधें विलायतच्या थंड हवेला हितावह अशींच असतील, पण तीं हिंदुस्थानच्या हवेला परवडणारीं नाहींत, एवढेंच मला सांगावयाचें आहे. आर्यऔषधें आर्यांकरितांच आहेत. तींच त्यांना हितपरिणामी आहेत.


## वैद्यालंकृतींची अनुकरणीय कर्तबगारी.

" आमचे स्नेही रा. रानडे, यांनीं महाराष्ट्र औषधी कारखान्याची आपणाला माहिती दिलीच आहे. वैद्यालंकृतींच्या कर्तबगारीबद्दल आह्मांला मोठें कौतुक वाटतें. हिंदुस्थानांत स्त्रियांनीं आयुर्वेदिक कारखाना चालविल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे त्यांनीं औषधी कारखाना चालवून जसी आपली कर्तबगारी दाखविली आहे, तसाच त्यांनीं आपला सामाजिक दर्जाही वाढविला आहे. त्यांनीं तीन वर्षें डिस्ट्रिक्ट स्कूल-बोर्डाच्या कौन्सिलरचें काम केलें आहे. बेळगांव म्युनिसिपालिटींत त्या सध्यां लोक-नियुक्त सभासद आहेत. मला वाटतें स्त्रियांनीं महाराष्ट्रांत निवडून येण्याचा पहिला मान यांनाच मिळाला आहे. या कीर्तनही उत्तम करतात. जव्हाहिराचा व सोन्याचा लाखों रुपयांचा व्यापार धडाडीनें करणाऱ्या स्त्रीवर्गांत हिंदुस्थानांत या एकच दिसतात. स्त्रियांमध्यें अशीं माणसें फार विरळा ह्मणून त्यांचा गौरव करावासा वाटतो. आपणाला जास्त सांगण्याचें कारण नाहीं. आपण जाण तच आहां. या पॅलेसची कोनशीळा माझ्या हस्तें बसत आहे, हाही मला मोठा आनंदच वाटतो. एवढ्या अवाढव्य खर्चानें व मेहनतीनें ही जी इमारत बांधली जात आहे, तिचा विनियोग लोककल्याणाकडे झालेला आह्मांला दिसेल, त्या वेळीं याहीपेक्षां आह्मांला जास्त आनंद होईल. शेवटीं वैद्यालंकृति रंगूबाई आणि श्री. रानडे या उभयतांनीं अंगिकारलेल्या त्यांच्या कार्यांत परमेश्वर त्यांना पूर्ण यश देवो, अशी परमेश्वराला प्रार्थना करून मी आपलें भाषण पुरें करतों. '



श्री. रंगूबाई पॅलेसचा कोनशीला समारंभ.

पृष्ठे ४१०-३११ (फोटोग्राफर— बी. वाय. जगताप, बेळगांव.) (क.फो.झिं.प्रे.वे.)



श्रीलक्ष्मीविलास थिएटरचा उद्घाटन समारंभ बेळगांव.

पृष्ठें ४१०-४११

[K.P.Z.P, B.]

राजेसाहेबांच्या भाषणानंतर वैद्यालंकृति श्री. रंगूबाईसाहेब यांनीं सूचना केल्यावरून राजेसाहेब कोनशीळा बसविण्याकरितां उठले. कोनशीळा बसविण्याचे जागीं आल्यानंतर गवंडी लोकांचे मेस्त्री रा. ओमाण्णा यांचा सन्मान करण्याकरितां मालकांकडून आलेला वस्त्रांचा अहेर त्यांनीं ओमाण्णा यांना केला. नंतर या समारंभाकरितां मुद्दाम तयार केलेल्या चांदीच्या पात्रांतून चांदीच्या करणीनें चुना घेऊन तो कोनशीळेचें जागीं सुमुहुर्तावर मंगल वाद्यांच्या सुस्वरांत अंथरून त्याचेवर त्यांनीं स्वहस्तानें कोनशीळा बसाविली. सर्वांनीं टाळ्यांच्या गजरानें त्याला आपली पूर्ण संमती दिली. याच ठिकाणीं बेळगांवांतील श्री. जगताप फोटोग्राफर यांनीं त्या प्रसंगाचें छायाचित्र घेतलें. ( ते येथें दिलेच आहे. ) राजेसाहेबांनीं पुनः आसन मंडित केल्यानंतर त्यांना हारतुरे अर्पण करण्यांत आले. निमंत्रित लोकांचाही पानसुपारी अत्तर गुलाब देऊन सत्कार करण्यांत आला. शेवटीं वैद्यालंकृति श्री. रंगूबाईसाहेब यांनीं राजेसाहेबांचे व निमंत्रित लोकांचे आभार मानले. अशाप्रकारें हा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला.

## लक्ष्मीविलास थिएटरचा उद्‌घाटन समारंभ.

दुसरे दिवशीं ह्मणजे रविवार तारीख ९ रोजीं सायंकाळीं बेळगांव येथील लक्ष्मीविलास थिएटरचा उद्‌घाटन समारंभ श्रीमंत राजेसाहेब यांचे हस्तें झाला. या थिएटरचे मालक श्रीयुत विष्णु दत्तात्रय देशपांडे यांनीं गेल्या वर्षापासून तें बांधण्याचें काम सुरू करून या वेळपर्यंत तें पुरें केलें होतें. बेळगांवसारख्या शहराला मध्यवस्तींत अशा प्रकारच्या नाटकगृहाची उणीव होतीच. ती श्री. विष्णुपंतांनीं मोठ्या धाडसानें उभारलेल्या या भव्य, सोईस्कर आणि प्रेक्षणीय नाटकगृहानें चांगलीच भरून काढली. हें नाटकगृह असें बांधण्यांत आलें आहे कीं, त्याचा उपयोग नाटकवाल्यांना व सीनेमालाही करितां येतो. श्री. देशपांडे यांनीं हे दोन्ही हेतू साधण्याकरितां सुमारें पन्नास हजार रुपये खर्च करून हें सुंदर नाटकगृह उभारलें आहे.

## देशी चित्रपटांचें महत्व.

श्री. देशपांडे यांनीं गेलीं पांच सात वर्षे कच्च्या थिएटरमध्येंच सीनेमाचे प्रयोग केले. त्या अवधींत त्यांनीं बेळगांवच्या नागरिकांचा लोभ संपादून आश्रयही चांगला मिळविला. स्वतंत्र तऱ्हेनें आपल्या मालकीचें थिएटर बांधण्यापर्यंत त्यांची परिस्थिति आली, हें त्याचेंच द्योतक आहे. त्यांनीं या उद्घाटन समारंभाला गांवांतील प्रतिष्ठित लोक, व्यापारी, शेट सावकार, सरकारी अंमलदार, वगैरे प्रमुख लोकांना निमंत्रण दिलें होतें. सायंकाळी सुमारें सहा वाजतां स्त्रीपुरुषांनीं सर्व थिएटर चिकार भरून गेलें. श्रीमंत राजेसाहेबांची स्वारी ठराविक वेळीं नाटकगृहांत आल्याबरोबर सर्व प्रेक्षकांनीं त्यांचें टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटानें स्वागत केलें. त्यांना उच्चासनावर बसविण्यांत आलें व त्यांचा हारतुऱ्यांनीं सन्मान करण्यांत आला. नंतर श्री. पांडुरंग गोपाळ रानडे यांनीं 'लक्ष्मी-सिनेमा' संबंधानें आणि लक्ष्मीविलास थिएटर विषयीं साद्यंत हकीकत निवेदन केली. त्यांनीं राजेसाहेबांना चार शब्द बोलण्याकरितां विनंति केल्यावरून राजेसाहेब ह्मणाले, ' कोणत्याही धंद्यांत लोककल्याण साधतां येतें. स्वार्थाबरोबर परमार्थ साधण्याची मनापासून बुद्धि मात्र पाहिजे. सीनेमाच्या चित्रपटाचेंही द्वारें लोकशिक्षणाचें काम करतां येतें. पौराणिक, सामाजिक किंवा ऐतिहासिक चित्रपट दाखवून लोकांच्या करमणुकीबरोबर त्यांना पुराणांचें, सामाजिक स्थितीचें अगर इतिहासाचें सहज ज्ञान करून देतां येईल. सिनेमा पाहून एक प्रकारचें वाईट शिक्षण मिळतें व त्यामुळें मुलें बिघडतात, अशी कांहीं लोकांची समजूत आहे. इंग्रजी पद्धतीचे शृंगारिक चित्रपट पाहून त्यांची ती समजूत झाली असावी, असें मला वाटतें. या विसाव्या शतकांतील सुधारणेच्या कालांत हंसक्षीरन्यायानें चांगलें तेवढेंच घेण्याची नवीन पिढीला संवय लाविली पाहिजे. तरच त्यांना समाजांत वावरतां येईल. सध्यां हिंदुस्थानांत फिल्म तयार करणाऱ्या पुष्कळ कंपन्या निघाल्या आहेत व निघतही आहेत. त्या कंपन्यांतून आर्यसंस्कृतीला पोषक असे अनेक चित्रपट निघालेले माझे पहाण्यांत आहेत. या सीनेमाच्या मालकांनीं तसेच चित्रपट दाखविण्याची पराकाष्ठा करावी. ह्मणजे कांहीं लोकांचा जो वाईट ग्रह झाला आहे, तो दूर होईल. स्थाईक स्वरूपानें सीनेमाचा धंदा करावयाचा ह्मणजे त्याला स्वतःच्या मालकीचें थिएटर असणें जास्त चांगलें. या थिएटरचा उपयोग नाटक कंपन्यांनाही चांगलाच होईल. याच्या ' लक्ष्मी-विलास ' या नांवा-

प्रमाणें यांत नेहमीं लक्ष्मी ' विलास ' करो, अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे. आजच्या सुमुहुर्तावर हें नाटकगृह सुरू झालें, असें मी जाहीर करतों. '

राजेसाहेबांच्या भाषणानंतर त्यांचे आणि निमंत्रित पाहुण्यांचे सीनेमाच्या मालकांनीं आभार मानले. सर्वांना पानसुपारी, अत्तरगुलाब वगैरे देण्यांत आल्यावर दोन तासपर्यंत एक सुंदर चित्रपट दाखविण्यांत आला. अशाप्रकारें हाही समारंभ मोठ्या थाटाचा झाला. हे दोन दिवस बेळगांवकरांना मोठ्या गमतींचे व गडबडीचे गेले.



# प्रकरण २१ वें.

# इतर सार्वजनिक कामगिरीचा त्रोटक वृत्तांत.

येथपर्यंत राजेसाहेबांच्या आयुष्यक्रमांतील आह्मांला महत्वाच्या वाटलेल्या कांहीं गोष्टींचें आणि प्रसंगांचें आह्मीं यथामति विवरण केलें आहे. परंतु ज्या खरोखर महत्वाच्या गोष्टी असूनही त्यांचें मागील प्रकरणांत विवरण आलेलें नाहीं; अशा कांहींचा येथें निदान त्रोटक तरी वृत्तांत न देतां या चरित्राचें काम संपविणें हें योग्य होणार नाहीं; ह्मणून येथें आह्मी कांहीं देत आहोंत. या सर्व गोष्टींची सविस्तर माहिती आह्मीं देण्याचा प्रयत्न केला असता, तर या चरित्राएवढे आणखी दोन तरी निराळे ग्रंथ निर्माण झाले असते. परंतु याच वेळीं ते लिहून तयार करण्याची परिस्थिति नसल्यामुळें केवळ त्रोटक वृत्तांतापलिकडे आह्मांला जातां येत नाहीं. नाइलाज आहे.

१ मगठा शिक्षण परिषदः-मराठा शिक्षण परिषदेची पांचवी बैठक तारीख २९ व ३० डिसेंबर सन १९१२ इ. रोजीं नागपूर मुक्कामीं मोठ्या थाटानें भरविण्यांत आली. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान श्रीमंत राजे आबासाहेब डफळे, जत संस्थानचे अधिपति यांना मिळाला होता. स्वागतमंडळाचे अध्यक्ष श्रीमंत राजेबहादूर रघोजीरावसाहेब भोंसले व उपाध्यक्ष श्रीमंत राजे लक्ष्मणरावसाहेब भोंसले हे होते. या अधिवेशनाचे राजेसाहेबांनीं वेळीं स्वागतपर भाषण केलें. हें भाषण सर्वांगसुंदर असें झालें. या त्यांच्या भाषणांत नागपूर प्रांताचा पूर्वेतिहास त्यांनीं सांगितला तो येणेंप्रमाणें:—

" आतां या आमच्या नागपूर प्रांताविषयीं थोडी माहिती देण्याची परवानगी घेतों. या नागपूर प्रांताचीं पुष्कळ राजकीय स्थित्यंतरें झालीं आहेत. हा प्रांत रामायणकालीं ' दंडकारण्य ' ह्या नांवानें प्रसिद्ध असून रघुकुलतिलक श्रीरामचंद्र यांच्या अंमलाखालीं होता. नंतर ह्या प्रांतावर ' अभीर ' नांवाच्या राजांचा अंमल होता, असें इतिहासावरून दृग्गोचर होतें. अभिरांच्यामागून " वाकातक " राजघराणें झालें. हें राजघराणें रजपुतांचें असावें, असा अंदाज आहे. ह्यानंतर शैलांनीं ह्या प्रांतावर इ. स. १४०० पावेतों राज्य केलें. शैलानंतर राष्ट्रकुटांकडे हा प्रांत गेला. राष्ट्रकुटाचे वेळचे ताम्रपटांवरून त्या काळीं देखील " नागपूर " आणि " नंदीवर्धन " नांवाचे दोन जिल्हे ह्या प्रांतांत होते, असें दिसतें.

" राष्ट्रकुटांना कल्याणीच्या चालुक्यांनीं जिंकलें. पण कांहीं कालपावेतों राष्ट्रकूट घराण्याचे राजे चालुक्याचे मांडलिक होऊन राहिले होते. चालुक्यानंतर माळव्याच्या " प्रमार उर्फ पवार " घराण्याची राजसत्ता येथें स्थापन झाली. इतिहास-प्रसिद्ध मुंजराजानें ह्या प्रांतावर सात वेळां स्वारी केलीं होती. सोळावे शतकाचे शेवटीं हा प्रांत " आतवा " नांवाचे गोंड राजाच्या हातीं गेला. तेथून ह्या प्रांताच्या अर्वाचीन इतिहासाला सुरवात झाली. ह्या वंशांतील तिसरा राजपुरुष बख्तबुलंद मोठा पराक्रमी होऊन गेला. ह्यानें दिल्लीस जाऊन आपल्या पराक्रमानें औरंग-जेबास प्रसन्न करून घेतलें. औरंगजेबानें आपला डाव साधून त्यास महंमदी धर्माची दीक्षा दिली. ह्यानें दुसरीकडून शेतकरी व कारागीर आणवून हा प्रांत ऊर्जिता-वस्थेत आणिला. हल्लींच्या नागपूर शहराची त्यानेंच वसाहत केली. ह्यानतर हा प्रांत भोंसले राजघराण्याकडे आला. तो येण्याचें कारण असें झालें कीं, बख्तबुलंदच्या ( चांद सुलतानच्या ) नंतर त्याचा दासीपुत्र वलीशाह गादी बळकावून बसला. तेव्हां बख्तबुलंदच्या स्त्रीनें त्या वेळीं वऱ्हाड प्रांतावर अंमल करीत असलेल्या पहिल्या रघोजीमहाराजांकडे कुमक मागितली. रघोजीमहाराजांनीं वलीशहाचें पारिपत्य केलें. याबद्दल महाराजांना अकरा लाख रुपये व वैनगंगेचे कांठचा प्रदेश मिळाला. ह्याप्रमाणें आमचे भोंसले घराण्याची सत्ता ह्या प्रांतावर स्थापन झाली. "

राजेसाहेबांच्या या भाषणावरून त्यांनीं इतिहासाचा व्यासंग कसा ठेवला होता, हें लक्षांत येण्यासारखें आहे. यानंतर मराठा विद्यार्थ्यांनीं शिक्षण कशा प्रकारचें घ्यावें, याविषयीं ते पुढें ह्मणाले:—

" प्राचीन काळीं मुलांचें उपनयन होतांच त्यांस विद्यार्जनासाठीं गुरुगृहीं ठेवण्याचा सांप्रदाय असे. याजबद्दल राजपुत्र द्रुपद वगैरेंची बरींच उदाहरणें भारतादि ग्रंथांमध्यें आहेत. त्या वेळीं मुलांचे वर्तनावर गुरुजींची सक्त नजर असल्यामुळें, ती सदाचारी निपजून कडकडीत ब्रह्मचर्याचें प्रतिपालन करीत असत. त्यामुळें भावी पिढि सशक्त व निरोगी अशी निपजून राष्ट्राचे उपयोगी पडत असे. तशी स्थिति सध्यांचे विद्यार्थ्यांची नाहीं. अभ्यासक्रम आटोपतांच पहावें, तों ते चरकांतून पिळून काढल्याप्रमाणें हतवीर्य व निस्तेज असे दिसतात. कित्येकांस नेत्ररोगादि अनेक विकार जडतात. याचीं कारणें अनेक आहेत. त्यांतील ठराविक अवधींत पुष्कळशा विषयांचें पठण, परिक्षेंत पास होण्याची रात्रंदिवस चिंता व अकालीं गृहस्थाश्रमाच्या पाशानें बद्ध होणें हीं प्रमुख होत. आर्यकालची शिक्षणपद्धती निराळ्याच प्रकारची होती. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला मानवेल अशाच विषयांचें शिक्षण त्यांस दिलें जात असे. एका विषयांत पारंगत होतांच त्याचें लक्ष दुसऱ्या विषयाकडे वेधून व्याकरण, न्याय, धर्मशास्त्र, वेदांत इत्यादि सर्व विषयांमध्यें तो तरबेज होत असे. त्याप्रमाणें विद्याव्यासंग आणि ब्रह्मचर्य ह्यांचा अवलंब केल्यास कितीतरी बरें होईल. सारांश, शिक्षणाच्या प्रत्येक अवयवाकडे लक्ष देऊन मराठावर्गास तयार केलें पाहिजे. "

पूर्वीचें शिक्षण देण्याची पद्धत सांप्रतच्या पद्धतीपेक्षां किती श्रेष्ठ होती व त्यामुळें पराक्रमी विद्यार्थी कसे निपजत याचा विचार राजेसाहेबांनीं किती केला होता, हें या त्यांच्या उद्गारांवरून दिसून येतें.

यानंतर निरनिराळ्या मुद्यांवर राजेसाहेबांचें भाषण झालें. नंतर परिषदेच्या अध्यक्षांचें भाषण होऊन व परिषदेपुढें मराठा शिक्षणाला परिपोषक असे अनेक ठराव येऊन परिषदेचें काम संपलें. या परिषदेंत राजेसाहेबांनीं तिच्या पूर्वतयारीपासून मोठ्या मेहनतीनें काम केल्यामुळें ही विशेष यशस्वी झाली, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

## २ शारीरिक शिक्षण मंडळ, नागपूर.

या मंडळाचा वार्षिकोत्सव नागपूर मुक्कामीं तारीख ११ माहे आक्टोबर सन १९२१ इसवी रोजीं श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

शारीरिक शिक्षणमंडळानें हा वार्षिकोत्सव मोठ्या थाटानें केला होता. त्या प्रसंगीं राजेसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा गोषवारा खालीलप्रमाणें आहे.


" प्रिय बंधूंनो ! फार आनंदाची गोष्ट आहे कीं, आज बरेच दिवसांपासून ज्या महत्वाच्या गोष्टीकडे सुशिक्षित वर्गाचें दुर्लक्ष असून फार अनास्था होती, तिकडे सर्वांचें लक्ष जाऊं लागलें आहे. ती गोष्ट ह्मणजे ' शरीर-सुधारणा ' ही होय. आपल्या शास्त्रांत ह्मटलें आहे कीं, या जगांत शरिराखेरीज इतर वस्तू पुनःपुन्हां प्राप्त होतात. याचा अर्थ असा कीं, द्रव्य, स्त्री, मित्र, अधिकार वगैरे एकदां गेल्यास पुन्हां मिळतील; परंतु गेलेलें शरीर ह्मणजे शरिरांतील सत्व पुन्हां प्राप्त होत नाहीं. सत्वरहित शरीर मातीच्या गोळ्यासारखें निरुपयोगी होय. ज्याचें शरीर निःशक्त आहे, त्याला सर्व कांहीं अशक्य वाटतें. शक्तिमान मनुष्याला अशक्य असें कांहींच नाहीं. त्याच्या आंगीं साहस, उद्योग, कार्यक्षमता वास करीत असून सर्व प्रकारें सिद्धि प्राप्त करितां येतें. आपल्या पौराणिक ग्रंथांकडे जरा नजर फेंकली, तर असें दिसून येईल कीं, शक्तिमान मनुष्यांकडून कल्पनातीत अशी मोठमोठीं कृत्यें घडून आलीं आहेत. आज आमचें शरीरसुधारणेकडे असावें तसें लक्ष नाहीं. ज्याचें शरीर सुदृढ असतें, त्याचे आंगीं मानसिक, व नैतिक बल अधिक वास्तव्य करितें.

" विद्यार्थी दशेंत असणाऱ्या कोंवळ्या वयाच्या मुलांना त्यांचे मानसिक व शारिरिक बलास झेंपणार नाहीं, इतका अभ्यासाचा बोजा त्यांच्यावर लादला जातो; व त्यायोगानें शरीरसुधारणेचा प्रश्न सोडवावयाला त्यांना वेळच मिळत नाहीं. किंवा त्यांचे पालक त्यांना या गोष्टीचें महत्व पटवून देत नाहींत. येऊन जाऊन ध्येय एवढेंच कीं, मुलगा कसातरी पदवीधर होऊन त्यानें नोकरीस लागून आपलें पोट भरावें. मुलांनीं सुशिक्षित होऊन आपापलें जीवन सुलभ करावें, हें आह्मांसही कबूल आहे; परंतु अभ्यास करून करून पाठीचें कुबड निघालें, दृष्टि अदू झाली, शरीर निस्तेज झालें, अशी स्थिति झाल्यावर त्यांजकडून लोकोपयोगी कार्यें तर एकाच बाजूला राहोत, पण त्यांचे स्वतःचे व्यवहारही नीट होत नाहींत. यासाठीं पूर्व वयांत शरीरसुधारणेकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. पुष्कळ विद्या आहे, पण आंगीं सामर्थ्य नाहीं, तर त्या विद्येचा उपयोग स्वतःसही नाहीं व दुसऱ्यांसही होत नाहीं.

" आपल्या आर्यपद्धतीप्रमाणें मनुष्यांना चार अवस्था सांगितल्या आहेत. त्या ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास या होत. त्यांत पहिली अवस्था ब्रह्मचर्य; यावर बाकीच्या तीनही अवस्था अवलंबून आहेत. ज्यानें बालवयांत आपलें ब्रम्हचर्य राखिलें. त्यालाच बाकीच्या तीन अवस्थांतले व्यवहार नीटपणें चालवितां येतात. ब्रम्हचर्याचें महत्व फार मोठें आहे; व तें बालवयाच्या विद्यार्थ्यांकडून संगोपन करविणें, हें प्रत्येक पालकाचें आद्यकर्तव्य आहे. याकरितां पालकाचेंही वर्तन निर्दोष असलें पाहिजे. बालवयांत मुलांचे मनावर वैषयिक गोष्टींचा परिणाम होतां कामा नये. होतां होईल तों शृंगारिक नाटकें पहाणें, किंवा काल्पनिक कादंबऱ्या वाचणें इकडे त्यांची प्रवृत्ति होऊं देऊं नये. त्यायोगानें ब्रह्मचर्याला बाध येतो. भारतीय युद्धांत मुळींच शस्त्र धरणार नाहीं, अशी भगवान् श्रीकृष्णांची प्रतिज्ञा असतांहि त्यांना भीष्माचार्यांनीं शस्त्र धरावयाला लाविलें. शुक्राचार्यांचा पुत्र कच यानें शत्रूंच्या गोटांत शिरून तेथील शृंगारिक वस्तूंकडे दुर्लक्ष करून संजीवनी विद्या प्राप्त करून घेतली. तसेंच दुर्लंघ्य असा महासागर श्रीमारुतिरायांनीं आक्रमण केला. हा सर्व प्रभाव केवळ ब्रह्मचर्याचा आहे. एवढा पुरुषार्थ आंगीं आणण्याकरितां ब्रह्मचर्य पाळून आपलें मन व शरीर सुदृढ केलें पाहिजे. चांगली किंवा वाईट कर्मे होतील, त्याप्रमाणें सुख किंवा दुःख प्राप्त होतें. याकरितां आपला आयुष्यक्रम सुखाचा व्हावा ह्मणून पूर्ववयांत ब्रह्मचर्य कायम राखून शरीर सुदृढ बनविलें पाहिजे. जुन्या काळचीं माणसें फार सुदृढ असत. आपले येथील (नागपूरचे) डॉक्टर मुंजे यांचे वडिलांचें वय जवळजवळ शंभर वर्षांचें होतें. त्या वयांत ते दररोज सात आठ मैल फिरून व्यायाम घेत असत. इतक्या वृद्धावस्थेंत इतकी शक्ति असण्याला केवळ पूर्ववयांत पाळिलेलें ब्रह्मचर्य कारण होय यांत संदेह नाहीं.

" शरीर-सुधारणेसाठीं शहरच्या प्रत्येक भागांत एकेक आखाडा असणें जरूर आहे. त्यांत त्या त्या भागांतील पालकांनीं आपापलीं मुलें पाठवावींत. व्यायाम शाळेवर चांगल्या, नीतिमान्, व निर्व्यसनी अशा गुरूची योजना असावी.

" आपल्या येथें ( नागपुरांत ) सुशिक्षित वर्गापेक्षां अशिक्षित वर्गांत शारीरिक सुधारणेचा प्रसार जास्त आहे परंतु त्या लोकांत शिक्षणाच्या अभावामुळें



नागपूर येथील मराठा क्षत्रिय मंडळ.

पृष्ठें ४१८-४१९

[K. P. Z. P. B.



क्षात्रिय उपकारिणी सभा मध्यभागां श्री० दुर्जनशालसिंह व श्री० राजे साहेब.

(क.फो.झिं.प्रे वे)

पृष्ठें ४१८-४१९

शक्तीचा प्रसंगोपात् दुरुपयोग होतो. त्यायोगानें आखाड्यांत जाणारे तेवढे दुर्वर्तनी दांडगे असावेत, असा अधिकारी वर्गाचा गैरसमज झाला आहे. हें फार वाईट आहे. हा त्यांचा गैरसमज दूर करणें आपलें कर्तव्य आहे.

" आखाड्यांत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्याकरितां वार्षिकोत्सव करून त्यांत मुलांच्या कुस्त्या, दांडपट्टा आदिकरून कार्यक्रम असावेत. सारांश, सर्व प्रकारें उत्साह वाढून उद्दिष्ट कार्य सिद्धीस जाईल, अशी व्यवस्था असावी. " अशाप्रकारचें उद्बोधक आणि कळकळीचें भाषण राजेसाहेबांनीं केलें. राजेसाहेबांच्या भाषणाचा परिणाम सुशिक्षित समाजावर चांगल्या प्रकारें झाला व या समारंभानंतर नागपूरचा बराच सुशिक्षित समाज आखाड्यांत उतरूं लागला. याचा प्रभाव नागपुरांतील मुसलमानांच्या दंग्याचे वेळीं सर्व जगाच्या नजरेला येऊन चुकलाच आहे. थोर माणसांची भरीव कार्य करण्याची ही अशीच पद्धत असते.

३ क्षत्रिय उपकारिणी सभा:—मध्य प्रदेश व वऱ्हाड या प्रांतांत सांप्रत बरीच हिंदुस्थानी क्षत्रिय घराणीं आहेत. त्यांचा संबंध राजपुतान्यांतील क्षत्रिय घराण्याशीं रोटीबेटी व्यवहाराचा आहे. त्यांनीं एक प्रांतिक सभा बरेच वर्षांपासून या प्रांतांत स्थापिली आहे. तिला " क्षत्रिय उपकारिणी प्रांतिक सभा मध्यप्रदेश व वऱ्हाड " असें संबोधण्यांत येतें. या सभेचें एकविसावें वार्षिक अधिवेशन नागपूर मुक्कामीं तारीख १९ व २० एप्रील सन १९२४ इसवी रोजीं झालें. या अधिवेशनाच्या स्वागतमंडळाचे अध्यक्ष ठाकूर डॉक्टर गिरिधारीसिंह ऊर्फ घासीसिंह सिसोदिया व सेक्रेटरी ठाकूर गणपतसिंह गहलोत हे होते. अधिवेशनाचे अध्यक्ष खिलचीपूर संस्थानचे अधिपति श्रीमन्महाराज राजा दुर्जनशालसिंह मंडित करणार होते.

या परिषदेपूर्वी ४-५ महिनेच नागपुरीं मुसलमानांचा प्रचंड दंगा झाला होता. त्यामुळें या क्षत्रिय परिषदेला विशेष महत्व आलें होतें. नागपूरच्या दंग्याची वार्ता सर्व हिंदुस्थानांत समजली होती. त्याचप्रमाणें राजपुतान्यांतही तेथील क्षत्रियांना समजली होती. नागपुरनें आपलें नांव राखिलें व त्याचें श्रेय मुख्यतः श्री. राजे लक्ष्मणराव भोंसले यांना आहे, हेंही तेथील प्रमुख राजेरजवाडे यांचे कानावर

गेलेंच होतें. तेव्हां या अधिवेशनाला राजपुतान्यांतील बरेच मोठमोठे क्षत्रिय वीर हजर राहणार होते. या क्षत्रिय सभेचीं यापूर्वी वीस अधिवेशनें झालीं होतीं. परंतु उत्तर हिंदुस्थानी क्षत्रियांव्यतिरिक्त इतर क्षत्रियांची त्या परिषदांतून कधींच वाच्यता झाली नव्हती. परंतु या नागपुरच्या परिषदेनें त्याला महाराष्ट्र क्षत्रियांविषयीं तोंड फोडलें; त्यामुळें या परिषदेला विशेष महत्व आलें. आमच्या चरित्र नायकांनीं या परिषदेच्या वेळीं मराठा क्षत्रिय वर्गाची जी अमोल्य कामगिरी केली, ती महाराष्ट्राला कधींच विसरतां येणार नाहीं.

सुमारें पांचशें वर्षांपूर्वी चितोडगडाहून दक्षिणेंत देवराज सिसोदीया आल. तेव्हांपासून त्यांच्या वंशजांचा संबंध राजपुतान्यांतील क्षत्रियांबरोबरचा सुटला होता. त्यांना पुढील सोयरिकी महाराष्ट्रीय क्षत्रियांबरोबर कराव्या लागल्या. त्यामुळें गेल्या पांचशें वर्षांच्या अवधींत उत्तर हिंदुस्थानी क्षत्रिय आणि मराठा क्षत्रिय यांचा कांहीं संबंध असेल, असें कोणाला वाटलें नव्हतें. परंतु असा एक प्रसंग येतो कीं, त्या वेळीं परमेश्वर आपण होऊन परस्परांची ओळख करून देतो. अशाच प्रकारचा प्रसंग म्हणजे ही नागपुरांतील ' क्षत्रिय उपकारिणी सभेची परिषद ' होय.

ही परिषद होण्यापूर्वी दोन तीन वर्षे तेलंग शास्त्र्यांनीं कलियुगांत क्षत्रिय व वैश्य दोन वर्ण नाहींत, म्हणून वाद उपस्थित केला होता. त्या वादाला राजे-साहेबांनीं आपल्या मुलाचें वेदोक्त उपनयन एका वर्षापूर्वी करून कृतीनें उत्तर दिलें होतें. ही उपनयनाची पद्धत, क्षत्रिय गायत्रीमंत्र वगैरे सर्व कांहीं उदेपूरच्या वेदोक्ताप्रमाणेंच असल्याचें नागपूरच्या रजपूत क्षत्रियांना दिसून आलें होतें. रजपूत क्षत्रिय कोंबडीं अगर अंडीं यांना अतिशय अपवित्र मानतात, त्याप्रमाणें नागपूरचे वेदोक्त कर रे मराठे क्षत्रिय हेही कोंबडीं, अंडीं यांना शिवत नाहींत. तेव्हां रजपूत क्षत्रिय आणि नागपुरचे मराठा क्षत्रिय यांत कांहींच भेदभाव नाहीं, असें त्यांना वाटूं लागलें होतें. शिवाय नागपुरचें वेदोक्त करणारे मराठे क्षत्रिय मद्यपान करीत नाहींत, हेंही रजपूत क्षत्रियांना कळून चुकलें होतें. त्यामुळें त्यांना मराठा क्षत्रियाबद्दल विशेष आस्था उत्पन्न झाली होती. पुढें नागपूरचा धर्मसत्याग्रह, मुसलमानांचा दंगा, यांमधील राजेसाहेबांची धार्मिक कामगिरी पाहून त्यांना मराठा क्षत्रियांबद्दल अभि-मान वाटूं लागला होता या मुसलमान दंग्याचें वेळीं राजेसाहेबांबरोबर ' क्षत्रिय

उपकारिणी परिषदे'चे स्वागताध्यक्ष डॉ. घासीसिंह सिसोदिया हेही सहकार्य करीत होते. त्या वेळीं खऱ्या क्षत्रियाला शोभेल अशी कार्य करण्याची राजेसाहेबांची धडाडी त्यांच्या पूर्ण नजरेला आली होती. त्या वेळच्या राजेसाहेबांच्या क्षात्रतेजाच्या प्रकाशानें डॉ. घासीसिंह सिसोदीया यांच्या डोळ्यांना त्यांच्याचप्रमाणें भोंसले राजे क्षत्रिय आहेत, असें दिसू लागलें. आणि 'युवराजांचें शिक्षण' या प्रकरणांत दिलेल्या धनगराच्या वाघाची व जंगली वाघाची जशी प्रसंगानें ओळख पटली व त शेवटीं एक होऊन कार्यतत्पर झाले. त्याप्रमाणें या उभयतां सिसोदिया वंशजांचें झालें. डॉ० घासीसिंह हेही सिसोदिया व नागपूरचे भोंसले राजे हेही पूर्वीचे सिसोदियाच. अशाप्रकारें परस्परांची ओळख पटल्यानंतर नागपुरास होणाऱ्या क्षत्रिय परिषदेंत मराठा क्षत्रियांचा समावेश करून घेण्याची कल्पना निघाली.

खिलचीपुर संस्थानचे अधिपति श्रीमन्महाराज राजा दुर्जनशालसिंह बहादूर यांचें आगमन नागपुरीं झालें. त्या वेळीं राजेसाहेबांनीं त्यांचें स्वागत मोठ्या आनंदानें केलें. या परिषदेंत राजेसाहेबांनीं सर्व बाजूनें भाग घेतला होता. सदर परिषदेंत रजपूत क्षत्रिय व महाराष्ट्र क्षत्रिय यांचें एकीकरण झालें. परस्पर क्षत्रियांनीं परस्परांना ओळखिलें. हें एकीकरण होण्याचा योग पांचशें वर्षांनंतर आला, यांत संशय नाहीं. तारीख १९ व २० हे परिषदेचे दिवस मोठ्या धांदलीचे व उत्साहाचे गेले. परिषदेचें कामही मोठ्या यशस्वी पद्धतीनें पार पडलें. याचें मुख्य श्रेय समतोल वृत्तीनें परिषदेचें काम चालविणाऱ्या श्रीमन्महाराज राजा दुर्जनशालसिंह यांचेकडेच आहे. श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले वगैरे मराठे क्षत्रिय मंडळींना क्षत्रिय उपकारिणी सभेचे रीतसर सभासद करून घेण्यांत आलें. रजपूत क्षत्रिय व मराठे यांचें एकीकरण करण्याचें थोर कार्य राजेसाहेबांनीं मोठ्या कुशलतेनें केलें. क्षत्रियांची संघटना करण्याचे दृष्टीनें ही अमोल कामगिरी झाली, असें प्रत्येकाला वाटल्यावांचून राहणार नाहीं.

रजपूत क्षत्रिय इतके दिवस मराठा क्षत्रियांचेकडे रोटीव्यवहारही करीत नसत. परिषदेंत या उभय क्षत्रियांचें एकीकरण झालें, तें केवळ शाब्दिक स्वरुपाचें नसावें, ह्मणून राजेसाहेबांनीं खिलचीपुर संस्थानच्या अधिपतींना व त्यांच्या बरोबरीला इतर रजपूत क्षत्रिय पाहुण्यांना एक टोलेजंग मेजवानी दिली. त्या मेजवानीचे वेळीं

एका रांगोळींत एक मराठा क्षत्रिय, तर एक रजपूत क्षत्रिय अशी भोजनाला बसण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. हा मेजवानीचा थाट राजेसाहेबांच्या आयुष्यांतील चिरस्मरणीय असाच झाला, यांत संशय नाहीं. रोटीव्यवहारापर्यंत रजपूत क्षत्रियांचें व मराठा क्षत्रियांचें एकीकरण राजेसाहेबांनीं घडवून आणलें, हें पुष्कळांना मोठें कौतुकास्पद वाटलें.

एकाद्या कुटुंबानें किंवा व्यक्तीनें एकादी सुधारणा घडवून आणली, तर ती सर्वमान्य होत नाहीं. ती त्या कुटुंबापुरती किंवा व्यक्तीपुरतीच होते. कालांतरानें अशी सुधारणा नामशेषही होऊन जाते. राजेसाहेबांचें धोरण असें नव्हतें. ते जी सुधारणा करीत, ती व्यक्तीपुरती नसून सर्व समाजाकरितां असे. ह्मणूनच त्यांचें कार्य लोकादराला पात्र आणि सर्वमान्य होत असे. मुधोळ संस्थानच्या अधिपतींनीं रजपूत क्षत्रियाबरोबर बेटीव्यवहार करण्याचा उपक्रम सुरू केला. पण ती एका कुटुंबापुरतीच सुधारणा झाली. बेटीव्यवहाराची नागपुरीं पद्धत पाडावयाला आणखी दोनचार वर्षें राजेसाहेब जगले असते, तर तीही रूढि नागपुरीं सर्रास सुरू झालेली दिसली असती.

आपल्या धर्माचा, वर्णाचा आणि कार्याचा विसर पडलेल्या क्षत्रिय लोकांना राजेसाहेबांची ही कामगिरी ह्मणजे अमोघ मंत्रच होता, असें कोणत्या विचारवंताला वाटणार नाहीं !

४ अखिल महाराष्ट्र शारीरिक उन्नति परिषदः—ही परिषद इ० स० १९२५ च्या जानेवारी महिन्यांत यवतमाळ येथें झाली. या परिषदेचे अध्यक्ष श्री. राजे लक्ष्मणराव भोंसले हे होते. नागपूरच्या दंग्यानंतर महाराष्ट्रामध्यें दोन चार वर्षांत शारीरिक उन्नतिबद्दल किंवा शिक्षणाबद्दल ज्या परिषदा झाल्या त्यांमध्यें, आखाडे, व्यायामशाळा, मर्दानी सामने वगैरेचे उद्घाटन समारंभ किंवा सामने यांमध्यें किंवा धर्मविषयक ज्या परिषदा झाल्या, त्या परिषदांचे आमचे चरित्रनायक अध्यक्ष किंवा स्वागताध्यक्ष हटकून झाले. आणि या प्रकारची कामगिरीही त्यांनीं बृहन्महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर केली. त्याचपैकीं यवतमाळच्या या अखिल महाराष्ट्र शारीरिक उन्नति परिषदेच्या अध्यक्षाची कामगिरी होय. यवतमाळ येथील श्रीहनु-

मान आखाड्याचे राजेसाहेब एक मोठे आश्रयदाते होते. इतर मोठमोठ्या ठिकाणच्याही आखाड्यांचे ते याचप्रमाणें आश्रयदाते होते. त्यामुळें या मल्लविद्येसंबंधीं कोठें कांहीं उत्सव किंवा परिषद भरली, ह्मणजे त्या ठिकाणीं राजेसाहेब असावेत, असें प्रत्येकाला वाटे. आणि राजेसाहेबांना त्या बाबतींत बोलावणें आलें, ह्मणजे ते होतां होईतोंपर्यंत तें अमान्य करीत नसत. यवतमाळ येथें ही जी परिषद भरली, ती फारच मोठ्या स्वरूपाची होती. राजेसाहेबांचें त्या ठिकाणीं टोलेजंग स्वागत करण्यांत आलें. राजेसाहेबांचें भाषणही नेहमींप्रमाणें परिणामकारक आणि विशेष कळकळीचें असेंच झालें. एकंदरींत हीहि परिषद यशस्वी होण्याला राजेसाहेबांचें अध्यक्षपद कारणीभूत झालें, यांत संशय नाहीं.

५ कामठी येथील धर्मसभाः— नागपुरापासून बारा मैलांवर कामठी या नांवाचें शहर आहे. हें एक मोठें लष्करी ठाणें आहे. तेथें बहुतेक हिंदी वस्ती आहे. भाषा बहुतेक हिंदीच आहे. तेथें तारीख ४ माहे आक्टोबर सन १९२५ इ. रोजीं धर्मसभेचा आठवा वार्षिकोत्सव झाला. श्री. धर्मवीर राजेसाहेब हे या वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष होते. नागपूर येथील मुसलमानांच्या दंग्याची थोडीबहुत झळ कामठीला लागलीच होती. ह्मणून या उत्सवाचे अध्यक्ष राजेसाहेबांना मुद्दाम करण्यांत आलें होतें. राजेसाहेबांच्या कामगिरीवरून त्यांच्या बाबतींत लोकांचा असा ग्रह झाला होता कीं, हिंदुधर्माचें रक्षण करणारे हे खरे क्षत्रिय धर्मवीर आहेत. राजेसाहेबांनीं लोकांचा हा झालेला ग्रह त्यांना प्रसंगीं उपयोगी पडून अनुभवानें खरा करून दाखविला. हा वार्षिकोत्सव कामठीच्या हिंदुलोकांनीं टोलेजंग स्वरूपांत केला. या उत्सवाकरितां ठिकठिकाणचे शास्त्रीपंडीतही आले होते. राजेसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकाल्यानंतर त्या वेळच्या परिस्थितीला अनुसरून त्यांनीं हिंदींत भाषण केलें. राजेसाहेबांना हिंदीभाषेचा मराठी भाषेइतकाच परिचय होता. ते उत्तमच हिंदी वक्ते होते. त्यांच्या भाषणाचा थोडक्यांत येथें गोषवारा आह्मी देत आहोंत.

" प्रिय सज्जनहो ! आपण जाणतच आहां कीं, आजकाल भिन्न भिन्न धर्मांमध्यें जे तंटे सुरू झाले आहेत, त्यामुळें सर्व वर्णीय व सर्व सांप्रदायी हिंदुधर्माच्या रक्षणाचा प्रश्न प्रामुख्यानें उपस्थित झाला आहे. ज्याची धर्मावर श्रद्धा नाहीं. धर्म-

रक्षणाकरितां तनमनधनेंकरून पुढें सरसावयाला जो कांकूं करतो, त्याचें जीवित व्यर्थ समजलें पाहिजे. धर्माशिवाय जय मिळत नाहीं किंवा सद्गतीही मिळूं शकत नाहीं. इतिहासाचें अवलोकन केल्यानें असें दिसून येतें कीं, कोणतीही" अन्यधर्मीय राष्ट्रसत्ता दुसऱ्या धर्माच्या राष्ट्रावर प्रस्थापित करण्यामध्येंही धर्मच कारणीभूत झाला आहे. यामुळें धार्मिक उन्नति हीच माझ्यामतें सर्व उत्कर्षांचें मूळ आहे.

" हिंदुसमाजाला परधर्मियांचें अनुकरण करण्याची संवय लागण्याचें कारण हेंच कीं, आपल्या पूर्व संस्कृतीचा लोप होत चालला आहे; आणि त्यामुळेंच हिंदु-धर्माला विपरीत असे अपमानास्पद प्रकार होत आहेत. याचा दोष ज्या धर्माचा प्रत्यक्ष अपमान होत आहे, त्या धर्माच्याच अनुयायी लोकांना देणें योग्य आहे.

" आपणाला माहीत आहे कीं, सशक्ताची स्वाभाविक प्रवृत्ति अशक्ताचा छळ करण्याची असते. हिंदुसमाज जरी संख्याबलानें मोठा असला, तरी त्याच्यांत सत्व व सामर्थ्य कमी झाल्यामुळें तो फारच बलहीन झाला आहे. याचें मुख्य कारण आपसांतील फूट, भेदभाव, मतमतांतरें आणि अंतःकलह हेंच आहे. जोंपर्यंत आपल्यामधील या दोषांचें निवारण होत नाहीं, तोंपर्यंत हिंदुधर्मावर परधर्मांचे हे अपमानास्पद प्रहार होतच राहणार !

" हिंदुधर्मावरील ही आपत्ति दूर करण्याकरितां कोणत्या उपायाचें अवलंबन करावें, हा प्रश्न उपस्थित होतो. त्याला माझ्या मतें पहिल्यानें धार्मिक दृष्टीनें ऐक्य होणें आवश्यक आहे. धर्मरक्षणाचे बाबतींत जाति, पंथ अथवा मताची पर्वा न करितां आणि आपसांतील भेदभाव सर्व विसरून जाऊन एकानें दुसऱ्याच्या खांद्याला खांदा भिडवून धार्मिक कर्तव्याविषयीं आपली तत्परता दाखविली पाहिजे. याचें एक दृश्य महाभारतांत पहावयाला मिळतें.

**परस्परविरोधेन वयं पंच च ते शतम् ॥ अन्यैस्साकं विरोधेन वयं पंचोत्तरःशतम् ॥**

अर्थात युधिष्ठिर ह्मणतात कीं, ज्या वेळीं आमच्याआमच्यामध्यें वैमनस्य उत्पन्न होईल, त्या वेळीं आह्मी केवळ पांचच पांडव व दुसऱ्या पक्षाला शंभर कौरव. परंतु

आमच्या दोघांच्या विरोधांत जर कोणी तिसरा आला, तर त्या वेळीं आह्मी एकशें-पांच होऊनें जाऊं. या दृष्टांताचा अभिप्राय एवढाच आहे कीं, हिंदुधर्माच्या भिन्न-भिन्न अवयवांनीं हिंदुधर्माच्या रक्षणाच्या बाबतींत एके ठिकाणीं मिळून चालण्याचें हेंच ध्येय स्वीकारावें.

"कांहीं विघ्नसंतोषी लोकांनीं आमच्या अंतःकलहाचा फायदा घेऊन आमच्या-मध्यें कित्येक वाद उपस्थित करण्याच्या चेष्टा सुरू केल्या आहेत. त्यांचा योग्य वेळीं प्रतिकार केला नाहीं, तर हिंदुसमाजाची काय स्थिति होईल, हें मी सांगूं इच्छित नाहीं. ईश्वरानें तो दिवस आह्मांला दाखवूं नये, एवढीच माझी इच्छा आहे. एकंदरींत हे वाद या वेळेचें महत्व ओळखून आपसांत मिटविले पाहिजेत. उदाहरणार्थ, ब्राह्मण व अब्राह्मण यांचा वाद, दुसरा स्पृश्यास्पृश्य इत्यादि. ब्राह्मण अथवा अब्राह्मण, स्पृश्य अथवा अस्पृश्य या जाती कांहीं आज निर्माण झालेल्या नाहींत. त्या पुरातन कालापासून आहेत. त्या वेळीं या जाती अस्तित्वांत असूनही हिंदु-समाज उन्नतीच्या शिखराला पोंचला होता. त्या वेळीं धर्मावर आपत्ति आली असतां सर्व वर्णांचे लोक एकत्रित झाले होते व होत होते. अर्थात ब्राह्मण अथवा अब्राह्मण, स्पृश्य अथवा अस्पृश्य हे भेद असूनही सर्वांमध्यें बंधु-प्रेमभाव जागृत होता. परंतु वर्तमानकालीं कांहीं विघ्नसंतोषी सज्जन असे क्षुल्लक झगडे उभे करून आपसांत अंतःकलहाचें बीजारोपण करीत आहेत. हिंदुसमाज विस्कळित होण्याचें कारण हेंच आहे.

" या झगड्याला, सर्व वर्णांच्या व संप्रदायांच्या सज्जनांनीं उदार अंतःकरणानें व व्यवहारिक निष्कपट प्रेमानें मिटविलें पाहिजे. जो ज्या स्थितींत असेल, त्याच स्थितींत स्वकर्माच्या विषयामध्यें त्याच्याकडून धार्मिक काम करून घेतलें पाहिजे. त्याशिवाय दुसरा कोणताच उपाय नाहीं. याप्रमाणें आपसांतील तंटे मिटवून ऐक्य व प्रेमभाव वाढवून स्वधर्मरक्षणाचा प्रयत्न केला पाहिजे. हेंच आपणाला माझें वारंवार सांगणें आहे. धार्मिक उन्नतीशिवाय आणि तिच्या मदतीवांचून आपणाला दुसऱ्या कोणत्याही कार्यांत यश मिळवितां येणार नाहीं. 'यतो धर्मस्ततो जयः, "

यानंतर राजेसाहेबांनीं हिंदुसंघटन, शुद्धि, ब्रह्मचर्याची आवश्यकता, एकी, गीतेंतील दुसरा अध्याय वाचण्याची जरूरी, सामाजिक हानिकारक रूढी बदलवि-

ण्याची खटपट वगैरे मुद्यांवर विस्तारपूर्वक भाषण केलें. नंतर निरनिराळे ठराव सभेपुढें येऊन ते पास झाले. याप्रमाणें कामठीचा धर्मसभेचा वार्षिकोत्सव मोठ्या थाटानें पार पडला. या उत्सव-प्रसंगानें राजेसाहेबांविषयीं हिंदुस्थानी लोकांचा केवढा आदर होता, हें स्पष्ट दिसून आलें.

## ६ वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत–हिंदुसामाजिक परिषद्.

वऱ्हाड व मराठी-मध्यप्रांत हिंदुसामाजिकपरिषदेचें पहिलें अधिवेशन उमरावती येथें तारीख १२ व १३ डिसेंबर इ. स. १९२५ इ. रोजीं गणेशनाटक-गृहांत फारच यशस्वी असें झालें. या परिषदेच्या स्वागताध्यक्षाचे जागीं श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले यांची निवड करण्यांत आली होती. ही सामाजिक परिषद पहिल्यानेंच भरविण्याचें कारण नागपूर येथील मुसलमान बंधूंचा दंगा हें होय. हिंदुधर्मावर परधर्मियांचे हल्ले कसे कसे होत आहेत व त्यांतून हिंदुधर्मियांची कशी सुटका करितां येईल, हा विषय हिंदुधर्मांचे पुढाऱ्यांपुढें नागपुरच्या दंग्यापासून होता. हिंदुसमाज संघटित झाल्याशिवाय हिंदुधर्मरक्षण होणार नाहीं, अशी हिंदु पुढाऱ्यांची बालंबाल खात्री झाली होती. हिंदुसंघटन करावयाचें तर हिंदुसमाजांत नाना पंथ, नाना जाती अशी त्याची परिस्थिति. ब्राह्मण, ब्राह्मणेतर, स्पृश्य, अस्पृश्य, जहाल, मवाळ इत्यादि राजकीय व सामाजिक स्वरूपाचे पक्ष उत्पन्न होऊन परस्परांत निष्कारण तेढ व वैमनस्य वाढलेलें. यामुळें हिंदुसमाजाचे अवयव खिळखिळे होऊन त्यावर येणाऱ्या घाल्याचा प्रतिकार करण्याचें त्यांत सामर्थ्य नसलेलें. अशा स्थितींत हिंदुसमाजांतील परस्पर जातींचें, पक्षांचें अगर पंथांचें निष्कारण वाढलेलें वैमनस्य आणि तेढ काढून टाकण्याकरितांच मुख्यतः या परिषदेची खटपट होती. आणि आपली समतोलवृत्ति ठेवून सर्व हिंदुसमाजाला प्रिय झालेल्या राजेसाहेबांना म्हणूनच स्वागताध्यक्ष निवडण्यांत आलें होतें.

स्वागताध्यक्ष श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले हे मोटारीनें नागपुराहून उमरा-वतीला तारीख १२ रोजीं सकाळीं आले. मोर्शी-रस्त्यावर गांवाबाहेर उमरावतीच्या प्रमुख नागरिकांनीं त्यांचें मोठें स्वागत केलें. हारतुरे वगैरे अर्पण केल्यानंतर त्यांना नामदार सर आण्णासाहेब जोशी यांच्या बंगल्यांत उतरण्याकरतां पोंचविण्यांत आलें. या परिषदेचे नियोजित अध्यक्ष मुंबईचे बॅरिस्टर मुकुंदराव जयकर हेही

त्याच दिवशीं तेथें आले. त्या दिवशीं तिसरे प्रहरीं परिषदेच्या कामाला सुरवात झाली. स्वागतमंडळाचे सभासद, प्रेक्षक, प्रतिनिधी वगैरेंनीं थिएटर चिकार भरून गेलें होतें. प्रारंभीं ' यशवंत संगीत मंडळीं ' तील मुलांनीं एक आणि त्या, कंपनीचे मालक श्री. शंकरराव सरनाईक यांनीं दोन अशीं ईशनमनपर व स्वागतपर पद्यें राग-दारींत अतिशयच सुंदर व कर्णमधुर अशीं ह्मटलीं. त्यामुळें. परिषदेला सुरवातीपासूनच रंग चढूं लागला. ना० श्री० दादासाहेब खापर्डे यांनीं स्वागताध्यक्ष राजे लक्ष्मणराव भोंसले यांचे गळ्यांत टाळ्यांच्या गजरांत हार घातल्यानंतर स्वागतपर भाषणाकरितां राजेसाहेब उठले. त्यांचें भाषण फारच कळकळीचें व उद्बोधक असें झालें. त्याचा सारांश असा:—

" आज आपला हिंदुसमाज विस्कळित होण्याचीं कारणें ह्मणजे जातींजातींतील, द्वेष, कृत्रिम व आत्मविघातकी ब्राह्मण-ब्राम्हणेतर वाद आणि अस्पृश्यता हीं होत. चातुर्वण्यांतील सर्व लोकांनीं एकाच शरिराच्या अयावप्रमाणें एकमेकांना मदत करून राष्ट्राचा प्रपंच चालविला पाहिजे, हें माझें ह्मणणें अल्पसंख्याक सत्यशोधकांना आजच पटणार नाहीं. पण हिंदूंना नामशेष करण्यासाठीं जे टपले आहेत, अशा परधर्मि-यांच्या आहारीं पडून व त्यांच्या सहाय्यानें सत्यशोधक तर आपसांत बेबनाव करीत आहेत. आपण आपसांतील द्वेषानें ह्या परधर्मियांच्या आहारीं अशा रीतीनें कधींहि पडतां कामा नये. ( टाळ्या ) आपलें तेवढें सर्व सोडून देऊन किंवा मोडून टाकून सुधारणा कधींहि होणार नाहीं. आपलें जें आहे त्याला धरूनच त्यांतील दोष काढ-ल्यानें सुधारणा होणार आहे. सात कोटी अस्पृश्यांच्या उन्नतीशिवाय हिंदुसमा-जाच्या उन्नतीचे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत. सर्व सार्वजनिक पानवठे व शाळा वगैरेंचा उपयोग करण्यास त्यांना मोकळीक दिलीच पाहिजे. त्यावांचून त्यांचें व हिंदूंतील इतर वर्गाचें प्रेम उत्पन्न होणें शक्य नाहीं. "

अशा आशयाचें व परिषदेच्या पुढील कार्याच्या धोरणाला अनुलक्षून त्यांनीं भाषण संपविल्यानंतर अध्यक्षांची रीतसर निवड, अध्यक्षांचें भाषण आणि नंतर स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांच्या भाषणांला अनुसरून सभेपुढें ठराव येऊन ते पास झाले. शेवटीं स्वागत मंडळातर्फें आभार मानतांना राजेसाहेब ह्मणाले, ' ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे बाबतींत मला एवढेंच बोलावयाचें आहे कीं, श्रीरामचंद्र क्षत्रिय

होते, भगवान् श्रीकृष्णही क्षत्रियच होते. तेव्हांपासून तों श्रीशिवाजीमहाराजांपर्यंत क्षत्रियांनीं काय काम केलें, व तें कसें केलें हें पाहून, त्यांची लाज राखून जें काय करावयाचें असेल तें करा. ' असा ब्राह्मणेतर पक्षाला उपदेश करून त्यांनीं सर्वांचे आभार मानले. अशाप्रकारें ही पाहिलीच वऱ्हाड मध्यप्रांत सामाजिक परिषद यशस्वी रीतीनें पार पडली.

या परिषदेच्या वेळीं राजेसाहेबांचा उमरावतीला ठिकठिकाणीं निरनिराळ्या पद्धतीनें मोठा गौरव झाला. त्यांत तेथील श्री० लक्ष्मण देव श्रीकृष्ण क्षीरे शास्त्री धर्माधिकारी यांनीं राजेसाहेबांना अमोल असा ' बद्ध काव्यहार ' मोठ्या गौरवानें अर्पण केला. राजेसाहेबांना काव्याची विशेष आवड असल्यामुळें व कवींना आपली करामत दाखविण्याला राजेसाहेब हे योग्य पुरुष वाटल्यामुळें त्यांच्या आयुष्यांत असे अनेक प्रसंग आले. क्षीरशास्त्री यांचा ' बद्ध काव्यहार ' विशेष मोलाचा असल्यामुळें तो येथें दिला आहे. हिऱ्या मोत्यांच्या अलंकारापेक्षां हे काव्यालंकार राजेसाहेबांना मनापासून आवडत असत.

७ हिंदु परिषदः—नागपूर येथील व्यंकटेश थिएटरांत हिंदु परिषद ही तारीख ६ माहे आगष्ट सन १९२७ इ. रोजीं मद्रासचे सर शंकर नायर यांचे अध्यक्षतेखालीं झाली. श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले हे या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. उमरावतीची सामाजिक परिषद भरविण्याला जीं कारणें उत्पन्न झालीं होतीं, तींच नागपुरच्या या परिषदेच्या मुळाशीं होतीं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला नागपुरींही थोडें तोंड फुटल्यामुळें त्याचा बींमोडहोण्याकरितां व परस्परांतील वैमनस्य पार काढून टाकण्याकरितां ही परिषद होती. या परिषदेचे स्वागताध्यक्ष राजेसाहेब असल्यामुळें ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाकाऱ्यांनींही या परिषदेंत भाग घेतला होता. राजेसाहेबांच्या समतोल वृत्तीच्या धोरणामुळें ही परिषद पूर्ण यशस्वी अशी झाली व त्यामुळें ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील तेढ जाऊन राजेसाहेबांच्या मनाप्रमाणें नागपुरांतील हिंदुसंघटनेचें कार्य पार पडलें.

### ८ मध्यप्रांतीय मालगुजार–कास्तकार परिषद.

श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले यांचे अध्यक्षतेखालीं मध्यप्रांतीय मालगुजार कास्तकार परिषदेचें पहिलें अधिवेशन कटणी येथें तारीख ९ व १० जानेवारी सन

१९२८ इ. रोजीं झालें. या अधिवेशनाचा हेतु मालगुजार आणि कास्तकार यांचेमधील हितसंबंध कायम राहून त्यांना भासत असलेल्या अडचणी सरकारनें दूर कराव्या, हा होता. या परिषदेचे स्वागताध्यक्ष देशभक्त शेठ जमनादास एम्. एल. सी. हे होते. या पाहिल्याच अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान आमचे चरित्र-नायकांना देण्यांत आला होता. यावरून मध्यप्रांतांतील धनाढ्य मालगुजारांचा व गरीब कास्तकारांचा त्यांच्यावर केवढा विश्वास होता व त्यांचेबद्दल त्यांना केवढा आदर वाटत होता, हें सांगण्याची जरूरी नाहीं.

मध्यप्रांतांत ही परिषद फारच महत्वाची अशी झाली. कारण तो प्रांत भाषेच्या दृष्टीनें मराठी व हिंदी असा विभागला गेला आहे. कर्नाटकांत ज्याप्रमाणें मराठी व कानडी त्याचप्रमाणें मध्यप्रांतांत मराठी व हिंदी असे दोन तट उत्पन्न झाले होते. मध्यप्रांतांतील कायदेमंडळाच्या लोकनियुक्त निवडणुकीही मराठी-हिंदी अशा पक्षाभिमानानें होत असत. अर्थात मध्यप्रांतांतील मालगुजार व कास्तकार यांच्यामध्येंही मराठी-हिंदीचें वारें उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. परंतु, राजेसाहेब हे मराठी प्रदेशांतले जरी गणले जात, तरी हिंदी प्रदेशांतील लोकांचा त्यांच्याबद्दलचा आदर तिळमात्र कमी झाला नव्हता. म्हणूनच त्यांना एकमतानें या परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला

मध्यप्रांतांत मालगुजार पद्धत चालू असल्यामुळें या परिषदेशीं सावकार आणि कास्तकार या दोन्ही दर्जाच्या लोकांचा हितसंबंध निगडित होता. याकरितां या परिषदेला धनिक व गरिब असे दोन्ही स्थितींतले लोक हजर राहिले होते. त्यामुळें कटणीला फारच मोठा लोकसमुदाय जमला होता. त्याशिवाय नागपुरचे राजे अध्यक्ष असल्यामुळें गांवोगांवचे हजारों लोक त्यांच्या दर्शनाकरितां कटणीला लोटले होते. अध्यक्षांची स्वारी तेथें जाऊन पोंचल्यानंतर त्यांची मोठ्या थाटानें जंगी मिरवणूक काढण्यांत आली.

तारीख ९ रोजीं परिषदेच्या कामाला सुरवात झाली. स्वागताध्यक्षांचे भाषणा-नंतर राजसाहेबांचं अध्यक्ष या नात्यानें हिंदीमध्यें भाषण झालें. हें भाषण फारच मोठें होतें. या त्यांच्या भाषणांत मालगुजार व कास्तकार यांच्या हितसंबंधाची चांग-लीच छाननी केलेली होती राजसाहेब हिंदी उत्तम बोलत असल्यामुळें त्यांचें भाषण सर्व लोकसमुदायाला फारच आवडलें.

त्यांच्या भाषणांतील मुद्दे खालील प्रमाणेंहोतें:—


" मालगुजार आणि कास्तकार या दोघांनाही प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष शेतीवरच आपली उपजीविका कशी करावी लागते; शेतकऱ्यांची अनुकंपनीय स्थिति होऊन त्यांची कशी दैना चालली आहे; या प्रांतांतील साक्षरतेचें प्रमाण लक्षांत घेतां आधीं शिक्षण आणि नंतर मताधिकार या योजनेची कशी जरूरी आहे; शेतकरी सुशिक्षीत झाल्यापासून कसा फायदा होऊं शकतो; प्रांतांतील बेकारीला कोणते उपाय योजावे; शेतीचें शिक्षण सक्तीचें केल्यानें कसे फायदे होतील; त्यांना सक्तीचें शारीरिक शिक्षण देणें कसें योग्य आहे; त्यांना दुसऱ्या कोणकोणत्या सुधारणांची आणि कास्तकारी कायद्याच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे; ठेक्याची मुदतवाढविणें; सेव.. पतपेढयांची वाढ करणें, शेतांचे तुकडे न पाडणें; त्याचप्रमाणें मालगुजारांच्या अडचणी; सारावाढीचा दुष्परिणाम; शेतकऱ्यांच्या हालाखीबद्दल सरकार जबाबदार कसें आहे; वगैरे वगैरे मुद्यांवर विस्तारपूर्वक असें त्यांचें भाषण झालें. कायमधाऱ्याची पद्धति होण्याबद्दलही त्यांनीं आपले विचार लोकांपुढें सविस्तर मांडले."

## ९ अखिल भारतीय अहीर सुवर्णकार शिक्षण परिषद.

ही परिषद जळगांव ( खानदेश ) येथें तारीख ५।६।७ फेब्रुवारी सन १९२८ ई० रोजीं श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. हिंदुस्थानांत अहीर सुवर्णकार जातींत मोठमोठे विद्वान व धनिक असे पुष्कळ लोक आहेत. तरी त्यांच्या परिषदेला अध्यक्ष म्हणून राजेसाहेबांना बोलावण्यांत त्यांनीं राजेसाहेबांविषयीं भक्ति व आदर व्यक्त केला यांत संशय नाहीं. नागपूरकर भोंसल्यांच्या पूर्ववैभवांत राजसाहेब नसतांही सर्व जातींचे. सर्व पंथांचे, सर्व लोक त्याना जो मान देत होते, याचें कारण त्यांच्या ठिकाणीं ' स्वयमेव मृगेंद्रता ' होती, असेंच ह्मणावें लागतें आणि त्यामुळेंच त्यांच्या ठिकाणीं सर्व जनतेचा विश्वास बसत होता.

राजेसाहेबांच्या भाषणानंतर त्यांच्या भाषणांतील मुद्यांना अनुसरूनच बरेच ठराव परिषदेपुढें आले व ते पास झाले. या परिषदेंत राजेसाहेबांनीं बजावलेली कामगिरी मालगुजार व कास्तकार या लोकांना चिरस्मरणीय अशीच झाली.


या वेळीं राजेसाहेबांचा कटणी येथें तर फार मोठा गौरव झाला शिवाय तेथून धमतरी येथें त्यांना बोलावून नेऊन तेथें धमतरी म्युनिसिपालिटीतर्फे व धमतरी मराठा मंडाळातर्फे मानपत्रें देऊन त्यांचा मोठा गौरव करण्यांत आला. हीं मानपत्रें हिंदी भाषेत आहेत. तीं परिशिष्टांत दिलीं आहेत




अखिल भारतीय अहिर सुवर्णकार शिक्षण परिषद्-जळगांव.

पृष्ठे ४३०-४३१

[ K. P. Z. P. B ]



भद्धानंद अनाथालयाचा उध्दाटन समारंभ होशंगाबाद.

(क.फो.झिं.प्रे.वे.)

पृष्टें ४३०-४३१

या परिषदेकरितां तारीख ४ रोजीं रात्रौ राजेसाहेब नागपुराहून जळगांवाला जाण्याकरितां एक्सप्रेसनें निघाले. त्यांचेबरोबर परिषदेचे सेक्रेटरी वगैरे बरीच मंडळी नागपुराहून निघाली. नागपुर स्टेशनापासून हारतुरे वगैरे सन्मान होण्याला प्रारंभ झाला. मार्गांत वर्धा, पुलगांव, धामणगांव, बडनेरा, भुसावळ वगैरे ठिकाणीं परिषदेच्या प्रतिनिधींकडून राजेसाहेबांचा हारतुऱ्यांनीं गौरव होतच होता. याच एक्सप्रेस गाडीनें शेंकडों प्रतिनिधी जळगांवाला जात होते. पहांटे पांच वाजतां जळगांव स्टेशनवर गाडी आली. तेथें राजेसाहेबांच्या स्वागताकरतां जळगांवची प्रतिष्ठित नागरिक मंडळी, स्वागत मंडळ, प्रतिनिधी व त्याचप्रमाणें नागपुरचे श्रीमंत दाजीसाहेब बुटी, बॅरिस्टर गोविंदराव देशमुख वगैरे मंडळी स्टेशनवर आली होती. तेथून राजेसाहेबांचे निवासस्थानापर्यंत त्यांची मिरवणुक काढण्यांत आली. मिरवणुकीकरतां दोन तीन हजार लोक समुदाय जमला होता.

परिषदेच्या कामाला दोनप्रहरनंतर सुरवात झाली. राजेसाहेबांचें भाषणही फारच उद्बोधक आणि मार्मिक असें झालें. यथायोग्य तऱ्हेनें परिषदेचें काम राजेसाहेबांनीं पार पाडलें. शेवटीं समारोप करतांना श्रीसंत तुकोबांचा ' एकमेकां सहाय्य करूं ॥ अवघे धरूं सुपंथ ॥ हा अभंग घेऊन त्याचें मर्म त्यांनीं सर्वांना पटवून दिलें. शिवाय आपण सर्वांनीं एकोप्यानें वागून कार्य केल्यास, आपली सामाजिक व धार्मिक उन्नति होऊन आज आपल्या जातींत असणारा विस्कळितपणा नाहींसा होईल, अशा प्रकारची उपदेशात्मक विनंति करून परिषदेचें कार्य त्यांनीं पार पाडलें

## १० श्रद्धानंद अनाथालयाचा उद्घाटन समारंभ.

नागपुराला हिंदुसभा स्थापन झाल्यानंतर तिचे विद्यमानें तेथें ' श्रद्धानंद अनाथालय ' उघडण्यांत आलें आहे. त्याचे मुख्य चालक नागपूरचे उत्साही कार्यकर्ते श्रीमंत दाजीसाहेब बुटी हे आहेत. नागपुरीं ही संस्था उत्तम चालू झाल्यानंतर त्याची एक शाखा होशंगाबाद येथें त्यांनीं काढण्याचें ठरविलें. हिंदुधर्मांतील कित्येक मुलें अन्नवस्त्राचे अभावीं अगर दुसऱ्या अनेक कारणांनीं परधर्मांत जातात, तीं जाऊं नयेत हा या संस्थेचा हेतु असल्यामुळें ठिकठिकाणीं अशा संस्था स्थापन करण्याचा त्यांचा विचार ठरला होता. त्याप्रमाणें पहिल्यानें होशंगाबाद येथें ही शाखा काढण्याचें त्यांनीं ठरविलें. नागपूरच्या हिंदुसभेचे अध्यक्ष श्रीमंत राजे लक्ष्मणराव

भोंसले यांचेच हस्तें हा उद्घाटन समारंभ करण्याचें सर्वांचे मतें ठरलें. त्याप्रमाणें नागपुराहून श्रीमंत कु. प्रतापसिंह, डॉ. मुंजे, श्रीमंत दाजीसाहेब बुटी, श्री. रानडे मंडळींसह राजेसाहेब होशंगाबादेस आले. तेथें त्यांची मोठ्या थाटाची मिरवणूक निघाली. सायंकाळीं मोठ्या थाटानें राजसाहेबांचे हस्तें श्रद्धानंद अनाथालयाचा उद्घाटन-समारंभ पार पडला. हा दिवस होशंगाबादेच्या नागरिकांना मोठ्या गडबडीचा गेला.


## ११ श्रीबालाजी मंदिराचा नूतनगृहप्रवेश–समारंभ.

श्रीक्षेत्र नाशीक येथील श्री बालाजी महाराज यांच्या नूतनगृहप्रवेश-समारंभा-निमित्त तारीख ५ माहे जून सन १९३१ इ. रोजीं श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले यांच्या अध्यक्षतेखालीं प्रचंड दरबार भरविण्यांत आला होता. दर वर्षी उन्हाळ्या-निमित्त राजेसाहेबांचें नाशीक मुक्कामीं तीन महिने वास्तव्य होत असे. त्यामुळें नाशिकच्या जनतेशीं त्यांचा वेळोवेळीं संबंध येई. राजेसाहेबांच्या मातोश्री श्रीमंत काशीबाईसाहेब यांनीं आपली इहलोकची यात्रा त्या ठिकाणीं संपविली होती. राजेसाहेबांनीं आपल्या मातोश्रींची छत्री श्री. यशवंत महाराज यांच्या समाधी शेजारींच बांधली व तिच्या फरसबंदी पटांगणाला जोडूनच दुसरें भव्य पटांगण आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ तयार करून दिलें. त्यामुळें नाशिकच्या नागरिकांची जाहीर सभा वगैरे भरविण्याला मोठी सोय झाली. या त्यांच्या कामगिरीमुळें नाशिकच्या नागरिकांना राजेसाहेब फारच प्रिय झाले होते. त्यांचेबद्दल आदर आणि भक्ति त्यांचे ठिकाणीं फारच वसत होती. ह्मणूनच या नूतन गृहप्रवेशसमारंभाच्या दरबाराला राजेसाहे-बांना अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें. त्या वेळीं राजेसाहेबांनीं जें भाषण केलें, त्या भाष-णांत त्यांनीं श्रीबालाजी मंदिराचा इतिहास सांगितला. गेलीं तीन शतकें या श्रीबालाजी संस्थानची परंपरा कशी अखंडित आहे व त्यामुळें त्याचें प्राचीनत्व कसें श्रेष्ठ आहे याचें त्यांनीं निवरण केलें. याशिवाय मंदिरें कां बांधावीं, मूर्तिपूजे-संबंधीं मूळ कल्पना काय आहे, नवीं मंदिरें बांधण्यापेक्षां जुनीं मंदिरें चिरकाल टिकविण्यासंबंधीं काय काय केलें पाहिजे, याचेंही त्यांनीं आपल्या भाषणांत उत्तम प्रकारें स्पष्टीकरण केलें. या त्यांच्या भाषणानंतर या दरबारांत दरबारी पद्धतीनें हार-तुरें वगैरेंनीं राजेसाहेबांचा सन्मान व गौरव करण्यांत आला.

राजेसाहेबांच्या या विविध कामगिरी पाहून ‘ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ’ या उक्तीचें वाचकांना स्मरण झाल्याशिवाय राहणार नाहीं.



कै. मातोश्री राणी काशीबाई साहेब यांच्या नाशीक येथील छत्रीचा कोनशीला समारंभ पृष्ठ ४३२ [K P.Z.P.B.]



हिंदुस्थानचे व्हाईसरॉय ना. लॉर्ड एर्वीन. लेडी एर्वीन व श्री राजेसाहेब. पृष्ठ ४४४

[K P.Z.P.B.] पृष्ठें ४३२-४३३



कोन्सिल ऑफ स्टेट-दिल्ली.

पृष्ठ ४३२-४३३

(क.फो.शिं.प्रे.वे.)

# प्रकरण २२ वें.

# कौन्सिल ऑफ स्टेटमधील कामगिरी.

नागपूर येथील डिस्ट्रिक्ट कौन्सिलचे अध्यक्ष ह्मणून राजेसाहेबांनीं तीन वर्षे काम केलें. त्यांचे ठिकाणीं पक्षभेद, जातिकलह वगैरेला मुळींच वाव नसल्यामुळें आणि कोणतेंही काम सरळ करण्याकडे त्यांची नेहमींच प्रवृत्ति असल्यामुळें त्यांची त्या कौन्सिलमधील अध्यक्षाची कारकीर्द सर्वांनाच हितावह अशी झाली. थोर घराण्यांतलीं माणसें जन्मतः च थोर विचाराचीं असतात ह्मणून प्रसंगविशेषीं त्यांना बहुमानाचें स्थान मिळालें किंवा अधिकार हातीं आला, तरी त्या स्थानानें व अधिकारानें त्यांच्या समतोल मनःस्थितींत फरक पडत नाहीं; किंवा ते विकारवशतेला बळी पडत नाहींत. जें लोककल्याणाचें आहे, असें त्यांची मनोदेवता त्यांना सुचवील, त्याचाच अंगिकार करण्याचा त्यांच्या मनाचा नेहमीं कल असतो न्यायबुद्धीनें काम करावयाचें ह्मणजे अशींच निरहंकारी व निर्लोभी माणसें समाजसेवेकरितां स्वयस्फूर्तीनें पुढें यावीं लागतात, तरच त्यांच्या कामगिरीवर लोकांचा विश्वास बसून खरीं लोक कल्याणाचीं कामें हातून घडतात. राजेसाहेबांनीं अशाच पद्धतीनें डिस्ट्रिक्ट कौन्सिलची कामगिरी केली व त्यामुळेंच राजेसाहेब लोकांच्या विश्वासाला विशेष पात्र झाले.

इ. स. १९३० मध्यें रा. ब. डी. लक्ष्मीनारायण हे कैलासवासी होऊन त्यांची कौन्सिल ऑफ स्टेटमधील जागा रिकामी झाली. ही लोकनियुक्त जागा मध्यप्रांताला अवघी एकच असल्यामुळें त्या जागेवर तशाच जबाबदार मनुष्याची योजना होणें इष्ट होतें; ह्मणून नागपूरच्या कांहीं प्रतिष्ठित मंडळींनीं त्या जागेच्या निवडणुकीला राजेसाहेबांना उमेदवार ह्मणून उभें करण्याचें ठरविलें. या वेळीं राजेसाहेबांची प्रकृति बरी नव्हती, तरी ते केवळ सर्वांच्या मताला मान देऊन सदर जागेकरितां

उमेदवार म्हणून उभे राहिले; व शेवटीं इ. स. १९३० च्या नोव्हेंबर महिन्याच्या सुरवातीला बिनविरोध निवडूनही पण आले.

हिंदुस्थानांत कौन्सिल ऑफ स्टेट प्रस्थापित झाल्यापासून त्याच्या सभासदत्वाचा मान क्षत्रिय मराठयांना या वेळेपर्यंत मिळाला नव्हता. तो असा हा प्रथमच मिळाला. तेव्हां हिंदुस्थानांतील क्षत्रिय लोकांच्या दृष्टीनें जी कामगिरी कौन्सिलमध्यें करतां येण्यासारखी होती, तेवढी हातीं घ्यावी, असा त्यांनीं विचार केला. या कौन्सिलमध्यें एकंदर साठ सभासद असतात. त्यांत सरकारनियुक्त व लोकनियुक्त जवळ जवळ सारखेच असतात. या कौन्सिलचा अध्यक्षही सरकारनियोजितच असतो. यांत येणारे सभासद मोठमोठे जमीनदार, जहागिरदार, सरदार यांपैकींच सामान्यतः असतात. सरकारी राज्यव्यवस्थेला प्रतिकूळ असें एकादें बिल असेंब्लीमध्यें बहुमतानें लोकशाहीच्या जोरावर पास झालें व तें लाटसाहेबांना अंमलांत आणणें धोक्याचें वाटत असलें, तर तें या कौन्सिलमध्यें आणून फेटाळून लावतां येतें. या कौन्सिलांत बहुतेक काम सरकारी धोरणानेंच चालतें व तोच पक्ष सामान्यतः प्रबल असतो. यांतील प्रत्येक लोकनियुक्त सभासद गर्भश्रीमंत असल्यामुळें या कौन्सिलमध्यें जो तो स्वतत्र असल्याप्रमाणें असतो. निरनिराळे राजकीय पक्ष यांत उत्पन्न होण्याचा संभव फार कमी असतो. त्यामुळें कोणतेंही बील अगर ठराव कौन्सिलपुढें येऊन तें पास व्हावयाचें म्हणजे त्याला सरकारचेंच पाठबळ असावें लागतें.

ही कौन्सिलची पद्धत राजसाहेबांचे लक्षांत आल्यानंतर मताधिक्याच्या जोरावर आपणाला कोणतेंही काम करतां येणें शक्य नाहीं असें त्याच्या लक्षांत तत्काल आलें. स्वतंत्र तऱ्हेनें ठराव आणण्याचे फंदांत ते पडले नाहींत. याचें कारण हात दाखवून अवलक्षण करून घेण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. म्हणून ते प्रसंग येईल त्याप्रमाणें आपल्या कार्याची दिशा सरकारी अधिकारी लोकांच्या नजरेला आणण्याचे प्रयत्न करीत

कलियुगांत क्षत्रिय व वैश्य नाहींत. असा उघड वाद उपस्थित होण्याइतकी समाजाची इ. स १९२० सालीं परिस्थिति आली. याचें खरें कारण म्हणजे क्षत्रियांना त्याच्या कार्याचें क्षेत्र मिळेनासें झालें. अर्थात वर्णाश्रम धर्माप्रमाणें वर्णविहित नेमलेलें कार्य करण्याच्या क्षेत्राचे अभावीं क्षत्रियांना केवळ उदरंभरण

करण्याकरितां अन्यक्षेत्रीं वर्णविहित नसलेलें कार्य करण्याचा प्रसंग आला. त्यामुळ क्षत्रियांचें अस्तित्व दृक्प्रत्ययाला येईना म्हणून वरील वादही स्वाभाविकच उत्पन्न झाला. तेव्हां त्या वादाचें मूळ कशांत आहे, हें राजसाहेबांनीं शोधून काढलें व त्या रोगाच्या मुळावर शक्य तो औषधोपचार करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. या औषधानें तो रोग जरी ताबडतोब बरा झाला नाहीं, तरी काला-वधीनें तो बरा झालाच पाहिजे, अशी त्यांची समजूत होती. त्या दृष्टीनें त्यांची कामगिरी बरीच महत्वाची झाली. एकदां एका जाग्याची जबाबदारी शिरावर घेतली, ह्मणजे ती पार पाडण्यांत बिलकुल कसूर करावयाची नाहीं; तसेंच त्या जबाबदारीला पोषक असें भाषण करीत असतांना कोणत्या पक्षाला तें वाईट लागेल किंवा झोंबेल याचा विचारही त्यांचे मनाला शिवला नाहीं. सडेतोड भाषण करून खरी परिस्थिति पुढें मांडणें हाच त्यांतील खरा हेतु होता. इ. स. १९३१ च्या मार्च महिन्याच्या सातवे तारखेस दिल्लीला कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें हिंदुस्थानसरकार-च्या बजेटावर त्यांनीं जें भाषण केलें, तें अत्यंत महत्वाचें आहे. या त्यांच्या भाषणांत त्यांच्या कामगिरीचें धोरण स्पष्टपणें निदर्शित केलें गेलें आहे. ते आपल्या भाषणांत ह्मणाले:—

" रेल्वे बजेट नुकतेंच कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें वादविवादासाठीं आलें, त्यावरूनच चालू व पुढील वर्षाच्या हिंदुस्थानसरकारच्या जमाखर्चाच्या आढाव्यांत बरीच तूट येणार हें स्पष्ट दिसून येत होतें. रेल्वे खात्याच्या कारभारांत जिकडे तिकडे नुकसान व

## रिझर्व फंडावर घाला

झालेला दिसत होता. सर्व साधारण बजेटांत तूट येणार हें जरी स्पष्ट दिसत होतें, तरी ती किती प्रमाणांत येणार, हें त्या वेळीं कळलें नव्हतें. आतां तें स्पष्ट होऊन गेल्या वर्षांत साडे चौदा कोटी रुपयांची तूट जमाखर्चाच्या आढाव्यांत दिसून आली आहे. ही तूट कोणत्या प्रकारें फडणीस भरून काढतात, हें पाहण्याकडे आतांपर्यंत सर्वांचे डोळे लागलेले होते. त्यांतल्या त्यांत आतां थोडी समाधान मानण्यासारखी एवढीच गोष्ट दाखवितां येईल कीं, साडे चौदा कोटींपैकीं साडे नऊ कोटी अप्रत्यक्ष कराच्या रूपानें ह्मणजे परदेशी मालावर जकात वाढवून वसूल करण्यांत येतील

विदेशीय दारू व बिअर या पदार्थांवर जबर जकाती बसवून मद्यपान अजीबात बंद करावें, असें ह्मणणारांस या वाढलेल्या करांनीं थोडेसें बरेच वाटेल. बाहेरून येणाऱ्या कापडावर शेंकडा पांचप्रमाणें जकातीचा दर वाढविल्यामुळें ( ह्मणजे शेंकडा पंधरा जकात होती, ती वीस केल्यामुळें ) हिंदुस्थानांतील कापडाच्या गिरणीवाल्यांनाही थोडेसें तरी बरें वाटून प्राप्तीवर कर व सुपरटॅक्स जो वाढविण्यांत आला आहे, त्या बाबतींत विरोध तेवढ्यापुरता तरी गिरणीवाल्यांमध्यें कमी होईल. पांच कोटींची तूट इनकमटॅक्स व सुपरटॅक्स वाढवून भरून काढण्यांत येणार आहे. या वाढीच्या समर्थनार्थ कांहीं मुद्दे पुढें आणले, तरी भांडवलवाले व उद्योगधंदेवाले या लोकांकडूनच या वाढीबद्दल निकराचा विरोध झाल्यावाचून राहणार नाहीं. हुंडणावळीच्या बाबतींत सरकारनें जो मार्ग स्वीकारला त्यामुळें लोकक्षोभ कितो वाढला, हें सर्वांस माहीत आहे. व त्यामुळें चालू चळवळीस किती अधिक जोर चढला, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. प्राप्तीवरील झालेल्या वाढीमुळें देशी उद्योगधंद्यावर अधिक बोजा पडेल, ही गोष्ट तर निर्विवादच आहे. परंतु प्रस्तुतच्या चळवळीच्या दिवसात लोकांस अशा प्रकारानें, ती चळवळ जोरावयास नवीन कारण उपस्थित करून ठेवणें हें शहाणपणाचें लक्षण खास नव्हे. बजेटाच्या तोंडमिळवणीसाठीं नवीन कर वाढविण्याची आवश्यकता क्षणभर जरी कबूल केली, तरीहि राजकीय धोरणाच्या दृष्टीनें झालेला करवाढीचा प्रकार गैरवाजवी व अप्रासंगिक आहे, असेंच ह्मणावें लागेल, माझ्या मतें सध्यांच्या आपल्या सर्व अडचणींचें मूळ मुलकी व फौजी खर्चांत अवाढव्य वाढ झाली आहे, त्यांतच आहे. आमच्या सर्व राजकीय पक्षांत कोणती एक जर कल्पना दृढमूल झालेली असेल. तर ती हीच कीं, हल्लींच्या सर्वाचें प्रमाण आमच्या देशास बिलकूल झेंपण्यासारखें नाहीं. लोकोपकारक गोष्टी तशाच दिरंगाईवर पडल्या असून, भलत्याच अनावश्यक अशा गोष्टींवर सध्यांच्या अडचणीच्या दिवसांतही मुबलक पैसा खर्च होत आहे. याबद्दल एकट्या फडणिसांनाच दोष देणें चुकीचें आहे, ही गोष्ट मी कबूल करितों. राज्यकारभाराचा खर्च राजकीय धोरणावर अवलंबून असतो; तें धोरणच जोंपर्यंत कायम असेल, तोंपर्यंत खर्चांत विशेषशी छाटाछाट करण्यास वाव सांपडणें कठीण आहे. एकंदर राज्यकारभाराच्या धोरणांत हिंदी लोकांच्या दृष्टीनें फेरतपासणी होऊन इष्ट तो फरक झाला नाहीं, तर लोकांची समजूत होणें शक्य नाहीं. इतकेंच नाहीं तर ज्या लोकांवर हिंदी लोकांचा साहजीकपणें विश्वास नाहीं,

त्यांनीं कितीही कंठरवानें सध्यांची स्थिति अपरिहार्य आहे, असें सांगितलें तरी त्यावर कोणाचाही विश्वास बसणार नाहीं. आमच्यां विश्वासास पात्र अशा लोकांकडून जेव्हां तसें सांगण्यांत येईल तेव्हांच त्यावर आमचा विश्वास बसेल, तोंपर्यंत आमच्या हिताच्या दृष्टीनें ज्या गोष्टी करणें शक्य आहे, त्या सर्व सध्यां केल्या जात आहेत, अशी खात्री पटणें शक्य नाहीं. राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या द्वारें राजकीय घटनादुरुस्तीचा सध्यां प्रयत्न होत आहे, त्यांतूनच या प्रकरणाचा समाधानकारक निकाल लागण्याचा बराच संभव आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे.

" व्हाइसरॉय आणि महात्मा गांधी यांच्या दरम्यान चाललेल्या वाटाघाटीचा समाधानकारक निकाल लागला, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. पुष्कळ वेळां या बाबतींत निराशा होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली होती, परंतु शेवटीं हें प्रकरण समाधानकारक मिटलें, याबद्दल व्हाइसराय आणि महात्मा गांधी या दोघांनाहि आपण धन्यवाद देणें अवश्य आहे. राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या कार्यक्रमांत कॅांग्रेस-पक्ष यापुढें भाग घेईल, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे.

" सध्यांच्या लष्करी खर्चाच्या अवाढव्यतेचा मीं उल्लेख केला आहे. या बाबतींत लॉर्ड किचनेर यांच्या वेळीं झालेल्या वादविवादाची मी आपणांस थोडी आठवण देतों. त्या वादविवादांत प. वा. गोखले यांनीं बराच भाग घेतला होता, हें सर्वांस स्मरत असेल. फौजी लोकांत तोंपर्यंत ज्या लोकांची भरती होत होती, ती हळूहळू कमी करून सरहद्दीवरील पहाडी लोकांचीच फक्त भरती करण्याचें धोरण त्या वेळीं स्वीकारण्यांत आलें. ते लोक लढवय्ये असल्यामुळें कमी माणसांत काम होऊन खर्चाची बचत होईल, असें बाहेरून कारण दाखविण्यांत आलें; परंतु त्यांतील अंतःस्थ हेतु देशांतील चळवळीच्या दिवसांत सैन्यांत जातभाईसंबंधीं सहाजिक सहानुभूति वाटेल, असे लोक नसावेत हाच मुख्य होता, यांत संशय नाहीं. हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा बळावल्या, तर त्यांस लष्करांत भरती झालेल्या लोकांची सहानुभूतीची भर पडावयास नको, हें त्यांतलें इंगित असावें. मी स्वतः ज्या प्रांतातर्फे प्रतिनिधि ह्मणून येथें आलों आहें, त्याच्या वतीनें व एकंदर मराठा जातीच्या वतीनें आपणांस बजावून सांगतों कीं, हें धोरण अत्यंत आत्मघातकीपणाचें, चुकीचें आणि खर्चाचा बोजा अवास्तव वाढविणारें आहे. ज्या मराठ्यांनीं

दक्षिणेंत व उत्तरेकडे दिग्विजय करून आपली मर्दुमकी मागील काळांत दाखविली, ते आजही अंतःस्थ शांतता राखण्याच्या व बाहेरून होणाऱ्या स्वारीच्या बाबतींत हिंदुस्थानचें रक्षण करण्यास पूर्णपणें समर्थ आहेत. हिंदी लष्करांत मराठ्यांची भरती किती प्रमाणांत आहे, हें मला सांगतां येत नाहीं; पण त्यांची भरती अधिक प्रमाणांत व सैन्याच्या सर्व भागांत झाली, तर लष्करी खर्च कमी होऊन काम कोणत्याही प्रकारें कमी चोखपणानें होणार नाहीं, याबद्दल मी खात्री देऊं शकतों. त्यांच्या लष्करी शिक्षणाची सोय चांगली झाली पाहिजे. सैन्यांत भरती होण्याची संधि पूर्वीप्रमाणें त्यांस अलीकडे मिळत नसल्यामुळें, नामांकित मराठा लोकांचीं घराणीं दानतींत कमी होऊन, आपल्या कर्तबगारीस मुकत आहेत. मराठा जातीची सैन्यांत अधिक प्रमाणांत भरती करून, खर्चाची केवढी बचत होऊं शकेल, ही विचारांत घेण्यासारखी गोष्ट आहे. मराठे व आमच्या प्रांतांतील हिंदुस्थानी लोक हे हिम्मत, लढवय्येपणा व काटकपणा या बाबतींत कोणत्याही इतर लोकांपुढें माघार घेणार नाहींत.

" पूर्वी मोंगल बादशहा व त्यांचे दक्षिणेंतील सुभेदार यांच्या सैन्यांत व त्यांच्या सैन्यांशीं मराठे लोक लढलेले असून, त्यांनीं आपले गाजविलेले पराक्रम महशूरच आहेत, आजच्या स्थितींतही तोच पराक्रम करण्याची त्यांच्यामध्यें धमक आहे. मात्र त्यांना आधुनिक पद्धतीनें लष्करी शिक्षण देण्याची तरतूद करणें जरूर आहे. खर्चाच्या काटकसरीच्या दृष्टीनें व आमचा राष्ट्रीय स्वाभिमान आमच्यांत जागृत राखणें या दृष्टीनें मी या सूचना आपल्यापुढें मांडल्या आहेत. असें करण्यांत इंग्लंड व हिंदुस्तान या दोन्ही देशांचें कल्याण आहे. सध्यांच्या बजेटांत शेतकरी वर्गाच्या दृष्टीनें विचार केल्यास रॉकेल, साखर, पेट्रोल, कपडा, त्या सर्व बाबतींत खर्चाचा बोजा शेतकऱ्यां-वर जास्त पडेल, हें स्पष्ट आहे. एकीकडे शेतींत उत्पन्न होणाऱ्या मालाची किंमत घसरत आहे. व दुसरीकडे शेतकऱ्यावर पडणाऱ्या खर्चाचा बोजा वाढत आहे. माल-गुजारास वसूल देण्यासाठीं कुळाजवळ पैसा नाहीं, अशी स्थिति येऊन पोहोंचली आहे, सरकारी पद्धतींत व बँकेच्या व्यवस्थेंत सुधारणा होऊन शेतकऱ्यांना कमी व्याजानें रक्कम मिळविण्याची तरतूद करण्याच्या योजना अजून भविष्य काळांतच आहेत. सध्यां तरी शेतकरी व मालगुजार यांची स्थिति फारच हलाखीची झाली आहे. या बजेटांत त्यांना समाधान वाटेल अशी एकही गोष्ट नाहीं. शेतकरी

उद्योगधंदेवाले या उभयतांसही हें बजेट जाचकच वाटेल. जमिनींतून उत्पन्न होणाऱ्या किंमतींत शेतीचा खर्चसुद्धां भागेनासा झाला आहे. शेतकऱ्यांस कमी व्याजींत कर्ज मिळण्याची तावडतोब व्यवस्था झाली नाहीं, तर प्रसंग फार कठीण येऊन ठेपणार आहे. एकीकडे ही स्थिति आहे तर दुसरीकडे तंबाखु व मृताच्या इष्टेटीवर कराचें बुजगावणें फायनान्स मेंबरनीं आमच्यापुढें उभें करून ठेविलेंच आहेत. या सर्वांमुळें लोक जास्तच हवालदील होतील, याचा सर्वांनीं विचार करणें जरूरीचें आहे. ''

राजेसाहेबांच्या या भाषणांत मराठा जातीची सैन्यांत अधिक प्रमाणांत भरती व्हावी, हा मुख्य हेतु आहे. लॉर्ड किचनेर हे मुख्य सेनापति हिंदुस्थानांत असतांना हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति कशीही असो, त्या परिस्थितीच्या दृष्टीनें हिंदुस्थानसरकाराला सैन्यांत कोणत्या लोकांची भरती केली असतां त्यांच्या सुराज्य व्यवस्थेला बाधक न होतां हितपरिणामी होईल, या दृष्टीनें त्यांनीं सरहद्दीवरील लोकांची सैन्यांत भरती केली. हें त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें व सरकारच्या विचारसरणीच्या दृष्टीनें योग्य झालें; पण राजकीय परिस्थिति ही नेहमींच एक स्वरूपाची राहत नाहीं. त्या परिस्थितींत कालानें फरक होतच असतो. सन १८५७ सालीं बंड झालें, त्या बंडाचे वेळची परिस्थिति आजही आहे, असें धरून चालणें, हें केव्हांही न्यायाचें होणार नाहीं. तेव्हां काल जसा बदलत जातो, त्याप्रमाणें राजकारणपद्धतीमध्येंही फरक करीत गेल्यानें धोका होण्याचा संभव रहात नाहीं. बृहन्नडेच्या जातीचा मनुष्य ब्रह्मचारी राहिला म्हणजे त्याचें तसें रहाणें हें जसें पुरुषत्वाचें द्योतक होऊं शकत नाहीं, तसेंच निःशस्त्र, दीन, दुबळ्या लोकांवर राजशासनाची नेहमींच हुकमत चालविणें शूरपणाचे लक्षण होणार नाहीं. सांप्रतच्या राजकारणांत इंग्रज सरकारनें आपल्या बुद्धिमत्तेच्य जोरावर जशी जगातील सर्व राष्ट्रांवर मात केली, तशीच शूर वृत्तीच्या तत्त्वांच्या बाबतींत त्यांची परिस्थिति असतांनासुद्धां पिछेहाट दिसण्यासारखी कृति करावी, हे योग्य नाहीं. विद्वत्तेचा गौरव विद्वान लोकांच्या सभेत होणें, हें जसें भूषणावह असतें, तसेंच शौर्याचा गौरव शूर लोकांवर हुकमत गाजवूनच होत असतो. शत्रूला मारून किंवा त्याचा सर्व बाजूंनीं अधःपात करून शत्रुत्व नष्ट होत नसतें. तर शत्रूची द्वेषबुद्धि घालवून टाकणें, हेंच शत्रुदमनाचें रहस्य आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनीं महंमद घोरीचा सतरा वेळ पराभव केला, पण शरण आल्याबरोबर त्याची मुक्तताही

केली. राघोबादादा पेशवे यांनीं निजामाचा तीन वेळां पराभव केला, पण शरण येतांच त्याच्या मानेवर राजकारणाचें जोखड न ठेवतां त्याची सुटका केली. अशीं अनेक उदाहरणें भारतवर्षाचे इतिहासांत आहेत, ह्मणूनच भारताची शूर वीर अशी ख्याति आहे. तेव्हां असें वीरसू भारत-वर्ष, निर्वीर्य बनविण्याचें राजकारण राजाला, प्रजेला किंवा राजहित साधणाऱ्या लोकांना हितपरिणामी होईल काय ? अर्थात होणार नाहीं. शिवाय युरोपांतील महायुद्धाचे वेळीं हिंदुस्थानांतील मराठा क्षत्रियांनीं परभूमींतही आपलें शौर्य दाखवून सरकारचा विश्वास संपादन केला आहे. तेव्हां अशा स्थितींत हिंदुस्थानांतील क्षत्रीय वर्णाला मागें न ठेवतां सरकारानें त्यांची सैन्यांत भरती करून त्यांना योग्य मार्गाला लावावें, ही तळमळ राजेसाहेबांचे मनाला लागून राहिली होती. शिवाय आर्थिक दृष्टीनेंही हिंदुस्थानाच्या संरक्षणाकरितां परराष्ट्रीय सैन्य ठेवून तें पोसणें हें कसें नुकसानीचें आहे, याचेंही विवरण त्यांनीं आपल्या भाषणांत केलें आहे. यानंतर इ. स. १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत सिमल्याला जेव्हां पुन्हां कौन्सिल सुरू झालें, त्या वेळीं पुण्याचे श्रीमंत सरदार श्री. जगन्नाथमहाराज यांनीं हिंदी लष्करी कॉलेज ( Indian Sandburst ) साताऱ्यालाच काढावें असा कौन्सिलपुढें ठराव आणला होता. त्यालाही दुजोरा देतांना राजेसाहेबांनीं हेंच प्रतिपादन केलें होतें. साताऱ्यासारख्या ठिकाणीं हें लष्करी कॉलेज निघाल्यास मराठा क्षत्रियांना त्याचा पूर्ण फायदा घेतां येईल. डेराडूनसारख्या लांबच्या पल्ल्यावर मुलें पाठवावयाचीं ह्मणजे खर्च फार लागतो, तशी मराठ्यांची आर्थिक स्थिति आतां राहिली नाहीं. तेव्हां साताऱ्याला, हें कॉलेज उघडलें गेल्यास त्याचा फायदा पुष्कळ मराठा लोकांना घेतां येईल व पुष्कळांना त्या कॉलेजमध्यें जाऊन शिकण्याची गोडीही पण लागेल. त्याचप्रमाणें इ. स. १९३२ च्या मार्च महिन्याच्या ११ वे तारखेस पुन्हां दिल्लीस कौन्सिलमध्यें हिंदुस्थान सरकारच्या बजेटावर राजेसाहेबांनीं भाषण केलें, त्यांतही मराठे लोकांची सैन्यांत भरती करण्याबद्दल त्यांनीं जोरदारपणें ध्वनित केलें आहे. हें राजेसाहेबांचें कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें शेवटचें भाषण झालें ह्मणून त्याचा गोषवारा खालीं दिला आहे.

## रयतेनें वाढते कर कोठून भरावे ?

"गेल्या वर्षाच्या अंदाजपत्रकावरील माझ्या भाषणाच्या शेवटीं एकंदर देशाची व मध्यवर्ती सरकारची आर्थिक स्थिति धडगतीची नाहीं, असें ह्मटलें होतें. सध्यांचा

जो जमाखर्चाचा आढावा कौन्सिलपुढें पेश करण्यांत आला आहे, त्यांत ही उद्वेगजनक स्थिति विशेषच दुणावलेली दिसत आहे. जमाखर्चाची तोंडमिळवणी कशी तरी करून वेळ निभावण्यांत आली आहे व फडणविसांनीं हिंदुस्थानच्या जमाखर्चांत काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं, असें बेधडक आश्वासन दिलें आहे. परंतु त्यांनीं आपल्या भाषणाच्या एकुणपन्नासाव्या कलमांत ह्मटल्याप्रमाणें कराच्या उत्पन्नाची बाब १९२७–२८ सालीं ६७ कोटींची होती, ती आतां ७७ कोटी झाली आहे. ह्मणजे तीन वर्षांत १० कोटींवर कर वाढविण्यांत आले आहेत. या कराचा बोजा सर्व वर्गांना सारखा भासत आहे. त्यांच्या ह्मणण्यावरून खर्चाच्या वाढीचा हा परिणाम नसून उत्पन्न कमी होत चाललें आहे, त्याचा हा परिणाम आहे. परंतु ही उत्पन्नाची दिवसेंदिवस वाढती कमतरता सरकारच्या तिजोरीवरीलच आपत्तीचें दिग्दर्शन नसून रयतेलादेखील हीच आपत्ति पदोपदीं जाणवत आहे. सरकारला पैसे खर्चासाठीं कमी पडतात. त्यासाठीं त्यांनीं रयतेवर कराचा बोजा एकामागून एक वाढवीत जाणें हें युक्त असेल; परंतु रयतेचेंही उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत चाललें आहे, ही गोष्ट लक्षांत घेतां त्यांनीं हा अधिकाधिक बोजा कोणाचे माथ्यावर टाकावयाचा या गोष्टीचा विचार झालेला दिसत नाहीं. रयतेचीही सांपत्तिक स्थिति दिवसेंदिवस खालावत चालली आहे, हे वाढते कर त्यांनीं कोठून भरावयाचे ? अशा चक्रव्यूहांत सरकार व रयत हीं दोघेही येऊन पडलीं आहेत.

## पुढील वर्षी आणखी करवाढ ?

" रॉकेल, मीठ व रयतेस नेहमीं लागणाऱ्या दुसऱ्या बारीक वस्तू यांच्यावर बनल्यास पुढल्या वर्षी अधिक कराचा बोजा टाकण्याची फडनविसांची इच्छा दिसते; व त्याप्रमाणें त्यांनीं अंधूक सूचनाही केली आहे. माझी त्यांना एवढीच विनंति आहे कीं, गरीब व सोशीक रयतेचा त्यांनीं अंत पाहूं नये.

" शेतकरी लोकांस पैशाची व कर्जाची मदत करण्याची बँकिंग चौकशी कमिटीच्या चौकशीनंतर कांहीं तरी तरतूद करण्यांत येईल, असें गेल्या वर्षाच्या फडनविसाच्या भाषणांत आश्वासन देण्यांत आलें होतें. या वर्षाच्या त्यांच्या भाषणांत त्या बाबीचा नुसता उल्लेखसुद्धां नाहीं. यावरून ती बाब मागें पडली कीं काय, हें कळत

नाहीं ! सरकारच्या तिजोरीची स्थिति काळजी करण्यासारखी नाहीं. सरकारची पत वाढत्या प्रमाणावर असून प्रॉमिसरी नोटांचे भाव वाढले आहेत, पोष्ट ऑफिस कॅश सर्टिफिकेटच्याद्वारें सरकारच्या तिजोरींत रयतेचा पैसा अधिक प्रमाणांत येत आहे, हें खरें असेल; परंतु ज्या शेतकऱ्यांजवळ वर्षाचा गुजारा करण्याइतके सुद्धां पैसे नाहींत, त्याला याचा उपयोग काय ? शेतींतून उत्पन्न होणाऱ्या मालाची किंमत कमी कमी होत चालली आहे व व्याजाच्या रूपानें त्याला अधिक रक्कम द्यावी लागत आहे. संसाराला लागणाऱ्या वस्तूंची किंमत त्याला देतां येत नाहीं, अशी शेतकऱ्यांची स्थिति झाली आहे.

## सोन्याच्या निर्गतीचा दुष्परिणाम !

" मनमुरादपणें, कांहीं एक सरकारी निर्बंध नसतां, सोनें देशांतून बाहेर जात आहे, ही गोष्ट देशाच्या हिताच्या दृष्टीनें चांगली कीं वाईट हें मला सांगता येत नाहीं. मी या बाबीकडे फक्त एकाच दृष्टीनें पाहूं इच्छितों आणि ती दृष्टि हींच कीं, या सोन्याच्या निर्गतीनें रिझर्व बँकेच्या स्थापनेस अडथळा येऊन दिरंगाई होईल, कीं ती लवकर अस्तित्वांत येईल ? त्याचप्रमाणें हिंदी उद्योगधंद्याच्या संरक्षणासाठीं सर्व प्रकारच्या आयातीच्या मालावर जकात वाढविण्याबद्दल सर्वत्र सारखी झांकाटी चालू आहे. बाल्यावस्थेंत असलेल्या नव्या उद्योगधंद्यास संरक्षक जकातीची थोडीशी अवश्यकता आहे हें नाकबूल नाहीं; परंतु एखाद्या चांगल्या बाबीचाही अतिरेक होण्याचा संभव असतो हें विसरतां कामा नये.

## अवाढव्य लष्करी खर्च कमी करा.

" माझ्या मतें सरकारी तिजोरीच्या हल्लीच्या हलाकीचें सर्व मूळ अवाढव्य वाढलेल्या लष्करी खर्चींतच आहे. विदेशी सैन्याची बेमुर्वत छाटाछाट करून हिंदुस्थानांतील अंतर्गत सैनिकांचा कमी पगारावर मोठ्या प्रमाणांत शिरकाव केल्याशिवाय ही वाढत्या खर्चाची धोंड वाटेंतून निघणें अशक्य आहे. शेवटीं, माझ्या भाषणाचा समारोप करतांना मला सरकारास एकच विनंति करावयाची आहे, ती ही कीं, त्यांनीं आमचा अंत पाहण्याचा नाद सोडून द्यावा. अधिक कर बसवून व अन्य नाना उपायांनीं जमाखर्चाची फडणविसांनीं तोंडमिळवणी केली, हें सर्व ठीक झालें व

असें केल्याबद्दल त्यांनीं समाधान मानणें, हेंही युक्तच आहे. परंतु, एखादा अत्यंत बिकट रोगानें पछाडलेला रोगी एखाद्या नामांकित डॉक्टराकडे उपचारासाठीं जावा व पुढें डॉक्टरानें नाना प्रकारचे जालीम उपाय करून मोठ्या शिकस्तीनें रोग बरा केल्याचें जाहीर करावें. परंतु रोग बरा करण्याच्या मार्गांत रोगी मात्र मरून जावा अशा प्रकारचें हें समाधान आहे ! ”

राजेसाहेब कौन्सिलमध्यें असतांना त्यांना कोणत्याही बिलावर अगर ठरावावर विचारविनिमय करावयाला दुसऱ्या नामदार गृहस्थांची चांगलीच मदत होत होती. राजेसाहेबांचे लहानपणीं कोर्ट ऑफ वॉर्ड असतांना भोंसला इस्टेटीचे म्यानेजर नागपूरचे सर दादाभाई हेही या कौन्सिलमध्यें बरींच वर्षे सरकारनियुक्त सभासद ह्मणून काम करीत होते. त्याप्रमाणें पुण्याचे श्रीमंत सरदार श्रीजगन्नाथ महाराज हेही कौन्सिलमध्यें धडाडीनें काम करणारे उमदे तरुण होते. शिवाय वयोवृद्ध-ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध असे उमरावतीचे दादासाहेब खापर्डे हेही असल्यामुळें कौन्सिल-मधील बरींच कामें परस्परांच्या विचारानें व सल्ल्यानें होत असत. राजेसाहेबांना या मंडळीच्या सहकार्याचा बराच फायदा मिळाला.

राजेसाहेबांच्या या भाषणांतही बेमुर्वत विदेशी सैन्याची छाटाछाट करून हिंदु-स्थानांतील अंतर्गत सैन्याचा शिरकाव करण्याची सरकाराला सूचना आहे. यावरूनही हिंदुस्थानांतील क्षत्रियांनीं आपला बरेच दिवस सुटलेला लढवय्या पेशा पुन्हां धारण करून त्यांनीं कलियुगांतही आपलें खरें अस्तित्व लोकनिदर्शनाला आणावें, असा राजेसाहेबांचा असलेला हेतु स्पष्ट दिसतो.

## कौन्सिलमुळें आलेले इतर योगायोग.

सन १९३१ च्या फेब्रुवारी महिन्यामध्यें राजेसाहेब पाहिल्यानें कौन्सिल ऑफ स्टेटच्या बैठकीकरितां दिल्लीला गेले, त्या वेळीं त्यांनीं कौन्सिलच्या कामाच्या मदती-करितां आपले स्नेही श्रीयुत नटेश आप्पाजी ऊर्फ बापूसाहेब द्रवीड श्री. पांडुरंग गोपाळ रानडे यांना बरोबर घेतलें होतें. हे दोघेही गृहस्थ राजेसाहेब कौन्सि-लमध्यें जितके दिवस होते, तितके दिवस त्यांचेबरोबर काम करीत होतेंच. राजेसाहेब दिल्लीला यापूर्वी बरेच वेळां आले होते. इ. स. १९१२ च्या दिल्ली दरबारला राजेसाहेब पहिल्यानें दिल्लीला आले. त्यानंतर त्यांच्या दिल्लीला एक

दोन खेपा झाल्या होत्या. परंतु श्री. सौ. राणी इंदिराबाई साहेब यांनीं हा उत्तरे-कडील प्रदेश पाहिला नसल्यामुळें व अनायासें दिल्ली, आग्रा, मथुरा, कुरुक्षेत्र, हरि-द्वार, लक्ष्मणझुला वगैरे स्थळें व क्षेत्रें पाहिल्यासारखीं होतात; ह्मणून या दौऱ्यामध्यें त्यांनीं राणीसाहेबांसह कुटुंबांतील सर्वच मुलाबाळांना बरोबर घेतलेलें होतें. त्या वेळीं श्री० सौ० राणीसाहेब यांना व्हाईसराय साहेबांच्या पत्नि लेडी एर्वीन यांचीही भेट घेण्याचा सुयोग लाभला होता.

हिंदुस्थानचे व्हाईसराय लॉर्ड एर्वीन यांचेबरोबर राजसाहेबांचा पूर्व परिचय होता. नागपुरीं ते आल्या वेळीं रामटेक येथील जुनीं मंदिरें पहाण्याकरितां जेव्हां ते गडावर गेले, त्या वेळीं त्यांचें स्वागत करण्याचा मान राजेसाहेबांकडे होता. दिल्लीलाही राजेसाहेबांना व्हॉईसराय साहेबांच्या भेटीचा वरचेवर योग येत असे.

## उदेपूर व नागपूर.

या वेळींच राजेसाहेबांना चिरस्मरणीय होईल अशा एका महत्वाच्या भेटीचा योग आला. दिल्ली येथें बुधवार ता. ४ मार्च सन १९३१ इ. रोजीं सकाळीं उदेपूरचे हिज हायनेस महाराणा भोपालसिंहजी यांच्या भेटीचा सुयोग लाभला. महाराणाजी दिल्लीला आले आहेत, असें सम-जतांच राजेसाहेबांना त्यांच्या भेटीची उत्कट इच्छा झाली. व त्याप्रमाणें योग घडवून आणणेकरितां त्यांनीं श्री. रानडे यांना सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं जाऊन भेटीचा योग जुळवून आणला. राजेसाहेबांनीं राणाजींवरून तीन मोहरांचा सतका केला. परस्पर राजे व महाराणे मोठ्या आनंदानें एकमेकांना भेटले. सुमारें अर्धा पाऊणतास परस्परांचें मोठ्या प्रेमानें संभाषण झालें. भोंसले ही शाखा उदेपूरच्या मूळ वंशवृक्षापैकीं असूनही महाराणा देवराज चितोडवरून दक्षिणेंत आल्यापासून या वेळपर्यंत भोंसले घराण्यांतील राजपुरुषांची व उदेपूरच्या राजघरा-ण्यांतील पुरुषांची भेट अशी कधींच झाली नव्हती. त्या दृष्टीनें सुमारें ५०० वर्षांनंतर उदेपूरच्या महाराणांची व नागपूरकर भोंसले राजांची ह्मणजे वृक्षशाखांची ही भेट विशेष महत्वाची झाली, यांत संशय नाहीं. परस्परांच्या संभाषणाचे वेळीं राजेसाहेबांना उदेपुरीं एकदांतरी येण्याबद्दल महाराणांनीं अगत्याचें निमंत्रण दिलें. राजेसाहेबांचे मनांतही उदेपूरला जाणेचें फार होतें. परंतु कार्य बाहुल्यामुळें उदेपुरीं जाण्याचा योग जुळून आला नाहीं.

ग्रंथ संग्रहालय
प्रत
नं.




उदेपूरच्या महाराणाजींच्या भेटीनंतर श्री. राजेसाहेब. श्री. पां. गो. रानडे.
मागें · रामराव जामदार.

 [K.P.Z.P.B.]




कौन्सिल ऑफ स्टेटच्या कामाचे राजेसाहेबांचे मदतनीस स्नेही श्री. बापूसाहेब द्रवीड, श्री. राजेसाहेब.
[K P.Z.P.B.] श्री. पां. गो. रानडे. पृष्ठ ४४४-४४५



श्रीसोनेगांव येथील रथोत्सव.

पृष्ठें ४४४-४४५ (क.फो.शि.प्रे.वे.)



जगद्विख्यात पहेलवान गामा आणि इमामबक्ष.

पृष्ठ ३४४-४४५

(क.फो.झिं.प्रे.बे.)

## गामा आणि इमामबक्ष.

जगद्विख्यात गामा पहेलवान व त्यांचे धाकटे बंधु इमामबक्ष पहेलवान हे सरकारी निमंत्रणावरून याच वेळीं दिल्लीला आले होते. नागपूरचे राजेसाहेब दिल्लीला आले आहेत, ही हकीकत त्यांचे कानीं पडतांच ते राजेसाहेबांना भेटण्याकरतां त्यांचे बंगल्यावर आले. राजेसाहेबांना पहेलवानीचा मोठा शोक होता व त्यामुळें त्यांचें नांव हिंदुस्थानांतील सर्व मोठमोठ्या पहेलवानांना माहीत होतें. बहुतेक मोठमोठ्या पहेलवानांचा त्यांच्याबरोबर पूर्वपरिचयही होताच. या वेळीं त्या उभय बंधूंची चांगलीच तयारी होती. त्यांना राजेसाहेबांनीं त्यांचेबरोबरील आठ दहा पहेलवानांसह मोठी मेजवानी दिली. जगद्विख्यात झिस्कोबरोबरील कुस्तीची साद्यंत हकीकत त्यांनीं गामाचे तोंडून ऐकली. राजेसाहेबांना ती ऐकून मोठा आनंद झाला व त्यांनीं गामा व इमामबक्ष यांना उंची वस्त्रें देऊन त्यांचा मोठा गौरव केला. त्या वेळीं राजेसाहेबांचें आम्हांला नेहमीं स्मरण रहावें, याकरितां आपणां सर्वांचा एक फोटो काढून घेऊं या, अशी गामा पहेलवान यांनीं आपली इच्छा प्रदर्शित केल्यामुळें एक ग्रुपवजा फोटोही काढण्यांत आला.

## दिल्ली येथील महाराष्ट्र – मंडळ.

दिल्लीयेथील महाराष्ट्र मंडळानें ' श्रीशिवाजी जन्मोत्सवा'चे वेळीं राजेसाहेबांना बोलावणें करून त्यांचा मोठा गौरव केला. या समारंभाचें अध्यक्षस्थान श्री. पां. गो. रानडे यांना देण्यांत आलें होतें. मुख्य वक्ते श्री. बापूसाहेब द्रवीड हे होते. या प्रसंगीं राजेसाहेबांनीं शिवाजीमहाराजांच्या चरित्रावर हृदयस्पर्शी असें भाषण केलें. या प्रसंगाला महाराष्ट्रांतील श्री. नारायणराव गुंजाळ वगैरे असेंब्लीचे सभासदही हजर होते. दिल्लीसारख्या दूरच्या ठिकाणीं ' महाराष्ट्र मंडळ ' स्थापन करून बहुतेक सर्व धार्मिक उत्सव एक जुटीनें करण्याचा उपक्रम चालू ठेवल्याबद्दल राजेसाहेबांनीं संतोष व्यक्त केला.

## समरहिल–सिमला.

इ. स. १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत कौन्सिलच्या कामाकरितां राजेसाहेबांना सिमल्याला जाण्याचा प्रसंग आला. यापूर्वी राजेसाहेब तेथें कधींच गेले नव्हते. या

सिमल्याच्या दौऱ्यांत श्री. बापूसाहेब द्रवीड, श्री. रानडे, वे. शा सं. ताम्हनकरशास्त्री रा. रामराव जामदार पहेलवान, रा. शिवनारायण पांडे, रा. किसनलाल ओझा वगैरे नेहमींची मंडळी होतीच. परंतु त्याखेरीज श्री. नानासाहेब उपाध्ये यांनाही कौन्सिलच्या कामाची माहिती व्हावी, ह्मणून मुद्दाम बरोबर घेण्यांत आलें होतें. त्याच प्रमाणें दूरच्या प्रदेशांत डॉक्टरी इलाज वेळेवर उपयोगी पडावा ह्मणून त्यांनीं श्री. बापूसाहेब द्रवीड यांचे चिरंजीव नुकतेच एम्. बी. बी. एस. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन नागपुरीं आले असल्यामुळें त्यांनाही त्यांनीं बरोबर घेतलें होतें. ही सर्व मंडळी नागपुरास ग्रँड ट्रंक एक्सप्रेसमध्यें बसून दिल्लीला आली. तेथें लाला दिवाणचंद यांचे कोठिमध्यें एक दिवस विश्रांति घेतल्यानंतर फ्रँटियर मेलनें दिल्लीहून कालकाला पोंचली कालका हें जंक्शन-स्टेशन आहे. या ठिकाणीं सिमल्याला जाण्याकरितां छोट्या गाडींत बसावें लागतें. या गाडीचा प्रवास सुमारें सहा तासाचा असतो. राजेसाहेबाकरितां सिमल्याला समरहिलवर सरकारी बंगला कायम केलला होता. या या समरहिलची उंची समुद्रसपाटीपासून आठ हजार फूट आहे. सप्टेंबर महिन्यांत या ठिकाणची हवा फारच आल्हादकारक असते; ह्मणूनच या वेळीं असेंब्लीची किंवा कौन्सिल ऑफ स्टेटची बैठक होत असते. सिमला ही हिमालय पर्वतावरील इंद्राची नगरीच वसल्याप्रमाणें सुंदर आहे. या दिवसांत तेथें हिंवाळ्यांत पडलेलें बर्फ वितळून जातें व जमीनही स्वच्छ होते. पर्वतावर सहल वगैरे करावयाला जाण्याचे हेच मुख्य दिवस असतात येथील थंड हवेमुळें पर्वतावरील चढउताराचे चालण्याचे कितीही श्रम झाले, तरी अंगाला घाम येत नाहीं व थकल्याप्रमाणेंही वाटत नाहीं. येथें मोठमोठे अंमलदार व श्रीमंत लोक चालतच जाण्याची पद्धत ठेवतात. येथें फक्त ठराविक मार्गानें व्हाईसराय, कमांडर इनचीफ व पंजाबचे गव्हर्नरसाहेब या तिघांच्याच मोटारींची वहातुक होते. बाकीच्या लोकांकरितां रिक्षा मिळतात. या रिक्षा ओढण्याकरितां चार माणसें असतात एका रिक्षेला एका दिवसाला चार रुपयांपासून पांच रुपयांपर्यंत भाडें पडतें. रिक्षा ओढणारे लोक सशक्त, चपळ व काटक असतात. टांग्यांप्रमाणें या रिक्षांचा उपयोग होतो.

## श्रीगणेशोत्सव.

सप्टेंबर महिन्यांतील ही कौन्सिलची बैठक गणेशचतुर्थीच्या सुमाराला आल्यामुळें राजेसाहेबांना त्या उत्सवाला नागपुरला राहतां येण्यासारखें नव्हतें. हा गणेश-

चतुर्थीचा उत्सव आजपर्यंत त्यांचा अंतरला नव्हता. तेव्हां या कौन्सिलमुळें तो अंतरणार, असें राजेसाहेबांना वाटलें. ह्मणून त्यांनीं त्यांत पर्याय काढण्याचें ठरविलें. नागपुरच्या राजवाड्यांतील उत्सव पार पाडून नेण्यासारखे त्यांचे वडील चिरंजीव बाळराजे प्रतापसिंह ( उपनयन झाल्यामुळें ) अधिकारी झालेच होते. आतां फक्त त्यांच्या स्वतःपुरताच प्रश्न होता. तेव्हां त्यांनीं सिमल्यास जातांना श्रीगजाननाची मूर्ति बरोबर घेतली. नंतर सिमल्यास गेल्यावर गणेशचतुर्थीचे दिवशीं श्रीगजाननाची रीतसर प्राणप्रतिष्ठा होऊन तेथें गणेशोत्सव मोठ्या थाटानें करण्यांत आला. असेंब्लीचे सभासद व कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद व इतर हिंदु स्नेही वगैरेंना निमंत्रणपत्रिका काढून रविवार ता. २० सप्टेंबर १९३१ इ. रोजीं पानसुपारीला पाचारण करण्यांत आलें होतें. गंधर्व नाटक मंडळींतील सुप्रसिद्ध गवई श्री. मास्तर कृष्णा हे त्या ठिकाणीं आले होते. त्यांच्या गाण्याची बैठक श्रीगजाननोउत्सवाप्रीत्यर्थ त्या पानसुपारीचे प्रसंगीं ठेवण्यांत आली होती. त्या प्रसंगीं सर्व मोठमोठी मंडळी आल्यामुळें त्या समारंभाला विशेष शोभा आली. त्या गणेशोत्सवानें सिमल्यास आलेल्या हिंदु लोकांना तो उत्सव अंतरल्याप्रमाणें वाटलें नाहीं. त्या ठिकाणीं हा पहिलाच गणेशोत्सव झाला, असें आमली मंडळी ह्मणूं लागली. राजेसाहेबांबरोबर वे. शा. सं. ताह्मनकर शास्त्री असल्यामुळें श्रीगजाननाचे पूजेसंबंधींही कोठें अडचण पडणारी नव्हती. सर्व उत्सव यथासाग असा झाला. शेवटीं उत्सवमूर्ति समरहिलवरील राहण्याचे स्थानापासून सुमारें दोन मैल खालीं उतरून दोन टेंकड्यांमधून वहात जाणाऱ्या नदीच्या प्रवाहांत विसर्जन करण्यांत आली. एकंदरींत सिमल्यास हा गणेशोत्सव नवीन ह्मणून नवलाचाच झाला.

## सिमल्यावरील मारुतीराय.

सिमल्यास समरहिलपासून सुमारें सहा सात मैलांवर जाकोहिल या नांवाची बरीच उंच टेंकडी आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून सुमारें एक हजार फूट आहे. या टेंकडीला श्रीहनुमानाचें सुंदर देवस्थान आहे. एका शनिवारीं राजेसाहेब दर्शनाकरितां या टेंकडीवर सर्व मंडळीसह आले. या मंदिरांतील मूर्तीची स्थापना श्रीरामदासस्वामींनीं केली आहे असें तेथील माहितीवरून समजलें. हें स्थान मोठें रम्य आहे. येथें माकडें पुष्कळ आहेत. दर्शनाला येणाऱ्या लोकांचे

हात धरून तीं माकडें तेथें त्यांना फुटाणें विकणाऱ्या इसमाकडे घेऊन जातात. पैशा-दोन पैशाचे फुटाणें घेऊन त्या माकडांना खाऊं घातले म्हणजे तीं हात सोडून निघून जातात. पाणी पिण्याचीही तेथें उत्तम सोय आहे. वृक्षांची सुंदर छाया आहे. या छायेंत बसून दर्शनाला येणाऱ्या लोकांना फराळ वगैरे आनंदानें करतां येतो या ठिकाणाहून पर्वताच्या उत्तुंग शिखराकडे दृष्टि फिरविली म्हणजे खऱ्या हिमालय पर्वताची कल्पना येते. हीं शिखरें नेहमीं बर्फानें आच्छादलेलीं असल्यामुळें पांढरीं शुभ्र असलेलीं दिसतात. परंतु तीं फार दूर असल्यामुळें जाकोहिलवरून डोळ्यानें पाहूनच मनाचें समाधान करून घ्यावें लागतें. श्रीरामदास स्वामींनीं स्वतःच्या हस्तें स्थापन केलेल्या जाकोहिलवरील या श्रीमारुतीरायाच्या दर्शनानें राजसाहेबांना अत्यंत आनंद झाला. व त्या काळीं स्वामींनीं एवढ्या अवघड स्थानींसुद्धां संचार करून आपलें श्रीमारुति स्थापन करण्याचें कार्य केलें, या बद्दलही यांना मोठें कौतुक वाटलें.

## लाहोर–स्वागत–समारंभ

इ. स. १९३२ च्या मार्च महिन्यामध्यें राजसाहेब कौन्सिलच्या बैठकी-करतां पुन्हां ज्या वेळीं दिल्लीला आले, त्या वेळीं त्यांचे समागमें त्यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. बाळराजे प्रतापसिंह हे होते. त्यांना लाहोरास परिक्षेकरतां जावयाचें होतें. ते पंजाब युनिव्हरसिटीच्या मॅट्रिक्युलेशनच्या परिक्षेला बसले होते. ही परीक्षा ता. १० मार्चपासून सुरू होऊन ता. २४ मार्चपर्यंत चालू राहणार होती. म्हणून राजसाहेब दिल्लीला कौन्सिल कामाकरितां राहिले व बाळराजे यांचेबरोबर लाहोरास श्री रानडे यांना पाठवून देण्यांत आलें. मध्यतरी शिमग्यानिमित्त कौन्सिलला सुटी असल्यामुळें व बाळराजे लाहोरास परिक्षेकरतां गेलें असल्यामुळें आपणही चार दिवस लाहोरास जाणेचा राजसाहेबांनीं विचार ठरविला. राजसाहेब लाहोरीं येणार, ही हकीकत तेथील महाराष्ट्र मंडळांतील कार्यकारी मंडळीला समजतांच त्यांच्या स्वागताची तयारी सुरू झाली. राजेसाहेब रविवार ता. २० मार्च रोजीं सकाळीं ७॥ वाजतां लाहोरास येणार होतें. त्यांचे स्वागताकरितां महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. गडकरी इंजीनीयर, सेक्रेटरी श्री. ताम्हने, श्री बाळासाहेब आगटे वगैरे मंडळी हारतुरे वगैरे घेऊन स्टेशनवर हजर होती. श्री. बाळराजे व श्री. रानडे हेही स्टेशन-

वर आले होते. त्या वेळीं तेथें स्टेशनवर श्री. रानडे यांना कौन्सिल ऑफ स्टेटमधील सभासद रायबहादूर लाला रामशरणदास हे भेटले. तेव्हां त्यांनीं आपण राजेसाहेबांचे स्वागताकरितां आल्याचें सांगितलें. शिवाय त्यांनीं असेंही ह्मटलें कीं, राजेसाहेब आमचे शहरीं आल्यानंतर त्यांना दुसरीकडे आह्मी उतरूं देणार नाहीं. आमचे येथेंच त्यांना गरिबाचे घरची मीठ भाकर खाण्याकरितां नेण्याची आमची इच्छा आहे. या भाषणानें महाराष्ट्र मंडळांतील लोकांचा थोडा विरस झाला. कारण लाहोरास राय-बहादूर ह्मणजे एक बडे श्रीमान व थोर गृहस्थ मानले जात. बहुतेक सर्व बडी बडी मंडळी त्यांचेच पाहुणे ह्मणून त्यांचे कोठींत उतरत. स्वत: ते राजेसाहेबांना स्टेश-नवर नेण्याकरतां आले असल्यानें महाराष्ट्रमंडळमध्यें ते उतरणार नाहींत, अशी सर्वांची खात्री झाली. ठरल्या वेळीं मेल आली. महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्षांनीं राजे-साहेबांचे गळयांत एक मोठा हार घातला. रायबहादुरांनींही राजेसाहेबांचें स्वागत केलें. राजेसाहेबांना आतां कोठें जावें असें कोडें पडलें. तेव्हां रायबहादूर ह्मणाले, " महाराष्ट्र—मंडळ हें महाराष्ट्रीय लोकांचें घरचेंच आहे. तेव्हां पहिला पाहुणचार आमचेकडेच झाला पाहिजे. नंतर केव्हांही आपण तिकडे जाऊं शकाल." यामुळें राजे-साहेब रायबहादूर यांचे कोठींतच राहण्याकरतां गेले राजेसाहेबांची त्यांनीं राजकीय थाटाप्रमाणेंच सर्व व्यवस्था ठेविली होती.

## लाहोर—महाराष्ट्रमंडळ.

महाराष्ट्र मंडळातर्फे ता. २२ मार्च रोजीं राजसाहेबांच्या सन्मानार्थ मोठा समारंभ करण्यांत आला. त्या वेळीं कर्नल बखले, न्यायमूर्ती भिडे वगैरे प्रमुख महा-राष्ट्रीय मंडळी हजर होती. भगिनीमंडळाच्या अध्यक्ष मिसेस भिडे, सेक्रेटरी मिसेस गडकरी व भगिनीमंडळाच्या बऱ्याच सभासदही हजर होत्या. तेथील महाराष्ट्र-मंडळींना राजसाहेबांचा परिचय व लाहोर येथील महाराष्ट्र मंडळींचा राजेसाहेबांना परिचय असा परस्पर परिचय करून देण्याचें काम मंडळाचे उत्साही अध्यक्ष श्री गडकरी व सेक्रेटरी श्री. ताह्मने यांनीं मोठ्या मार्मिक व विनोदी भाषणानें केलें. राजेसाहेबांनींही आपल्या भाषणांत सर्वांचे प्रथमत: आभार मानून ' लाहोरसारख्या पंजाबांतील शहरीं एक तरी महाराष्ट्र बंधु आमचे दृष्टीला पडेल किंवा नाहीं, याची आह्मांला शंका होती. पण येथेंसुद्धां महाराष्ट्रमंडळ ही संस्था असून येथें सुमारें चाळीस पन्नास महाराष्ट्र

कुटुंबें एक विचारानें एकमेकांना सहाय्यक होऊन व आपला एक स्वतंत्र गट निर्माण करून राहत आहेत, ही मोठीच आनंदाची गोष्ट आहे, असें त्यांनीं सांगितलें. शिवाय येथें आल्यापासून आह्मीं नागपुरीं घरींच आहोंत कीं काय असें वाटण्याइतक्या मोकळ्या मनानें येथील महाराष्ट्र मंडळी आमचेबरोबर वागली, हें पाहून तर आह्मांला धन्यताच वाटली.' वगैरे आशयाचें भाषण करून व आपला एवढा मोठा गौरव केल्याबद्दल सर्व बंधुभागिनींचे पुन्हां एकवार आभार मानून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर हारतुरे वगैरे होऊन व मुलामुलींचीं पदें वगैरे झाल्यावर अल्पाहार वगैरे होऊन हा गोड समारंभ आटोपला.

## अमृतसर.

याच वेळीं राजेसाहेब लाहोराहून अमृतसर पाहण्याकरितां गेले होते. तेथें शीख लोकांचें मुख्य सुवर्ण मंदिर आहे. त्याला ग्रंथसाहेबांचें मंदिर किंवा दरबारसाहेबांचें मंदिर असें ह्मणतात. या दरबारसाहेबांच्या दर्शनाला चार दिवसांच्या अवधींत राजेसाहेब दोन वेळां गेले. हें मंदीर जेवढें श्रीमंती थाटाचें आहे, तेवढेंच किंबहुना जास्तच जागृतस्थान असल्याबद्दल राजेसाहेबांना चांगलाच अनुभव आला. नवसाचा ठोकताळा एक दोन दिवसांतच आल्यामुळें राजेसाहेबांना दुसऱ्या वेळीं दर्शनाकरितां जाऊन यावें लागलें.

लाहोर व अमृतसर हीं शहरें पाहून राजेसाहेबांना फारच आनंद झाला. कारण, तेथील उत्तम हवेमुळें लोकांची शरीरप्रकृति फारच उत्तम दिसून आली. तेथील बहुतेक सर्वच लोक कसरत केलेले व धिप्पाड असे दिसले. गांवांत चहाचें एकही हॉटेल नव्हतें. सर्व ठिकाणीं दुध ताक पिण्याचीं दुकानें दिसून आलीं. ताकाला त्या ठिकाणीं लस्सी असें ह्मणतात. फळफळावळही विपुल होती. हा प्रदेश सुपिक असल्यामुळें खाण्यापिण्याची कोणालाच ददात नव्हती. जनावरेंही फारच मोठीं व दुधाला भरपूर अशीं असल्यामुळें दूध दुभतें विपुल होतें. वेळेला वीस वीस पौंड दूध देणाऱ्या गाई लाहोरास विकत मिळतात; ह्मणून राजेसाहेबांनीं आठ गाई व एक सांड तेथें खरेदी करून नागपुरीं आणली.

## ग्वाल्हेरवरून नागपूर.

लाहोराहून नागपुरास परत येतांना मध्यंतरीं ग्वाल्हेरास उतरण्याची राजेसाहेबांची फार इच्छा होती. तेथील श्रीमंत सरदार पाटणकर, राजेसाहेबांना उतरून घेण्याकरितां स्टेशनवरही आले होते. श्रीमंत खाशेराव पवार यांचेही भेटीची त्यांना इच्छा होती. महाराष्ट्र क्षत्रिय व हिंदुस्थानी क्षत्रिय यांच्या संयुक्त परिषदविषयीं त्यांचेबरोबर राजेसाहेबांना विचारविनिमय करावयाचा होता. तसेंच ग्वाल्हेरच्या श्रीमंत बालराजे महाराजांच्या दर्शनाचीही त्यांना फार फार इच्छा वाटत होती; परंतु राजेसाहेबांची तब्येत त्यांना त्या वेळीं तितकीं अनुकूल नव्हती. शिवाय त्यांना ता. १७ मार्च रोजीं चतुर्थ पुत्ररत्न झाल्यामुळें नागपुरीं बारशाचे समारंभाला ताबडतोब जाणें जरूरीचें होतें ह्मणून ते ग्वाल्हेरास न उतरतां थेट नागपुरीं निघून आले.

राजेसाहेब नामदार बनून कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें गेल्यापासून सुमारें वर्ष सव्वा वर्षाचे अवधींत त्यांनीं नवीन अशीं अनेक प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं; ठिकठिकाणीं त्यांचें अनेक गौरव झाले. त्यांत नागपूरचे सुप्रसिद्ध वे० शा० सं० लक्ष्मणशास्त्री घुले यांनीं राजेसाहेब कौन्सिल ऑफ स्टेटच्या निवडणुकींत यशस्वी झाल्या वेळीं त्यांना एक काव्यालंकार अर्पण करून त्यांचा त्यांनीं मोठा गौरव केला, तो खालीलप्रमाणें:—

येन श्रीनृप—लक्ष्मणेन सुधिया दिल्लीशकुट्यां मुदा ।  
प्रज्ञा—ज्ञान—गुण—प्रदीप्ति—नियुतं शूरस्य तेजोहरम् ।।  
चित्ताल्हादकरं वचो निगदितं स्वातंत्र्य—सौख्यप्रदम् ।  
तस्मै स्त्री—सुत—संयुताय दिशतु प्राज्यं स्वराज्यं प्रभुः ।। १ ।।

—लक्ष्मणशास्त्री घुले, नागपूर.

प्रकरण २३ वें.

# राजेसाहेबांचा अंतकाळ.

मापी लागलें शरीर । घडीनें घडी ॥

उत्पत्ति, स्थिति आणि लय हे सृष्टिचे नियम अवधित आहेत. या नियमांच्या तडाक्यांतून व्यावहारिक दृष्टीनें कोणीच सुटलेला नाहीं. या नियमांना गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी, सदाचारी-दुराचारी, मालक-नोकर, जित-जेता वगैरे सर्वांना एकच नियम लागू असतो. या सृष्टीच्या नियमाच्या बाहेर कोणालाच जातां आलें नाहीं व जातांही पण येत नाहीं. आत्मा अविनाशी असला तरी देहाला सृष्टीच्यावरील तीन्ही स्थिती प्राप्त होतच असतात. त्याला अनुसरून देहाचा लय करणाऱ्या रोगांची संप्राप्ति राजेसाहेबांच्या देहांतही उत्पन्न होऊं लागली. सुमारें सात आठ वर्षांपासून त्यांना ' मधुमेहाचा ' विकार उत्पन्न झाला होता. हा विकार ह्मणजे लघवींतून साखरेप्रमाणें गोड रस जाणें होय. सर्वसाधारणपणें हा रोग जडल्या-पासून कित्येक दिवस या रोगाची रोग्याला कल्पनाच असत नाहीं. खाणें, पिणें, नित्य व्यवसाय करणें, झोंपणें, फिरणें वगैरे शरीराचे सर्व व्यापार सुरू असतांना-सुद्धां या रोगाची संप्राप्ति व वृद्धि शरिरांत होते विशेष इतकेंच कीं रोग्याला मात्र तें समजत नाहीं. ताप आला ह्मणजे मनुष्याचे हिंडण्याफिरण्याचे व्यापार बंद होतात. त्याचप्रमाणें इतर रोगांमुळेंही कांहीं ना कांहीं विकृतीनें रोग झाला आहे, अशी जाणीव होते. परंतु हा ' मधुमेह ' रोग असा वस्ताद आहे कीं, त्यानें मनु-ष्यावर केलेला हल्लाच मुळीं त्याला समजत नाहीं. ज्या वेळीं मनुष्याचा सर्व देह पोंखरला जाऊन तो त्या रोगाच्या पूर्ण ताब्यांत येतो, त्या वेळीं आपण कोणत्या तरी रोगानें पछाडलों आहों, अशी त्याची कल्पना होते व नंतर तो वैद्याकडे जाऊन

त्यांची चौकशी करूं लागतो. नंतर कांहीं दिवसांनीं या रोगाचा पत्ता लागतो. उघड शत्रू परवडतो, पण गुप्त शत्रू खात्रीनें प्राणनाशक होत असतो. मधुमेह ( डायबिटीज ) ह्य गुप्त शत्रूप्रमाणें असल्यामुळें कित्येक थोर थोर व्यक्तींचे आजपर्यंत त्यानें घात केले आहेत,

## काळाचा प्रतिनिधि—मधुमेह !

राजेसाहेबांना हा विकार सात आठ वर्षांपासून होता, तरी या विकाराची कल्पना त्यांना सन १९२६ मध्यें आली. त्यांचे बालमित्र नबाब नियाजउद्दीनखान यांनाही तोच विकार असल्याचें त्यांना समजलें. त्याचप्रमाणें त्यांचे दुसरे मित्र श्री. गोविंदराव शहादाणी व त्यांचे पुरोहित वे. शा. सं. पाठकशास्त्री यांनाही याच विकारापासून पीडा आहे, अशी त्यांना खबर लागली. तेव्हां या विकाराची इतःपर उपेक्षा करणें बरें नव्हे, ह्मणून त्यांनीं डॉक्टर, वैद्यांचे औषधोपचार सुरू केले. डॉक्टर वैद्यांनीं राजेसाहेबांच्या इतर मित्रांप्रमाणें राजेसाहेबांना कडकडीत पथ्य सांगितलें. भात, बटाटे, साखर पौष्टिक पदार्थ वगैरे जिन्नस बंद करून त्यांनीं राजेसाहेबांना औषधोपचार सुरू केले. अशाप्रकारें आठ पंधरा दिवस गेल्यानंतर लघवी तपासून पहातां साखरेचें मान त्यांत कमी दिसे, पण त्यापासून त्यांना बेसुमार अशक्तता येई. ते पुन्हां आपले नेहमींचें अन्न खाऊं लागले व त्यांनीं कसरत सुरू केली कीं त्यांनीं आपली प्रकृती पुन्हां सुधारल्याप्रमाणें दिसे; परंतु लघवींतील साखरेचें प्रमाण मात्र त्यामुळें मूळ पदावर येई. नबाबसाहेब व गोविंदराव शहादाणी यांचे मतें या रोगावर औषधच नाहीं; भात साखर वगैरे पदार्थ कायमचेच सोडून पथ्यानें वागणें, हेंच या रोगावर औषध आहे, असें अनुभवांतीं ठाम ठरलें होतें. परंतु त्याप्रमाणें ते वागूं लागल्यामुळें दिवसेंदिवस ते क्षीण होऊं लागले. नबाबसाहेबांनीं तर पथ्यानें वागण्याचे आपलें व्रत चालू असतांच इहलोकची यात्रा संपविली !

## राजवैद्य आबासाहेब सांबारे.

नबाबसाहेबांच्या या प्रकारामुळें राजेसाहेबांच्या मनावर विपरीत परिणाम झाला. राजेसाहेबांचे आप्त व स्नेही सोबती यांनाही त्यांच्या प्रकृतीबद्दल काळजी

वाटूं लागली व औषधोपचार सुरू करण्याबद्दल त्यांना प्रत्येकाकडून विनंति करण्यांत आली. त्या वेळीं राजेसाहेबांनीं निक्षून सांगितलें कीं, “ मीं पथ्य करून नबाबसाहेबां-प्रमाणें अशक्त होऊन मरणार नाहीं. माझे हातपाय चालत असलेल्या स्थितींत मला मरण यावें. दुर्दैवानें याच वेळीं येथील राजवैद्य दादासाहेब मोहिते हेही दिवंगत झालेले आहेत. या रोगावर औषध लागूं पडत नाहीं ही माझी खात्री आहे. तुमचें सर्वांचे मनांत मला जर औषध देणें असेल, तर पथ्य न करितां साखर खाणेची न सोडतां जर एकादा वैद्य मला औषध देऊन माझा रोग बरा करणार असेल, तरच औषध घेणेची माझी तयारी आहे,'' राजेसाहेबांच्या या भाषणावर नागपूरच्या सर्व मंडळींचीं तोंडें बंद झालीं. कारण, साखर वगैरे पदार्थ खावयाला देऊन औषध देणारा डॉक्टर किंवा वैद्य तेथें कोणाच्येच ऐकण्यांत नव्हता. परंतु श्री. रानडे यांना मात्र सांगलीचे राजवैद्य श्री. आबासाहेब सांभारे यांची पूर्ण माहिती होती. साखर वाटेल तेवढी खावयाला देऊन डायाबिटीजवर औषधोपचार करणारे ते एकटेच राजवैद्य हिंदुस्थानांत होते. त्यांची सर्व हकीकत त्यांनीं राजेसाहेबांना सांगितली व ती त्यांना पटून त्यांनीं सांगलीस औषधोपचारास जाण्याचें ठरविलें.

राजेसाहेबांचा सांगलीस जाण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें तेथें त्यांचा परिचय असण्याचें कारण नव्हतें. पण त्याच वेळीं सांगलीचे राजेसाहेब विलायतेला गेले असल्यामुळें नागपूरचे श्री. सर मोरोपंत जोशी हे त्या ठिकाणीं ॲडमिनिस्ट्रेटर असल्याचें समजलें. शिवाय तेथील सौ. राणीसाहेब या त्यांच्याच कन्या. लहानपणीं त्या नागपुरीं होत्या. तेव्हां राजेसाहेबांशीं त्यांचा चांगला परिचय झाला होता. तेव्हां सांगलीस औषधोपचाराकरितां गेल्यास आपणाला कोणत्याच प्रकारची अडचण भासण्यासारखी परिस्थिति येणार नाहीं, हें ते जाणून होते; ह्मणून त्यांनीं श्री. रानडे यांचेबरोबर सर साहेबांना देण्याकरितां पत्र देऊन त्यांची सांगलीस रवानगी केली.

श्री. रानडे यांनीं सांगलीस येऊन सर राजेसाहेबांची भेट घेतली. राजेसाहेब सांगलीस औषधोपचाराकरितां येणार, ही हकीकत वाचून व ऐकून त्यांना व श्री. सौ. राणीसाहेबांना आनंद झाला. त्यांनीं लगेच आपल्या खासगीपैकीं श्री. आबा-साहेब यांचे स्नेही असलेले एक वृद्ध गृहस्थ रानडे यांचेबरोबर देऊन त्यांना वैद्य-राजांकडे पाठविलें. त्यांना सर्व हकीकत त्या उभयतांनीं सांगितली व राजेसाहेबांच्या

विचाराप्रमाणें त्यांना पथ्यपाणी न देतां औषधोपचार करण्याची श्री. आबासाहेब सांभारे यांनीं कबुली दिली.

## सांगली दरबारचा पाहुणचार.

ही हकीकत ऐकून सांगलीच्या श्री. सौ. राणीसाहेब व सरसाहेब यांना विशेष आनंद झाला. त्यांनीं सरकारी खण बंगल्यांत भोंसले राजांची सांगली दरबारकडून व्यवस्था करण्याचे हुकूम सोडले. याप्रमाणें व्यवस्था झाल्यानंतर जळगांवच्या 'अखिल भारतीय अहीर सुवर्णकार परिषदेच्या' अध्यक्षाचें काम आटोपून राजेसाहेब तारीख १ फेब्रुवारी १९२८ इ. रोजीं सांगलीस आले. ते स्टेशनवर आले, त्या वेळीं तेथील दरबारी मंडळींनीं त्यांचें यथायोग्य स्वागत केलें. खण बंगल्यांत त्यांची राहण्याची सोय भोंसले राजघराण्याला शोभेल अशीच करण्यांत दरबारनें दक्षता घेतली होती. या वेळीं सांगलीचे राजेसाहेब श्रीमंत सर चिंतामणराव आप्पासाहेब यांची स्वारीही विलायतेहून नुकतीच परत आली होती. उभयतां राजेसाहेबांच्या राजभेटी व मुलाखती उभयतांनाही आनंददायक झाल्या.

औषधोपचार सुरू करण्यापूर्वी राजवैद्यांनीं राजेसाहेबांची लघवी तपासली त्यांत सुमारें शेंकडा सहा ते सात टक्के साखर असल्याचें त्यांना दिसून आलें. त्याचप्रमाणें मिरजेच्या मोठ्या मिशनरी हॉस्पिटलमध्यें व इतर दोन तीन डॉ० लोकांच्या दवाखान्यांमध्यें लघवी तपासून तेही रीपोर्ट घेण्यांत आले. त्यांतही शेंकडा सहा ते सात टक्के साखर असल्याचें दिसून आलें. नंतर राजवैद्यांनीं औषध सुरू केलें पथ्य बिलकुल दिलें नाहीं. फक्त तेल, हिंग व गूळ हे पदार्थ वर्ज केले. साखर वाटेल तेवढी खाण्यास परवानगी दिली. आठ दिवस औषध घेतल्यानंतर फिरून दोन तीन ठिकाणच्या दवाखान्यांत लघवी तपासण्यांत आली. त्यांत साखरेचें प्रमाण कमी दिसूं लागलें. याप्रमाणें औषध आपलें कार्य उत्तम करूं लागलेलें पाहून सर्वांनाच आनंद वाटला. राजेसाहेब सांगलीस सुमारें दीड महिना राहिले. त्या अवधींत त्यांचें सहा पौंड वजन वाढलें. लघवींतील साखरेचें प्रमाण शेंकडा एक ते दोनच्या दरम्यान आलें. त्यांना आंगांत शक्ति आल्याप्रमाणें वाटूं लागलें. भूक उत्तम लागूं लागली. चालण्यापासून थकवा येईनासा झाला. तेव्हां तेथून औषध वगैरे बरोबर घेऊन नागपुरीं निघून आले.

राजेसाहेबांच्या सांगली येथील मुक्कामांत तेथील श्री. राजेसाहेबांशीं, दरबारी लोकांशीं किंवा दरबारी व्यवस्थेशीं त्यांचा संबंध आला, त्यावरून राजेसाहेबांचा सर्वांबद्दल फारच उत्तम ग्रह झाला. श्रीमंत सर आप्पासाहेब यांचा व राजेसाहेबांचा हा पहिलाच परिचय असूनही थोड्याच अवधींत उभयतांचा चांगला स्नेह जमला. श्रीमंत आप्पासाहेब यांचा नियमितपणा, सुस्वभाव, भारदस्त राहणी, प्रजावात्सल्य, निरभिमान कार्यतत्परता वगैरे अनेक सद्गुण त्यांच्या ठिकाणीं वास करीत असलेले राजेसाहेबांच्या अनुभवाला आले. राजे लोकांच्या ठिकाणीं हे गुण असणें हें खरोखर राष्ट्राचें भूषण आहे.

## काळाची पक्कड—क्किनाईन इंजेक्शन !

या औषधोपचारानंतर सुमारें तीन वर्षें राजेसाहेबांची प्रकृति उत्तम राहिली. मधून मधून मलेरियाचा ताप वगैरे किरकोळ दुखण्याशिवाय दुसरी कांहीं तक्रार नव्हती. इ० स० १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत सिमल्याला राजेसाहेब जाऊन परत आल्यानंतर नोव्हेंबर महिन्यांत त्यांना मलेरियाचा ताप जोरांत आला. तेव्हां नागपुरीं डॉक्टर लोकांची कमिटी भरून राजेसाहेबांना क्किनाईनचें इंजेक्शन देण्याचें ठरलें. राजेसाहेबांच्या प्रकृतीला क्किनाईन अगदीं सोसत नस; ह्मणून त्यांनीं तें इंजेक्शन न देतां दुसरा कोणताही इलाज करण्याकरितां डॉक्टरांना सांगितलें. पण दुसरा कोणताच इलाज चालेना, ह्मणून त्यांनीं शेवटीं त्यांच्या फऱ्याला तें इंजेक्शन दिलें. त्यामुळें त्यांचा ताप थांबला; पण तेव्हांपासून त्यांची प्रकृति जास्त क्षीण होत चालली. पुढें ते कार्तिक वद्य द्वादशीच्या सोनेगांवच्या रथोत्सवाला गेले. हें स्थान त्यांचें मोक्षगुरूचें असल्यामुळें तेथें ते दर वर्षी जात असत. तेथील दहीहंडी, भजन वगैरे वार्षिक धर्मकृत्यें आटोपून ते नागपुरीं आले, त्या वेळीं त्यांच्या सर्व आंगाला सूज चढली व उदर होतो कीं काय अशी स्थिति प्राप्त झाली. शिवाय त्यांना जें क्किनाईनचें इंजेक्शन फऱ्याला देण्यांत आलें होतें, त्याची जखम बरी न होतां ती थोडथोडी वाहूं लागली. नागपुरीं महिना पंधरा दिवस डॉक्टरांचे इलाज झाले, त्यामुळें थोडथोडी सूज उतरूं लागली. या वेळीं राजेसाहेबांना बहुतेक पथ्यावर ठेवण्यांत आलें होतें.

प्रकृतीला एकदोन महिन्यांत साधारण बरें वाटतें आहे अशी स्थिति आल्याबरोबर दिल्लीची कौन्सिल ऑफ स्टेटची बैठक आली; ह्मणून ते दिल्लीला गेले. दिल्लीला पायावर व पोटावर सूज होतीच. त्या स्थितींत त्यांनीं तसेंच काम केलें. लाहोर, अमृतसर वगैरे ठिकाणींही त्यांनीं त्याच स्थितींत प्रवास केला; व ते मार्च-अखेर नागपुरीं आले.

## निर्याण स्थळ—पुणें.

नागपुरीं आल्यानंतर चैत्रांतील श्रीरामाचें नवरात्र आटोपून उन्हाळ्यामध्यें पुन्हां सांगलीस जाऊन औषधोपचार करावा, असा विचार त्यांनीं केला. इतक्यांत सांगलीच्या श्री. आबासाहेब सांभारे यांचें राजेसाहेबांना पत्र आलें कीं, ' सांगलीच्या आमच्या दवाखान्याची शाखा पुण्यास आह्मीं ता. २७ मे रोजीं उघडण्याचें ठरविलें आहे. त्या ' व्याधिवेदनानिग्रहालया'चा अनावरण समारंभ आपले हस्तें करण्याचा बेत केला आहे. ' हें पत्र वाचून राजेसाहेबांना बरें वाटलें. राजवैद्यांचेंही काम केल्याप्रमाणें होईल व आपणालाही पुण्यालाच राहून औषध घेतां येईल, या विचारानें त्यांनीं श्री. आबासाहेबांस आपण पुण्यास येतों, असें पत्र पाठविलें.

राजेसाहेब उन्हाळ्यांत दरवर्षाप्रमाणें आपल्या सर्व मुलांबाळांसह नाशिकला आले. तेथें दोन चार दिवस स्थिरस्थावरता झाल्या. नंतर ते पुण्यास आले. त्यांनीं शुक्रवार तारीख २७ माहे मे रोजीं होणारा दवाखान्याचा अनावरणसमारंभ पार पाडला. दुसरे दिवशीं पहांटे चार वाजतां स्पेशल मोटार करून बरोबरीच्या मंडळींसह ते पंढरीला गेले. तेथून ते रविवारीं सायंकाळीं पांच वाजतां मोटारीनेंच पुण्याला परत आले. या खेपेला त्यांनीं आपल्याबरोबर श्री. बाळराजे प्रतापसिंह व श्री. राजारामसिंह या दोघां मुलांना घेतलें होतें.

पंढरीला जाऊन आल्यानंतर श्री. आबासाहेब यांचें औषध सुरू करण्याचें ठरविलें होतें. त्या औषधोपचाराकरितां महिनाभर पुण्यास राहण्याची त्यांची इच्छा होती; ह्मणून लष्करांतील पोलीस हेडक्वॉर्टरसमोरील पारशांचा बंगला त्यांच्याकरितां भाड्यानें घेण्यांत आला होता. राजेसाहेबांचे पुण्याचे जुने स्नेही रावबहादूर चिमण-लाल किसनदास ऑनररी मॅजिस्ट्रेट यांनीं तेथें त्यांच्या राहण्याची फर्निचर वगैरे

आणवून सर्व सिद्धता केली होती. राजेसाहेब शनिवारीं सायंकाळीं पुण्यास आल्या-नंतर राजवैद्य त्यांचे भेटीला आले व त्यांनीं त्या दिवसापासून त्यांना औषध सुरू केलें. या वेळीं राजेसाहेबांचे लघवींत साखर जात नव्हती. त्यांच्या प्रकृतीचें मान जवळ जवळ पंडु रोगावर गेलें होतें. त्या रोग्याला धरून औषधाची योजना झाली होती. औषध सुरू करते वेळीं श्री. आबासाहेब राजवैद्य राजे-साहेबांना सहज ह्मणाले, " आतां आठ दिवसांच्या आंत आपणाला जिना चढून जायाला आम्हीं लावतों; संध्या जिन्याची चढउतार आपणाला सहन होत नाहीं. धाप लागते. तरी आठ दिवसांतच औषधाचा चमत्कार आपणाला दिसेल. " राजसाहेबांना यामुळें बराच धीर आला व त्यांनीं नियमित औषध घेण्याला सुरवात केली. क्रमाक्रमानें औषधाचा गुण त्यांना दिसूं लागला. राजेसाहेबांना वक्त-शीर औषध देणें व त्यांच्या पथ्यपाण्याची योग्य व्यवस्था ठेवणें ही कामगिरी राजे-साहेबांचे भाचे, श्री. यशवंतराव मोहिते वैद्य, यांचे चिरंजीव श्री. गणपतराव, यांचेकडे होती. त्यांची अलीकडेच राजेसाहेबांनीं राजवाड्यांतील राजवैद्याच्या जागीं नेमणूक केली होती. श्री. गणपतराव मोहिते यांनीं राजेसाहेबांचे आजारीपणांत त्यांची फारच शुश्रुषा केली. त्याप्रमाणें क्विनाईनचें इंजेक्शन फऱ्याला दिल्यामुळें जी जखम झाली होती, ती पुढें व्रणावर जाऊन व मोठी होऊन जास्त वाहूं लागली होती. तिचेंही ड्रेसिंग रोज दोन वेळ चालूं असल्यामुळें तीही क्रमाक्रमानें बरी होऊं लागली होती.

राजेसाहेबांचे कांहीं एका संकल्पानिमित्त ब्राह्मण जेवावयाला घालावयाचे राहिले होते. पुण्यास या खेपला बरोबरीच्या मंडळींत तशी सोय होण्यासारखी नसल्यामुळें नाशीक मुक्कामींच सर्व मंडळी असल्यानें तेथेंच ते जेवूं घालावेत असा त्यांनीं विचार केला. पण औषध सुरू असल्यामुळें व एक महिना पुण्याला त्यांना रहावयाचें असल्यामुळें त्यांना नाशिकला जातां येईना. शिवाय कोणतेंही धर्मकृत्य लांबणीवर टाकणें, त्यांचे मनाला प्रशस्त वाटत नसे; ह्मणून त्यांनीं श्री. बाळराजे यांना नाशिकला जाऊन ब्राह्मणभोजन घालून त्वरित पुण्याला येण्याबद्दल सांगितलें. त्याप्रमाणें पुण्याहून त्यांची नाशिकला रवानगी शनिवार तारीख ४ जून रोजीं करण्यांत आली. त्याच दिवशीं औषध सुरू करून सात दिवस झाले होते.

राजेसाहेबांचे मनांत बाळराजांना स्टेशनवर जाऊन गाडींत बसवून यावें, अशी इच्छा झाली त्याप्रमाणें ते स्टेशनवर गेले.

## हाय ! हाय ! ! इंजेक्शन ! ! !

पुण्याहून मुंबईला जाणारी गाडी स्टेशनवर पलीकडील प्लॅटफॉर्मला लागलेली असल्यामुळें राजेसाहेबांना आपल्या चिरंजिवांना गाडींत बसविण्यासाठीं जिना चढून व उतरून पलीकडील प्लॅटफॉर्मवर जावें लागलें. बाळराजांबरोबर रा. रामराव जामदार यांस नाशिकाला पाठविण्यांत आलें होतें. बाळराजे गाडींत बसून गाडी निघाल्यानंतर पुन्हां त्यांना जिना चढून व उतरून यावें लागलें. औषध घ्यावयाला सुरुवात केल्यापासून सातच दिवसांत राजेसाहेबांनीं रेलवेच्या मोठ्या जिन्याची चढ-उतर केली. त्या वेळीं त्यांना विशेष दम लागला नाहीं. तेव्हां त्यांना वाटलें कीं, जिन्याची दोन वेळ आपण चढउतर केली, पण ज्या अर्थी दम लागला नाहीं, त्या अर्थी श्री. आबासाहेब यांनीं सांगितल्याप्रमाणें आपणाला औषधाचा गुण आला ? औषधाला जोड ह्मणून आपण आतां कसरत सुरू केली पाहिजे; ह्मणून त्यांनीं त्या दिवशीं कसरत-सुरू केली. त्या दिवशीं फक्त पंचेवीस दंड काढले. दुसरे दिवशीं त्याचप्रमाणें पंचेवीस दंड काढले. दुसरे दिवशीं त्याचप्रमाणें पंचवीस दंड काढले. तिसरे दिवशीं ह्मणजे सोमवारीं नाशिकाहून बाळराजे व रामराव आले. त्यांना राजेसाहेबांनीं आपण कसरत सुरू केल्याचें सांगितलें. या सांगण्यांत हेतु एवढाच होता कीं, बाळराजे कसरत करण्याचा मधून मधून कंटाळा करीत. त्याचप्रमाणें त्यांच्याबरोबरीच्या मंडळीचेंही होत असे. सर्वांनीं वक्तशीर कसरत करावी, असें त्यांना वाटे. पण राजेसाहेबांनीं कसरत सोडली कीं, बाकीची मंडळी कसरत सोडीत. हें राजेसाहेबांना दिसून आल्या-मुळें आपण स्वतः लंगोटा बांधून कसरत सुरू केल्याशिवाय ही मंडळी सुरू करणार नाहींत, हें ते जाणून होते, ह्मणून बाळराजांनीं पुन्हां कसरत सुरू करावी, एवढाच त्यांचा हेतु होता. सोमवारीं राजेसाहेबांनीं पुन्हां पंचेवीस दंड काढले. त्या वेळीं त्यांना वाटलें कीं फक्त दंड काढून आपली कसरत कशी वाढणार ह्मणून त्यांनीं बैठकही मारण्याचा विचार केला. हाच त्यांचा विचार या वेळीं अविचाराचा ठरून त्यानेंच सर्वस्वीं घात केला!

आपण ठरविल्याप्रमाणें व विचार केल्याप्रमाणें जर सर्वच गोष्टी घडून आल्या असत्या, तर परमेश्वराचें अस्तित्वच कोणीं कबूल केलें नसतें. आपण ठरविल्याप्रमाणें गोष्टी घडत नाहींत, इतकेंच नव्हे, तर आपण ठरविलेल्या गोष्टीपेक्षां विपरीत अशा त्या घडतात, असें अनुभवाला येतें, ह्मणूनच दैव किंवा देव यांची लोकांना साक्ष पटते. आजपर्यंत राजेसाहेबांनीं जी गोष्ट केली, ती स्वतः पूर्ण विचार करून केलीं. आजपर्यंतच्या त्यांच्या सर्व गोष्टी विचाराच्याच ठरल्या; पण सर्वच वेळां सारख्या असत नाहींत व थोर माणसांचे सर्वच विचार सदासर्वदा सुविचारच असूं शकत नाहींत, हें सिद्ध करण्याकरतांच कीं काय, या वेळचा राजेसाहेबांचा विचार परमेश्वराचे मनांत अविचार ठरविण्याचें आलें.

राजेसाहेबांचे मनांत बैठक काढावी असें आल्यानंतर त्यांनीं हातीं धरण्याकरितां बंगल्याच्या कैचीला दोरी बांधावयाला सांगितलें. दोन बाजूंला मुठीचा आकार असून मध्यभागीं दोरी बांधण्याकरितां जागा असलेलें एक गोल दांडयाप्रमाणें लांकूड असतें; त्याला लाटणें असें ह्मणतात. त्याच्या दोन मुठी हातांत धरून बैठक काढण्याचा रिवाज आहे. तें लांकूड त्या दोरीला बांधून राजेसाहेबांनीं एक बैठक काढली. त्या वेळीं तें हातात धरण्याचें लांकूड प्रमाणापेक्षां थोडें वर गेलेलें दिसून आल्यामुळें त्यांनीं दोरी थोडी खालीं सोडून बांधावयाला लावलें. ती दोरी प्रमाणापेक्षां थोडी ज्यास्त खालीं आली. हें राजेसाहेबांच्या लक्षांत आलें नाहीं. त्यांनीं दुसरी बैठक जी मारली त्या वेळीं हातांना ताण बसून शरिराचा भार वाहण्याला हाताच्या जोराचा जो उपयोग व्हावयाचा, तो दोरी जास्त खालीं आल्यामुळें झाला नाहीं. व एकदम सर्व भार चवडे, पिंडऱ्या व मांडया यांवर पडला. त्यामुळें फऱ्यावर क्विनाईनचें इंजेक्शन देऊन जी जखम वाहत होती व जिला रोज दोन वेळ ड्रेसिंग सुरू होतें, त्या जखमेवर एकदम ताण पडून तींतील नाजूक झालेली एक शीर तुटली. त्या शिरेचा संबंध अगदीं नाजुक स्थानाशीं होता. ती शीर तुटल्यामुळें जखमेंतून सुमारें अर्धा पेला रक्त वाहून गेलें. हा प्रकार झाल्यानंतर सुमारें दोन तीन तासाचे आंत नाजुक स्थानाला एकदम भयंकर सूज चढली व त्यामुळें राजेसाहेबांना बेफाम ज्वर आला. त्यांत बडबडही सुरू झाली. डॉ. वैद्य यांचे उपचार सुरू झाले. त्यामुळें मंगळवार सकाळपर्यंत ज्वर कमी झाला व जवळच्या मंडळीची काळजी थोडी कमी झाली. ज्वर कमी झाल्यावर सूजही आपोआप कमी होऊन आराम पडेल, अशी मंडळींची

व राजेसाहेबांची कल्पना असल्यामुळें नाशकाला तार करून अगर मनुष्य पाठवून मंडळींना बोलावून घेण्याची त्या दिवशीं त्यांना जरूरी वाटली नाहीं. मंगळवारचा सर्व दिवस प्रकृतीचें स्वास्थ्य आहे अशा स्थितींतच गेला.

त्या वेळीं श्री. रानडे हे राजेसाहेबांचे जवळ नव्हते. त्यांनीं राजेसाहेबांना औषध सुरू केलें, त्यांची तेथें राहण्याची वगैरे सोय लाविली व ते बेळगांवीं त्यांच्या इमारतीचें काम चालू असल्यानें आठ दिवसांची परवानगी घेऊन बेळगांवीं आले. त्यांना हा झालेला प्रकार तावडतोब कळवून बोलावून घ्यावें, असें मंडळींच्या मनांत होतें, पण राजेसाहेब ह्मणाले,' ते उद्यां परवां येणारच आहेत. त्यांच्या मागें अनंत कामें आहेत त्यांना विनाकारण त्रास देऊं नका. आज माझी तब्येत कालच्यापेक्षां बरी आहे. " त्यामुळें मंगळवारीं कोणालाच तार वगैरे करण्यांत आली नाहीं. राजेसाहेबांना उठून चालतां मात्र येत नव्हतें. कारण सूज बिलकुल उतरली नव्हती. मंगळवारची रात्रही विशेष त्रासाची गेली नाहीं.

## युवराजांना गुप्तधनाची देणगी.

राजेसाहेबांची प्रकृति बिघडल्यापासून श्री. बाळराजे प्रतापसिंह मात्र त्यांचा बिछाना सोडून हालले नाहींत. निष्काळजीपणानें रोज त्यांना येणारी झोंप कोठें व कशी पळाली, तें ईश्वरालाच माहीत. अलीकडे एक दोन वर्षें बाळराजांना सोडून राजेसाहेब सहसा कोठें जात नसत. त्यांचेवर त्यांचें विशेष प्रेम असे. हे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव असल्यामुळें कुटुंबाचा भार त्यांनाच मुख्यत: वाहून न्यावयाचा आहे, अशा कल्पनेनें अलीकडे त्यांना शिक्षण ते देत असत. आपल्या स्वतःच्या तिजोरीच्या किल्ल्याही त्यांना स्वतःजवळ ठेवण्याची संवय लागावी, ह्मणून त्याही ते त्यांचेकडे मधून मधून कमरेच्या कटिबंधांत लावून ठेवण्याकरितां देत. राजेसाहेबांचा बाळराजांना नेहमीं उपदेश असे कीं, " जगांत आपणाला पैशानें दुसरी कोणतीही गोष्ट मिळूं शकेल, पण प्रामाणिक, विश्वासु, प्रसंगविशेषीं जिवाला जीव देणारी अशी कळकळीचीं माणसेंच तवढीं मिळूं शकत नाहींत. इस्टेटींतील नोकर लोकांपेक्षां आपल्या नेहमींच्या सहवासांत राहणारीं वाड्यांतील नोकर माणसेंच वेळोंवेळीं कसाला लावून व पारखून ठेवावा

लागतात. अशीं पारखून ठेवलेलीं माणसेंच दुर्मिळ असतात. आपलें सर्व जीवित त्यांचें स्वाधीन असतें. ह्मणून मीं लहानाची मोठीं केलेलीं व तावून सुलाखून जवळ केलेलीं माझीं माणसें तुह्मीं दूर करूं नयेत. रामराव, बंडोबा, व्यंकटराव पुणेकर हीं जरी शिक्षणांत विद्वान नसलीं, तरी मीं त्यांना लहानाचें मोठें केलें आहे. तुमच्याप्रमाणेंच त्यांचेवर प्रेम केलें आहे, तरी तुह्मी त्यांना अंतर देऊं नये. ते होऊन नोकरीवरून दूर झाले तर तुमचा इलाज नाहीं. पण तुह्मीं त्यांना दूर करूं नये. त्यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं आमचा जीव वांचविला आहे. त्याची फेड पैशानें होणार नाहीं. त्यांचें जीवित असेपर्यंत त्यांचेवर तुमचें पूर्ण छत्र असलें पाहिजे. तुमच्या मातोश्रींचा व तुमच्या भावंडाचा भार तुमच्यावरच आहे. तो तुह्मांला विसरतां येणार नाहीं. ही गोष्ट तुमच्या कर्तव्याची आहे. जुन्या आप्त मंडळींनाही तुह्मी दूर करूं नये. आपणाला एक भाकरी मिळाली, तर परिवाराचें पोषण झाल्यानंतरच राहील तें आपण खावें. त्यांतच घराण्याचा व तुमचा नांवलौकिक आहे. प्रेमानें सर्वांबरोबर वागावें; आणि प्रेमानेंच सर्वांना आपलेंसें करून घ्यावें.' अशा प्रकारचा उपदेश बाळराजांना ते नेहमीं करीत. ते ही आपल्या उपदेशाच्या बाहेर जाणार नाहींं, असें राजेसाहेबांना सांगत. बुधवारचा सर्व दिवस जवळ जवळ या उपदेशांत गेला. रामराव, व्यंकटराव यांनाही तोच उपदेश असे. 'माझी जशी नोकरी बजावली, तशीच बाळांचीही तुमचें जीवित असेपर्यंत बजावा, आणि बाळांना अंतर देऊं नका; बाळराजे केव्हांही तुह्मांला अंतर पडूं देणार नाहींत; तुमचेवर ते कोणताही प्रसंग येऊं देणार नाहींत, असा त्यांनाही उपदेश केला व विश्वास दिला. बुधवारींच बाळराजांच्या स्वाधीन आपल्या किल्ल्या दिल्या व तुह्मी वडील असल्यानें तुमचेंच सर्व आहे असें मानून वागा, ह्मणून त्यांनीं सांगितलें.

## मूर्तिमंत स्थितप्रज्ञ.

बुधवारीं जप वगैरे नित्य कृत्य त्यांचें नेहमीं प्रमाणेंच झालें. गप्पा गोष्टी हंसणें वगैरे नेहमीं प्रमाणेंच होतें. परंतु सूज ज्याअर्थी कमी झाली नव्हती, त्याअर्थी श्री. सौ. राणीसाहेबांना बोलावून घ्यावें. असें त्यांना वाटलें त्याप्रमाणें नाशिकला मनुष्य रवाना केला. श्री. रानडे यांची दुसरे दिवशींच्या मेलची वाट पाहून नंतर त्यांना तार देण्याचें ठरविलें.

बुधवार सायंकाळपर्यंत प्रकृति ठीक होती. रात्रीं ताप चढला. बाळराजे, रामराव व्यंकटराव हे आळीपाळीनें पहारा देतच होते.बुधवारीं रात्रीं बारा वाजतांना व्यंकटराव पुणेकर राजेसाहेबांजवळ बसले असतांना ते त्यांना ह्मणाले, ' उद्यां बारा वाजतां आह्मीं जाणार ! ह्मणून आह्मांला तुह्मीं स्पेशल मोटार करून नागपुरीं न्या. नागपूरच्या आमच्या प्रेमी लोकांचा जीव गुंतेल. ' त्यावर व्यंकटराव ह्मणाले, 'आपणाला थोडें बरें वाटलें ह्मणजे नागपुरीं जाऊं. ' राजेसाहेब ह्मणाले ' उद्यांच दुपारीं बारा वाजतां आमचें जावयाचें ठरलें आहे. बेळगांवाहून मास्तर ( श्री. रानडे ) आले का ? नाशिकची मंडळी आली का ? आमचा युब्बु ( लहान मुलगा श्री. विजयसिंह ) आला का ? ' यावर व्यंकटरावांनीं ' सकाळीं येतील, ' असें सांगितलें. या रात्रीं त्यांना बिलकुल झोंप लागली नाहीं. मुखानें श्रीरामाचा, श्रीपांडुरंगाचा जप मात्र सारखा चालू होता.

गुरुवारीं सकाळीं नाशीकहून श्री. सौ. राणीसाहेब मुलांबाळांसह पुण्यास आल्या. सर्वांच्या भेटी झाल्या. सर्वांबरोबर मोठ्या आनंदानें राजेसाहेब बोलले. श्री. रानडे न आल्यामुळें, ' पहिलेंच गार्डीनें निघा, राजेसाहेबांची प्रकृती बरी नाहीं, अशी त्यांना श्री. सौ. राणीसाहेबांची एक्सप्रेस तार बेळगांवीं गेली. राजेसाहेबांची प्रकृति बरी नसल्याचीही हकीकत पुण्यांतील त्यांच्या स्नेही मंडळींना समजली. श्री. न. चिं. केळकर, नामदार श्रीमंत सरदार श्रीजगन्नाथमहाराज, श्री. नारायण राव गुंजाळ, रावबहादूर चिमणलाल किसनदास वगैरे मित्र मंडळीं राजसाहेबांना भेटण्याकरितां त्यांचे बंगल्यावर गेलं. त्यांचे बरोबरही ते उत्तम बोलले. त्यांना राजेसाहेबांचा अंतकाळ जवळ आला आहे, याची मुळींच कल्पना आली नाहीं. रावबहादुर चिमण शेटजी वगैरे मंडळी गुरुवारीं अकरा वाजतां तेथून आपापल्या घरांकडे परतली.

## मरणीं जया जें आठवे । तो त्याचि गतीतें पावे ॥

नंतर त्यांना श्री. सौ. राणीसाहेब वगैरे सर्वांना जेवणखाण करून घेण्याला सांगितलें. बाळराजे मात्र राजेसाहेबांचे जवळच होते. सर्व मंडळी निघून गेल्यानंतर राजेसाहेब उठले. स्वतः जाऊन झाडा फिरून आले. हातपाय धुऊन व सर्वांग पाण्याच्या कपड्यानें स्वच्छ पुसावयाला लावून त्यांनीं धौतवस्त्र परिधान केलें. आंगा-

तील कुडतें बदलविलें व ते जप करण्याकरितां खुर्चीवर बसले. त्यांनीं माळ घेऊन जप केला. बुधवारीं त्यांचा थोडासा जप करण्याचा शिल्लक राहिला होता तो ही त्यांनीं पुरा केला. रामराव यांना आज तारखेपर्यंत सर्व जप पुरा झाला; लिहून ठेवा ह्मणून सांगितलें. अलीकडे सुमारें वीस वर्षें राजसाहेब रोज किती जप करीत असत, याची नोंद रामराव हे ठेवीत होते. नंतर जपाची माळ बाळराज यांच्या स्वाधीन केली; व आतां आपण पलंगावर झोंपत नाहीं. खालींच कांबळ्यावर झोंपावें असें मला वाटतें ह्मणून त्यांनीं खालीं कांबळें अंथरण्यास सांगीतलें; व ते त्यावर झोंपले. कांबळ्यावर झोपल्यानंतर यांच्या श्वासाची गती थोडी जलद होऊं लागली. मंडळींना वाटलें कीं आतांच त्यांना थोडे श्रम झाले आहेत, ह्मणून श्वास जोरांत चालू आहे. बोलणें मात्र अगदीं स्वच्छ होतें. कोणाचा मधून आवाज आला तर, ‘ मास्तर ’ आले का ह्मणून प्रश्न विचारीत. अशास्थितींत ते झोंपले असतां बाराला पांच मिनिटें कमी असतां त्यांनीं बाळराजांना विचारलें कीं, ‘किती वाजले’ त्यांनी बाराला पांच मिनिटें कमी आहेत, असें उत्तर दिलें. तेव्हां त्यांनीं बाळराजांना सांगितलें, कीं, ‘तुह्मीं स्वत: उठा, तुमचे हातानें माझा चांदीचा मोठा जांब घ्या. नळावर जाऊन पहिलें पाणी सोडून नंतर जांब भरून त्यांत हाताचें बोट न बुडवितां घेऊन या. ’ त्याप्रमाणें त्यांनीं पाणी आणलें. ‘ माझ्या तोंडांत धार धरा. ’ त्याप्रमाणें त्यांनीं तशी धार धरली. राजेसाहेब गटागटा जांब भरून असलेलें तें सर्व पाणी प्याले आतां समाधान वाटतें, असें त्यांनीं सांगितलें पुन्हां त्यांनीं विचारलें ‘ किती वाजले ’ ? बाळराजानीं सांगीतलें ‘ दादा, बारा वाजले, ’ तेव्हां ते ह्मणाले ‘ असें का ! तर मग सर्वांचेच बारा वाजले, ’ असें ह्मणून त्यांनीं आपणाला कुशीवर करण्याकरितां मंडळींना सांगितलें. रामराव, व्यंकटराव, बाळराजे त्यांना उताण्याचे कुशीवर करूं लागले, इतक्यांत, ‘ श्रीराम–जयराम–जयजयराम, पांडुरंग-विठामाई ’ असें ह्मणून त्यांनीं आपली इहलोकची यात्रा आटोपली !

बुधवारीं रात्रीं बारा वाजतां त्यांनीं सांगीतल्या प्रमाणें गुरुवारीं दुपारीं बारा वाजतां त्यांनीं आपला अवतारी देह या मृत्युलोकावर ठेऊन ते निजधामाच्या प्रवासाला जातांना सुद्धां ‘ श्रीरामा ’ च्या त्रयोदशाक्षरी मंत्राला ते विसंबले नाहींत. पंढरीच्या पांडुरंगावर त्यांची अढळ भक्ति. त्याचें ही नामस्मरण करून शेवटीं त्याच नामरूपीं ब्रह्मानंदांत ते समरस झाले. मनुष्यानें जन्माला येऊन जें

अखेरच्या सिद्धीच्या वेळीं साधावयाचें असतें तें हेंच. त्यांनीं आजन्मपर्यंत श्रीरामनामाचा जप केला, तोच त्यांना अखेरीला मार्गदर्शक झाला. मरणाचे वेळीं श्रीरामाचें नांव यावें, एवढ्याचकरितां आजन्म रामाचें नांव घ्यावें लागत असतें. साधुसंत एवढ्याचकरितां तपश्चर्या करीत असतात. राजेसाहेबांनीं अशाप्रमाणें आपला उद्धार करून देहाचें सार्थक करून घेतलें. लोककल्याणाकरितां झटणाऱ्या खऱ्या लोकोत्तर पुरुषांना अखेरची आनंदमय सिद्धि ही अशीच प्राप्त होत असते.

## मृत्यु न ह्मणे हा धर्मवीर !

राजेसाहेब आपली इहलोकावरील सर्व काळजी, मायाजाल, प्रेमपाश सर्व सोडून ब्रह्मानंदांत मग्न झाले, हें त्यांच्या व्यक्तीपुरतें त्यांचें साध्य त्यांना लाभलें; पण त्यांच्यामागें त्यांच्या सात अज्ञान अर्भकांवर आणि श्री. राणीसाहेबांवर प्रत्यक्ष जें दुःखाचे पर्वत कोसळले, ते वर्णन करण्याची शक्ति या लेखणींत नाहीं! त्याची कल्पना तशा प्रकारच्या दुःखित हृदयांनाच बरोबर येईल,

तारीख ९ माहे जून सन १९३२ इ. रोज गुरुवार ज्येष्ठ शुद्ध ५ शके १८५४ रोजीं दुपारीं १२ वाजतां श्रीमंत धर्मवीर धर्मविभूषण परंजय राजे लक्ष्मणराव भोंसले यांची अवतारसमाप्ति होणार, याची नागपुरास कोणालाच कांहीं कल्पना नव्हती. परंतु त्या दिवशीं नागपुरीं राजेसाहेबांचे वाड्यावर एक अपशकून झाला. रा. नानासाहेब शिर्के हवेलीकामदार यांना त्याच दिवशीं सकाळीं राजवाड्यावरील ध्वजा अकस्मात मोडून पडलेली दिसली अपशकून कां ? याची कोणालाच कांहीं कल्पना आली नव्हती. राजेसाहेबांची प्रकृति सुधारत आहे.असें पत्र चार दिवसांपूर्वीच नागपुरीं गेलें होतें. त्यामुळें तेथील मंडळीला धीर वाटत होती. परंतु या अपशकुनानें कोणतें संकट कोसळणार आहे, या काळजींत नागपुरची मंडळी पडली होती. तोंच दुपारीं चार वाजतां राजेसाहेबांची दुःखद वार्ता तारेनें तेथें जाऊन पोहोंचली. शकुनापेक्षां अपशकुनाच ठोकताळे हटकून येतात.

सुमारें अर्ध्या तासांत राजेसाहेबांच्या मृत्यूची दुःखद वार्ता पुण्याच्या कोनाकोपऱ्याला जाऊन पोहोंचली. हां हां ह्मणतां त्यांचे हजारों प्रेमी लोक बंगल्यावर येऊन गोळा झाले. श्री. नरसोपंत केळकर, श्रीमंत सरदार जगन्नाथमहाराज, श्री. नारायणराव गुंजाळ, रावबहादूर चिमणशेटजी वगैरे पुण्याचे पुढारी तेथें येऊन हजर

30

झाले. राजेसाहेबांसारख्या हिंदुसमाजाच्या पुढारी विभूतीच्या अंत्यविधीचा मान पुण्यालाच मिळावा, असें पुण्याच्या सर्व प्रतिष्ठित मंडळींना वाटत होतें. राजेसाहेबांच्या आप्त मंडळींच्या मनांत त्यांचा अंत्यविधि नाशिकला व्हावा; असें होतें. याचें कारण राजेसाहेबांच्या मातोश्री श्री० राणी काशीबाईसाहेब यांनीं आपला देह नाशिकलाच ठेवला. त्यांचा अंत्यविधि तेथेंच झाला. राजेसाहेब नितांत मातृभक्त असल्यामुळें त्यांनीं मोठ्या थाटानें आपल्या मातोश्रींच्या छत्रींची कोनशीला श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ० कुर्तकोटी ) यांचे हस्तें बसवून त्या सुंदर छत्रीचें काम त्यांनींच पुरें केलें. तेव्हां मरणानंतरही मातापुत्रांना वियोग न व्हावा ह्मणून नाशिकलाच अंत्यविधि व्हावा, असें राजेसाहेबांच्या आप्तमंडळीला वाटत होतें. या भावनाप्रधान हेतूपुढें पुण्याच्या लोकांना कांहींच बोलतां येईना. त्यांनीं राजेसाहेबांचे शवाला नाशिकला नेण्याची समाधानानें परवानगी दिली. कांहीं मंडळींचे मनांत राजेसाहेबांचें शव नागपुरीं न्यावें, असें होतें. परंतु शव नेण्याच्या बाबतींत रेल्वेचे कांहीं विशिष्ट निर्बंध असल्यामुळें व ते दूरच्या प्रवासामुळें ताबडतोब अंमलांत येण्यासारखी परिस्थिति नसल्यामुळें तो विचार रद्दच करावा लागला. नंतर मोटारींतून नाशिकला शव नेण्याकरितां कलेक्टरची परवानगी लागते, ती श्री. केळकर श्रीमंत जगन्नाथमहाराज, व रावबहादूर चिमणशेटजी यांनीं खटपट करून ताबडतोब आणून दिली.

याच वेळीं नागपूरकर भोंसला इस्टेटीचे एके काळीं म्यानेजर असलेले ऑनरेबल सर दादाभाई, हे तेथें आपल्या पत्नीसह अकल्पित आले. नागपूरच्या भोंसले घराण्याबद्दल त्यांच्या मनांत विशेष आदर होता. राजेसाहेबांवर त्यांचा फारच लोभ असे. राजेसाहेबांच्या या अकल्पित मृत्युबद्दल त्यांना व त्यांच्या पत्नीला फारच दुःख झालें. परंतु त्यांनीं राजेसाहेबांच्या मुलांकडे पाहून आपला दुःखा वेग आंवरला आणि मुलांना व श्री. राणीसाहेबांना त्या उभयतांनीं मोठा धीर दिला. बाळराजे श्री. प्रतापसिंह यांनाही धीर येण्यासारख्या चार गोष्टी सांगून त्यांचें सांत्वन करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. परंतु ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष प्रेमळ पिता अज्ञान अर्भकांना निष्ठूरपणानें कायमचा अंतर देऊन जातो, त्या ठिकाणीं दुसऱ्यांच्या सांत्वनांचा त्यांच्या मनावर त्या वेळीं तरी कितीसा परिणाम होणें शक्य होतें !

सायंकाळीं पांच वाजतां राजेसाहेबांच्या खास बसण्याच्या मोटारींत त्यांच्या निर्जीव देहाला पुणें येथें अखेरचें बसविण्यांत आलें. बालपणापासून राजेसाहेबांची भक्तिभावानें सेवा करून कृतार्थ झालेले रामराव जामदार, व्यंकटराव पुणेकर, गणपतराव मोहिते मानकरी हे आपल्या कर्तव्यसागतेची अखेरची त्यांची सेवा करण्याकरितां त्यांच्या मोटारींत बसले. रा. बाजीराव चव्हाण ड्रायव्हर यांनीं आजपर्यंत राजेसाहेबांची इमानेंइतबारें जशी नोकरी केली, तशीच ही शेवटची नोकरी बजावण्याकरितां तेही जड अंतःकरणानें मोटारींत बसले व त्यांनीं पुण्याहून नाशिककडे ती हांकली. या मोटारीच्यामागें बाकीच्या सर्व मंडळींच्या मोटार-लॉरी निघाल्या. या मंडळींबरोबर श्री. नारायणराव गुंजाळ हेही पुण्याहून नाशिकला गेले.

या मंडळींना पुण्याहून नाशिकपर्यंत सव्वाशें दीडशें मैलांचा रस्ता कांटावयाचा होता. तोही डोंगर कडयांमधून, जंगलांतून आणि कित्येक ठिकाणीं खांचखळग्यांतून असा होता. राजेसाहेबांच्या मृत्यूमुळें मोटारींतील प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत दुःखांधःकार पसरलाच होता; त्याचें परिवर्तन रात्रीं दहाबाजण्याचे सुमारास चंद्रमा अस्ताला गेल्यानंतर बाह्यसृष्टींत झालें! पहाडी-जंगली रस्त्यावरील काळ्याकुट्ट अंतःक-रानें बाह्यसृष्टीला आलेली भीषणता आणि राजेसाहेबांच्या शोचनीय मृत्यूविषयक दुःखद विचारांनीं अंतःसृष्टींत माजलेलीं भीषण रणें या भयंकर दोन स्थितींच्या कात-रींतून मार्ग काढीत काढीत ही मंडळी नाशिकला रात्रीं तीन वाजण्याचे सुमारास बंगल्यावर येऊन पोंचली.

शुक्रवारीं सकाळीं नागपुराहून श्रीमंत फत्तेसिंगराव भोंसले, श्री. तात्यासाहेब गुजर, श्री. येशवंतराव गुजर, अहिलोजीराव अहेरराव, श्री येशवंतराव मोहिते वैद्य, रा० दादबा पालकर इन्स्पेक्टर, श्री. बेदरकर म्यानेजर, वगैरे मंडळी नाशिकला आली. राजेसाहेबांची दुःखद वार्ता सर्व नाशिक शहरभर पसरलीच होती. नाशि-कचे राजेसाहेबांचे स्नेही शेठ फत्तेचंद, भंडाऱ्याचे श्रीमंत गणपतराव ऊर्फ भय्यासाहेब पांडे आणि नाशिकचे सुप्रसिद्ध व्यापारी माधवराव वाघ यांनीं खटपट करून येशवंत-राव महाराजांचे समाधीजवळ श्री. राणी काशीबाईसाहेब यांचे छत्रीशेजारीं राजे-साहेबांच्या शवाला अंत्यविधि देण्याकरितां तेथील कलेक्टरची परवानगी मिळविली.

शुक्रवारीं सकाळीं दहा वाजतां स्मशानयात्रेला सुरवात झाली. हत्ती घोडे वगैरे सर्व राजचिन्हें या यात्रेबरोबर होतीं. सरकारी अंमलदार बरोबर असून पोलिसचा बंदोबस्त कडेकोट होता. नाशिकचे हजारों नागरीक राजेसाहेबांच्या अखेरच्या दर्शनाकरितां या यात्रेबरोबर होते. बारा वाजण्याचे सुमारास ही प्रेतयात्रा येशवंतराव महाराजांचे पटांगणावर आली. तेथें साधुवर्य येशवंतराव महाराजांनीं व परमपूज्य मातोश्री राणी काशीबाईनीं पावन केलेल्या स्थानीं राजेसाहेबांच्या शवाला विद्वान ब्राह्मणांकडून वेदमंत्रपूर्वक बालराजे श्री. प्रतापसिंह यांचकरवीं वेदोक्त अग्निसंस्कार यथाविधि देण्यांत आला. त्या वेळीं बंदुकांची लष्करी सलामी त्यांच्या सन्मानार्थ देण्यांत आली. नंतर तेथें जमलेल्या हजारों लोकांच्या समुदायांत उभें राहून श्री. नारायणराव गुंजाळ, एल. एम. ए. यांनीं राजेसाहेबांच्या लोककल्याणाच्या कामगिरीचें निदर्शक आणि त्यांच्या गुणवर्णनात्मक असें भाषण केलें. या भाषणांत त्यांनीं शेवटीं असें सांगितलें कीं, ' ज्या थोर आणि तेजस्वी बाण्याच्या राणी काशीबाई मातोश्रींच्या अंकावर राजेसाहेब बालपणीं पहुडले, ज्या मातोश्रींच्या शिक्षणाखालीं वाढले, ज्यांच्या प्रेमछत्राखालीं वागडले, ज्यांच्या प्रेमाशीर्वादानें आणीबाणीच्या प्रसंगांतून यशस्वी तऱ्हेनें पार पडले, त्या भाग्यशील मातेच्या प्रेमाच्या अंकावर आपलें मस्तक सदैव ठेवून महानिद्रा घेण्याकरितां या श्रीरामचंद्राच्या पुण्यक्षेत्रीं श्रीयेशवंतराव महाराजांच्या संतसमागमामध्यें राजेसाहेब ब्रह्मस्वरूपांत एकरूप झाले. पण त्यांनीं आपल्या नितांत मातृभक्तीची खूण मात्र अशा प्रकारानें आमच्या अंतःकरणावर कायमची कोरून ठेविली ! '

राजेसाहेबांची उत्तरक्रिया बालराजांनीं नाशिक येथेंच क्षत्रिय राजघराण्याला योग्य अशी यथासांग वेदोक्त पद्धतीनें केली. राजेसाहेबांची प्रेमी आणि आप्त वर्गांतील दूरदूरच्या ठिकाणची मंडळी या दिवसांकरितां नाशिकला आली होती. बालराजांचें वय लहान, तरी कोणत्याही त्रासाकडे बिलकूल लक्ष न देतां सर्व बाजूंनीं यथासांग अशी त्यांनीं ही उत्तरक्रिया केली. धर्माचरणानें वागणाऱ्या लोकांचा ईश्वर सदैव पाठिराखा असतो !

## मरावें परी कीर्तिरूपें उरावें.

राजेसाहेबांच्या मृत्यूबद्दल ठिकठिकाणच्या थोर गृहस्थांकडून दुखवट्याचे अनेक संदेश, निरनिराळ्या संस्थांकडून दुखवट्याचे ठराव, बऱ्याच सार्वजनिक लोकां-

कडून व आप्तस्वकीय व्यक्तींकडून पत्रें व तारा आल्या, त्यांपैकीं येथें कांहींचा नामनिर्देश करीत आहों.

## दुखवट्याचे संदेश (तारा).

१ श्रीमंत महाराजे सयाजीराव महाराज गायकवाड-पॅरीस. २ श्रीमंत महाराजे शिंदे सरकार–उज्जनी. ३ नामदार गव्हरनर साहेब-नागपूर. ४ श्रीमंत राजे तुकोजीराव पवार–देवास. ५ श्रीमंत राजेसाहेब चिंतामणराव आप्पासाहेब–सांगली. ६ श्रीमंत सरदार फाळके-ग्वाल्हेर. ७ श्रीमंत राजे बहाद्दूर रघोजीराव–उम्रानाला. ८ श्रीमंत सेनापति दाभाडेसाहेब-पुणें. ९ श्री. शंकररावसाहेब गायकवाड-बडोदें. १० श्री. दादासाहेब घोरपडे–वेडग. ११ दिवाण बहाद्दूर बापूसाहेब चिटणीस–धार. १२ श्रीमंत जतकर राजेसाहेब-जत. १३ श्रीमंत प्रतापसिंह राजे-तंजावर. १४ श्रीमंत राजाराम राजे–तंजावर. १५ श्रीमंत बाईसाहेब महाराज–सातारा. १६ श्रीमंत पद्माबाईसाहेब सुर्वे–सातारा. १७ गोस्वामी महेशपुरीजी–नागपूर. १८ अध्यक्ष सुवर्णकार बोर्डिंग-जळगांव. १९ सेक्रेटरी नॅशनल लायब्ररी, महाल–नागपूर. २० श्री. हरीरुद्र इंगळे-तंजावर. वगैरे वगैरे.

## दुखवट्याचे ठराव.

ठिकठिकाणच्या निरनिराळ्या सभा, संस्था आणि मंडळें यांजकडून दुखवट्याचे ठराव आले. त्यांपैकीं कांहींचा येथें केवळ नामनिर्देश करीत आहोंत. १ कौन्सिल ऑफ स्टेट–सिमला, २ डिस्ट्रिक्ट कौन्सिल–नागपूर, ३ दी ऑल इंडिया रिझर्व रायफल्स–नागपूर, ४ महाराजा बाग क्लब–नागपूर, ५ डिस्ट्रिक्ट कौन्सिल स्कूलबोर्ड-नागपूर, ६ न्यू इंग्लिश हायस्कूल-नागपूर, ७ हिंदुसभा–नाशिक, ८ श्रीश्रद्धानंद अनाथालय–नागपूर, ९ नागरिकांची सभा–वाशीम, १० इंग्लिश शिक्षण संस्था–भिवापूर, ११ भिडे कन्या शाळा गणेशोत्सव-नागपूर, १२ भोंसला देवस्थान कामिटी–नागपूर, १३ मराठा विद्याप्रसारक समाज–नागपूर, १४ श्रीमीरन महाराज संस्थान–देवळी, १५ लोकलबोर्ड–उमरेड, १६ मराठा संघ-जबलपूर, १७ मराठा शिक्षण परिषदेचें २२ वें अधिवेशन–मलकापूर वगैरे वगैरे संस्थांकडून दुखवट्याचे ठराव आले. या संस्थांशीं राजेसाहेबांचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, लाईफ मेंबर, अगर आश्रयदाते यांपैकीं कोणतांना कोणता तरी संबंध होताच. याशिवाय

बृहन्महाराष्ट्रांत बहुतेक मोठमोठ्या ठिकाणीं सार्वजनिक सभा भरून दुखवट्याचे ठराव पास करून त्यांचेबद्दल जनतेमध्यें वास करीत असलेला आदर, प्रेम, अभिमान आणि कळकळ हीं प्रदर्शित केलीं गेलीं

## दुखवट्याचीं पत्रें.

१ सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी आणि सेवासदन - पुणें या दोन संस्था-तर्फे सर्व्हंट्स ऑफ सोसायटीचे अध्यक्ष दे. भ. जी. के. देवधर यांचें पत्र २ महाराष्ट्र मंडळ - लाहोर या संस्थेचे उत्साही सेक्रेटरी श्रीयुत ए. आर. ताह्मणे यांचें पत्र. त्याचप्रमाणें ३ सी. पी. कायदेमंडळाचे अध्यक्ष व्ही. ए. रिझनी - पचमढी. ४ वऱ्हाडच्या इतिहासाचे कर्ते श्री. यादवराव काळे बुळढाणा. ५ बॅरिस्टर गोविंद काशीनाथ गाडगीळ - पुणें. ६ नागपूरचे माजी गव्हर्नर ना. तांबे यांच्या पत्नि श्री. सौ. रमाबाईसाहेब तांबे - नागपूर. ७ क्षत्रिय घराण्याचा इतिहासकर्ते श्री. सीताराम रघुनाथ तारकुंडे - पुणें. ८ महाराष्ट्र नाट्य मंदिराचे चिटणीस श्री. दत्तात्रेय शिवराम खारकर – नाशीक. ९ श्री. सर एम्. व्ही. जोशी-सांगली. १० श्री. रघुनाथ मार्तंड राजदेरकर वकील - मेहेरकर वगैरे वगैरे अनंत इसमांकडून दुखवट्याचीं पत्रें आलीं.

## वर्तमानपत्रांतील मृत्यु–लेख.

आमच्या चरित्रनायकांच्याविषयीं मृत्यूलेख, केसरी, महाराष्ट्र, लोकसत्ता, परीक्षक, हितवाद, जनता, राष्ट्रवीर, उदय, ज्ञानप्रकाश, नवाकाळ, टाईम्स ऑफ इंडिया, क्रॉनिकल, मराठा वगैरे वगैरे बृहन्महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व पत्रांतून आणि चित्रमय जगत् वगैरे मासिकांतून आले आहेत. त्या त्या पत्रकारांनीं व मासिककारांनीं आप-आपल्या विचारसरणीप्रमाणें त्यांचें गुणवर्णन केलें आहे. परंतु उमरावतीच्या 'उदय' पत्रकारानें राजेसाहेबांचा जो मृत्युलेख लिहिला आहे, त्या लेखांत वरील बहुतेक पत्रकारांच्या लेखांचा आशय आहे, अशी आमची समजूत झाल्यानें त्या एकच मृत्यु-लेखाचा उतारा आमच्या वाचकांकरितां आम्हीं परिशिष्टांत मुद्दाम दिला आहे.



# उपसंहार.

येथपर्यंत आमच्या चरित्र—नायकाच्या कामगिरीचें यथामति आम्हीं वर्णन केलें. त्यांच्याबद्दल लहान-थोर, गरीब-श्रीमंत, सुशिक्षित अशिक्षित, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, जहाल-मवाळ, राजपक्ष-लोकपक्ष, स्पृश्य-अस्पृश्य, हिंदु-मुसलमान वगैरे वगैरे कोणत्याच पक्षाचा अनादर नव्हता. त्यांचा सहवास सर्वांनाच प्रिय वाटे. वाणी त्यांची रसवंती असल्या-मुळें त्यांच्या भाषणाशीं समरस होण्याची प्रत्येकाला आवड उत्पन्न होई. त्यांच्या वाणींतून कोणाला लागण्यासारखें कधींच शब्द बाहेर पडत नसत. स्वभावतःच त्यांचे ठिकाणीं नितांत गांभीर्य असल्यामुळें अविचाराचीं कोणतींच कामें त्यांचे हातून घडलीं नाहींत. समाजांत ते जितक्या समतेनें व खुल्या दिलानें वागत, तितकेंच ते आपल्या नोकरांबरोबरही वागत. त्यांचा स्वभाव फार उदार असे. दुसऱ्याचें दुःख पाहून त्यांचें अंतःकरण कळवळे. कोणा गरिबाच्या घरीं लग्नकार्य असेल तर त्याला ते द्रव्यद्वारां मदत करीत. कोणाच्या प्रेत—संस्काराला पैसे नाहींत असें त्यांना समजलें, तर ते तावडतोब पैसे काढून देत. गरिबांना औषधापाण्याची जरूरी असलेली त्यांना समजली, तर ते त्यांच्या औषधाची स्वतःच्या खर्चानें व्यवस्था करीत. कोणाला चष्मा, कोणाला शाळेची किंवा कॉलेजची फी, कोणाला अन्न कोणाला वस्त्र वगैरे प्रकारच्या गरिबांना ज्या अडचणी उत्पन्न होतात, त्या त्यांचे कानावर आल्याबरोबर ते दूर करीत. सच्छील ब्राह्मणांचे ठिकाणीं त्यांची मोठी श्रद्धा होती. ते पंढरीच्या पांडुरंगाचे व नाशिकच्या श्रीरामाचे परमश्रेष्ठ भक्त होते. धार्मिक कृत्यें आचरण्यांत त्यांना मोठा आनंद होई. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी वगैरे लोकसेवेला वाहून घेतलेल्या थोर विभूतींबद्दल त्यांना अतिशय अभिमान वाटे. त्यांना इतिहास-संशोधनाची मोठी आवड होती. राजेसाहेबांना गायनवादनाचा मोठा नाद होता. त्यांनीं एक भजनी-मंडळ काढलें होतें. प्रसंग विशेषीं त्यांचीं ठिकठिकाणीं भजनें होत. ते दर वर्षी सोनेगांवचे उत्सवाकरितां जात. त्यांचे मोक्षगुरु श्रीसद्गुरु नानाजी महाराज हे सोनेगांवींच रहात असत. तेथें कार्तिक महिन्याचे उत्सवांत राजेसाहेबांचें भजन होत असे. उत्सवाचे रथाबरोबर ते पायीं जात. त्यांना हत्ती, घोडे, उंट, गाई,

बैल, वगैरे जनावरांचा मोठा शोक होता. हरिहर छतरच्या मेळ्यांतून त्यांनीं एक हत्ती आपल्या पसंतीप्रमाणें आणला होता. लाहोराहून रोज वीस शेर दूध देणाऱ्या आठ गाई त्यांनीं नागपुरीं आणल्या होता. पतंग खेळण्याचाही शोक त्यांनीं बराच केला. कोंबंड, तितर, एडके, हेले यांच्या चुरशीच्या लढायांतही ते भाग घेत असत. जनावरांच्या औधापाण्याचीही राजेसाहेबांना उत्तम माहिती होती. एकाद्या जनावराला कांहीं खोड असली, तर ते त्याचाही इलाज करीत. राजेसाहेब घोड्यावर बसण्यांत पटाईत होते. चार घोड्यांची चौकडीही ते फार उत्तम प्रकारें हांकीत. एकादे प्रसंगीं हत्ती मस्तीला येऊन सुटून पळून गेला, तर ते स्वतः जाऊन त्याला युक्तीनें पकडून आणीत. हत्तीची मस्ती थंड होण्याचीं औषधें त्यांना माहीत होतीं. पोलो, क्रिकेट, हॉकी, आट्यापाट्या, विटी–दांडू, खोखो, वगैरे कोणत्याही प्रकारच्या खेळांत ते निष्णात होते. कोणत्याही उत्सवाच्या प्रसंगाला ते नेहमींच उत्साही असत. त्यांनीं काशी, रामेश्वर, गया, प्रयाग, अयोध्या, हरिद्वार मथुरा–वृंदावन, जगन्नाथपुरी, गोकर्ण वगैरे वगैरे सर्व यात्रा केल्या. पंढरीची यात्रा तर दरवर्षी होत असे. नाशीक–त्रिंबकेश्वरही दरवर्षी होत असे. ते जसे नितांत मातृभक्त होते, तसेंच ते भरताप्रमाणें बंधुभक्तही होते. राजेबहादूर रघोजी महाराज हें त्यांचे बंधुदैवत. राजेसाहेबांची साधी रहाणी व थोर विचारसरणी असल्यामुळें ते या प्रपंच–पसाऱ्यांत असूनही नसल्याप्रमाणें होते. ह्मणूनच शेवटीं त्यांना समाजांत श्रेष्ठपद प्राप्त झालें.

प्रपंचीं जन्माला जगरुढिपरी सज्जन जसे ।
स्वभावें ते येती लघुगुरु क्रमें वाढति तसे ॥
अलिप्ती संसारीं अविरत तयांची परि असे ।
विलोकीं, लोकांच्या वसति शिरिं कां ते कमलसे ॥ १ ॥


—' चरित्रकार '

—: समाप्त. :—

**श्रीमंत धर्मवीर राजे लक्ष्मणराव भोंसले यांना**

श्रीयुत क्षीरे शास्त्री यांनीं अर्पण केलेला

काव्यालंकार.




# सूचना.

या नामपुष्पांत मोठीं ( लाल शाईनें ) जितकीं अक्षरें लिहिलेलीं आहेत, तितकीं वाचून पाहिलीं असतां अक्षर-रचनेंत लिहिल्याप्रमाणें यांत नामाचा समावेश केला आहे. हें वाचकांस कळोन येईल.

# बद्ध काव्यहार.

श्रीधीसद्गुण-मंडित पंडित-भूषण नरा धराधीशा ॥
जे युष्मदाख्य साधन गातों हे नमुनि सांब जगदीशा ॥१॥

श्रीमंत भूपवर लक्ष्मणराव राजे ।
श्री भोजराजसम नागपुरा विराजे ॥
हे धर्मनीति गुणमंडित कीर्तिमंत ।
हे पाहतांनुभव ये सकळां खचीत ॥२॥
मंजूल शांतकिरण द्विजराज जैसा ।
मंदस्मितानन जगीं नृपराज तैसा ॥
बन्धूपितासम नरा करुणावतारा ।
बन्दी न दर्शनिं सदा लघु आणि थोरा ॥३॥

श्रीफल प्रदोक्त लक्ष्मणाख्य काव्य सूक्ष्मसे ।
मंडणप्रदायक स्मरा प्रमोद दे तसे ॥
तत्र वर्णुनी नृपा प्रभो समान कीं क्षिती ।
राशि रेणुकांश लेखिली जि शास्त्रि तीं ॥४॥
जे मधु क्षितींतले नरा कसे कळे न ते ।
साच कल्मषा हरोनि श्रीसुख प्रपूर ते ॥
हे सुपुत्रवंत शान्त दान्त नामपुष्प की ।
बद्ध काव्यहार अर्पिजे करा स्विकार कीं ॥५॥

## प्रस्तावना.

निष्कार्य स्वकृतालपशाच कृतिला सुज्ञाग्रि संस्थापणें ।
हीं तो अल्पकुबुद्धि साच अणितें संभाविताला उणे ॥
मातें बोधियलें स्वकाव्य रचण्या युष्मत्स्तुतीचे नये ।
वैदर्भी अमरावतिस्थ सुजनें तैं हीं कृती संभवें ॥१॥
ज्ञाता सद्गुणि गर्वहीन सुमती वक्ता गिरा प्रेमळ ।
अंगीं भूतदया उदार नृपती ऐसा जगीं दुर्मिळ ॥
येतां योगचि हा अपूर्व जुळुनी मी का न अल्पागुणी ।
अर्चोनि प्रभुतें सुसाजरि करूं संक्रांतिची पर्वणी ॥२॥
हें नामपुष्प रचिलें नृप आव्हयाचे ।
अत्यल्पसे तरिहि दर्शक सद्गुणाचे ॥
दोषा त्यजोनिच गुणाप्रति स्वीकरावे ।
भूपाश्रयें कवि कृतार्थ सदा करावे ॥३॥

## उपसंहार.

झाले यांस किती परिश्रमचि ते सुज्ञा न संबोधणें ।
होती ज्ञात निरीक्षणेच सहजीं त्या थोर विद्याजेनें ॥
हा माझा नव अल्प यत्न कवनीं या नामपुष्पाचिया ।
सेवावे मकरंद कल्पुनि गुणां-शाते करोनी दया ॥१॥
येती सुंदरशी प्रफुल्ल कुसुमे नाना तरूंसी जयीं ।
वाटे सौरभ रंग रूप बघुनी आनंद चित्ता तयीं ॥
जाई सुंदरता समूळ पुढती सौगंध त्यातें नुरे ।
याचें कारण नाशवंत कथितो युष्मत्पदाते क्षिरे ॥२॥
हें नामपुष्प अविनाशि असे नृपेशा ।
देई सदा गुणिजनां-तरि फार तोषा ॥
म्लानत्व घे मच सुवासहि जाय याचा ।
हा तो प्रभावचि असे तव आश्रयाचा ॥३॥

## अक्षर-रचना.

या नामपुष्पांतील पहिल्या व शेवटच्या वर्तुळांत श्रीमंत राजसाहेब हीं अक्षरें उलट सुलट साधलीं असोन मध्यवर्तुळांत श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोंसले महाराज हीं अक्षरें साधिली आहत व तिरकस कमानींतून कर्त्यानें आपली नामाक्षरें साधिलीं आहेत.

पुष्पकर्ता,
लक्ष्मणदेव श्रीकृष्ण क्षीरे, धर्माधिकारी.

कर्नाटक फोटो झिंको प्रेस बेळगांव.

आ.व्या.
२२.
दा० क्र १८३२

# परिशिष्ट १ लें.

# तारा तुटला तरी तेज आहे !

(उदय ता. २१ जून १९३२ इ.)

आकाशांत अनेकविध तारे दिसतात ते तुटतात व लोपतात. तुटण्याबरोबर त्यांचें तेजहि लयाला जातें. सूर्य हाहि एक तेजःपुंज तारा आहे. तो दररोज अस्ताला जातो व दररोज पुनः उगवतो. सूर्य अस्ताला गेला ह्मणजे त्याचें तेज लोपतें हें आपणांस कळतें व दिसतेंहि. पण त्याजबरोबर तो पुनः उगवणार, हीहि मनुष्यास पूर्ण खात्री असते, ह्मणून मनुष्य रात्रीचा काळहि आनंदांत व सुखांत घालवितो. सूर्य अस्ताला गेल्यावर तो उगवणार, नाहीं, अशी जर जीवमात्राची खात्री असती, तर घोर अंधः-कार पाहून त्यास जीव सोडण्याचा प्रसंग आला असता. अस्ताला गेलेला तेजोनारा-यण हा उगवणार आहे व रात्र संपणारी आहे, ही जाणीव जीवमात्रास असते, ह्मणूनच ते आपल्या आयुष्यांत अनेक रात्रींसुद्धां दिवसांबरोबर पाहतात व त्यांतच सुखाचा शोध लावतात.

थोर पुरुष असेच सूर्याप्रमाणें तेजःपुंज असतात. ह्मणूनच सूर्य अस्ताला गेला, तरी तो जसा पुनः रजनीच्या पोटांतून दुसरे दिवशीं बाहेर पडतो, त्याचप्रमाणें थोर पुरुषहि दिवंगत झाले, तरी ते आपल्या आंगच्या अलौकिक गुणांनीं व कीर्तीनें पुनः तेजःपुंज होतांना दिसतात. तसें नसतें तर सृष्टीचा क्रम हा सैतानप्रणीतच सदासर्वदा राहिला असता. सृष्टींतून थोर पुरुषांचे गुण व कीर्ति त्यांच्या नाशवंत शरीराबरोबर नष्ट होत नाहीं, ह्मणूनच सैतान जातात व देव येतात; आणि देव गेले व सैतान आले, तरी पुनः सैतान जाईल व देव येईल, ह्या आशेवर सज्जन दबा धरून जगतात. याकरितांच थोर व कीर्तिमान् पुरुषांस सूर्यनारायणाचीच मानवी जीवितांत उपमा शोभते.

खुद्द नागपुरांत, मध्यप्रांत-वऱ्हाडांत इंग्रजी राजवटीला सुरुवात झाल्यापासून अनेक कीर्तिमान् उदार, धर्मशील, बहुश्रुत व विद्वान् पुरुष होऊन गेले व अजून आहेत. परंतु धर्मवीर राजे लक्ष्मणराव भोंसले ह्या दिवंगत थोर पुरुषाची थोरवी ह्या

सर्वांपेक्षां निराळी आहे. इंग्रजी राजवटीला सुरुवात होत असतां राजे लक्ष्मणराव ह्यांच्या राजकुळाचे आश्रित गणलेले लोकहि राजकुळास प्रसंगीं बेइमान होऊन वैभवसंपन्न झाले असतील, व त्या वैभवाच्या डोल्हाऱ्यावर कित्येकांना कांहीं प्रमाणांत सत्कीर्तीचा लाभहि झाला असेल. शिवाय, कित्येक ह्या राजकुळाशीं कोणताहि संबंध नसलेले पण इंग्रजी अंमलांत विद्याधन संपादन करून स्वतःच्या मनगटाच्या जोरावर ज्यांनीं कीर्ति संपादन केली, अशा वर्गांतील अनेक थोर पुरुष या प्रांतांत झाले व आहेत. राजे लक्ष्मणराव हे ह्या दोन्ही वर्गांतील पुरुष नव्हत. ज्या मराठेशाहींतील थोर पुरुषांनीं नागपूर-वऱ्हाडच्या भागापासून तों थेट बंगालपर्यंत एके काळीं आपला अंमल स्थापला होता, त्या भोंसले कुळांतील राजवैभवसंपन्न कुळाच्या एका शाखेंत राजे लक्ष्मणराव जन्माला आले होते. नागपुरचे राजे रघोजीराव ह्यांचे ते धाकटे सावत्र बंधु. हे जेव्हां जन्माला आले होते, त्या वेळेला ह्या भोंसले कुळाचे पूर्वराजवैभव जरी कायम नव्हतें, तरी तें राजवैभव प्रत्यक्ष पाहिलेले अनेक पुरुष त्या वेळीं हयात होते. राजे लक्ष्मणराव जेव्हां विचार करूं लागले असतील, तेव्हां त्यांच्यापुढें पूर्ववैभवाचे सुखसोहाळे कल्पनेनें का होईना, पण एकीकडे उभे रहात असावेत, व दुसरीकडे त्या राजवैभवाला कीड लागलेली वस्तुस्थिति दिसत असावी. एका बाजूला हिमनगाची उंची आणि दुसरीकडे तितकीच खोल दरी उभी असली, व अशा ठिकाणीं विचारी मनुष्यास उभें केलें, ह्मणजे त्यास काय वाटत असावें ? हिमनग चढण्याची तीव्र इच्छा जर त्याच्या मनाला शिवली तर चढण तर चढतां यावयाचीच नाहीं, पण उलट अत्यंत भयानक व खोल अशा दरींत जाऊन आदळूं असेंच त्यास वाटावयाचें. बरें, दरींतच उडी घ्यावी तर जाणूनबुजून मृत्यूला कवटाळण्याचें पाप लागतें. ह्याप्रमाणें वर चढतां येत नाहीं व खालींही जातां येत नाहीं, अशा स्थितींत विचारी मनुष्याला आहे त्या स्थितींतच धैर्य धरून काळ कंठावा लागतो. असा काळ कंठतांनासुद्धां भीति जीवाला असतेच. हिमालयाच्या उंचीकडे पहावें तर तो आंगावर कोसळून पडतो कीं काय असें वाटावयाचें, आणि पायाखालील भयानक खोलीकडे पहावें तर भोंवळ येऊन खालीं तोल जातो, कीं काय असें भासावयाचें. ह्मणून वरहि पहावयाचें नाहीं हें बंधन व खालींहि पहावयाचें नाहीं हें बंधन. अशाप्रकारें खालून व वरून पारतंत्र्याच्या यातना उपभोगण्याचा प्रसंग ज्या वैभवसंपन्न कुळांत जन्मलेल्या पुरुषांना येतो, त्यांत

पुरुषांच्या शीलाची व धर्माची वाढ क्वचितच होते. राजकुळांत जन्मलेल्या थोर पुरुषाचें अधःपतन होत असल्याचें जें आपण अनेकदां पाहतों, तें ह्यामुळेंच. तें आपल्या कुळाचें व शीलाचें अधःपतन ज्या पुरुषानें टाळलें, तो एक तेजःपुंज तारा कसा नव्हे ? जातिवंत कांहीं तेज व सामर्थ्य असल्यावांचून अशा परिस्थितींत अधःपतन टाळणें मोठें कठिण असतें. आणि हें कठीण कार्य ज्यानें सुकर करून दाखविलें, असा अलीकडच्या राजघराण्यांत जन्मलेला थोर पुरुष ह्मणून अखिल महाराष्ट्रांत राजे लक्ष्मणराव भोंसले ह्यांच्याकडे बोट दाखवावें लागेल. राजपुत्रांच्या हस्तें जें शिवस्मारक पुणें येथें उभारलें त्यास छत्रपतीच्या आश्रयानें वाढलेल्या राजकुळांनीं द्रव्यसहाय्य केलें असलें, तर नवलच नाहीं. ह्या मदतींत छत्रपतीविषयींच्या आदरापेक्षां बादशहाच्या पुत्राविषयींच्या आदराचेंच प्रतिबिंब अधिक. पण रायगड-स्मारक-कमिटीचा अध्यक्ष होणें, व तेथील शिवोत्सवाचा अध्यक्ष होण्याचा मान मिळणें, ह्यांत शिवछत्रपतीविषयींच्या शुद्ध आदराचेंच फक्त एक चिन्ह आहे. हा मान कोणत्या राजपुरुषास आजवर मिळाला व कोणीं तो स्वीकारण्याचें धैर्य दाखविलें ? तो मान फक्त राजे लक्ष्मणराव भोंसलेच मिळवूं शकले व त्यांनींच तो घेतला, ह्यांतच त्यांचें धैर्य होतें, हिंदुत्वावरील निष्ठा होती व शिव-देवावरील पवित्र श्रद्धा होती; आणि, वर शिखरावर जसा मी चढावयाचा नाहीं व त्याच्या उंचीकडेंहि पहावयाचा नाहीं, तद्वतच पायाखालील खोलींतहि मी जाऊन आदळणार नाहीं व तिकडे लक्षहि देणार नाहीं, ही त्यांची निश्चल मनोवृत्तिही होती.

राजे लक्ष्मणराव हे विद्वान राजे महाराजे ह्यांत मोडत नव्हते. ते मराठी लिहायला व वाचायाला शिकले. पुढें इंग्रजी समजेल एवढें ज्ञानहि त्यांनीं संपादन केलें. शरीरसंपत्तीची आवड, गायनवादन इत्यादि कलेची गोडीहि त्यांना होती. त्याबरोबरच लोक व धर्म ह्यांवरहि त्यांची प्रीति होती. ह्यावर त्यांची प्रीति होती, ह्मणूनच अलीकडचा ब्राह्मण व ब्राह्मणेतरवाद त्यांच्यापुढें गेला असतां, 'अरे, कसला ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद घेऊन बसलां, ' असें ते ह्मणत. स्वतःच्या सद्‌गुणाविषयीं ज्यांना विश्वास असतो, ते हा भेद करीतच नाहींत; मग तो ब्राह्मण असो वा अ-ब्राह्मण असो. त्यांच्या येथील धर्म कृत्यें व लग्न-मुंजी ह्या वैदिक कर्मानें होत. स्वतःच्या क्षात्रकुलाविषयीं त्यांना विश्वास होता, ह्मणून वैदिक कर्म करावयास ब्राह्मण त्यांच्या दारांत लोळले निवडणुकी आल्या कीं त्यांच्यापुढें ब्राह्मणब्राह्मणेतरवाद

येई. ' हिंदु ह्मणवा, मी कोणासहि मदत करतों, ' हीच वाणी त्यांच्या मुखांतून बाहेर पडे. नागपुरच्या एका सरदारास ब्राह्मणेतर ह्मणविण्याचें खूळ लागलें, आणि तो ब्राह्मणेतर ह्मणूनच तेथील म्युनिसिपल-निवडणुकींत उभा ठाकला. ' तूं ब्राह्मणतर हें नांव सोड व निवडून जा,' असा राजेसाहेबांचा त्यास सल्ला होता. पण त्यानें तो ऐकला नाहीं. शेवटीं राजेसाहेबांनीं आपल्या वाड्यांतील पुजारीच हिंदु ह्मणून त्या सरदाराविरुद्ध निवडणुकींत उभा केला व त्यास निवडून आणलें. आणि निवडणुकीपायीं भंगूं पाहणारा हिंदुसमाज संघटित केल्याचें चित्र नागपूर शहरास दाखविलें. नागपुरांत हिंदु-मुसलमानांचा लढा उत्पन्न झाला, व हिंदूंच्या दिंडीस मनाई झाली; तो मनाई-हुकूम सरकारानें मागें घ्यावा ह्मणणारांत जे नागपुरांतील थोर पुरुष अग्रभागीं होते, त्यांत राजे हेहि एक प्रमुख होते. नागपुरांत एका मशिदीवरून हिंदूंची मिरवणूक जाणें कठिण होतें, त्या वेळीं ' मी बरोबर येतों ' असें ते डॉ. मुंजे ह्यांना ह्मणाले. डॉ. मुंजे ह्यांनी ' आपण येऊं नका, ' म्हणून परोपरीनें राजेसाहेबांस विनविलें. शेवटीं 'मी मोटारींतच बसून राहीन,' हा अट मान्य करून ते मशिदीसमोर आले. डॉ. मुंजे मोटारींतून उतरले व ज्या मशिदींतून दगडांचा वर्षाव सुरू झाला होता, त्या मशिदीसमोर उभे राहिले. जातांना डॉ. मुंजे ह्यांनीं राजेसाहेबांच्या रक्षणाची योग्य तरतूद केली होती. पण, ' डॉ. मुंज्यांसारखा एक ब्राह्मण धर्मरक्षणार्थ दगडांचा वर्षाव होत असतां, मशिदीसमोर जीव धोक्यांत घालून जातो आणि मी धर्मरक्षण करणाऱ्याच्या कुळांत जन्म घेऊन मोटारींत बसून राहतों,' ही कल्पना राजेसाहेबांस असह्य झाली. ते मोटारींतून उठले आणि डॉ. मुंजे ह्यांच्या पाठीशीं छाती पुढें करून उभे राहिले. पुढें दगडांचा वर्षाव बंद झाला आणि डॉ. मुंजे मागें वळून पाहतात तों राजे लक्ष्मणराव भोंसले उभे! ह्या वेळीं ह्या उभयतांच्या मनांत कोणत्या श्रेष्ठ भावना उचंबळल्या असतील ! क्षत्रियाचा व ब्राह्मणाचा धर्म एक. तो एकमेकांनीं एकमेकास सहाय्य करूनच रक्षिला पाहिजे. तेथें मी तूं-चा सुद्धां भेद नाहीं. मग जातीचा रे कसला भेद ! 'जात' 'जात' हे शब्द लफंग्याकरितां आहेत. राष्ट्रवीराकरितां व धर्मवीरांकरितां ते नाहींत, हें ह्या प्रसंगानें साऱ्या महाराष्ट्रास शिकविलें. राजेसाहेब ह्या पवित्र भावनेचे होते, ह्मणूनच ते पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र-हिंदुधर्मपरिषदेचे अध्यक्ष झाले होते.

ह्या धर्मवीरानें कोणत्याहि हिंदूकडे जात ह्या दृष्टीनें पाहिलें नाहीं. मुसलमानाकडेहि ते ह्या भावनेनें पहात नव्हते. त्यांच्या आश्रयावर वाढलेले मुसलमान नागपुरांत आहेत आणि ह्मणूनच सर्व प्रकारची जनता राजेसाहेबांवर प्रेम करीत होती. जनतेला प्रेमानें वश करणारा हा राजा राजकुळांत, ह्या भारतांत एकुलता एकच. ह्मणूनच ते लोकनियुक्त संस्थांत निवडून गेले होते व तेथें त्यांनीं निःस्वार्थ-बुद्धीनें लोकसेवा केली. अशाप्रकारें राजकुलोत्पन्न थोर पुरुषाची जीवज्योति अकस्मात् पुणें येथें विझली व नाशीक येथें त्या देहाच्या देऊळास अग्निही लागला. सयाजीराव गायकवाडांचे चुलत जामात, आणि तंजावरच्या राजकुळाचे हे जामात कायमचेच दृष्टिआड झाले ! पण त्यांचे थोर गुण व शील ह्यानंतर जर राजकुळांत मग ते राजकुळ ब्राह्मणांचें असो वा अब्राह्मणांचे असो—निर्माण झाले, तर राजा व प्रजा हे भेद तर दूरावतीलच; पण आपसांतील स्वार्थी जातिमत्सरहि लयास जाईल. हे गुण शिकल्यानें अगर शिकविल्यानें येत नाहींत; ह्याकरितां जातिवंतच पुरुष पाहिजे. राजेसाहेब हे असे ह्यामुळेंच जातिवंत थोर पुरुष झाले त्यांच्या गुणांचा उदय होऊन त्या प्रकाशांत जातिमत्सराचें सैतान लयास जाईल व हिंदु संघटित व कार्यक्षम होतील ह्यांत तिळप्राय संशय नाहीं. कारण, हे गुण ईश्वरी होत. त्यांचा लोप होत नाहीं. या गुणांनीं क्षत्रिय-मराठा खरा क्षत्रिय राहील; ह्या गुणांनीं ब्राह्मण खरा ब्राह्मण राहील; हे गुण जर अस्पृश्यांत येतील तर अस्पृश्य अस्पृश्य, राहणार नाहींत. असा काळ महाराष्ट्रांत लवकरच उगवणार. ह्मणूनच त्यांच्या निधनानें अखिल—महाराष्ट्रांतील सर्व प्रकारची जनता शोकमग्न झालेली दिसते. हा मान गेल्या वीस-पंचवीस वर्षांत कोणत्याही राजकुलोत्पन्न पुरुषास लाभला नाहीं. ह्मणूनच राजसाहेब हे एक मानवांतील दैदिप्यमान् तेजोनारायण होत. हा तारा तुटला खरा; पण त्याचें तेज गुणाच्या व कीर्तीच्या रूपानें आहेच आहे. आणि त्यामुळेंच महाराष्ट्राच्या भाग्योदयाची पुन्हां आशा आहे.

## परिशिष्ट २ रें

वैद्यालंकृति देवी धन्वंतरी श्री. रंगुबाईसाहेब यांनीं श्री. कुं. प्रतापसिंह भोंसले यांचे उपनयनाचे वेळीं केलेला काव्यात्मक अहेर.

## ॥ सोन्याचा दिवस ॥

चालः—उद्धवा शांतवन कर जा.

दिन उगवे सोन्याचा कीं । आनंदाच्या बरसत सरि कीं ॥
झुळझूळ सरिता वाहे । मंद्र समीरण त्यावरि पोहे ॥
सुगंध सुमनें हंसती । भृंग-ततीही त्यावरी जमती ॥
सुरम्य नीलाकाशीं । रमती हे पाक्षि सखीशीं ॥
जणुं भरलें जग आनंदें । सुख सगळें तेथें नांदे । जीव नटला कीं त्या मोदें ।
नयनांतुनि आनंदाच्या । जलधारा स्रवती या कीं ॥ १ ॥

नागपूर शहरामाजीं । उत्सव हो मंगल आजीं ॥
शुभ दशमी फाल्गुन मासीं । नच उपमा त्या मोदासी ॥
मन रमलें आनंदानें । मन हरलें सुविचारानें ॥
मन डोले बोले कैसें । बावरलें कीं मन हें तैसें ॥
स्वकरें लाउनि तरुला । सुफलें त्यातें बघुनी डोळां । मोद मनाला तविं जहाला ।
नयनांतुनि आनंदाच्या । जलधारा स्रवती या कीं ॥ २ ॥

सुकुमार प्रतापाचा । नृप बालक ज्येष्ठ सुताचा ॥
वेदोक्त प्रकारें साचा । व्रतबंधहि होतां त्याचा ॥
प्रासादीं सकलां लोकां । आनंदाच्या येती लाटा ॥
नागरीक लोकां जैसा । अनुभवही गमला ऐसा ॥
द्विज बालक बघुनी नयनीं । कृतार्थ झालों ह्मणुनी । हा मोद साहेना स्वमनीं ।
नयनांतुनि आनंदाच्या । जलधारा स्रवती या कीं ॥ ३ ॥

हा प्रेम—पसारा जगतीं । सुखदाचि व्हावा सकलहि रीतीं ॥
आयुष्य कीर्ति संपत्ती । चिर नांदो याच कुटुंबीं ॥
अंगीकृत कार्यामाजीं । सुयशाची लाभो प्राप्ती ॥
दर दिन या प्रासादीं । उगवो शुभ रामप्रसादीं ॥
विनति ऐशी करिते । रंगुबाई ही स्वमतें । जगदीशातें स्तवितें ।
सार्थक जन्माचें होई । आनंदाच्या दिनीं विलोकीं ॥ ४ ॥

## परिशिष्ट ३ रें.

# · राजेसाहेबांवरील तीन दुःखद प्रसंग.

१ **श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाईसाहेबांचा मृत्युः**—राजेसाहेबांचा द्वितीय विवाह झाल्यानंतर सुमारें एका वर्षानें त्यांच्या प्रथम पत्नि श्री. सौ. राणी अन्नपूर्णाबाईसाहेब यांना क्षयाच्या विकारानें पछाडलें. औषधी उपचार अनंत प्रकारानें करण्यांत आले; परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग न होतां त्या तारीख २७ जून सन १९१५ इ. रोजीं दिवंगत झाल्या. त्या मोठ्या सुस्वभावी आणि प्रेमळ होत्या. राजवाड्यांतील नोकर चाकर माणसांवर त्यांचा जसा दरारा होता. त्याचप्रमाणें सर्वांना लेंकराप्रमाणें मानून त्यांचा सांभाळही त्या करीत. त्यांचा स्वभाव मोठा उदार होता गरीबगुरीबांना त्या पैशाची नेहेमीं मदत करीत असत. त्यांच्या मृत्यूनें राजेसाहेबांना फार दुःख झालें. त्यांना आपल्या संसारांतील सुखदुःख समान मानणारा प्रेमळ सांगाती गेल्याप्रमाणें वाटलें. त्यांच्या सुस्वभावाची राजेसाहेब अखेरपर्यंत आठवण काढीत असत.

२ **श्री. मातोश्री राणी काशीबाईसाहेबांचा मृत्यु**—राजेसाहेबांनीं मातोश्रींना मातृदैवत मानलें होतें. त्या वार्धक्यामुळें अलिकडे फारच क्षीण झाल्या होत्या. त्यांना डोकें दुखण्याचा विकार जडला; त्यांतून त्या औषधोपचारानें बऱ्या झाल्या. पण तेव्हांपासून त्यांची अशक्तता वाढत गेली शेवटीं त्या नाशीक मुक्कामी तारीख २६ एप्रील सन १९२५ इ० रोजीं कैलासवासी झाल्या. त्यांचा अंत्यविधि नाशीक मुक्कामीं श्रीयशवंतराव महाराज यांच्या समाधीजवळ वेदोक्त पद्धतीनें करण्यांत आला. त्याच स्थानीं त्यांची छत्री बांधण्यांत आली त्या छत्रीचा कोनशीला समारंभ श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( डॉ० कुर्तकोटी ) याचे हस्तें करण्यांत आला. मातृवियोगाचा राजेसाहेबांवर हा दुसरा दुःखद प्रसंग ओढवला !

३ **श्री. सौ. ताराराजे यांचा मृत्युः**—राजेसाहेबांना प्रथम कुटुंबापासून श्री. सौ. ताराराजे या एकच कन्या होत्या. त्याच्यानंतर बरेंच दिवस अपत्य नसल्यामुळें त्यांचेच सर्व लाड पुरविण्यांत आले. त्यांनाही त्यांचे मातोश्रीप्रमाणें क्षयाचा विकार जडला. औषधोपचार, हवा पालटणें वगैरे सर्व इलाज थकून त्यांना शेवटीं तारीख २१ जुलै सन १९३१ इ. रोजीं देवाज्ञा झाली. त्यांची देवब्राह्मण यांचे ठिकाणीं मोठी श्रद्धा होती. आजारीपणांतही त्यांचें स्नान, देवधर्म, पूजा, जप वगैरे सर्व आन्हिक चालूच होतें. रोज सुमारें पंधरा तास त्यांचे याच देवधर्मांत जात. त्यांना मरेपर्यंत चांगली स्मृति होती. शेवटीं परमेश्वराचे नामस्मरणांतच त्यांचा अंत झाला. राजेसाहेबांवर त्यांच्या मृत्यूचा हा तिसरा दुःखद प्रसंग ओढवला !

## परिशिष्ट ४ थें.

पुण्याच्या महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेंत भाग घेतलेल्या

### मुख्य शास्त्री पंडितांची यादी.

इ० स० १९२४ जून महिन्यांत तारीख २८।२९।३० तारखेस पुणें मुक्कामीं हिंदुधर्म परिषदेचें जें अधिवेशन झालें, त्या वेळीं तीनही दिवस परिषदेंत भाग घेतलेल्या शास्त्री–पंडितांचीं नांवें—

१ वे० शा० सं० नारायणशास्त्री मराठे–वांई, २ वे० शा० सं० श्रीधर शास्त्री पाठक–पुणें, ३ वे० शा० सं० धुंडिराजशास्त्री दीक्षित अग्निहोत्री, ४ वे० शा० सं० बापटशास्त्री पांचवडकर ५ वे० शा० सं० महादेवशास्त्री दिवेकर- वांई, ६ वे० शा० सं० वारेशास्त्री–नाशिक, ७ वे० शा० सं० फडकेशास्त्री–अहमदनगर, ८ वे० शा० सं० बापटशास्त्री–धुळें, ९ वे० शा० सं० गर्गेशास्त्री–नाशिक, १० वे० शा० सं० सिद्धेश्वरशास्त्री चित्राव–पुणें, ११ वे० शा० स० लक्ष्मणशास्त्री जोशी–निपाणी, १२ वे० शा० सं० पांडुरंगशास्त्री पालये बदलापूर

## परिशिष्ट ५ वें.

राजेसाहेबांनीं पुण्यास केलेल्या लघुरुद्रांत भाग घेतलेल्या

### मुख्य वैदिक ब्राह्मणांची यादी.

इ. स. १९२६ च्या एप्रिल महिन्यांत रायगडावरील महोत्सवानंतर राजसाहेबांनीं पुण्यास तारीख ९।४।२६ रोजीं जो लघुरुद्र केला त्यांत भाग घेतलेल्या मुख्य वैदिक ब्राह्मणांचीं नांवें:—

| | |
|---|---|
| १ वे. शा. सं. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव | २ वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री ताह्मनकर |
| ३ ,, अनंतशास्त्री जोशी | ४ ,, मोरभट लिमये |
| ५ ,, व्यंकटरमणाचार्य मण्णूरकर | ६ ,, दिगंबरशास्त्री भाटवडेकर |
| ७ ,, रामकृष्णशास्त्री भिडे | ८ ,, शंकरशास्त्री दाते |
| ९ ,, शिवरामभट दामले | १० ,, नारायणशास्त्री भाटवडेकर |
| ११ ,, शंकरभट जोशी | १२ ,, हरभटजी वाटवे |
| १३ ,, गंगाधरभट गोखले | १४ ,, केशवभट ढवळे |

१५ ,, रामभट चितळे
१६ ,, दत्तंभट भाटवडेकर
१७ ,, रामभट जोशी
१८ ,, शंकरभट धूपकर
१९ ,, नागनाथभट पोळ
२० ,, दामोदरभट पाठक
२१ ,, काशीनाथभट कर्वे
२२ ,, निळंभटजी
२३ ,, शंकरभटजी सहस्रबुद्धे
२४ ,, दिगंबरभट गांगल
२५ ,, मुरलीधरभट जोशी
२६ ,, सदाशीव भटजी भिडे
२७ ,, सीताराम अनंत भिडेशास्त्री
२८ ,, गजाननभटजी कर्वे
२९ ,, भास्कर हरीशास्त्री अभ्यंकर
३० ,, शंकर भटजी चितळे
३१ ,, शिवराम भास्करभटजी केळकर
३२ ,, अनंतभटजी पालये
३३ ,, चिंतामणभटजी लुकतुके
३४ ,, अनंत शंकरभटजी राजोपाध्ये
३५ ,, भास्कर भटजी केळकर
३६ ,, रामचंद्रभट जोशी पुणतांबेकर

वगैरे वगैरे वगैरे.



४८३०



## परिशिष्ट ६ वें

[ हें मानपत्र खादीच्या कपड्यावर छापलें आहे.]

॥ श्री १०८ ॥

# राजेबहादूर लक्ष्मणरावजी भोंसले की सेवामें समर्पण ।

श्रीमान राजा साहिब,

इस धमतरी म्युनिसिपाल्टी की आयु अभिप्राया ४५ वर्ष की है । इस प्रान्त के इस प्रकार की अन्य संस्थाओंकी तुलनामें अभी इसकी केवल बाल्यावस्था ही है । परन्तु जो कुछ सेवा इस संस्थाने इस नगरकी की है वह उत्साहहीन नहीं है ।

इस नगरकी नींव कब पडी यहबात इतिहासके अदृश्य पन्नों में होगी, पर इसमें सन्देह नहीं कि यह नगर आपके पूर्वजोंका गौरव युक्त काल देखचुका है । अभीतक इस नगरके मर्द ब्राह्मण व मरहठे आपके पूर्नजोंकी सेवाके उपहार में स्थावर पुरस्कार पा कर उसीसे आनंदपूर्वक अपना काल या पत्र करते हुए आपके नामस्मरण कर रहे हैं ।

हिंदुस्थानके आधुनिक इतिहासका आधा हिस्सा आपही के पूवजों का कीर्तनगान कर रहा है । ७० वर्ष पहिले यह नगर आपके पूर्वजोंकेही साम्राज्यकें अंतर्गत था । पद दलित हिंदुओंको पुनः संघटणकर तथा हिंदुमुसलमानों की राजनैतिक एकता स्थापित करके प्रजा तंत्र शासन पद्धतिका पुनरुद्धार करनेका श्रेय आपके पूर्वजोंकोही है । गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपती शिवाजी महाराज भोंसले जो प्रत्यक्ष शिवके अवतार समझे जाते है और जिनकी प्रतिमा महाराष्ट्रमें घरघर पूजी जाती है उनके वंशजको यह सन्मानपत्र समर्पण करके धमतरी म्युनिसिपाल्टी अपना गौरव समजती "

नथ्थूजीराव जगताप

सेडेन्ट म्यु० पाल कमिटी धमतरी.

REFBK-0004837